# मध्यवर्ती कारागृहातील बंद्यांचा चिकित्सक अभ्यास

(हर्सूल मध्यवर्ती कारागृह, औरंगाबाद)

**टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे**

समाजशास्त्र विषयातील

विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीसाठी

सादर केलेला शोधप्रबंध


**संशोधक**

**सुधीर बसवंत गायकवाड**

**मार्गदर्शक**

**प्रा.डॉ. श्रीकांत गायकवाड**

प्रपाठक व प्रमुख, संशोधन केंद्र, समाजशास्त्र विभाग,

महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर


**जुलै २०१४**

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या नेहरु सामाजिकशास्त्रे पदव्युत्तर विभाग **समाजशास्त्र** विषयाच्या विद्यावाचस्पती (पीएच.डी.) या पदवीसाठी **श्री सुधीर बसवंत गायकवाड** यांनी **"मध्यवर्ती कारागृहातील बंद्यांचा चिकित्सक अभ्यास"** (हर्सूल मध्यवर्ती कारागृह,औरंगाबाद) या विषयावर शोध प्रबंधाचे काम माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केले आहे.

सदर शोधप्रबंधामध्ये त्यांनी नमूद केलेली माहिती व संशोधनात्मक विधाने ही माझ्या माहितीप्रमाणे बरोबर आहेत. सदर माहिती त्यांनी इतरत्र कोठेही वापरली नाही.

ठिकाण :

**मार्गदर्शक**

दिनांक :जुलै २०१४

प्रा.डॉ. श्रीकांत गायकवाड

प्रपाठक व प्रमुख, संशोधन केंद्र, समाजशास्त्र विभाग,

महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर

# प्रतिज्ञापत्र

मी संशोधक **सुधीर बसवंत गायकवाड** लिहून देतो की, **मध्यवर्ती कारागृहातील बंद्यांचा चिकित्सक अभ्यास (हर्सुल मध्यवर्ती कारागृह, औरंगाबाद)** या प्रबंधातील सर्व माहिती मूळ संदर्भातुन संकलित केली असून त्याचा योग्य त्या ठिकाणी तसा उल्लेख केला आहे. सदर माहितीचा या प्रंबंधा व्यतिरिक्त अन्य कोठेही उपयोग केलेला नाही.

ठिकाण : **संशोधक**

दिनांक :

सुधीर बसवंत गायकवाड

# अनुक्रमाणिका


| अ.क्र. | प्रकरणाची शीर्षके | पृष्ट क्रमांक |
|---|---|---|
| | प्रतिज्ञापत्र | |
| | प्रमाणपत्र | |
| | मनोगत | |
| | सारणी विवरण | |
| प्रकरण १ ले | प्रस्तावना | १-६१ |
| प्रकरण २ रे | संशोधन पध्दती व संदर्भ साहित्याचा आढावा | ६२-१११ |
| प्रकरण ३ रे | कारागृह प्रशासन व कार्यपध्दती | ११२-१३९ |
| प्रकरण ४थे | बंद्यांची वैयक्तिक, कौटुंबिक, आर्थिक, सामाजिक, माहीती | १४०-१८६ |
| प्रकरण ५ वे | बंद्यांची आरोग्य, मानसिक, केलेल्या अपराधासंबंधी माहिती | १८७-२२२८ |
| प्रकरण ६ वे | बंद्यांना दिल्या जाणाऱ्या सुविधा व गृहीत कृत्यांची पडताळणी | २२९-२८७ |
| प्रकरण ७ वे | सारांश, निष्कर्ष व शिफारशी | २८८-३२० |
| | परिशिष्टे | ३२१-३३१ |
| | संदर्भ ग्रंथसूची | ३२२-३२५ |
| | मुलाखत अनुसूची | ३२६-३३१ |

# तक्ता विवरण /Table Index


| तक्ता क्र | तक्त्यांची शीर्षके | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| **प्रकरण दुसरे** | | |
| २.१.१ | कारागृहातील बंद्यांची संख्या | ६७ |
| | **प्रकरण तिसरे** | |
| ३.१ | कारागृहात बंद्यांना मिळणारे साहित्य | ११७ |
| ३.२ | बंद्यांना स्वच्छतेसाठी मिळणारे साहित्य | ११८ |
| ३.३ | प्रशासकीय रचना | १३२ |
| **प्रकरण चौथे** | | |
| ४.१ | **बंद्याची वैयक्तिक माहिती** | |
| ४.१.१ अ) | बंद्यांचे वयनिहाय वर्गीकरण | १४२-१४३ |
| ४.१.१ ब) | बंद्यांचे वयनिहाय वर्गीकरण | १४४ |
| ४.१.२ | बंद्यांचा धर्म | १४६ |
| ४.१.३ | बंद्यांची जात | १४८ |
| ४.१.४ | बंद्यांचे शिक्षण | १५० |
| ४.१.५ | बंद्यांचे मूळ राहण्याचे ठिकाण | १५२ |
| ४.१.६ अ) | बंद्यांची वैवाहिक स्थिती | १५३-१५४ |
| ४.१.६ ब) | बंद्यांची वैवाहिक स्थिती | १५५ |
| ४.१.७ अ) | बंद्यांचा व्यवसाय | १५५-१५६ |
| ४.१.७ ब) | बंद्यांचा व्यवसाय | १५७ |
| ४.२ | **कौटुंबिक माहिती** | |
| ४.२.१ | बंद्यांच्या कुटुंबाचे सध्या राहण्याचे ठिकाण | १५९ |
| ४.२.२ | बंद्यांच्या कुटुंबातील सदस्य संख्या | १६१ |
| ४.२.३ | बंद्यांच्या कुटुंबांचा प्रकार | १६१ |
| ४.२.४ | बंद्यांच्या कुटुंबातील शिक्षित व्यक्तींची संख्या | १६३ |
| ४.२.५ | बंद्यांला शिक्षा झाल्याने कुटुंबांवरील होणारे परिणाम | १६४ |

| | | |
|---|---|---|
| ४.२.६ | बंद्यांची कुटुंबांबद्दल आपलेपणाची भावना | १६५ |
| ४.२.७ | बंद्यांला कुटुंबीयांची आठवण | १६६ |
| ४.२.८ | कुटुंबातील सदस्यांचा गुन्हा | १६७ |
| ४.२.९ | कुटुंबातील सदस्याने केलेला गुन्हा | १६८ |
| ४.२.१० | कुटुंबांतील सदस्याला झालेली शिक्षा | १६८ |
| ४.२.११ | कुटुंबातील गुन्ह्यात बंद्यांचा सहभाग | १६९ |
| ४.२.१२ | त्यात बंद्यांला झालेली शिक्षा | १७० |
| ४.२.१३ | कारागृहाबाहेर बंद्यांचे मित्र | १७१ |
| ४.२.१४ | कारागृहाबाहेरील बंद्यांच्या मित्रांचा व्यवसाय | १७१ |
| ४.२.१५ | मित्रांची कुटुंबाला मदत | १७२ |
| ४.२.१६ | मित्रांच्या मदतीचे स्वरुप | १७३ |
| ४.३ | **बंद्याची आर्थिक माहिती** | |
| ४.३.१ | बंद्यांला स्वतःची जमीन | १७४ |
| ४.३.२ | बंद्यांला असलेली एकूण जमीन | १७५ |
| ४.३.३ | कुटुंबांचे सध्या उत्पन्नाचे साधन | १७६ |
| ४.३.४ | बद्यांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न | १७७ |
| ४.३.५ | बंद्यांच्या घराचे स्वरुप | १७९ |
| **४.४** | **बंद्यांची सामाजिक माहिती** | |
| ४.४.१ | बंद्यांचा सामाजिक कार्यातील सहभाग | १८१ |
| ४.४.२ | बंद्यांच्या कुटुंबांचे समाजातील स्थान | १८२ |
| ४.४.३ | सामाजिक नियमांचे पालन | १८३ |
| ४.४.४ | बंद्यांची ईश्वरावरील श्रध्दा | १८४ |
| ४.४.५ | बंदी मतदान करत होता काय ? | १८५ |
| | **प्रकरण पाचवे** | |
| ५.१ | बंद्यांची मानसिक व आरोग्यविषयक माहिती | |
| ५.१.१ | बंद्यांला संगीत गाण्याची आवड | १९० |
| ५.१.२ | बंद्यांला आवडणाऱ्या संगीत गाण्याचे स्वरुप | १९० |

| | | |
|---|---|---|
| ५.१.३ | बंद्यांची चित्रपटाची आवड | १९१ |
| ५.१.४ | बंद्यांची आरोग्य तपासणी | १९५ |
| ५.१.५ | बंद्यांला सध्या असलेला आजार | १९६ |
| ५.१.६ | बंद्यांला सध्या कोणता आजार आहे ? | १९६-१९७ |
| ५.१.७ | बंद्यांच्या आजारावर उपचार | १९७ |
| ५.१.८ | बंद्याचे व्यसन | १९८ |
| **५.२.** | **बंद्यांने केलेल्या अपराधाबाबतची माहिती** | |
| ५.२.१ | बंद्यांने केलेला गुन्हा | २०२-२०५ |
| ५.२.२ | बंद्यांने केलेल्या गुन्ह्यात लोकांचा सहभाग | २०८ |
| ५.२.३ | कुटुंबांतील व्यक्तींचा सहभाग | २१० |
| ५.२.४ | कुटुंबांतील कोणत्या सदस्यांचा सहभाग | २११ |
| ५.२.५ | गुन्हा करण्याचे कारण | २१२-२१३ |
| ५.२.६ | बंद्यांला झालेली शिक्षा | २१६ |
| ५.२.७ | बंद्यांने खरोखरच गुन्हा केला काय | २१८ |
| ५.२.८ | गुन्हा घडल्याने चूक झाली अशी भावना | २१९ |
| ५.२.९ | गुन्ह्याचे वर्तन करावे वाटले काय | २२० |
| ५.२.१० | गुन्ह्याप्रसंगी बंद्याने केलेले व्यसन | २२२ |
| ५.२.११ | गुन्ह्याप्रसंगी बंद्याने कोणते व्यसन केले होते ? | २२२ |
| ५.२.१२ | शिक्षा संपूर्ण घरी गेल्यावर करणारे काम | २२३ |
| ५.२.१३ | कुटूंब, समाज बंद्याचा स्वीकार | २२५ |
| ५.२.१४ | बंद्यांच्या शिक्षेतील माफी | २२७ |
| ५.२.१५ | बंद्यांची माफ झालेली शिक्षा | २२८ |
| | **प्रकरण सहावे** | |
| ६.१ | बंद्यांला कारागृहात मिळणाऱ्या  सुविधा | |
| ६.१ (अ) | बंद्यांना मिळणारा आहार | २३२-२३३ |
| ६.१ (ब) | बंद्यांना मिळणारा आहार | २३५ |
| ६. २ | बंद्यांना मिळणारे मुबलक व स्वच्छ पाणी | २३६ |

| | | |
|---|---|---|
| ६. ३ | बंद्याच्या राहण्याच्या ठिकाणाचे वातावरण | २३७ |
| ६. ४ | बंद्याचे कारागृहातील मित्र | २३८ |
| ६. ५ | बंद्यांना दिले जाणारे प्रशिक्षण | २३९ |
| ६. ६ | बंद्यांनी कोणते प्रशिक्षण घेतले/ घेत आहे | २४० |
| ६. ७ | किती लोक प्रशिक्षण घेतात ? | २४१ |
| ६. ८ | प्रशिक्षणाचा भविष्यातील फायदा | २४१ |
| ६.९ | बंद्यांचे सोबती बंद्यांसोबत कसे वागतात ? | २४२ |
| ६.१० | बंद्यांच्या कामाचे तास | २४४ |
| ६.११ | बंद्यांला मिळणारा कामाचा मोबदला | २४५ |
| ६. १२ | बंद्यांना मिळणाऱ्या मोबदल्याची नोंद | २४६ |
| ६. १३ | बंद्यांना मिळणारा प्रथमोपचार | २४६ |
| ६.१.१४ | बंदी सध्या शिक्षण घेत आहे काय ? | २४८ |
| ६. १५ | बंदी कोणते शिक्षण घेत आहे ? | २४९ |
| ६. १६ | कारागृहात होणारे सामूहिक कार्यक्रम | २५१ |
| ६. १७ | सामूहिक कार्यक्रमांत बंद्याचा सहभाग | २५२ |
| ६. १८ | सामूहिक कार्यक्रमांतून मिळणारे मानसिक समाधान | २५३ |
| ६. १९ | बंद्यांचे रिकाम्या वेळेचे नियोजन | २५४ |
| ६. २० | बंद्यांची आवड | २५५ |
| ६. २१ | बंद्यांना कारागृह कर्मचाऱ्याकडून मिळणारी वागणूक | २५६ |
| ६. २२ | घर आणि कारागृह यातील फरक | २५७ |
| ६.२३ | गुन्हेगारी प्रवृत्ती कमी झाली काय ? | २५८ |
| ६. २४ | बंद्यांला भेटायला कोण येतात ? | २६० |
| ६.२५ | बंद्यांना भेटायला कधी येतात ? | २६१ |
| ६.२६ | बंद्याला भेटीसाठीचे नियम | २६२ |
| ६.२७ | कारागृहात होणारे योगा, व्याख्याने, शिबिरे | २६३ |
| ६.२८ | घरी भेटण्यासाठी मिळणारी सुट्टी | २६६ |
| ६.२९ | किती दिवसाची सुट्टी मिळते | २६६ |

| | | |
|---|---|---|
| ६.३० | जामिनावर असतांनाचा खर्च | २६७ |
| ६.१.३१ | बंद्यांवर इतर गुन्हेगारांचा होणारा परिणाम | २६८ |
| ६.१.३२ | झालेल्या शिक्षेबाबत बंद्याचे मत | २६९ |
| ६.१.३३ | कारागृहातील उपक्रमांवर समाधान | २७० |
| ६.१.३४ | कारागृहात कोणत्या सुविधा असाव्यात ? | २७१-२७२ |


## आलेख विवरण /Graph Index


| आलेख क्रं | आलेखाची शीर्षके | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| | **प्रकरण चौथे** | |
| ४.१ | बंद्यांचे वय | १४६ |
| ४.२ | बंद्यांचे शिक्षण | १५१ |
| ४.३ | बंद्यांचे राहण्याचे मूळ ठिकाण | १५३ |
| ४.४ | बंद्यांला असलेली जमीन | १७५ |
| ४.५ | बंद्यांचे वार्षिक उत्पन्न | १७९ |
| | **प्रकरण पाचवे** | |
| ५.१ | बंद्यांचे व्यसन | १९९ |
| ५.२ | गुन्ह्यातील लोकांचा सहभाग | २०९ |

# मनोगत

समाजकार्याचा एक अभ्यासक म्हणून समाजाकडे पाहत असताना समाजात असंख्य समस्या आज मानवाला भेडसावत आहेत. प्रत्येक मानव कोणत्या तरी समस्येने ग्रस्त आहे. (प्रत्येक मानवाच्या स्थल काल परत्वे समस्या वेगवेगळया) प्रत्येक मानव समस्येतून बाहेर पडण्यासाठी प्रयत्नशील आहे. पण मानवाचे प्रयत्न अवैज्ञानिक, अशासकीय आणि असंघटित स्वरुपाचे असल्याने समस्या कमी होण्याऐवजी त्या वाढत असून त्यांचा विपरीत परिणाम मानवी जीवनावर होत आहे. शासकीय व निमशासकीय स्तरांवरुन अशा समस्यांच्या निर्मूलनार्थ अनेक उपक्रम आज चालू आहेत.

समाजकार्य क्षेत्रात अध्यापन कार्याला सुरुवात केल्यानंतर विद्यार्थ्यांना संस्थांची ओळख व्हावी या उद्देशाने समाजकार्य क्षेत्राशी निगडित संस्थांना भेटी दिल्या जातात. याच दरम्यान हर्सूल मध्यवर्ती कारागृह औरंगाबाद या ठिकाणी भेटीचे आयोजन करण्यात आले होते. प्रा. बालासाहेब मुंडे व मी विद्यार्थ्यांसोबत पर्यवेक्षक म्हणून गेलो होतो. संपूर्ण कारागृहाची माहिती तत्कालीन कारागृह उपअधीक्षक मा. श्री भा.म. भोसले साहेब यांनी सविस्तर दिली. भेटी दरम्यान काही बंद्यांशी संवाद साधला, त्यांनी व्यक्त केलेले विचार आणि कारागृहाच्या प्रत्यक्ष पाहणीत कारागृहातील बंद्यांच्या जीवनासंदर्भात मनन, चिंतन केल्याने सर्वसाधारण समाजातील व्यक्ती आणि एखादा अपराध करुन कारागृहात आल्यानंतर त्यांची परिस्थिती या विषयी सविस्तर माहिती घ्यावी असे वाटू लागले आणि या संदर्भात सहकारी प्रा. व तुरुंग अधिकारी यांच्याशी चर्चा करून कारागृहातील कैद्यांचा अभ्यास करण्याचे निश्चित झाले.

कारागृहातील बंद्या संदर्भात संशोधनात्मक अभ्यासाची प्रथम प्रेरणा तत्कालीन उपअधीक्षक मा.श्री. भा. म. भोसले साहेब यांनी निर्माण केली. संस्था ओळख भेटीनंतर भोसले साहेबांची भेट घेऊन या अध्यनासंदर्भात सविस्तर चर्चा केली. त्यांनी सांगितले आजपर्यंत संशोधनात्मक अभ्यास झाला नाही, फक्त समाज कार्याचे विद्यार्थी येतात, क्षेत्रकार्य करतात असे त्यांनी सांगितले. संशोधनात्मक अभ्यासासाठी मा. कारागृह उपमहानिरीक्षक मध्य विभाग यांची परवानगी आवश्यक आहे, त्यांच्या परवानगीने बंद्यां संदर्भात संशोधनात्मक अभ्यास करता येईल आणि हे अतिशय महत्वपूर्ण आणि आवश्यक आहे, कारण आजची कारागृहे ही कारागृहे न राहता ही सुधारालये बनली आहेत. मानवतावादी दृष्टिकोनातून कैद्यांना वागणूक दिली जाते. यांच्यामध्ये सुधारण्यासाठी अनेक प्रयत्न केले जातात. याची प्रत्यक्ष समाजाला माहिती असत नाही त्यामुळे कारागृहा संदर्भात समाजात अनेक गैरसमज आहेत. त्यामुळे संशोधनात्मक अभ्यासातून असे गैरसमज दूर होऊ शकतात. त्यासाठी हा संशोधनात्मक अभ्यास होणे आवश्यक आहे, असे सांगितले

त्यामुळे मा. श्री भा.म. भोसले साहेब यांच्या मानसिक पाठबळातून प्रस्तुत विषयावर संशोधनात्मक अभ्यासाला सुरुवात झाली.

संशोधनाला सुरुवात करण्यापासून परवानगी, तथ्य संकलन, प्रत्यक्ष कारागृह पाहणी, वेळोवेळी मार्गदर्शन, आवश्यक तेथे सूचना मा.श्री. भा.म. भोसले साहेबांनी दिल्या. त्यामुळे संशोधन कार्य अतिशय यशस्वीपणे पार पडले. त्यासाठी प्रथम त्यांचे आभार व्यक्त करणे प्रथम कर्तव्य आहे.

प्रस्तुत संशोधनासाठी मार्गदर्शक म्हणून महात्मा बसवेश्वर महाविद्यालय लातूर येथील समाजशास्त्र विभाग प्रमुख, गुरुवर्य आदरणीय **प्रा.डॉ. श्रीकांत गायकवाड** सर लाभले. संशोधन विषयाच्या निवडीपासून संशोधनाचे कार्य पूर्ण होईपर्यंत त्यांचे सखोल आणि अतुलनीय मार्गदर्शन लाभले. त्यांचे सखोल ज्ञान आणि मार्गदर्शनामुळेच माझे संशोधनात्मक अध्ययन पूर्ण करु शकलो. मी त्यांचा सैदव ऋणी राहुन मनःपूर्वक आभार व्यक्त करतो.

अध्ययनाचे कार्य करत असताना कर्मवीर प्रतिष्ठान जालना संस्थेचे अध्यक्ष मा. डॉ. संजय लाखे पाटील सर यांनी संशोधनात्मक कार्यासाठी प्रोत्साहित केले. त्यांचे प्रोत्साहन आणि प्रेरणामुळेच माझे संशोधनात्मक कार्य पूर्ण झाले. त्यामुळे त्यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करतो.

तू खूप शिकाव शिक्षणातील पीएच.डी. प्राप्त करावी हे स्वप्न वंदनीय **" अण्णा आणि काकीचे ."** माझ्या शिक्षण आणि आयुष्याच्या प्रत्येक वळणावर मैलाचा दगड म्हणून त्यांनी काम केले. मुळात मी पीएच.डी. प्राप्त करावी ही प्रबळ इच्छा अण्णांची. ते मला हमेशा उच्च शिक्षणाबद्दल मार्गदर्शन करत असत. त्यांच्या प्रेरणा, मार्गदर्शन आणि सतत पाठपुरावा त्यामुळेच माझे संशोधनाचे कार्य पूर्ण झाले. सदैव त्यांच्या ऋणांत राहू इच्छीतो.

माझ्या आयुष्याच्या सुख दुःखात प्रत्यक्ष सहभागी होऊन **अण्णा काकी** नंतर ज्यांनी अनेक प्रकारचा माझ्यासाठी त्रास सहन करुन मला यशस्वी बनवण्यात ज्यांचा सिंहाचा वाटा आहे ते माझे **दीदी आणि भाओजी** अर्थात **आयु. उषा चंद्रकांत कांबळे** त्यांच्या पाठबळामुळेच आणि सहकार्यामुळे माझे संशोधनाचे कार्य पूर्ण करु शकलो. तसेच सौ.विजया बोरा दीदी, माझी छोटी बहीण सौ.किरण, मेहुणे लक्ष्मण कांबळे, भाऊ सुमित, कु.पौर्णिमा, सौ. रोहिणी, प्रा.डॉ. प्रकाश शिंदे, सौ.माया शिंदे,आशीष शिंदे, सौ. पुष्पा वहिनी, बाबासाहेब हिरवे, संकेत बोरा यांची प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सहकार्य लाभले. यांच्या मानसिक पाठबळामूळेच हे संशोधनाचे कार्य पूर्ण करु शकलो. तसेच डॉ. प्रशांत, डॉ. वर्षाराणी, डॉ. सोनम यांनीही वेळोवेळी मला सहकार्य केले.

कर्मवीर प्रतिष्ठानचे संचालक मा. नरेंद्र लाखे पाटील सर यांचे मार्गदर्शन आणि प्रेरणा यामुळे संशोधन कार्यात खुप मदत झाली त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करतो. संशोधनासाठी विषयाच्या निवडीपासून अहवाल लिखाणापर्यंत मला प्रत्यक्ष सहकार्य करुन मार्गदर्शन करणारे महाविद्यालयाचे प्राचार्य आदरणीय डॉ. राजकुमार म्हस्के सर यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करतो. त्यांच्या विषेश मार्गदर्शनानेच माझे संशोधनाचे कार्य पूर्ण झाले आहे.

माझ्या संशोधन कार्यासाठी प्रत्यक्ष सहकार्य केले ते प्रा. बालासाहेब मुंडे, प्रा. मधू खोब्रागडे, प्रा. प्रवि ाण कनकुटे, प्रा. नरसिंग पवार, प्रा. दीपक बुक्तरे, प्रा. विक्रम राठोड, प्रा.डॉ. रेणुका भावसार प्रा. मीना बोर्डे यांच्या सहकार्य आणि मार्गदर्शनामुळे संशोधन कार्य पूर्ण झाले, त्यामुळे सर्व प्राध्यापक वृंदांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करतो. संशोधनासाठी ग्रंथालयातील पुस्तके वेळोवेळी देऊन ग्रंथापाल प्रा. विकास लाखे, सहा. ग्रंथपाल शिवाजी पिडगे, श्याम कांबळे यांनी सहकार्य केले त्याबद्दल त्यांचे आभार व्यक्त करतो.

माझ्या संशोधन कार्यासाठी मार्गदर्शन करणारे माझे मित्र आयु. प्रा.डॉ. सतीश गवई, प्रा.डॉ. रामचंद्र भिसे(नांदेड), प्रा. चांगदेव मुंढे, प्रा. संतोष निलाखे (सातारा), प्रा.डॉ. विलास मगर (पुणे), प्रा. डॉ. विशाल जाधव (पुणे) प्रा.संतोष शेंडे (नागपूर), प्रा.डॉ. एस.एम. नाईकवाडे (औढा नागनाथ), प्रा. लहुकुमार खंडाळे, प्रा.विक्रम गायकवाड (बारामती) या सर्वांच्या सहकार्यामुळेच माझे संशोधन कार्य पूर्ण झाले त्याबद्दल वरील सर्वांचे मी आभार व्यक्त करतो.

प्रत्यक्ष संशोधन कार्यास तत्कालीन कारागृह महानिरीक्षक मा.उध्दव कांबळे साहेब, कारागृह उपमहानिरीक्षक मध्य विभाग औरंगाबाद, हर्सूल मध्यवर्ती कारागृहाचे अधीक्षक मा. वैभव कांबळे साहेब, वरिष्ठ तुरुंग अधिकारी मा. सुधाकर कांबळे, मा.एस.ए. हार्दे, मा. बाळराजे निमगडे, मा. संजय मयेकर, मा. गजानन सरोदे मा. साबळे साहेब तसेच कारागृहातील कर्मचारी डॉक्टर्स, शिक्षक व इतर कर्मचारी त्यांच्या सहकार्यामुळेच संशोधन कार्य पूर्ण करु शकलो. त्याबद्दल या मान्यवरांचे मनःपुर्वक आभर व्यक्त करतो. ज्यांनी प्रत्यक्ष माहिती दिली ते सर्व बंदी यांनी मदत केल्यानेच माझे संशोधनाचे कार्य पूर्ण झाले. त्याबद्दल सर्वांचे मनःपुर्वक आभार व्यक्त करतो. बंदी संजय वळवी, गणेश निमगडे, राजाभाऊ सोनपसारे, संजय पारोदे यांनी कारागृहात संशोधन कार्यात विशेष सहकार्य केले त्याबद्दल त्याचेही मनःपुर्वक आभार व्यक्त करतो.

संपूर्ण शोध प्रबंध टाईपरायटिंग करुन तो अतिशय सुवाच्च व आकर्षक बनवून देण्यात निखील शेलार,मुकेश उदावंत यांनी मोलाचे सहकार्य यांचेही आभार व्यक्त करतो. माझ्या संशोधन कार्यास ज्यांचे, ज्यांचे प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष सहकार्य लाभले अशा सर्व मित्रांचे, मार्गदर्शक, हितचिंतकांचे आभार व्यक्त करतो.

सुधीर ब. गायकवाड

सहा. प्राध्यापक

शंकररावजी चव्हाण समाज विज्ञान व संशोधन

महाविद्यालय जालना.

## प्रकरण पहिले

### प्रस्तावना

१.१ प्रस्तावना

१.२ गुन्हा , गुन्ह्याचे स्वरूप, व्याख्या, प्रकार

१.३ गुन्हेगारांचे प्रकार

१.४ शिक्षा व्यवस्था - व्याख्या, सिध्दांत, उद्देश,प्रकार

१.५ कारागृहः व्याख्या, उद्देश, इतिहास

१.६ कारागृह सुधाराचे दिल्ली मॉडेल

१.७ खुले कारागृह - खुल्या कारागृहाचा भारतातील प्रयोग

१.८ परिविक्षा : व्याख्या आणि महत्त्व

१.९ अभिवचन : व्याख्या, अभिवचन व परिविक्षा यातील फरक

## १.१ प्रस्तावना

मानव हा समाजशील प्राणी आहे. मानवाच्या उत्पत्तीनंतर मानव आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी समुह करुन राहू लागला. मानवी गरजा पूर्ण करत असतांना आपल्या बुध्दीच्या जोरावर मानवाने अनेक नव नवीन शोध लावले. विज्ञान व तंत्रज्ञानात मोठ्या प्रमाणावर प्रगती झाली, यातून मानवी जीवन सुखकर होऊ लागले. समाजात व्यक्ती जीवन जगत असताना वर्तन कसे करावे याची नियमने ठरवून दिली आहेत. पण प्रत्येक व्यक्ती या नियमाप्रमाणे वर्तन करतेच असे नाही. व्यक्ती स्वार्थापोटी इतरांना दुःख देऊन आपला स्वार्थ साधतात. म्हणजेच समाजविघातक कृत्ये करतात. अर्थात गुन्हा करतात. गुह्याचे स्वरूप स्थल, कालपरत्वे बदलत असते. गुन्ह्याची प्रवृत्ती मात्र दिवसेंदिवस वाढत आहे हे गुन्ह्याच्या वाढत्या प्रमाणावरुन आपणास लक्षात येते.

गुन्हा आणि गुन्हेगार हा समाजातील स्थाई घटक असून तो प्राचीन काळापासून आजच्या आधुनिक युगापर्यंत आला असून पुढेही असेच राहणार आहे. अपराध म्हणजे कायद्याने ठरवून दिलेल्या नियमांविरुध्द वर्तन होय. असे वर्तन कारणाऱ्यास तुरुंगात, सुधारगृहांत किंवा तत्सम जागी डांबून ठेवण्याची शिक्षा दिली जाते. नीती शास्त्रदृष्ट्या कोणतेही अनैतिक कृत्य म्हणजे गुन्हा होय. गुन्हा ही प्रवृत्ती असून असे वर्तन करणारा तो गुन्हेगार, जी व्यक्ती असते. गुन्ह्याचे वर्तन होण्या पाठीमागे अनेक कारणे कारणीभूत असतात पण तत्कालीन समाजात ते वर्तन गुन्ह्याचे मानले जाते.

समाजात गुन्ह्याचे प्रमाण वाढू नये अर्थात समाजात विघटन कमी प्रमाणात व्हावे यासाठी औपचारिक नियंत्रणाची व्यवस्था अस्तिवात आहे. पोलीस, न्यायालय, तुरुंग त्यांच्या माध्यमातून असे नियमबाह्य, कायदाबाह्य वर्तन करणाऱ्यांना विशिष्ट काळाची शिक्षा होते. शिक्षा व्यवस्था ही सुध्दा गुन्ह्या प्रमाणेच प्राचीन काळापासून आजच्या आधुनिक काळापर्यंत तिचे स्वरूप बदलत आले आहे. प्राचीन काळात जशास तसे ही शिक्षा व्यवस्था अस्तित्वात होती. राजे रजवाड्यांच्या काळात ओसाड, निर्जळ, ठिकाणी अशा गुन्हेगार व्यक्तींना शिक्षा भोगण्यासाठी पाठवत असत. हद्दपार, तडीपार किंवा स्थलांतर करणे अशी शिक्षेची नावे होती. यात गुन्हेगार कधी कधी जिवंत परत येत नसे, गुन्हेगाराला समाजापासून दुर लोटावे हा त्या मागचा हेतू होता, त्यामुळे समाजात इतर लोकांवर त्याचा प्रभाव पडत असे. सामाजामध्ये दहशत बसल्याने इतर लोकांनी असे कृत्य करू नये ही भावना या शिक्षेमागे होती.

कारागृहाचा इतिहास प्राचीन असून तत्कालीन कारागृहे ही कैद्यांना पीडा देणारी संस्था म्हणून ओळखले जात होते, यातून कैद्यांमध्ये अपराधाची भावना अधिक प्रमाणात निर्माण होत असत. मध्ययुगीन कारागृहे

सुध्दा अतिशय प्रकाशहीन कठोर वागणूक किड्यांनी युक्त अशी अवस्था होती. कारागृहांचा उल्लेख कैद्यांना कब्रस्तानाकडे घेऊन जाणारे कमरे असा केला जात होता. स्त्री, पुरुष, बालके त्यांना एकत्र ठेवले जात असे, पुढे मात्र यामध्ये काळाप्रमाणे बदल होऊ लागला.

शिक्षा व्यवस्थेत सुधारणा होऊन कारागृहांची निर्मिती झाली. शिक्षा व्यवस्था गुन्हा प्रवृत्तींना कमी करण्यासाठी अत्यंत महत्वपूर्ण असून आज शिक्षा व्यवस्थेत आमुलाग्र बदल झालेला दिसतो. वॉल्टर सी. रेकलेस यांनी पाच प्रकारच्या दंड व्यवस्था प्रचलित असल्याचे सांगितले आहे.

१८-१९ व्या शतकापासून सामाजिक सुधाराला सुरुवात झाली. माणुस हा परिस्थितीशी सामावून घेताना चुकतो, असमर्थ ठरतो म्हणून तो नियमबाह्य वर्तन करतो. अशा व्यक्तींना समाजापासून काही काळ दुर ठेवावे पण त्याला जीवन जगण्याची पुन्हा एकंदा संधी द्यावी अशी विचारधारा पुढे येऊ लागली. कैदी हाही माणुस आहे, त्याला माणसाप्रमाणे वागवावे असा मानवतावादी दृष्टिकोन पुढे आला आणि शिक्षा व्यवस्थेत आमुलाग्र बदल झाला. सुधारणा करण्यासाठी शिक्षा गुन्हेगाराला शिक्षा भोगत असताना त्यामध्ये सुधारणा करण्यासाठी अनेक मार्गानी प्रयत्न केले जातात. जर किरकोळ, गुन्हा प्रथम गुन्हेगार असेल तर त्याला ताकीद देऊन सोडले जाते. गुन्हेगाराच्या हातून गंभीर स्वरूपाचा गुन्हा घडला असेल तर त्या पाठीमागची पार्श्वभूमी अत्यंत वाईट आणि समाजविघातक स्वरूपाची आहे असे लक्षात आले तर त्याला समाजापासून काही काळ दूर ठेवणे योग्य आहे. त्या उद्देशाने त्याला कारागृहात ठेवले जाते, कारागृहात त्याच्याशी मानवतावादी दृष्टिकोनातून वर्तन केले जाते. त्याला योग्य प्रशिक्षण शिक्षण देऊन त्यामध्ये सुधारणा करण्यासाठी प्रयत्न केले जातात.

गुन्हेगार हा रोगी आहे आणि त्याचा रोग बरा होईपर्यंत त्याला कारागृहात ठेवण्याची शिक्षा देणे हा आधुनिक दृष्टिकोन जोपासणारी शिक्षा व्यवस्था आहे. तुरुंगात वेगवेगळ्या मार्गानी बंद्यांमध्ये सुधारणा करण्यासाठी प्रयत्न केले जातात. कारागृह ही एक संस्था मानली जाते. येथे येणारा गुन्हेगार बाहेर पडताना सामान्य नागरिक म्हणून बाहेर पडावा यासाठी सर्वागीण प्रयत्न केले जातात.

२० व्या शतकातील कारागृहे ही कारागृहे न राहता सुधारालये बनली आहेत. सुधारणा आणि पुनर्वसन या अंतर्गत आजची कारागृहे मार्गक्रमण करीत आहेत. किरण बेदी यांनी आदर्श कारागृहाचा नमुना म्हणून दिल्ली येथील तिहार कारागृह निर्माण केला, कारागृहातील कैदी ही मानव आहेत.

त्यांच्या सोबत चांगले वर्तन करणे गरजेचे आहे. असे किरण बेदीने, प्रत्यक्ष वर्तनातून घडवून आणले. आज कारागृहात बंद्यांना सर्व काही सुविधा अत्यंत चांगल्या मिळतात. त्यातून चांगला नागरिक

बनण्याची संधी त्यांना मिळते. कारागृहात पॅरोल, खुले कारागृह यांची ही सुविधा बंद्यांना दिली जाते. म्हणजे कारागृहात एखादा कैदी गेला म्हणजे त्याचे पुनसामाजीकरण करुन त्यामध्ये सुधारणा करण्यासाठी प्रयत्न केले जातात. कारागृहात बंद्यांना आहार, आरोग्य, मनोरंजन, प्रशिक्षण, अत्यंत चांगल्या प्रतीचे व पध्दतीचे दिले जाते. जेणे करुन त्यांच्या मानसिकतेमध्ये बदल होतो. बऱ्याच बंद्यांना कारागृहे हा घरच वाटतात, येथील कर्मचारी बंद्यांशी अतिशय प्रेमाणे वागतात. फक्त बाहेरील समाजात कारागृहाबद्दल बरेच गैरसमज आहेत असे वाटते. कारागृह हे सुधारगृह, सुधारसंस्था, सुधारालय असून मानवतावादी दृष्टिकोन येथे अमलात आनला जातो.

समाजात आज जी जीवघेणे स्पर्धा वाढली, यातून बहुसंख्य लोक कमी श्रमात जास्त फळ मिळवण्यासाठी नीतिमुल्यांना पायदळी तुडवतात आणि अपराधाची कृत्ये करतात. त्यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे त्यामुळे कारागृहात आज क्षमतेपेक्षा अधिक बंदी आढळून येतात. याचा परिणाम म्हणून कारागृहात ज्या सोई दिल्या जातात त्यावर पडतो. कारागृह कर्मचाऱ्यांवर ताण पडतो, परिणामी स्वतंत्र, वैयक्तिक लक्ष देणे होत नाही, त्यामुळे कारागृहातील वाढणारी गर्दी थांबवणे काळाची गरज आहे समाजात त्या पध्दतीचे समुपदेशन होणे गरजेचे आहे. ज्यामुळे कारागृहात चांगल्या सेवा, सोई देता येईल आणि हे सुधारालय अबाधित राहील.

कारागृहात निमशासकीय संस्था अर्थात सेवाभावी संस्था यांचा सहभाग वाढवला पाहिजे. म्हणजे वाढत्या गर्दीत सूध्दा बंद्यांच्या मानसिकतेमध्ये चांगल्या प्रकारचे बदल आपणास घडवून आणता येतील.

## १.२ गुन्हा (Crime)

मानव हा समाजशीलल प्राणी आहे. मानवाच्या उत्पत्तीपासून मानवाने आपला गरजा भागविण्यासाठी इतरांचे सहकार्य मिळवले आहे. इतरांसोबत वागताना अर्थात वर्तन करताना कशा प्रकारे वर्तन करावे या संदर्भात अतिप्राचीन काळात अलिखित नियम होते. मानव जसजशी प्रगती करु लागला तसतशी स्वार्थी वृत्ती मानवात वाढू लागली. म्हणजेच आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी पुढच्या व्यक्तीला इजा करणे त्याच्या इच्छेविरुध्द कृती करुन आपल्या गरजा भागऊ लागला. अर्थात मानवी वर्तनाचे जे नियम होते त्याच्या विरुध्द वर्तन करणे म्हणजेच गुन्हा करणे होय असे समजले जाऊ लागले.

आज जसे समाजाच्या विरुध्द वर्तन करणे अर्थात नियमांचे उल्लंघन करणे म्हणजेच गुन्हा करणे होय. गुन्हा हा प्रत्येक मानवी समाजाचा एक अविभाज्य घटक बनला आहे. आज वाढती गुन्हेगारी ही संपूर्ण जगापुढील प्रमुख समस्या बनली आहे. कारण समाजाचे विघटन होण्यासाठी गुन्हा हा अत्यंत महत्त्वपुर्ण घटक मानला जातो.

अपराधामुळे समाजातील चालू असलेली घडी विस्कटने त्यातून समाजात अस्वस्थता, अशांतता अशी भावना निर्माण होते. गुन्हा म्हणजे समाजाविरोधात व बेकायदेशीर वर्तन आहे असे मानले जाते.

गुन्हा हा आज आंतरराष्ट्रीय पातळीवरील अत्यंत महत्त्वपुर्ण आणि गंभीर समस्या म्हणुन याकडे पाहिले जाते, कारण गुन्हा ही एक प्रवृत्ती आहे. यामध्ये एखाद्या व्यक्तीला दु:ख, हानी पोहचवणे, त्याच्या मालमत्तेचे नुकसान करणे, अशा  अनेक उद्देशाने असे कृत्ये केली जातात. आंतरराष्ट्रीय दहशतवाद ही कोणा एका देशाची समस्या राहिली नसून संपूर्ण जगाची समस्या बनली आहे.

गुन्ह्याचे प्रमाण संपूर्ण जगभर वाढते आहे. गुन्हे वाढले म्हणजे भीती, धोके, अस्वस्थता असुरक्षितता आणि अनिश्‍चितता वाढते. म्हणजेच सामाजिक तणाव वाढतात आणि यातून समस्या निर्माण होतात. अर्थात गुन्हा आणि गुन्हेगारी ही कोणत्या एका राज्य, देशापुरती मर्यादित नसुन तिचे स्वरूप जागतिक आहे. समाजशास्त्राचे अभ्यासक गुन्हासंदर्भात **प्रा. फ्रॅंक टानेन बाम,** म्हणतात की, " गुन्हा ही शाश्‍वत टिकणारी बाब आहे. जेथे जेथे समाज आहे, समाज नियमांची साधने आहेत, सामाजिक मूल्ये, प्रमाणके आहेत तेथे तेथे व्यक्तींना ती डावलून त्या विरोधी कृत्य करण्याची संधी केव्हाना केव्हा तरी येते आणि गुन्हे समाजातील एक परिचित सामाजिक घटना होऊन बसतात. " [१] (सुधा काळदाते. २००५. )

अर्थात गुन्ह्याचे आजचे वाढते प्रमाण पाहून आपणास गुन्हा ही अतिशय परिचीत संकल्पना झाली आहे. कारण समाजातील प्रत्येक व्यक्ती असे समाजाचे नियम डावलून आपला स्वार्थ साधण्यासाठी प्रयत्न करतात. म्हणून गुन्हा हे समाजाचे एक अविभाज्य अंग बनले आहे. गुन्ह्याचे अस्तित्व शाश्‍वत असून ते चिरकाल टिकणारे आहे. फ्रॅंक टन्नबूम म्हणतात की, "जसा आजार, रोग आणि मृत्यू हे नियमित अस्तित्वात राहणारे आहेत तसाच गुन्हा हा राहणार आहे. "

क्राईम या शब्दासाठी मराठीत गुन्हा तर हिंदीत अपराध, जुर्म, कसुर, दोष, उपकृत्य, पातक, पाप इ. शब्द वापरले जातात.

Crime हा शब्द लॅटिन भाषेतील "क्रीमेन" (Crimen) पासुन तयार झाला आहे. याचा अर्थ "निर्णय देणे " असा होतो. ग्रीकमध्ये क्रिमेन (Crimen) शब्दाचा अर्थ अलगाव असा आहे. संकल्पनेच्या स्वरूपात  हा निर्णय असाच बोध होतो. कालांतराने क्रिमेन (Crimen) हा शब्द ग्रीक  आणि लॅटिन मधील निर्णय असा अर्थ न राहता किंवा संस्कृत मधील कर्म शब्द (जो निर्णय या शब्दाच्या अगदी जवळचा आहे.) यांचा पर्याय न राहता अपकर्म अपकृत्य, गुन्हा असे स्थान घेतला आहे. जे कृत्य नाही, क्रिया योग्य नाही जे कर्मामध्ये अधर्म आहे ते कुकर्म होय आणि गुन्हे आहे. गुन्हा किंवा अपराध या संदर्भात डॉ. एस.चंद्रकुमार

---

१)    गुन्हेगारी आणि शिक्षा पध्दती - सुधा काळदाते. २००५

राय म्हणतात की, "अमेरिका में अपराधी के लिए डैंलिन्क्वेंन्ट और अपराध के लिए डैलिक्वेन्सी शब्दोंकाभी पर्यायवाची प्रयोग किया जाता है : " [२] (डॉ.एस.कुमार रॉय. २००४)

- **गुन्ह्याचे स्वरुप**

गुन्हा ही संकल्पना जागतिक स्वरूपाची आहे. पण गुन्हा या संकल्पनेचा अर्थ प्राचीन काळापासून आजच्या आधुनिक काळापर्यंत स्थळ, कालपरत्वे बदलला आहे असे जाणवते. गुन्ह्याच्या ज्या व्याख्या केल्या जातात त्यांच्यामध्येही विभिन्नता जाणवते.

**१)** गुन्हा हा प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे असे म्हणत असताना मानवाच्या प्रारंभिक अवस्थेत मानवाच्या बुध्दीचा विकास झाला नव्हता. तेव्हा तो कोणत्याही घटनेचे स्पष्टीकरण हे देव, दानव पाप, पुण्य इ. संदर्भात करत असे अर्थात ईश्वराची संकल्पना मोठया प्रमाणावर मानली जात होती, म्हणजे जे वर्तन इतरांना दुःख पोहचवणारे आहे ते वर्तन ईश्वराविरुध्दच वर्तन अर्थात गुन्हा मानले जात होते. एखाद्या व्यक्तीकडुन गुन्हाचे वर्तन झाले तर त्याला भूत, पिशाच या सारख्या अमानवी शक्तींनी झपाटलेले असते असे मानले जात होते. आजही ग्रामीण, आदिवासी भागांमध्ये काही प्रमाणात ही प्रवृत्ती आपणास पाहावयास मिळाले.

**२)** १२ व्या व १३ व्या शतकामध्ये धर्माचे प्राबल्य मोठ्या प्रमाणावर होते व राजेशाही व्यवस्था याच काळात असल्याने धर्म आणि राजसत्तेच्या विरुध्द वर्तन म्हणजे गुन्हा समजले जात होते. येथे राजद्रोह, बलात्कार आणि ईश्वरी निंदा ही कृत्ये गुन्ह्याची कृत्ये मानली जात होती. तसेच धर्मविरोधी कृत्य म्हणजेच धर्माच्या आचरणाविरुध्द कृत्य म्हणजेच गुन्हा समजला जात होते.

धर्माचे पावित्र्य हे धर्माने दिलेल्या नियमांचे पालन केल्याने आणि त्याचे पावित्र्य राखणे सर्वांचे कर्तव्य समजले जात होते. जो कोणी धर्माच्या नियमांचा भंग करील. त्याला धर्माच्या नियमानुसार शिक्षा दिली जात होती.

**३) नैतिक संकल्पना :-**

गुन्ह्याच्या संदर्भात धर्माच्या आणि राजाच्या प्रभावानंतर व्यक्तीच्या वर्तना संदर्भात काही नीति नियम आले, म्हणजे व्यक्तीचे वर्तन करताना समाजाने मान्य केलेल्या नीतिमुल्यांचे पालन करावे यामध्ये योग्य - अयोग्य, चूक - बरोबर, पवित्र - अपवित्र, नैतिक-अनैतिक अशा प्रकारे मानवी वर्तनाचे वर्गीकरण केले गेले.

---

२) विवेचनात्मक अपराधशास्त्र - डॉ. एस. चंद्रकुमार राय - पृष्ठ क्रं. ३९.

व्यक्तीने समाजात संघटन ठेवण्यासाठी नीतिमूल्याप्रमाणे वर्तन करावे. त्यामुळे समाजाचे एकात्म रूप, एकसंद्य रूपाने होईल या उलट नीतिमूल्यांच्या विरुध्द वर्तन म्हणजे ते वर्तन निषिध्द मानले आहे. असे वर्तन केले तर गुन्ह्याचे वर्तन ठरेल अशी धारण होती. या संदर्भात **वेस्टरमार्क** म्हणतात की, "एखाद्या समाजातील प्रथा आणि कायदे हे त्या समाजातील नीतिमत्ता विषयक कल्पनावर आधारलेले असतात. त्या विरुध्द होणारे वर्तन हे समाजाच्या दृष्टीने गुन्हा असते. "[३] (प्रा. माणिक माने. १९९९ )

**४) मध्ययुगीन कालखंड**

**१७ व्या शतकात** मानवी बुध्दीचा विकास होत होता. याच कालखंडात प्रबोधन, विज्ञान तंत्रज्ञानातील विकास सामाजिक, आर्थिक परिवर्तनांमुळे युरोपमध्ये मोठया प्रमाणात परिवर्तन होत होते. या परिवर्तनामुळे गुन्ह्याची संकल्पनाही बदलली. अर्थात गुन्ह्याचा शास्त्रीय पध्दतीने अभ्यास सुरू झाला आणि पुढे १८ व्या शतकात गुन्ह्यासाठी जो व्यक्ती अपराध करतो, तोच जबाबदार असतो हे तत्त्व प्रस्थापित झाले. अर्थात गुन्हेगारी वर्तनाचा विचार हा निर्मित कायद्यांच्या संदर्भात केला जाऊ लागला. अर्थात प्रचलित कायद्याच्या विरोधात होणारे वर्तन म्हणजे गुन्हा मानला जाऊ लागले.

- **गुन्हा - व्याख्या**

गुन्हा ही मानवी प्रवृत्ती आहे. गुन्हा हा प्राचीन काळापासुन आजच्या आधुनिक समाजापर्यंत अस्तित्वात आहे. पण गुन्ह्याचे स्वरुप प्राचीन काळापासुन आधुनिक काळापर्यंत कसे बदलत गेले हे आपण पाहिले. अर्थात गुन्ह्याची व्याख्याही अनेक बाजुने केली जाते. अर्थात गुन्हा ही संकल्पना स्पष्ट करतांना गुन्ह्याचा शास्त्रीय पध्दतीने केलेला अभ्यास हा महत्त्वपुर्ण मानला जातो. शास्त्रीय पध्दतीच्या अध्यायनातूनच गुन्ह्याच्या अनेक बाजु समोर आल्या आणि त्या पुढे ठेवून अभ्यासकांनी व्याख्या केल्या. गुन्ह्याची कायदेशीर व्याख्या, समाजशास्त्रीय व्याख्या, सामाजिक कायदेशीर व्याख्या, मनोवैज्ञानिक व्याख्या अशा प्रकारच्या विविध व्याख्या केल्या जातात.

❖ **कायदेशीर व्याख्या :-**

गुन्ह्याच्या अभ्यासकांनी कायदा डोळ्यांपुढे ठेवुन गुन्ह्याच्या व्याख्या केल्या आहेत. या संदर्भात व्याख्या अत्यंत महत्त्वपुर्ण मानल्या जातात. या संदर्भात प्रा. माणिक माने म्हणतात कि "A,आजची फौजदारी न्याय व्यवस्था ही कायदाधीष्ठीत आहे. B) सर्व गुन्हेगारांचे केले जाणारे अनुभवाधिष्ठित अभ्यास हे गुन्हेगारीची कायदेशीर व्याख्याच विचारात घेऊन केले जातात. C) गुन्हेगारीविषयक सांख्यिकी आकडेवारी किंवा शासकीय अहवाल हे पण गुन्ह्याच्या कायदेशीर व्याख्येवरच आधारलेली असतात आणि

---

३) गुन्हेगारीशास्त्र - प्रा. माणिक माने, पृष्ठ क्र. १६

महत्त्वाचे म्हणजे ही व्याख्या निश्चित निसंदिग्ध आणि मोजमाप योग्य असते. वरील कारणास्तव आपल्याला गुन्हेगारीचा कायदेशीर दृष्टिकोनातून विचार करावा लागतो. ही गुन्हेगारीची कायदेशीर संकल्पना होय."[४] (प्रा. माणिक मान. १९९९)

गुन्ह्याची कायदेशीर व्याख्या करतांना व्यक्तीचे कृत्य तेव्हाच गुन्ह्याचे होते जेव्हा ते कृत्य कायदयाने निशिध्द करुन अशा कृत्याला शिक्षा केलेली असली पाहीजे.

**१) टॅपन पॉल :-**

गुन्हा म्हणजे हेतुतः केलेले किंवा न केलेले कृत्य की जे केल्याने फौजदारी कायद्याचे उल्लंघन होते. कोणतेही संरक्षण किंवा समर्थना शिवाय असे कृत्य केलेले असते आणि त्या कृत्याला गंभीर किंवा सौम्य अपराध म्हणून राज्य संस्थेची मान्यता असते.

"Crime is an International Act or omission in violation of criminal law commited without defense of justification and sanctioned by the state as a felony of misdemeanor." **Tappan Paul.**

**२) एम. जे. सेठना :-**

गुन्हा म्हणजे असे कोणतेही केले जाणारे वा न केले जाणारे कृत्य जे संबंधित देशाच्या प्रचलित कायद्यानुसार शिक्षा प्राप्त आहे.

"Crime may be defined as an act or omission, which a society or state has thought fit to punish or ther wise deal with under its laws for the time being in force." **M.J.Sethna.**[५] (कित्ता)

**३) मायकेल अॅडलर :-**

"फौजदारी कायद्याने मनाई केलेले वर्तन म्हणजे गुन्हा होय."

"Crime is an instance of behaviour Prohibited by criminal law." **Michale Adler.**

**४) इलियट तथा मैरिल :-**

"अपराध कानून द्वारा निषिध्द (वर्जित) वह कार्य है, जिसके बदले मे. उसके कर्ता को मृत्यू जुर्माना कैद, काम, घर, सुधार गृह या जेल के द्वारा दंडीत किए जाता है ."

---

४) गुन्हेगारीशास्त्र - प्रा. माणिक माने, पृष्ठ क्र. १७

५) कित्ता - पृष्ठ क्र. १८.

वरील व्याख्येत असे कृत्य कायद्याद्वारे निषिध्द केले आहे. असे कृत्य गुन्ह्याचे असून त्यासाठी त्या व्यक्तीला जेलमध्ये किंवा सुधारगृहात पाठवले जाते.

**५) मावरर :-**

"अपराध कोई भी वह क्रिया है जिसके द्वारा कानून का उल्लंघन होता है ."[६] (डॉ. संजिव महाजन. २००४)

**६) लैडीस और लैडीस :-**

"अपराध वह कार्य है जिसे राज्यने सामूहिक हित के लिए हानिकारक घोषित किया है और जिस के लिए राज्य दंड देने की शक्ती रखता है ."[७] (जीत कृष्णा सिंह. २००१)

"Crime is an act which the state has declared harmful to group welfare and which the state has power to punish"

गुन्ह्याच्या कायदेविषयक व्याख्येचा सारांश असा होतो की, गुन्हा हे एक असे कृत्य, वर्तन आहे जे प्रचलित कायद्याच्या विरुध्द असते. अशा कृत्याला अपराध म्हणून राज्य संस्थेची मान्यता असते.अशा सामाज विघातक कृत्यांमुळे समाजास हानी पोहचते. अपराध किंवा गुन्हा हा समाजात शाश्वत असतो. पण त्याचे स्वरूप मात्र स्थल कालपरत्वे बदलेल्या असतात. पण कायद्याच्या वेगवेगळ्या व्याख्या केल्या जात असल्या तरी बहुसंख्य देशांत कायद्याचे राज्य असल्याने त्या त्या देशाच्या प्रचलित कायद्याचे उल्लंघन करणारे कृत्य हे गुन्ह्याचे ठरते व त्यासाठी त्याच्या देशातील घटनेत विशिष्ट अशी शिक्षा असते. म्हणजे गुन्ह्याची कायदेशीर व्याख्या अत्यंत महत्त्वपुर्ण मानली जाते.

❖ **गुन्ह्याची सामाजिक व्याख्या :-**

गुन्ह्याची कायदेशीर व्याख्या आपण पाहिल्या पण त्यात बऱ्याच प्रमाणात दोष आढळतात. कारण व्यक्ती आपल्या गरजा भागवत असताना तो ज्या समाजात राहतो त्या समाजात काही नियम, रुढी, परंपरा, प्रथा असतात. प्रत्येक व्यक्तीने इतरांसोबत वर्तन करताना आपल्या समाजाचे नियम पाळणे बंधनकारक असते. पण तसे बऱ्याच वेळा जाणवत नाही अर्थात व्यक्ती आपल्या रुढी, प्रथा, परंपरांना धरून वर्तन करेलच असे नाही मग असे वर्तन गुन्ह्याचे होते काय? तर होय, असे नियमबाह्य वर्तन गुन्ह्याचे होते असे समाजशास्त्र सांगते. पण गुन्ह्याच्या या कृती कायद्याच्या भाषेत गुन्हा नाही कारण त्या संदर्भात कायदे नसतील तर तो गुन्हा होऊ शकत नाही. पण समाजाच्या दृष्टीने समाज सुसंघटित राहण्यासाठी काही नियम

---

६) भारत मे सामाजिक विघटन - डॉ. संजिव महाजन - पृष्ठ क्र. १५४.

७) अपराध और दंड शास्त्र - जीत कृष्णा सिंह - पृष्ठ क्र. १३२.

असतात. काही योग्य, अयोग्य असे वर्तनाचे, नियमांचे पालन व्यक्तीने करावे असे असते, जर व्यक्तीने अशा नियमांचे पालन केले नाही तर ते वर्तन गुन्ह्याचे ठरते. कारण त्याच्या वर्तनाचा परिणाम समाज विघटनात होत असतो. म्हणून अनेक समाजशास्त्रज्ञ, विचारवंतांनी गुन्ह्याची सामाजिक व्याख्याही केली आहे. गुन्ह्याची फक्त कायदेशीर व्याख्या करणे योग्य नाही. त्या संदर्भात **थॉर्स्टिन सेलिन** म्हणतात की, "जर मानवी वर्तनशास्त्राचा विकास व्हायचा असेल तर या विषयाच्या संशोधन क्षेत्रातील अभ्यासकांनी फौजदारी कायद्याच्या पकडीतून आपली मुक्तता केली पाहिजे." " If a science of human conduct is to develop the investigation in this field of research must rid him self of shackles which have been forged by the criminal law. **Thorsten Sellin.** "[८] (प्रा. माणिक माने. १९९९)

अर्थात गुन्ह्याच्या वर्तनाच्या कायद्याच्या चौकटीत व्याख्या करणे योग्य नसून मानवी वर्तन, मानवी समाजाचे संघटन, विकास करणारे असावे. जर कायद्याच्या चौकटीतच आपण गुन्ह्याच्या व्याख्या केली तर व्यक्ती असे वर्तन करतील जेणे करुन समाज विघटन होऊन अनेक समस्यांनी ग्रस्त समाज आपणास दिसेल.

आजचे चित्र तसेच आपणास पाहवयास मिळेल. कारण गुन्ह्या संदर्भात समाजशास्त्रीय व्याख्या आहेत. पण त्या संदर्भात शिक्षेची कोणतीच तरतूद त्यामध्ये नसल्याने आज समाजात विघटन मोठ्या प्रमाणावर होत आहे. म्हणून गुन्ह्याची कायदेशीर व्याख्येबरोबरच समाजशास्त्रीय व्याख्याही तेवढ्याच महत्त्वाच्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे.

**१) डॉ. हैकरवाल**

सामाजिक दृष्टिकानसे अपराध व अपचार व्यक्ती का ऐसा व्यवहार है जो मानव संबंधोंकी उस व्यवस्था को बाधा पहुँचाता है जिसे समाज अपने सह अस्तिव की प्राथमिक दशा समझता है।

"From the social point of veiw crime and deliquency implies such behaviour of individhal that interferes with the order of human relatinship which society regards as primary condition of co-existence."

**२) गारोफालो** :-

अपराध, दया, इमानदारी की प्रचलित भावनाओं का उल्लंघन है ।

"A violation of the prevalent sentiments of pity and probity."[९] (जीत कृष्णा सिंह. २००१)

---

८) गुन्हेगारीशास्त्र व्याख्या - प्रा. माणिक माने - पृष्ठ क्र. २०.

९) अपराधशास्त्र और दंड शास्त्र - जीत कृष्णा सिंह - पृष्ठ क्र. ३२,३३

**३) रॅडक्लीफ बाऊन :-**

"प्रचलित चालीरीतीचे उल्लंघन की, जे केल्याने दंड व्यवस्था (शिक्षा पध्दतीचा) अवलंब केला जातो."[१०] (प्रा.माणिक माने. १९९९)

**४) क्लिनार्ड :-**

"अपराध सामाजिक नियमोंसे विचलन है।"

**५) वेस्टर मार्क :-**

"प्रथाएँ व कानून नैतिक विचारो पर आधारित होते है तथा अपराध व्यवहार के वे प्रतिमान है जो समाजद्वारा  अपराध माने जाते है."

**६) सेलिन :-**

"अपराध, व्यवहार, आदर्श प्रतिमान से विचलन यह इसे भंग करना है  या विचलन या भंग समाज द्वारा अपने दण्ड विधान द्वारा दंडित किया जाता है! परंतु दंड मूल्य का एकमात्र आधार नही है धर्म, कला, शिक्षा व अन्य समाजशास्त्रीय अभिकरण भी मूल्यों को प्रकट करते है."[११] (डॉ. संजीव महाजन. २००४)

**७) गिलीन आणि गिलीन :-**

"गुन्हा ही वस्तुतः समाजविघातक अशी कृती असते अथवा ती कृती समाज विघातक आहे असे दाखविले जाते किंवा ती कृती समाजविघातक आहे असा त्या समाजातील एखाद्या लोक समूहाचा विश्वास असतो आणि असा विश्वास इतरांवर लादण्याची सत्ता त्या समूहाला असते आणि असा समूह तसे कृत्य करणाऱ्याला खात्रीशीरपणे शिक्षा करू शकतो."

गुन्ह्याच्या समाजशास्त्रीय दृष्टिकोनातुन अनेक व्याख्या पाहिल्यावर आपल्या लक्षात येते की, व्यक्ती मानवी संबंधांमध्ये बाधा आणणारे वर्तन करते. त्यामुळे समाजात समस्या निर्माण होतात. ज्या समाजात ज्या दया, इमानदारी असते त्या भावनेचे उल्लंघन व्यक्ती करते म्हणजेच गुन्हा करतो.  समाजात काही चालीरीती रीतिरिवाज असतात त्यांचे उल्लंघन केल्यावर समाज त्या व्यक्तीला सामाजिक बहिष्कार इ. अशा शिक्षा देतो. गुन्ह्याची समाजशास्त्रीय व्याख्या सामाजिक नियम, प्रथा, परंपरा याचा भंग करणारे वर्तन म्हणजे गुन्हा असे समजले जाते. वरीलप्रमाणे गुन्ह्याची सामाजिक व्याख्या महत्त्वपुर्ण वाटत असली तरी तिच्यामध्ये अनेक दोष दिसुन येतात. प्रत्येक समाजातील योग्य-अयोग्य, नैतिक-अनैतिक, उचित-अनुचित या कल्पना वेगवेगळ्या असतात.  म्हणून संपूर्ण मानवजातिच्या वर्तनाचा शास्त्रीय पध्दतीने

---

१०) गुन्हेगारीशास्त्र - (प्रा.माणिक माने - पृष्ठ क्र. २०)

११) भारतमे सामाजिक विघटन - (डॉ. संजीव महाजन  - पृष्ठ क्र. १५५)

अभ्यास करून गुन्ह्याची सामाजिक आणि कायदेशीर बाजू यांना एकत्रित करणे गरजेचे आहे. कारण गुन्ह्याच्या कायदेशीर बाजूने सामाजिक बाजूची उणीव आहे व सामाजिक बाजूत कायदेशीर उणीव आहे. त्यामुळे या दोघांना एकत्र करुन गुन्ह्याची व्याख्या करण्याचा प्रयत्न अनेक अभ्यासकांनी केला आहे. तो पुढीलप्रमाणे.

## ❖ **गुन्ह्याची सामाजिक कायदेशीर व्याख्या** (Socio-Legal Concept of Crime)

सामाजिक आणि कायदेशीर व्याख्येमध्ये हे दोन्हीही घटक एकत्रित करुन व्याख्या करण्यात आल्या आहेत.

**१) रैडक्लिफ बाऊन :-**

अपराध उस आचरण का उल्लंघन है जिस के लिए दंड देने की व्यवस्था कि गई है!

**२) लैण्डीस तथा लैण्डीस :-**

"अपराध वह कार्य है जिसको राज्यने समूह के कल्याण के लिए हानिकारक माना है और जिसके प्रति दंड देने की शक्ती राज्य के पास रहती है."

**३) बार्न्स तथा टिटर्स :-**

"अपराध एक ऐसा समाज विरोधी व्यवहार है जिसने सार्वजनिक भावना को कानून से निषिध्द सीमा तक तोडा है !"[१२] (डॉ. संजीव महाजन. २००४)

वरील व्याख्यांवरून आपणास लक्षात येते की, गुन्ह्याची व्याख्या सामाजिक आणि कायदेशीर बाजू एकत्र करून गुन्ह्याची व्याख्या करणे गरजेचे आहे. कारण समूहाच्या अर्थात समाजातील बहुसंख्य व्यक्तींना हानिकारक वर्तन करणाऱ्यांना शिक्षा झाली पाहिजे. तसेच सार्वजनिक भावना ज्याने उल्लंघन केली आहे अशा कृतीला शिक्षा होते.

अर्थात कायदा आणि सामाजिक बाजूच्या व्याख्यांना वर्तमान काळात प्रचलित करणे गरजेचे आहे. त्यामुळे समाज एकसंध राहू शकतो.

## ❖ **गुन्ह्याची मनोवैज्ञानिक व्याख्या :-**

गुन्ह्याची मनोवैज्ञानिक व्याख्या सर्वप्रथम गैरिफैलो यांनी केला. ते म्हणतात,"मनोवैज्ञानिक दृष्टीकोनानुसार गुन्हा हे दया आणि सत्य यांच्या प्रचलित धारणेच्या विरुध्द केलेली कृती होय."

मुख्यतः भारतीय संदर्भात महात्मा गांधी यांचे गुन्ह्याबाबतचे विचार हे मनोवैज्ञानिक जाणवतात. कारण ते म्हणतात की अपराध/गुन्हा घडण्यामागे त्या व्यक्तीची मानसिक, सामाजिक परिस्थिती अवलंबून असते.

---

१२) भारत में सामाजिक विघटन - डॉ. संजीव महाजन - पृष्ठ क्र. १५५

त्यामुळे अपराध्यांना शिक्षा देताना मनोरुग्णावर उपचार केल्यासारखे द्यावे. **महात्मा गांधी** पुढे म्हणतात पापी कृत्याची घृणा करा, पापी व्यक्तीचा नाही.

**१) विलियम इसाक थॉमस :-**

अपराध सामाजिक मनोवैज्ञानिक दृष्टीसे यह कार्य है, जो उस समूह की एकता, संगठन, मतैक्य व समूह बंधन के प्रतिरोधी है, जिस को व्यक्ती अपना समझता है![१३] (डॉ. एस. चंद्रकुमार राय. २००४)

गुन्हा ही मानसिक स्थिती बिघडल्याने होतात. त्यात एखाद्या व्यक्तीच्या कृत्यामधून एकत्मता भंग पावते. त्याचा विपरीत परिणाम समाजावर होतो. मनोवैज्ञानिक दृष्टिकोनातून गुन्हा हा एक मानसिक रोग समजला जातो. आणि अशा गुन्हेगारांना सुधारण्यासाठी विशेष उपचारांची गरज असते असे मनोवैज्ञानिक विचार सांगतो.

थोडक्यात वर स्पष्ट केलेल्या अनेक व्याख्यांच्या तत्त्वांमध्ये स्वयंपूर्णता जाणवत नाही. विशिष्ट विचार विशिष्ट अंगाचाच विचार करतो. वास्तविक पाहता गुन्हा ही संकल्पना बदलती, गतिमान असून ती स्थल, कालपरत्वे सापेक्ष आहे असे जाणवते.

❖ **गुन्ह्याची प्रमुख तत्त्वे :-**

गुन्ह्याच्या विविध व्याख्या पाहिल्या नंतर त्यावरुन आपणास गुन्ह्यामध्ये काही निश्चित प्रकारची तत्त्वे आढळतात ती पुढीलप्रमाणे.

१) गुन्हा ही एक कृती आहे. ती कृती केल्याने पुढच्या व्यक्तीला त्रास, दुःख, वेदना होतात. आणि अशा कृतीबद्दल कायद्याने मनाई असते आणि असे कृत्य करणाऱ्याला विशिष्ट अशी शिक्षा होते.

२) गुन्हा हा ठरवून जाणूनबुजुन केलेला असावा. तर तो गुन्हा घडतो. जर एखादी अकस्मात घटना घडली तर ती गुन्ह्याची होईल पण तिला शिक्षा सौम्य मिळेल. जर आपण रस्त्याने गाडीवरुन जाताना रोडवर एखादा मुलगा अचानक गाडीपुढे आला आणि त्यात त्याचा मृत्यू झाला. म्हणजे येथे गाडीवाली व्यक्ती खुनी आहे. त्यावर ३०२ कलम लागणार नाही. कारण ही अनवधानाने घडलेली घटना आहे. म्हणून गुन्हा हा ठरवून केला जातो. त्याच कृत्यास गुन्हा म्हणता येईल.

३) ज्या व्यक्तींनी गुन्हा केला त्या व्यक्तीच्या गुन्हा करण्यामागे नेमका काय उद्देश आहे यावरुन ते वर्तन गुन्ह्यांचे आहे किंवा नाही हे ठरते.

४) समाजातील बहुसंख्य लोकांना मान्य असलेले आदर्श, मूल्यांचे नियमांचें उल्लंघन करुन त्यामुळे समाजाला धोका निर्माण होऊ शकतो. ते कृत्य गुन्ह्याचे मानले जाते.

---

१३) विवेचनात्मक अपराधाशास्त्र - डॉ. एस. चंद्रकुमार राय.

५) गुन्हा करणाऱ्या व्यक्तीबद्दल सामान्य व्यक्तीच्या मनामध्ये राग, द्वेषाची भावना असते. कारण त्या व्यक्तीच्या कृत्यामुळे इतरांना त्रास झालेला असतो.

६) गुन्हेगाराला त्याच्या गुन्ह्याच्या कृत्याबद्दल शिक्षा दिली जाते. मग ती दंड म्हणून पैसा असेल, कैद असेल अशा शिक्षा निश्चित केल्या जातात.

गुन्हा संकल्पना स्पष्ट होण्यासाठी विविध व्याख्यांमधून वरील तत्त्व स्पष्ट होतात आणि वरील घटक असल्याशिवाय गुन्हा ही संकल्पना स्पष्ट होत नाही. पृथ्वीतलावर जेथे जेथे मानव आहे तेथे तेथे गुन्हा आहे. कारण सर्वच व्यक्ती समाजमान्य, कायद्याच्या चौकटीत वर्तन करत नाहीत. ज्यात्या प्रदेशात गुन्हा कमी करण्यासाठी प्राचीन काळापासुन आजपर्यंत प्रयत्न केले जात आहेत.

आज जागतिकीकरणामुळे संपूर्ण जग जवळ आले आहे. आज गुन्हा हा स्थल कालपरत्वे बदलत असला तरी संपूर्ण जगाला भेडसावणाऱ्या समस्या म्हणजे दहशतवाद, घुसखोरी, मादक पदार्थांचा व्यापार, अशा जागतिक गुन्ह्याचे परिणाम सर्वच राष्ट्रांना भेडसावत आहेत. आज या जागतिक गुन्हेगारीला कमी करण्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रयत्न चालू आहेत आणि या सर्वांचा प्रयत्न हाच आहे की, मानव सुखी करणे.

### ❖ गुन्ह्यांचे प्रकार :-

गुन्हा म्हणजे कायदाबाह्य वर्तन होय. गुन्ह्याचे स्वरूप प्राचीन काळापासून आजच्या आधुनिक काळापर्यंत बदलत आले आहे. गुन्ह्याच्या वेगवेगळ्या आधारावर व्याख्या केल्या जातात परंतु कायद्याच्या समाजाच्या नियमाविरुध्द वर्तन म्हणजे गुन्हा होय असे मानले जाते. गुन्ह्याच्या व्याख्येबाबतचे विचार एकमत नाही. अगदी त्याचप्रमाणे गुन्ह्याच्या प्रकारामध्येही सर्वांचे एकमत नाही. वेगवेगळया आधारावर वेगवेगळ्या गुन्ह्याचे प्रकार अभ्यासकांनी सांगितले आहेत. ते पुढीलप्रमाणे.

### ❖ विल्यम ॲड्रियन बोंजर :- ( १८७६-१९४० )

विल्यम ॲड्रियन बोंजर हे एक डच अपराधशास्त्र होते. त्यांनी गुन्ह्याच्या उद्देशांनुसार चार प्रकारांत वर्गीकरण केले आहे ते खालीलप्रमाणे.

**१) आर्थिक गुन्हे :-**

अशा गुन्ह्या मागचा उद्देश पैसा मिळविणे हा असतो. यामध्ये साध्या चोरापासून वेगवेगळ्या आर्थिक घोटाळे यांचा यात समावेश होतो.

**२) लैंगिक गुन्हे :-**

यात बलात्कार, लैंगिक छळ, अनैसर्गिक लैंगिक कृत्य, बालिकांवरील बलात्कार यांचा यात समावेश होतो.

**३) राजकीय गुन्हे :-**

यात राज्याविरुध्द युध्द पुकारणे, राष्ट्रपती, राज्यपाल व आदींवर हल्ला करणे, राष्ट्राची गोपनीय माहिती फोडणे इ. गुन्हे राजकीय गुन्ह्यात मोडतात.

**४) इतर गुन्हे :-**

वर उल्लेख केलेल्या उद्देशाव्यतिरिक्त इतर सर्व गुन्ह्यांचा समावेश इतर गुन्ह्यात बोंजर यांना केला आहे.

**❖ एडविन हार्डिन सदरलँड :- ( १८८३-१९५०)**

सदरलँड या प्रसिध्द अपराधशास्त्रज्ञांनी गुन्ह्याच्या गभीरतेनुसार गुन्ह्याचे प्रकार सांगितले आहेत.

**१) गंभीर स्वरूपाचे गुन्हे :-**

जे गुन्हे अगदी नियोजनबध्द पध्दतीने केले जातात त्यात खून, दरोडा, अमली पदार्थांचा व्यापार असे कृत्यांचा समोवश गंभीर गुन्ह्यात होतो. यात फाशी, जन्मठेप, मृत्युदंड, दीर्घ कारावास अशा शिक्षा असतात.

**२) साधारण गुन्हे :-**

जे गुन्हे गंभीर नाहीत सौम्य आहेत अशा सर्व गुन्ह्यांचा समावेश साधारण गुन्ह्यात होतो.

**❖ हेज :- (Hayes)**

यांनीही गुन्ह्याच्या उद्देशानुसार गुन्ह्याचे वर्गीकरण केले आहे.

**१) समाज व्यवस्थेविरुध्द गुन्हे** :- (Crime Against Order)

समाजातील शांतता व सुव्यवस्था यांचा भंग करणारी कृती समाज व्यवस्थेविरुध्द गुन्ह्यात मोडतात. यात महापुरुषांच्या पुतळ्यांची विटंबना, धार्मिक ठिकाणांची विटंबना.

**२) मालमत्ते विरुध्द गुन्हा** :- (Crime Against Property)

मालमत्ते विरुध्द गुन्ह्यात पैसा मिळवणे हा उद्देश असतोच. पण इतरांच्या मालमत्ता (घरे, जमीन, वस्तु) हडप करणे किंवा नष्ट करणे अशा गुन्ह्यांचा समावेश मालमत्ता विरुध्दच्या गुन्ह्यात होतो.

**एडविन लेमेर्त** :- (Edwin Lemert)

**१) परिस्थितीजन्य गुन्हे** :- यात गुन्ह्यासाठी एखादी परिस्थिती कळत नकळत निर्माण होऊन त्यातून झालेली गुन्हे परिस्थितीजन्य गुन्हे यात मोडतात.

**२) योजनाबध्द गुन्हे** :-

जे गुन्हे अतिशय योजनाबध्द केले जातात त्यात खून, दरोडा, अपहरण, बलात्कार अशा सर्व गुन्ह्यांचा समावेश योजनाबध्द गुन्ह्यात होतो.

**३) विश्वासघाताचे गुन्हे :-**

एखाद्या व्यक्तीचा प्रथम विश्वास संपादन करून नंतर त्याच्या विश्वासघात करणे किंवा फसवणे या अशा गुन्ह्यांचा समावेश विश्वासघाताचे गुन्ह्यात होतो.

गुन्हा ही कायदाबाह्य, समाजबाह्य, कृती होय. कायदा आणि सामाजिक व्यवस्था या संदर्भात गुन्ह्यांचे वर्गीकरण वेगवेगळे असल्याचे जाणवते. कारण भारताच्या संदर्भात कायदाबाह्य वर्तन करणाऱ्याला आय.पी.सी.नुसार शिक्षा होते. म्हणजे आपणास असे म्हणता येईल की, जेवढे आय.पी.सी. मध्ये कलम आहेत तेवढे अपराध/गुन्हे आहेत. पण तसे पाहता त्या सर्व कलमांअंतर्गत येणाऱ्या गुन्ह्याचे एकत्रिपणे वर्गीकरण प्रा. डॉ. एन.व्ही.परांजपे यांनी त्यांच्या Criminology And Penology या ग्रंथात केले आहे.

❖ **"Classification Of Offences Under IPC :-**

Under the Indian Penal Code, various offences have been classifed into seven brand categories on statisticals basis. They are

१) Offences against Person.

२) Offences against Properry.

३) Offences relating to Documents.

४) Offences effecting mental order.

५) Offences against public tranquillity.

६) Offences against State.

७) Offences releating to Public servants."[१४] (Prof. N.V.Parnanjpe. २००३)

भारतीय दंडविधानातील कलमाअंतर्गत वरील सात गटात गुन्ह्याचे प्रकार मोडतात. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून समाज हा स्थिर राहण्यासाठी व्यक्तीचे वर्तन सहकार्याचे असावे. त्यातून व्यक्ती व्यक्तीचेपरस्पर संबंध चांगले बनतील. पण जर व्यक्ती आपला स्वार्थ साधण्यासाठी इतरांवर अन्याय करत असेल तर त्यातुन समाजात अशांतता निर्माण होते त्यातुन व्यवस्थेला बाधा पोहचेल. त्यामुळे वेगवेगळया गुन्हयांची निर्मिती होते ती पुढील प्रमाणे.

१) मालमत्तेविरुध्द गुन्हा

२) मानवी जीविताविरुध्द गुन्हे

३) सार्वजनिक शांततेविरुध्द गुन्हे

---

१४) Criminology and Penology - Prof. N.V.Parnanjpe.page no. 9

४) धर्मविरोधी गुन्हे

५) कुटुंब व्यवस्थेविरुध्द गुन्हे

६) नैतिक मूल्यांविरूध्द गुन्हे

७) सार्वजनिक आरोग्यविरुध्द गुन्हे

८) नैसर्गिक साधन संपत्तीविरुध्द गुन्हे

असे वर्गीकरण समाजशास्त्राचा दृष्टिकान पुढे ठेवून केलेले आपणास दिसते.गुन्ह्यांचे वेगवेगळे अभ्यासकांनी केले आहेत. पण त्या सर्वाना अगदी कमी वर्गीकरणात श्रीमती सुधा काळदाते यांनी मांडले आहे. त्या म्हणतात,"गुन्ह्याच्या विविध प्रकारांना आपण तीनच विभागांत मांडू शकतो. १) व्यक्तीविरुध्द गुन्हे २) मालमत्तेविरुध्द गुन्हे ३) नीतीविरुध्द गुन्हे "[१५] (सुधा काळदाते. २००५)

वरील विवेचनाचा तीन वर्गीकरणातील गुन्हे हे सर्वसमाविष्ट आहेत असे जाणवते.

## १.३ गुन्हेगार : Criminal

गुन्हा ही एक अशी कृती आहे जी कृती कायद्याने व समाजाने निषिध्द मानली आहे अशी कृती करणारी व्यक्ती म्हणजे गुन्हेगार होय. पण कायद्याद्वारे निशिध्द कृती करणारी प्रत्येक व्यक्ती गुन्हेगार असते असे नाही. कारण व्यक्तीने गुन्हेगार ठरविण्यासाठी न्यायालयाने त्याने केलेल्या कृत्याला शिक्षा दिली तरच तो व्यक्ती गुन्हेगार ठरते. अन्यथा ता व्यक्ती गुन्हेगार ठरत नाही. बऱ्याच वेळा व्यक्ती नियोजित पध्दतीने गुन्हा करताना असे पुरावेच सोडत नाही किंवा कायद्याने सिध्द होईल असे काहीच पुरावा न दिसल्याने अशा व्यक्तींना कोर्ट गुन्हेगार म्हणत नाही. म्हणजेच गुन्हेगाराचा शिक्का जोपर्यंत कोर्टाकडून पडत नाही. तोपर्यंत ती व्यक्ती गुन्हेगार असत नाही. समाजात आज अशा घटना घडतात त्या घटनांत सर्वसामान्य व्यक्ती कायद्याच्या अज्ञानतेमुळे फसवल्या जातात आणि निपराध व्यक्तीला गुन्हेगार म्हणून शिक्षा दिली जाते. आज कारागृहात बरेच कैदी सांगतात की आम्ही कोणताच गुन्हा केला नाही. आम्हाला याच्यामध्ये फसवले गेले आणि त्याची आम्ही शिक्षा भोगत आहोत. आमच्यावर न्यायालयीन अत्याचार झाला अशी भावना ते व्यक्त करतात.

कायद्याच्या दृष्टीने अशी निषिध्द कृती व्यक्तीने केली तरी न्यायालयात ती सिध्द व्हावी लागते. त्यासाठी व्यक्त्ीला अतोनात प्रयत्न केले जातात. हा कायदेशीर गुन्हेगार ठरवण्यामधील अडथळा आहे असे वाटते.समाजशास्त्राच्या आधारे समाजाने जे वर्तन निषिध्द मानले आहे किंवा इतरांना त्रास देणारे, अन्याय करणारे आहे असे कृत्य करणाऱ्या व्यक्तींना गुन्हेगार मानले जाते. पण समाजशास्त्राच्या आधारामध्येही विसंगतपणा हा दिसतो. की काही ठिकाणी एखादी कृती गुन्ह्याची आहे तीच कृती दुसऱ्या ठिकाणी

---

१५) आधुनिक भारताच्या समस्या - सुधा काळदाते - पृष्ठ क्र. ९९.

गुन्ह्याची असेलच असे नाही. या संदर्भात **गिलीन** आणि **गिलीन** म्हणतात की, " समाजशास्त्रीय दृष्टीसे अपराधी ऐसे कार्य का दोषी होता है जिसको समाज अपने लिए हानीप्रद समझता है और इसलिए निषिध्द करता है!"[१६] (जित कृष्णा सिंह. २००१)

अपराधी समाजशास्त्रीय विवेचन कायदेविषयक विवेचना एवढेच महत्वपुर्ण वाटते. अर्थात समाजाला हानी पोहचवणारी व्यक्ती म्हणजे अपराधी होय असे म्हणता येईल.

## ❖ गुन्हेगारांचे प्रकार

गुन्हेगारांच्या वर्गीकरणाबाबतही अभ्यासकांमध्ये एकमत जाणवत नाही. गुन्हेगारांचे प्रकार अनेक अभ्यासकांनी मांडले आहेत ते पुढीलप्रमाणे.

**१) जन्मजात गुन्हेगार :- (Born Criminals)**

लोंब्रोसो म्हणतात काही व्यक्ती जन्मतःच विशिष्ट अशी शारीरिक व मानसिक विषेशतः घेऊन येतात त्या विशेषतेमुळे या व्यक्ती गुन्हे करायला लागतात.

**२) भावनाप्रधान गुन्हेगार :- (Criminals By Passion)**

असे गुन्हेगार आपल्या भावना तीव्र होताच गुन्हे करतात. लैंगिक स्वरूपाचे अपराध अशा व्यक्तीकडून होतात.

**३) मनोविकृत गुन्हेगार :- (Epileptic Criminals)**

अशा व्यक्ती मानसिक दृष्टीने विकृत असामान्य आणि मानसिक आजारांनी ग्रस्त असतात अशा व्यक्ती गुन्हे करतात.

**४) प्रासंगिक गुन्हेगार :- (Occassional Criminals)**

काही व्यक्ती अकस्मातपणे तशी परिस्थितीत निर्माण झालीली ताबडतोब गुन्ह्याचे कृत्य करतात त्यांना प्रासंगिक गुन्हेगार असे म्हणतात.

**सदरलॅड यांचे वर्गीकरण** :-

१) **कनिष्ठवर्गीय गुन्हेगार** :- (Lower Class Criminal)

ज्या व्यक्तींचा आर्थिक स्तर अतिशय नीच / खालावलेला असतो अशा व्यक्तीकडे जर एखादी कृती घाला तर त्या व्यक्तीला कनिष्ठ वर्गीय गुन्हेगार असे म्हणतात.

---

१६) अपराधशास्त्र और दंडशास्त्र - जित कृष्णा सिंह - पृष्ठ क्र. ३६

**२) पाढरेपेशीय गुन्हेगार :-** (White Collor Criminal)

समाजातील ज्या श्रीमंत, उच्च दर्जाच्या व्यक्ती आपल्या व्यवसायाशी संबंधित काम करताना जे कायदाबाह्य किंवा नियमबाह्य वर्तन करतात त्यांना पाढरेपेशी गुन्हेगार असे म्हणतात असे सदरलँड यांनी सांगितले आहे.

व्यक्तींचा आर्थिक स्तर पुढे देऊन सदरलँड यांनी गुन्हेगारांचे दोन प्रकारांत विभाजन केले आहे.

❖ **हॅवलॉक एलीस यांचे वर्गीकरण :-**

१) राजकीय गुन्हेगार

२) भावनाप्रधान गुन्हेगार

३) मनोविकृत गुन्हेगार

४) आकस्मिक गुन्हेगार

५) नीतिभृष्ट गुन्हेगार

६) व्यावसायिक गुन्हेगार

७) सऱ्हाईत गुन्हेगार

❖ **डॉ. जहाँगीर एम.जे.सेठना :-**

१) नीतिभ्रष्ट गुन्हेगार

२) व्यावसायिक गुन्हेगार

३) सऱ्हाईत गुन्हेगार

४) संभाव्य गुन्हेगार

५) हिंसक गुन्हेगार

६) लैगिक गुन्हेगार

७) मनोदुर्बल गुन्हेगार

वरील अभ्यासकांनी गुन्हेगारांचे विविध प्रकार सांगितले आहेत. गुन्हा करणारी व्यक्ती कोणत्या उद्देशाने गुन्हा करतो. यावरुन त्या गुन्ह्याचा प्रकार ठरतो आणि तो गुन्हा करण्याला व्यक्ती कायद्याच्या चौकटीत एखादे अपराध्याचे कृत्य करतो पण न्यायालयाने जो पर्यंत त्यास गुन्हेगार ठरवत नाही तो पर्यंत ती व्यक्ती गुन्हेगार होत नाही.

## १.४ शिक्षा (Punishment)

मानव हा समाजशील प्राणी आहे. मानवाला जीवन जगण्यासाठी काही गरजा असतात. त्या गरजा पूर्ण करण्याची व्यवस्था समाज व्यवस्थेत असते. व्यक्ती परस्पर संबधांतून आपल्या गरजा पूर्ण करीत

असताना बऱ्याच वेळेस आपल्या स्वार्थापोटी इतरांना दु:खी करून अर्थात नियमबाह्य वर्तन करून आपल्या गरजा भागवतो. पण यामुळे समाजात संघर्ष, विघटन निर्माण होत असते. अशा वेळी असे नियमबाह्य वर्तन करणाऱ्या व्यक्तीच्या वर्तनावर नियंत्रण ठेवण्याची व्यवस्थाही समाजव्यवस्थेत असते. नियमबाह्य वर्तन अर्थात गुन्हा गुन्हा हा प्रचीना काळापासून आजच्या आधुनिक समाजापर्यंत अस्तिवात आहे. अर्थात तो आता समाजाचा एक अविभाज्य अंग बनला आहे.

गुन्हा हा जसा मानवाच्या प्राचीन आवस्थेपासून आहे तसेच शिक्षा व्यवस्थाही प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे. गुन्ह्याचे स्वरूप जसे वेगवेगळे आहे त्याचप्रमाणे शिक्षेचे स्वरूपही वेगवेगळे असल्याचे आपणास पाहावयास मिळते. प्राचीन काळात ईश्वराविरुध्द केलेली कृती म्हणजे गुन्हा होय. तर याच काळात शिक्षा ही त्याच पध्दतीची होती. जर एखाद्या व्यक्तीने असे वर्तन केले तर ईश्वरच त्यास शिक्षा करतो. "जैसे ज्याचे कर्म तैसे फळ देतो रे ईश्वर " ही अध्यात्मिक भावना होती.

राजे राजवाड्यांच्या काळात ज्या व्यक्तीने राजाच्या विरुध्द वर्तन केले आहे. अशा व्यक्तींना अतिशय कठोर अशी शिक्षा दिली जात होती. अर्थात जशास तसे असे शिक्षेचे स्वरूप होते. जर एखाद्याने खून केला तर त्याचाही खून केला जात होता. तडीपार करणे, कारावासात पाठवणे अशा शिक्षा दिल्या जात होत्या. आधुनिक काळात शिक्षा देताना सुधारणावादी दृष्टिकोनातुन गुन्हेगार हा माणूस आहे. त्याने ज्या परिस्थितीत गुन्हा केला त्याचा अभ्यास करून त्याला सुधारण्यासाठी शिक्षा आज आधुनिक समाजात दिली जाते.

आजच्या २१ व्या शतकात गुन्हेगारांना होणाऱ्या शिक्षेसंदर्भात अनेक प्रश्नचिन्ह निर्माण होतात. कारण आज प्रत्येक गुन्हेगारांना शिक्षा होतेच असे नाही आणि झाली तर त्या व्यक्तीने केलेल्या अपराधापेक्षा खूपच सौम्य असते. त्यामुळे न्याय व्यवस्था, पोलीस यंत्रणा सक्षम होऊन अशी अपराध्यांना कठोर शिक्षा होण्यासाठी प्रयत्नशील असावे असे चित्र आज समाजात आढळत आहे.

शिक्षा व्यवस्थाही प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे असे सांगत असताना गुन्हेगारांना शिक्षा देण्यासंदर्भात अनेक विचार अभ्यासकांनी मांडले आहेत. अपराध्याला शिक्षा देण्यासंदर्भात वशिष्ठ म्हणतात. " अपराध का समय और स्थान अपराधीकी आयु कर्तव्य व ज्ञान दंण्ड स्थान आदी भलीभॉती विचार करके हि अपराधी का दंड देना चाहिए।" तसेच त्या संदर्भात कौटिल्या म्हणतात.

"दण्ड देते समय अपराधी को अपराध के कारणोंको अपराधी की हैसियत को वर्तमान तथा भावी परिणामो को और देश काल की स्थिती को भलीभली सोच समझले तद नंतर न्याय के अनुसार प्रथम, मध्यम, और उत्तम दण्डो कों सुनाये "[१७] (डॉ. ए.एन.अग्निहोत्री. १९९५)

१७) अपराधी कल्याणके विविध आयाम - डॉ. ए.एन.अग्निहोत्री - पृष्ठ क्र. ६५.

अर्थात गुन्हेगाराला दंड देताना त्याने केलेल्या गुन्ह्याच्या परिस्थितीचा अभ्यास करूनच शिक्षा दिली जात होती. शिक्षा व्यवस्था ही प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे असे म्हणत असताना ती काळाची गरज होती आणि आहे. कारण समाजाच्या नियमांचा कायद्याचा भंग करणाऱ्या व्यक्तींना त्याने केलेल्या कृत्याबद्दल शिक्षा झाली पाहिजे. जेणे करुन तो व्यक्ती पुन्हा तसे कृत्य करणार नाही आणि समाजातील इतरांनाही याची जाणीव होईल. शिक्षा देत असताना मग ती शारीरिक शिक्षा यामध्ये गुन्हेगाराला दु:ख देणे, आर्थिक दंड देणे, मालमत्ता जप्त करणे, सुधारसंस्थेत पाठवणे, जन्मठेप देणे अशा विविध प्रकारच्या शिक्षा दिल्या जातात. या संदर्भात स्कॉट विल्यम म्हणतात की, "शिक्षा म्हणजे क्लेशकारक वर्तनूकीचे संस्थीकरणच होय." "(Punishment is a kind of institutionalized cruelty. **Scot william**)."[१८] (प्रा. माणिक माने. १९९९)

अर्थात गुन्हेगार व्यक्तीला त्याने केलेल्या नियमबाह्य वर्तनाची शिक्षा झाली पाहिजे. कारण त्याच व्यक्तीने इतरांवर अन्याय करून गुन्ह्याला बळी पडलेल्या व्यक्तीला यातना होतात, त्यांचे नुकसान होते, त्यांची अब्रू लुटली जाते, ज्याने नुकसान केले तो गुन्हेगार, त्याचेही नुकसान झाले पाहिजे. त्यालाही यातना झाल्या पाहिजेत. अशी भूमिका शिक्षेमागे अभिप्रेत आहे. ज्यामुळे गुन्हेगारीला बऱ्याच प्रमाणात नियंत्रणात आणता येते. राजे राजवाडयांच्या काळातील शिक्षेसंदर्भात विवेचन करताना सुधा काळदाते म्हणतात की,"पूर्वी भारतात राजेशाहीच्या काळात मोठ्या राजवाड्यामधून, किल्यामधून अंधार कोठड्या व भूमिगत कोंदट निवासस्थाने कैद्यांसाठी मुद्दाम बांधलेली असत. तसेच कडेलोट, हातपाय तोडणे, भिंतीत चिरडून मारणे, हत्तीच्या पायदळी तुडवणे, डोळे काढणे, लोखंडी तापलेल्या सळयांनी चटके देणे इ. शिक्षा दिल्या जात."[१९] (सुधा काळदाते. २००५)

वरील प्रकारच्या शिक्षेचा परिणाम ताबडतोब समाजात पसरत असल्याने इतर व्यक्ती पुन्हा अशा स्वरूपाचे गुन्ह्याचे कृत्य करण्यासाठी घाबरत असे. आजच्या आधुनिक काळातही शिक्षा व्यवस्था सक्षमपणे अस्तित्वात आहे.

### शिक्षेची - व्याख्या (Definition of Punishment)

ज्या व्यक्ती इतरांचे हक्क हिरावून घेऊन नियमबाह्य कायदाबाह्य, वर्तन करते. त्याला त्याच्या मूलभूत हक्कापासून, कुंटुंब, समाजापासून वेगळे करणे त्यासाठी त्याला शिक्षा दिली जाते पण नेमके शिक्षा म्हणजे काय त्याचा अर्थ पाहण्यासाठी अभ्यासकांच्या व्याख्या पाहणे आवश्यक आहे. जे पुढीलप्रमाणे

---

१८) गुन्हेगारीशास्त्र - प्रा. माणिक माने - पृष्ठ क्र. ५७.
१९) सामाजिक समस्या - सुधा काळदाते- पृष्ठ क्र. ११३.

"१) टॅफ्ट :-

दण्ड को हम एसा अवांच्छनीय अनुभवो वाला कष्ट कह सकते है जो समाजकी शांती भंग करने वाले व्यक्तीजीको दिया जाता है।

**Taft :-**

We way define punishment as the conscious implication upon a disturbing individual or undesired experiences not society in the interest of his welfare.

**२) वॉल्टर रेक्लेस :-**

दंण्ड वह प्रतिशोध है जो कॉमन वेल्थ (राष्ट्रमंडल) एक अपराधी सदस्य से लेता है।

**Walter Reclaes :-**

It is the redress that the Commonwealth takes against an offending members.

**३) एम.जे.सेथंना :-**

दण्ड एक प्रकारचा सामाजिक नियंत्रण है जिसमे शारीरिक प्रपीडन का होना आवश्यक नही है।

**M.J. Sethana :-**

Punishment is some sort of social sensure and not necessarily the involving of infiction of physical pain.

**४) वेस्टरमार्क :-**

दण्ड उस पिडातक समीत है! जो समाज के नाम पर निश्चित ढंग से उस अपराधीको दी जाती है जो कि उसी समाज का स्थायी या अस्थायी सदस्य होता है ।

**Westermarck :-**

Punishment is suffering as is inflicted upon the offender in definite way by or in the name of the society of which he is a permanent or temporary member." [२०] (जित कृष्णा सिंह. २००१)

## शिक्षा सिध्दांत (Theories of Punishment)

समाजात व्यक्ती जीवन जगताना नियमबाह्य, समाजबाह्य, कायदाबाह्य वर्तन करुन आपला उद्देश साध्य करतो अर्थात गुन्हा करतो. गुन्ह्यापाठीमागे अनेक कारणे असतात. पण जो गुन्हेगार व्यक्ती आहे त्याने ज्या व्यक्तीवर अन्याय केला आहे. त्या बद्दल त्या गुन्हेगाराला शिक्षा झाली पाहिजे या बाबत.

२०) अपराधशास्त्र और दंडशास्त्र - जित कृष्णा सिंह - पृष्ठ क्र. १९५,९६.

प्राचीन काळापासून आजच्या आधुनिक समाजापर्यंत सर्वांचे एकमत आहे.

समाजामध्ये नियंत्रणाची अर्थात दंडाची व्यवस्था असते. गुन्हा आणि गुन्ह्याचे स्वरूप जसे स्थल, कालपरत्वे जसे प्राचीन काळापासून बदलत आले आहे. त्याचप्रमाणे गुन्हेगारांना शिक्षा देण्या संदर्भात सुध्दा आपणास स्थल, कालपरत्वे भिन्नता जाणवते, शिक्षे संदर्भात काही सिध्दांतांची मांडणी केली आहे त्यातून आपणास बोध होईल. पण सर्वांचे एकमत यावर आहे की, गुन्हेगाराला शिक्षा ही झालीच पाहिजे पण या संदर्भात दोन मत प्रवाह पाहावयास मिळतात. पहिला म्हणजे गुन्हेगाराने केलेल्या कृत्याची त्याला कठोर शिक्षा झाली पाहिजे. जेणे करून पुन्हा त्याच व्यक्तीने असे अपराधाचे वर्तन करता कामा नये. हा सूडवादी विचार प्रवाह होय.दुसरा विचार प्रवाह म्हणजे गुन्हेगाराने केलेल्या गुन्ह्याच्या कृतीबद्दल शिक्षा देऊन गुन्हेगारी थांबणार नाही. शिक्षा ही अतिशय वाईट पध्दत असून त्या गुन्हेगाराला सुधारण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत म्हणजेच त्याला शिक्षा झाली पाहिजे पण ती शिक्षा न राहता सुधारणा असली पाहिजे असे मत मानणाऱ्यांना उपयुक्ततावादी असे म्हणतात.

**१) बदला किंवा सूड सिध्दांत :- Retribution Theory**

बदला किंवा सूड सिध्दांत हा शिक्षे संदर्भात ज्या व्यक्तीने गुन्हा करून इतरांवर अन्याय केला आहे त्याला त्याच प्रकारची शिक्षा द्यावी. त्या कृत्याचा सूड किंवा बदला घ्यावा ही भावना या पाठीमागे असते. ज्या व्यक्तीचे नुकसान होते ती व्यक्ती याच भावनेने विचार करते. पण ती एकटी व्यक्ती किंवा एखादा छोटासा समूह असा बदला घेऊ शकत नाही. तर जात-जमात पंचायत, कायदा यांच्या सहायाने गून्हेगाराला शिक्षा देणे म्हणजे त्या कृत्याचा बदला किंवा सूड असतो. या सिध्दांतांने जशास तसे शिक्षा देताना भारतीय समाजातील कर्म सिध्दांत आपणास सांगता येईल. कारण चांगल्या कर्माचे चांगले फळ मिळाले तर वाईट कर्माचे वाईट फळ तेथे लागू पडते तसेच या संदर्भात जेम्स टीफन म्हणतात की, "लैगिक भूक भागविण्याशी विवाहाचा जितका संबंध आहे तितकाच सूड भावनेचा शिक्षेशी आहे."[२१] (प्रा. माणिक माने. १९९९)

अर्थात अपराध्याने ज्या व्यक्तीचे नुकसान केले आहे त्याबद्दल त्याला शिक्षा झालीच पाहिजे जशास तसे शिक्षा मिळाली पाहिजे. गुन्हेगाराचा सूड घेतला पाहिजे आणि तोही जशास तसे उदा - खून करण्याऱ्याचा खून, डोळा काढणाऱ्याचा डोळा, हात कापणाऱ्याचा हात असे ही संहिता प्रथम हम्मुराबीचा नियमावली संहिता यात प्रथम आढळते. चांगल्या कामासाठी बक्षीस तर वाईट कामासाठी शिक्षा ही आवश्यक दिली पाहिजे. सूड सिध्दांतामध्ये काही दोषही जाणवतात. त्यात जर एखाद्या वेड्या किंवा मनोरुग्ण व्यक्तीने असे कृत्य केले तर त्यालाही सूड भावनेची शिक्षा देणे योग्य ठरणार नाही. आणि हा

---

२१) गुन्हेगारी शास्त्र - प्रा. माणिक माने - पृष्ठ क्रं. ५८.

सिंध्दांत बदल्याच्या भावनेवर आधारित आहे. तसेच शिक्षा हे  सामाजिक सुरक्षितेचे एक साधन आहे हे हा सिंध्दांत विसरतो..

**२) दहशत सिध्दांत :- Theory of Deterence**

दहशत सिंध्दांताचा मूळ उद्देश गुन्हेगाराला शिक्षा करणे हा असतोच. पण त्याला झालेल्या शिक्षेमुळे समाजात दहशत बसावी आणि असे संभाव्य होणारे गुन्हे टाळले जावेत अशीच भावना या शिक्षेमागे असते. दहशत ही दोन प्रकारची असते. एक वैयक्तिक काही सराईत गुन्हेगार असतात. त्यांना जर शिक्षा सौम्य वाटली तर ते तुरुंगातुन येऊन पुन्हा असे गुन्ह्याचे कृत्य करुन शकतात. त्यामुळे अशा सराईत गुन्हेगारावर दहशत निर्माण करावी असा उद्देश असतो.

दुसरा उद्देश म्हणजे जेव्हा एखाद्या गुन्हेगाराला शिक्षा झाली तर त्याचा परिणाम सर्वसामान्य माणसावर होतो. म्हणजे भविष्यात जे गुन्हे होणार आहेत ते होत नाहीत. म्हणजे संभाव्य गुन्ह्याच्या आळा घालू शकतो हा उद्देश या शिक्षेपाठीमागे असतो.

**३) सुधारणात्मक सिध्दांत :-** (The Reformative Theory)

शिक्षेबाबतचा सुधारणात्मक सिध्दांत हा आधुनिक सिध्दांत मानला जातो. १८ आणि १९ व्या शतकात गुन्हेगारीशास्त्रात अनेक संशोधने झाली. या अनेक संशोधनातून गुन्हेगार ही व्यक्ती सामाजिक परिस्थितीतून अपराधाचे कृत्य करते. कारण तशी परिस्थिती निर्माण होते त्यामुळे तो गुन्हा करतो. तो एकरोगी असतो. आणि त्या रोग्यावर योग्य पध्दतीचे उपचार करून बरे केले जाऊ शकते असे हा सिंध्दांत सांगतो.

गुन्हेगाराला शिक्षा देताना मानवतावारी दृष्टिकोनातून शिक्षा देण्याची पध्दत सुधारण्यासाठी सिंध्दांतापासून झाली. गुन्हेगार हा जाणून बुजून मुद्दाम गुन्हा करत नसुन त्याला अनेक कारणे कारणीभुत असतात. तोही मानव आहे. त्याला शिक्षा दयावी पण त्यामध्ये सुधारणा व्हावी त्यासाठी प्रयत्न करावेत. अपराध्याला शिक्षा भोगण्यासाठी कारागृहात पाठवले जाते कारागृहात आज सुधारण्यासाठी सिंध्दांताची अम्मलबजावणी केली जाते. कारागृहाचे ब्रीद "सुधारणा आणि पुनर्वसन" हे आहे. म्हणजेच कारागृहात येणाऱ्या कैद्यांची वैयक्तिक, सामाजिक, कौटुंबिक, धार्मिक, केलेल्या अपराध्याबद्दल या सर्वांचा चिकित्सकपणे अभ्यास करून त्या व्यक्तीने जो अपराध केला  त्यासाठी कोणती कारणे  कारणीभूत आहेत त्यातून त्याच्यावर उपचार केले जातात.गुन्हेगार हाही माणूस आहे तो समाजाचा एक जबाबदार घटक आहे त्याला जर कठोर शिक्षा दिली गेली तर त्याचा विपरीत परिणाम त्याच्यावर होऊ शकतो. त्यासाठी सुधारणात्मक उपचार पध्दतीचा अवलंब केला जातो.

कारागृहात कैद्यांना त्यांच्या आवडीनुसार काम दिले जाते, त्यांना वैद्यकीय सोई औद्योगिक प्रशिक्षण, मनोरंजनासाठी पेपर, कॅरम, सांघिक खेळ, गायन, भजन, धार्मिक कार्यक्रम, सुट्टी अशा सुविधा दिल्या जाव्यात असे सुधारणावादी सिंध्दांत सांगतो.

सुधारणात्मक सिध्दांतानुसार कैद्यांना प्रोबेशन व पॅरोलवर सोडले जाते. जेणे करुन कुटुंब, समाज व त्यांच्यामध्ये जास्त अंतर न राहता त्यांच्या मनावर परिणाम होणार नाही. यासाठी नातेवाईक, कुंटुंबीयांची भेट अशा सेवा दिल्या जाव्यात. अशी अपेक्षा असते तसेच त्यांना शिक्षणाची आवड असेल तर मुक्त विद्यापीठअंतर्गत शैक्षणिक अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी प्रोत्साहित केले जाते.

सुधारणात्मक सिध्दांतानुसार जेलमध्ये शिक्षा भोगत असलेला कैदी शिक्षा भोगत नाही तर त्याच्या वर्तनामध्ये परिवर्तन करण्यासाठी प्रयत्न केले जातात. त्याचे पुनर्सामाजीकरण केले जाते. जेणे करून तो बाहेर आल्यावर सभ्य नागरिकाप्रमाणे वागेल. पुन्हा गुन्ह्यासारखे कृत्य करणार नाही. यामुळे गुन्हेगारीवर आळा बसू शकतो असे हा सिध्दांत सांगतो. सुधारणात्मक सिंध्दांता संदर्भात बायबलमधील तत्वे जीत कृष्णा सिंह सांगतात की, "वे धन्य है जो अपराधी को सुधारते है। न की उनका अन्त करते है वो धन्य है जो एक पापी व्यक्तीको जो एक गुणी व्यक्ती बनाते है।" [२२] (जित कृष्णा सिंह. २००१ )

"Blessed is he who mends and not end the offender, blessed is who averts the man of sin into a man of virtue"

सुधारणात्मक सिध्दांत गुन्ह्यासाठी ती व्यक्ती जबाबदार नसून सामाजिक वातावरण जबाबदार असते त्यामुळे त्या व्यक्तीमध्ये सुधारणा होऊ शकते तरी वेगवेगळ्या साधनांच्या आधारे त्या व्यक्तीला पुन्हा समाजात सन्मानाने जगण्यासाठी तयार केले जाऊ शकते. आणि त्यामुळे समाजातील गुह्यांच्या वाढत्या संख्येवर आळा बसू शकतो असे हा सिंध्दांत सांगतो.

सुधारणात्मक सिध्दांत चांगला आहे असे म्हणत असताना काही बाबतीत त्यावर टीकाही केली जाते त्यात हा सिध्दांत एकांगी असून गुन्हेगाराच्या कृत्यापासून वेगळे करतो. गुन्हेगारामध्ये सुधारणांपेक्षा भीतीचे वातावरण निर्माण करणे आवश्यक आहे अशी टीकाही केली जाते.

**४) प्रतिबंधात्मक सिंध्दांत :- Perventive Theory :-**

शिक्षेबाबतचा प्रतिबंधात्मक सिध्दांत ज्यांनी गुन्ह्याचे वर्तन केले आहे त्यांना कठोरातील कठोर शिक्षा व्हावी. कारण हा सिध्दांत मानतो की गुन्हेगार हे जन्मतः असतात. त्यांची अनुवंशकिता आणि शरीराची विशिष्ट अशी ठेवण असते. त्यामुळे त्यांच्यामध्ये बदल होणे शक्य नाही. त्यासाठी अशा

---

२२) अपराधशास्त्र और दंडशास्त्र - जित कृष्णा सिंह

गुन्हेगारांना आजन्म कारावास, मृत्युदंड अशा शिक्षा दिल्या जाव्यात. ज्यामुळे असे गुन्हेगार कारागृहातून बाहेर येणार नाहीत. आणि गुन्हेगारीवर प्रतिबंध येऊ शकतो असे हा सिध्दांत सांगतो.

प्रतिबंधात्मक सिध्दांतावर टीकाही होते. यात गुन्हेगार हा मानव आहे. त्यात सुधारणा होऊ शकणार नाही ही भावना चुकीची आहे. त्याला जास्तीत शिक्षा दिली तर यामुळे त्याच्या मनात समाजाबद्दल द्वेषाची भावना निर्माण होईल अशी टीका केली जाते.

**५) सामाजिक ऐक्यभाव जोपासना सिध्दांत :-** (Theory of Maintenance of Social Cohesion Intact)

शिक्षा ही सामाजिक ऐक्यभाव जोपासण्याचे एक उपकरण आहे असे मानले जाते. वैयक्तिक सूड भावनेला प्रतिबंध करून समाजाचे नीतिध्यैर्य टिकविणे हाच शिक्षेमागचा उद्देश असतो. सामाजिक ऐक्यभाव अबाधित राखणे हेच खरे शिक्षेचे कार्य आहे असे डरखीमने म्हटले आहे. समाजात व्यक्ती कायद्याचा आदर करणाऱ्या असतात. आपल्यावर एखाद्या गुन्हेगाराने अन्याय (गुन्हा) केला तरी कायदाभंग करत नाहीत. त्यांना सुरक्षितता निर्माण करण्यासाठी गुन्हेगारांना शिक्षा होणे आवश्यक आहे असे हा सिध्दांत सांगतो.

## शिक्षेचे उद्देश Objectives Of Punishment

समाजामध्ये शांतता आणि सुरक्षितता असल्याशिवाय समाजाची प्रगती होत नाही. समाजात ज्या व्यक्ती कादयाबाह्य  वर्तन करतात त्यांना शिक्षा मिळणे ही अत्यावश्यक आहे. शिक्षेमुळे देशाचा विकास होतो.

गुन्हेगारांना शिक्षा देण्यापाठीमागचे उद्देश पुढीलप्रमाणे.

१) शिक्षा ही ज्या व्यक्तीने अपराध / गुन्हा केला आहे त्यासाठी दिली जात नाही तर गुन्ह्यामुळे समाजाच्या सुख शांतीसाठी घातक आहे त्यासाठी गुन्हेगाराने किंवा समाजातील इतर व्यक्तींनी असे कृत्य करू नये यासाठी शिक्षा दिली जाते.

२) गुन्हेगाराचे कारागृहात पुनर्सामाजिकरण करून त्याला पुन्हा समाजात सन्मानाने जीवन जगता यावे यासाठी शिक्षेच्या माध्यमातून त्याच्यामध्ये सुधारणा केल्या जातात यासाठी शिक्षा दिली जाते.

३) शिक्षा गुन्हेगाराच्या केलेल्या गुन्ह्याच्या तीव्रतेनुसार दिली जाते. कारण त्यामुळे गुन्ह्यावर नियंत्रण येऊ शकते. गुन्हेगाराच्या मनामध्ये भीती निर्माण करणे हा उद्देश या शिक्षेमागे असतो.

## शिक्षेचे प्रकार Types Of Punishment :-

गुन्हा हा मानवाच्या उत्पत्तीपासून अस्तित्वात आहे. गुन्ह्याचे स्वरूप, स्थल, कालपरत्वे बदलते. समाजात जसा गुन्हा अस्तित्वात आहे तसेच गुन्हेगारालाही शिक्षा प्राचीन काळापासून अस्तित्वात होती आणि आजही आहे. शिक्षेचे स्वरूपही प्राचीन काळापासून आजपर्यंत बदलत आले आहे.

मानवाच्या उत्पत्तीच्या प्राथमिक अवस्थेत मानवाचा विकास झाला नव्हता. तेव्हा ज्या ज्या व्यक्ती समाजविरोधी कृत्य करतात त्यांना शिक्षाही तशीच सूड भावनेने प्रेरित होऊन दहशत निर्माण करण्यासाठी दिली जात होती. आदिम समुदायामध्ये कायद्याच्या ज्ञानाच्या आभारी वैयक्तिक आणि सामूहिक पातळीवर बऱ्याच वेळा रक्तपाताच्या पातळीवरच शिक्षा दिली जात होती. मध्ययुगीन काळातही गुन्हेगाराला क्रूरतेची शिक्षा दिली जात होती. तिचे स्वरूप मात्र वेगवेगळे होते १८ व्या शतकात गुन्हेगारीशास्त्रात संशोधने होऊन शिक्षा व्यवस्थेमध्येही सुधारणा होऊन गुन्हेगाराला मानवतेच्या भावनेतूनच वेगवेगळ्या शिक्षा दिल्या जात होत्या आणि आजही दिल्या जात आहेत. त्या वेगवेगळ्या शिक्षा पुढीलप्रमाणे.

**१) शारीरिक शिक्षा :- Corporal Punishment.**

गुन्हेगाराने केलेल्या गुन्ह्याबद्दल त्याचे खच्चीकरण करण्यासाठी त्याला वेगवेगळेगळ्या प्रकारच्या शारीरकि शिक्षा दिल्या जात असत.

**अ) अवयव तोडणे :- Mutilation :-**गुन्हेगारांना दहशत बसावी यासाठी प्राचीन काळी शारीरिक शिक्षेमध्ये त्या गुन्हेगाराचे वेगळेवेगळे अवयव जसे की, हात, पाय, कान, गुप्तांग तोडले जायचे. तसेच उकळत्या तेलात टाकणे, उकळत्या पाण्यात टाकणे, जिवंत जाळणे इ. शिक्षा दिल्या जात असत. जशास तसे या तत्त्वानुसार चोरी केली तर हात तोडणे, बलात्कार केला तर गुप्तांग कापणे अशा शिक्षा मोगल व मराठे राजेशाहीच्या काळापर्यंत दिल्या जात असत.

**ब) फटके देणे :- Folgging :-**

गुन्हेगाराला त्याचा गुन्हा कबूल करण्यासाठी त्याला सार्वजनिक ठिकाणी आणून फटके दिले जात असत. ही प्रथम प्राचीन काळापासून मध्ययुगीन काळापर्यंत अस्तित्वात होती. प्राचीन इराण मेरीलॅंड व अमेरिकेतील काही राज्यांत अशा प्रकारची शिक्षा दिली जात होती. आजही मध्य पूर्वेतील काही देशांमध्ये फटके देण्याची शिक्षा दिली जाते." फटके देण्यासंदर्भात भारतात कायदेशीरच शिक्षा होती. तसा कायदा (Whipping Act 1864) केला होता.१८६४ हा कायदा पुन्हा १९०९ मध्ये दुरुस्त करून तो शेवटी १९५५ मध्ये खारीज करण्यात आला."[२३] (प्रा.माणिक माने. १९९९)

फटके देण्यामध्ये देश कालपरत्वे फरक होता. काही देशांत कातडी पट्याचा उपयोग तर काही ठिकाणी चाबकाचा वापर करत. फटके मारण्यासंदर्भात डॉ. बार्नस म्हणतात की, "फटक्यामुळे कुणी गुन्हेगार सुधाण्याचे मला ठाऊक नाही उलट असे फटके खाल्लेल्या व्यक्ती जास्तच धोकादायक बनत असत." [२४] (दा.धों.काचोळे. २००१) "मुंबई उच्च न्यायालात १९४४ मध्ये एका फौजदारी खटल्यात

२३) गुन्हेगारीशास्त्र - प्रा.माणिक माने - पृष्ठ क्र. ६४.

२४) गुन्हा समाजशास्त्र - प्रा.डॉ.दा.धो.काचोळे - पृष्ठ क्र. २९४.

बलात्काराच्या गुन्ह्याबाबत मा. न्यायमूर्तीनी चार आरोपींना २ ते ३ वर्षे कारावास आणि प्रत्येकाला २० ते ३० फटक्याची शिक्षा सुनावल्याचे जहांगीर एम.जे. सेठना यांनी नोंदवले आहे." [२५] (प्रा. माणिक माने. १९९९)भारतात मात्र १९५५ मध्ये फटक्याची शिक्षा बरखास्त करण्याल आली.

**क) डाग देणे :- Branding**

गुन्हेगाराला तसे लोखंडी सळईने किंवा इतर धातूने डाग दिल जात जेणेकरून ते गुन्हेगार म्हणून ताबडतोब ओळखले जात असत. त्यातून त्यांना समाजात अपमानित व्हावे लागत असे. आज ग्रामीण आदिम समुदायामध्ये पाळीव प्राण्यांना ओळखण्यासाठी डाग देऊन विशिष्ट अशी खूण केली जाते ते ओळखण्यासाठी इंग्लंडमध्ये १८२९ पर्यंत डाग देण्याची पध्दत रुढ होती. रोममध्ये गुन्हेगाराच्या कपाळावर विशीष्ट खूण केली जात असे. त्यामुळे अशा व्यक्ती ताबडतोब ओळखल्या जात. शिक्षेचे अमानवीय रूप असल्याने ही प्रथा बंद झाली.

**ड) मानखोडा :- Pillory :-**

शिक्षेचा अमाननीय नमुना म्हणजे मानखोडा होय. गुन्हेगाराला एका चौकटीमध्ये बांधून त्यांचे हात व मान बांधले जाऊन त्याला चाबकाने मारले जाते. बऱ्याच वेळा त्याला तशा अवस्थेत दगड मारून, कानात खिळे, ठोकत असत. गुन्हेगाराने कोणता गुन्हा केला आहे. त्यावरुण त्याला वरील प्रकारची शिक्षा दिली जात असत. भारतात प्राचीन काळापासून मोगल काळापर्यंतही शिक्षा पध्दती अस्तित्वात होती. नंतर मात्र अपराधरशास्त्राच्या विकासात ही अमानवीय शिक्षा कालबाह्य झाली.

**२) आर्थिक शिक्षा :- (Financial Penalties)**

शिक्षा प्रकारामध्ये प्राचीन काळापासून आजपर्यंत आर्थिक शिक्षेवर सार्वमत झाले आहे. कारण ज्या गुन्हेगाराने गुन्हा केला आहे. त्याच्यांकडून आर्थिक स्वरूपात दंड देणे, भरपाई करून घेणे, जेणे करून त्या गुन्ह्यासाठी आर्थिक दंड दिल्याने ज्या व्यक्तीने तो अपराध केला आहे त्याला शिक्षा होईलच पण जो गुन्ह्यात पिडीत असतो त्याला नुकसान भरपाई झाल्याने त्याला थोड्या प्रमाणात न्याय मिळतो.आर्थिक स्वरूपाची शिक्षा बेगवेगळ्या स्वरूपात दिली जाते. ती पुढीलप्रमाणे

**अ) दंड :-**

गुन्हेगाराने केलेला गुन्हा पैसे लुबाडणे, फसवणूक कर चुकवणे, वाहतुकीचे नियम तोडणे आणि जे सौम्य स्वरूपाचे गुन्हे आहेत त्या बाबत शिक्षा म्हणून विशिष्ट रक्कम दंड म्हणून भरावी लागते.एखाद्या गुन्हेगाराला दंडाची शिक्षाच द्यावी का? या संदर्भात जर कायद्यात त्यासाठी कारावासाऐवजी दंड अशी त्यात तरतूद केलेली असते त्यावेळी दंडाची रक्कम आकारण्यात येते. दंड आकारताना ज्याला दंड द्यावयाचा

---

२५) गुन्हेगारी शास्त्र - प्रा. माणिक माने - पृष्ठ क्र. ६५.

आहे त्याच्या आर्थिक परिस्थितीचाही विचार आवश्यक करावा लागतो. कारण एखाद्या गरीब व्यक्तीला दंडाची शिक्षा दिली तर तो ती भरू शकत नसेल तर त्यासाठी त्याला काही मुदत आणि हप्त्याने भरण्याची सवलत द्यावी असे सांगितले जाते. या सदर्भात इंग्लंडमधील खटल्यात न्यायालयात जे स्पष्ट म्हटले आहे. आर. विरुध्द लेविस या खटल्यात म्हटले आहे की, "गुन्हेगाराला कारावासात पाठवायचे की दंड आकारायचा त्याचा प्रथम विचार केला पाहिजे. एकदा दंड आकारायचा हे न्यायालयाने ठरविले की मग अनेक घटकांचा विचार करावा लागेल. त्यापैकी एक म्हणजे दंड भरण्याची गुन्हेगाराची कुवत आहे. की नाही हे पाहिले पाहिजे."[२६] (कित्ता)

"भारतात १९७३ च्या फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४२१ नुसार दंड वसूल केला जातो. तर याच कलमाच्या ३५७ मध्ये जेव्हा दंडाची शिक्षा सुनावली जाते किंवा दंड हा शिक्षेचा एक भाग असतो तेव्हा संपूर्ण दंड किंवा त्याचा काही भाग आरोपीने अन्यायग्रस्ताला नुकसान भरपाई म्हणून देण्याची तरतूद आहे."[२७] (कित्ता) दंडाची शिक्षा ही त्या व्यक्तीला कारागृहात जाण्यापासून वाचवते कारागृहात होणारी गर्दीही टाळता येते. यात गुन्हेगार व्यक्तीला केलेल्या गुन्ह्याबाबत शिक्षाही होते आणि त्याच्यावर वाईट कोणताच परिणाम होत नाही. म्हणजे त्याच्या नोकरी,कूटुंब, सामाजिक,आर्थिक जीवन यावर विपरीत परिणाम होत नाही. त्यामुळे दंडाची शिक्षा प्राचीन काळापासून आजपर्यंत चालू आहे असे दिसते आणि ते योग्यही आहे.

**ब) अन्यायग्रस्त किंवा नुकसानग्रस्त व्यक्तीला भरपाई देणे :-**

आर्थिक शिक्षेचा हा दुसरा प्रकार म्हणजे अन्यायग्रस्त म्हणजेच जी व्यक्ती त्या गुन्ह्याला बळी पडत आहे त्या व्यक्तीचे जे नुकसान झाले आहे त्याची भरपाई म्हणून त्याला काही पैसे देणे या संदर्भातील शिक्षा दिल्या जातात.एखाद्या व्यक्तीने एक व्यक्ती किंवा समूहाविरुध्द कृती अर्थात गुन्हा करतो आणि त्याला दंडाच्या स्वरूपात किंवा कारावासाची शिक्षा होईल पण जो व्यक्ती या गुन्ह्यात बळी पडला आहे त्याच्यावर दुहेरी अन्याय होतो म्हणून काही प्रमाणात दंडाची रक्कम त्या पीडित व्यक्तीला दिली जाते. पण बऱ्याच वेळा असे गुन्हे असतात की, त्याची भरपाई आपणास पैशाच्या स्वरूपात केली जाऊ शकत नाही. उदाः बलात्कार, स्त्रियांचा छळ इ. अशा व्यक्तींना (पीडित) नुकसान भरपाई मिळूनसुध्दा त्यामुळे त्याची नुकसान भरपाई पैशाच्या स्वरूपात होऊ शकत नाही. तरी परंतु काही रक्कम नुकसान भरपाई म्हणुन अशा पिडीत व्यक्तीला दिली जाते.

---

२६) गुन्हेगारीशास्त्र- प्रा. माणिक माने - पृष्ठ क्र. ६६

२७) कित्ता - प्रा. माणिक माने - पृष्ठ क्र. ६७.

**क) मालमत्ता जप्त करणे :-** मालमत्ता जप्तीची शिक्षा प्रामुख्याने आर्थिक गुन्हेगारांसाठी दिली जाते. जे बँक घोटाळे, भ्रष्टाचार करून अवैध मालमत्ता जमवणे, कर्ज बुडवणे अशा वेळी न्यायालयात त्या व्यक्तीची मालमत्ता जप्तीचे आदेश देते. ही एक प्रकारची आर्थिक शिक्षाच मानली जाते.

**ड) खटल्याचा खर्च देणे :-**

बऱ्याच वेळा सर्वसामान्य व्यक्तींना काही व्यक्ती कायद्याच्या सरंक्षणाचा आधार घेऊन खोटे आरोप लावतात, त्यात आरोपीची पिळवणूक होते. अशा वेळी न्यायालय फिर्यादीला खटल्याचा खर्च भरून देण्याची शिक्षा न्यायालय देते. उदा. काही महिला पुरुषावर खोटे आरोप करुन न्यायालयात धाव घेतात. अशा वेळी आरोपी पुरुषावर अन्याय होतो. त्यामुळे न्यायालयात जोपर्यंत केस चालू आहे तोपर्यंत त्याचा खर्च त्याला करावा लागतो. तो खर्च त्या फिर्यादी व्यक्तीला भरण्या संदर्भात न्यायालय आदेश देते.पर्यायाने हीच शिक्षा समजल जाते.

**३) हद्दपार करणे :- Transportation Of Criminals :-**

गुन्हेगारांना अनेक स्वरूपाच्या शिक्षा दिली जातात त्यापैकी एक म्हणजे हद्दपारीची शिक्षा होय. गंभीर स्वरूपाच्या गुन्हेगारांना देशाबाहेर काढून देण्याची शिक्षा म्हणजेच हद्दपार होय, गंभीर गुन्हेगारांना देशाबाहेर पाठविल्याने पुन्हा असे गंभीर गुन्हे होण्याला आळा बसतो. हद्दपारीची शिक्षा संपूर्ण जगभर दिली जाते. "जे कैदी तुरुंगातुन हमेशा पळून जातात अशा कैद्यांनाही हद्दपारीची शिक्षा दिली जाते. अशा कैद्यांना व राजकीय गुन्हेगारांना वा युध्द कैद्यांना इंग्लंड, दूरच्या आफ्रिकन वसाहतीत, फ्रेंच गुन्हेगारांना गियानामधील वसाहतीत वा आफ्रिकेच्या जंगली प्रदेशात पाठवले जात असे."[२८] (दा.धों.काचोळे. २००१) बऱ्याच वेळा असे हद्दपार केलेले कैदी वापस येत नसत. कारण अनेक रोगांनी ग्रस्त हाऊन तिकडेच त्यांचा मृत्यू होत असे. दुसऱ्या महायुध्दानंतर अनेक देशांनी हा शिक्षेची पध्दत बंद केली आहे. भारतातसुध्दा हद्दपारीची शिक्षा दिली जात होती. ब्रिटिश काळात ही शिक्षा काळ्या पाण्याची शिक्षा म्हणून ओळखली जात होती. गंभीर गुन्हेगारांना अंदमान आणि निकोबार बेटावर पाठवले जात असे. १९५५ मध्ये ही शिक्षा काढून घेण्यात आली प्रसिध्द अपराधशास्त्रज्ञ सिसारे लॉब्रोसो आणि गॅरोफॅलो यांनी हद्दपारीच्या शिक्षेचे समर्थन केले आहे. लॉब्रोसो म्हणतात की, अशा गुन्हेगारांच्या हद्दपारीमुळे त्यांचा समाजावरील प्रभाव कमी होतो, तर गॅरोफॅलो केली म्हणतात की, हद्दपारीच्या शिक्षेमुळे दहशतीचा हेतू सफल होतो.

**४) तडीपार करणे :- Externment :-**

हद्दपारीपेक्षा सौम्य शिक्षेचा प्रकार म्हणजे तडीपार करणे होय. भारतीय समाजात तडीपारीची शिक्षा आजही दिली जाते. महाराष्ट्रामध्ये मुंबई पोलीस कायदा कलम ५६ व ५७ नुसार ग्रामीण भागात

---

२८) गुन्हा समाजशास्त्र - दा.धों.काचोळे - पृष्ठ क्र. ३००

उपविभागीय दंडाधिकारी तर पोलीस आयुक्त यांच्या हद्दीत सहायक पोलीस आयुक्त तडीपाराचे आदेश काढून गुन्हेगारांना विशिष्ट जिल्ह्यात ठरावीक काळासाठी तडीपार करतात.

ज्या गुन्हेगारावर गुन्हे दाखल झालेले आहेत पण शिक्षा झालेली नाही त्यांच्यासाठी कलम ५६ तर शिक्षा भोगूण आलेल्यांसाठी मुंबई पोलीस कायदा कलम ५७ नुसार कार्यवाही केली जाते जे गंभीर स्वरूपाचे गुन्हेगार आहेत, ते ज्या ठिकाणी राहतात तेथे ते दादा किंवा खतरनाक गुंड म्हणून राहतात. ते तेथे राहून अनेक गंभीर स्वरूपाचे गुन्हे करतात. तर अशा गुन्हेगारांना ते ज्या ठिकाणी राहतात. तेथील लोक त्यांना घाबरुन पोलिसांना सहकार्य करीत नाहीत किंवा त्यांच्या हाती लागत नाही. तर अशा गुन्हेगारांना विशिष्ट (संबंधीत) जिल्ह्याबाहेर विशिष्ट कालावधीसाठी हद्दपार केले तर त्यांच्या गुन्हेगारी वर्तनावर नियंत्रण येईल आणि नवीन ठिकाणी त्यांना सहकार्य लोकांकडून मिळणार नाही. तसेच भविष्यात सामाजिक शांततेचा भंग होऊ नये म्हणून विशिष्ट कालावधीसाठी तडीपारीची ही शिक्षा दिली जाते.

**५) एकांतवासाची शिक्षा :- Solitary Confinement :-**

एकांतवासाची शिक्षाही आतिशय गंभीर अशी शिक्षा होती. १७९० मध्ये सर्वप्रथम या शिक्षेचा उगम झाला. जे सराईत गंभर गुन्हेगार आहेत त्यांना इतर व्यक्तींशी संपर्क येणार नाही अशा ठिकाणी ते फक्त एकटेच राहतील अशी शिक्षा दिली जात होती. कारण मानव हा समाजशील प्राणी आहे. त्याला इतर मानवांचा सहवास अत्यंत आवश्यक असतो आणि जर अशा गुन्हेगारास इतर व्यक्तींचा सहवास मिळणार नाही अशा ठिकाणी ठेवले तर तो लवकरच वेडा होतो किंवा मृत्यू पावतो. त्यामुळे गंभीर गुन्हेगारांपासून समाजाचे संरक्षणही होत होते.

"एकांतवासाच्या शिक्षेसंदर्भात भारतीय अपराधशास्त्रज्ञ डॉ.पी.के. सेन. म्हणतात की, कुठलाही रक्तपात न करता गुन्हेगाराला संपवण्याचा एकांतवास ही कदाचित उत्तम पध्दत असावी."[२९] (प्रा. माणिक माने. १९९९) भारतीय संदर्भात प्राचीन काळापासून ही शिक्षा अस्तित्वात होती कारण यामुळे गुन्हेगाराने स्वतःचे आत्मपरीक्षण करावे, पश्चात्ताप करावा यातून स्वतः सुधारणा घडवून आणावी अशी भावना या शिक्षेमागे होती.

**६) कारावास :- Imprisonment :-**

कारावास ही शिक्षा पध्दत संपूर्ण जगभर प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे. पण आज त्यामध्ये अनेक महत्त्वपुर्ण बदल झाले आहेत. गुन्हेगार व्यक्तीने गुन्ह्याचे कृत्य केल्यामुळे त्याला त्याच्या कुटुंब समाज यापासून विशिष्ट कालावधीसाठी तुरुंगासारख्या ठिकाणी ठेवणे म्हणजेच कारावास होय.

२९) गुन्हेगारीशास्त्र - प्रा. माणिक माने. पृष्ठ क्र. ६८.

प्राचीन काळापासून कारावासाची शिक्षा दिली जात होती आणि आजही दिली जात आहे. पण प्राचीन आणि मध्ययुगीन काळात कारागृहात खूपच अवघड कामे करून घेतली जात. त्यांना सूवीधा मात्र अतिशय नगण्य मिळत होत्या. गुन्हेगारांना विशिष्ट कालावधीसाठी कारावासात पाठवल्यामुळे समाजाचे संरक्षण होते. आधुनिक काळात तुरुंग व्यवस्थेत मानववादी दृष्टिकोनाचा अवलंब होऊ लागला आणि गुन्हेगाराला विशिष्ट कालावधीचा जो कारावास झाला आहे त्या काळात त्यामध्ये सुधारण्यासाठी प्रयत्न केले जातात. आज संपुर्ण जगभर कारागृहे ही कारागृहे न राहता सुधारालये बनली आहेत. कारावासाच्या शिक्षे संदर्भात " हॅन्स मॅटिक म्हणतात की, पूर्ण फौजदारी न्याय व्यवस्थेलाच सामावून घेणारे कारागृह हे केंद्र नसून ते कैद्यांच्या आरोग्य, कल्याण आणि सामाजिक समस्यांवरील प्रथम आणि अंतिम उपाय आहे."[३०] (कित्ता) अर्थात तुरुंगातील कारावास ही शिक्षा शिक्षा न राहता त्या गुन्हेगारांना सुधारण्याची केंद्र बनली आहेत. या संदर्भात विस्तृत माहिती पुढे दिली आहे.

**७) देहदंड / फाशी :- Capital Punishment:-**

देहदंड हा अतिशय भयंकार शिक्षा प्रकार आहे. ज्या गुन्हेगारांनी खून अशा गंभीर स्वरूपाची गुन्हे केले आहेत त्यांना इतर व्यक्ती आणि समाजबद्दल सहानुभूतीची भावना नाही त्यांना देहदंडाची शिक्षा दिली जात देहदंडाची शिक्षा प्रत्येक देशात वेगवेगळ्या स्वरूपात दिली जाते. काही देशांत मरेपर्यंत उकळणे, बंद खोलीत विषारी वायू सोडणे, भारतात मरेपर्यंत फाशी अशा शिक्षा केल्या जातात. ज्या व्यक्ती इतर व्यक्तींचे जीवन संपवतात त्यांना जगण्याचा क्क नाही या भावनेतून देहदंड ही शिक्षा दिली जाते.

**८) सामाजिक अपमान :- Social Degradation :-**

सामाजिक अपमानाची शिक्षा प्राचीन काळात आदिवासी व ग्रामीण समाजात दिली जात होती. जी व्यक्ती गुन्हेगार आहे. त्याला सर्व लोकांपुढे अपमानित केले जात होते. त्याला शारीरिक यातना ही दिल्या जात होत्या. त्यामुळे त्याचा सर्व लोकांसमोर अपमान झाल्याने त्याचा काही अधिकरांपासून ही त्याला वंचित ठेवले जात होत सामाजिक प्रतिष्ठा हा प्रत्येक व्यक्तींचा सामाजिक दर्जा ठरवत असे. मग ज्या गुन्हेगार व्यक्ती आहेत त्यांचा अपमान करून त्यांचा मानहानी करणे हीच शिक्षा मानली जात होती.

अशा प्रकारे विविध प्रकारच्या शिक्षा प्रकार अस्तित्वात होते. प्राचीन काळापासून आजच्या आधुनिक काळापर्यंत शिक्षा पध्दतीत आमूलाग्र बदल झालेले आहेत. आज तर गुन्हेगारांना शिक्षा म्हणजे त्याच्यामध्ये सुधारणा होण्याचा काळ मानला जातो. गुन्हेगार हेही मानव आहेत. त्यांनी जो गुन्हा केला त्यापाठीमागे ते स्वतः जबाबदार असत नाही तर सामाजिक परिस्थिती जबाबदार असते. त्यामुळे व्यक्ती

---

३०) कित्ता - पृष्ठ क्र ४९.

गुन्ह्याची कृत्ये करतात. त्यामुळे त्यांना अमानुषंपणे शिक्षा देण्याऐवजी त्यांच्या वर्तनामध्ये सुधारणा करण्यासाठी शिक्षा गरजेची आहे. याच भावनेतुन आज गुन्हेगारांना शिक्षा दिल्या जातात.

### १.५ कारागृह - Prison

कारागृह एका विशिष्ट राहण्याचे ठिकाण आहे की, ज्यांनी गुन्हा केला आहे व गुन्हा केल्याचा संशय आहे त्यांना न्यायालयाच्या आदेशान्वये निश्चित कालावधीसाठी आपल्या कुटुंबीयांपासून वेगळे ठेवले जाते कारागृह ही एक संस्था आहे. या संस्थेचे स्वरूप प्राचीन काळापासून आजपर्यंत बदलत आले आहे. गुन्हा करणाऱ्या व्यक्तीला त्याच्या गुन्ह्याच्या स्वरू पावरुन अनेक प्रकारे शिक्षाही दिली जात असे. त्यात कारावासाची शिक्षाही दिली जात असे. ही कारावासाची शिक्षा देण्याची पध्दती प्राचीन काळापासून अस्तीत्वात होती. पण त्यात अशा अपराध्यांना शिक्षा मात्र अतिशय त्रासदायक अशा दिल्या जात होत्या. पण परिस्थितीनुसार त्यामध्ये सुधारणा होऊन त्या अपराध्यामध्ये सुधारणा करण्यासाठी प्रयत्न केले जातात. आज कारागृहे ही "**सुधारणा आणि पुनर्वसन**" या प्रमाणे कार्यरत असून अपराधी हेही माणसे आहेत, त्यांना सुधारण्यासाठी अनेक उपक्रमांच्या माध्यमातून प्रयत्न केले जातात. दंड प्रक्रियेत कारागृह ही सुधार संस्था मानली जाते. कारण अपराधी हा कारागृहातून शिक्षा भोगून आल्यानंतर समाजात सन्मानाने जगावे हा महत्त्वपुर्ण उद्देश असतो. आपल्या कुटुंबीय, नातेवाईक, समाज यांच्यापासून दूर राहिल्याने त्यांच्यामध्ये मानसीक परिवर्तन होऊ शकते. कारागृहाच्या उद्देशांत अपराध्यामध्ये सुधारणा, प्रशिक्षण स्वावलंबन, तसेच सामान्य नागरिकामध्ये त्याचे रूपांतर करणे इ. गोष्टी येतात. या संदर्भात डॉ. सपूर्णानंद म्हणतात की "समाज की वर्तमान परिस्थिती में जेल रखने ही होंगे, परन्तु यदी उसके प्रबंधमें जेल सम्वेदना और मनोविज्ञान को अधिक स्थान दिए जाये तो उनसे उन अभागों का सचमुच लाभ हो सकता है । जो समाज के संघटन के साथ अपनी प्रवृतीयाका सामंजस्य न कर सकनेके कारण जेल भेजे जाते है।" [३१] (डॉ.ए.एन.अग्नेहोत्री. १९९५) अर्थात कारागृहात अपराध्यांच्या सुधारणेमध्ये मनोवैज्ञानिक उपचारांची आवश्यकता आहे जेणे करून त्यांच्या मनावर परिणाम झाला तर बाहेर आल्यावर ते मनोरुग्ण होणार नाहीत. त्यासाठी कारागृहातच तसे प्रयत्न प्रशिक्षित कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून होणे गरजेचे आहेत. त्या शिवाय हे शक्य नाही.

या संदर्भात श्री परिपूर्णानंद वर्मा म्हणतात की उसको शिक्षा, "उसको उद्योग धंदे में लगना यह सब तो गौन चीज है । असली चीज है उसमे यह भावना या जागृती उत्पन्न करना की, वह अपने जीवन को, अपने व्यक्तित्व को ऊपर उठाएगा ।

३१) अपराधी कल्याण के विविध आयाम - डॉ. ए.एन.अग्नेहोत्री - पृष्ठ क्र. ७२

अत एवं जेल कर्मचारीयो में जितना धैर्य, होगा उतनाही बंदीका सुधार होगा । इसलिए जेल के कर्मचारियोंको शिक्षित तथा समझदार होना चाहिए ।"[३२] (कित्ता)

प्राचीन कारागृह कार्यप्रणाली आणि आजची कार्यप्रणाली यामध्ये खूप मोठ्या प्रमाणात बदल झाला आहे. भारता संदर्भात विचार करता जुनाट किल्ले, इमारत यांचा वापर तुरुंग म्हणून केला जात होता. पण या तुरुंगात त्या अपराध्यांना फक्त यातना दिल्या जात. त्यातून त्यांच्यामध्ये सुधारणा होण्याऐवजी अपराधाची भावना अधिक बळावत असे बऱ्याच वेळा आपल्या कुटुंबीयापासून वेगळे राहिल्याने मनोरुग्ण होत असत. त्यामुळे आज अपराध्याला त्याच्या कुटुंबीयापांसून वेगळे ठेवून त्यामध्ये सुधारणा करण्यासाठी वेगवेगळे प्रयत्न जेल प्रशासनाकडून केले जातात.

## कारागृहाची व्याख्या

कारागृह हे अपराध्यासाठीचे विशिष्ट असे राहण्याचे ठिकाण आहे. ही एक दंड संस्था असून शासनामार्फत तिचे मार्गक्रमण चालू असते. ती आज एक सुधारसंस्था म्हणून गणली जाते. या कारागृहाला बंदीगृह, जेल अशा अनेक नावांनी ओळखले जाते. या कारागृहाचा नेमका अर्ज सांगत असताना अनेक अभ्यासकांनी वेगवेगळ्या व्याख्या केल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे.

**१) " फेयर चाइल्ड:** (Fair Child) कारागार एक दंडात्मक संस्था है । जिसका संचालन राज्य या संघीय सरकार व्दारा किया जाता है । और उन वयस्क अपराधियों के लिए प्रयुक्त होती है । जिनका दण्डादेश एक वर्ष से अधिक का होता है ।" "A Prison is a Penal Instution operated sentince exceed one year" [३३] (जीत कृष्णा सिंह. २००१)

**२) एम. जे. सेठना** (M.J. Sethna) "कारागार (जिसका अर्थ पिजडा है ) रोकने का एक स्थान है । कारागार विचाराधीनों को भी रोकने का स्थान है । ये ऐसे स्थान है । जहाँ अपराधियों को उनके सुधार के लिए रखा जाता है । A Prison (meaning cage) is a place for detention prisons are places for detention of undertrials" [३४] (डॉ. रामनाथ शर्मा, राजेंद्रकुमार शर्मा. १९९६)

**३) कारागृह अधिनियम १८९४ नुसार :-** कारागृह राज्य सरकारव्दारे निर्धारित केलेले ते स्थान आहे. जेथे अपराध्यांना स्थाई किंवा अस्थाई स्वरूपात ठेवले जाते.

---

३२) कित्ता - पृष्ठ क्र. ७३

३३) अपराधशास्त्र और दंडशासन - जीत कृष्णा सिंह - पृष्ठ क्र. २६७

३४) सामाजिक विघटन - डॉ. रामनाथ शर्मा, राजेंद्रकुमार शर्मा - पृष्ठ क्र. ४११

४) **बर्नेस आणि टिटर्स :-** "ज्यांनी कायदाविरोधी कृती केली आहे, कायद्याचा भंग केला आहे अथवा केला असल्याचा संशय आहे अशा व्यक्तींना डांबून ठेवण्याची जागा म्हणजे कारागृह होय. "

## ❖ कारागृहाचे उद्देश Objectives of Imprisonment :-

१) अपराध्यांना समाजापासून, कुटुंबापासून वेगवेगळे ठेवणे. ज्यामुळे अपराध्यांच्या मनामध्ये भीतीचे वातावरण निर्माण होईल. आणि एकांतवासात राहिल्याने त्यांना मूल्यवान जीवनाची जाणीव होईल.

२) अपराध्यामध्ये सुधारण करणे :- अपराध्यांना कारागृहात चांगल्या प्रकारची वागणूक देऊण त्यांच्यावर चांगले उपचार करावेत जेणे करून त्यांच्यामध्ये सुधारणा होईल.

३) होणाऱ्या अपराधावर नियंत्रण ठेवणे. ज्यांनी कायदाबाह्य वर्तन केले आहे त्यांना कारागृहात ठेवल्याने त्यांच्या हातून भविष्यात होणारे अपराध थांबवता येतात. आणि कारागृहात त्यांच्या सुधारण्यासाठी अनेक प्रयत्न केल्यामुळे बाहेर आल्यावर हे अपराधी अशी कृती करणार नाहीत अर्थात त्यांचे पुनर्वसन करणे.

## ❖ कारागृहाचा इतिहास History of Prison

पृथ्वीतलावर गुन्हा आणि गुन्हेगाराशिवाय समाज राहु शकत नाही. त्या आधी प्रत्येक देशाला तुरूंगासारख्या संस्थेची गरज असते. आणि ती प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे. पण या संस्थेचे स्वरूप आणी रचना कालानुरूप परिवर्तीत झालेली आपणास दिसते. ज्या व्यक्तींनी इतरांना दुःख पोहचवले आहे. किंवा ज्या व्यक्तीने नियमबाह्य /कायदाबाह्य वर्तन केले आहे. त्याला समाजात राहण्यापेक्षा कुटुंब आणी समाज यांच्यापासून दूर ठेवले तर त्याच्या हातून भविष्यात घडणाऱ्या गुन्ह्यांना आळा बसेल. या प्रमुख उद्देशाबरोबर अनेक उद्देश होते. गुन्हेगारांना पीडा देणे हाही महत्त्वपुर्ण उद्देश होता. कारण कुटुंब आणि समाज यांच्यापासून दूर राहिल्याने त्याला पश्चात्ताप होत असे. त्यामुळे गुन्हेगारांना ठेवण्याचे ठिकाण म्हणजे कारागृह हे गुन्हेगारांना ठेवण्याचे एक विशिष्ट ठिकाण होते. संपूर्ण जगभरातील कारागृहांची निर्मिती प्राचीन काळापासून झाली. पण गुन्हेगारांना शिक्षा देण्याच्या पध्दती मात्र थोड्या फार प्रमाणात तफावत जाणवते कारागृहाचा इतिहास पाहत असताना प्राचीन काळापासून आजच्या आधुनिक २१ व्या शतकातील कारागृह त्यांच्या कार्यपध्दतीन खूप बदल आपणास जाणवतो. प्राचीन काळात कठोर अशी शिक्षा दिली जात असे. अर्थात ज्या व्यक्तीने गुन्हा केला आहे त्या व्यक्तीचे मानव म्हणून अधिकाराचा विचार केला जात नव्हता. पण विज्ञान, तंत्रज्ञानाच्या प्रगतीबरोबर अनेक अभ्यासक, अपराधशास्त्र, समाजशास्त्रज्ञ यांचा अभ्यास करुन त्यात वेळोवेळी सुधारणा सांगितल्या. कारागृहातील कैदी हेही माणुस आहेत. ही मानवतावादी भावना

निर्माण होऊन आजची कारागृहे ही कारागृहे न राहता सुधारालये बनली आहेत. "सुधारणा आणि पुनर्वसन" यां प्रमाणे अनेक कार्यक्रम उपक्रमांच्या माध्यमातून त्यांच्यामध्ये मानसिक परिवर्तन करण्यासाठी प्रयत्न चालू आहेत. जेणे करून असे कैदी बाहेर आल्यावर पुन्हा असे विघातक कृत्य करणार नाहीत. या प्रमाणे आजची कारागृहे मार्गक्रमण करीत आहेत. कारागृह रचना आणि कार्य पध्दतीचा ऐतिहासिक आढावा पुढीलप्रमाणे.

### ❖ भारतीय कारागृहांचा इतिहास

भारतीय कारागृहांचा इतिहास पाहाता असतांना कारागृहे ही राज्य शासनामार्फत चालवली जाणारी एक दंड संस्था आहे. भारतीय कारागृहांचा इतिहास पाहाता असताना आपणास यांचे प्राचन, मध्ययुगीन आणि आधुनिक कारागृहे असे टप्पे पाहावे लागतील. कारण प्राचीन काळापासून आजच्या आधुनिक काळापर्यंत यांचे स्वरूप खूपच बदललेले आपणास दिसते.

मानवी समाजात गुन्हेगारांच्या वाढत्या प्रमाणाबरोबरच त्यांना दिल्या जाणाऱ्या शिक्षेमध्येही बदल झाला. शिक्षेचे अनेक प्रकार अस्तित्वात होते. अतिप्राचीन काळातील शिक्षे संदर्भात डॉ. रामनाथ शर्मा म्हणतात की "अतिप्राचीन काल में बंदीगृह की व्यवस्था नही थी, हम कह सकते है की, आखेट युग एवं पशुपालन युग मै बंदी गृहोंकी बिल्कुल भी व्यवस्था नही थी। कृषी काल में बन्दीगृहोंकी आवश्यकता ही नही थी ।" [३५] (डॉ. रामनाथ शर्मा, डॉ. राजेंद्र कुमार शर्मा. १९९६)अर्थात मानवी उत्पतीच्या अतिप्राचीन काळात कारागृहांची व्यवस्था नव्हती  अर्थात गुन्हा आणि गुन्हेगार आणि त्यांना शिक्षेची व्यवस्था होती. मात्र कारागृहात ठेवण्याची शिक्षा दिली जात नव्हती. त्यामुळे कारागृहे ही अतिप्राचीन काळात कारागृहे नव्हती असे वरील संदर्भावरुन आपणास जाणवते. प्राचीन भारतात सर्वच गुन्हेगारांना सारखीच शिक्षा दिली जात नव्हती. कारण वर्णव्यवस्था, जाती व्यवस्था या आधारावर या शिक्षेमध्ये तफावत जाणवत असे. प्राचीन काळात बंदीस्त तुरंगातील शिक्षेपेक्षा तडीपार करणे, बदला घेणे, कडेलोट करणे, हातपाय तोडणे, भिंतीत चिरडून मरणे, हत्तीच्या पायाखाली चिरडून मारणे, डोळे काढणे, तापलेल्या सळ्यांनी चटके देणे अशा प्रकारच्या शिक्षा दिल्या जात असत. १५९७ मध्ये पहिल्यांदा कारागृहाची निर्मिती करण्यात आली. यात स्त्री, पुरुष मुले, प्रथम गुन्हेगार, सऱ्हाईत गुन्हेगार या सर्वांना एकत्रच डांबवून ठेवत असत. भारतामध्ये स्वतंत्र अशा कारागृहाची स्थापना १७८७ मध्ये सुमात्रा बेटांवरील बांकुलन (Bancoolen) येथे झाली.

---

३५) सामाजिक विघटन - डॉ. रामनाथ शर्मा, डॉ. राजेंद्र कुमार शर्मा - पृष्ठ क्र. ४१

प्राचीन भारतात कायदे निर्मिती मनुष्याने असे नमूद केले आहे की, दंड हा धर्माचाच एक भाग आहे अर्थात भारतात गुन्हेगारीशास्त्र हा विषय नवीन नाही, तो प्राचीन काळापासून दंड शासनाच्या स्वरूपात अस्तित्वात आहे. अपराधशास्त्राच्या संदर्भात प्राचीन भारतात अनेक वाङ्मय उपलब्द आहे. जसे की, दंड नितिशास्त्र, धर्मशास्त्र, वेद, स्मृतिशास्त्र कौटिल्याचे अर्थशास्त्र यात समाजविरोधी कृत्य करणाऱ्यांना शिक्षेचे प्रावधान केले आहे. "प्राचीन भारतीय तुरुंग व्यवस्था आणि कार्यप्रणाली अत्यंत शिस्तबद्द होती. बृहस्वतीने गुन्हेगारांना तुरुंगात ठेवण्यावर भर दिला तर मनुने बंद तुरुंगाचा विरोध केला. कौटिल्यांनी तुरुंग रस्त्याच्या कडेला असावे असे सांगितले" [३६] (Dr. N.V. Paranjape. २००३ ) कारण त्यांचा परिणाम समाजातील इतर लोकांवर होऊन गुन्ह्यांचे प्रमाण कमी करता येईल. भारतात प्राचीन काळापासून न्यायाला विशेष महत्त्व दिले जात होते. गुन्ह्यांचे प्रमाण कमी करण्यासाठी अनेक प्रकारच्या शिक्षा दिल्या जात होत्या. कारागृह हे गुन्ह्यांच्या प्रमाणाला आळा घालणारे साधन आहे असे मानले जात होते.

**१) वेदकालीन कारागृह**

वैदीक काळात न्याय, दंड व गुन्हेगारा संदर्भात ज्ञान प्राप्त करण्यासाठी वेद हे एकमेव साधन होते. वेद साहित्यात आजच्यासारखी दंडसहिता अस्तित्वात नव्हती, मात्र न्यायदानाला अतिउच्च स्थान होते न्याय देणे म्हणजे परमेश्वराचे कार्य आहे असे समजल जात असे. स्वर्ग नरक या कल्पनांना अतीव महत्त्व होते. निश्चित स्वरूपाची कारागृहे नव्हती. पण वाईट काम/कर्म केल्यावर आपण नरकात जातो. नरकात वेगवेगळ्या यातना भोगाव्या लागतात अशी धारणा होती. नरकात जाणे म्हणजेच कारागृहात जाणे होय असे मानले जात असे.

**२) स्मृतिकालीन बंदीगृह :-**

स्मृति काळातील दंड संहितेची निर्मिती झाली होती. अपराधी आणि त्यांना दिली जाणारी शिक्षा त्या संबंधी माहिती मनुस्मृतीमध्ये दिली गेली होती. मनुने व्यक्तीची कार्य धर्म आणि अधर्म या दोन प्रकारांत वर्णन केले होते. मानव कल्याणाचे, हिताचे प्रत्येक वर्तन म्हणजे धर्म तर मानवी हिताच्या विरुध्द अर्थात मानवाला दुःखी करणारे वर्तन म्हणजे अधर्म होय. अधर्माचे वर्तन करणाऱ्यांना शिक्षेची व्यवस्था होती. पण ही दंड व्यवस्था धर्म, जाती, वर्ण या प्रत्येकात विभिन्नता होती. या काळात बंदीगृह व्यवस्था अस्तित्त्वात होती पण बंदीगृहाचे प्रकार आणि विस्तृत विवरण उपलब्ध नाही.

**३) महाकाव्यकालीन कारागृह :-**

महाकाव्य म्हणजे रामायण, महाभारताचा काळ होय. या काळात कारागृहांना शिक्षेचे प्रमुख साधन मानले जात होते. श्री कृष्णाचा जन्म कारागृहातच झाला होता.

---

३६) Criminology and Penology - Dr. N.V. Paranjape

**४) बुध्दकालीन कारागृहे :-**

बुध्दकाळात कारागृहांचा विकास झाला होता गुन्हेगारांना कारागृहात अतिशय कठोर अशी शिक्षा दिली जात होती. त्या कठोरतेचे वर्णन डॉ.एम.जे सेठना यांनी पुढील शब्दांत केले आहे. "In India the Prisons of the pre-Buddtist times were terrible indeed There were dungeons, and Prisoners where kept under chains and heavey lodes and wipped on the slightest pretext " [३७] Dr. M.J. Sethna - society and the criminal p-275 (डॉ. रामनाथ शर्मा. १९९६) अर्थात भारतात बुध्दपूर्व काळातील कारागृहे भयंकर होती. या काळात जेलमध्ये खोल्या असत आणि त्यांना कोणत्याही साधारण कारणावरुन फटके मारले जात असत.

**५) मध्ययुगीन काळातील कारागृहे :-**

मध्ययुगीन राजे, रजवाड्यांच्या काळात जुनाट किल्ल्यांचा वापर कारागृह म्हणून केला जात होता. मुस्लिम व हिंदू काळातही गुन्हेगाराने पुन्हा गुन्हा करू नये म्हणून शिक्षा दिली जात होती. फटके मारणे, फाशी, डांबून ठेवणे, उपाशी ठेवणे अशा कठोर शिक्षा मुस्लिम राजवटीत दिल्या जात असत.

तुरुंग हे दहशतीचे केंद्र होते. तुरुंग अधिकारी कैद्यांसोबत अतिशय निर्दयपणे वागत असत. मध्ययुगीन काळातील कारागृहात कैद्यांना अतिशय प्रकाशहीन, किड्यांनी युक्त अन्न, साफसफाईचा अभाव अशा परिस्थितीत ठेवले जात असे. "वास्तवात कबरस्तानाकडे घेऊन जाणारे कमरे असा उल्लेख कारागृहाचा केला जात होता" [३८] (कित्ता ) स्त्री, पुरुष, बालक यांना एकत्रच ठेवले जात असे. त्यांच्यात कोणत्याच प्रकारची वर्गवारी केली जात नसे. " मौर्य शासन काळात विशेषतः सम्राट अशोकाच्या काळात धर्म महामंत्र नावाच्या अधिकाऱ्याची नेमणूक करुन तो तुरुंगातील कैद्यांकडे पाहात असे. प्राचीन भारतीय सभ्येतेत जेथे धर्म हा सर्वश्रेष्ठ होता. तेथे गुन्हेगारावर कृपादृष्टी असायची, परंतु मध्ययुगीन काळात राज्यांच्या वाढत्या राजकीय अधिपत्यात ती संपुष्टात आली. "अकबराचा एक विद्वानमंत्री "**अबुल फजल**" नुसार मुसलमान राज्यांनी गुन्हेगारांना तुरुंगवासाची शिक्षा सुनावण्यास सुरुवात केली व त्यांना जुनाट किल्लात डांबून ठेवण्यात आले" [३९] (Nital Roy Chowdhury. २००२) "सरण सांगतात की, मध्ययुगीन काळात कारागृहाचे विभाजन अ आणि ब या दोन श्रेणीत केले जात होते. अ श्रेणीत तुरुंगात राजघराण्यातील व उच्च श्रेणीतील कैद्यासाठी ज्यात राजकीय व्यक्ती, शासकीय अधिकारी, राजकुमार व इतर लोकांचा समावेश

३७) सामाजिक विघटन - डॉ. रामनाथ शर्मा - पृष्ठ क्र. ४१६

३८) कित्ता

३९) Indian Prison Lows and Correction of Prisoners - Nital Roy Chowdhury

असतो तसेच ब श्रेणीत सर्वसाधारण गुन्हेगारांना ठेवण्यात येत असत" [४०](कित्ता) पुढे **जहॉगीर** च्या काळात तुरुंगाला पोषक वातावरण मिळाले त्यामुळे न्याय या तत्वावर मानुसकी, प्रेम, माया व सौम्यता या मानवी स्वभावर आधारित शिक्षा होत्या जहागीरचे अनुकरण नंतर शहाजहान ने केले जो स्वतः शेवटी आठ वर्ष आपल्या मुलाचा कैदी म्हणून आग्रा किल्ल्यात होता. शहाजहानच्या काळात प्रशासनाकडून व तुरुंग प्रशासनाकडून कैद्यांना कुटल्ल्याच प्रकारची दया दाखवली जात नसे.

मध्ययुगीन काळात न्याय व्यवस्था ढासाळली होती मुलगी मुगल साम्राज्याच्या विस्तारा बरोबरच तत्कालीन भारतात पोर्तुगीजांचे आगमन होत होते. पोर्तुगीज तेव्हा कैथलीक चर्चच्या अधिपत्याखाली होते. ते कट्र धर्मांधंतेचे पुरस्करते होते. ख्रिश्चन परंपरेनुसार दुःख यातना या व्दारे शुध्दीकरण घेण्याला प्राधान्य दिले म्हणून एकांतताची शिक्षा देण्यास सुरुवात झाली. मध्ययुगीन कारागृहा बाबत कौटील्या यांनी त्यांच्या अर्थशास्त्रात काही सुचना सांगितल्या होत्या. कारागृहे हे मुख्य रस्त्यावर किंवा सार्वजनिक ठिकाणी असावे. कारण कारागृहात अमानुश कठोर वागणूक कैद्यांना दिली जात होती. याची माहिती सामान्य लोकांना व्हावी कारण कारागृहात कैद्यांना दिली जाणारी वागणूक सामान्य मानसांना कळाली तर त्याचा परिणाम त्यांच्या वर्तनावर होईल अर्थात गुन्ह्याचे प्रमाण आपोआपच कमी होईल. कारागृहात कठोर शिक्षा बरोबरच कठोर नियंत्रन, वेगवेगळ्या यातना दिल्या जात होत्या हर्षवर्धन च्या काळातही न्यायाला प्राथमीकता दिली जात होती गंभीर अपराध्यांना कठोर शासन केले जात होते शेरश्हा सुरी मोगल सम्राट, आणि मराठा राजे, पेशव्यांच्या काळात शिक्षेच्या कठोर साधनांचा वापर केला जात होता.

### ❖ ब्रिटीश कालखंड

भारतीय तुरुंगाचा इतिहास पहात असतांना कारागृह प्रशासनावरही ब्रिटिशांची छाप होती. भारतात ब्रिटिशांनी आगमन केल्यानंतर प्रथम जेथील प्रशासकीय परिवर्तनाची सुरुवात केली येथील कायद्यामध्ये काही प्रमाणात अर्थात ब्रिटिशांना अनुकूल असे बदल करण्यात आले इ.स. १७७३ ला रेग्युलेटीग ॲक्ट पास केला आणि त्या अनुसार कलकत्ता येथे उच्च न्यायालयाची स्थापना केली. अर्थात भारतात इंग्रजांनी जे कायदे केले ते प्रथम इंग्रजांसाठीच होते पण नंतर ते भारतीयांसाठी सुध्दा लागू केले जाऊ लागले. आणि १७७३ ला शिक्षेच्या स्वरुपात कारावासाची शिक्षा दिली गेली. इंग्रजांचे राज्य इस्ट इंडिया कंपनी मार्फत भारतावर चालु होते. त्यांनी कारागृहाची स्थापना केली पण या कारागृहात कैद्यांची अतिशय दमनीय आवस्था होती. राहण्यासाठी आपुरी जागा, निकृष्ठ आहार, वैद्यकीय सुविधेचा अभाव तर त्यांना फक्त

४०) कित्ता

कपडे दिले जात असत अर्थात कारागृहात दिल्या जाणाऱ्या सुविधांचा दर्जा अतिशय वाईट होता.

भारतीय कारागृहा संदर्भात १८३५ मध्ये लॉर्ड मेकॉल यांच्या अध्यक्षतेखाली समितीचे गठन करण्यात आले. लॉड मेकॉले यांनी १८३८ मध्ये आपला अहवाल सादर करुण कारागृहात मुलभूत सुधारण करण्या संदर्भात सुचना केल्या त्यात मध्यवर्ती कारागृहांची स्थापना करुण ज्यांना एक वर्षापेक्षा अधिक शिक्षा झाली आहे अशा सर्व कैद्यांना ठेवावे, पण एका मध्यवर्ती कारागृहात एक हजार पेक्षा अधिक कैदी ठेऊ नये सर्व राज्यांनी इन्स्पेक्टर जनरल प्रिझनची नियुक्ती करावी, कैद्यांना राहण्यासाठी पुरेशी जागा असावी अशा शिफारशी केल्या. या सुचनांचे पालन काही राज्यांनी केले तरी परंतू यातून मुलभूत बदल झाले नाहीत. याच काळात म्हणजे १८५६ मध्ये भारतीय दंड संहिता (Indian penal code) व १८६०मध्ये दंड विधी संहिता (Criminal Procedure code) कायद्याच्या रुपात पुढे आले. भारतीय दंड संहितेत गुन्ह्याच्या व्याख्या तसेच त्यासाठीची शिक्षा यांचा आंतरभाव केला होता.

भारत सरकारने कारागृहातील समस्या शोधन्या संदर्भात १८६४ मध्ये अखिल भारतीय कमीटीची स्थापना केली. या जेल कमीटीने प्रत्येक कारागृहात प्रत्येक कैद्यांसाठी ६४० घनपुट जागा पाहीजे, राहण्याच्या ठिकाणी खेळती हवा पाहिजे, प्रत्येक कैद्याचे सामान ठेवण्याची व्यवस्था करावी, वैद्यकीय तपासणीसाठी डॉक्टरांची नियुक्ती करावी, १५ कैद्यांसाठी स्वतंत्र राहण्याची व्यवस्था करावी मोठ्या कैद्यांबरोबर बालगुन्हेगारांना ठेवू नये अशा विविध सुचना केल्या.

१८७७ मध्ये तीसरी कारागृह समितीची स्थापना झाली या समितीने संपुर्ण कारागृह प्रशासनाचा अभ्यास केला. या समितीने कारागृहाच्या हिशोबा संबंधीचे काही नियम बनवले. तसेच १८७७मध्येच कलकत्ता येथे अपराधशास्त्रातील तज्ञाचे संमेलन आयोजित केले होते १८८६ मध्ये चौथी कारागृह समिती स्थापना करण्यात आली या समितीने जेल प्रशासनाचे अनेक नियम बनवले.ज्या कैद्यांची न्यायालयीन प्रक्रिया चालु आहे अशा कैद्यांना शिक्षा झालेल्या कैद्यांपासून वेगळे ठेवावे तसेच कारागृहात एक रुग्णालय आवश्यक आहे अशा शिफारशी केल्या.

१८८८-८९ मध्ये कारागृह प्रशासनाचा अभ्यास करण्यासाठी भारत सरकारने एका समितीची नियुक्ती केली या समितीत डॉ.वॉकर आणि लेथ ब्रीज हे सदस्य होते. या समितीच्या अध्ययनातून संपुर्ण भारतासाठी १८९४ चा कारागृह अधिनियम बनला. १८९४ च्या अधिनियमानंतर कारागृहात मोठ्या प्रमाणात सुधारणा झाल्या कारण भारतीयांच्या दृष्टीने २० वे शतक हे स्वतंत्र चळवळीचे शतक होते. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात अनेकांना राजकीय कैदी म्हणून कारागृहात ठेवले जात त्यामुळे तुरुंग नियमावलीत अनेक बदल केले गेले.

## ❖ भारतीय तुरुंग सुधार समिती :- १९१९ -२०

भारतीय तुरुंगात सुधारणा करण्यासाठी अनेक समित्यांचे गठन झाले. त्यांनी अहवाल सादर केले पण त्यांच्या सूचनांचे योग्य प्रकारे पालन झाले नाही. त्यामुळे कारागृह प्रशासनात महत्त्वपुर्ण बदल झाले नव्हते. त्यासाठी भारत सरकारने "**सर अलेग्झाडर कारडेव्ह**" यांच्या अध्यक्षतेखाली १९१९-२० मध्ये तुरुंग सुधार समितीची स्थापना केली. या समितीने भारतीय कारागृहात सुधारणा करण्यासाठी बर्मा, जपान, फिलिपाईन्स, ब्रिटेन, हाँगकाँग इ. देशांतील तुरुंगांना भेटी दिल्या आणि भारतीय कारागृहांना भेटी देऊन सुधारण संबंधीचा अहवाल सादर केला.

"सर अलेक्झांडर कारडेव्ह यांनी केलेल्या सूचना या कारागृह सुधारणा संदर्भात अत्यंत महत्त्वपुर्ण असून त्या पुढीलप्रमाणे.-

१) कारागृहात प्रशिक्षित अधिकारी वर्ग असावा

२) तुरुंग अधिकाऱ्यांची नियुक्ती उच्च श्रेणीतून करण्यात यावी.

३) वैद्यकीय अधिकाऱ्यांने तुरुंगाच्या नियमाआंतर्गत वैद्यकीय सेवा द्यावी.

४) तुरूंग रक्षक (Warders) शिक्षित असावेत.

५) सऱ्हाईत गुन्हेगार आणि प्रासंगिक गुन्हेगार अशी वर्गवारी करावी .

६) गुन्हेगारांना राहण्यासाठी बॅरेक्स ची स्वतंत्र व्यवस्था करण्यात यावी.

७) कारागृहात कैद्यांना सुधारण्यासाठी प्रयत्न करावेत.

८) कैद्यांना वाचनासाठी पुस्तके, वर्तमानपत्रे देण्यात यावीत. त्यांना आलेली पत्रे द्यावीत. तसेच नाते वाईकांची भेट घडवून आणावी .

९) गुन्हेगाराची एकांतवासाची शिक्षा पूर्णतः रद्द करावी.

१०) कारागृहात ग्रंथालय असावे.

११) कैद्यांना गरम आणि चांगले शिजलेले अन्न द्यावे.

१२) कैद्यांना दोन जोडी कपडे द्यावेत.

१३) कैद्याना सुटकेच्या वेळी त्यांना काही पैशाच्या स्वरूपात मदत करावी.

१४) बाल व प्रौढ गुन्हेगारांसाठी परिविक्षा पध्दतीची सुरुवात करावी.

१५) बाल गुन्हेगारांना राहण्यासाठी स्वतंत्र बॅरेकची व्यवस्था असावी.

१६) कैद्यांना जामिनावर सोडण्यासाठी तुरुंग नियमीत तरतूद असावी. त्यासाठी पॅरोल अधिकाऱ्याची नेमणूक करावी.

१७) जे आरोपी आहेत त्यांना स्वतंत्र राहण्याची व्यवस्था करावी.

१८) खासगी भेटकर्त्यांची कारागृहास भेट देण्याकरिता नेमणूक करण्यात यावी.

अशा विविध सुधारणात्मक शिफारशी १९१९ मधील समितीने केल्या.

आज कारागृहात काही ज्या मूलभूत गोष्टी दिसतात हा १९१९ च्या समितीची अम्मलबजावणी आहे असे जाणवते" [४१] (K. Sing. १९९६) १९१९ च्या कारागृह सुधार समितीने सुधारणा सांगितल्या आणि कारागृह हा १९१९ च्या कायद्यान्वये प्रांतीय सरकारच्या अधिपत्याखाली गेले. "१९२० ते १९४७ या काळात भारतीय स्वातंत्र्यलढा तीव्र झाला होता. १९२१ मध्ये असहकार चळवळीने जोर पकडला होता. या संदर्भात मुजुमदार म्हणतात की जवळपास तीस हजार राजकीय कैदी असल्यामुळे, तुरुंगातील भय हरवून तुरुंगवास एक प्रतिष्टेचे प्रतीक बनले नंतर ते संसद व विधान मंडळात स्थान प्राप्त करण्याचे एक पारपत्र बनले. ही एक अदभुत घटना असून जगाच्या पाठीवर कुठेही आढळून येत नाही " [४२] (Nitail Roy Chowdhury. २००२)

"कारागृहे ही प्रांतिक सरकारच्या अधिपत्याखाली गेल्याने १९२९ मध्ये कारागृह चौकशी समिती स्थापन झाली यात काही सुधारणा सांगितल्या होत्या. संयुक्त प्रांत तुरुंग सुधार समिती स्थापन करण्यात आली. " [४३] (कित्ता) गुन्हेगाराप्रमाणेच बालअपराध्यासोबत वर्तन करू नये. अर्थात बालअपराध्यांना लहान बालक म्हणून त्यांच्याशी चांगल्या पध्दतीचे वर्तन कारागृह प्रशासनाने करावे. आदर्श कारागृहाची स्थापना करावी आणि कैद्यांचे वैज्ञानिक आधारावर वर्गीकरण करावे अशा महत्त्वपूर्ण सूचना १९४६ च्या कारागृह सुधार समितीने दिल्या.

---

४१) Criminology - by K. Sing

४२) Indian Prison Laws and Correction of Prisoners - Nitail Roy Chowdhury

४३) कित्ता

## ❖ स्वातंत्र्यानंतर भारतीय तुरुंग (१९४७ नंतर)

भारतीय स्वातंत्र्यापूर्वी कारागृहांना व त्यातील प्रशासन आणि कैद्यांना सुधारण्यासाठी अनेक समित्या नेमल्या, त्यांनी सुधारणाही सांगितल्या त्या सर्व सुधारणांचा सारांश म्हणजे कैद्यांना माणूस म्हणून वागणूक द्यावी. प्रौढ, महिला, बालक यांना दिल्या जाणाऱ्या वर्तणुकीत फरक असावा. पण १९४७ पर्यंत हे असे बदलाचे चित्र दिसले नाही. १९४७ मध्ये भारत स्वातंत्र्यानंतर कारागृहांच्या सुधारणेचे प्रत्यक्षात कृती करण्यास सुरुवात झाली १९४७ ते २०१० पर्यंत चा भारतीय कारागृहांचा इतिहास पाहिलास कारागृह प्रशासन आणि कैद्यांना दिली जाणारी वागणूक यांच्यात बदल झालेला आपणास दिसतो. आज कारागृहात सुधारणा आणि पुनर्वसन या प्रमाणे प्रशासन चालते.

स्वातंत्र्यानंतर कारागृहात बदल करण्यासाठी अनेक समित्यांचे गठण करून त्यांच्या सूचना मागवून त्याप्रमाणे अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न केला गेला. पण आज कारागृहांतील कैद्यांना दिली जाणारी वागणूक कारागृहात होणाऱ्या घटना पाहिल्यानंतर अनेक प्रश्न निर्माण होतात. पण स्वातंत्र्यानंतर अनेक चांगल्या सुधारणा झाल्या असे आपणास जाणवेल.

"भारतात अनेक लोक स्वातंत्र्यलढ्यात तुरुंगात गेले होते. त्यांनी तुरुंगातील कार्यपध्दती अनुभवली होती. त्यामुळे भारतीय स्वातंत्र्यानंतर तुरुंगातील सुधारणा याला प्राधान्य दिले गेले. भारतीय संविधानात कारागृह हा राज्याचा विषय आहे. प्रत्येक राज्य आणि केंद्रशासित प्रदेशाचे स्वतंत्र कारागृह नियमावली आहे. ही नियमावली केंद्रीय अधिनियमांवर आधारित आहे. " [४४] (डॉ. सुनील कांत भट्टाचार्य. २००४) अर्थात कारागृह हे राज्य शासनामार्फत मार्गक्रमण करत असले तरी केंद्रीय नियमावली अंतर्गत ते मार्गक्रमण करतात.

"भारतीय तुरुंगाबाबत महात्मा गांधी म्हणतात की, Jails must be converted in to hospital for their treatment and care. The Jail staff should be transformed in to physicians The prisoner should be made to feel that they are his friends Mahatma Gandhi" [४५] (डॉ. जित कृष्णा सिंह. २००१) अर्थात कारागृहाचे रूपांतर रुग्णालयात झाले पाहिजे. आणि कारागृहातील अधिकारी आणि कर्मचारी डॉक्टरच्या भूमिकेत काम करावे व त्यांच्या कैद्यांसोबतचा व्यवहार मैत्रीपूर्ण वाटेल या पध्दतीने वर्तन करावे असे गांधीजींनी सांगितले. महात्मा गांधीच्या वरील संदर्भानुसार कारागृहमध्ये आमुलाग्र बदल करण्यासाठी अनेक बदल झाले. कारागृह हा प्रत्येक राज्य

---

४४) भारत की सामाजिक समस्याएँ - डॉ. सुनील कांत भट्टाचार्य - पृष्ठ क्र. ५७

४५) अपराधशास्त्र और दंडशास्त्र - डॉ. जित कृष्णा सिंह - पृष्ठ क्र. २७०

सरकारच्या अंतर्गत काम करत असल्याने अनेक राज्यांची कारागृहांत सुधारणात्मक बदल केला. १९५० पासून कैद्यांच्या मानसिकतेकडे लक्ष देण्यात येऊन त्यांना आरोग्यविषयक सुविधा देऊन जे कैदी व्यावसायिक शिक्षण घेण्यासाठी योग्य आहेत त्यांना व्यावसायिक शिक्षण देण्याची व्यवस्था केली जाऊ लागली. "उत्तर प्रदेशात गुन्हेगारांचे प्रमाण अधिक वाढल्याने राज्य सरकारने मोठे कारागृह, जिल्हा कारागृह, तृतीयश्रेणी जिल्हा कारागृह, चतुर्थ श्रेणी कारागृह, बाल कारागृह अशा विविध कारागृहांची स्थापना करुन कारागृह विभागा अंतर्गत १ जेल प्रशिक्षण विद्यालय २ सुधार विद्यालय ३ उत्तर प्रदेश जेल विभाग अशा तीन संस्था स्थापन केल्या" [४६] (डॉ. एस.चंद्रकुमार रॉय. २००४)

१९५२ मध्ये उत्तर प्रदेशचे तत्कालीन गृहमंत्री डॉ. संपूर्णानंद यांनी कैद्यांमध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी खुल्या कारागृहाचा उपयोग केला. कारागृहात कैद्यांना जेवण, कपडे, आरोग्य, शिक्षण यामध्ये महत्त्वपुर्ण बदल करण्यात आले. कारागृहात ग्रंथालय, व्याख्यान, शारीरिक व्यायाम, शारीरिक श्रम, खेळणे मानसिक आरोग्यासाठी नाटके, कवी सम्मेलन, संगीत इ. ची व्यवस्था करण्यात आली होती.

स्वांतंत्र्यानंतर तुरूंग हा विषय राज्य शासनाचा अंतगत असला तरी संपूर्ण भारतभर कारागृहात सुधारणा करण्यासाठी समितीचे गठण करावे असे निश्चित करण्यात आले. कारण उत्तर प्रदेश सरकार प्रमाणेच सर्व राज्यांतील कारागृहांची स्थिती नव्हती. त्यामुळे सुधारणा मागवण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघाच्या सहकार्याने भारत सरकारने १९५१ मध्ये प्रसिध्द अपराधशास्त्रज्ञ **डॉ. वॉल्टर सी रेक्लेस व डॉ. गल्वे** यांना आमंत्रित करण्यात आले . डॉ. वॉल्टर सी रेक्लेस आणि डॉ.गल्वे यांनी भारतीय कारागृहांचा अभ्यास करून अतिशय महत्त्वपुर्ण सूचना सांगितल्या त्या सूचना पुढीलप्रमाणे.

१) कारागृह प्रशासनविषयक नियमांची तपासणी करणे आणि कारागृहातील गुन्हेगारांच्या समस्यांकडे लक्ष देणे.

२) जिल्हा स्तरावर पूर्वकालीन परिविक्षा अधिकाऱ्याची नियुक्ती करणे.

३) कारागृहात संपूर्ण शिक्षा भोगल्यानंतर सुटणाऱ्या कैद्यांना मदत करण्यासाठी व्यवस्था करणे.

४) कारागृहात दवाखाना, मानसिक चिकित्सेची व्यवस्था करणे.

५) कारागृहातील कैद्यांसाठी मनोरंजन, वाचन, व्यवस्था, तसेच शिक्षणासंबंधीची व्यवस्था करणे.

---

४६) विवेचनात्मक अपराधशास्त्र - डॉ. एस.चंद्रकुमार रॉय - पृष्ठ क्र. २३८-२३९

६) कारागृहात कैद्यांना कसे सुधारता येईल या साठी सर्वांगीन प्रयत्न करण्यात यावेत.

७) ज्या कैद्यांचे वर्तन चांगले असेल त्यांना शिक्षेत सवलत देण्याची तरतूद करण्यात यावी. आणि त्यासंबंधी शिफारस करण्याचे अधिकार कारागृह अधीक्षक आणि इतर अधिकाऱ्यांना असावेत.

८) महिला कैद्यांची व्यवस्था स्वतंत्र करण्यात यावी.

९) सर्व तुरुंगांचा समान स्तर असावा.

१०) बाल गुन्हेगारांना वेगळे ठेवण्याची व्यवस्था करावी.

११) सुयोग्य तज्ञ अधिकाऱ्यांची नियुक्ती करावी व त्यांना वेळोवेळी प्रशिक्षण द्यावे.

१२) कमी कालावधीच्या शिक्षा देण्याऐवजी त्यासाठी इतर दंड देण्याची व्यवस्था करण्याचा प्रयत्न करावा.

१३) केंद्र सरकार व्दारे गुन्ह्याच्या क्षेत्रातील अनुभवी तज्ञ अधिकारी, व्यक्ती यांनी सम्मेलने यातून भविष्यात कार्य करताना येणाऱ्या आडचणी संदर्भात मार्ग काढता येईल. अशा विविध सूचना डॉ.वॉल्टर सी. रेक्लेस यांनी केल्या. या शिफारशीनंतर १९५७ मध्ये अखिल भारतीय जेल मॅन्युअल कमिटी स्थापन करण्यात आली इन्स्पेक्टर जनरल ऑफ प्रिझन यांची एक अखिल भारतीय कॉन्फरन्स भरवण्यात आले. या कॉन्फरन्समध्ये कैद्यांच्या सुधारणा आणि त्यांच्या पुनर्वसन संदर्भात काही मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्यात आली ती पुढीलप्रमाणे.

१) प्रत्येक राज्याच्या गृहखात्यात एक सुधारणा सेवा असायला पाहिजे. आणि अशीच सेवा केंद्रीय शाखा म्हणून निर्माण करायला पाहिजे.

२) तुरुंगातील गर्दी कमी करण्यासाठी काही काळ शिक्षा भोगलेल्या कैद्यांची जामिनावर सुटका होईल या साठी प्रयत्न करावेत.

३) एकांतवासाच्या शिक्षेची पध्दत रद्द करण्यात यावी .

४) गुन्हेगारावर उपचार करण्यासाठी त्यांचे वर्गीकरण करण्यात यावे.

५) राज्य तुरुंग कार्य पध्दतीच्या तुरुंग नियमावलीचे वेळोवेळी पुर्नपरीक्षण करण्यात यावे. " [४७] (Dr. N.V. Paranjape. २००३)

---

४७) Criminology and Penology- Dr. N.V. Paranjape

अशा विविध मार्गदर्शक तत्वावर चर्चा करण्यात आली. १९६१ मध्ये गृह मंत्रालयांच्या अंतर्गत "केंद्रीय सुधारात्मक सेवा ब्युरो (Central Bureau of Correctional Services) ची स्थापना झाली. ज्याला आता "राष्ट्रीय समाज सुरक्षा संस्था" या नावाने ओळखले जाते. नंतर केंद्रीय सुधारात्मक सेवा ब्युरोला केंद्रीय गृह मंत्रालयाकडून सामाजिक सुरक्षा विभागकडे वर्ग करण्यात आले. आता ही संस्था "राष्ट्रीय समाज रक्षा संस्था" असे नवीन नावे दिल गेले आहे. १९७२ मध्ये भारत सरकारने कारागृहांचे प्रशासन व कैद्यांना दिली जाणारी वागणूक या संदर्भात अभ्यास करणाऱ्यासाठी एक कार्यगटाची स्थापना केली. यांनी कारागृहाचा विभिन्न अंगांनी अभ्यास केला. त्यात त्यांना अनेक समस्या जाणवल्या, त्यामध्ये कारागृहात कैद्यांची गर्दी झाली आहे. कैद्यांसाठी व्यावसायिक प्रशिक्षण, कर्मचारी रचना, कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण इ. अनेक उणीवा जाणवल्या. त्याचप्रमाणे कारागृहांतील सुधार सेवांची कमतरता, कैद्यांचे वर्गीकरण, वैयक्तिक सुधारणाकडे दुर्लक्ष आदींचा अभाव जाणवल्याने कारागृहांत मूलभूत परिवर्तन होणे गरजेचे आहे असे सांगितले. त्यामुळे भारत सरकारने १९८० मध्ये अखिल भारतीय जेल सुधार समितीची स्थापना केली. या समितीचे अध्यक्ष निवृत्त न्यायमूर्ती ए.एन. मुल्ला होते. या समितीने १९८३ मध्ये ५११ पानी अहवाल भारत सरकाला सादर केला. त्यात अनेक सूचना केल्या त्या पुढीलप्रमाणे. "भारतात आधुनिक तुरुंगाची स्थापना करण्यासाठी राष्ट्रीय तुरुंग कमिशन गठित करण्यात यावे, तुरुंगांचे राष्ट्रीय आणि राज्य हे पोटभाग काढावेत, बाल व तरुण गुन्हेगारांसोबत तुरुंग कर्मचाऱ्यांनी क्रूरतेची वागणूक देऊ नये. कर्मचाराऱ्यांच्या क्रूर वर्तनावर नियंत्रण ठेवण्यासाठी कायद्याची गरज आहे. मनोरुग्ण कैद्यांना मनोरुग्णालयात उपचार करून स्वतंत्र ठेवण्याची व्यवस्था करावी, गुन्हेगारांचे वर्गीकरण करावे, कैद्यांच्या तक्रारींची दखल घेण्यासाठी विशेष अधिकाऱ्यांची नेमणूक करावी. अशा सूचना करून काही शिफारशी केल्या.

१)तुरुंगातील गुन्हेगारांना चांगले अन्न, कपडे, स्वच्छता आणि खोलीमध्ये भरपूर हवा येईल अशी व्यवस्था करण्यात यावी.

२) तुरुंगातील वेगवेगळ्या पदावरील अधिकारी प्रशिक्षित असावे. इंडियन प्रिझन आणि सुधारणात्मक सर्व्हिसेस अंतर्गत तुरुंग अधिकाऱ्यांना प्रशिक्षण द्यावे. कैद्यांची काळजी, त्यांचे पुनर्वसन करणे, काही काळाकरिता शिक्षा झालेल्या कैद्यांशी आपुलकीने वागणे या सर्व बाबी तुरुंगासाठी आवश्यक आहेत. नवीन कैद्यांकरिता परिविक्षा कायदा योग्य पध्दतीने वापरण्यात येत नाही.

३) वृत्तपत्रांचे प्रतिनिधी, लोकप्रतिनिधी, सामाजिक संस्था यांना तुरुंगास भेट देण्यास बंदी घालू नये. या घटकांमुळे तुरुंगातील माहिती लोकांपर्यंत पोहचण्यास मदत होईल. त्यामुळे समाजाचे सहकार्य मिळेल.

४) न्यायालयातील विविध प्रकरणांच्या सुनावणीसाठी आलेल्या आरोपींना कमी काळाकरिता कारागृहत ठेवावे. आणि त्यांना शिक्षा झालेल्या कैद्यांपासून दुर ठेवावे. कधी कधी आरोपींची कारागृहात खूपच गर्दी होते ती गर्दी कमी करण्यासाठी त्यांना जामिनावर सोडण्यात यावे. किवा त्यांची ट्रायल लवकर पूर्ण करावी.

५) तुरुंगातील संसाधने परिपूर्ण असावीत आणि तेथील सुधारणा पध्दत अंमलात आणण्याकरिता शासनाने लागणाऱ्या खर्चासांठी पैसा पुरवावा" [४८] (कित्ता) अशा अनेक पण महत्त्वपुर्ण शिफारशी केल्या. वरील सर्व शिफारशी या मानवतावादी दृष्टिकोनातून केल्या आहेत असे स्पष्ट जाणवते. शिफारशींची अंमबजावणी प्रत्येक्षात कारागृहात कृतिरूपात केले जाऊ लागली. आरोग्य सुविधा, शिक्षण, मनोरंजन आदी अनेक कार्यक्रमांचे आयोजन करून त्यांना व्यावसायिक प्रशिक्षणातून त्यांचे भविष्याचे पुनर्वसन व्हावे यासाठी त्यांना विविध उद्योगांचे प्रशिक्षणही देण्यात येऊ लागले. व्यावसायिक प्रशिक्षण हा सुधारात्मक कार्यक्रमाचा अत्यंत महत्त्वपूर्ण भाग आहे कारण या प्रशिक्षणाचा उपयोग शिक्षा संपल्यावर बाहेर आल्यावर त्याचा उदर निर्वाहासाठी महत्त्वपूर्ण ठरते. काही राज्यांनी समाजकार्याचे तज्ञ व्यक्तींची कारागृह अधिकारी म्हणून निवड करुन हा अधिकारी तेथील कैद्यांच्या समस्यांकडे शास्त्रीय दृष्टिकोनातून पाहून व्यक्ती सहायोग कार्य आणि गट कार्य या पध्दतीचा प्रत्यक्ष वापर कैद्यांवर करेल. जेणेकरून कैद्यांच्या पुनर्वसनामध्ये मदत होईल. तसेच तो कैद्यांच्या कुटूंबाच्या व मित्र, नातेवाईक यांच्या भेटीचे योग्य नियोजन करू शकतो. तसेच कैद्यांसोबत त्यांच्या समस्या संदर्भात चर्चा करीत राहिल्याने त्यांचे मानसिक खच्चीकरण न होता त्यांच्या वर्तनामध्ये सुधारणा होते आणि कैद्यांच्या वर्तनात जर सुधारणा झाली असेल तर बऱ्याच वेळेस त्याला मुदतीपूर्वसुध्दा सोडले जाते. कैद्यांना सुट्टीवर सोडण्याचे अधिकार राज्य सरकार, कारागृह, कारागृह महानिरीक्षक, कारागृह अधीक्षक यांच्याव्दारे दिले जातात.

कारागृहातील अधिकारी हा कैद्यांच्या पुनर्वसनात अत्यंत महत्वपूर्ण घटक आहे. त्यामुळे या अधिकाऱ्यांनाही वेळोवेळी प्रशिक्षण दिले जाते. कारागृहाचे अधीक्षक, उपअधीक्षक, जेलर, सहायक जेलर यांना विशेष प्रशिक्षणाची व्यवस्था लखनौ, पुणे, बिहार, वेल्लोरा येथे प्रशिक्षण विद्यालयात केली आहे. तसेच "राष्ट्रीय अपराध विज्ञान आणि न्याय चिकित्सा संस्था" वेळोवेळी वरिष्ठ अधिकाऱ्यांना अल्प कालीन प्रशिक्षण देतात "न्या.मुल्ला समितीने (१९८३) केलेल्या शिफारशींनुसार राष्ट्रीय मानव अधिकार आयोगाने तुरुंगातील कैद्यांचे प्रश्न तळाशी जाऊन सोडवण्यासाठी राष्ट्रीय तुरुंग कायदा तयार करण्यासाठी पावले उचलली. यांचा मसुदा (भारतीय तुरुंग कायदा १९९५) राज्य सरकारांना १९९९ मध्ये निरीक्षणासाठी देण्यात आला. जेणे करुन देशात एक व्यापक कायदा अस्तित्वात येईल" मानव अधिकाराने हा मसुदा भारत सरकारला कायदा बनवण्यास सुपुर्द केला.

---

४८) कित्ता

## १.६ तुरुंग सुधाराचे दिल्ली मॉडेल (तिहार मॉडेल)

दिल्ली येथील तिहार हा मध्यवर्ती कारागृह इतर कारागृहांप्रमाणेच मार्गक्रमण करत असताना इतर कारागृहांतील समस्या सारख्याच याही कारागृहात क्षमतेपेक्षा जास्त कैदी होते. पण कैद्यांना मिळणाऱ्या सुविधा येथेही मिळत नव्हत्या आणि अशा परिस्थितीत १ मे १९९३ रोजी तुरुंग महानिरीक्षक (तिहार) म्हणून किरण बेदी यांची नियुक्ती मे १९९५ पर्यंत करण्यात आली. किरण बेदी यांनी कारागृहातील कैद्यांच्या सुधारण्यासाठी त्यांच्याशी भेट, त्यांच्या तक्रारी दखल, अन्नाचा दर्जा चांगला, आरोग्य सेवा, काम, मनोरंजन इ. घटकांवर लक्ष केंद्रित करून कैदी ही माणसे आहेत. त्यांना कारागृहात सुधारण्याचे प्रयत्न केले पाहिजे या भावनेतून अनेक उपक्रम यशस्वीपणे राबवले आणि संपूर्ण भारतभर तिहारचा एक तुरुंग सुधाराचे मॉडेल तयार झाले किरण बेदी येण्यापूर्वी तिहार कारागृहातील परिस्थिती संदर्भात उपअधिकारी सुनील गुप्ता सांगतात की, १) "तुरुंगातील वातावरणाने गुन्हेगारी पोसलेली होती, छोटे गुन्हे करणाऱ्या कैद्यांना मोठ्या गुन्ह्यांचे धडे सराईत गुन्हेगारांकडून मिळत होते. तुरुंगात अनेक टोळ्या निर्माण झाल्या होत्या. ते थांबवण्याचा प्रयत्न करण्यात आला नाही, कारण त्या गुन्हेगारांची सर्वांना अतिशय भीती वाटायची. शिवाय वरिष्ठांचे नेतृत्वही दिशाहीन होते. आमच्यापेक्षा अट्टल गुन्हेगार तुरुंग चालवीत होते. "

**२) विल्फेड :-** अमेरिकन कैदी दोन वर्षे शिक्षा भोगल्यावर म्हणतो की, "कारागृहातील टोळीमध्ये दादा लोक वैद्यकीय अधिकाऱ्याकडे जायचे. औषध घेण्यासाठी तिथे इतर अनेक कैदी, तुरुंग कर्मचारी, उपतुरुंग अधिकारी हे सगळे रांगेत उभे असायचे. पण दादा लोक त्यांना बाहेर जायला सांगायचे आणि स्वतः हवेते, हवे तेवढे औषध मिळवायचे त्यांना कोणीही काहीही म्हणू शकत नव्हते. "

कारागृहात कोणाचीही तक्रार ऐकून घेतली जात नसे, मारहाण होत असे, राहण्याच्या ठिकाणचे वातावरण जास्त गर्दी असल्याने कोंदट झाले होते श्रीमंत कैद्यांना सर्व सुविधा मिळत पण गरीब कैद्यांचे हाल होत. अशा भावना तिहारमधील काही कर्मचारी आणी शिक्षा भोगत असलेले कैदी यांनी केली होती.

किरण बेदींचा प्रवेश या कारागृहात झाला आणि या कारागृहाचे नियम बदलून गेले. अर्थात किरण बेदीपुढे अनेक आव्हाने होती. व्यवस्थापनाचे आव्हान, नियंत्रणांच्या अडचणी अशा अनेक अडचणीवर मात करुन तिहार कारागृहाला आश्रम बनवले. अशक्य वाटणारी, असंभव वाटणारी कोणतीही बाब शक्य करता येते, तिला मुर्तीमंत रूपदेता येते, याच विश्वासाने अनेक अडचणीवर मात करत कार्यास प्रारंभ केला. १९९३ मध्ये पदभार स्वीकारल्यानंतर तिहारअंतर्गत चार तुरुंग होते. येथे २२७३ कैदी ठेवण्याची क्षमता होती. पण त्यावेळी ७२०० कैदी होते. १९९३-९४ मध्ये ही संख्या ८००० च्या आसपास गेली . म्हणजेच

क्षमतेपेक्षा अधिक कैदी, कारागृहातील अस्वछता, दादागिरी, अमानवी वातावरण, अन्नातील भेसळ, भ्रष्टाचार, शिस्तीचा अभाव अत्यावश्यक सुविधांचा अभाव, दुर्गंधी, अस्वच्छ वातावरण, न्याहारी दिली जात नव्हती, कैद्यांच्या तक्रारींची दखल घेतली जात नव्हती, अनेक रोगांची लागण झालेली, सर्वत्र गोंधळ अशी तिहारची परिस्थिती होती.

### ❖ किरण बेदी यांनी पुढीलप्रमाणे सुधारणा केल्या

**१) दररोजची प्रत्यक्ष भेट :-**

किरण बेदींने सुधारण्याचा प्रारंभ स्वतः दररोज कारागृहाला व कैद्यांना प्रत्यक्ष भेट देऊन कैद्यांना काय अडचणी आहेत त्या विचारुन त्यात सुधारणा करण्यासाठी संबंधितांना सूचना करत असत. त्या संबंधीची माहिती सूचना फलकावर लावली जात असत. त्यात स्वच्छता, अन्नाचा दर्जा, न्याहारी, वैद्यकीय उपचार, मनोरंजन सुविधा इ.मध्ये बदल करण्या संदर्भात सूचना देऊन त्यांची अम्मलबजावणी होते काय यांची स्वतः पाहणी करत. यामुळे कारागृहातील सर्व अधिकारी कामाला लागले. कारण कारण कारागृह महानिरीक्षकच दररोज यांची पाहणी करतात. म्हणून प्रत्यक्ष कार्यास सुरुवात झाली. दररोजच्या भेटीत जस जशा अडचणी येतील त्या सोडविण्यासाठी तुरुंग अधिकाऱ्यांना त्या मार्गदर्शन करत. त्यामुळे कारागृहातील कैदी, अधिकारी, कर्मचारी यांच्यामध्ये विश्वास निर्माण होऊ लागला आणि सुधारण्याच्या सामूहिक प्रकारे सुरुवात झाली. कारागृहात कैद्यांसाठी शिक्षण, प्रौढ शिक्षण, योगा, ध्यान धारणा, प्रार्थना सुरू झाली.

**२) फिरती तक्रार पेटी :-**

कारागृहातील कैद्यांच्या अडचणी, समस्या यांची माहिती करण्यासाठी त्यांनी कारागृहात फिरत्या तक्रार पेटीची संकल्पना चालू केली. या तक्रारपेटीत तक्रार टाकण्यासाठी कैद्यांना कागद दिले जात व त्यावर ते त्यांची अडचणी, समस्या, कारागृहातील आरोग्य सुविधा यातील भेसळ आदी माहिती त्यात देत असत. या तक्रारींचा निपटारा करण्यासाठी एका स्वतंत्र अधिकाऱ्यांची नियुक्ती करून त्या तक्रारीची सोडविण्या संदर्भात संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या जाऊ लागल्या. या तक्रार पेटीतून आलेल्या सूचनामध्ये सुधारणा झाल्यावर कैद्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण होऊ लागले. तसेच या तक्रार पेटीमुळे अधिकारी प्रामाणिकपणे कामे करू लागली. कारण जर त्या तक्रारीत अधिकाऱ्या संदर्भात तक्रार असेल तर ताबडतोब त्यांची चौकशी होऊण जर तो अधिकारी दोषी आढळला तर ताबडतोब शिक्षा दिली जात असे. या तक्रार पेटीमुळे कैद्यांच्या काय समस्या आहेत त्या कळाल्या व त्या सोडण्यासाठी मदत झाली, परिणामी कारागृहात सुधारणा झाली.

**३) शिक्षण, प्रशिक्षण योग, ध्यानधारणा सुविधा :-**

कारागृहातील आमूलाग्र बदलांसाठी शिक्षण, प्रशिक्षण, योग, ध्यानधारण हा उपक्रम अतिशय महत्त्वपुर्ण ठरला. ज्या कैद्यांना शिक्षणाची आवढ आहे अशा कैद्यांसाठी इंदिरा गांधी मुक्त विद्यापीठाचे उपकेंद्र व राष्ट्रीय मुक्त शाळा चालू केली. पौढ साक्षरतेचे वर्ग चालू केले. ज्यांना प्रशिक्षणाची आवड आहे त्यांना प्रशिक्षण दिले. सर्व कैद्यांमध्ये मानसीक मनोबल वाढण्यासाठी योगा, ध्यानधारणा, धार्मिक कार्यक्रम यांची सुरुवात करण्यात आली. याचा परिणाम म्हणून कैद्यांची कारागृहासंदर्भात आपलेपणाची भावना निर्माण होऊन एका कुटूंबाप्रमाणे वर्तन चालू झाले.

**४) तुरुंग पंचायत :-**

तिहार कारागृहात वॉर्डनिहाय पंचायती स्थापना केल्या या पंचायतीमध्ये संबधीत वॉर्डन, कर्मचारी, काही कैदी व अधिकारी यांचा समावेश केला. वॉर्डच्या कैद्यांना समस्या काय आहेत यावर पंचायतीमधील वरील सर्वांनी एकत्र चर्चा करुन त्यावर उपायही सुचवून त्यामध्ये सुधारणा करायची. यांचा उपयोग कारागृह प्रशासनावरील कामाचा ताण कमी झाला. कारण प्रत्येक वॉर्डच्या समस्या तेथेच सोडवल्या गेल्याने कमी वेळात जास्त परिणामकारक बदल जाणवू लागला.

**५) प्रार्थना आणि परिसर विकास :-**

तिहार परिसर सहा हजार चौरस फूट आहे या परिसर अतिशय सुंदर करण्यात आला. आणि कचऱ्यापासून खत निर्मिती केली गेली. तिहारमध्ये योग, ध्यान साधना, धार्मिक प्रार्थना सुरू झाल्याने भक्तीमय वातावरणात भजन, पूजा सुरू झाली. यात सर्वच कैदी सहभागी होत असत.

**६) कर्मचारी कल्याणाचे उपक्रम :-**

तिहारमधील कामगार कर्मचाऱ्यांसाठी शिक्षण ,संगणक शिक्षण ,प्रशिक्षण आरोग्य सुविधा ,विमा योजना ,तिहार कर्मचारी कल्याण संस्था, स्वेच्छा निवृत्ती योजना अशा विविध कर्मचाऱ्यांच्या कल्याणाचे उपक्रम राबवले गेले. यामुळे त्यांच्या कामामधील आळस दूर होऊन काम करू लागले. कैद्यांसाठी होणारे योगा ध्यानसाधना, धार्मिक कार्यक्रम प्रार्थना यामुळे कर्मचाऱ्यांमध्येही बदल घडून येऊ लागला.

**७) सेवाभावी संस्था (NGO) आणी प्रसार माध्यमांचा सभाग :-** तिहार कारागृहातील बदल पाहून व काही सेवाभावी संस्थांनी विविध उपक्रमांतून कैद्यांमध्ये बदल घडवण्यासाठी तिहारमधे प्रवेश दिला गेला. शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक क्षेत्रात काम करणाऱ्या सेवाभावी संस्था तिहारच्या उपक्रमांत

सहभागी झाल्या. यात ब्रह्मकुमारी, रामकृष्ण मिशन, योग प्रशिक्षण संस्था, साक्षरता क्षेत्रातील संस्थांनी सेवाभावी वृत्तीने कैद्यांसाठी विविध उपक्रम राबवले. तिहार कारागृहातील विविध उपक्रमाची माहिती घेण्यासाठी पत्रकार येत असत काही वेळेला त्यांना विशेष बोलावले जात असे. कारण त्यांच्या माध्यमातून कारागृहात काय बदल होत आहेत यांची माहिती सर्वसामान्य लोकांना होते. यातून अनेक व्यक्ती, संस्था तिहार कारागृहाशी जोडले गेले तिहार कारागृह ही प्रयोगशाळाच झाली.

प्रसारमाध्यमांमुळे तिहारचे बदलते रूप भारतभरच नाही तर संपूर्ण जगभर यांची माहिती पसरली आणि यांची दखल आंतरराष्ट्रीय स्तरावर घेतली गेली. अमेरिकेतील "असोसिएटेड प्रेस" या आंतरराष्ट्रीय वृत संस्थेने तिहारचा गौरव पुढील शब्दांत केला आहे.

"तिहार मध्यवर्ती कारागृह हे भारतातील सर्वात कठोर कारागृह म्हणून ओळखले जाते, मादक द्रव्य, टोळ्या युध्द कर्मचाऱ्यांचा भ्रष्टाचार गुंड कैद्यांची दादागिरी याचा प्रभाव असलेला हा तुरुंग परंतु अलीकडे मात्र रोज प्रार्थना ध्यान योगा यासाठी हजारो कैदी एकत्र जमलेले असतात. गेल्या पस्तीस वर्षात प्रथमच स्वयंसेवी संस्थांना प्रवेश मिळाला. या सेवाभावी संस्था कैद्यांना मार्गदर्शन, ध्यान साधना वर्ग, व्यावसायिक प्रशिक्षण, कायदेविषयक सल्ला, करमणुकीच्या कार्यक्रमांचेही आयोजन करतात. "

१९९३ ते १९९५ या दोन वर्षांच्या काळात तिहार कारागृहाचा चेहराच बदलून गेला. एका महिला अधिकाऱ्यांने हे सगळे करून दाखवले. हे भारतातच नाही तर संपुर्ण जगभर आश्चर्यकारक गोष्ट होती. कारागृहातील कैदी आणि कर्मचारी यांच्यामध्ये आमूलाग्र बदल विविध उपक्रमांच्या माध्यमातून किरण बेदी यांनी केले. आणि एक आदर्श नमुना कारागृह सुधारणेचा तयार केला. कारागृहात कैद्यांमध्ये आणि कर्मचाऱ्यांमध्ये बदल करण्यामागे त्यांची **विचारशक्ती, सकारात्मक दृष्टिकोन** आणि **विश्वास** यामुळेच सर्व सहज शक्य झाले असे वाटते. कैद्यांना त्यांनी बंदिस्त जास्त काळ ठेवले नाही. जेवढे त्यांना मुक्त ठेवता येईल तेवढे त्यांना मुक्त वातावरणात ठेवण्याचा त्यांनी प्रयत्न केला. मोकळ्या वातावरणामुळे कैद्यांमध्ये आमुलाग्र बदल जाणवू लागला. या संदर्भात किरण बेदी म्हणतात की "आम्हाला एका गोष्टीचे सर्वात मोठे समाधान मिळाले ते म्हणजे आम्ही ज्या प्रमाणात कैद्यांच्या जवळ जाऊन पोहचलो होतो. त्यांच्या ऱ्हदयात शिरकाव केला होता. ते फार महत्त्वाचे होते आणि त्यांचे फार चांगले परिणाम आम्हाला दिसले होते, या खुल्या वातावरणामुळे देशभर आमच्या उपक्रमाचे स्वागत झाले. "

कैद्यांवर आम्ही विश्वास टाकून त्यांना ज्यास्त वेळ मोकळ्या वातावरणात फिरण्यास मुभा दिली गेली. त्या संदर्भात किरण बेदी " इट्स ऑलवेज पॉसिबल" या पुस्तकात पान क्र. ९९ वर म्हणतात की,

"आम्हा भारतीयांचा अहिंसा, क्षमा, करुणा, स्वार्थत्याग, बलिदान, निस्वांर्थी वृत्ती अशा अनेक मुलभूत संकल्पनांवर जो दृढ विश्वास आहे त्यातूनच आम्ही तिहारमध्ये जे काही घडवून आणले, ते कारण आम्हाला शक्य झाले. सुधारणेचे उपक्रम राबवताना आमच्या कैद्यांवरील अविश्वासाची बैठक असे" किरण बेदीनी सांगितले आहे. अर्थात कैद्यांवर विश्वास टाकला त्या विश्वासासाठी त्यामागे जे विचार होतो तो महत्त्वपुर्ण होता असे जाणवते.

तिहारमध्ये अनेक उपक्रमांमधून जे बदल किरण बेदींनी घडवून आनले त्यामागे त्यांची दूरदृष्टी, स्वतःच्या ज्ञानावर दृढ विश्वास आणि भरपूर इच्छाशक्ती या आधारावरच हे सर्व बदल घडवून आले. कारागृहातील परिवर्तना संदर्भात "इटस ऑल्वेज पॉसिबल या पुस्तकात त्या म्हणतात की " माणूस जेव्हा अथकपणे, सातत्याने, निःस्वार्थपणे आणि कळकळीने सुसंवाद प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करतो, तेव्हा त्यात त्याला नक्की यश मिळते असा माझा अनुभव होता. अगदी उलटया काळजाच्या, कठोर व्यक्तीच्या ह्दयाससुध्दा तो स्पर्श केल्यावाचून राहत नाही. केवळ आमच्या मनातील सच्च्या भावनांच्या जोरावर आम्ही अनेक निरढावलेल्या अट्टल गुन्हेगारांना चांगल्या मार्गाला लावून त्यांचे पूनर्वसनसुध्दा केले होते तिहारमध्ये मला एकलक्षीपणाने जे काम करायला मिळणार होते ते माझे सर्वात आवडते, माझ्या ऱ्हदयाच्या सर्वात जवळचे काम होते. गरजू व्यक्तीपर्यंत जाऊन पोहचणे, त्यांना समजावून घेणे त्यांच्याशी बोलणे, सुसवाद साधणे, त्याच्यासाठी योग्यती वातावरण निर्मिती करून त्यांना अंतर्मुख होण्यास उद्युक्त करणे, आत्मावलोकन व आत्मपरिक्षण करण्यास प्रवृत करणे. (भाग पाडणे नव्हे ) "असे विचार व्यक्त केले आहेत. मानवतावादी विचाराने कैद्यांमधील माणसाची ओळख किरण बेदीनी त्यांच्या **ज्ञान, कौशल्य** आणि **सरकारात्मक दृष्टिकोन** या आधारावर करून प्रत्यक्ष कैद्यांच्या समस्यांचा निपटारा वेगवेगळया कार्यक्रमांच्या माध्यमांतून केले. या सर्व अथक प्रयत्नातूनच दिल्ली येथील तिहार कारागृह हे कैदी सुधारणेचे एक प्रारुप/मॉडल तयार झाले. या प्रारूपाची दखल जागतिक स्तरावर घेतली जाऊन १९९४ मध्ये किरण बेदी यांना "रॅमन मॅगसे" पुरस्कार मिळाला. तसेच १९९७ मध्ये **नोबेल प्राईड ऑफ एशिया** आणि जोसेफ बॉईज फांउडेशनतर्फे जोसेफ बॉईज पुरस्कार स्विझर्लॅण्ड येथे प्राप्त झाला. तिहारमध्ये राबवलेल्या विविध उपक्रमांची इतर कारागृहांतही अम्मलबजावणी काही प्रमाणात सुरूवात झाली.

## १.७ खुले कारागृह Open Jail

गुन्हेगारांना शिक्षा भोगण्यासाठी विशिष्ट कालावधीसाठी तुरुंगात ठेवले जाते. आजची तुरुंगही सुधारालये बनली आहेत. मानवतावादी दृष्टिकोन येथे आला आहे. ज्या कैद्यांनी त्याला निश्चित केलेले शिक्षा काही काळ पूर्ण केला आहे व ज्यांच्या वर्तनात सुधारणा झाली आहे. अशाच कैद्यांना खुल्या

कारागृहात पाठविले जाते. खुले कारागृह हे कारागृह आहे पण येथे त्याचे स्वरूप  खुले असते. कारागृहात वाढणारी गर्दी व कैद्यांमध्ये मानसिक परिवर्तन लवकर व्हावे व मानवतावादी दृष्टिकोन अशा अनेक कारणामुळे खुल्या कारागृहांची निर्मिती झाली.

खुले कारागृह हे देखील कैद्यांना सुधारण्याचा एक प्रयोगच आहे. हा प्रयोग सर्वप्रथम १९३३ मध्ये इंग्लंड मध्ये करण्यात आला तेथे हा प्रयोग बऱ्याच प्रमाणात यशस्वी झाला, त्यामुळे भारतातसह अनेक देशांत खुल्या कारागृहाचा प्रयोग केला. कैद्यांमधील सुप्त गुणांचा विकास करावा हा प्रमुख उद्देश खुल्या कारागृहाचा आहे. खुल्या कारागृहात न्यायालयाने शिक्षा दिलेल्या गुन्हेगाराला कारागृहात एक कैदी म्हणून वागणूक न देता एक माणूस म्हणून वागणूक देणे हे खुल्या कारागृहाचे आधारभूत तत्व आहे.

खुल्या कारागृहात खोल्यांमध्ये बंदिस्त होऊन जीवन जगावे लागत नाही, येथे मोठ्या विस्तृत जागेवर अशी कारागृहे उभारली जातात. तेथे त्या कारागृहाच्या भिंतीपेक्षा कुंपण असते. आणि हे कुंपण अतिशय दूर असून त्यात शेती, विविध उद्योग चालवले जातात. तेथे कैद्यांना फिरण्यासाठी मोकळी जागा असते. ते एकमेकांसोबत राहू शकतात, दिवसभर आपल्या आवडीनुसार काम करायचे आणि रात्री आपल्या निश्चित ठिकाणी येऊन आराम करायचा. येथे नियंत्रणही शिथिल असते, त्यामुळे कैद्यांच्या मनात आत्मविश्वासाची भावना निर्माण होते.

**खुल्या कारागृहासाठी कैद्यांची निवड**

कारागृहातून खुल्या कारागृहात कैद्यांना पाठवत असताना काही अटींची पूर्तता कैद्यांनी करणे बंधन कारक असते. खुल्या कारागृहासाठी निवडीचा पहिला निकष म्हणजे त्या कैद्यांचे वय २१ ते ५० वर्षाच्या दरम्यान असावे. ज्या कैद्याला १५ ते २० वर्षाची प्रदिर्घ शिक्षा झाली आहे. अशा कैद्यांनी किमान सात वर्षे शिक्षा भोगलेली असली पाहिजे, शिक्षा भोगतांना त्यांनी कारागृह नियमबाह्य वर्तन केलेले नसावे. त्याच्या वर्तनाचे रेकॉर्ड चांगले असावे. ज्याचे चारित्र व विश्वासार्हता चांगली आहे अशाच कैद्यांची निवड केली जाते. २ ते ३ वर्षांसाठी खुल्या कारागृहात ठेवले जाते. खुल्या कारागृहातील कैदी ठेवण्याची क्षमता वेग वेगळया जेलमध्ये १०० ते ३००० यामध्ये कमी जास्त होते. सर्वात अधिक कैदी राहणारे खुले कारागृह ३००० उत्तर प्रदेशात नैनिताल जिल्ह्यात सितारगंज येथे असून सर्वात कमी संख्येचे कारागृह १०० पेक्षा कमी तमिळनाडू, आसाम, मध्य प्रदेश, गुजरात येथे आहे.

**खुल्या कारागृहांचा भारतातील प्रयोग**

कैदी सुधारण्याचा मार्ग म्हणून खुल्या कारागृहाचा स्वीकार भारताने केला. याचा महत्त्वपुर्ण उपयोग म्हणून उत्तर प्रदेश सरकारने १९५२ मध्ये तत्कालीन गृहमंत्री  डॉ. संपूर्णानंद यांनी केला .उत्तर प्रदेश सरकार

प्रमाणे महाराष्ट्र सरकारने १९६८ मध्ये पैठण येथे खुली कारगृह चालू केले. "भारतात १८ राज्यांमध्ये ३१ खुले कारागृहे आज कार्यरत आहेत. " [४९] (डॉ. एस.चंद्रकुमार राय. २००४)

"१९५२ :- उत्तरप्रदेश सरकारने प्रथम खुल्या कारागृहाची सुरुवात केली. डॉ. संपूर्णानंद यांनी (तत्कालीन गृहमंत्री ) यांनी केली . खुल्या कारागृहातील कैद्यांकडून चंद्रप्रभा नदीवर धरण बांधण्यासाठी उपयोग केला. येथे कैदी मोकळ्या वातावरणात वावरत असत. त्यांना जेवण, शाळा, मनोरंजन साहित्याची व्यवस्था करण्यात आली होती. या धरण बांधण्यासाठी जे कैदी होते त्यांना मजूर असे संबोधण्यात येत होते. हे धरण बांधण्याचे काम १ ऑक्टोंबर १९५२ ते ३ ऑक्टोंर १९५३ पर्यंत चालले. उत्तरप्रदेशमध्येच चंद्रप्रभा नदीवरील धरणानंतर "**कर्मनाशा**" नदीवर धरण बांधण्याची सुरुवात ४ ऑक्टोंबर १९५३ पासून झाली. हे बांधकाम १९५५ मध्ये पूर्ण झाले. या प्रकल्पासाठी ३९०५ कैदी कार्यरत होते. १९५६ मध्ये बनारस येथे वरुणा नदीवर पूल बांधण्यासाठी या खुल्या कारागृहातील कैद्यांना पाठविण्यात आले. ४ महिन्याच्या काळात हा पुल तयार झाला उत्तर प्रदेशात श्रमदानातून मोठमोठे काम करून घेण्यासाठी खुल्या कारागृहांतील कैद्यांचा वापर करण्यात आला. सीतारंगज (नैनिताल ) व धुर्मा (सोनभद्रा) येथे स्थायी स्वरूपाची खुले कारागृहे आहेत "[५०] (डॉ.ए.एन. अग्निहोत्री. १९९५)

वरील विविध उपक्रमांसाठी २१ ते ५० वर्षेवयाच्या पुरुष कैद्यांना पाठविले जात असत. त्यावेळी ज्याची शिक्षा कमीत कमी ९ महिने बाकी राहिली आहे. त्यांनाच पाठवले जात असे. या विविध उपक्रमांदरम्यान कैद्यांचा दिनक्रम अत्यंत शिस्तबध्द होता. सकाळी उठल्यानंतर प्रातविधी, प्रार्थना, व्यायाम, स्नान, नाश्ेता करुन कामावर जात असत. दुपारी जेवणानंतर पुन्हा कामावर जात असत. सायकांळी जेवणानंतर मनोरंजनासाठी संगीत, खेळ, इतर त्यांना आवडेल त्यापध्दतीने वेळ घालवत असत.

१९ फेब्रुवारी १९६० रोजी नैनिताल जिल्ह्यातील सितारगंज येथे विशेष शिबिर खुल्या कैद्यांसाठी राबविण्यात आले. हे शिबिर कृषीप्रधान होते. यात २२०६ एकर कृषीयोग्य जमीन होती. येथे कैद्यांना शेतीशी निगडित सर्व कामे करावी लागत. याचबरोबर त्यांना ग्रामीण कुटीरोउद्योग धंद्यांचे प्रशिक्षण दिले जात असे. येथे शेतीत काम करताना कृषी संबंधीत यंत्र सामुग्रीचा वापर केला जात असे. या कामाची मंजुरी कैद्यांना दिली जात असे. या कृषी क्षेत्रातून मोठ्या प्रमाणात उत्पन्नही होत असे.

---

४९) भारतीय सामाजिक समस्या - डॉ.एस. चंद्रकुमार राय - पृष्ठ क्र. १८३

५०) अपराधी कल्याण के विविध अभ्यास- डॉ.ए.एन. अग्निहोत्री - पृष्ठ क्र. ८४

**महाराष्ट्र १९६८**

"महाराष्ट्रात पैठण येथील २५० एकर परिसरात या कारागृहाचे निर्मिती करण्यात आली. हे कारागृह मध्य विभाग औरंगाबाद येथील कारागृह उपमहानिरीक्षक यांच्या अंतर्गत कार्यरत आहे. येथे शेती मोठ्या प्रमाणात केली जाते. शेतीतील कामे कैद्यांकडून करून घेतली जातात. येथे कैदी अगदी खुल्या वातावरणात वावरतात. त्यामुळे त्यांच्या मानसिकतेमध्ये परिवर्ततन होते. " [५१] (रा.ज. लोटे. १९९९) पैठण येथील जायकवाडी धरणाच्या बांधकामाला या खुल्या कारागृहातील कैद्यांची मदत घेतली होती.

## १.८ परिविक्षा (Probation)

ज्या व्यक्तीने कायदाबाह्य वर्तन केले आहे. अशा व्यक्तींना कारागृहात पाठवण्यापेक्षा त्यांच्यामध्ये सुधारणा व्हावी व कारागृहातील गर्दी कमी व्हावी यासाठी आणि त्या व्यक्तीला केलेल्या कृत्याचा पश्चात्ताप व्हावा यासाठी ही असंस्थात्मक उपचार पध्दती मानली जाते. ज्या व्यक्तीने गंभीर स्वरूपाचा अजामीनपात्र गुन्हा केला नाही, अशा गुन्हेगारांना चांगले वर्तन करण्याच्या अटीवर आणि परिविक्षा अधिकारी यांच्या नियंत्रणाखाली समाजात सोडले जाते. या पध्दतीला परिविक्षा असे म्हणतात.

"भारतात अपराधी परिविक्षा अधिनियम १९५८ मध्ये जम्मू काश्मीर वगळता सर्व राज्यांना लागू झाला. पण प्रत्येक राज्यांनी आपल्या सोईनुसार तो राज्यात लागू केला. भारतामध्येच नाही तर संपूर्ण जगभर ही अपराध्याला सुधारण्याची व्यवस्था अस्तित्वात होती. १८४१ मध्ये सर्वप्रथम अमेरिकेमधील न्यायालयाच्या बाहेर बसणाऱ्या चांभाराचा व्यवसाय करणाऱ्या व्यक्तीनी एका दारूड्याला त्याच्या जबाबदारीवर सोडून देण्याची न्यायालयाला विनंती केली. न्यायालयाने ती मान्य केली असे करीत अनेक अपराध्यांची हमी घेऊन त्यांना सोडण्यात आले. त्यातून ज्यांनी प्रथम अपराध किंवा जामीनपात्र स्वरूपाचा अपराध केला आहे. अशा व्यक्तींना पुन्हा आपल्या कुटुंबात व नोकरीवर राहण्याची व्यवस्था झाली. त्यामुळे कारागृहातील होणारी गर्दी टाळली जाऊ लागली आणि पुढे संपूर्ण जगभरही अपराधी सुधारण्याची एक गैरसंस्थात्मक उपचार पध्दत म्हणून अस्तित्वात आली.

"भारतात १९५८ मध्ये अपराधी परिविक्षा अधिनियम लागू झाला. पण प्रत्येक राज्यांनी पुढील प्रमाणे लागू केला. आंध्र प्रदेश- १९७१, आसाम- १९६५, गुजरात - १९७३, बिहार - १९७९, हरियाना - १९६८,कर्नाटक - १९६०, केरळ- १९६८, महाराष्ट्र-१९७२, अशा विविध कालावधीत हा अधिनियम राज्यांनी लागू केला. " [५२] (डॉ.ए.एन. अग्निहोत्री. १९९५)

---

५१) भारतातील सामाजिक समस्या- रा.ज. लोटे, पृष्ठ क्र. - ५९

५२) अपराधी कल्याण के विविध आयाम - डॉ.ए.एन. अग्निहोत्री - पृष्ठ क्र. ९१

**व्याख्या :१) सदरलॅण्ड :-** "गुन्हेगाराची शिक्षा तात्पुरती स्थगित ठेवून त्याला चांगले वर्तन करण्याच्या शर्तीवर मोकळे ठेवण्याची ही पध्दती आहे. परिविक्षेच्या काळात गुन्हेगांरावर व्यक्तिगत निरीक्षण ठेवून त्याला सदवर्तन करण्याची राज्य सरकार मदत करते. "

**२) प्रा.सक्सेना :-** "परिविक्षा ही एक अशी न्यायालयीन प्रक्रिया आहे की, ज्यात गुन्हा सिध्द झाल्यावर गुन्हेगारास कारागृहात पाठवण्याऐवजी एका निश्चित कालावधीसाठी एका बाँडवर सदवर्तनाच्या हामीवर मुक्त केले जाते, ज्यामुळे अपराध्यास सामाजिक समायोजन करून घेता येते. "

**३) नॅशनल प्रोबेशन असोसिएशन ऑफ द युनायटेड स्टेटस् ऑफ अमेरिका :-**

"कानूनोंका प्रल्लंघन करणे के लिए दोषी पाये गये चयनीत व्यक्तियों हेतू न्यायालय व्दारा उपयुक्त सामाजिक अन्वेषण तथा पर्यवेक्षणीय उपचार की भूमिका प्रोबेशन कहलाती है । प्रोबेशन की अवधीमे अपराधी समुदाय मे ही सामान्य तौरपर रहता है । तथा न्यायालय व्दारा लगाई गई शर्तोके अधीन और प्रोबेशन अधिकारी के पर्यवेक्षण व मार्गदर्शन के अंतर्गत अपना आचरण संयमीत रखता है । "[५३] (कित्ता)

**४) बर्नेस और टिटर्स :-**

"प्रोबेशन आधुनिक न्यायालय व्दारा इस्तेमाल किया जानेवाला ऐसा तरिका है जिससे अपराधीयोंके सुधारने का काम जेल या दंण्ड संस्थाओंसे बाहर किया जाता है। कुछ निश्चित समय के लिए एक अधिकारी व्यक्ति विशेष कार्यकलाप और व्यवहारोंकी देखभल करता है। ऐसा समझा गया की, जेल अथवा सुधारगृह के दुषित वातावरण मे अपराधीको भेजनेसे ज्यादा अच्छा समाजमेही वापस भेजना है । यह ठीक है की, उसके चाल चलनपर नजर रखी जाए और अच्छी परिस्थितीयाँ उत्पन्न कि जाये । सफल परिविक्षा कार्यक्रम के लिए यह आवश्यक है की, अपराधीकी परिस्थितीयॉ उसकी संस्कृती, चरित्र और उसके जीवन इतिहास की विस्तार मे जानकारी कि जाये जिससे की न्यायालयमे लाये जानेवाले अपराधी को परिविक्षापर छोडा जा सकता है ।" [५४] (डॉ.जी.आर.मदन. २०००) वरील विविध तज्ञ व्यक्तींनी परिविक्षे संदर्भात व्याख्या करुन ही एक असंस्थात्मक सुधार सेवा आहे. परिविक्षाचा वापर केल्याने कारागृहात होणारी गर्दी कमी होऊन त्याला परिविक्षा अधिकाऱ्याच्या नियंत्रणाखाली सोडले जाते.

**अपराधी परिविक्षा अधिनियम १९५८ मधील तरतुदी.**

१) ज्याने प्रथम अपराध केला असून तो जामीनपात्र आहे. असे कृत्य करणाऱ्याला ताकीद देऊन सोडले जाते.

२) पूर्वी शिक्षा झाली आहे अशा व्यक्तींना याचा फायदा मिळत नाही.

---

५३) कित्ता - पृष्ठ क्र. ९६

३) एकवीस वर्षांच्या आतील अपराधी व एकवीस वर्षांपुढील अपराध्याचा गंभीर गुन्हा नाही त्यांना याचा फायदा होतो.

४) अपराध्याच्या सामाजिक, कौटुंबिक, आर्थिक, परिस्थिती पूर्वचरित्र इत्यादींचा अभ्यास करून त्याला सोडायचे किंवा नाही हे न्यायालय ठरवते.

५) परिविक्षेवर सोडताना त्यासाठीच्या विविध अटी संदर्भात कल्पना देऊन त्यांचे उल्लंघन करणार नाही या बाबतचे प्रतिज्ञापत्र द्यावे लागते. यात त्या अपराध्याला त्याचे राहण्याचे ठिकाण बदलता येणार नाही. परिविक्षा अधिकाऱ्यांचा पर्यवेक्षणाखाली राहावे लागते, परिविक्षा अधिकाऱ्यांच्या सूचनांचे पालन करावे लागते. परिविक्षा अधिनियम हा एक अपराधी पुनर्वसनात वरदान ठरला आहे. हे पुढील मुद्यांवरून स्पष्ट होईल.

**परिविक्षा पध्दतीचे महत्त्व :-**

१) अपराध्यास एक चांगला नागरिक बनण्याची संधी मिळते.

२) अपराध्याला परिविक्षेचा फायदा मिळाला म्हणजे त्याला शिक्षा होण्यापासून वाचवल्याने त्याचे मानसिक परिर्वतन होते.

३) अपराध्यास तुरुंगात ठेवून अट्टल गुन्हेगार बनण्यासापासून ही पध्दती वाचवते.

४) अपराध्याने केलेल्या कृत्याचा पश्चात्ताप करण्यास संधी देणारी पध्दत आहे.

५) अपराध्याला कारागृहात न पाठवता चांगले वर्तन करण्याच्या अटीवर सोडल्याने त्याच्या कुटुंबावर विपरीत परिणाम होत नाही.

६) अपराध्यास परिविक्षेवर सोडल्याने त्याचा पूर्ववत नोकरी, काम, व्यवसाय करू शकतो, त्याचे आर्थिक नुकसानही होत नाही.

परिविक्षा पध्दतीचे असे अनेक फायदे आहेत. त्यामुळे अपराध्याच्या पुनर्वसनामध्ये परिविक्षा पध्दतीचे अनन्य साधारण महत्त्व आहे.

## १.९ अभिवचन (Parole)

अपराध्यामध्ये सुधारणा घडवून त्यांच्यामध्ये सुधारणा घडवणारी असंस्थात्मक उपचार म्हणून अभिवचन याकडे पाहिले जाते. परिविक्षा या उपचार पध्दतीबरोबरच अभिवचन ही सुध्दा एका महत्त्वपुर्ण

---

५४) भारतीय सामाजिक समस्याएँ - डॉ.जी.आर.मदन - पृष्ठ क्र. १२७-१२८

पध्दती म्हणून वापरली जाते. परिविक्षा आणि पॅरोल यामध्ये महत्त्वपुर्ण फरक म्हणजे परीक्षेचा लाभ शिक्षा झालेल्या व्यक्तीस कारागृहात पाठवण्यापेक्षा काही अटीवर पुन्हा समाजात पाठवले जाते. पण अभिवचन जे अपराधी शिक्षा भोगत आहेत. ज्यांना निश्चित स्वरूपाची प्रदीर्घ शिक्षा न्यायालयाने दिली आहे. त्यांनी त्या शिक्षेचा १/३ काळ कारागृहात काढला आहे अशा अपराध्यामध्ये सुधारणा व्हावी, आपल्या कुटुंबीयांना समाजात काही काळासाठी सुट्टीवर म्हणून पाठवले जाते त्यास अभिवचन असे म्हणतात. अभिवचनावर गुन्हेगार काही काळ घरी समाजात आल्याने त्याला मानसिक समाधान मिळते. कारागृहात होणारी गर्दी काही प्रमाणात कमी होते. त्यामुळे अभिवचन ही महत्त्वपुर्ण उपचार पध्दती म्हणून मानली जाते.

**व्याख्या :-**

१) **प्रा.गिलीन :-** दंड किंवा सुधार संस्थेतून गुन्हेगाराला मुक्त करण्याचाी ही पध्दत असून अशा गुन्हेगारावर सुधार अधिकाऱ्यांचे नियंत्रण असते. पर्यवेक्षणाशिवाय तो समाजात राहण्यास योग्य आहे का हे पाहण्याचा त्या मागे उद्देश असतो.

२) **सदरलँड आणि क्रेसी :-** "आपल्या शिक्षेचा जास्तीत जास्त काळ पूर्ण केल्यानंतर राज्याने मान्यता दिलेल्या एखाद्या संस्थेमार्फत चांगल्या वर्तनाची हमी देऊन अंतिम सुटका होईर्पंत गुन्हेगाराला मुक्त करण्याच्या पध्दतीला पॅरोल असे म्हणतात. " [५५] (प्रा.माणिक माने. १९९९)

आपराध्याला न्यायालयाने निश्चित कालावधीची शिक्षा दिल्यानंतर त्या अपराध्याने काही काळ शिक्षा भोगल्यानंतर त्याच्या कुटुंबीयांशी भेटता यावे त्याच्या मनामध्ये विफलतेची भावना निर्माण होऊ नये आणि कारागृहामधील अट्टल गुन्हेगारांच्या सोबत राहिल्याने आणि घर, मित्र, नातेवाईक यांचा पूर्णपणे संपर्क तुटला तर त्याच्या मनामध्ये विफलतेची भावना निर्माण होते, त्याचा विपरीत परिणाम अशा व्यक्ती कारागृहांतुन बाहेर आल्यावर पुन्हा गुन्हेगारी प्रवृत्तीकडे वळू शकतात. त्यामुळे त्या अपराध्याने काही काळ शिक्षा भोगल्यावर त्याला अभिवचन अधिकाराऱ्याच्या नियंत्रणाखाली काही दिवस सुट्टीवर सोडले जाते. कारागृहात शिक्षा भोगत असलेल्या कैद्यांच्या वर्तनातील सुधारणा झाली असेल त्याने काही काळ शिक्षा भोगली आहे अशा गुन्हेगार व्यक्तीला काही काळासाठी घरी भेटून येण्यासाठी त्यांची प्राथमिक चौकशी करुन जामिनावर प्रथम ३० दिवसांची रजा दिली जाते. नंतर तीच्यामध्ये काही अपवाद कारणांसाठी पुन्हा ३० दिवसांपर्यंत पाठवता येते. असे एकूण १२० दिवसांचे अभिवचन अपराध्यास मिळते. अभिवचनावर सोडण्यासाठी तुरुंग अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली अपराध्याची निवड केली जाते. त्याचा अभिवचनावर पाठवण्याची शिफारस तुरुंग महानिरीक्षक यांच्याकडे करुन त्यांना अभिवचन मंजूर करण्याचा अधिकार

५५) गुन्हेगारीशास्त्र - प्रा.माणिक माने - पृष्ठ क्र. ९०

आहे. अभिवचन ही वैयक्तिक उपचार पध्दती आहे. कारागृह प्रशासन त्या अपराध्यावर विश्वास ठेवते आणि त्यात काही काळासाठी घरी पाठवते. या काळात त्यांना आपल्या कुटुंबासोबत राहणे, लैंगिक संबंध प्रस्थापित करणे, समाजाशी एकरूपता करुन घेणे आपल्या व्यक्तींचे विवाह, मृत्यू इ. काळात कुटुंबीयांसोबत राहता येणे. यामुळे त्या अपराध्याच्या मानसिक परिवर्तनात बदल होऊन कारागृहातील शिक्षा ही (घरून परत आल्यावर ) शिक्षा वाटत नाही. तो पुन्हा उत्साहाने, आनंदाने कारागृहात राहतो आणि त्या काळात कोणतेच नियमबाह्य वर्तन तो करत नाही. कारण त्याला पुन्हा सुट्टीवर येण्याची ओढ लागलेली असते. अर्थात त्याच्या पुनर्वसन अभिवचन महत्त्वपुर्ण भुमिका पार पडते. पॅरोल ही उपचार पध्दती १८६९ मध्ये इग्लंडमधील एलमीरा रिजॉमॅटरिया संस्थेने प्रथम स्वीकारली. त्याचबरोबर अमेरिका, सोव्हीएट, रशिया इ. राष्ट्रांनी या उपचार पध्दतीचा स्वीकार केला. हंगेरीमध्ये The Educative Reformatory Act. 1950 पास झाला आणि त्यानुसार अपराध्यास एक महीना ते दोन वर्षापर्यंत पॅरोलवर सोडले जाऊ लागले.

भारतात १८९४ च्या तुरुंग कायद्यानुसार १९५३ मध्ये दुरुस्ती करण्यात आली आणि जे अपराधी दीर्घ काळाची शिक्षा भोगत आहेत. त्यांना काही काळासाठी तुरुंग महानिरीक्षक यांच्या परवानगीने अभिवचनावर सोडले जात. पॅरोलवर सुटल्यावर काही अटींची पूर्तता अपराध्यास करावी लागते. त्या अटी पुढीलप्रमाणे. अपराध्याने व्यसने, आमली पदार्थापासून दूर राहिले पाहिजे.

१) स्वतःजवळ हत्यार बाळगू नये.

२) बाहेर असताना कारागृहातील इतर कैद्यांशी संपर्क ठेवू नये, पत्रव्यवहार करू नये.

३) रात्री दहा वाजण्यापूर्वी घरी जावे.

४) आपल्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तींना साहाय्य करणे.

५) आदेश असल्यास वैद्यकीय इलाज करवून घ्यावेत.

६) दारू अड्ड्यावर जाऊ नये.

७) जुगार अड्ड्यावर जाऊ नये.

८) आपल्या मिळकतीतून काही बचत करावी.

९) परवानगीशिवाय राहण्याचे ठिकाण, राज्य बदलू नये.

१०) परवानगीशिवाय वाहन चालवू नये.

वरील अटींचे पालन अभिवेचनावर सुटलेल्या व्यक्तीने करणे बंधनकारक आहे. या काळात त्याच्यावर नियंत्रण ठेवण्याचे काम कारागृहातील पर्यवेक्षक, पोलीस, सोबतीला पोलीस पाटील यांच्यामार्फत केले जाते. जर एवढ्या लोकांचे पर्यवेक्षण असून सुध्दा एखादा व्यक्तीने पॅरोलच्या काळात गुन्हेगारी सारखे कृत्य

करुन त्याच्या ज्या अटी होत्या त्यांचा भंग केला असेल तर त्या व्यक्तीस पुन्हा अटक करुन पुन्हा कारागृहात शिक्षा भोगण्यासाठी पाठवले जाते. "अभिवचनावर उच्च न्यायालयाने आपले मत व्यक्त करताना म्हटले आहे की, कायद्यांवरील ताण कमी करण्याची एक पध्दत म्हणजे कैदी आणि त्यांचे कुटुंब यामध्ये एक भक्कम दुवा निर्माण करणे होय. समाजापासून फारकत झालेले कैदी विशेषतः दीर्घ काळासाठी त्यांचे कुटुंबापासून संबंध दुरावल्यास तो दुष्ट बनतो. या कारणासाठी सुधारणात्मक दृष्टिकोनातून कैद्यांना पॅरोलवर मुक्त करणे उचित ठरते. " [५६] (कित्ता)

**अभिवचन आणि परिविक्षा यातील फरक :-**

परिविक्षा आणि अभिवचन या दोन्ही गुन्हेगार सुधाराच्या उपचार पध्दती आहेत. या दोन्ही कैद्यांना सुधारण्याच्या वैयक्तिक उपचार पध्दती असून यात दोन्हीमधील फरक पुढीलप्रमाणे सांगता येईल. शिक्षेची सशर्त स्थगिती म्हणजे परिविक्षा म्हणजेच एखाद्या गुन्हेगाराला शिक्षा झाल्यावर त्याला न्यायालय कारागृहात पाठवण्याऐवजी परिविक्षा अधिकारी यांच्या पर्यवेक्षणाखाली समाजात पुन्हा पाठवू शकते.

१) अभिवचन हे ज्या कैद्याला विशिष्ट शिक्षा लागली असून न्यायालयाच्या आदेशाने तो शिक्षा भोगत आहे. त्यांनी एकूण शिक्षेच्या १/३ भोगल्यानंतर त्याच्या वर्तनाचा आढावा घेऊन त्याला काही काळासाठी त्याच्या घरी पाठवले जाते. ही सुट्टी ३० ते १२० दिवसांची असू शकते. अभिवचन काळात कैद्याने अटींचे पालन करणे गरजेचे आहे.

२) परिवेक्षेवर अपराध्यास सोडण्याचे काम न्यायालय करते. अभिवचनावर सोडण्याचे काम तुरुंगातील अधिकारी किंवा अभिवचन मंडळ करीत असते.

३) परिविक्षेवर सोडणाऱ्या व्यक्तीवर परिविक्षा अधिकाऱ्यांचे नियंत्रण असते. पॅरोलवर सोडलेल्या व्यक्तींवर तुरुंग अधिकारी व पोलीस लक्ष ठेवत असतात.

४) परिविक्षेवर कैद्याला सोडताना अपराधी परिविक्षा अधिनियम १९५८ अंतर्गत सोडले जाते. अभिवचनावर अमेडमेंट ऑफ प्रिझनर्स ॲक्ट १८९४ अंतर्गत सोडले जाते. परिविक्षा आणि अभिवचन या दोन्ही कैद्यांस सुधारण्यासाठी संधी उपलब्ध करून देतात. ज्यामुळे त्यांना कुटुंबात राहण्याची संधी मिळते.

**समारोप :-**

प्रस्तुत प्रकरणामध्ये संशोधन विषयातील मुख्य घटक म्हणजे कारागृह व त्याच्याशी निगडित घटकांचा समावेश केला आहे. यामध्ये प्रामुख्याने कारागृहात ही सुधार संस्था असून या कारागृहात ज्या

५६) गुन्हेगारीशास्त्र - प्रा. माणिक माने - पृष्ठ क्र. ६३

व्यक्तींनी कायदाबाह्य वर्तन केले आहे अशा व्यक्ती म्हणजेच त्यांना आपण गुन्हेगार म्हणतो आणि जे वर्तन नियमबाह्य आहे त्याला गुन्हा असे म्हणतो. गुन्हा म्हणजे नेमके काय, त्याचे वेगवेगळे प्रकार, गुन्हेगार म्हणजे काय, त्यांच्या व्याख्या, गुन्हेगारांमध्ये वेगवेगळे प्रकार यांचा विस्तृत आढावा घेतला आहे.

शिक्षा व्यवस्था ही गुन्हा आणि गुन्हेगार या बरोबरच निर्माण झालेली संकल्पना असून गुन्ह्याला प्रतिबंध व्हावा व ज्या व्यक्तीने कायदाबाह्य वर्तन केले आहे त्यांना केलेल्या वर्तनाची शिक्षा होणे महत्त्वाचे आहे. कारण तो पुन्हा असे कृत्य करणार नाही आणि दुसऱ्या लोकांना यापासून भीती वाटल्याने गुन्ह्याचेप्रमाण कमी होऊ शकते. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणामध्ये शिक्षा व्यवस्था, शिक्षेचा अर्थ, व्याख्या, शिक्षेचे नेमके काय उद्देश आहेत शिक्षेचे वेगवेगळे प्रकार आणि विविध अभ्यासकांनी शिक्षेबद्दल जे विविध सिध्दांत सांगितले आहेत यांचा सविस्तर आढावा घेतला आहे.

कारागृह हा मुख्य अभ्यासाचा विषय असल्याने कारागृहाचा नेमका अर्थ काय? यासाठी कारागृहाच्या विविध अभ्यासकांनी केलेल्या व्याख्या, कारागृहाचे उद्देश आणि प्राचीन काळापासून आजच्या आधुनिक काळापर्यंत कारागृहाचा इतिहास यांचा सविस्तर विवेचन केले आहे. कारागृहे गुन्हेगारामध्ये सुधारणा करण्यासाठी विविध मार्गानी प्रयत्न करतात. त्याचबरोबर ज्या बंद्यांच्या वर्तनात सुधारणा झाली आहे अशा बंद्यांना खुल्या कारागृहात पाठवले जाते. जेणे करून कारागृहातील गर्दी टाळता येते आणि बंद्यांमध्ये सुधारणा होण्यास मदत होते. त्यामुळे खुले कारागृह म्हणजे काय याचा सविस्तर आढावा घेऊन भारतात खुल्या कारागृहाचा प्रयोग याचा सविस्तर आढावा घेतला आहे.

कारागृहाबरोबरच कारागृहातील गर्दी कमी करण्यासाठी व ज्यांनी प्रथम पण सौम्य स्वरूपाचा गुन्हा केला आहे अशा व्यक्तींना सरळ कारागृहात न पाठवता त्यांना समज देऊन परिविक्षा अधिकारी यांच्या देखरेदखीखाली सोडून पूर्ववत समाजात पाठवले जाते ती परिविक्षा पध्दती होय. प्रस्तुत प्रकरणात परिविक्षा म्हणजे काय, त्याचे फायदे यांचा सविस्तर आढावा घेतला आहे. तसेच कारागृहात शिक्षा भोगणाऱ्या बंद्याला वर्षातून एकदा त्याच्या घरी भेटून येण्यासाठी दिली जाणारी सुट्टी म्हणजे अभिवचन होय. प्रस्तुत प्रकरणात अभिवचन याचा सविस्तर आढावा घेतला आहे. प्रस्तुत प्रकरणात संशोधनाशी संबंधित गुन्हा, गुन्हेगार, शिक्षा, व्यवसाय, कारागृह, खुले कारागृह, परिविक्षा, अभिवचन यांचा सविस्तर आढावा घेण्यात आला आहे.

*******

# प्रकरण २ रे

## संशोधन पध्दती व संदर्भ साहित्याचा आढावा

२.१ संशोधन विषयाची निवड

२.२ संदर्भ साहित्याचा आढावा

२.३ संशोधनाचे उद्देश

२.४ संशोधनाची गृहीत कृत्ये

२.५ संशोधनाचा आराखडा

२.६ अध्ययनाचे क्षेत्र व एकक

२.७ संशोधन पध्दती (नमुना निवड )

२.८ तथ्य संकलन

२.९ निरीक्षण

२.१० सांकेतिकीरण

२.११ सारणीयण, विश्लेषण

२.१२ प्रकरण योजना

२.१३ सैध्दांतिक पार्श्वभूमी

**संशोधन पध्दती (Research Methodology)**

मानव हा समाजशील आणि जिज्ञासू आहे, मानवाच्या अवतीभोवती घडणा-या घटनांबाबत माहिती करून घेण्याची जिज्ञासा त्यामध्ये असते. आणि तो सतत नवीन माहिती, ज्ञान मिळवण्यासाठी धडपडत असतो. ज्ञान मिळवण्यासाठी विशिष्ट पध्दत म्हणजे वैज्ञानिक पध्दती होय. कारण यातून जी माहिती दिले ती सत्य असते, समाजात ज्या वेगवेगळ्या घटना घडतात त्या घटनांच्या सत्याचा शोधण्याचा एक विशिष्ट असा मार्ग म्हणजे शास्त्रीय पध्दत होय.

काल पिअर्सन या संदर्भात म्हणतात,"सत्याकरिता कोणताही लघुमार्ग नाही. विश्वाचे ज्ञान प्राप्त करण्याकरिता शास्त्रीय पध्दतीच्या मार्गाशिवाय दुसरा मार्ग नाही. "[१] (डॉ. प्रदीप आगलावे. २०००) (There is no short Cat to truth no way to going knowledge of the universe except through the getway of scientific method)

अर्थात कोणत्याही घटना विषया संदर्भात नवीन ज्ञान मिळवायचे असेल तर वैज्ञानिक पध्दतीचा अवलंब करणे आवश्यक आहे. वैज्ञानिक पध्दतीने त्या विषयाचे क्रमबध्द ज्ञान मिळवले जाते. शास्त्र किंवा विज्ञानाची व्याख्याच अशी केली जाते की "क्रमबध्द ज्ञान."

सामाजिक शास्त्रातही क्रमबध्द पध्दतीने अर्थात शास्त्रीय पध्दतीने संशोधन होवून निष्कर्ष काढले जातात. सामाजिकशास्त्रांतील विषयांत आज अनेक नवीन नवीन विषयांवर संशोधन होत आहे, अनेक समस्या,घटना,प्रसंग इ वर संशोधनातून त्या बाबत काही नवीन माहिती संकलित करुन त्यावर उपाय योजना करता येतील काय याच संदर्भात आज अनेक विषयांवर संशोधन करताना शास्त्रीय पध्दतीचा आधार घेतला जातो. सामाजिकशास्त्रांत संशोधन हे मानव आणि मानवी पर्यावरण आणि मानवाचे कल्याण यासाठी आज नवीन नवीन विषय घेऊन संशोधने चालू आहेत. संशोधन करत असताना शास्त्रीय संशोधनाच्या पध्दतीचा अवलंब करून काढलेला निष्कर्ष आणि त्यातून मांडलेले सिध्दांत दीर्घकाळ टिकणारे असतात. त्यामुळे आज सामाजिकशास्त्रांतील संशोधनामध्ये शास्त्रीय पध्दतीचा वापर हा अनिवार्यपणे होत असलेला आपणास दिसतो. कारागृहातील बंद्यांचा वैयक्तिक, सामाजिक, कौटुंबिक आर्थिक अभ्यास या विषयावर संशोधन करीत असताना शास्त्रीय पध्दतीच्या आधारावरच संशोधन केले आहे. विषयाच्या निवडीपासून अहवाल लिखाणापर्यंत संशोधनात येणाऱ्या सर्व पायऱ्यांप्रमाणेच संशोधनाचे कार्य पूर्ण केले आहे.

---

संदर्भ :- १) सामाजिक संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे - डॉ. प्रदीप आगलावे - पृष्ठ क्र. २

संशोधन करण्यापुर्वी विषयाची निवड झाल्यानंतर प्रथम संशोधनाची रूपरेषा निश्चित करुन त्याप्रमाणे संशोधन रूपरेषा निश्चित केली. प्रत्यक्ष संशोधन करीत असताना परिस्थितीनुरूप थोड्याफार प्रमाणात बदल केले (संशोधन रूपरेषेमध्ये) आणि संशोधन कार्य पुर्ण करू न अहवालाची मांडणी केली.

अध्ययनाचे उद्देश, गृहीत कृत्ये, निश्चित करुन अध्ययनाचा संशोधन आराखडा तयार केला आणि त्यात अध्ययनासाठी मध्यवर्ती कारागृहातील बंद्यांचे अध्ययन करण्याचे निश्चित झाल्यानंतर मराठवाडा विभागात औरंगाबाद या ठिकाणी मध्यवर्ती कारागृह असल्याने आणि आजपर्यंत या कारागृहावर संशोधन झाले नसल्याने मध्यवर्ती कारागृह औरंगाबाद हे अध्ययनाचे क्षेत्र निश्चित करुन त्यासाठी मा. कारागृह उपमहानिरीक्षक औरंगाबाद यांच्याकडे संशोधन कार्यासाठी पूर्व परवानगीसाठी विनंती अर्ज केला. त्यानंतर मा. कारागृह उपमहानिरीक्षक यांनी संशोधकाचे अध्ययनाचे उद्देश लक्षात घेऊन काही अटींवर संशोधनाची परवानगी देण्यात आली. परवानगीनंतर प्रत्यक्ष संशोधन कार्याला सुरुवात झाली. त्यानंतर संशोधकाने संशोधनासाठी शास्त्रीय संशोधनातील पध्दतींचा वापर करण्यासंबंधीचा आराखडा तयार करुन पुढील संशोधन कार्य पूर्ण केले.

### २.१ विषयाची निवड :-

संशोधनाची सुरुवात विषयाच्या निवडीपासून होते. सामाजिकशास्त्रांत अनेक संशोधक आपल्या आवडीचा, दुर्लक्षित असा विषय निश्चित करून संशोधन करतात. संशोधकाने विषय निवडीत असताना अनेक विषय संशोधकाच्या मनात गोंधळ घालत होते. पण त्या सर्व विषयांसंदर्भात विचारमंथन केल्यानंतर आणि काही तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेऊन कारागृहातील कैदी त्यांचा वैयक्तिक, सामाजिक, कौटुंबिक आर्थिक अभ्यास हा विषय निश्चित करुन संशोधन करण्याचे निश्चित केले.

समाजामध्ये व्यक्ती जीवन जगत असताना त्याच्याकडून कळत न कळत नियमांचे उल्लंघन होते. ज्या व्यक्तींनी कायद्याच्या नियमांचे उल्लंघन केले आहे त्यांना अपराधी असे म्हणतात. प्रथम तो आरोपी असतो व गुन्हा सिध्द झाल्यानंतर तो गुन्हेगार होतो. त्याला तुरुंगात ठेवले जाते, न्यायालयाने जी शिक्षा दिली आहे ती शिक्षा तुरुंगात त्याला भोगावी लागते.

तुरुंग ही एक व्यवस्था आहे. येथे अपराध्यांना ठेवले जाते. तुरुंगव्यवस्था प्राचीन काळापासून अस्तीत्त्वात आहे. पण कालपरत्वे त्यामध्ये दिल्या जाणाऱ्या सुविधांत बदल झाला आहे. आता २१ व्या शतकात कारागृह ही कारागृहे न राहता सुधारणागृहे बनली आहेत. आज ती सुधारणा आणि पुनर्वसन या ब्रीद वाक्याला धरून मार्गक्रमण करीत आहेत. कारागृहे ही सुधारालये झाली आहेत तरी परंतु समाजातील व्यक्तींना कारागृहाकडे पाहण्याचा दृष्टिकोन भीतीदायक आहे. कारण सर्वसामान्य समाजाची मानसिकता अशी आहे की, कारागृहात कठोर शिक्षा दिली जाते. बंद्यामध्ये सुधारणा करण्यासाठी काहीच

प्रयत्न केले जात नाहीत. कारागृहातून बाहेर आलेला बंदी हा इतर बंद्यांच्या सान्निध्यात येऊन अट्टल गुन्हेगार बनतात आणि बाहेर आल्यानंतर अतिशय सफाईदारपणे गुन्हे करतात अशी अनेक उदाहरण प्रत्यक्षात घडत असून पेपर, टी.व्ही. मधून अनेक बातम्या वाचनात व पाहण्यात येत आहेत.

तुरुंगातील कैद्यांकडे आज मानवतावादी दृष्टिकोनातून पाहिले जाते, बंदी हेही माणसे आहेत या व्यक्तींनी कुठल्या तरी कारणाने कायदाबाह्य वर्तन केले आहे पण त्यामध्ये सुधारण होऊ शकते, पण आज कारागृहातील कैद्यांची संख्या वरचेवर वाढत असलेली आपणास दिसते. आज अनेक बंदी कारागृहातून पळून जात असलेले आपणास वर्तमानपत्रातून वाचायला मिळते. याच पार्श्वभूमीवर त्यांची व्यथा जाणून घेण्यासाठी राष्ट्रीय मानव अधिकार आयोगाचे एक पथक काराग्रहांना भेटी देणार हे वृत्त वृत्तपत्रात प्रसिध्द झाले होते.

मध्यवर्ती आणि जिल्हा कारागृहांतील बंद्यांची प्रत्यक्षात क्षमता आणि प्रत्यक्षात राहत असलेले कैदी यांचे वाढलेले प्रमाण पुढील तक्त्यावरून लक्षात येते. महाराष्ट्रातील कारागृहांतील गुन्हेगारांचे वाढते प्रमाण खालील तक्त्यावरून आपणास लक्षात येईल

" महाराष्ट्रात एकूण ३८ कारागृहे आहेत. त्यात मध्यवर्ती कारागृहे ०८, जिल्हा कारागृहे २३, महिला कारागृहे ०१, मुक्त वसाहत ०१ बोस्टल स्कूल ०१, विशेष कारागृह रत्नागिरी ०१, खूली कारागृहे ०३ अशी एकूण ३८ कारागृहे आहेत. या कारागृहांत कैदी ठेवण्याची क्षमता ही १७७६७ इतकी आहे पण २००६-२००७ मध्ये मध्ये प्रसिध्द झालेल्या सांखिकीमध्ये प्रत्यक्षात २५०३४ कैदी शिक्षा भोगत होते. त्यात पुरुष २३८०८ तर स्त्रिया १२२६ आहेत. "[२] (Hand Book of Prison Statistics 2006-07 I.G. office Pune. २००७)

"महाराष्ट्रातील एकूण ३८ कारागृहांतील बंद्यांचे प्रत्यक्ष प्रमाण व त्यांची क्षमता यांचे विश्लेषण पाहिल्यावर कारागृहात होणारी गर्दी आपणास सहज दिसून येईल. ती पुढीलप्रमाणे

| अ.क्र. | कारागृहाचा प्रकार | एकूण संख्या | प्रत्यक्ष कैदी ठेवण्याची क्षमता | प्रत्यक्षात कैदी |
|---|---|---|---|---|
| १ | मध्यवर्ती कारागृहे | ०८ | ११३८२ | १७०८६ |
| २ | जिल्हा कारागृहे वर्ग -१ | ०८ | २७०६ | ३५४३ |
| ३ | जिल्हा कारागृहे वर्ग -२ | १३ | २१७१ | ३०६७ |
| ४ | जिल्हा कारागृहे वर्ग -३ | ०२ | १४५ | १९६ |
| ५ | महिला कारागृहे | ०१ | २६२ | २४१ |
| ६ | बोस्टल स्कूल | ०१ | १०५ | ३३२ |
| ७ | विशेष कारागृह | ०१ | २४६ | १८३ |

२) Hand Book of Prison Statistics 2006-07 I.G. office Pune Pag 3

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८ | खुले कारागृह | ०३ | ७२२ | ६५६ |
| ९ | खुली वसाहत | ०१ | २८ | २९ |
| | **एकूण** | **३८** | **१७७६७** | **२५३३३ "३** |

(कित्ता)

वरील आकडेवारीवरुन मध्यवर्ती कारागृहे, जिल्हा कारागृहे वर्ग -१,२,३ या कारागृहांतील कैदी ठेवण्याची प्रत्यक्ष क्षमता आणि प्रत्यक्षातील कैद्यांची संख्या पाहता कारागृहांतील वाढती संख्या आपल्या लक्षात येते. महिला कारागृहे, बोस्टल स्कूल, विशेष कारागृहे, खुली कारागृहे, मुक्त वसाहत यांची प्रत्यक्ष क्षमता आणि प्रत्यक्षातील बंदी यामध्ये फरक जाणवतो पण क्षमतेपेक्षा कमी कैदी असलेले लक्षात येते.

दररोज कारागृहांतील कैद्यांची वाढती संख्या कारागृह प्रशासनाचा चिंतेचा विषय बनला आहे त्यातून अनेक प्रश्न निर्माण होतात. साठ वर्षांच्या कैद्यांना शिक्षे्तून सूट द्यावी असे आदेश असतांनाही त्यांना सोडले जात नाही. कैद्यांना दिल्या जाण-या सुविधा या संदर्भात अनेक प्रश्न निर्माण झाले होते. अभिनेता संजय दत्त २००१ मध्ये तुरुंगातून बाहेर जामिनावर मुक्त झाल्यानंतर त्याने सांगितले की, "तुरुंग विषयक कायदे बदलायला हवेत. नियमानुसार कुटूंबांना महिन्यातून केवळ एकदाच भेटायची परवानगी होती. खरे तर अशा काळात कुटुंबीयांची गरज सर्वाधिक असते. त्यामुळे कुटुंबीयांना भेटण्याचे विशिष्ट नियम असू नयेत " कारण यामुळे अटकेतील व्यक्तींची मानसिक स्थिती व्यवस्थित राहु शकेल.आजची कारागृहे ही कारागृहे न राहता सुधारालये बनली आहेत. "सुधारणा आणि पुनर्वसन" हे ब्रीद आज प्रत्येक कारागृहाचे प्राण बनले आहे असे म्हणत असताना कैद्यांना कारागृहात दिली जाणारी वागणूक

पुनर्वसनात्मक कार्यक्रम या संदर्भात प्रश्नचिन्ह निर्माण होते कारण, " गुन्हेगारांची पाठशाळा हा मैत्रमधील ट्रॅप वाचल्यानंतर लक्षात येते की, महाविद्यालयात शिक्षण घेणारा विद्यार्थी पहिल्यांदा रस्त्यावर लूटमार करतो. त्याला तीन महिने तुरुंगात ठेवले जाते. तीन महिन्यांच्या तुरुंगवासानंतरही सुशांत हा सुधारला नाही. "सुधारणा आणि पुनर्वसन" हे ब्रीद  तुरुंगाच्या दर्शनी भागात आढळले. पण प्रत्यक्षात दगडी भिंतीआड कोणते वातावरण असतें तीन महिन्यांच्या तुरुंगावासात सुशांतला केलेल्या कृत्याचा पश्चात्ताप व्हायचे राहिले दूरच तो अधिक निर्ढावलेल्या गुन्हेगारीच्या वाटेकडे वळला" होता ते कस झालं याचा अर्थ कारागृहात सुधारण करण्याऐवजी इतर गुन्हेगारांच्या संगतीत राहून सराईत गुन्ह्याचे प्रमाण वरचेवर वाढत आहे.  या वाढत्या गुन्हेगारीमुळे कारागृहात प्रशासनावर ताण येतो आणि अनेक कैदी पळून जातात. अनेक कैदी आत्महत्या करतात, बऱ्याच वेळा कारागृहातच टोळीयुध्द होतात.

३)  कित्ता - पृष्ठ क्र. १५

आणि काही कैद्यांचा मृत्यू होतो. या संदर्भात आज अनेक बातम्या वाचायला आणि ऐकायला मिळतात. कारागृहे ही कारागृहे न राहता सुधारालये बनली आहेत. पण कारागृहांत गेलेल्या बंद्याला सुधारण्यासाठी काय काय कार्यक्रम हाती घेतले जातात ? त्यांच्या मानसिक परिवर्तनासाठी काय उपाय केले जातात ? त्यांना सुविधा कोण कोणत्या मिळतात त्यांना आरोग्यविषयक रजाविषयक सुविधा मिळतात का ? पुरेसा पोषक आणि पूरक आहार मिळतो काय? प्रत्येकाला काम दिले जाते काय? अपराध्याने अपराध करण्यामागची काय पार्श्वभूमी आहे? त्यांची कौटुंबिक सामाजिक, आर्थिक, राजकीय मानसिक परिस्थितीचा आढावा घेऊन कारागृहासंबंधीची सत्य माहिती मिळवणे आणि अपराध्यांना मिळणाऱ्या सुविधांसंदर्भात काही निष्कर्ष काढून उपाय सुचवणे त्याच उद्देशाने आणि उत्सुकतेपोटी कारागृहातील बंद्यांचा वैयक्तिक, सामाजिक, कौटुंबिक आर्थिक अभ्यास या विषयाची संशोधनासाठी निवड करण्यात आली.

संशोधनामधून वरील परिस्थितीचा संपूर्ण अभ्यास करुन प्रत्यक्ष बंद्यासोबत मुलाखत तंत्राचा वापर करुन माहिती करुन घेतली आणि त्यातून संशोधकाला अपराधी का अपराध करतात त्याची कारणे, अपराधापाठीमागची पार्श्वभूमी, परिणाम, कारागृहात दिल्या जाणाऱ्या सुविधा, त्यांचा त्या बंद्यांवर होणारा परिणाम, बंद्यांना दिली जाणारी वागणुक या सर्व परिस्थितीचा आढावा घेतल्यानंतर संशोधकाला संशोधन विषयातून न्याय मिळाला असे वाटते.

## २.२ संशोधन विषय-संदर्भ साहित्याचा आढावा

संशोधकाने संशोधन विषयाच्या संदर्भात साहित्याचा आढावा पुढीलप्रमाणे घेतला आहे. कारागृह हे एक विशिष्ट राहण्याचे ठिकाण आहे. ज्यांनी गुन्हा केला आहे व गुन्हा केल्याचा संशय आहे त्यांना न्यायालयाच्या आदेशान्वये निश्चित कालावधीसाठी कुटुंबापासून वेगळे ठेवले जाते. कारागृह ही सुधारणा आणि पुनर्वसन या प्रमाणे मार्गक्रमण करतात. कारागृहाचे स्वरूप, कार्यपध्दती यामध्ये वेळोवेळी बदल झाला आहे. अनेक अभ्यासक, विचारवंतांनी कारागृह प्रशासन व कारागृहात मिळणाऱ्या सुविधा या संदर्भात अध्ययन करुन वेळोवेळी कारागृह कार्यपध्दतीमध्ये बदल सुचविले आहेत. कारागृहात शिक्षा भोगणारे बंदी हे मानव आहेत त्यांना मिळणाऱ्या सुविधा व त्यांच्याबरोबरची वागणूक ही मानवतावादी असली पाहिजे, त्यांना मिळणाऱ्या प्रशिक्षणातून त्यांना कामही मिळेल. आणि बाहेर आल्यावर त्याचा नक्कीच उपयोग त्यांनी होईल या उद्देशाने विविध सुविधा दिल्या जातात. पण बऱ्याच वेळा अनेक कारणांनी त्या कागदावरच राहतात. त्यामुळे कारागृहासंदर्भात संशोधकांनी, अभ्यासकांनी नोंदविलेली निरीक्षणे आणि सूचना यातून आज कारागृहात योग्य पध्दतीचे वातावरण नाही असे जाणवते. त्याच संदर्भात संबंधित साहित्याचा आढावा पुढीलप्रमाणे घेतला.

२० व्या शतकात कारागृहात अनेक सुधारणा केल्या गेल्या. पण त्या प्रत्यक्ष सुधारणा कृतीरूपात बऱ्याच घडत नव्हत्या. बऱ्याच राज्यात त्या कागदावरच होत्या. विविध राज्यांतील कारागृहांची स्थिती पाहिल्यानंतर आपल्या लक्षात येते. कारागृह ही सुधार संस्था आणी समाज व्यवस्थेचा अविभाज्य घटक म्हणून काम करतांना अतिशय महत्त्वपुर्ण जबाबदारी पार पाडते. पण कारागृहात मिळणाऱ्या सोई, सुविधांचा अभाव,अमानवी कृत्ये,भ्रष्टाचार, साधे गुन्हेगार इतर सराईत गुन्हेगारांच्या सोबत राहून तेही शिक्षा भोगून बाहेर आल्यावर सराइत गुन्हेगारा प्रमाणे गुन्हे करतात, त्या संबधीच्या अनेक बातम्या आपण प्रसिध्दी माध्यमातून ऐकत वाचत असतो.

❖ कारागृहे योग्य प्रकारे मार्गक्रमण करत असताना त्यांच्या कार्यप्रणालीत बदल होण्यामागे काय कारणे आहेत त्या संदर्भात "एम.पोनाइन (M.PONNAIAN) आपल्या (Criminolgy and Penology) या ग्रंथात कारागृहाच्या समस्या पुढीलप्रमाणे मांडतात.

१. **कारागृहांतील वाढती गर्दी :** कारागृहात बंद्यांची गर्दी वरचेवर वाढत चालली असल्याने प्रशासनाची दमछाक होते.या वाढत्या गर्दीची कारणे न्यायालयांची कमतरता, पोलीस तपासातील विलंब, आर्थिक दुर्बलांची पैशा अभावी जामिनावर सुटका न होणे, सुनावणी वेळी साक्षीदार कोर्टात हजर न राहणे,पोलिस कर्मचाऱ्यांची कमतरता इ. कारागृहांतील वाढत्या गर्दीची कारणे आहेत.
२. तुरुंगातील फावल्या वेळेचे नियोजन नाही .
३. तुरुंगातील सामुदायिक एकीकरण.
४. तुरुंगातील तरंगती लोकसंख्या : कारागृहात शिक्षा लागलेल्या बंद्यापेक्षा आरोपींची संख्या वरचेवर वाढते आणि त्यांचा परिणाम तुरुंगातील संख्येवर होतो.
५. महिला बंद्यांचे एकाकी जीवन
६. तुरुंगातील भ्रष्टाचार
७. तुरुंगातील फावल्या वेळेचे नियोजन नाही : " [४] (M.Ponnaian. १९९२) तुरुंगवास,नियम व नियमावलीमुळे तुरुंगातील जीवन एकाकी होते. तुरुंगातील वातावरण एकाकी असून सुधार कार्यक्रमांची आवश्कता आहे. कारागृहातील बंद्यांकडे असलेल्या फावल्या वेळेमधून मनुष्यबळाचा वापर बंद्यांच्या आणि तुरुंग व्यवस्थापनाच्या फायद्यासाठी केला पाहिजे. बंद्यांचे वेगवेगळ्या आधारावर वर्गीकरण करुन घ्यावेत जेणे करुन त्यांचा फावला वेळ रिकामा जाणार नाही.

---

४. Criminology and Penology - M.Ponnaian

❖ महिला बंद्यांचे एकांकी जीवन

महिला तुरुंग अधिकाऱ्यांच्या कमतरतेमुळे महिला बंद्यांना त्यांच्या समस्या सांगणे अतिशय कठीण असते. ज्या महिला बंद्यांचे लहान मूल असेल त्यांचे प्राथमिक उपचार,पोषण आहार आणि आरोग्यासंबधीच्या सेवा उपलब्ध नसतात. अशा प्रकारच्या विविध समस्या कारागृहाला भेडसावतात असे एम.पोनाईन यांनी सांगितले आहे.

❖ २० व्या शतकात कारागृहातील बंद्यांना वैयक्तिक सुधारणा करुण त्यांना व्यावसायिक प्रशिक्षणातून त्यांचे भविष्यातील पुनर्वसन व्हावे आणि त्यांना मानवतावादी दुष्टिकोणातून वागणूक द्यावी पण या संदर्भात अनेक कारागृहांत तशा पध्दतीच्या सुविधा मिळत नाहीत. त्यामुळे तुरुंग सुधारासाठी करण्यात आलेले प्रयत्न आंणि योजना कार्यक्षम आणी प्रभावी बनवण्यासाठी त्यांची पुनर्रचना होणे आवश्यक आहे असे **निताई रॉय चौधरी** यांनी आपल्य (Indian Prison Laws and Correction of Prisoners) या पुस्तकात सांगितले आहे. त्या संदर्भात त्यांनी प.बंगालमधील कारागृहांचा संदर्भ दिला कि, प.बंगालमधील (२००२) कारागृहे ही आधुनिक मापदंडाच्या प्रतिकूल आहेत. अनेक कारागृहे जुनाट झाली असून तेथील खोल्या या असुविधा आणी अस्वछतेचे माहेरघर म्हटले तरी चालेल. कैदी राहणाऱ्या खोल्यांमध्ये खेळती हवा नाही, स्नानगृह व मलनिस्सारणगृहांची संख्या अपुरी आहे. कारागृहांतील बंद्यांची संख्या वरचेवर वाढतच आहे. बंद्यांना मच्छरदाण्या न दिल्याने संसंर्गजन्य रोग मोठ्या प्रमाणात पसरतात, उन्हाळ्यात पंखे नसल्याने मोठ्या प्रमाणात गरम होते. बंद्यांना जे अन्न दिले जाते त्याचा दर्जा ठरवून दिलेल्या अन्नाची पूर्तता करित नाही.याच्या कारणांचा शोध घेतला तर भ्रष्टाचार हे जाणवते. तुरुंग मंत्र्यांनी बऱ्यांच वेळा कारागृहांना अकस्मीक भेटी दिल्या आहेत.

❖ " प.बंगाल मानव अधिकार समितीने १९९७-९८ च्या कारागृहा संबधीत महत्त्वपुर्ण अहवालात म्हटले आहे की,समितीने कारागृहाचे केलेल्या निरीक्षणाआधारे समोर आले की,कैदी परमेशचंद्र दत्त यांना सिगारेट व बिडी घेण्यासाठी पाचशे रुपयांची मागणी करण्यात आली. या पैशाच्या मागणीची पूर्तता न केल्यामुळे त्याला व त्याच्या मुलाला २०-०६-१९९७ रोजी सकाळी १० वाजता उपतुरुंगातील चार कक्षांची साफसफाई करण्यास भाग पाडण्यात आले. तसेच त्यांना या चारही कक्षातील पाण्याच्या टाक्या हापशांचे पाणी हाफसुन भरण्यास सांगितले. स्वयंपाकासाठी लागणारे मोठे भांडेसुध्दा धुण्यास सांगण्यात आले. आणि त्याला मारहाणही करण्यात आली. २०-०६-१९९७ च्या रात्री त्याच्या दोन्ही मुलांना कक्ष क्र १ मध्ये जबरदस्तीने नेण्यात आले. कक्षप्रमुखाने दत्त यास त्याच्या पोटावर, पाठीवर लाथा बुंक्क्यानी बेदम मारहाण केली . आणि ही पिळवणूक त्यांच्या मागणीची पूर्तता होत नाही तो पर्यंत चालू राहील अशी धमकी देण्यात

आली. २१-०६-१९९७ रोजी तो आजारी असतानाही त्याला मलनिस्सारणगृहाची साफसफाई करण्यास सांगितलं त्याच्या वैद्यकीय साहाय्यातेच्या विनंतीकडे दुर्लक्ष केले गेले. जेंव्हा त्याने त्यांची मागणी पूर्ण केली तेव्हाच त्यांचा त्रास थांबला, त्यानंतर त्यांना व त्यांच्या दोन्ही मुलांना कक्ष क्र १ मध्ये ठेवण्यात आले. त्या दिवशी तो अत्यंत व्याकुळ होता. दिवसभर रडत राहिला. पोटात अंत्यत वेदना होत होत्या तेव्हा त्याला गोळ्या देण्यात आल्या. त्यामुळे त्याचा त्रास वाढला. काही वेळांत त्याला उलटया होऊ लागल्या त्यांची प्रकृती अत्यंत चिंताजनक झाल्याने २३-०६-१९९७ रोजी सकाळी ०५.१५ वाजता रुग्णालयात दाखल करण्यात आले. सकाळी ६.०० वा त्याचा मृत्यू झाला. शव विच्छेदन अहवालामध्ये उघड झाले की, त्यांच्या जठराला व यकृताला जबरदस्त इजा झाली होती. त्याचा मृत्यू जबरदस्त मानसिक ताणामुळे आणि जठराच्या जखमामुळे झाला असे नमूद करण्यात आले. तपासादरम्यान बंद्यांनी सांगितले की, तुरुंग अधिकारी त्यांना सिगारेट,बिडी या सुविधा पुरवण्यासाठी नेहमी पैशाची मागणी करीत होते त्या मागण्या पूर्ण न केल्यास त्रास देत असत. सरकारने आधी आमची दखल घ्यावी व अशा प्रकरणात तुरुंग अधिकाऱ्याला जबाबदार धरावे . तसेच बंद्यांची तुरुंग प्रशासनाकडून पैशासाठी होत असलेली पिळवणूक होऊ नये "[५] (Nitali Roy Chowdhary. २००२)

❖ Nitali Roy Chowdhary यांनी त्यांच्या Indian Prison Laws And Corrections of Prisoners या ग्रंथात कारागृहांतील बंद्यांना दिल्या जाणाऱ्या अन्नाच्या संदर्भात श्री कुलदीप नायर यांचे निरीक्षण (पृष्ठ क्र. १७९) वर पुढीलप्रमाणे सांगितले आहे." कारागृहात बंद्यांना दिल्या जाणाऱ्या गहू,आणि तांदुळ यात अधिक प्रमाणात भेसळ असते. अन्नधान्याचे वजन वाढवण्यासाठी त्यात दगड,माती इ मिसळले जाते. जळणासाठी वापरणारे लाकूड वजन वाढविण्यासाठी पाण्यात भिजवले जाते, वजन करणाऱ्या मशीनमध्ये सुध्दा फेरफार केला जातो . दुधामध्ये भेसळ करताना पाण्याचा मोठ्या प्रमाणात वापर होता असे भ्रष्टाचाराचे प्रमाणे वाढल्याने कारागृहात सुधारणा करणे गरजेचे आहे. जेणे करुन त्यांना उत्तम दर्जाचे अन्न,राहण्याच्या ठिकाणचे पोषक वातावरण, स्वच्छता व त्यांना मनोरंजनाची साधने असावीत जेणे करुन त्यांचे मानसिक परिर्वतन होईल. "[६] (कित्ता)

❖ कारागृहात बंद्यांना दिल्या जाणाऱ्या सुविधेसंदर्भात कारागृह ज्या जिल्ह्यात आहे त्या जिल्हा न्यायाधीशाच्या कर्तव्याची व्याख्या डॉ.ए.एन.अग्निहोत्री यांनी त्यांच्या **अपराधी कल्यान के विविध आयाम** या मध्ये एका केस संदर्भा एका केसच्या संदर्भ देऊन पुढीलप्रमाणे केली आहे. " अलाहाबाद उच्च न्यायालयाने सतबीर सिंग विरुध्द मध्यवर्ती कारागृहातील वैद्यकीय अधिकारी या संदर्भात सूचित करते की, कारागृह

---

५) Indian Prison Laws And Corrections of Prisoners -Nitali Roy Chowdhary (P 170)
६) कित्ता :

अधिकाऱ्यांनी कैदी हे मानव आहेत याची प्रथम जाणीव ठेवावी .त्यांच्या सोबत वर्तन करताना मानवतावादी दृष्टिकोन समोर ठेवावा. कारागृहात शिक्षा भोगणाऱ्या व्यक्ती गुन्हेगार आहेत म्हणून त्यांना जेवण चांगले न देणे, राहण्यासंदर्भात सुविधा न देणे असे करता येणार नाही ,भविष्यात बंद्यासंदर्भात अधिकाऱ्यांनी सौजन्याने वागावे, जिल्हा न्यायाधीश तथा मुख्य न्यायदंडोधिकारी यांना दिला जाणाऱ्या सुविधांची पाहणी करावी. ही पाहाणी कारागृह अधिकारी यांना सोबत घेवून करू नये.आणी कारागृह अधिकारी बंद्यांसोबत कसे वागतात या बाबत बंद्यांना विचारणा करावी, त्याचबरोबर दिल्या जाणाऱ्या सुविधांचेही निरीक्षण करावे. त्या योग्य प्रमाणात पुरवल्या जातात का. "[७] (डॉ. ए.एन. अग्निहोत्री. १९९५) या वरुन आपणास लक्षात येते की, कारागृहात वैद्यकीय सुविधा मिळत नाहीत, मानवतावादी दृष्टिकोण नाही, विविध सुविधा नाहीत असे जाणवते.

❖ १९९९ " कारागृहातील कैदयांच्या आरोग्य समस्या संदर्भात मध्य प्रदेश उच्च न्यायालयाने अनिल कुमार विरुध्द मध्य प्रदेश सरकारच्या खटल्यातील निकालात स्पष्टपणे म्हटले की "तुरुंगातील वातावरणामुळे व इतर कारणांमुळे टी. बी. आणि एड्स् रोगांनी किती बंद्यांना पछाडले होते हे सत्य समोर आले आहे. कारण कारागृहात बंद्यांची आरोग्यासंदर्भात विषेश काळजी घेतली जात नाही. त्याची कारणे पुढीलप्रमाणे

१. बंद्यांच्या रोग निदानातदिरंगाई, आरोग्य समस्येकडे दुर्लक्ष, जंतुनाशक यंत्राची अपुरी सोय.

२. वैद्यकीय सवेत टी.बी चे निदान करण्यास आणि वेळेवर उपचार करण्यास केलेली दिरंगाई.

३. टी.बी या रोगाची लागण झालेल्या बंद्याला इतर बंद्याबरोबर ठेवणे.

४. उच्च प्रतीच्या औषधांचा अभाव असल्याने रोगावर उपयुक्त उपचार होत नाहीत.

५. अपुरी हवा आणी पौष्टिक आहाराची कमरतता यामुळे रोगांची वाढ झाली.

मध्य प्रदेश उच्च न्यायालयाने राज्य सरकारला सुचना दिल्या की, कारागृहे रोगराई पसरु नये म्हणून व त्यावर नियंत्रण असावे म्हणुन निश्चित पावले उचलावीत अशा सूचना केल्या. वरील परिस्थितीवरुन कारागृहात बंद्यांच्या आरोग्य सुविधेकडे विषेश लक्ष दिले जात नाही असे जाणवते. कारण कारागृहांच्या कार्यप्रणालीत उच्च न्यायालयांना हस्तक्षेप करावा लागतो असे जाणवते "[८] (Dr. N. V. Paranjape. 2003)

❖ " भारतातील उच्च न्यायालयाने कारागृहासंदर्भात अनेक प्रकरणांचा संदर्भ देऊन कारागृहातील सुधारणा संदर्भात चिंता व्यक्त केली असून त्यात सुधारणा करणे गरजेचे आहे असे सांगितले आहे. त्यात सुधारणा केसेसचा संदर्भ देत.(मोहम्मद गियासुद्दिन विरुध्द आंध्र प्रदेश राज्य (१९७७) लिंगाप्पा विजय

---

७) अपराधी कल्याण के विविध आयाम - डॉ. ए.एन. अग्निहोत्री - पृष्ठ क्र. २३१

८) Criminology and Penology - Dr. N. V. Paranjape - P-286

कुमार आणि इतर विरुध्द सरकारी अभियोक्ता (१९७८), माधव ऱ्हदयवदन राव हास्कोट विरुध्द महाराष्ट्र राज्य (१९७८) सुनील बत्रा विरुध्द दिल्ली प्रशासन आणि इतर (१९७९) या संदर्भात उच्च न्यायालयाने महत्त्वपुर्ण निर्णय दिले. या निर्णया संदर्भात कारागृहातील दिल्या जाणाऱ्या सुविधा संदर्भात चिंता व्यक्त करुन कारागृहाच्या सुधारात्मक नीतीमध्ये बदल करणे आवश्यक आहे असे निर्दशनास आणून दिले. या सूचनांना पुढे ठेवून जेल सुधार समितीने कारागृहांतील सुधारणा संदर्भात अतिशय महत्त्वपुर्ण शिफारशी केल्या." [९] (डॉ.सुनील कांत भट्टाचार्य. २००४)

❖ "कारागृहातील सुविधांसंदर्भात बंगलोरच्या तुरुंगात शिक्षा भोगणारा राममूर्ती यांने तरुंगातून भारताचे मुख्य न्यायाधीश यांना पत्र लिहून त्यात कारागृहातील समस्या मांडल्या. त्यात त्यांनी सांगितले की काम करुनही त्याला मजुरी नाकारण्यात आली. अन्न खाण्यासारखे नाही. आम्हाला शारीरिक आणि मानसिक त्रास दिला जातो असे पत्र त्यांनी पाठवले. मुख्य न्यायाधीशांनी पत्राची दखल घेऊन २६ नोंव्हेबर १९९२ रोजी बेंगलोरच्या जिल्हा न्यायाधीशाला आदेश दिले की, त्यांनी स्वतः बंगलोरच्या केंद्रींय कारागृहास भेट द्यावी आणि कारागृहात मजुरांना मिळणारी मजुरी, त्यांच्या राहण्याची स्थिती, स्वच्छता, अन्नाचा दर्जा, औषधी संदर्भात पाहणी करुण अहवाल सादर करावा. मुख्य न्यायाधीशांच्या आदेशाप्रमाणे बेगलोरच्या जिल्हा न्यायालयाने मध्यवर्ती कारागृहात भेट देऊन ३०० पानी अहवाल २४ एप्रिल १९९३ रोजी सर्वोच्च न्यायालयाला सादर केला. यात त्यांनी पाहणी केलेल्या बंद्यांची सर्वसाधारण अवस्था त्यांना मिळणाऱ्या अन्नाचा दर्जा,मजुरीचा दर आणी बंद्यांना ठेवण्याच्या व्यवस्था या बद्दल समाधान व्यक्त केले होते. परंतु कारागृहातील स्वच्छता,वैद्यकीय सेवा,मानसिक कैदी,दवाखान्यात बंद्यांना पाठवण्याची पध्दती या गोष्टी समाधानकारक नाहीत असा उल्लेख अहवालात होता.

वरील अहवालाचा संदर्भ घेऊन अशा प्रकारच्या समस्या असणाऱ्या भारतातील ११५५ कारागृहांविरुध्द कारवाई केली. यावरुण आपणास जाणवते की ,कारागृहे ही सुधारणा आणी पुनर्वसन या प्रमाने काम करतात असे म्हणत असताना वरील प्रकारच्या समस्या बहुसंख्य कारागृहांत जाणवतात. जेणे करुन येथे मानवतावाद फक्त कागदावरच आहे का ? असा प्रश्न निर्माण होतो." [१०] (Dr. N. V. Paranjape. 2003)

❖ स्त्री गुन्हेगारीवर डॉ. स्मृती भोसले यांनी मुंबई मधील ऑथर रोड मध्यवर्ती कारागृहातील आरोपाखाली अटक झालेला महिलांचा संशोधनात्मक अभ्यास केला. ( Undertrial Female Criminal In Mumbai A Sological Study) मुंबई ऑर्थर रोड, मध्यवर्ती कारागृहातील आरोपी

---

९) भारत की सामाजिक समस्याएँ मुद्दे और परिप्रेक्ष- डॉ.सुनील कांत भट्टाचार्य

१०) Criminology & Penology - Dr. N. V. Paranjape (P295)

महिलांची परिस्थिती, स्त्रियांनी गुन्हा करण्याची कारणे, कारागृहांत मिळणाऱ्या सुविधा, त्यात राहण्याचे ठिकाण अन्नाचा दर्जा, वैद्यकीय सुविधा, प्रशिक्षण, शैक्षणिक परिस्थिती यांचा आढावा घेऊन मानव अधिकाराच्या दृष्टीने गुन्हेगारांच्या विचार सविस्तरपणे मांडला आहे. प्रचलित न्याय प्रक्रियेतील उणीवा सांगून गुन्हेगार न्याय प्रकियेत सुधारणा, कारागृहांत मिळणाऱ्या सुविधांमध्ये सुधारणा, महिलांसाठींची कायदेशीर मदत व इतरही काही महत्त्वपूर्ण सूचना मांडल्या आहेत.

मुंबई येथील ऑर्थर रोड मध्यवर्ती कारागृहात आरोपी स्त्रियांमध्ये सर्व वयोगटांतील स्त्रियांचा समावेश होता. बहुसंख्य स्त्रि अशिक्षित असून गलिच्छ वस्तीमध्ये राहणाऱ्या हिंदूधर्मीय, मराठी भाषिक होत्या. जातीनुसार विचार करता उच्चजातीच्या स्त्रियांचे प्रमाण अधिक असून घटस्फोटित, परित्यक्ता स्त्रियांचे प्रमाण अधिक होते. बहुसंख्य स्त्रियांचे मासिक उत्पन्न ३००० रु. व त्याहूनही कमी होते असे संशोधकाने नमूद केले आहे.

गुन्हेगारीसाठी खालावलेली आर्थिक परिस्थिती अर्थात दारिद्र्य हे महात्त्वपूर्ण कारण असून विभक्त कुटुंबातील स्त्रियांचे प्रमाण अधिक आहे. चोरी, खून, पाकिटमारी, चैन चोर, पर्स कापणे, दुकानातील उचलेगिरी, फसवणूक इ. गुन्ह्यांच्या आरोपातील महिलांची संख्या अधिक आहे. घरातील दारिद्र्य अशा गुन्हेगारीचे वर्तन करण्यास भाग पाडते असे बहुसंख्य स्त्रियांचा परिस्थिती आहे.

आधुनिकीकरण, औद्योगिकीरण तसेच सामाजिक, आर्थिक परिस्थितीतील झालेला बदल यामुळे स्त्रियां घराबाहेर जाऊन काम करू लागल्या. कुटुंबाचे उत्पन्न वाढले पण कुटुंबात घटस्फोटांचे कुटुंब विघटनाचे, परितक्तां प्रमाण वाढू लागले. मुलांचे संगोपन, आर्थिक अडचणी या सर्वांचाच परिणाम स्त्री गुन्हेगारीचे प्रमाण वाढण्यात झाला असे संशोधक मांडतात.

स्त्री बंद्यांची कारागृहातील परिस्थिती संशोधक पुढीलप्रमाणे मांडतात. स्त्रि गुन्हेगार असमाधानी व अमानवी स्थितीत जीवन जगत आहेत, कारागृहात वाढत्या गर्दीमुळे त्यांना राहण्यासाठी आवश्यक तेवढी जागा मिळणेही कठीण झाले आहे. ज्या ठिकाणी या महिलांना ठेवले जाते तेथील वातावरण आरोग्यासाठी पोषक नाही. त्यांना जे अन्न दिले जाते त्या अन्नाचा दर्जाही चांगला नाही. विदेशी स्त्रि गुन्हेगार आणि भारतीय स्त्री गुन्हेगार यांना मिळणाऱ्या अन्नाच्या दर्जात तफावत आहे. विदेशी गुन्हेगारांना पाव, अंडी,दूध, इतर आवश्यक गोष्टी पुरवल्या जातात. त्या भारतीय स्त्री बंद्यांना मिळत नाहीत. रात्रीचे जेवण ४ वाजता दिले जाते. ही अयोग्य वेळ आहे. वैद्यकीय सूविधा समाधानकारक नाहीत, औषधीपरिणाम कारक नाहीत, वैद्यकीय उपचारही वेळेवर मिळत नाहीत, सर्वांना एकत्रच डांबून ठेवल्याने जर कोणाला संसर्गजन्य आजार झाला तर त्याचा प्रसार ताबडतोब इतरांवर होतो. त्यांना राहण्याची स्वतंत्र व्यवस्था नाही.

बहुसंख्य स्त्रिया अशिक्षित असल्याने त्यांना कायदेविषयक ज्ञान नाही. प्रोबेशन, पॅरोल किंवा कायदेशीर मदत याबाबत त्या अनभिज्ञ असतात. कारागृहात व्यावसायिक प्रशिक्षणाचा अभाव जाणवतो. त्यामुळे रिकामा वेळ मोठ्या प्रमाणात असल्याने एकमेकांमध्ये बाचाबाची, मारामारी असे प्रकार घडतात.

महिला बंद्यांना भेटण्यासाठी येणाऱ्यांना फक्त पाच मिनिटच भेट दिली जाते. मनमोकळेपणे संवाद होत नाही. त्यामुळे स्त्रियांमध्ये मानसिक आजारांचे प्रमाण वाढत आहे. अशी परिस्थिती संशोधकाने सविस्तरपणे मांडली असून काही महत्त्वपूर्ण सूचनाही केल्या आहेत. त्यामध्ये कारागृहातील वाढती गर्दी ही कमी करण्यासाठी जलद गतीने न्यायालयीन प्रक्रिया होणे अपेक्षित आहे त्यासाठी कुटुंब न्यायालयांची स्थापना करावी  तसेच पोलिसांना प्रशिक्षण काळात स्त्रियाबाबत संवेदनशील राहण्या संदर्भात प्रशिक्षण द्यावे. तसेच न्यायाधीश व वकील यांनी न्यायालयीन व कायदेशीर कार्यवाही करताना पूर्णपणे संवेदनशील राहायला हवे. त्यांना स्त्रियांच्या परिस्थितीचे तसेच त्यांच्यावर कारावासाच्या होणाऱ्या परिणामांचे ज्ञान करुन देणे आवश्यक आहे.कारागृहात मिळणाऱ्या सुविधा संदर्भात संशोधकाने काही सूचना पुढीलप्रमाणे सांगितल्या आहेत. कारागृहात सलोख्याचे वातावरण असायला हवे. कारागृहात मानवतावादी दृष्टिकोनातून वागणूक अपेक्षित आहे. बंद्यांना स्वच्छता व आरोग्यविषयक शिक्षण देणे गरजेचे आहे. अन्नाचा दर्जा व जेवणाच्या वेळेतही सुधारणा व्हावी, कारागृहात पुरेसा उजेड, खेळती हवा, किमान जागा, स्वच्छ पाणी पुरवठा उपलब्ध करुण द्यावा.

कारागृहातील स्त्रियांना त्यांच्या कायदेविषयक हक्कांची जाणीव करुन द्यावी. त्यांना कायदेशीर मदत पुरवावी. ज्यांचे कुटुंबीय असमर्थ असतील अशा वेळी कारागृह अधिकारी व निमशासकीय संस्था यांनी कायदेविषयक मदत देण्यासाठी पुढाकार घ्यावा. कारागृहात कायदेविषयक समुपदेशन विभाग स्थापन करावा. कारागृहात महिला कैद्यांमध्ये मानसिक आजारांचे प्रमाण वाढत आहे. त्यासाठी मानसिक उपचार व समुपदेशनाची व्यवस्था करावी. कारागृहात बंद्यांच्या करमणुकीसाठी प्रार्थना, ध्यानधारणा, व्यावसायिक प्रशिक्षण देणारे उपक्रम सुरू करावेत. अद्याप सर्व कारागृहांत अशा सोयी उपलब्ध नाहीत. कैद्यांना त्यांच्या योग्यतेचे काम देऊन कामाचे वेतन अशा अनेक महत्त्वपूर्ण सूचना संशोधकाने केल्या आहेत.[११] (A Sociological Study. 2009)

वरील संशोधनातील कारागृहांत येणाऱ्या कैद्यांची गुन्हे करण्यापाठीमागची पार्श्वभूमी स्पष्ट होते. आर्थिक परिस्थिती ही अत्यंत महत्त्वपूर्ण नसते. दारिद्र्यातील स्त्रियांचे अपराधांचे प्रमाण अधिकार तसेच कारागृहात कैद्यांना दिल्या जाणाऱ्या सुविधा संदर्भात प्रश्नाचिन्ह निर्माण होते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे

---

११)  डॉ. स्मृती भोसले - Undertrial Female Criminals In Mumbai : A Sociological Study

मानवतावादी दृष्टिकोन आणि कैद्यांसाठीच्या अन्न, अन्नाचा चांगला दर्जा, आरोग्य, व्यवसाय, मनोरंजन, याबाबी योग्य पध्दतीने मिळत नाही. असे जाणवते. त्यामुळे संशोधकाने सुचविलेल्या सुचना अत्यंत महत्त्वपुर्ण वाटतात.

❖ मध्यवर्ती कारागृहातील महिला बंद्यांचा संशोधनात्मक अभ्यास डॉ. शुभांगी गोटे यांनी Female Criminology In India : A Sociological Analytics (1985-1992) या नावाने केला. पुणे येथील येरवाडा मध्यवर्ती कारागृहात शिक्षा भोगत असणाऱ्या महिला बंद्यांचा अभ्यास त्यांनी केला. भारतीय व्यवस्थेतील महिलांना दुय्यम स्वरूपाची वागणूक मिळते. महिला घरामध्ये हिंसाचाराचे प्रमाण भारतात अधिक असून पाश्चात्य देशांत कामाच्या ठिकाणी महिलांवर होणाऱ्या अत्याचारांचे प्रमाण अधिक आहे. भारतीय स्त्रियांच्या अपराधाची नेमकी कारणे कोणती आहेत ? कारागृहात शिक्षा भोगणाऱ्या महिला बंद्यांच्या सामाजिक आणि आर्थिक स्थितीचा आढावा तसेच भारतीय स्त्रियांच्या अपराधांची पाश्चात्य महिला अपराध्यांसोबत तुलना करुन महिला अपराध्याला प्रतिबंध करण्यासाठी काही सूचना करता येतील या उद्देशाने संशोधनात्मक अभ्यास केला गेला.

संशोधकाने अभ्यासात महिला बंद्यांचे वय, धर्म, शिक्षण, पालकांचा व्यवसाय, वैवाहिक जीवन, आर्थिक परिस्थीती, लग्नाचे वय या संदर्भात सविस्तर आढावा घेतला आहे. संशोधकाने पन्नास बंदी महिलांचा अभ्यास केला आहे. प्रत्यक्ष महिला बंद्यांशी प्रश्न विचारुन अर्थात मुलाखत अनुसूचीचा अवलंब तथ्य संकलनासाठी केला. संशोधकाने महिला बंद्यांचा अभ्यास करुन जे निष्कर्ष मांडले ते महत्त्वपुर्ण वाटतात. ते पुढीलप्रमाणे - भारतात स्त्रियांचा सामाजिक व आर्थिक दर्जा अतिशय खालावलेला आहे. त्यामुळे स्त्रियांना दुय्यम दर्जाची वागणुक दिली जाते. आजही स्त्रियांकडे पुरुषांचा पाहण्याचा दृष्टिकोन दुय्यमच आहे. त्यामुळे महिलांवर अत्याचारांची सुरुवात घरापासूनच होते. पाश्चात्य देशांत महिला मोठ्या प्रमाणात घराबाहेर कामावर जातात. घरामध्ये त्यांना समान दर्जा असते. त्यामुळे घरी महिला हिंसाचाराचे प्रमाण कमी आढळते. पण ज्या ठिकाणी त्या काम करतात अशा ठिकाणी मात्र महिलांवर हिंसाचार होतो. भारतात मात्र घरगुती हिंसाचाराचे प्रमाण अधिक आहे. कारण महिलांबरोबर पुरुषांची समायोजनाची भूमिका आढळत नाही.

संशोधकाने अभ्यासलेल्या महिलांमध्ये २५ ते ३५ वयोगटातील महिलांचे प्रमाण अधिक जाणवले. तसेच दारिद्र्य हे गन्ह्याचे प्रमुख कारण म्हणून पुढे आले आहे. महिलांना लग्नानंतर अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. हुंडा त्यातील एक प्रमुख कारण मानले जाते. बहुसंख्य महिला हुंड्यासाठी होणाऱ्या छळाला कंटाळुन अपराधाचे पाऊल उचलतात. ज्यांच्याकडुन आपणास त्रास होतो, त्यांना नंतर

संपवतात किंवा स्वतः आत्महत्या करतात. बऱ्याच वेळी आत्महत्येसाठी महिलांना भाग पाडले जाते. महिलामध्ये शिक्षणाचे प्रमाण कमी असेल तर तेथे महिला हिंसाचाराचे प्रमाण अधिक जाणवते असे संशोधकाने नमूद केले आहे.

कारागृह प्रशासन महिलांना वेगवेगळ्या कामाचे प्रशिक्षण देते. ज्यात हँडलूम, टेलरिंग, विणकाम यातून महिलांना कामही मिळेल आणि त्यांना त्याचा मोबदलाही मिळेल. कारागृहातील महिला बंद्यांना विविध कामांचे प्रशिक्षण द्यावे असे १९८६-८७ मध्ये स्थापन झालेल्या नॅशनल एक्स्पर्ट कमिटीने सूचीत केले होते त्या सूचनेनुसार महिलांना प्रशिक्षण दिले जाते. संशोधकाने अभ्यासाअंती काही सूचनाही केल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे- कारागृहात बंद्यांसोबत मानवतावादी दृष्टिकोनातून वर्तवणूक करणे गरजेचे आहे. ज्यामुळे बंदी आणि कारागृह प्रशासन यामध्ये खेळीमेळीचे, सहकार्याचे वातावरण राहील. महिला बंद्यांसोबत प्रशासनाने मनमोकळेपणाने संवाद साधावा. महिलांना भेटीसाठी येणाऱ्यांचे प्रमाण कमी आहे. त्यासाठी कारागृह प्रशासनाने विशेष प्रयत्न करावेत. कारागृहात निमशासकीय संस्थांचे कार्यकर्ते येतात तसेच समाज कार्याचे प्रशिक्षण घेणारे विद्यार्थीही येतात. पण कुटुंबीयांनी भेटण्याचे प्रमाण मात्र कमी आहे. सराईत महिला गुन्हेगार व सराईत महिला गुन्हेगार यांना वेगळे ठेवावे, स्त्रियांमध्ये साक्षारतेचे प्रमाण वाढविण्यासाठी प्रौढ साक्षर वर्ग घ्यावेत. अनौपचारिक शिक्षणावर भर द्यावा, नैतिक मूल्य शिक्षण द्यावे, त्या संदर्भातील दृकश्राव्य माध्यमांचा वापर करावा. ज्यामुळे महिलांमध्ये अपराधीपणाची भावना कमी होईल. स्त्रियांच्या आरोग्याची, स्वच्छतेची विशेष काळजी घ्यावी. महिला बंद्यांसाठी दूरदर्शन संच, वर्तमानपत्रे, पुस्तके आहेत पण त्यात वाढ करावी.

महिलांना विशेष समुपदेशन करण्यासाठी समाज कार्याचे विद्यार्थी येथे येतात. त्यांच्या समस्या काय आहेत त्यांचा अभ्यास करुन त्यावर योग्य ते समुपदेशन करतात. त्यामुळे त्यांना बाह्य जगाची ओळख होते. ज्या महिला कारागृहात राहतांना स्वतःला सामावून घेऊ शकत नाहीत अशा महिलांना खुल्या कारागृहात पाठवावे. ज्या महिलांना शेतीशी निगडित कामांची आवड आहे त्यांना मुक्त वसाहतीमध्ये पाठवावे. जेणे करुन त्यांना काम करुन मजुरी मिळेल आणि त्यांना त्यांच्या कुटुंबासोबत राहण्याचा आनंद मिळेल अशा सूचना संशोधकाने केल्या आहेत. महिला हिंसाचार विवाहानंतर उद्‌भवत असल्याने विवाहा संदर्भात मुलींचें समुपदेशन होणे गरजेचे आहे. विवाह होण्यापूर्वीच विवाह झाल्यानंतर कोणकोणत्या परिस्थिती उद्‌भवू शकतात, त्यावर कशा पध्दतीने मात करावी या संबंधीचे सविस्तर समुपदेशन होणे गरजेचे आहे. नवीन जोडप्यांना जोडीदाराच्या संदर्भातील अधिकार आणि कर्तव्यांची जाणीव करुन द्यावी. त्यांना शिक्षण, आरोग्य शिक्षण, कायद्याचे शिक्षण, बाल विकास, स्त्रियांना सन्मानाची वागणूक या संदर्भात नवविवाहितांचे समुपदेशन होणे गरजेचे आहे.

महाविद्यालयीन मुली, अविवाहित मुली यांना डॉक्टर्स, निमशासकीय संस्था, पालक यांनी विवाह आणि यापुढील आयुष्यात येणाऱ्या अडचणी यांची जाणीव करुन द्यावी व योग्य ते समायोजन करण्या संदर्भात मार्गदर्शन करणे गरजेचे आहे. ज्या महिला बंद्यांची शिक्षा संपल्यावर त्यांना बऱ्याच वेळी त्यांचे पती, पालक स्वीकारण्यास तयार होत नाहीत अशा वेळी त्यांची तात्पुरत्या निवाऱ्याची सोय करावी. महिलांना त्यांच्या क्षमतेनुसार नोकरी द्यावी अशा महत्त्वपुर्ण सूचना संशोधकाने केल्या आहेत. [१२] (A Sociological Analysis. 1995)

❖ **२००७ :-** कारागृहातील परिस्थितीवर मानव अधिकार आयोग लक्ष ठेवून असते. २००७ मध्ये कारागृहांत बंद्याना दिल्या जाणाऱ्या सुविधा संदर्भात मानव अधिकार आयोग महाराष्ट्रातील कारागृहाना भेटी देणार असे वृत्त वर्तमानपत्रांत प्रसिध्द झाले .म्हणजेच जेव्हा कारागृहात दिल्या जाणाऱ्या सुविधा संदर्भांत प्रश्नचिन्ह निर्माण होतात तेव्हा मानव अधिकार आयोग हस्तक्षेप करते.

डिसेबर २००७ मध्ये अभिनेता संजय दत्त जामीनावर मुक्तता होताच म्हणाला की , तुरुंगविषयक कायदे  बदलायला हवेत, नियमानुसार कुटुंबीयांना महिन्यातून केवळ एकदाच भेटण्याची परवानगी होती. .खरे तर अशा काळात ( तुरुंगात असताना) कुटुंबीयांची गरज सर्वाधिक असते. त्यामुळे महिन्यातून एकच वेळा भेटण्यासाठी परवानगी न देता जेव्हा कुटुंबीयांना वाटेल तेव्हा भेटण्यासाठी मुभा असावी. कारण या काळात कुटुंबियांचा आधार महत्त्वपुर्ण असतो. त्यामुळे कुटुंबीयांना भेटण्यासाठी नियम नसावेत असे वरील विधानावरुन वाटते.

**२००८ :-** सुधारणा आणी पुनर्वसन या प्रमाणे मार्गक्रमण करताना कारागृहात अनेक समस्या असलेल्या आपणास दिसतात, तसेच अपराध्यांना दिल्या जाणाऱ्या सुविधोंसंदर्भांत प्रश्नचिन्ह निर्माण होते. कारागृहातील वाढती गदी आणी या वाढंत्या गर्दीमुळे सुधारणात्मक कार्यक्रमांवर होणारा परिणाम यामुळे कारागृहातून बाहेर आलेले कैदी हे सुधारण्यापेक्षा सराईत गुन्हेगारांच्या संगतीत येऊन अतिशय सफाईदार पध्दतीने गुन्हे करतात. याच संदर्भात २२ फेब्रुवारी २००८ दै.लोकमतमधील मैत्रमध्ये गुन्हेगारांची पाठशाळा हा त्या संदर्भात प्रकाश टाकते. यात कॉलेजमध्ये शिक्षण घेणारा विद्यार्थी पहिल्यांदा रस्त्यावर लूटमार करतो. त्याला तुरुंगात ठेवले जाते. तीन महिन्यानंतर त्यांचे वडील त्याला तेथून घेऊन जातात पण बाहेर आल्यावर तो पुन्हा घरफोड्या अतिशय सफाईदार पध्दतीने करतो आणि पुन्हा पकडला जाऊन त्यांची परवानगी पुन्हा कारागृहात होते. कारण कारागृहात पहिल्या तीन महिन्यांच्या काळात त्याचा संपर्क इतर सराईत गुन्हेगारांशी आल्याने चोरीचे कौशल्य शिकल्याने तो पुन्हा त्याच मार्गाने मार्गक्रमण करतो.

---

१२) डॉ. शुभांगी गोटे यांनी Female Criminology In India : A Sociological Analysis (1985-1992)

**२०१० :** Commonwealth Human Right Institute आणि Voluntary Action Rehablitation & Are यांनी २००८ मध्ये महाराष्ट्रातील उप-कारागृहांचा संशोधनात्मक अभ्यास केला. कारागृहाची इमारत, कैद्यांना राहण्या-साठीचे निवासस्थान, कैद्याना मिळणारे अन्न, स्वच्छता आरोग्य विषयक सुविधा या संदर्भात सविस्तर अभ्यास केला. महाराष्ट्रातील १२ जिल्ह्यांतील ३२ उपकारागृहांना संशोधकांनी भेटी देऊन अभ्यास केला. या अभ्यासगटाने संशोधना दरम्यान जे वास्तव आहे. त्या संदर्भात खालील विवेचन आढळते.

२००७ च्या कारागृह सांख्यिकी अहवालानुसार कारागृहातील एकूण बंद्यापैकी ६६ टक्के बंद्यी हे आरोपी आहेत. कारागृहात क्षमतेच्या अधिक बंद्यी असल्याने गर्दी मोठ्या प्रमाणात जाणवते. कारागृहाच्या इमारती या अतिशय जुनाट असून त्या आज जीर्ण झालेल्या अवस्थेत आहेत. बंद्यांची संख्या वाढल्याने कोंदट हवा यामुळे वातावरण दुषित होते, त्यामुळै आरोग्यविषयक समस्या निर्माण होतात. कैद्यांना दिले जाणारे अंथरुण, पांघरुण हे फार जुने व अस्वच्छ जाणवते. कपडेही अतिशय घाण जाणवले. काही कारागृहांत तर मागील पाच वर्षांपासून कपडेच दिले नाहीत असे निर्दशनास आले.

कारागृहात कैद्यांना जेवणासाठी स्वयंपाक बनवला जात नाही किंवा तशी स्वतंत्र व्यवस्था नाही. खासगी व्यक्तींना जेवणांचे टेंडर दिले जाते. त्यामुळे अन्नावर पैसे पुरेसे खर्च होतात. मात्र अन्नाचा दर्जा मात्र अतिशय निष्कृष्ट आढळला. कैद्यांना जेवणासाठी ज्वारीची रोटी आणि भाजी दिली जाते. काही वेळेला कंत्राटदार चपाती उपलब्ध झाली तर देतात. कारागृहात पुरेसे पाणी उपलब्ध नाही. जेल मॅन्युअलमध्ये बेंद्यांना जेवणामध्ये दाळ, रोटी, भात,भाजी असे नमूद केलेले, असले तरी त्या प्रमाणे जेवण मिळत नाही. आरोग्य तपासणीही आठवड्यातुन दोन वेळा व्हावी असे असतांनासुध्दा फक्त आवश्यक त्या वेळी बंद्याला स्थानिक शासकीय रुग्णालयात पाठवले जाते. म्हणजे नियमित आरोग्य तपासणी होत नाही. कैद्यांना राहण्यासाठी पुरेशी जागा नाही. जे अन्न मिळते ते अतिशय निष्कृष्ट दर्जाचे असते. कपडे स्वच्छ नाहीत. वैद्यकीय सुविधा नाहीत. कुटुंबींयाना भेटीसाठी सात ते आठ फुटांवरुन भेट दिली जाते. यावरुन महाराष्ट्रातील उपकारागृहांची अवस्था आपणास लक्षात येते. वरील परिस्थिती आढळल्याने अभ्यास गटाने अनेक महत्त्वपूर्ण सुचनाही केल्या आहेत. वरील विवेचनावरुन आपणास कारागृहांची सद्यःस्थिती कशी आहे याचा प्रत्यय येतो.

❖ वरील परिस्थीतीवरुन आपणास जाणवते की, कारागृहात मानवतावादी दृष्टिकोनाचा अभाव असून बंद्यांना सुधारण्यासाठी वेगवेगळ्या तंत्रांचा वापर करणे गरजेचे आहे. जेणे करुन कारागृहातुन बाहेर पडताना त्यांना समाजाबद्दल आपलेपणाची भावना निर्माण झाली पाहिजे. पण तसे होत नाही असे

जाणवते. गुन्ह्यासाठी दारिद्र्या हा अत्यंत महत्त्वपुर्ण घटक जाणवतो. तसेच शिक्षणाचा अभाव, विवाहानंतरच्या समायोजनामधील अडचणी, समुपदेशनाचा अभाव अशा अनेक कारणांमधून अपराधीचे कृत्ये घडतात असे जाणवते. सराईत अपराधाचे प्रमाण मात्र कमी जाणवते. विशिष्ट परिस्थितीच गुन्हा करण्यासाठी महत्त्वपुर्ण ठरते असे जाणवते. त्यामुळे संशोधकाने सुचविलेल्या सूचनांचा प्रत्यक्षात अवलंब होणे गरजेचे वाटते. [13.](Swati Mehta. 2010.)

❖ **१९८७ :** इंग्लंडमधील ग्रेन्डोन येथील अपराध्यांचा गुन आणि रॉबर्टसन यांनी अभ्यास केला. यात त्यांनी पुढील प्रमाणे विवेचन केले आहे. ग्रेन्डोन कारागृहात वर्षातून २०० बंद्यांना इतर कारागृहातून पाठविले जात असत. त्यात सर्वच गुन्हेगार सुधारण्या योग्य नसतात. सुधारण्या योग्य बंद्यांची चाचणी करणे ग्रेन्डोन कारागृहासाठी कठीण काम असते. ग्रेन्डोन पध्दतीने बंद्यांना सुधारणात्मक उपचार पध्दतीद्वारे सुधारले जात असे. रोग निवारक कारागृह म्हणून ग्रेन्डोन एक अद्‌भूत संस्था म्हणून ओळखली जाते. ग्रेन्डोन अंडरवूड कारागृहाची स्थापणा १९६२ मध्ये बंकींगहॅमशायर येथे झाली. सप्टेंबर १९९७ मध्ये पाठविण्यात आलेल्या ३०० बंद्यांपैकी २९ टक्के बंदी दरोड्यातील गुन्ह्याखाली आले होते. २३ टक्के बंदी खून केलेले होते. १५ टक्के बंद्यावर लैगिंक शोषणाचा आरोप होता तर १४ टक्के बंदी हे लूटमार, दंगल या गुन्ह्यात सहभागी होते. एका पाहणीत असे आढळून आले आहे की, मानसीक रोगाशी संबंधीत असलेल्या बंद्यांना ग्रेन्डोन कारागृहात पाठविण्यात आले होते. येथील २६ टक्के बंदी मनोरुग्ण म्हणून घोषीत करण्यात आले होते. ही संख्या १९९७ च्या तूलनेत यु. के. मधील तुरुंगापेक्षा सर्वात जास्त होती. ग्रेन्डोनमध्ये अपंगत्व किंवा मनोरुग्ण या तत्वावर भर देण्यात येत असे. कुलेन यांच्या मताप्रमाणे ग्रेन्डोनमधील बंद्यांमध्ये सुधारणा आणि बदल होताना दिसतो. ज्यांना जन्मठेपेची शिक्षा झाली आहे. अशा बंद्यांची चाचणी आग्रक्रमाणे करण्यात येते. यातून त्याच्यात बदल होत असत. [१४] (Iain Crow. 2001)

❖ **२००१ :** आफ्रीकेमधील कारागृहांच्या परीस्थिती संदर्भात Center For The Study Of Violence And Reconciliation सप्टेंबर २००१ मध्ये अहवाल प्रसिध्द केला. यात त्यांनी केनीया आणि युगांडा यंथील कारागृहा संदर्भात पूढील विवेचन केले आहे. केनिया या देशात मानव अधिकारांचे उल्लंघन व भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणावर होतो. त्यामुळे १९९० मध्ये अंतरराष्ट्रीय समुदायाकडुन विविध आर्थीक प्रबंध लादले होते. आर्थीक मदत मिळत रहावी यासाठी त्यांनी विविध उपाय योजना लागु केल्या. मानव अधिकारांच्या इ. स. २००० च्या अहवालानुसार ७८ कारागृहात ४१,२११ बंदी आहेत. केनियातील

१३) Maharashtra Abandoned Prisons - A Study Of Sub Jails - Swati Mehta - २०१०

१४) The Treatment And Rehabilitation Of Offenders - Iain Crow

करागृहे म्हणजे मृत्युंशया असे मानले जाते. कारागृहातील वातावरण, अन्न, वस्त्र यांचा तुटवडा आहे. यासाठी तेथील आर्थीक परीस्थिती जबाबदार आहे. इ. स. २००० मध्ये रेशन खरेदी ५० टक्के कपात केली. यावरुण यातील भयानकता आपणास लक्षात येते. शोषण आणि वाईट वागणूक व्यापक प्रमाणात शिस्तीच्या नावाखाली वापरण्यात येते. शिक्षा पूर्ण भोगलेल्या एका व्यक्तीने सांगीतले की, कारागृहात बंद्यांमध्ये एच. आय. व्ही. / एड्स पसरविण्याचा पूर्ण प्रयत्न प्रशासनाकडुन होतो. कारागृहातून पळून जाण्याच्या प्रयत्नात असणाऱ्यांना गोळ्या घालण्यात आल्या आहेत. प्रसंगी डोळे देखील काढून घेण्यात आले आहेत. केनियन संसदेने नुक्तीच मृत्युदंडाची शिक्षा पुन्हा : आमलात आणली तरी देखील १९८७ पासून कोणत्याच बंद्याला ती दिली गेली नाही.

स्वयंसेवी संस्था आणि आंतरराष्ट्रीय समूदायातील समित्यांना सुरक्षेच्या कारणावरुण कारागृहात भेटी नाकारण्यात येतात.कारागृह व्यवस्थापणाचा मुळ उद्देश बंद्यांचे पूनर्वसन करणे हा आहे. यात बंद्यांना विविध उद्योगांचे प्रशिक्षण, समुपदेशन यांचा आंतरभाव होतो. यातून बंद्याला स्वावलंबी बनविणे हा महत्वपूर्ण उद्देश असतो. पण यासाठी कारागृह प्रशासनाने सहकार्य करणे आवश्यक असते.

**युगांडा :** युगांडामध्ये केंद्र सरकाचे आणि स्थानीय प्रशासनाचे असे दोन प्रकारचे कारागृहे कार्यरत आहेत. युगांडामधील कारागृहातील बंद्यांची संख्याही क्षमतेपेक्षा अधिक आहे. कारागृहातील परीस्थिती ही अतिशय बिकट असून आहार, आरोग्य याबाबत योग्य ती काळजी घेतली जात नाही. परिणामी बंद्यांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होतो. बंद्यावर अत्याचाराचे प्रमाणही अधिक असून बंद्यांना मारण्यासाठी प्रसंगी लोखंडी साहित्याचाही वापर केला जातो. अशी परीस्थिती कारागृहाची जाणवते. [१५] (Amanda Dissel. 2001)

❖ **२००२ :** अफगाणीस्थान मधील करागृहे व बंद्यांची परीस्थिती संदर्भात लेन अमोवेटीझ, जीनी फेर, लिलिंग जॉन हिफरनन यांनी अभ्यास करुन अहवाल प्रसिध्द केला त्यात त्यांनी केलेल्या अभ्यासावरुण असे निदर्षनास आले की, मानवाधिकार तज्ज्ञांच्या अहवालात असे नमुद करण्यात आले की, शेबरगन येथील बंद्यांच्या परीस्थिती बाबत आंतरराष्ट्रीय मानकांचे उल्लंघन मोठ्या प्रमाणात होत आहे. येथील सोई सुविधा विशेष : अपूरा व निकृष्ठ दर्जाचा आहार, अस्वच्छ पिण्याचे पाणी, पुरेशा शौचालयाचा आभाव, अपूरे कपडे, आरोग्य सुविधांचा अभाव मोठ्या प्रमाणावर दिसून येतो. अपुऱ्या सुविधांमुळे कारागृहात रोगराई पसरण्याची संभावना अधिक असते.

प्रत्येक बॅरेक्स हे अठरा खोल्यांची आहे. प्रत्येक खोलीत १० ते १५ बंदी राहू शकतात परंतू प्रत्यक्षा त्यांची संख्या ८० ते ११० एवढी आहे. बंद्यांना मिळणारी वैद्यकीय मदत ही औषधांच्या अपूऱ्या

---

१५) Prison Condition In Africa - By Amanda Dissel.

पुरवठ्यामुळे दिली जात नाही त्यामुळे कावीळ, हगवण अशा रोगांची साथ पसरते. यात बरेच बंदी उपचारा अभावी मरण पावतात. कारागृह प्रशासनाने औषधी, जीवण आवश्यक साहित्याबाबत वेळोवेळी मागणी करुनही त्याकडे दुर्लक्ष केले जाते. अफगाणीस्थान येथील कारागृहाचे नियंत्रण करण्याचे कार्य अमेरीकन लष्कराकडे आहे. बंद्यांनी वैद्यकीय सुविधा व पुरेशा कपड्यांची अपेक्षा व्यक्त केली. बऱ्याच बंद्यांना कावीळ व पोटाचे विकार दिसून आले तसेच थंडीमुळे अनेक बंदी गृस्त असून त्यांना पुरशे कपडे नाही त्यामुळे त्यांना श्वसनाचे आजार, शरीरावर खाज येणे, पाय हमेशा थंड राहणे अशा विविध आजारांनी त्रस्त आहे. बंद्यांना ज्या ठिकाणी ठेवले जाते तेथील जागा ही अस्वच्छ असून घाणेरडे कपडे यामुळे संसर्गजन्य रोग मोठ्या प्रमाणात पसरतात. करागृहात बंद्यांना अन्न हे पौष्टीक असावेत, त्यांना पुरेसे कपडे, राहण्याच्या ठिकाणची स्वच्छता असावी. वेळोवेळी वैद्यकीय मदत पुरवावी. मानवतावादी दृष्टीकोनातून ज्या ज्या सुविधा बंद्यांना देता येतील त्या द्याव्यात असे सांगितले. [१६] (Report By Physician For Human Rights. 2002.)

❖ **२००२ :** न्युयॉर्क मधील कारागृहातील सुधारणा संदर्भात करेक्शनल असोशिएशन ऑफ न्युयॉर्कच्या कारागृह समितीने प्रत्यक्ष पाहणी करुन येथील कारागृहाची परीस्थिती सविस्तर नमुद करुन काही शिफारशी केल्या त्या संबंधीचा अहवाल जून २००२ मध्ये प्रसिध्द झाला. समिती सदस्यांनी कारागृहाची प्रत्यक्ष पाहणी करुन व कारागृहातील अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, शिक्षक, बंदी यांच्याशी संवाद साधला. संपूर्ण न्युयॉर्क राज्यात ७० कारागृहे कार्यरत आहेत मार्च २००२ मध्ये या कारागृहात ६७, ११४ बंदी होते त्यात ९५ टक्के बंदी पुरुष होते. त्यांतील ८० टक्के कृष्णवर्णीय होते. १४ टक्के महिला व ५ टक्के पुरुष बंदी यांना एच. आय. व्ही. ची लागवण झाली आहे. २३ टक्के महिला व १४ टक्के पुरुष बंदी यांना कावीळ या रोगाने बाधित आहेत. ११ टक्के बंदी हे मानसीक आजाराने गृस्त आहेत. ५० टक्के पेक्षा अधिक बंद्यांचे शिक्षण हे अल्प म्हणजे शालेय शिक्षण झालेले आहे.

कारागृहात बंद्यांसाठी होणाऱ्या कार्यक्रमात अनियमितता असून त्याचा विपरीत परिणाम बंद्यांच्या वर्तनावर होतो. औषधांचा तुटवडा, व्यवसायीक व शैक्षणिक कार्यक्रमाची कमतरता यामुळे बंद्यांमध्ये अकार्यक्षमता निर्माण होऊन ते हिसंक बनतात. १९९१ ते १९९८ या कालावधीत राज्याने अनेक कार्यक्रम रद्द केले याचा परिणाम म्हणून बंद्यांच्या संख्येत वाढ झाली. बंद्यांना मिळणारे अन्न पुरसे नाही. त्यांच्यांसोबत अमानवीय वर्तन कारागृह कर्मचारी करतात. बंद्यामध्ये व्यसनाधींनतेचे प्रमाण अधिक आहे. बंद्यांना आरोग्य विषयक समस्या मोठ्या प्रमाणात आहे. बंद्यांच्या मानसीक आरोग्याचा प्रश्न गंभीर आहे.

---

१६) A Report On Condition At Shabarghan Prison, Northern Afghanistan - 2002.

कारागृहातील परीस्थितीचे प्रत्यक्ष पाहणीतून वरील माहिती पुढे आली. यावरुण काही शिफारशीही केल्या त्यात बंद्यांना कमीत कमी कालवधीची शिक्षा द्यावी. बंद्यांना आरोग्य सुविधा पुरविणे, वय वर्षे ५५ असलेल्याबंद्यांना पॅरोलवर सोडणे, पॅरोलचा जास्तीत जास्त वापर करणे. बंद्यांसाठी व्यवसायीक प्रशिक्षण कार्यक्रमात वाढ करणे. बंद्यांसाठी विषेश शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन करणे. बंद्यांमधील व्यसनाधिनता कमी करण्यासाठी प्रयत्न करणे. बंद्यांना पुरेसे अन्न द्यावेत. व्यायमाची साधने उपलब्ध करुन द्यावेत. जे बंदी मानसीक आजाराने पिढीत आहे त्यांना स्वतंत्र ठेवून मनोचिकित्सकामार्फत उपचार करावेत. कारागृह कर्मचाऱ्यांनी मानवतावादी दृष्टीकोनातून वर्तन करावेत. बंद्यांच्या आरोग्याबाबत विषेश लक्ष द्यावेत. कारागृह कर्मचाऱ्यांचे मनोबल वाढविण्यासाठी त्यांना विविध प्रशिक्षण, वेतन वाढ, विमा, घर, अशा सुविधा द्याव्यात. कारागृहात जवळपास ८५ टक्के बंदी हे कृष्णवर्णीय आहेत व ९५ टक्के कर्मचारी हे गोरे आहेत. हे कर्मचारी कृष्णवर्णीय बंद्यांसोबत मानवीय दृष्टीकोनातून वर्तन करत नाहीत. त्यामुळे कर्मचाऱ्यांत सर्व वर्णानांच्या लोकांचासमावेश करावा. अशा अनेक महत्त्वपूर्ण शिफारशी केल्या. [१७] (A Report By Prison Visiting Committee Of The Correctional Association Of New York. 2002)

❖ **२००३ :** रशियन कारागृहातील बंद्यांबाबत गुन्हे शास्त्रज्ञ लेन कोण कोयर बेरे यांनी आपल्या 'सोव्हिएत रशिया फाईट क्राईम' पुस्तकात पुढील माहिती दिली आहे. कारागृहात बंद्यांना शिक्षण देण्यावर अधिक भर दिला जातो. बंद्यांना विविध प्रशिक्षण देऊन त्यांना कामाचा मोबदलाही दिला जातो. त्यांना मजूरी दिल्याने त्यांच्या कुटुंबाची उपासमार होत नाही. बंद्यांना मिळणाऱ्या एकूण मजूरीपैकी २/३ मजूरी नगदी दिली जाते त्यामुळे बंदी पैसे घरी पाठवितात. तसेच १/३ रक्कम त्यांची सुटका झाल्यावर घरी जाताना दिली जाते. कारागृहात बंद्यांना राहण्याची उत्तम व्यवस्था, मनोरंजनाची साधने, धार्मीक प्रवचने आदींची व्यवस्था करण्यात येते. बंद्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी एका समितीची स्थापणा करुण सर्वांच्या सहकार्याने बंद्यांच्या अडचणी सोडविल्या जातात. आदी सुविधा बंद्यांना दिल्या जातात असे लेन कोण कोयर बेर यांनी मांडले आहे. [१८] (Dr. N.V. Paranjape. 2003.)

वरील सर्व अभ्यासातून जाणवते की, कारागृहांबाबत वैश्वीक पातळीवर उदासीनता आहे. त्यामुळे

१७) State Of ThePrisons - Conditions Of Confinement In 25 New York Correctional Facilities.

१८) Criminology And Penology - Dr. N.V. Paranjape

कारागृहांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. भारतात स्वांतत्र्यानंतर तुरुंग सुधारण्यासाठी वॉल्टर रेक्लेस यांनी केलेल्या सूचना आणि वेळोवेळी नेमलेल्या समित्या आणि त्यांनी दिलेले अहवाल त्यांचे प्रत्यक्ष पालन होत नाही असे जाणवते . सुधारणा आणी पुनर्वसन या पध्दतीने मार्गक्रमण करणाऱ्या तुरुंगापूढे दिल्ली येथील तिहार कारागृहाच्या प्रमुख किरण बेदी यांनी तयार केलेला आदर्श नमुना यातून आदर्श घेवून कारागृहाची आजची परिस्थिती काय आहे ? वेळोवेळी केलेल्या सूचनांचे पालन होते काय ? . कारागृहात बंद्यांना सुधारण्यासाठी काय प्रयत्न केल ? कारागृहात बंद्यांना सुधारण्यासाठी काय प्रयत्न केले जातात , त्यांना योग्य प्रकारची वागणूक दिली जाते काय ? त्यांना शिक्षण, प्रशिक्षण दिले जाते काय ? आरोग्यविषयक सुविधा, मनोरंजनासाठी काय साधने आहेत. बंद्यांमध्ये मानसिक परिवर्तनासाठी धार्मिक कार्यक्रम, योगा ध्यानसाधणा ,प्रार्थना इ. घेतले जातात काय ? बंदी सुधारण्यांत प्रशासनाचा प्रत्यक्ष सहभाग आहे काय ? या विविध प्रश्नांच्या उत्सुकतेपोटीच कारागृहातील बंद्यांचा अभ्यास या विषयावर संशोधन करण्याचे ठरवले.

## २.३ संशोधनाचे उद्देश :-

संशोधन प्रक्रियेत संशोधन उद्देशांना अनन्यसाधारण महत्त्व असते. संशोधनाचा विषय निश्चित झाल्यानंतर संशोधक संशोधनाचे उद्देश निश्चित करतो. कारण उद्देश हे संशोधकाला मार्गदर्शक ठरतात. संशोधन विषयाला अनेक बाजू, अनेक पैलू असतात पण संशोधकाला संशोधन विषयाच्या कोणत्या बाजूचा, पैलुंचा अभ्यास करावयाचा आहे याची निश्चिती करणे गरजेचे असते. त्यासाठी उद्देश स्पष्ट करावे लागतात. त्यामुळे नेमका कशाचा अभ्यास केला जाणार आहे हे निश्चित होते. त्याकरिता पुढील उद्देशांची मांडणी करण्यात आली आहे.

१) बंद्याच्या वैयक्तिक, कौटुंबीक, सामाजिक, आर्थिक राजकीय, मानसिक परिस्थितीचा अभ्यास करणे.

२) बंद्यांच्या गुन्ह्याविषयक किंवा केलेल्या अपराधाविषयी अध्ययन करणे.

३) कारागृहाच्या रचनेचा अभ्यास करणे.

४) कारागृहातील बंद्यांना दिल्या जाणाऱ्या सुविधांचा अभ्यास करणे.

५) बंद्यांमध्ये होणाऱ्या परिवर्तनांचा अभ्यास करणे.

## २.४ संशोधनाची गृहीत कृत्ये :-

संशोधन प्रक्रियेत संशोधन उद्देशांप्रमाणेच गृहीत कृत्यांचे स्थानही अत्यंत महत्त्वपुर्ण असते. गृहित कृत्येसुध्दा संशोधकाला दिशादर्शन करण्याचे कार्य करतात. संशोधकाला संशोधन विषयाच्या निवडीनंतर

त्याला त्या विषया संबंधीच्या पूर्व ज्ञानाच्या आधारे गृहीत कृत्यांची मांडणी संशोधक करत असतो. ज्यामुळे संशोधनाची एक निश्चित दिशा ठरत असते. त्या करिता प्रस्तुत संशोधनात संशोधकाने पुढील गृहीत कृत्यांची मांडणी केली आहे.

१) गुन्हेगार जन्मजात नसून परिस्थितीने बनतात.

२) कारागृहात सुधारणात्मक सुविधांचा अभाव जाणवतो.

३) कारागृहात क्षमतेपेक्षा अधिक बंदी ठेवले जातात.

४) बंद्यांकडे मानवतावादी दृष्टिकोनातून पाहिले जात नाही किंवा तशा आदेशांचे पालन केले जात नाही व त्यांच्याकडून अतिश्रम करुन घेतले जाते.

५) कुटुंब, समाज यापासून दूर राहिल्याने त्यांच्या मनात विफलतेची भावना निर्माण होते.

## २.५ संशोधनाचा आराखडा :-

संशोधन ही एक प्रकिया आहे. संशोधनामध्ये शास्त्रीय पध्दतींचा वापर करताना संशोधकास अनेक टप्प्यातून जावे लागते. संशोधनात शास्त्रीय पध्दतींचा वापर केल्याने त्या संशोधनातून काढलेले निष्कर्ष दीर्घकाळ टिकणारे असतात. म्हणून आज नैसर्गिक शास्त्राप्रमाणेच सामाजिक शास्त्रांतसुध्दा शास्त्रीय पध्दतीचा वापर करुन निष्कर्ष काढणे अनिवार्य झाले आहे. कारण त्यावरुनच संशोधनाचा दर्जा उंचावतो किंबहुना त्यातुन मांडलेले सिध्दांत विश्वसनीय आणि दीर्घकाळ टिकणारे असतात.

शास्त्रीय संशोधन पध्दतीत अनेक टप्पे आहेत. या पायऱ्यांआधारे संशोधन करणे म्हणजे ती एक प्रक्रिया होय असे जाणवते. शास्त्रीय संशोधन पध्दतीत ज्या अनेक पायऱ्या आहेत. त्यात विषयाची निवड करणे, त्या संबंधीचे उद्देश, गृहीत कृत्यांची मांडणी करणे, त्यासंबंधीच्या तथ्यांचे संकलन करणे त्यांचे वर्गीकरण आणि विश्लेषण करणे, शेवटी निष्कर्ष, अहवाल लिखाण अशा अनेक अवस्थांमधून संशोधकाला जावे लागते. संशोधनाची प्रक्रिया व्यवस्थितपणे पूर्ण करण्यासाठी (उदा. घर बांधणे, व्यवसाय,धंदा इ) त्या कार्याचे नियोजन, नियोजनाचा आराखडा असावा लागतो. त्याचप्रमाणे संशोधनाचे कार्य करण्यासाठी सुध्दा नियोजनाचा, संशोधनाचा आराखडा असणे गरजेचे असते. संशोधनाच्या आराखड्यामुळे संशोधन कार्यात सुसूत्रता येते. आराखड्यामुळे संशोधकास संशोधन करण्यासाठी लागणारा वेळ,पैसा,श्रम,शक्ती इत्यादींचा अनावश्यक वापर होत नाही.

### ❖ संशोधन आराखडा म्हणजे काय ?

सामान्य भाषेत संशोधनासंबंधीचे नियोजन किंवा संशोधनासंबंधीची पूर्व योजना म्हणजे संशोधनाचा आराखडा होय किंवा संशोधनासंबंधीच्या रूपरेषेला संशोधन आराखडा असे म्हणतात.

**व्याख्या :-**

**१) सेल्टीस जहोदा डबारईश आणि कुक :-**

"संशोधनाचा आराखडा म्हणजे तथ्ये जमविणे व त्यांचे तर्कशुध्द विश्लेषण करणे यासाठी आखलेली योजना होय. ज्या योजनेमुळे संशोधनाचा हेतू साध्य होण्यासाठी केलेला प्रकियेत वेळ, पैसा व श्रम यांची बचत होते."

**२) रसेल एकॉफ :-**

"संशोधनाचे कार्य प्रत्यक्ष करण्यापूर्वीच त्या संबंधीचे निर्णय घेण्याची प्रक्रिया म्हणजे संशोधन आराखडा होय."

**३) एफ.एन. कार्लिजर :-**

"संशोधन प्रश्नांची उत्तरे मिळवण्यासाठी व विचारावर नियंत्रण ठेवण्यासाठी संशोधनाची योजना, रचना आणि संशोधनाचा व्यूह तयार करणे म्हणजे संशोधन आराखडा होय. " [१३] (डॉ. प्रदीप आगलावे. २०००)

संशोधन आराखड्याच्या वरील व्याख्यांवरुन संशोधन आराखड्याचे स्वरूप स्पष्ट होते. संशोधनाची कार्य योजना बनवणे किंवा संशोधनाचे नियोजन करणे म्हणजे संशोधनाचा आराखडा होय. संशोधन आराखडा हा पूर्व नियोजित आणि हेतूपुर्वक तयार करावा लागतो. म्हणुनच संशोधन आराखडा हा पुढील सर्व संशोधन कार्यांचा आधार असतो. संशोधन कार्यात संशोधन आराखाड्याला अनन्य साधारण महत्त्व आहे. संशोधन आराखडा हा संशोधनाचा आत्मा मानला जातो. तो संशोधकाला मार्गदर्शन करतो.

## ❖ संशोधन आराखड्यांचे प्रकार :-

संशोधन प्रक्रियेत संशोधन आराखड्यांचे अनन्य साधारण महत्त्व पाहिल्यानंतर संशोधन आराखड्यांच्या प्रकारासंबंधी माहिती पुढीलप्रमाणे. संशोधन आराखड्यांचे प्रामुख्याने चार प्रकार पडतात. संशोधकाच्या संशोधन उद्देशांनुसार संशोधनाचा आराखडा प्रकार ठरतो.

१) अन्वेषणात्मक / परिचयात्मक संशोधन आराखडा
२) निदानात्मक संशोधन आराखडा
३) वर्णनात्मक संशोधन आराखडा
४) प्रयोगात्मक संशोधन आराखडा

---

१३) .सामाजिक संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे - डॉ. प्रदीप आगलावे - पृष्ठ क्र. १४४

**१) अन्वेषणात्मक/परिचयात्मक संशोधन आराखडा**

जेव्हा एखाद्या संशोधन कार्याचा उद्देश सामाजिक घटनेमध्ये अंतर्भूत असणा-या कारणांचा शोध घेणे हा असतो तेंव्हा अशा संशोधनासाठी तयार केल्या जाणा-या आराखड्याला अन्वेषणात्मक किंवा परिचयात्मक आराखडा असे म्हणतात. या संशोधन आराखड्याच्या आधारे संशोधक अज्ञात तथ्यांचा शोध घेऊन त्या संदर्भात विस्तृत ज्ञानाचा शोध घेतला जातो.

अन्वेषणात्मक संशोधन आराखड्याच्या संदर्भात सेल्टीज, जहोडा असे सांगतात की, "अधिक निश्चित अशा संशोधनाच्या हेतूने संबंधित गृहीत कृत्यांच्या निर्मितीमध्ये सहायक ठरतील अशा अनुभवांना प्राप्त करण्यासाठी अन्वेषणात्मक संशोधन आवश्यक आहे."तसेच अन्वेषणात्मक अध्ययने शास्त्रीय प्राथमिक स्थितीचे प्रतिनिधित्व करणारी असतात. अन्वेषणात्मक अध्ययन अधिक परिणामकारक ठरण्यासाठी त्या विषयासंबंधीचे ज्ञान मिळणे आवश्यक असते. त्या करिता ते ज्ञान कोढून आणि कोणत्या पध्दतीने मिळेल याचा विचार केला जातो. सेल्टीज, जहोडा यांनी अन्वेषणात्मक अध्ययनासाठी आवश्यक ते ज्ञान उपलब्ध व्हावे म्हणून माहिती संकलित करण्यासाठी पुढील काही गोष्टींची आवश्यकता सांगितली आहे.

**अ) साहित्याचे सर्वेक्षण :-** संशोधनापूर्वी संशोधकास विषयाची निवड केल्यानंतर त्या संबंधित साहित्याचा शोध पुस्तके मासिके, अहवाल, वर्तमानपत्रे, इंटरनेट या वरून घ्यावा लागतो.

**ब) अनुभवांचे सर्वेक्षण :-** एखाद्या विषयासंबंधी समाजात अशा काही तज्ज्ञ व्यक्ती असतात त्या तज्ज्ञ व्यक्ती त्यांचे ज्ञान लिखित स्वरुपात नसेल तर सशोधक आपला विषयाशी निगडित तज्ज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन घेउन संशोधनासाठी उपयोग करू शकतो.

**क) अंतर्दृष्टी प्रेरणा देणा-या घटकांचे विश्लेषण :-** संशोधन विषयाशी संबंधित असे अनेक विषय असतात की, त्यांचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष संबंध हा त्या विषयाशी असतो. अशा विषयाच्या अध्ययनातून संशोधनकर्त्यांची अंतर्दृष्टी विकसित होते. अध्ययन विषयाच्या संबंधात व्यावहारिक अंतर्दृष्टीचा विकास होऊ शकतो. प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात काही आकर्षक काही अत्यंत सरळ व स्पष्ट काही व्यक्तिगत विशिष्ट गुणासंबंधी घटना घडत असतात. या घटना अंतर्दृष्टीस प्रोत्साहित करण्यास विशेष सहायक ठरतात. व्यक्ती व समाज त्यांच्या बाबत परस्पर संबंधांच्या अनेक अंतर्दृष्टीचा संबंध त्या संबंधी सखोल अध्ययनाशी आहे. सुप्रसिध्द मानसशास्त्रज्ञ **सिग्मण फ्रॉईड** यांना मानसिक रुग्णांच्या अध्ययनावरुन आंतरदृष्टी प्राप्त झाली होती. त्या अंतर्दृष्ट्यांमूळे त्यांना अनेक सैध्दांतिक कल्पना सुचल्या होत्या.

**२ वर्णनात्मक संशोधनाचा आराखडा**

एखादी व्यक्ती, समूह, समाज, घटना किंवा कोणत्याही विषय वा समस्यांच्या वास्तविक तथ्यांचे वैशिष्ट्यांचे वर्णनात्मक विवेचन करणे हा वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा मुख्य उद्देश आहे. त्यासाठी विषयाच्या संदर्भात संपूर्ण माहिती प्राप्त होणे आवश्यक आहे. कारण त्या शिवाय अध्ययन विषय किंवा समस्यांच्या संदर्भात आपण कोणतेही वर्णनात्मक विर्वेचन प्रस्तुत केल्यास ते विवेचन वैज्ञानिक राहणार नाही. वैज्ञानिक विवेचनाचा आधार वास्तविक आणि विश्वसनीय तथ्य आहे.

वैज्ञानिक पध्दतीने संकलित केलेल्या तथ्यांच्या आधारे वर्णनात्मक विश्लेषण म्हणजे वर्णनात्मक संशोधन आराखडा होय. वर्णनात्मक संशोधन आराखड्याात तथ्य संकलनासाठी वैज्ञानिक तंत्राचा उपयोग करुन वस्तुनिष्ठ तथ्ये संकलित केली जातात. वर्णनात्मक संशोधन आराखड्यात मुलाखत प्रश्नावली, निरीक्षण, रेकॉर्ड इ तथ्य संकलनाच्या तंज्ञांचा वापर केला जातो. वर्णनात्मक संशोधन आराखड्यासाठी आवश्यक गोष्टी पुढीलप्रमाणे १) अध्ययन विषयाची विचारपूर्वक निवड, २) तथ्य संकलनासाठी योग्य तंत्राची निवड ३) वस्तुनिष्ठता बाळगणे ४) संतुलित दृष्टिकोन वेगवेगळ्या स्वरूपाच्या समस्यांकरिता वेगवेगळे संशोधन आराखडे वापरावे लागतात. कारण संशोधनाच्या उद्दिष्टानुसार संशोधन आराखड्याची निवड केली जाते. ज्या संशोधनाचा उद्देश वर्णन करणे हा आहे अशा संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन आराखडा वापरला जातो.

आधुनिक काळात देशात अनेक विकासाच्या योजना आणि कल्याणाची धोरणे राबविली जातात. कोणत्याही विकासाच्या योजना किंवा धोरणे राबवण्यासाठी लोकांच्या समस्या, त्यांची वैशिष्ट्ये, स्वरुप इ. विषयाचा माहिती आवश्यक असते . कारण लोकांची शासकीय धोरणांविषयीची कोणती मते आहेत हे जाणून घेणे अतिशय आवश्यक आहे. लोकांची वैशिष्ट्ये, समस्यांविषयी त्यांचा दृष्टिकोन, त्यांची मते इ. गोष्टींची माहिती शासनाला असेल तर त्या नुसार धोरणांची योग्य प्रकारे अम्मलबजावणी होउन त्याचा लोकांना फायदा मिळेल. त्यामुळे वर्णनात्मक अध्ययनातूनच लोकांविषयी माहिती प्राप्त होत असते. म्हणून विकासाच्या योजना व धोरणांची योग्य अम्मलबजावणी करण्याच्या दृष्टीने वर्णनात्मक अध्ययनाचे विशेष महत्त्व आहे.

**३ निदानात्मक संशोधन आराखडा -**

संशोधनाचा उद्देश हा ज्ञानाची प्राप्ती करणे हा असतो. एखाद्या समस्येच्या कारणांसंबंधी वास्तविक ज्ञान प्राप्त करुन त्या समस्येच्या निराकरणासाठी त्याचा उपयोग करणे हा देखील संशोधनाचा हेतू असतो.

विशिष्ट सामाजिक समस्येच्या निदानांचा शोध घेण्यासाठीच्या संशोधन कार्यास निदानात्मक संशोधन असे म्हणतात. अशा प्रकारच्या संशोधनातून त्या विशिष्ट समस्येचे निराकरण करण्याच्या दृष्टीने उपाय सुचवले जातात.संशोधक वैज्ञानिक पध्दतीव्दारे समस्यांची कारणे जाणून घेऊन ती समस्या कोणत्या प्रकारे सोडवता येईल याचा शोध संशोधन घेतो. निदानात्मक संशोधनामध्ये समस्येचे संपूर्ण आणि विस्तृत अध्ययन वैज्ञानिक पध्दतीने करुण समस्येच्या मुळाशी जाण्याचा प्रयत्न करतो. ज्यामुळे समस्येच्या प्रत्येक संभाव्य कारणांचा शोध घेता येईल. अशा प्रकारे कोणत्याही समस्येच्या कारणाचे ज्ञान महत्त्वाचे आहे. त्यानंतरच त्यासमस्येच्या निदानाचा शोध घेता येईल. ज्या वेळी एखाद्या समस्येचे त्वरित निराकरण करावयाचे असते तेंव्हा त्या समस्येचा संभाव्य उपाय लक्षात घऊनच गृहीत कृत्यांची निर्मिती केली जाते.

निदानात्मक संशोधन आराखड्याची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत.

१) निदानात्मक संशोधनाची पहिली पायरी म्हणजे गृहीत कृत्यांची निर्मिती करणे, त्यानंतर त्या आधारावर अध्ययन करणे.

२) निदानात्मक संशोधन कार्याची आवश्यकता, सामाजिक व्यवस्था व सामाजिक संबंधांपासून निर्माण होणा-या समस्या त्वरित दूर करणे.

३) निदानात्मक संशोधन कोणत्या विशिष्ट सामाजिक समस्येच्या निदानाच्या शोधाशी संबंधीत असते.केवळ शुध्दज्ञान प्राप्त करणे एवढाच उद्देश या संशोधनाचा नसतो. तर समस्येच्या उपाय योजनांचा शोध घेणे हा देखील असतो.

४) निदानात्मक अध्ययनात संशोधक समस्यांविषयी उपाय योजना शोधतो. परंतू समस्या सोडवणे त्याचे कार्य नाही. संशोधक समस्येवर उपाय सुचवितो. या उपयाची अंमलबजावणी शासन, समाज सुधारक व निमशासकीय संस्था करीत असतात.

**४ प्रयोगात्मक संशोधन आराखडा -**

नैसर्गिक शास्त्रांमध्ये प्रयोगशाळेत प्रयोग करून संशोधने केली जातात. नैसर्गिक शास्त्राप्रमाणेच सामाजिक शास्त्रांत देखील संशोधन कार्यात निरीक्षण परीक्षणाचा म्हणजे प्रयोगाचा उपयोग करुन त्याला विश्वसनीयता प्राप्त करण्याचा प्रयत्न केला जातो. नैसर्गिकशास्त्रांत निश्चित अशा नियंत्रित अवस्था निर्माण करुन संशोधने केली जातात. त्याच प्रकारे समाजिक शास्त्रांतसुध्दा अध्ययन केले जाते. अशा प्रकारे नियंत्रित स्थितीत निरीक्षण परीक्षणाव्दारे केल्या जाणा-या सामजिक घटनांच्या पध्दतशीर अभ्यासाला

प्रयोगात्मक किंवा परीक्षणात्मक संशोधन असे म्हणतात. या संदर्भात **स्टुअर्ट चॅपिन** सांगतात की, "समाजशास्त्रीय संशोधनात प्रयोगात्मक आराखड्याची संकल्पना ही नियंत्रणाच्या अवस्था अंतर्गत निरीक्षणाव्दारा मानवीय संबंधांच्या व्यवस्थित अध्ययनाकडे संकेत करते, " विज्ञान किंवा शास्त्रामध्ये प्रयोग केले जातात. प्रयोग या शब्दाचा अर्थ स्पष्ट करताना शास्त्रज्ञ म्हणतात की, " नियंत्रीत आवस्थेत केलेले निरीक्षण म्हणजे प्रयोग होय." चॅपीन यांनी देखील प्रयोग किंवा परिक्षणाच्या संबंधात नियंत्रित अवस्थेचा उल्लेख केला आहे. थोडक्यात असे म्हणता येईल की, प्रयोगशाळा पध्दतीव्दारे नियंत्रित अवस्थेतील निरीक्षण विषयाचे अध्ययन म्हणजेच प्रयोगात्मक संशोधन होय. नियंत्रित स्थितीत संशोधक गृहीत कृत्यांची यथार्थता तपासून पाहतो. नियंत्रित अवस्था म्हणजे जोपर्यंत प्रयोग चालू आहे तो पर्यंत त्या स्थितीत कोणताही बदल होऊ न देणे तीच स्थिती कायम ठेवून प्रयोग करणे होय. वरील चार प्रकार संशोधन आराखड्याचे पडतात.

**अन्वेषणात्मक/परिचयात्मक संशोधन आराखडा व निदानात्मक संशोधन आराखडा-** संशोधकाने मध्यवर्ती कारागृहातील बंद्यांचा अभ्यास केला असून कारागृहात शिक्षा भोगणाऱ्या बंद्यांची वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक,आर्थिक, मानसिक, आरोग्यविषयक, केलेल्या अपराधांसंबंधी, कारागृहात त्यांना मिळणाऱ्या सुविधा, बंद्यांमध्ये केले जाणारे परिवर्तन करणारे कार्यक्रम, कारागृह रचना यांचा अभ्यास करणे हे प्रमुख उद्देश होते.

संशोधकाने वरील उद्देश साध्य करत असताना कारागृह व्यवस्था, कारागृहातील कैदी, त्यांना दिल्या जाणाऱ्या सुविधा यांचा अभ्यास असल्याने आणि बंद्यांनी अपराध का केला यामागची कारणे शोधुन त्यांचे कशा प्रकारे पुनर्सामाजिकरण करावे या उद्देशाने संशोधन केले आहे. मध्यवर्ती कारागृहातील बंद्यांवर या अगोदर संशोधन झाले नव्हते. त्या संदर्भात कारागृह प्रशासनाने संशोधन करण्यापूर्वी सांगितले. कारागृहा संदर्भात समाजात भीती दायक मानसिकता असते. कारागृहात अतिशय क्रूर वागणुक दिली जाते, जेवण चांगले दिले जात नाही, आजारी पडल्यावर औषोधोपचार वेळेवर दिले जात नाहीत, कोंदट वातावरणात राहावे लागते, सर्वांना काम मिळत नाही, बंद्यांची पिळवणूक केली जाते. पुरेसे कपडे, अंथरुण-पांघरुण मिळत नाही, त्यामुळे बंद्यांचे खूप हाल होतात अशी भीतीदायक मानसिकता सर्वसामान्य माणसाची असते. ही मानसिकता वर्तमानपत्रे, मासिके वाचून तर दुरदर्शन, चित्रपटांच्या माध्यमातून पाहुन व एकमेकांच्या तोंडून ऐकून अशी भीतीदायक मानसिकता कारागृहाबद्दल तयार झालेली असते. पण प्रत्यक्षात कारागृहातील परिस्थिती, बंद्यांना दिली जाणारी वागणूक, मिळणाऱ्या सुविधा, त्यांच्या सोबत केले जाणारे वर्तन इ. बाबत समाजात गैरसमज अधिक असून प्रत्यक्ष परिस्थिती यामध्ये तफावत आहे. त्यामुळे

संशोधकाने हर्सुल मध्यवर्ती कारागृहातील बंद्यांचा सामाजिक, आर्थिक, कौटुंबिक, मानसिक, आरोग्यविषयक, कारागृहात दिल्या जाणाऱ्या सुविधा या संदर्भात प्रथमच अभ्यास केल्याने प्रस्तुत संशोधनाचा बहुतांश भाग हा **अन्वेषणात्मक किंवा परिचायात्मक संशोधन आराखड्यात समावेश होतो.**

संशोधकाने बंद्याने अपराधाचे कृत्य का केले? त्यास कोणती कारणे जबाबदार आहेत त्याचा शोध घेऊन त्यावर कशा पध्दतीने उपाय सुचवून त्यांचे पुनर्सामाजिकरण करावे अर्थात कारागृहात बंद्यांमध्ये सुधारणा करण्यासाठी आज अनेक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. बंद्याला काम देऊन त्यांना चिंता करण्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला जातो. तसेच दिलेल्या कामाचा मोबदलाही दिला जातो. यातून काही बंदी आपल्या कुटुंबीयांना पैसे पाठवतात. जे काही सामूहिक कार्यक्रम होतात त्यामध्ये सर्वसमावेशकता असत नाही. मनोरुग्णांचे प्रमाण वाढत आहे. पण कारागृहात मनोरुग्ण चिकित्सक नाही. खेळाचे साहित्य नाही. त्यामुळे बंद्याचे मानसिक परिवर्तन होण्याऐवजी चिंता करुन मनोरुग्णांचे प्रमाण वाढत आहे त्यासाठी संशोधकाने कारागृह प्रशासनाला काही शिफारशी केल्या आहेत. कारागृह प्रशासनाने शिफारशीचे पालन केले तर बंद्यांमध्ये निश्चितच बदल होऊ शकतो. संशोधकाने अपराध्याने गुन्ह्याचे वर्तन करण्याची कारणे शोधून त्यावर काही उपायही माडण्याचा प्रयत्न केला. प्रस्तुत संशोधनाचा समावेश निदानात्मक संशोधन आराखड्यात होतो. संशोधन आराखड्यातील अन्वेषणात्मक/परिचयात्मक संशोधन आराखडा व निदानात्मक संशोधन आराखडा या दोन प्रकारांचे प्रस्तुत संशोधनात समावेश होतो.

## २.६ अध्ययनाचे क्षेत्र आणि एकक

शास्त्रीय संशोधनाच्या प्रक्रियेमधील अत्यंत महत्त्वाचा टप्पा म्हणजे अध्ययनाचे क्षेत्र व एकक होय. विषयाच्या निश्चितीनंतर संशोधक आपले संशोधन कोठे करावयाचे ? कोणाचे करावयाचे, का करावयाचे? कसे करावयाचे? असे काही प्रारंभिक प्रश्न संशोधकाच्या मनामध्ये निर्माण होतात. या प्रश्नांच्या निराकरणातून संशोधन प्रक्रिया मार्गक्रमण करत असते. वरील प्रश्नांचा शोध घेत असताना संशोधक अध्ययनाचे उद्देश, गृहीत कृत्ये यांची निर्मिती करतो. हे करीत असतांना आपणास कोणाचे आणि कोठे अध्ययन करावयाचे ? यासाठी संशोधक अध्ययन क्षेत्राची निवड करतो. प्रस्तुत संशोधनात संशोधकाने कारागृहातील पुरुष बंद्यांचे अध्ययन करण्याचे निश्चित केल्यानंतर मध्यवर्ती कारागृह, जिल्हा कारागृह, तालुका कारागृह, खुले कारागृह असे कारागृहांचे अनेक प्रकार पडतात. त्यात मध्यवर्ती करागृहात बंद्यांची संख्या अधिक असते. औरंगाबाद हे महाराष्ट्राच्या मध्यवर्ती ठिकाणी असल्याने महाराष्ट्र कारागृह विभागाचे **मध्य विभाग** कारागृह उपमहानिरीक्षणालय असून एक मध्यवर्ती कारागृह सुध्दा आहे.

मराठवाड्यात एकूण आठ जिल्हे असून फक्त औरंगाबाद येथेच मध्यवर्ती कारागृह आहे. या कारागृहात नाशिक, पुणे, मुंबई येथील बंद्यांनाही ठेवले जाते. तसेच सुधारणा आणि पुनवर्सन या ब्रिदवाक्याप्रमाणे काम करत असताना या मध्यवर्ती कारागृहासं ISO हे प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. मध्यवर्ती कारागृहात संशोधक अध्ययनासाठी जात असतांना तेथील परिस्थिती, बंद्यींना दिल्या जाणाऱ्या सुविधा, समाजापासून दूर राहिल्याने बंद्यींची झालेली मानसिक स्थिती यांचा अभ्यास करीत असतांना संशोधकाने कारागृह प्रशासनाकडे चौकशी केली की आजपर्यंत कारागृहातील बंद्यांवर कोणी संशोधन केले आहे काय? तर त्यावर नाही असे उत्तर मिळाले. फक्त एम.एस.डब्ल्यू चे आणि एल.एल.बी.चे (समाजकार्य व विधी) अध्यायनाचे विद्यार्थीच भेटी देतात असे सांगण्यात आले. आजपर्यंत या मध्यवर्ती कारागृहातील बंद्यांवर संशोधन झालेले नसल्यामुळे संशोधकाने औरंगाबाद येथील मध्यवर्ती कारागृहाची निवड अध्ययनाचे क्षेत्र म्हणून केली.

औरंगाबाद शहराचे जुने नाव खडकी असे होते. मल्लिक अंबरचा मुलगा फत्तेहा खानने खडकीला फतेहपूर असे नाव दिले. इ.स. १६३६- ४४ मध्ये औरंगजेब दक्षिणेचा सुभेदार होता. दुसऱ्यांदा  इ.स. १६५३ ते १६५८ पर्यंत पुन्हा दक्षिणेचा सुभेदार होता. त्याने फतेहपूरचे औरंगबाद असे नामांतर केले. औरंगजेबानंतर मुगल बादशाह फार प्रभावी राहिले नाहीत. मुगल सुभेदार चिनकिलीज खानने निजाम उल-मुल्क पदवी घेतली. बादशाहाशी न पटल्याने तो दक्षिणेत आला व हैदराबादच्या मुबारीज खान सुभेदाराचा पराभव केला. बादशहाने मान्यता देऊन त्यास आसफजा पदवी दिली. त्याने दक्षिणेच्या सहा सुभ्यांवर आपले वर्चस्व प्रस्थापित केले तो १७२४-४७ पर्यंत दक्षिणेचा शासक राहिला. पुढे भारताने स्वातंत्र्य मिळवले तरी हैदराबाद मुक्ति संग्रामापर्यंत निझामाच्या वारसांची सत्ता या प्रदेशावर होती.

इ.स. १६५० च्या आसपास औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह बांधल्याचा उल्लेख आहे. पुढे औरंगाबाद येथे निजाम सत्ता आल्याने हे कारागृह निजाम सत्तेच्या ताब्यात होत. १९४८ च्या पोलीस ॲक्शन वेळी भारतीय लष्कराने मध्यवर्ती कारागृह ताब्यात घेऊन निजामी स्तत्ता या ठिकाणहून संपवली आणि भारतीय संघराज्यांत हा प्रदेश सामील झाला या वेळी मराठवाडा विभाग मुंबई राज्यात समाविष्ट केला गेला. पुढे १९५६ साली राज्याची पुनर्रचना झाली. त्यामुळे प्रशासकीय कारणाने मराठवाडा विभागातील ज्युडिशियल लॉकअप तालुका स्तरावरील उपकारागृहे, विदर्भातील मॅजेस्टिरीय लॉकअप मुंबई राज्याकडे हस्तांतरित झाले. पुढे १९६० ला महाराष्टामध्ये राज्याची स्थापना झाल्यानंतर मराठवाडा विभाग महाराष्ट्र राज्यात समाविष्ट झाला. महाराष्ट्र राज्य कारागृह सांख्यिकीय विभागाने प्रसिध्द केलेल्या अहवालात औरंगाबाद येथील मध्यवर्ती कारागृहाची स्थापना १९१६ मध्ये झाल्याचा उल्लेख करण्यात आला आहे.

**एकक :-**

संशोधकाने अध्ययनासाठी मध्यवर्ती कारागृह औरंगाबाद (महाराष्ट्र) हे क्षेत्र निश्चित केल्यानंतर कोणाचे अध्ययन करावयाचे यासाठी एककाची निवड करणे आवश्यक असल्याने संशोधकाने खालीलप्रमाणे एककांची निवड केली. मध्यवर्ती कारागृहात दोन प्रकारचे कैदी राहतात.

१) अंडर ट्रायल /आरोपी (Under Trial) :- ज्यांना न्यायालयीन कोठडी दिली आहे असे आरोपी ज्यांच्यावर अजून खटला चालू असून त्यांच्यावर अद्याप गुन्हा सिध्द झाला नाही अशा बंद्यांचा अंडर ट्रायल यामध्ये समावेश होतो. त्यांना आरोपी असे म्हणतात.

२) कन्व्हिक्ट Convict :- ज्यांच्यावर न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण होऊन कोर्टाने त्यांना निश्चित कालावधीची शिक्षा दिली आहे त्यांना बंदी किंवा कन्व्हिक्ट असे म्हणतात.

वरील दोन प्रकारच्या बंद्यांना कारागृहात ठेवले जाते. संशोधकाने मध्यवर्ती कारागृहात वरील दोन्ही प्रकारच्या बंद्यांचा अभ्यासात समावेश केला नाही. कारण ज्या बंद्यांची न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण होऊन न्यायालयाने ज्यांना शिक्षा दिली आहे व जे बंदी म्हणजे Convict या संज्ञेत मोडतात. अशाच बंद्यांना अभ्यास केला. कारण विशीष्ट शिक्षा झाल्याने त्यांनी अपराध केला हे प्रथम सत्य असल्याने त्यांनी हा अपराध का, कधी, कसा, कशासाठी, किती लोकांनी ? या प्रश्नांच्या उत्तरासाठी फक्त जे बंदी आहेत ज्यांना शिक्षा झाली आहे अशाच बंद्यांचा अभ्यास संशोधकाने केला.

## २.७ नमुन्याची निवड :-

शास्त्रीय संशोधन पध्दतीमधील अत्यंत महत्त्वपूर्ण टप्पा म्हणजे नमुना निवड होय. सामाजिक शास्त्रात संशोधन होत असताना बहुतेक वेळा नमुना निवड पध्दतीचा वापर केला जातो. नमुन्यावरुन संशोधन विषयाचा निष्कर्ष काढले जातात. याचाच अर्थ् समग्रातून निवडलेल्या काही एककांच्या म्हणजेच नमुन्यांच्या अध्ययनावरुन समष्टीबाबत सामान्य स्वरूपाचे निष्कर्ष काढता येतात.

जनगणना आणि नमुना निवड या दोन पध्दतीच्या आधारावर संशोधन कार्य केले जाते. जनगणना पध्दतीमधील आपला अध्ययन विषयांशी संबंधीत मर्यादित आसणा-या संपूर्ण एककांचे अध्ययन करुन निष्कर्ष काढावे लागतात. जेथे एकक संख्या अधिक असते तेथ् वेळ श्रम,पैसा हा अधिक लागतो. त्यामुळे ही पध्दत परवडणारी नसते. जनगणना पध्दत आणि नमुना पध्दत यांच्या अध्ययनातील निष्कर्षांत फरक नसतो. त्यामुळे संशोधक नमुना निवड पध्दतीचा उपयोग करतात.

"सामाजिकशास्त्रांत सांख्यिकी नमुना चाचणीचे जनक **ए.एन. बाऊले** हे आहेत. त्यांनी १९१२ ते १३ च्या दरम्यांन ढोबळमानाने वीस कुटुंबामध्ये एक कुटुंब या प्रमाणे नमुना निवडून अशा नमुन्याच्या अध्ययनावरुन काही निष्कर्ष काढले. बाऊले यांनी हे स्पष्टीकरण दाखवून दिले की, नमुना पध्दतीमुळे वेळ, श्रम, आणि पैशाची बचत होते. तसेच वस्तुनिष्ठ आणि प्रातिनिधिक स्वरूपाचे निष्कर्ष काढले जातात. "[१४] (कित्ता)

सामाजिकशास्त्रांत अध्ययनाच्या पॅरामॅट्रिक पध्दती आणि नॉन पॅरामॅट्रिक पध्दती या दोन पध्दती आहेत. पॅरामॅट्रिक पध्दती म्हणजे ज्या व्दारे संपूर्ण समूह किंवा लोकसंख्या यांना परीक्षणाचे क्षेत्र मानून संशोधन केले जाते. तर नॉन पॅरामॅट्रिक पध्दतीमध्ये संपूर्ण लोकसंख्येमधून एका विशिष्ट प्रातिनिधिक समूहाची निवड करुन त्यांचे अध्ययन केले जाते. नॉन पॅरामॅट्रिक पध्दतीव्दारे करण्यात आलेले अध्ययन सरळ, विश्वसनीय आणि कमी खर्चाचे असते. नमुना हा नॉन पॅरामॅट्रिक पध्दतीचा आधार आहे. नमुना हा विश्व किंवा समाग्रातून निवडण्यात आलेला एक भाग असतो. विश्व किंवा समग्र हे पर्यायी शब्द आहेत. विश्व किंवा समग्रातील फक्त काही प्रातिनिधित्व एककांची निवड करणे म्हणजे नमुना निवड होय.

समग्राचे योग्य प्रतिनिधीत्व करणा-या काही एककांना नमुना म्हणतात. नमुना निवड हे संशोधनाचे असे तंत्र आहे की, ज्यामध्ये संशोधन विषयाच्या आंतर्गत समाविष्ट संपूर्ण लोकसंख्या किंवा एककामधून काळजीपूर्वक संपूर्ण वैशिष्ट्येच योग्य प्रतिनिधित्व करण्या-या एककांना निवडले जाते. नमुना निवड तंत्राचा शास्त्रीय संशोधनात नव्हे तर आपला दैनंदिन जीवनात देखील उपयोग केला जातो.


नमुना हा त्यातील नावाप्रमाणेच विस्तृत समूहाचा लघु प्रतिनिधी आहे. संशोधकाने संशोधन करताना तथ्य संकलनापूर्वी नमुना निवड करायची का नाही किंवा नमुना निवडीच्या प्रकारातील कोणत्या उपप्रकाराचा वापर करणार याची निश्चिती संशोधन करण्यापूर्वीच निश्चित करतो. प्रत्यक्ष संशोधन करताना संशोधक आपल्या अध्ययन क्षेत्रातील एकक त्यांची एकूण संख्या जास्त असेल तर सर्व घटकांचा अभ्यास करणे शक्य नसते. अशा वेळी संशोधक नमुना निवड पध्दतीचा आधार घेतो.

---

१४. कित्ता - पृष्ठ क्र. १७०

**नमुना निवडीचे प्रकार**

(Types of Sampling)




वरील विविध नमुना निवडीचे प्रकार आहेत. संशोधक आपल्या अध्ययनाचे क्षेत्र मोठे व एककांची संख्या जास्त असेल तेव्हा परिस्थितीनुसार वरील नमुना प्रकारांपैकी एखादा नमुना प्रकाराची निवड करुन त्यातील उपप्रकारांची निवड करुन नमुना निवड करतो. प्रस्तुत संशोधनात संशोधकाने संभाव्यता नमुना निवडीतील साधा यादृच्छिक नमुन्यातील कोटा नमुना निवड पध्दतीचा वापर केला आहे.

## संभाव्यता नमुना

संभाव्यता नमुना निवड पध्दतीमध्ये समग्रातील सर्व एककांच्या निवडीची संभाव्यता ही समान असते. या पध्दतीमध्ये पक्षपात होण्याची शक्यता फारच कमी असते. समग्रातील कोणत्याही एककाचा नमुन्यात समावेश होण्याची शक्यता ही किती आहे सांख्यिकीय एककावरून सांगता येते. या नमुना निवड पध्दतीत काही एककांची निवड प्रातिनिधिक नमुना म्हणून केली जाते यात समग्रातील विभिन्न स्तरातील एककांचा विचार केला जातो. नमुन्याचा आकार हा संक्षिप्त स्वरूपात संशोधक समग्रातील एकूण संख्येच्या

प्रमाणात ठरवू शकतो. त्यामध्ये संशोधनकर्त्याला आपल्या मतानूसार कोणत्याही एककाची निवड नमुन्यात करता येत नाही. त्यामुळे संभाव्यता नमुना पध्दतीने निवडलेला नमुना प्रातिनिधिक असून त्या अध्ययनातून काढलेले निष्कर्ष हे अधिक विश्वसनीय असतात.

**साधा यादृच्छिक नमुना**

साधा यादृच्छिक नमुना निवड पध्दती एककांची निवडण्याचे स्वतंत्र संशोधनाच्या स्वाधीन नसते. संशोधक आपल्या इच्छेनुसार कोणत्याही एककाचा नमुन्यामध्ये समावेश करू शकत नाही. त्यामुळे समग्रातील प्रत्येक एककाला नमुन्यात समाविष्ट होण्याची संधी असते म्हणून पार्टिन सांगतात की, " यादृच्छिक नमुना हा शब्द अशा वेळी वापरला जातो की, जेव्हा प्रत्येक व्यक्ती वा ताचांना निवडण्याची समान संधी प्राप्त होते. "[१५] (कित्ता) प्रत्येक एककाला नमुन्यात समाविष्ट होण्याची संधी किती प्रमाणात आहे हे गणितीय पध्दतीच्या आधारे ठरवले जाते या पध्दतीत समग्रातील एककाचा नमुन्यात समावेश होणे हे दैवावर अवलंबून असते. ही नमुना निवड पध्दत शास्त्रीय आहे म्हणून या पध्दतीत पक्षपात होण्याची शक्यता कमी असते.

## कोटा पध्दत

साधा यादृच्छिक नमुन्यातील अनेक उपप्रकारांचा समावेश होतो. त्यातील कोटा पध्दतीचा वापर संशोधनकाने केला आहे. या पध्दतीत समग्राला सर्व प्रथम वेगवेगळ्या वर्गात विभाजित केले जाते .

प्रत्येक वर्गामधून किती एकक निवडायचे आहेत हे निश्चित करून नंतर प्रत्येक वर्गामधून संशोधक एकक आपल्या इच्छेनुसार निवडतो. अशा प्रकारे निवडल्या गेलेल्या एककांना नमुना मानले जाते. या पध्दतीत एककांना निवडण्याचे स्वातंत्र्य संशोधकाला असते. कारागृहात दोन पध्दतीचे बंदी राहतात.

१) ज्यांचा गुन्हा सिध्द होऊन ज्यांना शिक्षा झाली आहे असे बंदी

२) ज्यांचा गुन्हा आणखी सिध्द झाला नाही ज्यांच्यावर अपराध केल्याचा आरोप आहे असे आरोपी.

कारागृहातील बंद्यांची संख्या दरवर्षी कमी अधिक होते असे सांगण्यात आले. कारागृहात वरील दोन पध्दतीचे बंदी राहतात. त्यापैकी संशोधकाच्या संशोधनाचा उद्देश ज्यांचा आरोप सिध्द होऊन ज्यांना प्रत्यक्ष शिक्षा झाली आहे अशाच बंद्यांना संशोधकाने एकक म्हणून निवडले. ज्यांना शिक्षा झोली आहे त्यांची संख्या दरवर्षी कमी जास्त होते ते बंदी अनेक (विविध) अपराध केलेली वेगवेगळ्या कलमांअंतर्गत शिक्षा भोगत आहेत. संशोधकाने प्रत्यक्ष कारागृहात माहिती (तथ्य) संकलनकेले, तेव्हा ती संख्या **४०७**

१५. कित्ता - पृष्ठ क्र. १८१

अशी होती. त्या सर्व अपराध्यांचे अध्ययन करणे संशोधकाला शक्य नव्हते म्हणून संशोधकाने नमुना निवड पध्दतीचा आधार घेऊन नमुना निवड प्रकारातील संभाव्यता नमुना (Probability Sampling) निवडीतील साधा यादृच्छिक नमुन्यातील कोटा पध्दतीचा वापर केला.या आधारे कारागृहातील ५० टक्के एकक म्हणुन **४०७** बंद्यांपैकी २०० बंद्यांची निवड केली आणि त्यांच्याकडून तथ्य संकलित केले. नमुना निवडीचा आधार घेतल्याने वेळ, श्रम, आणि पैसा यांची बचत होऊन संशोधकाला मिळणाऱ्या माहितीची पुनरावृत्ती (Repetition) टाळता आले.

**२.८ तथ्य संकलन Data Collection :-** सामाजिक संशोधनात सामाजिक घटनांचे वैज्ञानिक पध्दतीने अध्ययन केले जाते. म्हणजेच सामाजिक घटनांच्या अध्ययनामध्ये वैज्ञानिक पध्दतीचा उपयोग करुन त्या आधारे वस्तुनिष्ठ पध्दतीने संशाधन करण्यात येते. वैज्ञानिक पध्दतीचा उद्देश कोणत्याही घटनांच्या संदर्भात सत्याचा शोध घेणे हा आहे. सत्याचा शोध हा कल्पनेच्या आधारावर शक्य नसतो. त्या करिता त्या घटनेच्या संबंधित वास्तविक तथ्यांचे संकलन करणे अतिशय आवश्यक असते शिवाय वैज्ञानिक संशोधन करणे शक्यच नसते.

तथ्य हा शब्द दैनंदिन जीवनात वारंवार वापरला जातो. पण त्यांची निश्चित व्याख्या करणे कठीण आहे. असे **श्रीमती पॉलीन यंग** यांनी म्हटले आहे. तरी परंतू तथ्यांला व्याख्या श्रीमती पॉलीन यंग यांनी केली आहे ती अशी की, "तथ्य केवळ मूर्त वस्तू पर्यंतच मर्यादित नाही. सामाजिक शास्त्रात विचार, अनुभव, भावनादेखील तथ्य आहेत तथ्यांना अशा भौतिक वा शारीरिक मानसिक किंवा भावनात्मक घटनांच्या रूपात पाहिले पाहीजे की, ज्याची खात्रीपूर्वक पुष्टी केली जाऊ शकेल आणि ज्यांचा भाष्यांच्या जगात सत्य म्हणून स्वीकार केला जातो. **गुड** आणि **हॅट** यांनी तथ्यांची पुढीलप्रमाणे व्याख्या केली आहे. "तथ्य एक अनुभवसिध्द सत्यापनीय निरीक्षण आहे. " [१६] (कित्ता)

वरील व्याख्येवरुन तथ्यांचा अर्थ स्पष्ट होतो तथ्य ही एक अशी घटना आहे की, जी वास्तविक रूपात घडलेली आहे किंवा जी वास्तविक स्वरूपात विद्यमान आहे. तथ्य हे मूर्त आणि अमूर्त अशा दोन्ही प्रकारचे असतात. तथ्यांचे निरीक्षण करुन अनुभव घेता येतो. तथ्य ही अशी वस्तू, घटना असून तिचे निरीक्षणाव्दारे आणि अनुभवांव्दारे पुष्टी करता येते. घटनांचे अध्ययन करुन तथ्य संकलन केले जाते. त्या आधारावरच निष्कर्ष मांडले जातात म्हणून तथ्यांचे शास्त्रीय पध्दतीने संकलित करणे आवश्यक असते.

---

१६ कित्ता - पृष्ठ क्र. ३६८

शास्त्रीय संशोधनात तथ्य संकलनास अनन्य साधारण महत्त्व आहे. कारण तथ्ये ही संशोधनाचा आधार असतात. तथ्यांमुळे कार्यकारण संबंधाचा शोध घेतला जातो, समस्येच्या निराकरणास साहाय्य घेता येते, अनेक महत्त्व तथ्य संकलनास आहे. तथ्य संकलनाची दोन साधने / स्त्रोत आहेत. प्रो.बॅगल यांच्या मते

"**तथ्य संकलनाचे स्त्रोते**

- अ) प्राथमिक स्त्रोते
  - १) निरीक्षण
  - २) मुलाखत
  - ३) प्रश्नावली
  - ४) अनुसूची
- ब) द्वितीयक स्त्रोते
  - अ) वैयक्तिक
    - १) पत्रे
    - २) डायऱ्या
    - ३) आत्मचरित्र
    - ४) दैनंदिनी
  - ब) सार्वजनिक
    - १) अहवाल
    - २) आकडेवारी

"[१७] (कित्ता)

प्राथमिक स्त्रोते आणि द्वितीयक स्त्रोतामधील अत्यंत महत्त्वपूर्ण फरक म्हणजे प्राथमिक साधनांचा वापर संशोधक प्रत्यक्ष स्वत: करतो आणि द्वितीयक स्त्रोतांचा दुसऱ्यांनी केलेल्या संशोधनाचा आधार घ्यावा लागतो. हा या संशोधनातील महत्त्वाचा फरक आहे. संशोधक आपल्या संशोधनात दोन्ही (प्राथमिकआणि द्वितीयक) पध्दतीचा वापर करुन तथ्य संकलित करू शकतो. तथ्य संकलनाची उपयुक्तता आणि संशोधकाच्या स्त्रोतांचा आधार घ्यावयाचा यांची निश्चिती करुन तथ्य संकलन करतो. प्रस्तुत संशोधनात संशोधकाने संशोधनासाठी प्राथमिक आणि द्वितीयक स्त्रोतांचा आधार घेऊन तथ्य संकलन केले आहे.

संशोधकाने प्राथमिक स्त्रोतांमध्ये मुलाखत अनुसूची या साधनाचा वापर करुन तथ्य संकलित केले आहे. मुलाखत अनुसूची निवडीमागील कारण म्हणजे कारागृहात ज्यांना शिक्षा झाली आहे असे बंदी होते. ज्यात काही शिक्षित, अशिक्षित होते. त्यांना प्रश्नावली देऊन उपयोग नाही म्हणून मुलाखत अनुसूचीचा वापर केला. त्यामध्ये संशोधकाने एक संरचित अनुसूचीद्वारे तथ्य संकलनाची निश्चिती केल्यामुळे त्यामुळे प्रत्येक बंद्यांची मुलाखत घेताना त्यांचे प्रत्यक्ष निरीक्षणही होऊन यातून त्यांचे हावभाव यांचाही अभ्यास करता आला. प्रथम तथ्य संकलनासंदर्भात मा. कारागृह उपमहानिरीक्षकांकडून परवानगी घेण्यात आली. संशोधकाने जी संरचित मुलाखत अनुसूची तयार केली तिची पडताळणी मा. महानिरिक्षक तुरुंग विभाग,

१७) कित्ता - पृष्ठ क्र. २०१

पुणे यांच्या कार्यालयाने केली आणि त्यात थोड्याफार बदलांच्या सूचना (काही प्रश्न वगळल्यानंतर) देऊन मुलाखत अनुसूची निश्चित केली. निश्चित झालेल्या मुलाखत अनुसूची भरण्याची परवानगी मा. उपमहानिरीक्षक (तुरुंग) औरंगाबादने दिली आणि मुलाखत अनुसूचीचा वापर करुन प्रत्यक्ष बंद्यांची मुलाखत घेतली.

यामुळे प्रत्यक्ष बंद्यांचे निरीक्षणही झाले. काही कैदी आपली खोटी माहिती सांगण्याचा प्रयत्न करत होते. पण जेव्हा संशोधकाने त्यांना सांगितले की आपण सांगितलेली माहिती गुप्त ठेवण्यात येईल या माहितीचा वापर फक्त संशोधनापुरताच मर्यादित राहील असे सांगितल्यानंतर बऱ्याच काळानंतर त्यांनी सत्य माहिती दिली. प्राथमिक तथ्य संकलनासोबतच द्वितीयक साधनांचा संशोधकाने आधार घेऊन बंद्यांच्या संदर्भात अपराधी म्हणजे काय? अपराधाची कारणे, परिणाम, बंद्याना मिळणाऱ्या सुविधा, कारागृह प्रशासनाची रचना, कारागृहाचा इतिहास इत्यादी गोष्टींची माहिती (तथ्ये) द्वितीयक सामुग्रीचा म्हणजेच त्या संदर्भातील पुस्तके, मासिके, अहवाल इत्यादींचा वापर करुन तथ्य संकलन केले. संशोधकाने द्वितीयक सामुग्रीद्वारे मिळणाऱ्या माहितीसाठी मुंबई येथील टाटा समाजविज्ञान संस्था, दिल्ली येथील प्रकाशकांची पुस्तके, शासनाचे वेळोवेळी प्रकाशित होणारे अहवाल, जेल मॅन्युअल आदींचा चा आधार घेऊन तथ्य संकलन केले. प्राथमिक आणि द्वितीयक या दोन्ही स्रोतांचा वापर संशोधकाने संशोधनासाठी केला आहे.

## २.९ निरीक्षण

संशोधकाने तथ्य संकलन करताना बंद्यांसाठी मुलाखत अनुसूची या प्राथमिक स्रोताचा वापर केला. प्राथमिक स्रोतात मुलाखत घेत असताना बंद्यांचे प्रत्यक्ष निरीक्षणही करण्यात आले. निरीक्षण हे विश्वसनीय साधन मानले जाते. कारण संशोधकाला उत्तरदाते माहिती देत असताना त्यांचे निरीक्षणाद्वारे ती सत्य माहिती देतात का ? याचे निरीक्षण करता आले.

प्रस्तुत संशोधनात संशोधकाने बंद्यांची मुलाखत घेत असताना कैदी आपली माहिती सांगताना भावनिक होत होते. कुटुंबाची माहिती विचारत असताना बऱ्याच कैद्यांचे डोळे पाणावले. कारण त्यांना पत्नी, आई, वडील, मुले यांची आठवण झाली. केलेल्या अपराधासंदर्भात जेव्हा प्रश्न विचारला तेव्हा अनेक बंदी प्रखरपणे सांगत होते की साहेब आम्ही अपराध केला नाही. पण आमच्यावर गुन्हा नोंदवून जेलमध्ये पाठवले. आमचा काहीच दोष नाही. चुकीची शिक्षा आम्ही भोगत आहोत असे अनेक कैद्यांनी सांगितले. आमची सुटका व्हावी यासाठी तुम्ही काही तरी करा अशी विनंतीही बरेच कैदी करत होते.

बंद्यांची मुलाखत घेताना प्रामुख्याने युवक त्यात अविवाहित आणि वृध्द ज्यांचे वय ६० वर्षांपेक्षा अधिक आहे त्यांनी दिलेली माहिती अत्यंत महत्त्वपुर्ण होतीच. पण त्यांचे हावभाव चेहऱ्यावरील भाव,

मानसिक ताण, अविवाहित युवकांने मधील दाबल्या जाणाऱ्या लैंगिक भावना, वाढणारे वय, आई वडिलांची चिंता इ. महत्त्वपूर्ण माहिती त्यांच्या मुलाखत आणि निरीक्षणातून मिळाली.

वृध्द बंदी सांगत होते प्रत्येकाला काम मिळावे कारण कामात वेळ कसा जातो ते कळत नाही. काही बंदी कार्यक्रम व्हावेत म्हणजे मानसिक समाधान मिळते. आम्ही स्वतः देवाचे नामस्मरण करतो. आणि त्यातून आत्मिक समाधान आम्हास मिळते. बऱ्याच बंद्यांनी सांगितले आम्ही जेलमध्ये आल्याने आमचे कुटुंब पूर्णपणे उध्वस्त झाले आहे. आता शिक्षा संपवून बाहेर गेल्यावर काय करावे असा प्रश्नही काही बंद्यांना केला.

बऱ्याच बंद्यांनी सांगितले आम्हाला सुटटी वेळेवर मिळावी ती मिळत नाही. भेटीसाठी खूपच कमी वेळ दिला जातो. कारागृहात सर्वांना काम नाही. मनोरंजनाची साधने कमी आहेत असे अनुभव कथन केले. बऱ्याच बंद्यांनी अपराध कसा घडला हे विचारल्यावर प्रत्यक्ष अपराध घडला तेव्हा जशी परिस्थिती असेल तशा परिस्थितीत तिचे वर्णन करुन सांगितले. बऱ्याच बंद्यांचे डोळे पाणावले होते. अहमदनगर जिल्ह्यातील कोठेवाडी येथे पारध्यांनी दरोडा टाकला होता. त्यातील बऱ्याच बंद्यांच्या मुलाखती संशोधकाने घेतल्या. दरोडा कसा टाकला हे विचारत असताना प्रत्यक्ष अनुभव त्यांनी कथन केले. त्यात त्यांनी दरोडा टाकताच महिलांची अब्रू कशी लुटली, त्यांच्यावर अत्याचार कसे केले, पैसे, सामान कसे पळवले याचे अनुभव कथन केले. पण हे सांगत असताना अपराधीपणाची भावना त्यांच्या चेहऱ्यावर अजिबात जाणवत नव्हती.

अशा प्रकारे संशोधकाने मुलाखत अनुसूची भरत असताना बंद्यांचे अनुभव व निरीक्षण याचा फायदा तथ्य संकलनासाठी झाला. प्राथमिक तथ्य संकलन स्त्रोतामधील निरिक्षण मुलाखत ही अतिशय विश्वसनीय साधने मानली जातात. बंद्यांसाठी मुलाखत अनुसूची तयार करून संशोधकाने अत्यावश्यक माहिती संकलित केली. तसेच कारगृहात काम करणारे कर्मचारी हेही तेवढेच महत्त्वपुर्ण आहेत. कारण बंद्यांमध्ये परिवर्तन करण्याच्या कामी येथील कर्मचारी महत्त्वपुर्ण भूमिका निभावतात. कर्मचाऱ्यांमध्ये कारागृहात तुरुंग अधिकारी म्हणून काम करित असताना अत्यंत जबाबदारीपुर्वक भूमिका पार पाडाव्या लागतात. संशोधकाने तुरुंग अधिकाऱ्यांसाठी स्वतंत्र प्रश्नावली तयार केली. त्यामध्ये तुरुंग व्यवस्थेत काम करत असतानाचे प्रत्यक्ष आलेले अनुभव, बंद्यांसोबतचे वर्तन, बंद्यांना दिली जाणारी वागणूक, बंद्यांच्या पुनर्वसनासाठी केले जाणारे उपाय, कारागृहात बंद्यांना कोणकोणत्या सुविधा दिल्या जातात काम करताना येणाऱ्या अडचणी कशा सोडविल्या जातात. काम करताना होणारा त्रास, वेळोवेळी प्रशिक्षण दिले जाते काय? इत्यादी प्रश्नांसोबतच त्यांची वैयक्तिक माहिती संदर्भातील काही प्रश्न तयार करुन एक संरचित प्रश्नावली तयार करण्यात आली. ही प्रश्नावली मा. अधीक्षक मध्यवर्ती कारागृह यांनी तपासली व पुढील मान्यतेसाठी मा. कारागृह उपमहानिरीक्षक यांच्यामार्फत पुणे येथील कारागृह महानिरीक्षक संशोधन विभाग

यांना पाठविली. पुणे येथील महानिरीक्षक कार्यालयातील संशोधन विभागाने संशोधकाच्या प्रश्नावली मधील काही प्रश्न वगळून प्रश्नावलीस मान्यता दिली.

प्रश्नावलीच्या अंतिम मान्यतेनंतर मध्यवर्ती कारागृहातील अधिकाऱ्यांकडून भरुन घेण्यात आली. प्रथम बरेच अधिकारी प्रश्नावली भरुन देण्यास टाळाटाळ करत होते. तेव्हा संशोधकाने संशोधनाचा उद्देश स्पष्ट केल्यानंतर काही दिवसांनी ती भरुन मिळाली. त्या प्रश्नावलीच्या आधारे बऱ्याच माहितीची मदत संशोधकाला झाली. कारागृहात बंद्यांना दिली जाणारी सेवा-सुविधा, होणारे विविध कार्यक्रम, अन्नाचा दर्जा, आरोग्य सुविधा, सुट्टी, बंद्यांसाठी काम करणारे विविध विभाग, बंद्यांचे राहण्याचे ठिकाण, त्यातील सुविधा, मनोरंजनाची साधने, तसेच काम करतांना येणाऱ्या अडचणी, प्रशासन व्यवस्था यांच्या संदर्भात सविस्तर माहिती झाली. बंद्योंकडून मिळालेली माहिती आणि अधिकारी यांच्याकडून मिळालेली माहिती यांच्यामध्ये साम्य आढळले. प्राथमिक तथ्य सामुग्रीचा वापर करुन संशोधकाने वरील माहिती संकलित केली.

## २.१० सांकेतिकीरण :

शास्त्रीय संशोधनाच्या प्रक्रियेतील सांकेतिकीरण हा अत्यंत महत्त्वपुर्ण टप्पा आहे. सांकेतिकीरणाचा वापर लष्कर, पोलीस प्रशासन यात अत्यंत महत्त्वपुर्ण मानला जातो. त्याचबरोबर संशोधन कार्यातील कुशलता, वेळ, श्रमांची बचत यासाठी शास्त्रीय संशोधनात सांकेतिकीरणाचा वापर केला जातो.

**सांकेतिकीरणाच्या व्याख्या**

१ . **गुड** आणि **हॅट** के अनुसार "सांकेतीकरण एक ऐसी प्रक्रिया हे जिसके व्दारा तथ्यों को वर्गोमें संगठीत किया जाता है और प्रत्येक पदको जो जीस वर्गमें आता है एक संख्या या संकेत प्रदान किया जाता है | इस प्रकार संकेतों को गिनकर हम बता सकते है की, किसी दिए हुए वर्ग में पदोंकी संख्या कितनी है परंतु आधारकृत प्रक्रिया वर्गीकरण की है | "

२. **पी.वी. यंग** के अनुसार "तथ्योंको प्रस्तुत करने के लिए संकेतीकरण में वर्गो या श्रेणीयोंका निर्माण किया जाता है | और इनको संकेत Symbol प्रदान किया जाता है | "[१८] (आर.के. रस्तोगी. २००६) वरील व्याख्येवरुन सांकेतीकरण म्हणजे काय व त्याचे महत्त्वही स्पष्ट होते. शास्त्रीय संशोधनाच्या प्रक्रियेतील महत्त्वपूर्ण टप्पा म्हणजे सांकेतीकरण होय. संशोधकाने प्राथमिक तथ्य संकलन साधनांचा वापर करुन (मुलाखती घेऊन ) जी तथ्ये संकलित केली आहेत. त्या तथ्यांची संख्यात्मक माहिती काढण्यासाठी

१८) सामाजिक अनुसंधान, सर्वेक्षण एवं सांख्यिकी - लेखक आर.के. रस्तोगी - पृष्ठ क्र. २७४

सांकेतिकीरण या एका महत्त्वपूर्ण साधनाचा वापर केला आहे.

संशोधकाने संरचित मुलाखत अनुसूची तयार करुन ती प्रत्यक्ष बंद्याकडून भरुन घेतली. त्यात वैयक्तिक प्रश्न, कौटुंबीक , सामाजिक, आरोग्यविषयक, धार्मिक , मानसिक, केलेल्या अपराधासंबंधी, कारागृहात मिळणाऱ्या सुविधांसंदर्भात या प्रमुख घटकांवर काही प्रश्नांची मांडणी करुन मुलाखत घेऊन तथ्य संकलन करण्यात आले.

सांकेतिकीरण करताना संशोधकाने मुलाखत अनुसूचीतील प्रत्येक प्रश्नाच्या उत्तराला A,B,C, असा संकेत दिला. ज्यामुळे उत्तरदात्याकडून आलेल्या उत्तराला संकेतामध्ये परिवर्तीत करुन एकूण उत्तरदात्यांच्या उत्तरांची संख्या एकत्रित करण्यासाठी सांकेतीकीरण उपयुक्त ठरले. कारण सांकेतिकीरणानंतर मास्टरचार्ट बनवण्यासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरले. संशोधकाने मुलाखत अनुसूची तयार करतांनाच प्रश्नांचे वर्गीकरण वैयक्तिक,कौटुंबिक,सामाजिक,आर्थिक,आरोग्यविषयक, धार्मिक, केलेल्या अपराधासंदर्भात कारागृहात मिळणाऱ्या सुविधांसंदर्भात असे अगोदरच वर्गीकरण केल्याने सांकेतिकीरणात वेगळे वर्गिकरण करण्याची गरज संशोधकाला पडली नाही. सांकेतिकरणानंतर संशोधकाने एक मास्टर चार्ट तयार करुन तथ्यांचे संख्यात्मक रूपांतर केले. या सर्व प्रक्रियेत संशोधकाने संगणकाचा वापर केला.

## २.११ सारणीयन आणि विश्लेषण

संशोधकाने तथ्य संकलनानंतर त्यांचे वर्गीकरण करून संख्यात्मक स्वरूपात त्यांचे रूपांतर करण्यासाठी सारणीयन करणे आवश्यक असते. तथ्य संकलनामधून जी माहिती उपलब्ध झाली आहे अशा माहितीचे संख्यात्मक स्वरूपातील प्रमाण व्यवस्थितपणे समजण्यासाठी आणि एकमेकांसोबत तुलना करण्यासाठी आवश्यक असतात. सारणीयनमुळे तथ्यांतील माहितीला सूत्रबध्दता येते. सारणीच्या व्याख्या पुढीलप्रमाणे

१ **ब्लेयर** के अनुसार - "विस्तृत अर्थ में सामग्री कॉलमों और पंक्तीयों में किसी क्रमबध्द व्यवस्था को सारणीयन कहते है |"

२ **प्रो. निसवेजर -** " एक सांख्यिकीय सारणी रकानोंमे पंक्तियोंमें समंकोका सुव्यवस्थित संघटन है | " [१९] (कित्ता)

संशोधकाने कारागृहातील कैद्यांची मुलाखत अनुसूचीच्या साहाय्याने जी तथ्ये संकलित केली आहेत त्या प्रत्येक प्रश्नाच्या उत्तराला कोड संकेत दिला. संकेतानंतर मास्टर चार्ट बनवला. या मास्टर चार्टच्या आधारे सारणीयन काढणे अत्यंत सोपे होते. मुलाखत अनुसूचीमधील बंद्यांना जी वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक,

१९) कित्ता - पृष्ठ क्र. २७४

मानसिक, आरोग्यविषयक, कलेल्या अपराधाविषयी, कारागृहात मिळणा-या सुविधांविषयक अशा विविध घटकांतील प्रश्नांच्या तक्ता तयार करुन त्यातील उत्तरांमधील किती समान आहेत. दोन उत्तरांतील किती फरक आहे. तसेच सरासरी प्रमाण कोणाचे अधिक आहे म्हणजे तथ्यांचे विश्लेषण आणि निष्कर्ष काढण्यासाठी सारणीयणनचा अत्यंत महत्त्वपूर्ण उपयोग होतो. संशोधकाने प्रत्येक प्रश्नांसाठी स्वतंत्र सारणी तयार करुन त्या संबंधीचे विश्लेषण केले आहे.

## २.१२ संशोधनाच्या मर्यादा :

संशोधकाने प्रस्तूत विषयाची निवड केल्यानंतर संशोधनासाठी रितसर परवानगी संदर्भात विनंती मा. कारागृह उपमहानिरीक्षक (मध्यविभाग) औरंगाबाद यांना केली. संशोधकास कारागृह प्रशासनाने कारागृहातील फक्त पुरुष बंद्यांचाच अभ्यास करण्याची परवानगी दिली. कारागृहातील स्त्री बंदी, सेप्रेट यार्ड व अंडासेलमधील बंदी यांचा अभ्यास करण्याची परवानगी सुरक्षेच्या कारणास्तव दिली नाही. त्यामुळे प्रस्तूत संशोधनात संशोधकाने स्त्री बंदी, सेप्रेट यार्ड, अंडासेल यामधील बंद्यी यांचा संशोधनात समावेश केला नाही. यांच्या व्यतिरीक्त जे बंदी शिक्षा भोगत आहेत त्यांचाच समावेश प्रस्तुत संशोधनात केला आहे.

## २.१३ प्रकरण योजना

१. प्रस्तावना

२. संशोधन पध्दती

३. कारागृहाची रचना व कार्यपध्दती

४.बंद्यांची वैयक्तिक, कौटुंबिक,सामाजिक, आर्थिक माहीती,

५. बंद्यांची मानसिक, आरोग्यविषयक, केलेल्या अपराधासंबंधीची माहिती,

६. बंद्यांना दिल्या जाणाऱ्या सुविधांबाबत माहिती

७. सारांश, निष्कर्ष आणि शिफारशी

## २.१४ अपराधाचे सिध्दांत/ संशोधनाची सैध्दांतिक चौकट

मानव हा समाजशीलप्राणी आहे. तसेच तो जिज्ञासक सुध्दा आहे मानवाच्या उत्पत्तीनंतर आपल्या गरजा भागवत असतांना अनेक वेळा तो नियमांचे उलंघन करत, अर्थात गुन्हे करत असत. त्याचा उद्देश

साध्य करून घेत, यातून दुस-या व्यक्तीवर  अन्याय करत असे जसे मानवाचे वर्तन अर्थात " गुन्ह्याचे वर्तन प्राचीन काळापासून मानवी वर्तनाचा भागच बनले हे एक समाजाचे वास्तव तथ्यच बनले आहे असे **इटली**मध्ये **फ्लोरिटा** आणि फ्रान्समध्ये **एमिल दुर्खीम** यांनी म्हटले आहे " [२०] (डॉ. संजीव महाजन. २००४)

गुन्ह्याच्या सार्वत्रिकीरणमुळे प्राचीन काळापासून समाज चिंतकांनी गुन्ह्यांची कारण मीमांसा करण्याचा प्रयत्न केला आहे. या संदर्भात अनेक सिध्दांत निर्माण झाले. प्रत्येक अभ्यासकाने स्वतंत्रपणे याची मीमांसा केली. त्यामुळे त्यांच्या विचारामध्ये एकवाक्यता जाणवत नाही, या संदर्भात डॉ. संजीव महाजन म्हणतात की, "अपराधके, सिध्दांत जिन्हे संप्रदाय भी कहाँ जाता है वास्तव में अपराध के कारणों की खोज के ही परिणाम है | जैसे जैसे अपराध संबंधी अध्ययनोमें वैज्ञानिकता आती गई वैसे वैसे इन सिध्दांतोका खंडण भी होता चला गया | वास्तव मे प्रत्येक सिध्दांत अपराध के केवल एक कारक पर ही आधारित है तथा आज यह अनुभव किया जाने लगा है | कि अपराध का कोई एक कारन नही है | "[२१] (कित्ता) म्हणजेच कुठल्याही अपराधामागे एक आणि एकच कारण पाहावयास मिळत नाही. अर्थात अनेक कारणे कारणीभूत असतात. अपराधशास्त्रात अपराधाच्या कारणांसदर्भात जे विविध सिध्दांत मांडले आहेत ते पुढीलप्रमाणे

## १) पूर्वशास्त्रीय सिध्दांत ( Pre-Classical Theory) :-

अपराधाच्या कारणांसंदर्भात सैध्दांतिक विवेचनात पूर्वशास्त्रीय सिध्दांत हा प्राचीन असा सिध्दांत मानला जातो. या सिध्दांताचा प्रभाव १४ ते १७ व्या शतकात युरोपमध्ये होता. पिशाच्च वृत्तीमुळे मानव अपराधासारखे कृत्य करतो. ज्या व्यक्ती प्रेत, सैतान यांच्या नियंत्रणात जाऊन आत्म्यांने प्रेरित आणि प्रभावित होतात त्यामुळे ते कोणालाच भीती नाहीत त्यामुळे अपराधासारखे कृत्य ते अगदी सहजपणे करतात असे हा सिध्दांत सांगतो. यावर उपाय म्हणून ज्या वक्ती भूत, प्रेत, आत्मा यांच्या नियंत्रणत गेल्या आहेत. त्यापासून दू र करणे किंवा त्या व्यक्तींना संपवणे हाच मार्ग आहे असे मानले जात होते. या संदर्भात जित कृष्णा सिंह म्हणतात की, "प्रेतात्माओ से समाज को बचाने के लिए या तो प्रेतात्माओंको प्रभावित व्यक्तीकों समाजसे निष्कासित किया जाय तथा उस व्यक्ती कों समाप्त किया जाय इस विचारधाराके फलस्वरूप युरोप में १४ वी शताब्दीसे लेकर १७ वी शताब्दीतक लगभग ३,००,००० व्यक्तियों हत्या की गयी | " [२२] (जित कृष्णा सिंह. २००१) अपराधी वृत्ती वाढल्याने त्याला कमी करण्यासाठी अशा व्यक्तींनांच

---

२०) भारतमें सामाजिक विघटन - डॉ. संजीव महाजन - पृष्ठ क्र. १७१

२१) कित्ता - डॉ. संजीव महाजन - पृष्ठक्र. १७२

२२) अपराधशास्त्र और दंडशास्त्र- जित कृष्णा सिंह - पृष्ठ क्र. १५

संपवणे ही प्रथाच युरोपमध्ये होती. कारण युरोपमधील लोक भूत, प्रेत, सैतान यावर विश्वास असणा-या व्यक्तींची संख्या खूप मोठी होती. या संदर्भात सुधा काळदाते म्हणतात,"१७ व्या शतकात मॅसेच्युसेटस् येथील सैतानावर विश्वास ठेवणा-यांनी पूर्वशास्त्रीय सिध्दांत मांडला " [२३] (डॉ. सुधा काळदाते. २००५) १७ व्या शतकानंतर भूत, प्रेतावर विश्वास न ठेवणा-या व्यक्तींनी या सिध्दांताचे खंडण केले. कारण भूत, प्रेत यांना कोठेच शास्त्रीय आधार नाही. ही अंधश्रध्दा आहे अंधश्रध्देच्या प्रभावातून या सिध्दांताची निर्मिती झाली होती. पण पुढे हा सिध्दांत टीकाकरांच्या टीकेने लोप पावला.

### २) शास्त्रीय आणि नव शास्त्रीय सिध्दांत (Classical and Neo Classical Theory)

शास्त्रीय सिध्दांताचे जनक म्हणून जेरिनी बेंथम (Jereny Bentham) यांना ओळखले जाते. शास्त्रीय सिध्दांत इंग्लंडमध्ये अधिक लोकप्रिय होता. शास्त्रीय सिध्दांताचा वापर अपराधशास्त्रत सर्वप्रथम १७६४ मध्ये **कैसर बेकारिया** यांनी केला.

जेरिनी बेंथम आणि कैसर बेकारिया यांच्यामते मानवी व्यवहारांचा आधार सुखः आणि दुःख आहे. व्यक्ती आपल्या दैनंदिन वर्तनात सुख मिळवण्यासाठी प्रयत्नशील असते. एखादे कार्य करतांना दुःख कमी व सुखाची प्राप्ती अधिक झाली तर व्यक्ती त्याच मार्गाचे अनुकरण करतात.

" शास्त्रीय सिध्दांतानुसार व्यक्ती दुःखापेक्षा सुखाची जास्त प्राप्ती व्हावी. या कारणासाठी गुन्ह्याचे वर्तन करीत असते. थोडक्यात गुन्ह्याचे कारण म्हणजे जास्त सुखाची लालसा होय. " [२४] (भा. कि. खडसे. १९९९)

शास्त्रीय सिध्दांतात आजही तथ्य असलेले आपणास जाणवते. कारण आज भ्रष्टाचार, काळा बाजार, करबुडवेपणा या सारखे अनेक गुन्हे सुख प्राप्त करण्यासाठी लोक करीत आहेत. यात पांढरपेशीय वर्गाचे प्रमाण सर्वात अधिक आहे. या संदर्भात, **कैसर बेकारिया** म्हणतात की "व्यक्ती दुःखाच्या तुलनेत सुख अधिक मिळवण्यासाठी व्यक्ती गुन्हे करतात. त्यामुळे समाजाची मानहानी होते. विधिमंडळाने केलेल्या कायद्याचे पालन न्यायाधीशांनी करावे यामध्ये बदल करू नये असे ते म्हणतात. तसेच आजीवन कारावास हि शिक्षा अपराध कमी करण्यासाठी अत्यंत चांगली आहे असे ते म्हणतात" [२५] (डॉ. जितकृष्णा सिंह. २००१) अर्थात कठोर शिक्षेमुळे अपराधाला आळा बसू शकतो.

---

२३) आधुनिक भारताच्या सामाजिक समस्या - डॉ. सुधा काळदाते - पृष्ठ क्र. ९१

२४) भारतातील सामाजिक समस्या - डॉ. भा.की. खडसे - पृष्ठ क्र. १०१-१०२

२५) अपराधशास्त्र और दंडशास्त्र - डॉ. जितकृष्णा सिंह

शास्त्रीय सिध्दांतावर खूप मोठ्या प्रमाणात टीका झाली. डॉ. संजीव महाजन म्हणतात की "यह सिध्दांत कल्पनांपर आधारित है केवल एकही कार्यकलाप बल देता है | तथा सामाजिक परिस्थितीयोंपर ध्यान नही देता इसलिए इसे वैज्ञानिक नही माना गया | " [२६] (डॉ. संजीव महाजन. २००४) शास्त्रीय सिध्दांत हा सुखवादी सिध्दांत असल्याने तो लहान मुले आणि वेडी माणसे यांना लागू होत नाही. कारण यांना सुख आणि दुख यातील फरकच करता येत नाही. त्यामुळे या सिध्दांतामध्ील चुकांना सुधारण्यासाठी नवशास्त्रीय सिध्दांताची निर्मिती झाली नवशास्त्रीय सिध्दांताच्या मते अपराध्याला दंड देताना त्यांच वय, अपराध, मानसिक स्थिती यांचा विचार करणे गरजेचे आहे असे सांगितले.

### ३) भौगोलिक सिध्दांत (Geographical Theory)

१८३० ते १८८०च्या काळात भौगोलिक सिध्दांताचा विकास झाला. भौगोलिक सिध्दांताचे जनक **क्वेटलेट** आणि **ग्वेरी** आहेत. अपराधाच्या मुळाशी भौगोलिक परिस्थिती कारणीभूत असते असे ते मानतात. भौगोलिक पर्यावरणात जल, वायू, पर्वत, नद्या, ऋतूनुसार होणारे बदल इ. घटकांचा समावेश होतो. भौगोलिक वातावरणाच्या अनुषंगाने गुन्ह्याचे स्वरुप व संख्या ठरत असते. अपराधांसाठी भौगोलिक वातावरण अनुकूल असेल तर अपराधाची संख्या वाढते आणि भौगोलिक वातावरण प्रतिकूल असेल तर अपराधाची संख्या कमी होते. ऋतुमानानुसार अपराधांचे प्रमाण कमी जास्त होते. **चॅपेन** यांनी १८२५-३० या कालावधीत केलेल्या अभ्यासात तापमानाचा आणि गुन्हेगारीचा अंत्यंत जवळचा संबंध असतो असे सांगितले.

"भौगोलिक सिध्दांताच्या अभ्यासकांच्या मते भौगोलिक वातावरणाच्या अनुषंगाने गुन्ह्याचे स्वरूप आणि संख्या ठरत असते. क्वेटलेच्या मते व्यक्तीविषयक गुन्हे आणि हिंसात्मक गुन्हे उष्ण प्रदेशात घडतात. थंड प्रदेशात संपत्तीविषयक गुन्ह्यांचे प्रमाण अधिक असते. लोकसंख्येची घनता ज्यास्त असलेल्या प्रदेशात गुन्हेगारी प्रवृत्तीला पोषक असे वातावरण असते. मार्च एप्रिल महिन्यांत गुन्ह्याची आणि त्यात लैगिक गुन्ह्यांची संख्या वाढते. या पध्दतीने गुन्ह्यांच्या वाढीसाठी भौगोलिक कारणे जबाबदार असल्याचे मानले जाते. " [२७] (डॉ. भा.की. खडसे. १९९९)

अपराधासाठी भौगोलिक कारण किती महत्त्वपुर्ण आहे हे सांगण्यासाठी महिन्याप्रमाणे कोणकोणते गुन्हे घडतात या संदर्भात **डैक्सटर** यांनी एक अपराधी कैलेंडर तयार करुन भौगोलिक पर्यावरण आणि अपराध यांचा अतिशय जवळचा संबंध आहे हे सिध्द केले.

---

२६) भारत में सामाजिक विघटन - डॉ. संजीव महाजन - पृष्ठ क्र. ११
२७) भारतातील सामाजिक समस्या - डॉ. भा.की. खडसे - पृष्ठ क्र. १०२

"**अपराध्री कॅलेंडर**

| **अपराध** | | **महिना** |
|---|---|---|
| १ भ्रूण हत्या | :- | जानेवारी, फेब्रुवारी, मार्च, एप्रिल |
| २ हत्या आणि गंभीर अपराध | :- | जुलै |
| ३ पितृ हत्या | :- | जानेवारी, ऑक्टोबर |
| ४ प्रौढ बलात्कार | :- | जुलै, ऑगस्ट |
| ५ युवक बलात्कार | :- | जून |
| ६ संपत्ती संबंधीचे अपराध | :- | डिसेंबर जानेवारी |
| ७ व्यक्तीविरुध्द अपराध | :- | मे, जून, |

" [२८] (डॉ. संजीव महाजन. २००४)

अपराधासंबंधी भौगोलिक कारणांची पुष्टी देण्यासाठी अनेक विचारवंतांनी प्रयत्न केले, पण अपराधामधील नव नवीन संशोधनातून नवीन नवीन विचार, सिध्दांत निर्माण झाले. जुने काळाच्या पडद्याआड झाले. तसेच भौगोलिक सिध्दांताचे झाले तसेच भौगोलिक सिध्दांत हा शास्त्रीय पध्दतीवर आधारित नव्हता, कारण एकाच भौगोलिक प्रदेशात सारखेच गुन्हे घडताना दिसत नाहीत. भौगोलिक कारणांमुळे गुन्हेगारीला पूरक पार्श्वभूमी निर्माण हाऊ शकते. पण भौगोलिक कारणच गुन्हेगारीला जबाबदार आहे असे म्हणता येणार नाही. त्यामुळे भौगोलिक सिध्दांत ज्यास्त काळ टिकू शकला नाही.

### ४) समाजवादी सिध्दांत (Socitist Theory)

समाजवादी सिध्दांताचा उगम १८५० मध्ये झाला. या सिध्दांताचे समर्थक **कार्ल मार्क्स** आणि **एंगेल्स्** हे आहेत. कार्ल मार्क्स आणि एगेल्स यांच्या मते अपराधासाठी आर्थिक कारण महत्त्वपुर्ण आहे. लोकांची आर्थिक परिस्थिती अनुकूल असेल तर अपराधाचे प्रमाण कमी आणि आर्थिक परिस्थिती प्रतिकूल असेल तर अपराधाचे प्रमाण वाढते. आर्थिक प्राप्तीसाठी अनेक जन इतरांवर अन्याय करतात. अर्थात गुन्हे करतात. अर्थात अपराधासाठी आर्थिक विषमता ही महत्त्वपुर्ण आहे. भांडवलशाही अर्थव्यवस्थेत विषमता

---

२८) भारत में सामाजिक विघटन - डॉ. संजीव महाजन - पृष्ठ क्र. १६९

असते. भांडवलदार आणि श्रमीक यांच्यात फारच अंतर असते, भांडवलदार हा आहेरेचा तर श्रमिक वर्ग हा नाहीरेचा वर्ग असतो असे कार्ल मार्क्स सांगतात. श्रमिकांना आपल्या जीवन आवश्यक गरजाही पूर्ण करता येत नाहीत. त्यामुळे हे श्रमिक आपल्या गरजा भागवण्यासाठी सामाजिक नियमांचे उल्लंघन करतात अर्थात अपराध करुन आपल्या गरजा पूर्ण करण्याचा प्रयत्न करतात. विषमतेमधून अपराधाचा जन्म होतो.

समाजवादी सिध्दांतावरही टीका झाली. कारण सर्व समाजात श्रीमंत, भांडवलदार, गरीब, श्रमिक, कामगार वर्ग असतात. पण सर्वच श्रमीक, कामगार आपल्या गरजा भागवण्यासाठी अपराधच करतात असे नाही. आज श्रीमंत भांडवलदार आर्थिक श्रीमंत होण्यासाठी धडपडतात पण सर्व श्रमिक कामगार गैर मार्गाचा अवलंब करीत नाहीत. त्यामुळे समाजवादी सिध्दांतावर टीका होउन हा सिध्दांतही मागे पडला

**५) रूपवादी सिध्दांत (Topological Theory)**

रूपवादी सिध्दांत लॉम्ब्रोसो आणि गोडार्ड यांनी विकसित केला आहे. लॉम्ब्रोसो यांनी १८७५ मध्ये रूपवादी सिध्दांत विकसित करताना सांगितले की, अपराधी हे जन्मजात असतात असे सांगून अपराधांच्या शरीराची विशिष्ट अशी ठेवण असून त्यांच्या शरीरावर काही लक्षणे जाणवतात अपराधी व्यक्तीची शारीरिक ठेवण इतर सामान्य व्यक्तीपेक्षा वेगळी असते. वंशानूक्रमाने अपराधाचे व्यक्तीमध्ये संक्रमण होत असते असे सांगितले.

लॉम्ब्रोसो यांनी इटलीच्या कारागृहातील बंद्यांची शरीरिक व मानसिक अभ्यास केला, त्यात त्यांना ब-याच बंद्यांची शरीरिक ठेवण विशिष्ट स्वरूपाची आढळली. त्यात त्यांचे मोठे डोळे, लांबट चेहरा, सपाट व मोठे नांक, गालाची हाडे वर आलेली, मोठे कान, तीक्ष्ण व भेदक दृष्टी, केसांचे प्रमाण अधिक इ. लक्षणे आढळल्यामुळे अपराधी हे जन्मजात असतात असे लॉम्ब्रोसो सांगतात.

लॉम्ब्रोसो हे स्वतः शरीरशास्त्राचे डॉक्टर होते. **गोगार्ड** यांनी शारीरिक लक्षणांऐवजी मानसिक आधार यांचा अभ्यास करुन मानसिक विकृती हे अपराधाचे प्रमुख कारण मांनले. व्यक्तीची मानसिक विकृती ही अनुवंशिकतेने प्राप्त होते असे गोगार्ड सांगतात. मानसिक विकृत असणा-या व्यक्ती जीवन जगताना समाजमान्य नियमांच्या विरुध्द वर्तन करतात. पण त्या वर्तनासंबंधी त्यांना जाणीव नसते. त्यामुळे गुन्ह्योंचे प्रमाण वाढते असे गोडार्ड सागून मानसिक विकृती हे कारणही अपराधास जबाबदार आहे असे सांगतात.

अपराधी जन्मजात असतात हे आधुनिक युगात मान्य नसल्याने या रूपवादी सिध्दांतावरही टीका झाली. "चार्ल्स गोरिंग (Charles Goring) व त्यांच्या सहकार्यांनी ३० हजार अपराध्यांचे अध्ययन करुन निष्कर्ष काढला की, अपराधी आणि सामान्य माणसात शारीरिक व मानसिक विषयांमध्ये समानता

आढळली " [२९] (कित्ता) त्यामुळे अपराधी माणसाची विशिष्ट अशी शारीरिक व मानसिक ठेवण असते असे म्हणता येणार नाही त्यामुळे हा सिध्दांतही मागे पडला.

### ६) मानसिक परीक्षण सिध्दांत (Mental Tester Theory)

मानसिक परिक्षण सिध्दांत हा रूपवादी सिध्दांताची एक शाखा मानली जाते. कारण लॉम्ब्रोसो म्हणतात की, अपराध्याची विशिष्ट अशी शरीराची ठेवण असते. पण मानसिक परीक्षण सिध्दांत सांगतो की, मानव मानसिक विशेषणाने भिन्न प्रकारचे असतात. त्यामुळे व्यक्तीच्या शरीर रचनेबरोबरच त्यांची मानसिक स्थिती महत्त्वपुर्ण आहे असे हा सिध्दांत सांगतो.

एच.एच. गोडार्ड या सिध्दांताचे जनक मानले जातात. मानसिक दुर्बलतेमुळे व्यक्ती अपराधासारखे कृत्य करते. त्यांना त्यांच्या वर्तनाबद्दल चांगले वाईट अशी जाणीव असत नाही आणि ही मानसिक दुर्बलता बहुतांश वेळा अनुवंशीक असत असे गोडार्ड सांगतात गोडार्ड यांनी अपराधाचे कारण मानसिक दुर्बलता प्रतिवादन करताना सांगतात की,

"१ लगभग सभी अपराधी मानसिक दोष से ग्रस्त होते है |

२ मानसिक रोगसे ग्रस्त व्यक्ती विषम परिस्थिती में अपराध करते है और अपने अपराधी कार्यका मूल्यांकन नही कर सकते |

३ मेण्डल के नियम के भाँती मानसीक दुर्बलता भी एक पिढी से दुसरी पीढी को प्राप्त होती है |

४ अपराध की रोकथाम के लिए मानसिक दुर्बलता से ग्रस्त व्यक्तियोंको निवयीकरण (Sterlization) किया जा सकता है अथवा उनको समाप्त किया जा सकता है | " [३०] (जित कृष्णा सिंह. २००१)

पूर्वशास्त्रीय सिध्दांताप्रमाणे मानसिक परीक्षण सिध्दांत हा अपराधाचे प्रमाण कमी करण्यासाठी त्या व्यक्तींना संपवणे हाच उपाय सांगतात. या सिध्दांताचे खंडण करताना कोलमन म्हणतात, की सर्वच गुन्हेगार मानसिक विकृतीचे नसतात. विकृत मानसिकता ही अनुवंशिकतेने येते यावरही टीका झाली आणि पुढे संशोधनातून सिध्द होऊ लागले की, अपराधासाठी एकच कारण कारणीभूत असत नाही .

### ❖ मनोविश्लेषक सिध्दांत (Psychiatric Theory)

मनोविश्लेषणात्मक सिध्दांत हा मानसिक परीक्षण सिध्दांताचा एक भाग आहे पण हा स्वतंत्र सिध्दांत म्हणून उदयास आला. मानोविश्लेषक सिध्दांताचे जनक म्हणून सिग्मण्ड फ्रॉयड, एडलर, आणि

२९) कित्ता - पृष्ठ क्र. १७४

३०) अपराधशास्त्र और दंडशास्त्र - जित कृष्णा सिंह - पृष्ठ क्र. २४-२५

ओटोरके यांना मानले जाते. सिग्मण्ड फ्रॉयड सांगतात की, मानवात तीन तत्त्वांचे सामंजस्य आवश्यक असते. ID Ego. Siperego मानसिक तणावामुळे व्यक्ती या तिन्हींमध्ये सामंजस्य होऊ शकत नाही. त्यामुळे तो सामाजिक नियमांना धरुन वर्तन करत नाही. एडलर म्हणतात की, अपराधी व्यक्ती ही हीन भावनेने ग्रस्त असते, त्यामुळे तो बारबार अपराधाचे कृत्य करतो.

ओटोरेक यांनी जन्मजात विघटित व्यक्तित्व सिध्दांताचे प्रतिपादन केले. बालक विघटित कुटुंबात जन्मले तर त्याचे सामाजीकरण योग्य होणार नाही. अर्थात असे बालक अपराधाची कृत्येच करी. मनौवैज्ञानिक सिध्दांत विकसित करताना हिली आणि ब्रेनर (Healay and Brennar) यांचे योगदान महत्त्वपुर्ण आहे. ते म्हणतात, व्यक्तीमधील भावनिक प्रक्षुध्बता आणि निराशा ही कारणे महत्त्वपुर्ण आहेत. भावनात्मक प्रक्षुब्धतेच्या भरात सारासार विवेकानुसार वर्तन केले जात नाही, त्यामुळे अपराधासारखे कृत्य घडते व्यक्तीमधील भावनिक प्रक्षुब्धता आणि नैराश्य हे अनुवंशितकतेने येते असे मानल जाते. अपराधाच्या कारणांचा शोध येत असतात. मनोविश्लेषक सिध्दांतावरही टीका होऊ लागली आणि हा सिध्दांतही काळाच्या पडद्याआड गेला.

**७) समाजशास्त्रीय सिध्दांत (Sociological Theory)**

समाजशास्त्रीय सिध्दांत हा आधुनिक सिध्दांत मानला जातो, अपराधाची कृत्य ही जन्मजात येत नाहीत. ती व्यक्ती आपल्या वर्तनातून इतर व्यक्तींच्या वर्तन आणि अनुकरणातून शिकते असे हा सिध्दांत मानतो. समाजात संघर्ष, स्पर्धा यातूनही अपराधासारखी कृत्ये होतात. व्यक्तीच्या वर्तन अनुकरणा संदर्भात फ्रान्स मधील डार्टे यांनी अपराधाच्या जैविक सिध्दांताचे खंडण करून अनुकरण सिध्दांत निर्माण केला. टार्डे यांच्या मतानुसार "माणसाचे वर्तन अनुकरण प्रिय असते, यातूनच अपराधासारखी कृत्ये घडतात." समाजशास्त्रीय सिध्दांताच्या विकासात सदरलॅड्, डोनाल आर टैफ्ट, क्लिफार्ड शॉ यांचे योगदान महत्त्वपुर्ण आहे. ते सांगतात इतर व्यक्तीच्या सहवासात अपराधाचे वर्तन शिकले जाते. अपराधाचे वर्तन हे सहसा ओळखीच्या व्यक्तीमध्ये जाणवते, लहान वयातच गुन्हेगार व्यक्तींच्या सोबत राहून गुन्ह्याचे वर्तन करायला लागतात व पुढे प्रौढ गुन्हेगार म्हणून अनेक सफाईदारपणे अनेक गुन्हे करतात.

डोनाल आर टैफ्ट यांनी प्रत्येक अपराधाचे कृत्य हे संस्कृतीशी निगडित असते. या संदर्भात टैफ्ट म्हणतात की, "किसी संस्कृतीके आराधाभूत तत्व सामाजिक मूल्य होते है | जिनका विकास प्रत्येक समाजमें ऐतिहासिक अनुभवों व्दारा होता है | समूह को संतुष्ट प्रदान करने वाले अनुभव और आचरण के ये प्रतिमान सकारात्मक रूप से मूल्यांकित रहते है | इसके विपरीत असंतोष प्रदान करने वाले प्रतिमाननकारात्मक रूप से मूल्यांकित रहते है | "[३१] (कित्ता)

३१) कित्ता - पृष्ठ क्र. २८

सामाजिक मुल्यांचे पालन व्यक्ती करतात तेंव्हा सामाज संघटन होते. पण व्यक्ती जेंव्हा मूल्यांचे विरुध्द वर्तन करतात. त्यातून विघटनाचे प्रमाण वाढते. यातून समाजात असंतोष निर्माण होतो. पुढे याही सिध्दांतावर टीका झाली.

### ८) बहुकारणवादी/बहुकार सिध्दांत (Multiple Theory)

अपराधाच्या कारणांसंदर्भात अनेक सिध्दांत मांडले गेले. त्या प्रत्येक सिध्दांतामध्ये एखादेच कारण पुढे करुन सिध्दांताची मांडणी केली होती. पण पुढे अनेक अपराधशास्त्रज्ञ जेंव्हा अपराधाच्या कारणांचा एकत्रित आढावा घेत होते तेव्हा कोणतेही एकच कारण अपराधासाठी जबाबदार असत नाही तर अनेक कारणे जबाबदार असतात. यातूनच बहुकारणवादी सिध्दांताचा उदय झाला.

"बहुकारणवादी सिध्दांताचे जनक म्हणून **सिरील बर्ट** यांना मानले जाते. १९२५ मध्ये बर्ट यांनी हा सिध्दांत मांडला. ते सांगतात जेवढे अपराध असतील तेवढेच त्याची कारणे असू शकतात. म्हणजेच एका अपराधासाठी एकच कारण कारणीभूत नसून अनेक कारणे जसे अनुवंशिकता, सामाजिक शारीरीक, मानसिक आर्थिक अशी अनेक कारणे कारणीभूत असतात.

बर्ट यांनी केलेल्या अध्यायनावरून काही निष्कर्ष काढले ज्यात, अपराधासाठी कमीत कमी चार कारणे प्रभावशाली असतात. त्यात

१ मुख्य किंवा सर्वांत महत्त्वाचे कारण

२ मुख्य सहायक कारण

३ लहान सहान परिस्थिती जी अपराधास प्रेरित करते

४ अशी परिस्थिती की, जी उपस्थित नाही. "[३२] (रा.ज. लोटे. १९९९)

अर्थात एखाद्या घटनेमागे वरील कारणे असतात. त्यामुळे अपराधासारख्या घटना घडतात.

बहुकारणवादी सिध्दांतावर **अल्बर्ट कोहेने** यांनी टीका केली परंतु अपराधशास्त्रात अनेक सिध्दांतापैकी बहुकारणवादी सिध्दांत अनेकजण मान्य करतात.

प्रस्तुत संशोधनात मध्यवर्ती कारागृहातील बंद्यांचा अभ्यास करीत असताना अपराधा मागच्या कारणांचा शोध घेतला असता सैध्दांतिक चौकटीत किंवा विश्लेषणामध्ये समाजशास्त्रातील सिध्दांत व बहुकारणवादी सिध्दांत यात समावेश होतो. यामध्ये बहुसंख्य अपराधी आर्थिक कारण आणि कौटुंबिक कारणांतून झाले असून राजकीय कारण, चोरी, दरोडा, जातीयवाद, अनैतिक संबंध, धार्मिक वाद इ. कारणामुळे बंद्यांनी अपराध केल्याचे सांगितले. म्हणून प्रस्तुत संशोधन अपराधाच्या विविध सिध्दांतांपैकी

---

३२) भारतातील सामाजिक समस्या - रा.ज. लोटे

**समाजशास्त्रीय सिध्दांत व बहुकारणवादीय सिध्दांत यात समावेश होतो.** बंद्याने केलेल्या अपराधाचे कारण विस्तृतपणे बंद्याने केलेल्या अपराधासंबंधी माहिती यातील तक्ता क्र.०५ मध्ये विवेचन आले आहे.

## समारोप

प्रस्तुत प्रकरणात संशोधन विषयाच्या संदर्भात विवेचन केले असून आज प्रस्तुत विषयावर संशोधन करण्याची गरज असून सर्वसामान्य लोकांना कारागृहाबद्दल सत्य माहिती मिळावी यासाठी संशोधनासाठी प्रस्तुत विषयाची निवड करण्यात आली. संशोधन विषया संदर्भात संदर्भ साहित्याचा आढावा घेतला असून संशोधन प्रक्रियेतील महत्त्वपुर्ण पायऱ्यांचा समावेश केला आहे. यामध्ये संशोधनाची उद्देश, संशोधनाची गृहीत कृत्ये, संशोधनाचे क्षेत्र व एकक, संशोधन पध्दती (नमुना निवड), तथ्य संकलन यामध्ये संशोधकाने निरीक्षण आणि मुलाखत अनुसूचीचा वापर केला तसेच तथ्य संकलनानंतर वर्गीकरण, सांकेतिकीरण व सारणीयन व विश्लेषण याचा अवलंब कसा केला याचा सविस्तर आढावा घेतला असून संशोधन विषया संदर्भात सैध्दांतिक पार्श्वभूमी याचाही आढावा घेतला आहे.

*****

# प्रकरण ३ रे

## कारागृह प्रशासन आणि कार्यपध्दती

३.१ कारागृह प्रशासन आणि कार्यपध्दती

३.२ कारागृहाची रचना

३.३ कारागृहातील शेती

३.४ कारखाना विभाग

३.६ बंद्यांचे अधिकार

## ३.१ कारागृह प्रशासन आणि कार्यपध्दती

राज्यात मध्यवर्ती कारागृहे, जिल्हा कारागृहे, किशोर सुधारालये, खुले कारागृह व खुली वसाहत मिळून एकुण ३८ कारागृहे आहेत. या कारागृहांमध्ये बंद्यांची क्षमता १७,७६७ (पुरुष १६,८२४ व महिला ९४३) इतके आहे. मात्र प्रत्यक्षात या कारागृहातील बंद्यांची संख्या क्षमतेपेक्षा ८ ते १० हजारांनी अधिक असते. कारागृहे गृह विभागाच्या अंतर्गत असुन राज्यातील कारागृहांचे प्रशासन व नियंत्रण याची जबाबदारी कारागृह महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे सोपवली आहे. त्यांच्या मदतीकरिता राज्यात ४ कारागृह उपमहानिरीक्षक आहेत. कारागृह उपमहानिरीक्षकांच्या नियंत्रणाखाली राज्यातील मध्यवर्ती, जिल्हा, किशोर सुधारालय, खुले कारागृह व खुली वसाहत यांचे अधीक्षक काम करीत असतात.

### ❖ कारागृहाचे उद्देश

पुनर्वसनासाठी गुन्हेगारांची सुधारणा हे ध्येय ठेवून तुरुंग कायदा, १८९४ नुसार महाराष्ट्रातील कारागृहांची स्थापना झाली आहे. अस्तित्वात असलेल्या कायद्याच्या विरुध्द वर्तन करुन गुन्हा करणाऱ्या गुन्हेगारांना समाजाच्या शांतता व स्वाथ्यतेच्या दृष्टिकोनातुन काही काळ एकांतवासात ठेवणे हा उद्देश कारागृहाची स्थापना करण्यामागे आहे. गुन्हेगारांना सुधारण्यासाठी कारागृहामध्ये योजनाबध्द कार्यक्रम राबविले जातात. या कार्यक्रमांमध्ये वैचारिक उपदेश, कायद्याचे मार्गदर्शन, शिक्षण, आरोग्याच्या दृष्टिकोनातून जीवन जगण्याची कला इत्यादींचा समावेश आहे. कैद्यांच्या शिक्षा कालावधीचा उपयोग त्यांच्या वर्तणुकीत आवश्यक त्या सुधारणा करुन गुन्हेगारी प्रवृत्तीपासून त्याला दूर ठेवणे याकरिता केला जातो.

**कारागृह विभागाची कार्ये थोडक्यात खालीलप्रमाणे आहेत.**

१) कैद्यांचा सांभाळ करणे व खालीलप्रमाणे कायद्यांचे प्रशासन करणे.

तुरुंग कायदा, १८९४

कैदीविषयक कायदा १९००

किशोर सुधारणा कायदा,१९२९

कैद्यांचा स्थलांतरविषयक कायदा,१९५०.

अपराधी परिविक्षा अधिनियम १९५८

सराईत अपराधीविषयक कायदा,१९६०.

२) कैद्यांच्या गुन्हेगारी जीवनाचा व त्याला गुन्हेगारी जीवनाकडे नेणाऱ्या त्याच्या जीवनातील घटनांचा अभ्यास करणे तसेच या अभ्यासात कैद्यांची आर्थिक व मानसिक स्थिती, त्याची कौटुंबिक परिस्थिती, गुन्हे करण्याची पध्दती, त्यांचे शेजाऱ्याबरोबर असलेले संबंध व वागणूक तसेच समाजविघातक व्यक्तींशी त्याचे असलेले संबंध व वागणूक कशी होती त्यातून त्याची गुन्हेगारी प्रवृत्ती कशी वाढली याचाही अभ्यास करणे प्राप्त असते.

३) गुन्हेगाराच्या वागणूकीत सुधारणा होईल हे गृहीत धरुन त्याला शिक्षण व मार्गदर्शन करणे तसेच हे शिक्षण घेण्यास त्याचे मन तयार करणे.

४) त्यांना निरनिराळे धंदेवाईक शिक्षण उपलब्ध करुन देणे.

५) त्याची सुटका झाल्यानंतर त्याचे पुनर्वसन करण्याची योजना आखणे. त्यात जिल्हा परिविक्षा अधिकाऱ्यांमार्फत कर्ज योजना तसेच विविध योजनांअंतर्गत सुविधांची माहिती देणे, थोडक्यात सुरक्षितता, शिस्त, सुधारणा, पुनर्वसन, शिक्षण व कैद्यांचे कल्याण ही कारागृह विभागाची महत्त्वाची कार्ये आहेत.

## ❖ महाराष्ट्र कारागृह विभागाची संस्थात्मक रचना

कारागृहाचे प्रशासन व त्याचे नियंत्रण करण्याचे काम कारागृह महानिरीक्षक यांच्याकडे सोपविलेले आहे. त्यांचे मुख्यालय पुणे येथे आहे. त्यांच्या मदतीकरिता पुणे येथीत त्यांच्या कार्यालयात कारागृह उपमहानिरीक्षक, विधी अधिकारी, संशोधन अधिकारी, लेखा अधिकारी, उपअभियंता, उद्योग अधीक्षक, कृषी अधिकारी इत्यादी अधिकारी मदत करत असतात. प्रशासनाच्या सोईसाठी राज्यात चार विभाग निर्माण करण्यात आलेले आहेत. त्यांचे प्रमुख कारागृह उपमहानिरीक्षक हे आहेत.

**१) क्षेत्रीय कार्यालयाची रचना :-** राज्यात कारागृहांचे प्रशासन चार विभागीय कार्यालयांमार्फत हाताळण्यात येते. पूर्व विभाग, नागपूर, पश्चिम विभाग, पुणे, दक्षिण विभाग, मुंबई, मध्य विभाग, औरंगाबाद.या प्रत्येक कार्यालयाचे प्रमुख हे कारागृह उपमहानिरीक्षक हे आहेत.

**२) मध्यवर्ती/ जिल्हा कारागृहाची रचना :-** कारागृहात न्यायाधीन, सिध्ददोष, स्थानबध्द बंदी ठेवण्यात येतात. या कारागृहाचे प्रमुख अधीक्षक आहेत. कारागृहाचे दैनंदिन कामकाजाच्या मदतीकरिता उपअधीक्षक, तुरुंग अधिकारी, सुभेदार,हवालदार रक्षक हे कार्यकारी वर्गातील अधिकारी /कर्मचारी अधिपत्याखाली असुन त्यांच्यामार्फत कारागृहांची व बंद्यांची सुरक्षितता राखणे, बंद्यांना नियमाप्रमाणे दैनंदिन सुविधा उपलब्ध करणे, न्यायालयीन कामकाजासाठी बंदयांना पोलीस पथकाकडे सुपूर्द करणे इत्यादींचे नियंत्रण केले जाते.

**३) खुले कारागृहे :-** शिक्षा झालेल्या दीर्घ मुदतीच्या बंद्यांची ठराविक काळ शिक्षा भोगल्यानंतर त्यांची वर्तणूक, शारीरिक व मानसिक प्रकृती उत्तम असलेल्या व कष्टाचे काम करण्याची सवय असलेल्या बंद्यांना खुले कारागृह निवड समितीच्या शिफारशीवरुन कारागृह महानिरीक्षक यांच्या आदेशान्वये खुल्या कारागृहामध्ये ठेवण्यात येते. या कारागृहामध्ये बंद्यांना सुटकेनंतर त्यांचे पुनर्वसन व्हावे म्हणून त्यांना विविध उद्योगांचे आधुनिक प्रशिक्षण, काम व रोजगार तसेच नियमाप्रमाणे शिक्षेमध्ये बंद कारागृहापेक्षा जास्त माफी देण्यात येते. तसेच कामाच्या बदल्यात वेतन देण्यात येते. या कारागृहाचे प्रशासन अधीक्षकांमार्फत चालविण्यात येते. त्यांच्या मदतीकरिता उपअधीक्षक, तुरुंग अधिकारी, सुभेदार , हवालदार, रक्षक हे कार्यकारी संवर्गातील अधिकारी / कर्मचारी यांच्यामार्फत नियंत्रण केले जाते.

**४) खुली वसाहत :-** खुल्या कारागृहातील बंद्यांची निवड शासनामार्फत (गृह विभाग) करण्यात येते. या कारागृहातील बंद्यांना त्यांच्या कुटुंबीयांसमवेत राहण्याची मुभा आहे. खुल्या वसाहतीत बंद्यांना शेतीचे काम किंवा जवळपासच्या मान्यवर संस्थांकडे काम देण्याचे आयोजन कारागृह अधीक्षकांमार्फत केले जाते. या कारागृहाचे प्रशासन व नियंत्रण कारागृह अधीक्षक व इतर आवश्यक कर्मचाऱ्यांमार्फत केले जाते.

**५) बंद्यांना कारागृहात ठेवण्याची व्यवस्था :-** कारागृह खात्यात सराईत गुन्हेगार नाशिक रोड व अमरावती मध्यवर्ती कारागृह येथे ठेवले जाते. विशेष बंदी म्हणून प्रमाणीत केलेल्या बंद्यांस रत्नागिरी विशेष कारागृहात ठेवले जाते.

**६) किशोर सुधारालय :-** नाशिक येथे एक किशोर सुधारालय शाळा असून तेथे बाल गुन्हेगारांच्या फायद्यासाठी व्यवसाय प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आलेले आहेत. इयत्ता दहावीपर्यंतचे नेहमीचे शैक्षणिक वर्ग चालविले जातात. ज्या बाल गुन्हेगारांना पुढील उच्च शिक्षण घ्यावयाचे असेल त्यांना आवश्यक त्या सवलती दिल्या जातात. हिंदी, उर्दु इत्यादी भाषांचे वर्ग घेतले जातात. औद्योगिक प्रशिक्षणाकडे प्रवृत्ती असणाऱ्या विद्यार्थ्यांना स्थानिक औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत पाठविले जाते. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडे प्रशिक्षणासाठी बाल गुन्हेगार पाठविण्याच्या पध्दतीचे परिणाम उत्साहवर्धक आहेत.

### ❖ बंद्यांचा कारागृहात प्रवेश

कारागृहात न्यायाधीन बंदी, शिक्षा झालेले, स्थानबध्द, दिवाणी बंदी यांनी कारागृहात प्रथम दाखल केल्यानंतर खालील बाबी कारागृह अधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार करावयाच्या असतात.बंद्याने स्वतःजवळील रोकड रक्कम, दागिने व इतर मौल्यवान वस्तू कारागृह अधिकाऱ्यांकडे जमा करणे, या वस्तू बरोबर जमा केल्याबद्दलची बंदी अधिकाऱ्यांकडून खात्री करू शकतो. बंद्यांना सुटताना त्यांच्या वस्तू परत करण्यात येतात. कारागृहात बंदी दाखल झाल्यावर नियमाप्रमाणे प्रशासनाकडून दैनंदिन वापरण्यासाठी थाळी, मग,

वाटी देण्यात येते. तसेच बंदी कपडे व बिस्तरा देण्यात येतो. बंदी न्यायाधीन असल्यास तसेच स्थानबंद्यांना त्यांचे स्वतःचे कपडे वापरण्याची स्वतःचा बिस्तरा वापरण्याची तरतूद आहे. परंतु न्यायाधीन बंदी स्वतःच्या बिस्तऱ्याची व्यवस्था करू शकला नाही तर त्याला कारागृहाकडून तो दिला जातो. भारतीय दंड विधान कलम ३०२ च्या खाली दाखल न्यायाधीन बंद्यांना सुरक्षा व्यवस्था म्हणून कैदी कपडे वापरणे सक्तीचे आहे. बंदयांना शिक्षेनुसार तसेच नैमित्तिक, सराईत, पळपुटा हे ओळखता येण्यासाठी नियमाप्रमाणे त्यांच्या शर्टच्या बाहीवर पिवळी, निळी व लाल पट्टी लावली जाते.

बंद्यांस कारागृहात प्रवेश दिल्यावर त्याची वैद्यकीय तपासणी शासकीय रुग्णालयामध्ये करुन त्याच्या अंगावरील खुणा संबंधित रजिस्टरमध्ये नोंदविण्यात येतात. न्यायाधीन बंदी, शिक्षा झालेले बंदी, किशोरवयीन बंदी, स्थानबध्द यांना वेगवेगळ्या विभागांत प्रशासनाच्या सोईनुसार ठेवले जाते. स्त्री बंद्यांना वेगळ्या स्वतंत्र व सुरक्षित कक्षात ठेवले जाते. स्त्री बंद्यांसोबत असलेल्या ६ वर्षांखालील मुलांना त्यांच्या जवळ ठेवण्याची तरतूद आहे. अशा मुलांसाठी कारागृहात खेळणी व पोषक अन्न देण्याची व्यवस्था आणि बालवाडीची व्यवस्था देखील करण्यात येते.

### ❖ क्वारंटाईन पीरिएड

शिक्षा झालेल्या बंद्यांना किमान १० दिवस या कक्षात ठेवून कारागृहाच्या एकूण नियमावलीचे व इतर बाबी, सवलतींबाबतची त्यांना माहिती करुन दिली जाते. ज्या बंद्यांना ते कारागृहात आल्यामुळे त्यांच्या कौटुंबिक अडचणी, वैयक्तिक अडचणी याबाबत प्रशासन त्यांच्याशी मोकळेपणाने चर्चा करुन अशा अडचणी पत्रव्यवहार करुन व वाटल्यास कारागृहात कार्यरत असलेले परिविक्षा अधिकारी, कल्याण अधिकारी, संपर्क अधिकारी यांना समक्ष पाठवून त्या अडचणी सोडविण्यासाठी प्रशासन मदत करते.

### ❖ कारागृह दैनंदिनी

कारागृहांतील नियमाप्रमाणे बंद्याने सकाळी ५.१५ ते ५.३० या दरम्यान उठणे आवश्यक आहे. त्यानंतर सकाळची गिनती, प्रार्तविधी तसेच सकाळचा चहा, नाष्टा घेतल्यावर साधारणतः ७.३० ते ७.४५ च्या दरम्यान शिक्षा लागलेल्या बंद्यांना दिलेल्या कामावर जाणे आवश्यक आहे. सकाळचे जेवण १०.४५ पर्यंत संपवून परत कामावर गेल्यावर अर्धा तास विश्रांती घेतल्यावर ४.३० वाजता कामावरुन परत येणे, नंतर खेळ व सायंकाळचे जेवण उरकल्यावर सायंकाळी ६.१५ म्हणजेच सूर्यास्ताच्या दरम्यान गिनती करुन कारागृहाची बंदी केली जाते. रात्री ९.३० नंतर बंद्यांनी जागे राहू नये असा नियम आहे.

न्यायाधीन बंद्यांना काम देण्याबाबत किंवा कामाची सक्ती करण्याबाबत कायद्यात तरतुद नसल्यामुळे सकाळचे जेवण आटोपल्यावर साधारणतः दुपारी १२ ते ३ वाजेपर्यंत त्याने आपल्या बॅरेकमध्ये

बंद होणे आवश्यक असते. जेणेकरुन न्यायाधीन बंदी विनाकारण त्यांचे नियोजित कक्षातून इतरत्र फिरू नये यासाठी सुरक्षा व्यवस्था तसेच शिस्त न बिघडण्याबाबत प्रशासन जागरुक असते.

जे न्यायाधीन बंदी व साधी शिक्षा असलेले बंदी स्वेच्छेने कारागृहातील काम करण्यास इच्छुक असतील, त्यांना कारागृह प्रशासन प्रोत्साहनपर मजुरी नियमानुसार देते. याबाबीसाठी कारागृह प्रशासन प्रयत्नशील असते.

❖ **कारागृहात बंद्यांना कपडे, बिस्तरा व इतर गरजेच्या वस्तू पुरविणे. तक्ता क्र. ३.१**

सिध्ददोष बंद्यांना खाली नमुद केल्याप्रमाणे कपडे, बिस्तरा साहित्य व इतर गरजेच्या वस्तू देण्यात येतात. न्यायाधीन बंद्यांना त्यांचे खाजगी कपडे वापरता येतात. बिस्तरा व इतर गरजेच्या वस्तू देण्यात येतात.

| **अ.क्र.** | **वस्तु** | **पुरुष बंदी** | **महिला बंदी** |
|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** |
| १ | सुती आणि लोकरचे ब्लँकेट | १ | १ |
| २ | सुती चादर | १ | १ |
| ३ | सतरंजी | १ | १ |
| ४ | सुती सदरा | १ | -- |
| ५ | सुती व लोकरी जॅकेट (थंडीत) | १ | -- |
| ६ | विजारी | २ | -- |
| ७ | टोपी | १ | -- |
| ८ | सुती साड्या | -- | २ |
| ९ | सुती चोळ्या | -- | २ |
| १० | सुती पेटीकोट | -- | २ |
| ११ | डायपर | -- | ८ |
| १२ | उशी व उशीचे कव्हर | १ | १ |
| १३ | ॲल्युमिनियमचा मग | १ | १ |
| १४ | थाळी | १ | १ |
| १५ | वाटी | १ | १ |

**आधार --** शासन अधिसूचना क्रमांक जेएलएम-१००६/प्र.क्र.२४८/पीआरएस-२, दिनांक ७ फेब्रवारी २००७

❖ **वैयक्तिक स्वच्छतेसाठी खालीलप्रमाणे सवलती देण्यात येत आहेत. तक्ता क्र. ३.२**

| **अ.क्र.** | **वस्तू** | **पुरुष बंदी** | **महिला बंदी** | **शेरा** |
|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** | **५** |
| १ | दंत मंजन | ५० ग्रॅम | ५० ग्रॅम | महिन्यातून एकदा |
| २ | आंघोळीचा | ११३ ग्रॅम | ११३ ग्रॅम | महिन्यातून एकदा |
| ३ | साबण | १४ ग्रॅम | १४ ग्रॅम | आठवड्यातून एकदा |
| ४ | खोबरेल तेल | २८ ग्रॅम | २८ ग्रॅम | वॉर्डर व वॉचमन महिला शिफ्ट |
| ५ | खोबरेल तेल | -- | २८ ग्रॅम | लहान मुले |
| ६ | खोबरेल तेल कार्बोलिक सोप | ५८ ग्रॅम | ५८ ग्रॅम | महिन्यातून एकदा कुंडा काम करणारे बंदी व लहान मुले |

❖ **बंद्यांचे शास्त्रीय वर्गीकरण**

बंद्यांचे त्याच्या एकूण गरजेप्रमाणे कारागृहातील उपचार वेळोवेळी त्यांच्या एकूण काळाने समन्वित करुन राबविणे किंवा हा समन्वय साधताना बंद्यांचे मानसिक निदान, उपचार लक्षात घेऊन वर्गीकरण समितीमार्फत प्रशासनाचा कार्यक्रम याला शासकीय वर्गीकरण म्हणतात. या प्रक्रियेत बंद्यांना कामाचे वाटप तसेच त्यांचा मानसिक अभ्यास इत्यादी बाबींचा समावेश आहे. त्याप्रमाणे कारागृह प्रशासन त्यांच्या वेळोवळीच्या गरजा लक्षात घेऊन कार्यक्रम आखते. वेळोवेळी बंद्यांचे पुनर्विलोकन या एकंदरीत प्रक्रियेत समाविष्ट असते. या एकूण प्रक्रियेचा उद्देश बंद्यांना त्यांच्या गरजेनुसार प्रयोजन केल्यामुळे बंद्यास कारागृहाच्या जीवनात तसेच तो कारागृहातून सुटल्यावर त्याचा परिणामकारक उपयोग होईल असा आहे.

❖ **पत्रव्यवहार**

बंद्यांने नातेवाईकांशी, मित्रांशी, वकिलांशी पत्रव्यवहार करण्याची तरतूद आहे. नियमाप्रमाणे बंद्यांच्या येणाऱ्या व जाणाऱ्या पत्रांची छाननी केली जाते. बंद्यांने कोणास पत्र पाठविणार याबाबतची यादी देणे आवश्यक असते. कारण बंद्यांने महिन्यातून दोन पत्रे (एक स्वखर्चाने व एक शासकीय खर्चाने) पाठविण्याबाबत सवलत आहे. येणाऱ्या व जाणाऱ्या पत्रांचा मजकूर हा कारागृह अधिकारी यांना समजेल असा असावा. तसेच येणाऱ्या व जाणाऱ्या पत्रांतील मजकूर खासगी किंवा वैयक्तिक अडीअडचणींबाबतचा असावा. वेळ पडल्यास व कारण संयुक्तिक असल्यास जादा पत्र स्वत:च्या खर्चाने

पाठविण्याची परवानगी दिली जाते. येणाऱ्या पत्राबाबत किती पत्रे यावीत यावर बंधन नसते. प्रसंगी बंद्यांस तार अगर रजिस्टर पोस्टाने देखील पत्रव्यवहाराची सोय असते. येणाऱ्या-जाणाऱ्या पत्रांतील मजकूर जर संशयास्पद आक्षेपार्ह असल्याचे दिसून आले तर सुरक्षा कारणास्तव असा पत्रव्यवहार थोपवून धरण्यात येतो व त्याची माहिती संबंधित बंद्यास सांगितली जाते.

**वर्तमानपत्रे**

बंद्यांना मराठी, हिंदी, इंग्रजी, उर्दू व तत्सम भाषिक शासन मान्य यादीतील वर्तमानपत्रे २० बंद्यांकरिता एक नग याप्रमाणात शासन खर्चाने पुरविण्यात येतात. बंद्यांना त्या त्या विषयातील पुस्तके ठेवण्याची मुभा दिली जाते. तसेच न्यायाधीन बंद्यांना त्यांची इच्छा असल्यास त्यांच्या खासगी रकमेतून शासनमान्य वर्तमानपत्रे खरेदी करता येतात.

## ❖ कायदेविषयक मदत

(अ) बंद्यांना कारागृहामार्फत उच्च/सर्वोच्च न्यायालयात अपील करावयाचे असल्यास त्यांना पूर्ण सहकार्य व मदत प्रशासनाकडून दिली जाते महाराष्ट्र शासनाने आता महाराष्ट्र राज्य, (तुरुंग आणि बाल सुधारगृह यांना भेट) प्रकरण नियम १९९३ केले आहेत. या नियमानुसार कार्यसमुपदेशक (Duty Counsellor) यांची नेमणूक करण्यात आली असून त्यांच्यामार्फत कायदेविषयक सल्ला व साहाय्य मिळवून देण्याचा उद्देश आहे. याद्वारे सर्व न्यायाधीन बंदी यांना कार्यसमुपदेशन यांच्याकडून साहाय्य मिळण्यासाठी बंद्यांचे अर्ज त्यांच्याकडे पाठविण्यात येतात व प्रोत्साहन देण्यात येते.

(ब) ज्या बंद्यांना अपिलांसाठी व केससाठी स्वतःचा वकील नेमणे शक्य नसेल, अशा बंद्यांना शासनातर्फे वकील देण्याची तरतूद आहे.

(क) बंदी कारागृहात आल्यामुळे त्यांचे आर्थिक व्यवहार चालू ठेवणेबाबत त्याला त्याच्या इच्छुक व्यक्तीला पॉवर ऑफ ॲटर्नी (मुखत्यार) पत्र करुन देण्याची तरतूद आहे.

(ड) बंद्याला इच्छापत्र करुन ठेवता येते.

(ई) बंद्यांना पुढील शिक्षणासाठी सर्वतोपरी प्रोत्साहन देऊन मदत केली जाते व तसे प्रशिक्षण वर्ग चालविले जातात तसेच सर्व सोईसुविधा उपलब्ध करुन दिल्या जातात.

## ❖ बंद्यांसाठी उपाहारगृह

कारागृहातील बंद्यांसाठी दैनंदिन आहारव्यतिरिक्त कारागृहात उपाहारगृहाची व्यवस्था नियमानुसार केलेली आहे. ही उपाहारगृहे **ना नफा ना तोटा** या तत्त्वावर चालविली जातात. या उपाहारगृहांतून बंद्यांसाठी कूपन्सद्वारे साधारणतः खालील नमूद वस्तू विक्रीसाठी ठेवण्यात येतात. प्रत्येक बंद्यास त्याचे वेतन व खासगी रकमेतून जास्तीत जास्त १५०० कुपन्स दिले जातात. कूपन्स ही अहस्तांतरणीय असतात.

(अ) चहा, कॉफी, दूध

(ब) लोणची, ब्रेड, बिस्किटे, चॉकलेट, अंडी, साखर, शेंगदाणे, गूळ

(क) बिडी-सिगारेट, तंबाखू

(इ) साबण, तेल कंगवे इत्यादी

(फ) टूथपेस्ट, टूथ पावडर, ब्रश

(ग) कागद, पेन्सिल, पेन, बॉलपेन, नोट-बुक्स इत्यादी लिखाणाच्या वस्तू

(च) पोस्टकार्ड, लिफाफे, आंतरदेशीय पत्रे, तिकिटे

(छ) उपाहारगृहातून बंद्याच्या खाद्योपयोगी पदार्थ मागणीनुसार व सणानुसार नियमात बसत असलेल्या वस्तुच तयार करुन विकल्या जातात.

## ❖ बंद्यांसाठी सण व उत्सवांचे आयोजन

कारागृहात बंद्यांना समाजापासून वंचित असल्याने वावगेपणा वाटू नये या उद्देशाने त्यांच्यासाठी रक्षाबंधन, गणेशोत्सव, दिवाळी, नाताळ, रमजान ईद तसेच १५ ऑगस्ट, २६ जानेवारी, १ मे असे सण कारागृहात साजरे केले जातात. २ ऑक्टोबर **महात्मा गांधी जयंती हा बंदी कल्याण दिन** म्हणून साजरा करण्यात येतो.

या सणांच्या दिवशी कारागृह उपाहारगृहात बंद्यांसाठी निरनिराळे खाद्यपदार्थ विक्रीला ठेवले जातात तसेच राष्ट्रीय सणाच्या दिवशी शासनातर्फे बंद्यांना मिष्टान्न व जास्तीचे जेवण पुरविले जाते. या सर्वांचा एकंदरीत उद्देश बंद्यांस आपणही समाजातच वावरत आहोत असे वाटावे हा आहे.

**माफीची पध्दत**

बंद्यांना माणूस समजणे हा कारागृह प्रशासनाचा दृष्टिकोन आहे. त्यांना त्याची जाणीव होणेकामी माफी पध्दतीची सवलत आहे.

| | |
|---|---|
| साधारण माफी | ७ दिवस |
| रात्र पहारेकरी (नाईट वॉचमन) | ८ दिवस |
| सिध्ददोष अन्वेषक (वॉर्डर) | ९ दिवस |
| कुंडाकाम | १० दिवस |
| एक वर्ष झाल्यानंतर चांगल्या वर्तणुकीची माफी | ३० दिवस |
| खुल्या कारागृहातील माफी | एक महिन्याला ३० दिवस |
| खुली वसाहत माफी | एक महिन्याला ३० दिवस |

बंद्यांना चांगले काम व वर्तणुकीबद्दल विशेष कारणे/ प्रसंगानिमित्त राज्य माफी जाहीर केली जाते. या सर्व उपक्रमांचा एकूण उद्देश बंदी कारागृहात सद्वर्तनी व कामात मग्न राहून प्रशासनाला व त्याला स्वतःला मदत व्हावी असा आहे. बंद्यास ठरावीक कालावधीपर्यंत एकूण १/३ काळापेक्षा अधिक सूट मिळत नाही. तसेच सराईत गुन्हेगार व प्रशासकीय कारणांस्तव रत्नागिरी विशेष कारागृह येथे पाठविण्यात आलेल्या बंदी इत्यादींना माफी देय नाही. एन.डी.पी.एस. ॲक्टमध्ये दिनांक २९ मे १९८९ नंतर शिक्षा झालेल्या कैद्यांना माफी देण्यात देण्या येते.

❖ **बंदी अधिकारी पध्दत**

**रात्र पहारेकरी :-** सिध्ददोष बंद्याने शिक्षेचा ठराविक कालावधी भोगल्यानंतर, त्याची कारागृहातील चांगली वर्तणूक व मिळालेल्या माफीनुसार तो रात्र पहारेकरी या पदावर काम करण्यास पात्र होतो.

**सिध्ददोष अन्वेषक :-** सिध्ददोष रात्र पहारेकरी बंद्याने सहा महिने शिक्षा भोगल्यानंतर त्याची कारागृहातील वर्तणूक चांगली व मिळालेल्या माफीनुसार तो सिध्ददोष या पदावर काम करण्यास पात्र होतो.

कारागृहातील उद्योगप्रिय, चांगली वर्तणूक व जबाबदारी सांभाळण्यास योग्य अशा बंद्यांना त्यांचा ठराविक शिक्षेचा काळ झाल्यावर रात्र पहारेकरी व सिध्ददोष अन्वेषक अशी पदोन्नती देण्यात येते. या

बंद्यांस कारागृह कायदा, १८९४ अन्वये शासकीय कर्मचारी म्हणून समजले जाते. या संवर्गाने कारागृहात बंद्यांपासून ओळखण्यासाठी प्रचलित नियमांनुसार वेगळे कैदी कपडे दिले जातात. हा संवर्ग प्रशासनात आणि बंद्यांत समन्वय व एक प्रकारचा दुवा म्हणून कार्यरत असतो.

### ❖ बंदी कल्याण निधी

शासनाने बंद्यासाठी बंदी कल्याण निधीची सोय केली आहे. या कल्याण निधीतून गरजू बंद्यांसाठी व त्यांच्या कुटुंबीयांसाठी आर्थिक मदत दिली जाते. तसेच बंद्यांचे शिक्षण, व्यावसायिक शिक्षण, चष्मे, अपंगांसाठी कुबड्या, सुटलेल्या गरजू बंद्यांसाठी मदत या निधीतून केली जाते.

### ❖ रेसिप्रोकल ट्रान्सफर (आंतरराज्यात बंद्यांना बदली करण्याची सुविधा)

जे बंदी दुसऱ्या राज्यातील असतील आणि त्यांना महाराष्ट्रातील न्यायालयाकडून शिक्षा झाली असेत, अशा बंद्यांचे अपील निकालात निघाल्यावर बंद्यांच्या विनंतीवरुन त्यांच्या मूळ राज्यातील जवळच्या कारागृहात पाठविण्याची सोय आहे. या सवलतीमुळे त्यांच्या नातलगांना तो वेळोवेळी भेटून आपल्या कुटुंबीयांशी संबंध ठेवू शकतो. हा उपक्रम बंद्यांच्या पुनर्वसनातील एक भाग आहे. सदरचा निर्णय हा शासन स्तरावर होतो.

### ❖ सल्लागार मंडळ

दीर्घ मुदतीच्या शिक्षा झालेल्या बंद्यांनी ठरावीक शिक्षा भोगल्यावर त्यांची प्रकरणे सल्लागार समितीपुढे पुनर्विलोकनार्थ ठेवण्यात येतात. या सल्लागार मंडळापुढे बंद्यांचे पूर्व इतिहास, गुन्हा घडण्यामागील कारणे, तसेच त्यांची कारागृहातील एकंदरीत वर्तणूक जमेस धरुन त्यांच्या मुदतपूर्व सुटकेबाबत विचार करण्यात येतो. सल्लागार मंडळाच्या बैठका वर्षातून दोन वेळा घेण्यात येतात. हीच पध्दत जन्मठेप बंद्यांसाठी लागू असते. परंतु दिनांक १८ डिसेंबर १९७८ नंतर जन्मठेप शिक्षा झालेल्या बंद्यांना सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार कमीत कमी १४ वर्षे निव्वळ शिक्षा भोगणे आवश्यक आहे. तसेच बंद्यांच्या एकूण गुन्ह्यांची पार्श्वभूमी तसेच कारागृहातील वर्तणूक, बंद्यांचे स्वरूपाचे आजार व अतिवयोवृध्द या गोष्टी जमेस धरुन शासन , शासन अधिकारात प्राप्त झालेल्या अधिकारान्वये बंद्यांना माफीसह ठराविक वर्षांच्या कलावधीनंतर सोडण्याबाबत आदेश देते या एकूण प्रक्रियेचा उद्देश म्हणजे बंद्यांचे कारागृहातील सर्वसाधारण नियम पाळून कारागृह प्रशासनाकडून आयोजित केलेल्या उद्योगाचा पुरेपूर फायदा घेऊन मुदतपूर्व सुटून स्वतःच्या कुटुंबात पुनःस्थापित होणे असा आहे.

## ❖ तक्रार पेटी

सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांच्या सूचनेनुसार कारागृहात तक्रार पेटी ठेवण्यात येते. या तक्रार पेटीत बंद्यांनी कारागृह प्रशासनाविरुध्द किंवा त्यांच्या अडचणी सोडवू शकले नसल्यास अशाबाबत लिखित स्वरुपात तक्रार या पेटीत अर्जाद्वारे टाकण्याची सोय आहे. ही तक्रार पेटी सीलबंद करुन त्यांच्या चाव्या स्थानिक सत्र न्यायाधीशांकडे पाठविल्या जातात. सत्र न्यायाधीश वेळोवळी या तक्रार पेट्या उघडून तक्रारीच्या पत्रांची दखल घेतात. अशीच दुसरी तक्रार पेटी ठेवून कारागृहातील बंदी त्यांच्या अडचणी प्रशासनासमोर मांडू शकतात. या तक्रार अर्जाचा निपटारा दर सोमवारी करण्यात येतो.

## ❖ बंदी पंचायत व्यवस्था

बंद्यांमध्ये शिस्त, सहकार्याची तसेच एकंदरीत जबाबदारीची जाणीव व एक प्रकारचा आत्मविश्वास जागृत ठेवण्याबाबत बंद्यांच्या पंचायतीचे गठन केले जाते. या पंचायतीत फक्त चांगल्या वर्तणुकीच्या बंद्यांना भाग घेण्यास परवानगी असते. कारागृहाच्या एकूण विस्ताराच्या मानाने असे किती पंच ठेवावे हे प्रशासन ठरविते. पंचाची निवड झाल्यावर त्यांनी खालील बाबींबाबत लक्ष पुरवुन प्रशासनाशी समन्वय साधून अडचणी दूर करणे असा उद्देश आहे.

१) कारागृहातील स्वच्छता, २) आरोग्य, ३) बंद्यांना देण्यात येणारे रोजचे जेवण व्यवस्थितपणे वाटणे, ४) बंद्यांना वेळोवेळी वैद्यकीय मदत मिळण्याबाबत ५) बंद्यांसाठी करमणुकीचे आयोजन करणे, ६) बंद्यांमध्ये एकोपा ठेवणे, ७) प्रशासनाला सर्वतोपरी मदत करणे.

## ❖ खुले कारागृह व खुल्या वसाहती

कारागृह प्रशासनाचा बंद्यांच्या पुनर्वसनाचा हा शेवटचा टप्पा आहे. महाराष्ट्रामध्ये येरवडा खुले कारागृह ही संस्था १९५६ मध्ये अस्तित्वात आली आहे. पैठण खुले जिल्हा कारागृह ही संस्था १९६८ साली सुरू करण्यात आली आहे. तसेच स्वतंत्र खुली वसाहत, आटपाडी, जिल्हा सांगली ही संस्था १९५६ मध्ये सुरू झालेली आहे.

**खुले कारागृह :-** बंद कारागृहातील शिक्षा लागलेल दीर्घ मुदतीच्या बंद्यांची त्यांची ठराविक काळ शिक्षा भोगल्यावर, तसेच गुन्ह्याचा पूर्व इतिहास, बंद्यांची मानसिक, शारीरिक प्रकृती उत्तम आहे. आणि ज्यांना खुले कारागृहात जाण्याची इच्छा आहे, तसेच कष्टाची कामे करावयाची सवय आहे व कारागृहातील वर्तणूक चांगली आहे अशा बंद्यांची खुल्या कारागृहासाठी समितीकडून निवड केली जाते. निवड झाल्यावर माननीय कारागृह महानिरीक्षक यांच्या आदेशान्वये त्यांना येरवडा खुले कारागृह किंवा पैठण खुले जिल्हा

कारागृह तेथे पाठविण्यात येते. पैठण खुले जिल्हा कारागृह येथे एकूण ३०० बंदी ठेवण्याची तसेच येरवडा खुले कारागृह येथे १५० बंदी ठेवण्याची क्षमता आहे. या दोन्ही कारागृहांत बंद्यांना मुख्यतः शेतीचे काम व विणकाम विभागात काम दिले जाते.

खुले कारागृहातील बंदी असल्यामुळे त्यांची सुरक्षा व्यवस्थाही कमी असते. खुल्या कारागृहातील बंद्यांना माफीची सवलत बंद कारागृहातील बंद्यांपेक्षा जास्त असते. बंद्यांवर निर्बंधही कमी प्रमाणात असतात. कारागृह प्रशासनाचा जास्तीत जास्त बंद्यांना खुले कारागृहात पाठविणे हा उद्देश असतो.

**खुली वसाहत :-** साधारणतः खुल्या कारागृहात खुल्या वसाहतीसाठी बंद्यांचा तपशील कारागृह महानिरीक्षक हे त्यांच्या अभिप्रायासह शासनाकडे पाठवितात. त्यानंतर शासन, गृह विभाग, शासनाला प्रदान केलेल्या अधिकारांत त्यांना खुली वसाहत येथे पाठविण्याचे आदेश देते.

### ❖ कारागृहात बंद्यांना बाळगण्यास निषिध्द असणाऱ्या वस्तू

कारागृहात एकूण शांतता सुव्यवस्था राखण्यासाठी काही पथ्य पाळावयाचे असते. ज्या वस्तू नियमाने बंद्यांना बाळगण्यास मनाई आहे अशा वस्तू कारागृहात बाळगण्यास मज्जाव असतो. त्या वस्तूना निषिध्द वस्तू म्हणतात. साधारणतः खालील नमूद केलेल्या वस्तू कारागृहात बाळगण्यास निषिध्द असतात.

१. मोबाईल

२. दारू, स्पिरीट

३. जुगारासाठीच्या वस्तू इत्यादी

४. रोकड रक्कम

५. भांग, गांजा, चरस,अफू, ब्राऊन शुगर इत्यादी मादक पदार्थ

६. सोने, चांदी अशा मौल्यवान वस्तू

७. पिस्तूल व इतर ज्वालाग्राही वस्तू चाकू , सुरे

८. बांबू शिड्या, दांडे, काठ्या, दोर व तत्सम वस्तू जेणेकरुन बंद्यांना पलायनासाठी मारामारी वगैरेसाठी उपयोग होऊ नये.

### ❖ कारागृहातील बंद्यांनी शिस्तीबाबत पाळावयाचे मार्गदर्शन

बंद्यांना सवलती देण्याबाबत तरतुदी आहेत. त्यांनी सवलतींचा फायदा घ्यावा. तसेच त्यांची काही कर्तव्येही असतात. ती खालीलप्रमाणे नमूद केली आहेत.

१. बंद्याने कारागृह प्रशासनातील अधिकारी, लिपिक वर्ग, तांत्रिक वर्ग, तांत्रिक कर्मचारी वर्ग तसेच बंदी अधिकारी यांच्या आज्ञा पाळाव्यात.

२. बंद्यांनी त्यांच्या कामाच्या जागा सोडुन, संयुक्तिक कारणाशिवाय कोठेही जाऊ नये.

३. बंद्यांनी आपापसांत भांडणे, ओरडणे, मोठ्याने गाणे म्हणणे हे निषिध्द आहे.

४. कारागृहाच्या नियमांप्रमाणे व वेळापत्रकाप्रमाणे वागणे.

५. बंद्यांनी दिलेले कपडे व बिस्तरे स्वच्छ ठेवावेत व स्वतःही स्वच्छ राहावे.

६. कोणतेही मादक पदार्थ, (उदाहरण) दारू, गांजा ,चरस या वस्तू जवळ बाळगू नयेत.

७. पळून जाण्याचा प्रयत्न करू नये.

८. जुगार खेळू नये.

९. सहकारी बंद्यांच्या वस्तू चोरू नयेत.

१०. स्वतःची कँटीन कुपन्स दुसऱ्यास देऊ नये.

११. सरकारी मालमत्तेचे नुकसान होऊ देऊ नये.

१२. बरॅक व परिसर स्वच्छ ठेवावा.

१३. प्रशासनाने नेमून दिलेलेच काम करावे.

१४. अधिकाऱ्यांचे आदेश पाळावेत.

१५. गुन्हा करू नये व करणाऱ्यास मदत करू नये.

१६. अफवा फैलावू नयेत.

१७. बंद्यांनी दिलेल्या कैदी कपड्यात बदल करू नये.

### ❖ बंद्यांना कारागृहात देण्यात येणाऱ्या शिक्षा

वरील परिच्छेदात बंद्यांना कारागृहात कसे वागावे याबाबत थोडक्यात चर्चा केलेली आहे. बंद्यांने कारागृहात वर नमूद केलेल्या सर्वसाधारण नियमांचे उल्लंघन केल्यास कारागृह नियमावली त्या त्या कारागृहीन अपराधाबद्दलच्या स्वरूपानुसार कारागृहीन शिक्षेची तरतूद केलेली आहे. कारागृहीन शिक्षा खालीलप्रमाणे असते.

१) ताकीद देणे

२) माफी कापणे

३) कामात बदल करणे

४) पदावनत करणे

५) विभक्त कोठडीत बंद करणे

६) ठराविक काळासाठी उपाहारगृह व भेटीची सवलत बंद करणे व अशा तत्सम शिक्षा

७) न्यायालयाच्या परवानगीने हातकडी व दंडाबेडी काही क्वचितप्रसंगी देण्याची शिक्षा दिली जाते.

## ❖ बंद्यांच्या हक्काची जोपासना

महाराष्ट्र कारागृह नियमावली ही बंद्यांच्या सर्वतोपरी कल्याणासाठी, त्यांचा आशावाद ज्वलंत ठेवण्यासाठी औद्योगिक प्रशिक्षण देऊन तसेच माणूस म्हणून वागणूक देऊन, तो सुटल्यानंतर समाजात व कुटुंबात पुनःस्थापित होणे असे आहे. परंतु इतर काही राज्यांतील कारागृहांत त्यांच्या मूलभूत हक्कांचे कारागृह प्रशासनाकडून उल्लंघन झालेले दिसून आले म्हणून निरनिराळ्या संस्था उदाहरणार्थ सर्वोच्च न्यायालय, उच्च न्यायालय, राष्ट्रीय मानवी हक्क आयोग यांनी दखल घेतलेली आहे.

## ❖ भारतीय घटनेने प्रदान केलेले हक्क

भारतीय घटनेतील अनुच्छेद २१ अन्वये कोणत्याच प्रकारचा मानसिक व शारीरिक छळ होता कामा नये. जर अशा प्रकारचे कृत्य झाल्यास सक्षम न्यायालय अशा बाबींची दखल घेते. तसेच बंद्यांना कारागृहातील राहणीमान, स्वच्छता व इतर बाबींबाबत या कलमात तरतूद केलेली आहे.

## ❖ बंद्यांना मोफत कायदेविषयक मदत / सल्ला

१. कायदेविषयक मदत व सल्ला हा बंद्यांच्या मूलभूत हक्क असून गरजू व गरीब बंद्यांना वेळोवेळी उपलब्ध करुन देणे हे कारागृह प्रशासनाचे कर्तव्य आहे.
२. जे बंदी स्वतः कायदेविषयक मदतीची व सल्ल्याची व्यवस्था करू शकत नाहीत, अशा बंद्यांना शासनाने ती मदत मोफत उपलब्ध करून देणे हे भारताच्या घटनेनुसार परमकर्तव्य असेल.
३. बंद्यांच्या अटक झाल्याच्या तारखेपासून कोर्टात प्रकरण चालून शेवटी अपील करून तसेच संपूर्ण अपिलाचा निर्णय होईपर्यंत तसेच बंदी न्यायाधीन किंवा शिक्षा झालेले त्यांना कायदेविषयक मदत देणे हे कारागृह प्रशासनाचे कर्तव्य आहे.
४. शासनाचे कर्तव्य आहे की, त्यांनी त्या आरोपीला मोफत कायदेविषयक सल्ला मिळू शकतो याची जाणीव करुन देणे.
५. ज्या न्यायाधीन बंद्यांना शासनाकडून त्यांची बाजू मांडण्यासाठी कायदेशीर मदत देण्यात आली नसेल. त्याचा परिणाम म्हणून त्याला कारणांमुळे रद्दबातल होऊ शकते.

मोफत कायदेविषयक सल्ला व मदत गरजू बंद्यांना खालीलप्रमाणे देणे अपेक्षित आहे. कायदेविषयक सल्ला लिखित स्वरूपात किंवा तोंडी सल्ला संबंधित बंद्यास देणे ही बाब त्या त्या प्रकरणाच्या एकूण स्वरूपानुसार असेल.

**कायदेविषयक मदत**

१. कोर्टाची फी, साक्षीदारांचा खर्च तसेच प्रकरण चालू असताना इतर खर्चांची जी काही देय असलेली रक्कम.

२. बंद्यांकडून वकील नेमण्याबाबत.

३. न्यायनिर्णयाची प्रत मोफत उपलब्ध करुन देणे.

४. पेपर, पुस्तके यांची छपाई, भाषांतर इत्यादींबाबत मदत करणे.

५. अपिलाचा एकूण मसुदा (Drafting) तयार करणे.

**न्यायाधीन प्रकरणे लवकर निकाली काढण्याबाबतचे मूलभूत हक्क**

भारताच्या एकूण कायदेविषयक बाबीत बंद्यांची न्यायाधीन प्रकरणे वेगाने व लवकर निकाली काढणे याबाबत हक्क समजला गेला आहे. एकूण विलंब प्रशानाकडून होत असेल तर त्या विलंबास बंदी जबाबदार नसून तो न्यायाधीन कोठडीत असेल, अशा बंद्यांना निकाल लागण्याअगोदर त्याच्यावरील असलेले आरोप लक्षात न घेता विनाशर्त मुक्त केले पाहिजे. फौजदारी प्रक्रिया, १९७३ (Criminal Producedure Code, 1973) अन्वये तत्सम कारवाईची तसेच न्यायाधीन प्रकरण लवकर निकाली काढण्याबाबत तरतूद आहे.

फौजदारी प्रक्रिया संहिता कलम क्रमांक १६७(५) अन्वये फौजदारी प्रकरणांतील चौकशी बंद्यांच्या अटकेपासून सहा महिन्यांच्या आत संपविली पाहिजे. अन्यथा संबंधित न्यायालय, पुढील चौकशी थांबवून प्रकरण निकाली काढू शकते. जर संबंधित कारणामुळे न्यायालयाचे समाधान झाले तरच सहा महिन्यांपेक्षा जास्त मुदत वाढवून मिळू शकते या पध्दतीप्रमाणे Jagannath Naidu Versus State of Madras (India Today October 1983 "Ending a Long Wait") सदर प्रकरणात तामिळनाडू हायकोर्टाने सगळ्या दुय्यम न्यायालयांना असे आदेश दिले आहेत की, पोलिसांनी एफ.आय.आर. प्रलंबित ठेवून अटकेनंतर न्यायाधिन बंद्यांवर सहा महिन्यांच्या आत (Charge Sheet) न दिल्यामुळे निर्दोष सोडण्याचे आदेश दिले आहेत. यामुळे निरनिराळ्या कारागृहांतील अनेक न्यायाधीन बंद्यांना जे वर्षानुवर्षे कारागृहात पडून होते याचा फायदा मिळाला.

**राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाची अपेक्षा**

महाराष्ट्र कारागृह नियमावली, १९७९ ही बंद्यांचे एकूण हित लक्षात घेऊन गठीत केली आहे. परंतु काहीं बाबतीत प्रशासनातील काही घटकांद्वारे याबाबत उल्लंघन केल्याचे दिसून आल्यावर त्यांची राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाने दखल घेतलेली आहे. परिणामतः नियमांतील तरतूदीप्रमाणे खालील नमूद बाबींबाबत मानवी हक्क आयोग जागृत असल्याचे दिसून आलेले आहे.

(अ) बंद्यांसाठी निवारा

(ब) बंद्यांसाठी अन्न, वस्त्र, करमणुकीची साधने.

(क) बंद्यांना कैदेशिवाय इतर अनावश्यक बंधने सुरक्षा सबबीखाली राबविणे.

(ड) बंद्यांसाठी स्वच्छ परिसर असावा, जेणेकरुन त्यांचे आरोग्य चांगले राहील.

(इ) कारागृहातील तसेच पोलिस कोठडीतील मृत्यू व बलात्कार इत्यादी .

(फ) कारागृहातील वैद्यकीय सुविधा

---

**संदर्भ :-** नागरिकांची सनद - गृह (तुरुंग) विभाग महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई

## ३.२ कारागृहाची रचना

कारागृहे ही सुधारगृहे आहेत. बंद्यांना सुधारण्यासाठी कारागृह ही संस्था कार्यरत आहे. कायद्याच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांना न्यायालयाने शिक्कामोर्तब करुन बंद्यांना शिक्षा भोगण्यासाठी पाठवले जाते. बंद्याने केलेल्या कृत्याची शिक्षा म्हणून कारागृहात आल्यानंतर त्याच्यामधील क्रोधाची भावना, वर्तन यांचे निरीक्षण कारागृहातील कर्मचारी करतात. त्याची गुन्ह्यापाठीमागची पार्श्वभूमी कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय इत्यादी संपूर्ण माहिती घेऊन त्यामध्ये सुधारणा करण्यासाठी कारागृह यंत्रणा सज्ज असते. व्यक्तीला त्याने केलेल्या अपराधाची शिक्षा म्हणून त्याला जेव्हा कारागृहात आणले जाते तेव्हा त्याला व्यक्ती स्वातंत्र्याची खरी किंमत कळते. शिक्षा म्हणजे व्यक्तीच्या व्यक्ती स्वातंत्र्यावर निर्बंध होय. तो चार भिंतीच्या आत राहत असताना कुटुंब, समाज यांचे महत्त्व कळते. कुटुंब आणि बंद्यांच्या वर्तनात सुधारणा झाली तर पुढील सुधारण्यासाठी त्याला विविध कामे सोपवणे, थोडी फिरण्याची सवलत देणे, विविध उपक्रमांत, कार्यक्रमात सहभागी करुन घेतले जाते.

या कारागृहात एक विशिष्ट प्रकारची रचना असते आणि येथील कर्मचाऱ्यांची विशिष्ट अशी एक कार्यपध्दती असते. संशोधकाने औरंगाबाद येथील कारागृहातील बंद्यांचा अभ्यास करत असतांना या बंद्यांच्या पुनर्वसनासाठी कार्य करणारी कारागृहाची रचना आणि कार्यपध्दती कशी आहे याचाही आढावा घेतला. मध्यवर्ती कारागृहात एकूण सोळा + तीन असे १९ बॅरेक्स आहेत. त्यापैकी आठ + आठ असे सोळा बॅरेक्सची एक अंडाकृती इमारत असून तळ मजल्यावर आठ आणि प्रथम मजल्यावर आठ असे एकूण सोळा बॅरेक्सची इमारत असून इमारतीच्या मध्यभागी मोकळी जागा अतिशय थोडी आहे.

न्यायाधीन आणि सिध्ददोष अशा बंद्यांना या सोळा बॅरेक्समध्ये ठेवले जाते. सात बॅरेक्समध्ये सिध्ददोष बंद्यांना म्हणजे ज्यांना शिक्षा लागली आहे अशा बंद्यांना ठेवले जाते. एका बॅरेक्समध्ये किमान ४५ बंद्यांना ठेवले जात असून प्रत्येक बॅरेक्समध्ये ७ फॅन, ९ बल्ब, ४ संडास, २ पाण्याचे हौद, १ड्रम, १ पिण्याच्या पाण्याचा ड्रम, १ रांजन, १ टी.व्ही., १ कॅरम असे साहित्य असून प्रत्येक बंद्याला त्याच्या प्रवेशा वेळी सतरंजी, ताट, वाटी, कांबळ २, चादर १, तकिया १, दरी १ असे एकदाच मिळते. तर साबण सुप्रिया महिन्याला एक मिळते. तेल आठ दिवसाला १०० ग्रॅम मिळते, टॉवेल १, हाफ पॅन्ट १, शर्ट १, पॅन्ट १ असे साहित्य दिले जाते. राहण्याच्या ठिकाणचे (बॅरेक्सचे वातावरण) आल्हाददायक नाही. कारण नियमापेक्षा अधिक बंदी आल्यानंतर गर्दी होते. त्यामुळे वातावरण आल्हाददायक राहत नाही असे सांगितले गेले.

आंघोळीसाठी स्वतंत्र बाथरुम नाहीत. बॅरेक्समध्ये आंघोळ करण्यासाठी उघड्या जागेवर करावी लागते. तसेच संडासला दारे नाहीत फक्त दोन भिंती आहेत असे बंद्यांनी सांगितले आणि संशोधकाने स्वतःही पाहिले. संडासला दारे नाहीत, याचे कारण प्रशासनाला विचारले असता बंद्यांनी संडासमध्ये स्वतःला कोंडून घेऊ नये यासाठी संडास रुमला दारे लावली नाहीत. सोळा बॅरेक्स व्यतिरिक्त तीन बॅरेक्सपैकी एक बॅरेक्सचा वापर दवाखान्यासाठी केला जातो. एक बॅरेक्स सेप्रेट यार्ड म्हणून वापरले जाते तर एक बॅरेक्स खुले कारागृह म्हणून वापरले जाते. बॅरेक्समध्ये बंद्यांना वाचनासाठी वर्तमानपत्र २० बंद्यांमागे एक असे आहे. बंद्यांने सायंकाळी ६-९ याच वेळेत ही वर्तमानपत्रे वाचावीत असे आदेश आहेत. यात लोकमत, सकाळ, महाराष्ट्र टाइम्स, लोकसत्ता अशी वर्तमानपत्रे येतात. २० बंद्यांमागे एक वर्तमानपत्र येत असल्यामुळे व वाचनासाठी सायंकाळी ६ ते ९ हीच वेळ असल्याने ती पुरत नाहीत. बहुसंख्य वेळा एक-एक पान वेगळेवेगळे करुन पेपर वाचतात. २० बंद्यांमागे एक पेपरऐवजी १० बंद्यांमागे एक पेपर असावा असे बंद्यांनी सांगितले.

**सेपरेट यार्ड :-**

या यार्डमध्ये बॉम्बस्फोट अशा गुन्ह्याअंतर्गत बंद्यांना ठेवले जाते अतिमहत्त्वाच्या गुन्ह्यात आलेल्या बंद्यांची निवड सेपरेट यार्डात केली जाते. प्रामुख्याने सराईत गुन्हेगारी, टोळी युध्द, संघटित अपराध करणाऱ्यांना या स्वतंत्र यार्डात ठेवले जाते. कारण इतर सामान्य बंद्यांसोबत अशा धोकादायक बंद्यांना ठेवले तर त्यांच्या अपराधाची कौशल्ये या सामान्य बंद्यांना शिकू शकतात म्हणून तसेच या बंद्यांचा प्रभाव सामान्य बंद्यावर पडू नये याचसाठी त्यांना स्वतंत्रपणे ठेवले जाते. याचा नकळत फायदा होतो. संशोधकाने माहिती घेत असताना सेपरेट यार्डात १९९३ च्या बॉम्ब स्फोटांतील बंदी आहेत असे सांगितले गेले.

संशोधकाने या सेपरेट यार्डाची बाहेरुन पाहणी केली असता वरील व्यवस्था दिसून आली. त्याचबरोबर सेपरेट यार्डामधील बंद्यांची संख्या कमी असून त्यांना खेळण्यासाठी आतच पटांगण आहे. ते विविध प्रकारचे खेळ तेथे खेळतात. पण या यार्डामध्ये टी.व्ही. नाही कारण बाहेरच्या जगाचा त्यांच्याशी संपर्क येऊ नये त्यामुळे टी.व्ही नाही असे सांगितले. पण त्यांना पेपर वाचनासाठी दिले जातात. १० बंद्यांमागे एक पेपर असून स्थानिक आणि राष्ट्रीय वर्तमानपत्रे मराठी, हिंदी, उर्दू भाषेतील येतात असे सांगण्यात आले. अत्यंत धोकादायक बंद्यांकरिता सेपरेट यार्ड आहे तरी परंतु त्यातील अतिमहत्त्वाच्या धोकादायक बंद्यांसाठी अंडाकृती एक इमारत आहे. सहसा येथे जास्त बंदी राहत नाहीत. त्यामुळे ज्याला येथे ठेवले जाते त्याला एकांतवास लाभतो.

कारागृहात बंद्यांना राहण्याच्या बॅरेक्सव्यतिरिक्त स्वयंपाकगृह, धान्य साठवण, गोदाम, सांस्कृतिक सभागृह असून कारखाना विभागाचे स्वतंत्र कार्यालय, कारागृह कार्यालय त्यात विविध विभाग कार्यरत असतात. कारागृहाच्या या इमारतीबरोबरच येथील बंदी आणि कर्मचारी या व्यवस्थेचे घटक असतात. कारागृहाचे कर्मचारी आपली नोकरी करीत असतांना कारागृहाचे नियमांचे पालन करावे लागते तसेच सध्य कालीन परिस्थितीचाही आढावा घ्यावा लागतो.

बंद्यांच्या पुनर्वसनासाठी काम करत असताना सर्व कर्मचाऱ्यांना नियोजनबध्द काम करावे लागते. बऱ्याच वेळेस अधिकारी त्यांच्या पातळीवर त्यात थोडया फार प्रमाणात लवचिकता देतात. कारण आपण मानवांसोबत काम करतो. त्यांना सुधारण्यासाठी काम करत असताना बऱ्याच वेळेस लवचिक भूमिका घेतली नाही तर बंदी आणि कर्मचारी यांच्यातील संबंध तणावपूर्ण बनू शकतात. ते तसे बनू नये म्हणून सर्व कर्मचारी संतुलित भूमिका पार पाडत असतात.

कारागृहात कर्मचाऱ्यांना आठ-आठ तासांच्या ड्युटी दिल्या जातात. प्रत्येक जण आपआपल्या ठराविक वेळी येऊन मदतीला अनेक बंदी, वॉर्डर, वॉचमन तसेच कार्यालयीन कामे करतात. सकाळी ओपनिंगपासून रात्री बंदी झोपेपर्यंत आणि रात्रीचे संरक्षण करणारे कर्मचारी सर्वजण निष्ठेने काम करतात.

कारागृह हे बंद्यांना ठेवण्याचे ठिकाण असून ज्यांनी कायदाबाह्य वर्तन केले आहे आणि ज्यांना न्यायालयाने शिक्षा सांगितली आहे अशा बंद्यांना शिक्षा भोगण्यासाठी कारागृहात ठेवले जाते. आजची कारागृहे ही कारागृहे न राहता सुधारणागृहे बनली आहेत. या कारागृहातील अत्यंत महत्त्वपुर्ण घटक म्हणजे काम करणारे कर्मचारी वर्ग होय. अधीक्षक यांच्यापासून शिपायापर्यंत सर्वच कर्मचाऱ्यांना बंद्यांच्या बदलासाठी काम करत असतांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. कारागृहात जे वेगवेगळे विभाग आहेत त्या विभागात काम करताना बऱ्याच वेळेस त्या कर्मचाऱ्यांवर कामाचा ताणा जाणवतो. तरी पण सर्व कर्मचारी आपआपली जबाबदारी योग्य पध्दतीने पार पाडतात.

❖ मध्यवर्ती कारागृहाची **प्रशासकीय रचना** पुढीलप्रमाणे - **तक्ता क्र. ३.३**

मा. अधीक्षक

↓

मा. उपअधीक्षक

| | | |
|---|---|---|
| वरिष्ठ तुरुंग अधिकारी आस्थापना | वरिष्ठ तुरुंग अधिकारी वर्ग-१ (न्याय विभाग) | तुरुंग अधिकारी वर्ग-१ (कारखाना विभाग) |
| (सामान्य प्रशासन) प्रशासकीय अधिकारी | | |
| तुरुंग अधिकारी वर्ग-२ O.S. | तुरुंग अधिकारी वर्ग-२ | तुरुंग अधिकारी वर्ग-२ |
| सुभेदार | वरिष्ठ लिपिक | भांडारपाल |
| मुख्य लिपिक | | |
| हवालदार कनिष्ठ लिपिक | लिपिक | वरिष्ठ लिपिक |
| शिपाई | | पर्यवेक्षक |
| लिपिक | | |
| | | लिपिक |
| | | पर्यवेक्षक |
| | | निर्देशक |

शेती विभाग

तुरुंग अधिकारी वर्ग-२

↓

शिक्षण विभाग

शिक्षक    शिक्षक

- ❖ वैद्यकीय विभाग

  वैद्यकीय अधिकारी वर्ग-१
- ❖ मंडल विभाग
- ❖ तुरुंग अधिकारी वर्ग-१
- ❖ तुरुंग अधिकारी वर्ग-२
- ❖ सुभेदार
- ❖ हवालदार
- ❖ रक्षक

## ❖ कारागृहातील दिनचर्या

समाजात वावरणाऱ्या प्रत्येक व्यक्तीची दिनचर्या वेगवेगळी पाहावयास मिळते. कारण प्रत्येकाचे काम त्याचे स्वरूप यावरूण त्याची दिनचर्या ठरते. प्रामुख्याने कामाला जावे लागणाऱ्या व्यक्तीची दिनचर्या ही घड्याळाच्या काट्यावर चालत असते. दिनचर्या म्हणजे व्यक्तींने दिवसभर कोणत्या वेळी काय काम करावे यांचे नियोजन म्हणजेच थोडक्यात दिनचर्या होय. व्यक्ती स्वत: होऊन या नियमांना अंगीकृत करून औपचारिकपणे नियमांचे पालन करतो आणि अशा नियमांचे पालन करीत असताना पुढे ती प्रत्येक व्यक्तीची सवयच बनते, परिणामी एखादी व्यक्ती एखाद्या पदावर काम करत असतांना त्याची दिनचर्या ही तो सेवानिवृत्त झाला तरी तो त्याच दिनक्रमानुसार वागतो. उदा :- सैन्यामध्ये नोकरी करणाऱ्या व्यक्तीची दिनचर्या ही अत्यंत शिस्तबध्द असते. त्या व्यक्ती सेवानिवृत्त झाल्या तरी त्याच विशिष्ट वेळेला उठणे, चहा, दाढी दररोज करणे, ठराविक वेळेलाच जेवण, झोप अशी विशिष्ट दिनचर्येनुसार व्यक्ती वर्तन करतात.

कारागृह ही बंद्यांसाठी काम करणारी सुधार संस्था असून यात बंद्यांची दैनंदिनी कारागृहाचे अधिकारी ठरवतात. त्याच पध्दतीने बंद्यांना जीवन जगावे लागते. बंद्यांना सकाळी पाच वाजता उठावे लागते. त्यानंतर प्रातवीधी, तोंड धुणे, आंघोळ त्यांना दिला जाणारा चहा किंवा दूध दिले जाते. त्यानंतर त्यांना नाष्टा दिला जातो. नाष्टा हा दररोज एकाच प्रकारचा दिला जात नसून पोहे, उपमा शिरा, असे दिवसाआड बदलून दिला जातो. १० वाजता जेवण दिले जाते. काही बंदी नाष्टा करुन कामावर जातात. दुपारी एक वाजता आल्यावर जेवण करतात. पण बंद्यांना १० वाजता जेवण मिळाल्यानंतर बंदी कामावर जात नाहीत. ते जेवण करतात, त्यानंतर बॅरेक्समध्ये आराम करतात. या वेळात टी.व्ही. पाहणे, इतरांशी

गप्पा मारून वेळ घालवला जातो. सायंकाळी ६ वाजता जेवण दिले जाते. त्यानंतर वर्तमानपत्रे वाचणे , नामस्मरण करणे , टी.व्ही. पाहणे आणि रात्री ९ वाजता झोपणे असा दिनक्रम आहे.

### ❖ बंद्यांसाठी ग्रंथालय व शैक्षणिक सोयी

शिक्षण हा मानवाचा तिसरा डोळा मानला जातो . भारतात सर्व व्यक्तींना शिक्षण घेण्याचा अधिकार भारतीय राज्यघटनेने दिला आहे. प्रत्येक व्यक्तीला त्याच्या कुवतीनुसार शिक्षण देण्याचे कार्य शासन करीत असते. कारागृह ही शासनाचीच सुधार संस्था असून तेथील बंद्यांना सुधारण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातात. त्यातीलच एक भाग म्हणजे शिक्षण होय. व्यक्ती समाजात वावरत असताना त्याच्या हातून असे कृत्य घडले त्याचा परिणाम म्हणून तो कारागृहात शिक्षा भोगत आहे. अशा बंद्यांना शिक्षणाची सोय कारागृह प्रशासनाने केली आहे. ज्या बंद्यांना कारागृहात राहून शिक्षण घेण्याची इच्छा आहे अशा बंद्यांना शिक्षणाची परवानगी दिली जाते. पण त्यांना दररोज नियमित महाविद्यालयात जाण्याची परवानगी दिली जात नाही.

शिक्षणासाठी मुक्त विद्यापीठामार्फत विविध अभ्यासक्रमांना बंद्यांना प्रवेश दिला जातो. तसेच त्या संबंधीची फीस, पुस्तके, वही पेन इ. साहित्य कारागृहामार्फत पुरवले जाते. आज पत्रकारिता असे शिक्षण काही बंदी घेत आहेत. कारागृहातील जे बंदी शिक्षण घेत नाहीत किंवा बाहेर असतानाही ज्यांनी शिक्षण घेतले नाही जे निरक्षर आहेत अशा बंद्यांना शिकवण्यासाठी आज कारागृहात दोन शिक्षक आहेत. हे शिक्षक निरक्षर बंद्यांना अक्षर ओळख करुन देतात व त्यांना साक्षर करण्याचा प्रयत्न करतात.

कारागृहात शिक्षणाबरोबरच बंद्यांना वाचनाची सवय लागावी यासाठी ग्रंथालयही आहे. ग्रंथालयात मराठी, हिंदी, उर्दू, इंग्रजी भाषेतील १३४६ पुस्तके असून विविध मासिके असल्याच तेथील शिक्षकांनी संशोधकाला सांगितले. बंद्यांच्या वाचनासाठी विविध दैनिक वर्तमानपत्रे येतात. त्यात लोकमत, महाराष्ट्र टाइम्स, लोकसत्ता , सकाळ, लोकमत, समाचार अशी वर्तमानपत्र दररोज येतात. वीस बंद्यांमध्ये एक पेपर येत असून हा पेपर बंद्यांनी सायंकाळी ६ ते ९ या वेळेतच वाचावा असा नियम आहे. ६ ते ९ वेळेतच बंदी पेपर वाचतात.

२० बंद्यांमध्ये एक पेपर असल्याने पेपर सर्व बंद्यांना वाचनासाठी मिळत नाही. कमी पेपर असल्याने पेपरची ओढाओढ होते. पेपरबरोबरच बंद्यांच्या मनोरंजनासाठी रेडिओ, दूरदर्शन संच आहे असे कारागृहातील शिक्षकांनी संशोधकास सांगितले. तसेच दहा बंद्यांमध्ये एक पेपर असावा असेही सांगितले.

## ३.३ कारागृह शेती

शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. भारतातील बहुसंख्य लोक शेती करून आपला उदर निर्वाह करतात. कारागृह प्रशासनानेही कारागृहात राहणाऱ्या बंद्यांपैकी अनेक जण शेतकरी आहेत. त्यांच्या कडून शेती करून घेण्यासाठी औरंगाबाद येथील मध्यवर्ती कारागृह आणि पैठण येथील खुले कारागृह यांच्याकडे शेती आहे. या शेतीतून विविध पिके घेतली जातात तसेच भाजीपाला जो दैनंदिन आहारासाठी लागतो याचे उत्पादन घेतले जाते. मध्यवर्ती कारागृह औरंगाबाद यांच्याकडे दोन एकर जमीन असुन यात विविध पिके व भाजीपाला मुळा अशी पिके घेतली जातात. शेतीचे काम पाहण्यासाठी स्वतंत्र तुरुंग अधिकारी असून २५ बंदी शेतीमध्ये काम पाहतात.

ज्या बंद्यांना शेतीतील कामे करण्याची सवय आणि आवड आहे अशा बंद्यांकडून शेतीची कामे करणाऱ्या बंद्यांना कारागृह नियमाप्रमाणे वेतन दिले जाते आणि बंदी त्यांना आवडीचे आणि बाहेर असताना ते नेहमी शेतीची कामे करत असल्याने त्यांना वेळ कसा जातो ते कळत नाही. आमचे मन रमते असे बंद्यांनी सांगितले.

## ३.४ कारखाना विभाग

स्वातंत्र्यानंतर सुधारणा आणि पुनर्वसन याप्रमाणे आजची कारागृहे मार्गक्रमण करत आहेत. आज संपूर्ण कारागृहात बंद्यांना शिक्षा दिली जात नाही तर त्यांच्यामध्ये सुधारणा करण्यासाठी अनेक उपक्रमांच्या माध्यमातून अनेक कार्यक्रमांचे आयोजन आणि नियोजन केले जाते. कारागृहातून बाहेर येणारा बंदी हा कारागृहातील विविध उपक्रमांमुळे त्यांच्यातील अपराधीपणाची भावना कमी होऊन त्यांच्या पुनर्वसनासाठी अत्यंत महत्त्वपुर्ण आहे.

कारागृहात आज एकूण २२ ट्रेडचे प्रशिक्षण दिले जाते. पण प्रत्येक कारागृहात संपूर्ण २२ ट्रेडचे प्रशिक्षण दिले जात नाही. प्रत्येक कारागृहातील परिस्थितीनुसार काही ट्रेडचे प्रशिक्षण दिले जाते. त्यातून बंद्यांचे पुनवर्सन करण्याचा प्रयत्न केला जातो. औरंगाबाद येथील मध्यवर्ती कारागृहातील कारखाना विभागाची संशोधकाने माहिती घेतली असता **आठ प्रकारचे प्रशिक्षण** येथे बंद्यांना दिले जाते असे सांगितले. कारागृहातील बंद्यांच्या आवडीनुसार त्यांना काम दिले जाते. एकूण आठ विभागात दररोज बंदी जातात पण त्यांची संख्या दररोज सारखी नसते. त्यामध्ये काही कमी जास्त होतात. कारण त्यांच्या विभागातील तयार होणाऱ्या मालांची मागणी, कच्चा माल आदींमध्ये असंतुलन झाले की बंद्यांची संख्याही कमी जास्त होते.

विविध विभागांत काम करताना त्या बंद्यांचे काम अनुभव यावरून कुशल कामगार, अर्धकुशल कामगार, अकुशल असे तीन प्रकारांत कामगारांचे विभाजन केले जाते. त्यांचा पगारसुध्दा त्याप्रमाणेच

दिला जातो. कुशल कामगारांना दररोज ४० रु. तर अर्धकुशल कामगारांना दररोज ३५ रु., अकुशल कामगारांना २५ रु. मजुरी दिली जाते. त्या मजुरीची कारागृहात रजिस्टरमध्ये नोंद होते. पण बंद्यांना प्रत्यक्षात पैसे दिले जात नाहीत. पण त्यांच्या पैशाचा हिशोब मात्र ठेवला जातो, त्यातील बंद्यांना कुपन्सच्या माध्यमातून कॅन्टीनमधून खरेदीसाठी दिले जाते. कारागृहात आज आठ प्रकारचे प्रशिक्षण दिले जाते. प्रत्येक विभागासाठी स्वतंत्र प्रशिक्षक नेमण्यात आले आहेत. यंत्रमाग, सुतारकाम, पंजाकाम, शिवणकाम, धोबीकाम, लोहारकाम, सॉ मिल, हातमाग अशा विविध कामांच्या ठिकाणी दररोज साधारणतः २० ते ३० बंदी कामावर जातात. त्यांच्यासोबत एक प्रशिक्षक असतो. प्रशिक्षकाच्या मार्गदर्शनाखाली बंदी येथे काम करतात. कारागृहात प्रत्येक विभागातून जी विविध उत्पादने निर्माण केली जातात ती फक्त शासकीय विभागांनाच दिली जातात. ती सर्वसामान्यांसाठी बाजारपेठेत विकली जात नाहीत.

कारागृहातील कारखाना विभाग हा स्वतंत्रपणे कार्य करत असून तुरुंग अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली कार्य करतात. विविध विभागांअंतर्गत जी वेगवेगळी उत्पादने केली जातात ती पुढीलप्रमाणे

**१) यंत्रमाग :-**

यंत्रमाग विभागाअंतर्गत हॉस्पिटलसाठी लागणारे कापड, मांजरपाट, बेडशीट, गादीपाट, टॉवेल, त्याचबरोबर मागणीनुसार वसतिगृहाचे कापड, दवाखाने सरकारी कार्यालयांसाठीचे सर्व कापड तयार केले जाते.

**२) सुतारकाम :-**

सुतार काम विभागाअंतर्गत वुडन फर्निचर,टेबल,खुर्ची,कपाट,राज्य राखीब पोलिसांसाठी लागणारे रायफल स्टँड इ. वस्तू तयार केल्या जातात.

**३) पंजाकाम :-**

पंजाकाम विभागाअंतर्गत सतरंजी भोजनपट्टी, खुर्ची, मॅट अशा वस्तू तयार करून त्या शासकीय कार्यालयांना पुरवल्या जातात.

**४) शिवणकाम :-**

शिवणकाम विभागाअंतर्गत होमगार्डचे ड्रेस, पोलिस,राज्य राखीव पोलीस यांचे ड्रेस, दवाखान्यातील रुग्ण, डॉक्टर्स यांचे कपडे,जेलमधील अधिकारी कर्मचारी, बंदी यांचे कपडे, बनियन या विभागाअंतर्गत तयार केले जातात.

**५) धोबीकाम :-**

या विभागाअंतर्गत प्रामुख्याने कपडे धुण्याचीकामे केली जातात. हे कपडे कारागृह अधिकारी,

कर्मचारी, यांचे कपडे धुणे आणि इस्तरी करणे, तसेच बेडशीट, सतरंजी, उशीचे खोळ यांची धुलाई केली जाते.

**६) सॉ मिल :-**

सौ मिलअंतर्गत प्रामुख्याने लाकडाची कटाई केली जाते. फर्निचरसाठी लागणारे लाकुड, सागवान यांची पाहिजे त्या आकारात कटाई या विभागा अंर्तगत केले जाते.

**७) लोहार काम :-**

लोहार काम विभागाअंतर्गत लोखंडी पलंग, हॉस्पिटल, शासकीय वसतिगृहे यांना लागणारे पलंग, कपाटे, रॅक, न्यायालयाला ट्रॉली, किट बॉक्स इ. साहित्य मागणीनुसार पुरवले जाते.

**८) हातमाग :-**

हातमाग विभागाअंतर्गत सतरंजी, चादर यांना रंगकाम केले जाते. कारखाना विभागाचे व्यवस्थापक प्रमुख असून कारखाना तुरुंग अधिकारी या दोघांच्या अंतर्गत कारखाना विभागाचे काम चालते. तसेच प्रत्येक विभागाचे निर्देशक मदत करीत असतात. सर्व विभागांना आठवडी सुटटी रविवारी असते. कारखाना विभागाशिवाय बंदी गोदाम, हजाम, मेस, कुंडाकाम, पहारेकरी या ठिकाणी काम करतात. ही कामे अकुशल कामांमध्ये येतात. पण या कामांलाही मंजुरी दिली जाते. कारागृहातील बंद्यांनी शिक्षा भोगत असताना चांगले वर्तन केले आणि त्यांनी विशिष्ट शिक्षा भोगली तर त्यांना विशिष्ट नावाने ओळखले जाते. त्यांना इतर बंद्यांपेक्षा थोडीफार फिरण्याची मुभा असते. त्यांचा पोशाखही वेगळा असतो. त्यांची माहिती पूढीलप्रमाणे.

**वार्डर :** ज्या बंद्यांने त्याच्या एकूण शिक्षेच्या सात वर्ष शिक्षा पूर्ण केल्यानंतर गरजेनुसार कारागृह प्रशासन वॉर्डर म्हणून बंद्यांची नियुक्ती करते. दहा बंद्यामागे एक वॉर्डर असतो. वॉर्डर चा गणवेश पिवळ्या रंगाचा पायजमा व टोपी यावरून तो वॉर्डर आहे असे ओळखता येते.

**वॉचमन :** ज्या बंद्यांनी आपल्या शिक्षेपैकी पाच वर्षे पूर्ण केली आहेत त्यांची नियुक्त गरजेनुसार कारागृह प्रशासन वॉचमन म्हणून नियुक्ती करते. वरील ठिकाणी काम केल्याचा बंद्यांना मोबदला दिला जातो.

## ६.२ बंद्यांचे अधिकार

१) प्रत्येक बंद्याला न्यायिक अधिकार असतो. तुरुंग अधिकाऱ्यांचे प्रत्येक बंद्याला त्याच्या तुरुंगावासाच्या आणि वैयक्तिक बाबी व न्यायिक संधी उपलब्ध करुन द्यावी. कैद्याच्या अधिनियमांत न्यायिक सेवा आणि न्यायिक सहकार्य अपेक्षित आहे.

२) प्रत्येक कैद्याला पुढील अधिकार असतील.

a) कुठल्याही प्रकारच्या बेकायदेशीर आक्रमतेतून स्वतःचे संरक्षण किंवा कायद्याने बंदी घातलेल्या कुठल्याही प्रकारच्या कृती त्यांच्यावर लादण्यास प्रतिकार.

b) कुठल्याही प्रकारच्या अस्वच्छ आणि असाह्य वातावरणात डांबून न ठेवण्याचे संरक्षण.

c) आरोग्य खराब होऊ नये म्हणून चांगल्या वैद्यकीय सुविधा, सेवा आणि कैदी ज्या आजाराने त्रासले आहे त्यावर उपचारांची सुविधा.

d) कुठल्याही प्रकारच्या भेदभवापासून संरक्षण

e) न्यायपालिकेने प्रस्थापित केलेल्या शिक्षाव्यतिरिक्त कुठल्याही प्रकारच्या शिक्षेपासून संरक्षण

f) न्यायापालिकेने केलेल्या नियमावलीची बंद्यांना माहिती करुन देणे तसेच इतर सुविधा आणि अधिकारांची माहिती करुन देणे.

g) बंद्यांना त्यांच्या धर्माचे आचरण करण्याची अनुमती द्यावी. पण त्यामुळे कारागृहातील दैनंदिन कार्यात अडथळा येऊ नये. कैद्यांना त्यांच्या आई, वडील किंवा आपल्या रक्तसंबंधीत व्यक्तीच्या मृत्यूनंतर ठरावीक काळासाठी म्हणजे त्याच्या धर्माने ठरवून दिलेला काळापर्यंत वैराग्य पाळण्याची अनुमती.

h) न्यायपालिकेने प्रस्थापित न केलेले शारीरिक कार्य कण्यापासून संरक्षण किंवा शिक्षा काळानंतर कामाचा मोबदला न मिळाल्यास त्या पासून संरक्षण देणे.

i) नियमाप्रमाणे नातेवाईकांशी किंवा मित्रांशी संभाषण न करू देण्यापासून संरक्षण.

३) प्रत्येक बंद्याला जो अस्तित्वात असलेला कुठल्याही कायद्याचा विषय असेल राज्य विधानसभा, लोकसभा किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत मत देण्याचा अधिकार असेल.

४) कुठलाही कैदी कारागृह अधिकाऱ्याच्या घरी घरगुती कामासाठी कामावर ठेवता येणार नाही. " [२] (Nital Roy Chowdhury. 2002)

**समारोप :-**

प्रस्तुत प्रकरणात कारागृह प्रशासन आणि त्यांची कार्यपध्दती यांचा सविस्तर आढावा घेण्यात आला आहे. तसेच कारागृहाची रचना, कारागृहातील विविध विभाग, बंद्यांचे अधिकार यांचा आढावा घेतला आहे. महाराष्ट्रातील कारागृह विभागाची संस्थात्मक रचना, बंद्यांचा कारागृहातील प्रवेश, कारागृहातील दिनचर्या, कारागृहात बंद्यांना मिळणारे कपडे, बिस्तर व इतर मिळणाऱ्या गरजेच्या वस्तू, बंद्यांसाठीचे

२)Indian Prison Laws & Correction of Prisoners - Nital Roy Chowdhury - Page 424-25

उपाहारगृह, बंद्यांसाठीची नियमावली, बंद्यांना मोफत कायदेशीर मदत या संदर्भात सविस्तर आढावा घेतला गेला असून कारागृहाची स्थापना यामध्ये कारागृहात बंद्यांना राहण्यासाठीचे बॅरेक्स व त्यातील इतर सुविधा कारागृहातील प्रशासकीय रचना, बंद्यांसाठी ग्रंथालय, शैक्षणिक सोई, कारागृह शेती, कारागृहात बंद्यांसाठीचा स्वतंत्र असा कारखाना विभाग यांचा सविस्तर आढावा घेतला आहे. वरील सर्व विवेचनावरून कारागृहाची रचना व कार्यपध्दती व बंद्यांना दिले जाणारे साहित्य व सुविधा यांचे सविस्तर विवेचन आढळले.

*****

# प्रकरण ४ थे

## बंद्यांची वैयक्तिक, कौटुंबिक, आर्थिक, सामाजिक माहिती

४.१ बंद्यांची वैयक्तिक माहिती

४.२ बंद्यांची कौटुंबीक माहिती

४.३ बंद्यांची आर्थिक माहिती

४.४ बंद्यांची सामाजिक माहिती

## ४.१ बंद्यांची वैयक्तिक माहिती

मध्यवर्ती कारागृहातील बंद्यांचा अभ्यास करत असताना संशोधकाने ज्या बंद्यांना शिक्षा झाली आहे. म्हणजे ज्यांच्यावर आरोप सिध्द होऊन जे गुन्हेगार या व्याख्येत मोडतात त्यांचे अध्ययन केले. या गुन्हेगारांनाच कारागृहात बंदी हा शब्द वापरला जातो. व्यक्ती गुन्हेगार होण्या पाठीमागे अनेक कारणे कारणीभूत असतात. बऱ्याच वेळेला इच्छा नसताना नकळतपणे असे कृत्य घडून जाते. त्याचा परिणाम म्हणून शिक्षा भोगावी लागते. कारागृहात शिक्षा भोगत असताना बंद्यांना दिल्या जाणाऱ्या सुविधा किंवा दिली जाणारी वागणूक या संदर्भात सर्वसामान्य व्यक्तींची माहिती अतिशय त्रोटक असते. अशी कारागृहा संबंधीची पुसटशी माहिती जेव्हा वर्तमानपत्रात किंवा दूरचित्रवाणीवर येथे तेव्हाच थोडी फार माहिती सर्वसामान्य जनतेला होते. बऱ्याच वेळा अनेक गैरसमजही कारागृहासंदर्भात असतात. पण आज कारागृहे ही कारागृहे न राहता सुधारालये बनली आहेत. गुन्हेगार हाही माणुस असून त्यामध्ये बदल होऊ शकतो. त्यामुळे त्याच्यात सुधारणा करण्यासाठी अनेक उपक्रमांचे नियोजन आणि आयोजन केले जाते. विविध कार्यक्रम, प्रशिक्षण, शिक्षण, मनोरंजन इत्यादी माध्यमांतून बंद्यांच्या वर्तनात बदल करण्यासाठी प्रयत्न केले जातात.

संशोधकाने मध्यवर्ती कारागृहातील बंद्यांचा अभ्यास करत असताना द्वितीयक स्त्रोतांच्या माध्यमांतून म्हणजे अपराध, गुन्हेगार, कारागृह या संदर्भातील लिखित स्वरूपातील माहिती विविध पुस्तके, मासिके, अहवाल या माध्यमांतून घेतली. पण संशोधकाने प्रत्यक्षात बंद्यांना भेटून त्यांची वैयक्तिक, कौटुंबिक, आर्थिक, सामाजिक, मानसिक, केलेल्या अपराधांसंबंधी कारागृहात मिळणाऱ्या सुविधेसंदर्भात प्राथमिक तथ्य संकलन स्त्रोतामधील मुलाखत अनुसूची आणि निरीक्षण या साधनांचा वापर करुन सत्य माहिती (तथ्य) संकलित केली. कारागृहातील बंद्यांसाठी संरचित मुलाखत अनुसूची तयार करून तथ्ये संकलित केला.

संशोधकाने उत्तरदात्यांचे म्हणजे बंद्याचे लिंग अर्थात पुरुष किंवा स्त्री यांचे वर्णन केलेले आहे. मध्यवर्ती कारागृहातील बंद्यांचा अभ्यास करत असताना प्रथम संशोधकाने परवानगीसाठी मा. कारागृह उपमहानिरीक्षक मध्यविभाग औरंगाबाद यांना अर्ज केला होता. परवानगीमध्ये मध्यवर्ती कारागृहातील फक्त **पुरुष बंद्यांचाच अभ्यास** करण्यासंदर्भात परवानगी देण्यात आली. मध्यवर्ती कारागृहात बंद्यांची माहिती घेतली असता स्त्रीयांची संख्या पुरुषांच्या संख्येने अत्यंत कमी आहे असे सांगण्यात आले. पण स्त्री बंद्याच्या अभ्यासाला परवानगी नसल्याकारणाने संशोधकाने मध्यवर्ती कारागृहातील ज्या बंद्यांना शिक्षा लागली आहे

अशाच २०० बंद्यांचे अध्ययन केले. पुरुष बंदी आणि स्त्री बंदी यांना राहण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था आहे. त्यांना सर्व सुविधा स्वतंत्रपणे पुरवल्या जातात.

### ४.१.१ बंद्यांचे वय :-

कारागृहात शिक्षा भोगणारे बंदी हे यांचा वयोगट हा अत्यंत महत्त्वपूर्ण असतो. त्याने जो अपराध केला आहे त्या अपराधाचे स्वरूप आणि तीव्रता यांचा वयाशी परस्पर संबंध असतो. कारण तारुण्यांचा काळ हा अत्यंत महत्त्वपूर्ण असून अनेक धाडसाचे निर्णय व्यक्ती याच काळात घेत असते. या काळात कोणताही होणारा अन्याय तो सहन करीत नाही किंवा काही तरी नवीन करुन दाखवण्याची धमक त्याच्यामध्ये असते. तारुण्य आणि प्रौढ अवस्थेतील बंद्यांचे संपूर्ण महाराष्ट्रातील कारागृहांतील परिस्थिती पाहिल्यावर जाणवते की, यांचे प्रमाण सर्वाधिक आहे. तारुण्यात जबाबदाराची जाणीव असत नाही. स्वातंत्र्याचा उपभोग मुले घेण्याचा सर्व अंगाने प्रयत्न करतात. यातूनच एखादी अपराधांची कृती त्याच्या हातून घडते. त्याचा परिणाम म्हणून या व्यक्ती कारागृहात शिक्षा भोगत असतात. २००६-०७ मध्ये महाराष्ट्र कारागृह विभागाने प्रसिध्द केलेल्या सांख्यिकीमध्ये वयनिहाय बंद्यांच्या प्रमाणात २१ ते ३० वयोगटातील तरुणांचा समावेश मोठ्या प्रमाणावर जाणवतो.

**तक्ता क्र.४.१.१ (अ)**

| अ.क्र. | कारागृहाचे नाव | वयनिहाय बंद्यांचे वर्गीकरण (२००६-०७) | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १८-२१ वर्षे | २१-३० वर्षे | ३०-४० वर्षे | ४०-५० वर्षे | ५०-६० वर्षे | ६० वर्षे पुढे | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| (अ) मध्यवर्ती कारागृहे | | | | | | | | |
| १ | येरवडा | ४४० | ४७८ | २६९ | २२६ | ९१ | ५ | १५०९ |
| २ | कोल्हापूर | ७९ | १२७ | ५८ | ४० | १६ | १ | ३२१ |
| ३ | मुंबई | ८४ | १४२६ | १५३२ | १२०८ | १७६ | ७ | ४४३३ |
| ४ | ठाणे | ३७७ | १४२३ | २८७ | ८१ | १४ | ३ | २१८५ |
| ५ | औरंगाबाद | ५५ | २३३ | १५४ | ७२ | २८ | ३ | ५४५ |
| ६ | नाशिक रोड | ९७ | ३८६ | २९५ | १३० | ६१ | १२ | ९८१ |
| ७ | नागपूर | १३८ | १७६८ | १३६० | ५६९ | ५९ | ७ | ३९०१ |
| ८ | अमरावती | १६ | १४३ | १३९ | ५० | २१ | ६ | ३७५ |
| | एकूण | १२८६ | ५९८४ | ४०९४ | २३७६ | ४६६ | ४४ | १४२५० |
| (ब) जिल्हा कारागृहे - वर्ग १ | | | | | | | | |
| ९ | येरवडा | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| १० | कल्याण | ७८६ | ७६२ | ४९७ | ३०४ | १९५ | १२८ | २६७२ |
| ११ | भायखळा | १८७० | २७७४ | १९९९ | १०४९ | १५१ | ० | ७८४३ |
| १२ | विशेष कारागृह रत्नागिरी | ८ | ३३ | ३७ | २२ | १० | ३ | ११३ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १३ | खुले कारागृह पैठण | ० | ० | १ | ० | ० | ० | १ |
| १४ | धुळे | ८४ | ६५ | ४६ | १४ | ५ | ० | २१४ |
| १५ | अकोला | ८ | १०७ | ११८ | ४७ | २२ | ८ | ३१० |
| १६ | भंडारा | ० | ७३ | ६४ | ३७ | ११ | १ | १८६ |
| १७ | चंद्रपूर | ४ | ६८ | १४० | ८४ | २५ | ११ | ३३२ |
| १८ | यवतमाळ | १५ | ५९ | १०४ | ४८ | १७ | ५ | २४८ |
| १९ | वर्धा | ० | ८६ | ७६ | ७० | ३५ | १ | २६८ |
| २० | नाशिक बोस्टन स्कूल | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| २१ | औरंगाबाद खुले कारागृह | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | एकूण | २७७५ | ४०२७ | ३०८२ | १६७५ | ४७१ | १५७ | १२१८७ |
| (क) जिल्हा कारागृह - वर्ग २ | | | | | | | | |
| २२ | अलिबाग | ६ | ३३ | ४० | १८ | १० | १ | १०८ |
| २३ | सावंतवाडी | ३ | १३ | ७ | १० | ० | २ | ३५ |
| २४ | बुलढाणा | ५ | ७० | ७४ | २३ | १४ | ० | १८६ |
| २५ | परभणी | १४ | ८३ | ७४ | ४१ | १७ | ५ | २३४ |
| २६ | उस्मानाबाद | ३८ | ९८ | ६२ | ४१ | ० | ० | २३९ |
| २७ | बीड | ३ | ६६ | ५८ | २७ | ९ | ८ | १७१ |
| २८ | नांदेड | ७२ | १४७ | ९६ | ३९ | १४ | ५ | ३७३ |
| २९ | जळगाव | २४५ | ३०७ | २४९ | १५८ | ३ | ० | ९६२ |
| ३० | विसापूर | ३ | ६२ | ५० | ४२ | ८ | ६ | १७१ |
| ३१ | सोलापूर | १४१ | १८४ | १३५ | ७६ | १९ | ० | ५५५ |
| ३२ | सांगली | ३५ | १४१ | १६० | ७५ | ४७ | ४ | ४६२ |
| ३३ | सातारा | ८ | १०० | ८० | ५५ | ३५ | २९ | ३०७ |
| ३४ | अहमदनगर | २ | २९ | ३८ | ३८ | १४ | ० | १२१ |
| ३५ | आटपाडी मुक्त वसाहत | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ३६ | मुंबई डी.डब्ल्यू. पी. | १२० | १०८ | १३६ | ५५ | ११ | ० | ४३० |
| | एकूण | ६९५ | १४४१ | १२५९ | ६९८ | २०१ | ६० | ४३५४ |
| (ड) जिल्हा कारागृह - वर्ग ३ | | | | | | | | |
| ३७ | जे.जे.रुग्णालय | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ३८ | कोल्हापूर शहर | ९ | ३६ | ८६ | ३४ | ४ | ० | १६९ |
| | एकूण | ९ | ३६ | ८६ | ३४ | ४ | ० | १६९ |
| | एकूण (अ+ब+क+ड) | ४७६५ | ११४८८ | ८५२१ | ४७८३ | ११४२ | २६१ | ३०९६० |

**(स्त्रोत :- महाराष्ट्र कारागृह विभाग - हॅण्ड बुक ऑफ प्रिझन सांखिकी -२००६-०७)**

संशोधकाने कारागृहात प्रत्यक्षात शिक्षा भोगणाऱ्या बंद्यांच्या वया संदर्भात माहिती संकलित केली असता पुढीलप्रमाण जाणवले.

**तक्ता क्र. ४.१.१ ब) बंद्यांचे वय दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र | वय (वर्षे) | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | १८ ते २० | २ | १% |
| २. | २० ते ३० | ५९ | २९.५% |
| ३. | ३० ते ४० | ५२ | २६% |
| ४. | ४० ते ५० | ५२ | २६% |
| ५. | ५० ते ६० | १७ | ८.५% |
| ६. | ६० ते ७० | १२ | ६% |
| ७. | ७० ते ७५ | ६ | ३% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

मध्यवर्ती कारागृहात जे बंदी शिक्षा भोगत आहेत त्यांच्या वयांचे विवरण सांगणारी आहे. गुन्ह्यासाठी वय हा घटक अत्यंत महत्त्वपूर्ण मानला जातो. संशोधकाने ज्या २०० बंद्यांचे अध्ययन केले त्यामध्ये १८ ते २० वर्षे वयाची फक्त (२) म्हणजे १% , २० ते ३० वयोगटाची (५९) २९.५% बंदी आढळले, तर ३० ते ४० वयोगटाच्या (५२) २६%, ४० ते ५० वयोगटाच्या (५२) २६%, तर ५० ते ६० वयाची (१७) म्हणजे ८.५०%, तर ६० ते ७० वयोगटाची (१२) ६%, तर ७० ते ७५ वयोगटाची (६) ३% बदी आढळले. १८ ते ३० वर्षे वयाचे युवक ३० ते ५० वयोगटाचे प्रौढ ६० ते ७५ वर्षे वयांचे वृध्द असे वर्गीकरण केले तर ३० ते ५० वयोगटाचे प्रमाण सर्वाधिक म्हणजे ५२% (१०४) आढळले. तर सर्वात कमी प्रमाण ६० ते ७५ वयोगटाचे ९% आढळले.

वरील वयोगटाचे परीक्षण केले असता जाणवते की, १८ ते ३० वयोगट हा तारुण्याचा काळ मानला जातो. या तारुण्याच्या काळातच ३०.०५% युवकांच्या हातून अपराध घडल्याने ते कारागृहात शिक्षा भोगत आहेत. या वयातील बऱ्याच युवकांचे विवाह झाले आहेत. काही युवकांचे विवाह व्हायचे आहेत. पण त्यांच्या हातून अपराधी पणाचे कृत्य घडल्याने पुढील आयुष्याबद्दल त्यांच्या मनामध्ये उदासीनता निर्माण झालेली पाहावयास मिळाली.


३० ते ५० या वयोगटातील पुरुषांचे प्रमाण ५२ % (१०४) आढळले. ३० ते ५० हा काळ प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यातील अत्यंत महत्त्वपूर्ण काळ मानला जातो. कारण विवाह होऊन कुटुंब, आई, वडील,

मुले यांची जबाबदारी प्रामुख्याने याच वयोगटात असते. पण (१०४) बंदी ५२ % कारागृहात शिक्षा भोगत आहेत.

भारतीय समुदायात ६० वर्षे वयाच्या पुढील व्यक्तींना वृध्द समजले जाते. ६० ते ७५ या वयोगटातील (१८) ९% व्यक्ती कारागृहात शिक्षा भोगत आहेत. मानवी हक्क आयोगाचे आदेश ६० वर्षे वयाच्या वरील व्यक्तींना कारागृहात ठेवू नये असे असतानाही १८ व्यक्ती शिक्षा भोगत आहेत. मानवी हक्क आयोगाचे आदेश असतानासुध्दा ६० वर्षोवरील वृध्दांना कारागृहात कसे काय ठेवले जाते या संदर्भात कारागृहातील वरिष्ठ तुरुंग अधिकाऱ्यांकडे विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, एखादा अपराधी जेव्हा एखादे विघातक कृत्य करतो तेव्हा त्याला शिक्षा त्याचे वय पाहून दिली जात नाही तर त्याचा अपराध पाहून शिक्षा दिली जाते. जर एखाद्या व्यक्तीने वयाच्या ५५ व्या वर्षी खून केला तर त्याला जन्मठेप शिक्षा होते. म्हणजे वृध्द अवस्थेतही तो शिक्षा भोगणार. मानवी हक्क आयोगाचे आदेश वृध्द व्यक्तींना कारागृहात ठेवू नये याची जाणीव करून दिली असता वरिष्ठ तुरुंग अधिकारी म्हणाले की, आम्हाला मा. न्यायालयाने अपराध्याला शिक्षेसंबंधी जे आदेश दिले जातात त्यांचे पालन करावे लागते असे सांगण्यात आले.

यावरून आपणास असे जाणवते की, व्यक्तीच्या हातून जेव्हा एखादे कायदाबाह्य वर्तन होते तेव्हा त्याला शिक्षा ही होणारच पण जे अतिशय वृध्द व्यक्ती आहेत, ज्यांना शिक्षा झाली आहे पण त्यांना स्वतःची कामे करता येत नसतील त्यांना मदतीची गरज आहे आणि ज्यांचा अपराध सौम्य आहे व ज्यांनी काही काळ शिक्षा भोगली आहे अशा बंद्यांना त्यांच्या वृध्दत्वाचा काळ कुटुंबात राहण्यासाठी सोडून द्यावे. गुन्ह्याचे वर्तन करण्यामध्ये मोठे व्यक्तीचे प्रमाण आधिक आहे. कारण या काळात व्यक्ती असे कायदाबाह्य वर्तन करतांना होणाऱ्या परिणामांची तमा बाळगत नाहीत. त्यामुळे यांच्या हातून अशी कृत्ये घडतात. असे जाणवते पण वृध्द अवस्थेतील व्यक्तींचे गुन्ह्याचे प्रमाण अतिशय कमी जाणवते. वृध्द अवस्थेत व्यक्तींचे शरीर थकलेले असते. जास्त काळ विश्रांती करून वेळ घालावा लागतो. अशा काळात गुन्ह्यासारखे कृत्य करण्यास कोणताही व्यक्ती सहसा तयार होत नाही. बऱ्याच वेळा त्यांची मानसिक स्थिती तयार झाली तरी शरीर साथ देत नाही. त्यामुळे वृध्द अवस्थेत गुन्हे कमी प्रमाणात होतात असे जाणवते.

**बंद्यांचे वय दर्शविणारा आलेख ४.१**




### ४.१.२ बंद्यांचा धर्म :-

धर्म हा मानवाचा एक अविभाज्य घटक आहे. प्रत्येक व्यक्तीला त्याच्या आई वडिलांकडुन त्यांचा धर्म आपोआप मिळतो. भारतीय समाजात अनेक धर्मांचे लोक राहतात. धर्म हा व्यक्तीला जीवन जगण्यासाठी मार्गदर्शन करतो. धर्माच्या नीति नियमांचा प्रत्येक व्यक्ती पालन करीत असते. प्रत्येक धर्माने नीति नियम, रुढी, प्रथा, परंपरा, चालीरीती, श्रध्दास्थाने वेगवेगळी आहेत. जन्माने धर्म मिळाला तरी व्यक्ती नंतर धर्मांतर करु शकते. आज भारतात धर्मांतर मोठ्या प्रमाणावर होत असलेले पाहावयास मिळतात. व्यक्तीने धर्मातर केले तरी तो धर्म सोडत नाही, कोणत्या तरी अर्थात त्याला आवडणाऱ्या धर्मातील नीति नियमांचे, रुढी, प्रथा, परंपरांचे पालन करते. धर्म व्यक्तीला तत्त्वज्ञानातून शिकवण देतो. अर्थात व्यक्तीचे अप्रत्यक्ष सामाजिकरणच होत असते. कारागृहात शिक्षा भोगणाऱ्या बंद्यांचा धर्म कोणता यांचा आढावा घेतला असता पुढीलप्रमाणे माहिती मिळाली.

**तक्ता क्र. ४.१.२ बंद्यांचा धर्म दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र | धर्म | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | हिंदू | १३६ | ६८% |
| २ | बौध्द | २६ | १३% |
| ३ | जैन | १ | ०.५% |
| ४ | मुस्लिम | ३६ | १८% |
| ५ | शिख | १ | ०.५% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

मध्यवर्ती कारागृहात जे बंदी शिक्षा भोगत आहेत त्यांच्या धर्माचे विवरण करणारी आहे. धर्म हा प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात अत्यंत महत्त्वपुर्ण कार्य करीत असतो. कार्ल मार्क्स सांगतात धर्म ही अफुची गोळी आहे. म्हणजेच प्रत्येक व्यक्ती आपल्या धर्मानुसार जीवन जगत असते. भारतीय समाजात प्रामुख्याने हिंदू, जैन, बौध्द, इस्लाम, शिख, ख्रिश्चन या धर्मांचे लोक राहतात. पैकी चार धर्मांचा उदय भारतातील आहे.

मानव हा समाजशील प्राणी आहे. समाजात त्यांच्या गरजा भागवल्या जातात. जीवन जगताना वर्तनात धर्म हा एक अविभाज्य घटक असतो. मध्यवर्ती कारागृहातील बंद्यांच्या धर्माचे अध्ययन केले असता, हिंदू, बौध्द, जैन, मुस्लिम, शिख या पाच धर्मांचे बंदी आढळले. संशोधकाने २०० बंद्यांच्या अध्ययनात हिंदू बंद्यांचे प्रमाण (१३६) ६८% म्हणजे सर्वात अधिक जाणवते. बौध्द (२६) १३% तर मुस्लिम (३६) १८% तर जैन आणि शिख प्रत्येकी म्हणजे ०.५% बंदी आढळले.

भारतात हिंदू धर्मीय मोठ्या प्रमाणात राहतात. त्याचप्रमाणे कारागृहातील हिंदू धर्मीय लोकांचे प्रमाण सर्वाधिक आढळले तर जैन आणि शिख धर्मीयांची संख्या कमी आढळली. भारतात जैन, शिख,बौध्द अल्पसंख्याक मानले जातात. त्यांचे लोकसंख्येचे प्रमाणही प्रत्यक्षात कमी आहे. त्यामुळेच कारागृहातील त्यांचे प्रमाण कमी असल्याचे जाणवते.

### ४.१.३ बंद्यांची जात :-

जाती व्यवस्था ही भारतीय समाजातील एक अविभाज्य घटक आहे. हिंदू धर्मात जाती व्यवस्था अस्तित्वात आहे. जाती व्यवस्था ही श्रेणीबध्द पध्दतीवर अवलंबून असून पोर्तुगिजांनी (Caste) हा शब्द प्रयोग प्रथम केला. व्यक्तीला जात जन्माने मिळते. जात हा एक बंद वर्ग मानला जातो. तसेच हा अंतरविवाही समूह असून तो श्रेष्ठ कनिष्ठ तत्त्वावर आधारित आहे. मुजुमदार व मदन यांनी " जाती हा एक बंदिस्त वर्ग आहे " तर प्रा.कुले "संपूर्णताः अनुवंशिकतेवर आधारलेल्या वर्गास जाती असे म्हणतात. तर प्रा. मुखर्जी यांनी " जाती ही प्रामुख्याने जन्म तत्त्वावर आधारलेली अशी एक स्तरीकरण व्यवस्था आहे. तसेच ती समाजाचे निरनिराळ्या भागांत विभाजन करते व आपल्या सदस्यांना खाणे-पिणे, वैवाहिक संबध, व्यवसाय व सामाजिक व्यवहार या बाबतीत कमी अधिक प्रमाणात निर्बंध घालते." [१](दा.धों.काचोळे. २०००)

वरील विविध तज्ञांनी जातीच्या व्याख्या केल्या आहेत. २१ व्या शतकाच्या पूर्वार्धात जातीची बंधने तेवढी कठोर राहिली नाहीत असे म्हणत असतांना आजही जातीचे महत्त्व कमी झाले नाही असे वाटते, कारण आजही बहुसंख्य प्रमाणात जातीची वैशिष्ट्ये समाजात पाहायला मिळतात त्यामुळे जात ही प्रत्येक

---

१) भारतीय समाज रचना - दा.धों.काचोळे, पृष्ठ क्र. -२०६

व्यक्तीच्या जीवनात अत्यंत महत्त्वपुर्ण आहे. जाती व्यवस्था फक्त भारतातच आपणास पाहावयास मिळते. भारतीय प्रत्येक व्यक्तीला धर्म आहे त्याचबरोबर जात असते. धर्म आणि जात ही प्रत्येक व्यक्तीला जन्माने मिळते. भारतात आजही कनिष्ठ दर्जाच्या जातींवर वरिष्ठ दर्जाच्या जाती अत्याचार करतात. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारतीय घटनेने सर्वांना समान हक्क दिले आहेत. परंतु कनिष्ठ जातींच्या रक्षणासाठी काही विशेष कायदे (नागरी हक्क संरक्षण कायदा) केलेले आहेत. तसेच मानवी हक्क आयोग, राज्य मानवी हक्क आयोग, काही सामाजिक संघटना (N.G.O.) वरून होणारे अन्याय दूर करण्यासाठी कार्यरत आहेत. एवढे उपाय असून सुध्दा आज अनेक अपराध होत असतांना आपणास जाणवतात. कारागृहातील बंद्यांची जात दर्शविते. जात ही भारतीय समुदायात अत्यंत महत्त्वपूर्ण मानली जाते.

**तक्ता क्र. ४.१.३ बंद्यांची जात दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र | जात | वारंवारिता | टक्केवारी | अ.क्र. | जात | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | मराठा | ५० | २५% | २१. | गुजर | १ | ०.५% |
| २. | पारधी | १० | ५% | २२. | माळी | ३ | १.५% |
| ३. | महार | १७ | ८.५% | २३. | वडार | १ | ०.५% |
| ४. | बंजारा | ५ | २.५% | २४. | कोळी | १ | ०.५% |
| ५. | वंजारी | १९ | ९.५% | २५. | भंगी | ३ | १.५% |
| ६. | कुरेशी | ३ | १.५% | २६. | सय्यद | ४ | २% |
| ७. | न्हावी | ८ | ४% | २७. | केवट | १ | ०.५% |
| ८. | नंदीवाले | १ | ०.५% | २८. | भोई | ३ | १.५% |
| ९. | फकीर | २ | १% | २९. | तेलगु | १ | ०.५% |
| १० | लोहार | ६ | ३% | ३०. | शिंपी | १ | ०.५% |
| ११. | भिल्ल | १ | ०.५% | ३१. | ठाकूर | १ | ०.५% |
| १२. | कैकाडी | १ | ०.५% | ३२. | शायरी | १ | ०.५% |
| १३. | मातंग | १४ | ७% | ३३. | तांबोळी | १ | ०.५% |
| १४. | धनगर | ६ | ३% | ३४. | धीमर | १ | ०.५% |
| १५. | गवळी | ५ | २.५% | ३५. | ब्राह्मन | १ | ०.५% |
| १६. | चांभार | ३ | १.५% | ३६. | काजी | १ | ०.५% |
| १७. | शेख | ८ | ४% | ३७. | राजपूत | ३ | १.५% |
| १८. | सुतार | २ | १% | ३८. | केवळ | १ | ०.५% |
| १९. | हाटकर | ६ | ३% | ३९. | रज्जक | १ | ०.५% |
| २०. | पठाण | ३ | १.५% | | **एकूण** | **२००** | **१००%** |

वरील संदर्भ घेऊन कारागृहातील बंद्यांच्या जातीसंबंधी अध्ययन केले असता ३९ जातीच्या व्यक्ती कारागृहात आढळल्या. मराठा जातीचे (५०) २५%, तर पारधी (१०) ५%, तर महार जातीचे (१७) ८.५%, बंजारा (५) २.५%, वंजारी (१९) ९.५%, कुरेशी (३) १.५%, न्हावी (८) ४%, नंदीवाले (१)

०.५%, फकीर (२) १%, लोहार (६) ३%, भिल्ल (१) ०.५%, कैकाडी (१) ०.५%, मातंग (१४) ७%, धनगर (६) ३%, गवळी (५) २.५%, चांभार (३) १.५%, शेख (४) ८%, सुतार (२) १%, हाटकर (६) ३%, पठाण (३) १.५%, गुज्जर (१) ०.५%, माळी (३) १.५%, वडार (१) ०.५%, कोळी (१) ०.५%, भंगी (३) १.५%, सय्यद (४) २%, केवट (१) ०.५%, भोई (३) १.५%, तेलगु (१) ०.५%, शिंपी (१) ०.५%, ठाकुर (१) ०.५%, शायरी (१) ०.५ %, तांबोळी (१) ०.५%, धीमर (१) ०.५%, काजी (१) ०.५%, राजपुत (३) १.५%, केवळ (१) ०.५%, रज्जक (१) ०.५%, ब्राह्मण (१) ०.५% अशा प्रकारे ३९ जातीच्या व्यक्ती कारागृहात शिक्षा भोगत आहेत.

वरील विश्लेषणात मराठा जातीचे प्रमाण सर्वात अधिक म्हणजे २५% आढळले तर बाकी इतर जातीचे प्रतिनिधीच काही प्रमाणात आपणास जाणवते. वरील विविध जातींचे विवरण पाहिले असता बहुसंख्य बहुजन जातीतील व्यक्ती आहेत. ब्राह्मण जातीचा फक्त एकच बंदी आढळला, म्हणजेच उच्च वर्णीय जातींचे प्रमाण अत्यल्प असल्याचे जाणवते.

### ४.१.४ बंद्यांचे शिक्षण :-

शिक्षण हा मानसाचा तिसरा डोळा मानला जातो. भारतात स्वातंत्र्यानंतर सर्वांना समान हक्क देऊन शिक्षण सर्वांसाठी खुले झाले. भारतात सर्व भारतीयांना शिक्षणाचा अधिकार नव्हता येथील फक्त उच्च वर्णीय पुरुषांनाच होता. बहुसंख्य असणारे बहुजन आणि सर्व स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार भारतीय व्यवस्थेतील उच्च वर्णीयांनी नाकारला होता. सर्वांना शिक्षण मिळावे यासाठी अनेक समाजसुधारकांनी प्रयत्न केले. त्यात महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, श्री. र.धो. कर्वे, पंडिता रमाबाई, राजर्शी शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर इत्यांदींनी जाणीवपूर्वक सर्वांना शिक्षण मिळवण्यसाठी प्रयत्न केले."भारतात आज साक्षरतेचे प्रमाण ७४% असुन साक्षर पुरुषांचे ८२%, व स्त्रीयांचे ६५% आहे.महाराष्ट्रात साक्षरतेचे प्रमाण ८२% असुन पुरुषांचे ८९% तर स्त्रियांचे प्रमाण ७५% असे आहे. " [२]
(www.litracy in India)

---

२) www.litracy in India

**तक्ता क्र.४.१.४ बंद्यांचे शिक्षण दर्शविणारा तक्ता**


| अ.क्र | शिक्षण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | १ ली ते ४ थी | ४४ | २२% |
| २. | ५ वी ७ वी | ३४ | १७% |
| ३. | ७ वी १० वी | ३६ | १८% |
| ४. | १० वी ते १२ वी | ८ | ४% |
| ५. | १३ वी ते १५ वी | १६ | ८% |
| ६. | १५ वी ते १७ वी | ३ | १.५% |
| ७. | आय.टी.आय. | १ | ०.५% |
| ८. | अशिक्षित | ५८ | २९% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

मध्यवर्ती कारागृहात शिक्षा भोगत असलेल्या बंद्यांच्या शिक्षणविषयक माहितीचे विश्लेषण करण्यात आले आहे. संशोधकाने २०० बंद्यांच्या मुलाखती घेतल्या त्या पैकी (५८) २९% बंदी अशिक्षित होते. १ ली ते ४ थी पर्यंतचे प्राथमिक शिक्षण घेतलेले (४४) २२%, ५ वी ते ७ वी उच्च प्राथमिक शिक्षण घेतलेले (३४) १७%, ७वी ते १० वी माध्यमिक शिक्षण घेतलेले (३६) १८% तर १० वी ते १२ वी उच्च माध्यमिक शिक्षण घेतलेले (८) ४%, पदवी शिक्षण (३) १.५% तर आय.टी.आय. चे प्रशिक्षण घेतलेले (१) ०.५% बंदी आढळले. एकूण बंद्यांपैकी २९% बंदी हे अशिक्षित आहेत. त्यांचे प्रमाण सर्वात जास्त जाणवले तर १० वी ते १२ व व्यावसायिक प्रशिक्षण घेणाऱ्यांचे प्रमाण सर्वात कमी आढळते.

वरील विवेचनावरुन आपणास जाणवते की, शिक्षण आणि गुन्हा यांचा अतिशय जवळचा संबंध आहे. शिक्षित व्यक्ती यात प्राथमिक व माध्यमिक शिक्षण असणाऱ्यांचे प्रमाण अधिक आहे. उच्च शिक्षित बंद्यांचे प्रमाण कमी आढळून आले. अर्थात व्यक्तीचे उच्च शिक्षण झाले म्हणजे त्याला कोणासोबत कसे वर्तन करावे ,समाजमान्य आणि कायदाबाह्य वर्तनाची जाणीव आलेली असते.

शिक्षणाचे प्रमाण जेथे जास्त आहे तेथे गुन्ह्याचे प्रमाण कमी जाणवते जे बंदी कारागृहात शिक्षा भोगत आहेत त्यामध्ये प्राथमिक, माध्यमिक आणि अशिक्षित व्यक्तींचे प्रमाण अधिक आहे. समाजातील गुन्ह्यांचे प्रमाण कमी करण्यासाठी उच्च शिक्षणाचे प्रमाण वाढवणे गरजेचे आहे. त्यामुळे कारागृहांतील वाढणारी गर्दी आपोआपच कमी होईल असे जाणवते.

**बंद्याचे शिक्षण दर्शविणारा आलेख ४.२**




**४.१.५ बंद्यांचा मूळ पत्ता :- / राहण्याचे ठिकाण :-**

भारतीय लोक ग्रामीण, शहरी आणि आदिवासी समुदायात विभागलेले आहेत. प्रत्येक समुदायाची संस्कृती भिन्न आहे. प्रत्येक समुदायाच्या समस्यांही भिन्न आहेत आज ग्रामीण आणि आदिवासी समुदायाकडून शहरी समुदायाकडे स्थलांतराचे प्रमाण वाढत आहे. याची अनेक कारणे आपणास जाणवतात, त्यापैकी प्रमुख कारण म्हणजे शिक्षण, नौकरी, व्यवसाय, कामही आहेत. एका समुदायातून दुसऱ्या समुदायात आल्यावर त्याला अनेक नवीन परिस्थितीशी तडजोड करावी लागते. बऱ्याच वेळा नवीन समस्या निर्माण होतात. त्या समस्येतून मार्ग काढताना बऱ्याच वेळा नियमांचे अर्थात कायद्याचे उल्लघंन व्यक्तीकडून होते.

कारागृहात शिक्षा भोगणारा बंदी हा मूळ त्याचे राहण्याचे ठिकाण म्हणजे ग्रामीण समुदायातून आला आहे किंवा शहरी समुदायातून आला आहे. याची माहिती करुन घेणे. कारण ग्रामीण समुदायातील लोक आपल्या धर्म आणि सांस्कृतीनुसार वर्तन करतात. सहसा नियमांचे उल्लंघन करत नाहीत. कारण ग्रामीण समुदायातील लोकामध्ये अनौपचारिक नियंत्रण असल्याने व्यक्ती एकमेकांना आदरपूर्वक घाबरतात. शहरांत मात्र अनौपचारिक नियंत्रणाचे प्रमाण कमी जाणवते. व्यक्तीला स्वातंत्र्य असते. त्या स्वातंत्र्याचा स्वैरपणे तो उपभोग घेण्याचा प्रयत्न करते. त्यातून अपराधासारखी कृती करण्यास तो घाबरत नाही. त्यामुळे बंद्यांचे मूळ राहण्याचे ठिकाण या संदर्भात पुढील प्रकारची माहिती मिळाली.


**तक्ता क्र. ४.१.५ बंद्यांचा मूळपत्ता दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | मूळपत्ता | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | खेडेगाव | १४७ | ७३.५% |
| २. | तालुका | १३ | ६.५% |
| ३. | जिल्हा (शहर) | ३३ | १६.५% |
| ४. | इतर राज्य | ७ | ३.५% |
| ५. | इतर देश | १ | ०.५% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

कारागृहातील बंद्यांचे मूळ ठिकाण कोणते म्हणजे खेडेगाव, तालुका, जिल्हा, इतर राज्य किंवा इतर देश अशा कोणत्या ठिकाणावरून बंदी आले आहेत या संबधीची माहिती वरील प्रश्नातून मिळते. संशोधकाचा मूळपत्ता विचारण्याचा मुळ हेतू हा होता की बंदी हा ग्रामीण भागातून आला आहे का शहरी भागातून आला आहे. कारण त्यावरुन आपणास अपराधाचे प्रमाण ग्रामीण भागात जास्त आहे का शहरी भागात याची तुलनात्मक विश्लेषण करता येईल. वरील प्रश्नांच्या उत्तरात (१४७)७३.५ % बंदी ग्रामीण भागातून आले आहेत. तर तालुक्याचा ठिकाणावरुन (१३) ६.५ % तर जिल्ह्याचे ठिकाण म्हणजे शहरातून (३३) १६.५% इतर राज्य (७)३.५% तर इतर देश (१)१.५% अशा प्रकारे प्रमाण आढळले. ग्रामीण भागातील बंद्यांची संख्या सर्वाधिक तर तालुक्याच्या ठिकाणचे प्रमाण कमी आढळते.

वरील विवेचनावरून ग्रामीण समुदायातील नागरिकांचे गुन्ह्यांचे प्रमाण अधिक आहे असे जाणवते. खेड्यात शिक्षणाचे प्रमाण कमी असून मान, प्रतीष्ठा यांना खुपच महत्त्व दिले जाते. ग्रामीण समुदायात स्त्रियांना आजही दुय्यम स्वरूपाची वागणूक दिली जाते. पुरुषप्रधान संस्कृतीचे अतिशय काटकोरपणे पालन केले जाते. स्त्रियांना दुय्यम स्थान, शिक्षणाचे प्रमाण कमी, प्रतिष्ठा, मान यामुळे ग्रामीण समुदायात गुन्ह्याचे प्रमाण अधिक आहे असे जाणवते आज ग्रामीण समुदायात शिक्षणाचा प्रचार अणि प्रसार करणे गरजेचे आहे. कारण शिक्षणातून स्त्रियांना स्वातंत्र्य मिळू शकते. त्यातून त्यांच्यावर अन्याय अत्याचार कमी होईल तसेचकायदे विषयक जाणीव, जागृती होणे गरजेचे आहे. या वरील उपायांतून ग्रामीण समुदायात वाढत असलेले गुन्हेगारीचे प्रमाण आपणास कमी करण्यासाठी मदत होऊ शकते.

**बंद्यांचे राहण्याचे ठिकाण दर्शविणारा आलेख ४.३**




### ४.१.६ बंद्यांची वैवाहिक स्थिती :-

विवाह ही प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यातील अत्यंत महत्त्वपूर्ण बाब आहे. मानवाची लैंगिक गरज समाजमान्य पध्दतीने पूर्ण करुन प्रजोत्पादन करण्यास मान्यता देणारी विवाह ही संस्था अत्यंत महत्त्वपूर्ण काम पार पाडत असते. यामुळे समाजाचे सातत्य चालू राहते. महाराष्ट्रातील संपूर्ण कारागृहात शिक्षा भोगत असलेल्या बंद्यांचे प्रमाण पाहिले तर अविवाहितांपेक्षा विवाहितांचे प्रमाण अधिक जाणवते. आपण वरील वय दर्शविणाऱ्या तक्त्यात पाहिले की, २० ते ५० वयोगटातील व्यक्तींचे प्रमाण अधिक आहे. आणि हे विवाहित आहेत म्हणजे हे तारुण्यात शिक्षा भोगत आहेत. त्यामुळे त्यांची लैंगिक गरज पूर्ण होत नाही. याचा परिणाम त्यांच्या मानसिकतेवर पडतो. तसेच त्यांच्या पत्नीवरही पडतो. प्रजोत्पादन होत नाही अशा वेळी पती पत्नीचे संबंधात दुरत्वाची भावना निर्माण होते. यातून बऱ्याच वेळा पत्नी घर सोडून जाते. दुसरे लग्न करते अर्थात कुटुंबाचे विघटन होते. कारागृहात शिक्षा भोगणाऱ्या बंद्यांची वैवाहिक स्थिती काय आहे. त्या संदर्भात पुढील माहिती मिळाली.

**तक्ता -४.१.६ (अ)**

| अ.क्र. | कारागृहाचे नाव | बंद्यांचे वैवाहिक दर्जाचे वर्गीकरण (२००६-०७) | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | विवाहित | अविवाहित | स्वतंत्र | घटस्फोटित | विधवा किंवा विधुर | एकूण |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | |
| (अ) मध्यवर्ती कारागृह | | | | | | | |
| १ | येरवडा | १०१९ | ३८३ | ३३ | ५५ | १९ | १५०९ |
| २ | कोल्हापूर | २२० | ९८ | ०० | ० | ३ | ३२१ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | मुंबई | १६२० | २०४३ | ३३१ | २०९ | २३० | ४४३३ |
| ४ | ठाणे | ११२७ | १०६५ | ० | ० | ३ | २१८५ |
| ५ | औरंगाबाद | २९९ | २२६ | १४ | ० | ६ | ५४५ |
| ६ | नाशिक रोड | ५६६ | २९६ | २३ | ४३ | ५३ | ९८१ |
| ३ | नागपूर | २९२५ | ९७६ | ० | ० | ० | ३९०१ |
| ८ | अमरावती | ३१५ | ६० | ० | ० | ० | ३७५ |
| | एकूण (अ) | ८०८१ | ५१४७ | ४०१ | ३०७ | ३१४ | १४२५० |
| (ब) जिल्हा कारागृह - वर्ग १ | | | | | | | |
| ९ | येरवडा | ० | ० | ० | ० | ० | ० |
| १० | कल्याण | १२२६ | ८३७ | २१५ | १६० | २३४ | २६७२ |
| ११ | भायखळा | ३६६२ | ४५८१ | ० | ० | ० | ७८४३ |
| १२ | विशेष कारागृह रत्नागिरी | ८० | ३० | ० | १ | २ | ११३ |
| १३ | खुले कारागृह पैठण | १ | ० | ० | ० | ० | १ |
| १४ | धुळे | १७१ | ३० | १ | ६ | ६ | २१४ |
| १५ | अकोला | २७३ | ३७ | ० | ० | ० | ३१० |
| १६ | भंडारा | ११५ | ५६ | ० | १३ | २ | १८६ |
| १७ | चंद्रपूर | २१४ | १११ | ४ | ० | ३ | ३३२ |
| १८ | यवतमाळ | १८८ | ४१ | २ | ९ | ८ | २४८ |
| १९ | वर्धा | १९६ | ५० | ४ | १७ | १ | २६८ |
| २० | नाशिक बोस्टन स्कूल | ० | ० | ० | ० | ० | ० |
| २१ | औरंगाबाद खुले कारागृह | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | एकूण (ब) | ५७२६ | ५७७३ | २२६ | २०६ | २५६ | १२१८७ |
| (क) जिल्हा कारागृह - वर्ग २ | | | | | | | |
| २२ | अलिबाग | ७९ | २६ | ० | ० | ३ | १०८ |
| २३ | सावंतवाडी | १६ | १३ | ० | ३ | ३ | ३५ |
| २४ | बुलढाणा | १४८ | २७ | ० | ० | ११ | १८६ |
| २५ | परभणी | १६९ | ६५ | ० | ० | ० | २३४ |
| २६ | उस्मानाबाद | १८५ | ५४ | ० | ० | ० | २३९ |
| २७ | बीड | १५३ | १८ | ० | ० | ० | १७१ |
| २८ | नांदेड | २४९ | १२१ | ० | ० | ३ | ३७३ |
| २९ | जळगाव | ६३१ | ३३१ | ० | ० | ० | ९६२ |
| ३० | विसापूर | १४० | ८ | १७ | ६ | ० | १७१ |
| ३१ | सोलापूर | ३९० | १६५ | ० | ० | ० | ५५५ |
| ३२ | सांगली | ३०४ | १५८ | ० | ० | ० | ४६२ |
| ३३ | सातारा | २५५ | ५१ | ० | ० | १ | ३०७ |
| ३४ | अहमदनगर | ९६ | २२ | ० | ० | ३ | १२१ |
| ३५ | आटपाडी मुक्त वसाहत | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ३६ | मुंबई डी.डब्ल्यु. पी. | ३०७ | १२० | ० | ० | ३ | ४३० |
| | एकूण (क) | ३१२२ | ११७९ | १७ | ९ | २७ | ४३५४ |
| (ड) जिल्हा कारागृह - वर्ग ३ | | | | | | | |
| ३७ | जे.जे.रुग्णालय | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ३८ | कोल्हापूर शहर | १६२ | ७ | ० | ० | ० | १६९ |
| | एकूण | १६२ | ७ | ० | ० | ० | १६९ |
| | एकूण (अ+ब+क+ड) | १७०९१ | १२१०६ | ६४४ | ५२२ | ५९७ | ३०९६० |

**(स्त्रोत :- महाराष्ट्र कारागृह विभाग - हॅण्ड बुक ऑफ प्रिझन सांख्यिकी -२००६-०७)**

**तक्ता क्र. ४.१.६ (ब) बंद्यांचा वैवाहिक दर्जा दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | वैवाहिक दर्जा | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | विवाहित | १७३ | ८६.५% |
| २. | अविवाहित | २७ | १३.५% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

बंद्यांच्या वैवाहिक दर्जाचे विश्लेषण करणारी आहे. विवाह ही एक सामाजिक संस्था असून आजही भारतीय समाजात विवाह हा एक संस्कार मानला जातो. समाजाचा समतोल राखण्यासाठी प्रजोत्पादन करणे महत्त्वाचे असून समाजमान्य मार्गाने लैंगिक संबंधांसाठी मान्यता देऊन प्रजोत्पादनाचे कार्य विवाह या संस्थेमार्फत पार पाडले जाते. कारागृहात शिक्षा भोगत आसणाऱ्या बंद्यांना त्यांच्या विवाह विषयक माहिती विचारली असता (१७३) ८६.५% बंद्यांचे विवाह झालेले असून (२७)१३.५% बंद्यांचे अद्याप झाले नाही.

२७ बंद्यांचे आजपर्यंत विवाह झाले नाहीत पण ते कारागृहात आज शिक्षा भोगत आहेत याचा विपरित परिणाम त्यांच्या मनावर होण्याची दाट शक्यता वाटते. कारण व्यक्ती वयात आल्यानंतर त्यांच्या लैंगिक गरजांची पूर्तता होणे गरजेचे आहे. नाही तर त्याचा विपरीत परिणाम त्या व्यक्तीच्या मनावर होतो. ज्या वयात विवाह करुन प्रजोत्पादन करावयाचे त्याच वयात कारागृहात शिक्षा भोगणारे युवक बंदी यांच्या मानसिकतेवर कसा काय परिणाम होणार नाही असा प्रश्न मनात पडतो. पण त्या संदर्भातील कारागृह अधिकाऱ्यांनी अगोदरच सांगितले होते की, अपराध्याच्या वयाचा विचार न्यायालय करीत नसून जो अपराध झाला आहे त्यासाठी जी शिक्षेची तरतूद आहे ती बंद्यांस भोगावी लागते.

### ४.१.७ बंद्यांचा व्यवसाय :-

**तक्ता क्र. ४.१.७ (अ)**

| अ.क्र. | कारागृहाचे नाव | बंद्यांचे व्यवसायनिहाय वर्गीकरण (२००६-०७) | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | शेतकरी | शेतमजूर | व्यावसायिक | शासकीय नोकरी | खासगी नोकरी | इतर | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| (अ) मध्यवर्ती कारागृह | | | | | | | | |
| १ | येरवडा | ५७ | ११४ | ४४ | ० | २२३ | १०७१ | १५०९ |
| २ | कोल्हापूर | ६९ | ७४ | ३४ | ० | ९५ | ४९ | ३२१ |
| ३ | मुंबई | १०६५ | ८७१ | १०२ | ३ | १६१ | २२३१ | ४४३३ |
| ४ | ठाणे | २ | ० | ० | २ | २१८१ | ० | २१८५ |
| ५ | औरंगाबाद | ९० | ३८१ | २६ | ३ | ३४ | ११ | ५४५ |
| ६ | नाशिक रोड | ६७ | ८४८ | ६ | ११ | ० | ४९ | ९८१ |
| ७ | नागपूर | २१२ | १६०८ | ८८४ | ० | १०८१ | ११६ | ३९०१ |
| ८ | अमरावती | २ | ३६६ | ३ | १ | ३ | ० | ३७५ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | एकूण | १५६४ | ४२६२ | १०९९ | २० | ३७७८ | ३५२७ | १४२५० |
| (ब) जिल्हा कारागृह - वर्ग १ | | | | | | | | |
| ९ | येरवडा | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| १० | कल्याण | २०० | २६२ | ५०७ | ० | १०५३ | ६५० | २६७२ |
| ११ | भायखळा | २८ | २१२ | २७३ | ० | ४७१२ | २६१८ | ७८४३ |
| १२ | विशेष कारागृह रत्नागिरी | १६ | १५ | १ | ० | ७१ | १० | ११३ |
| १३ | खुले कारागृह पैठण | ० | १ | ० | ० | ० | ० | १ |
| १४ | धुळे | ६६ | ४४ | ३८ | २५ | ३६ | ५ | २१४ |
| १५ | अकोला | ५६ | १५३ | १८ | ५ | ६३ | १५ | ३१० |
| १६ | भंडारा | ५० | ५६ | ० | ० | ८० | ० | १८६ |
| १७ | चंद्रपूर | ९७ | २०६ | २२ | २ | १ | ४ | ३३२ |
| १८ | यवतमाळ | ८० | ११६ | १० | ० | ८ | ३४ | २४८ |
| १९ | वर्धा | ४१ | ५६ | ४० | १८ | ९९ | १४ | २६८ |
| २० | नाशिक बोस्टन स्कुल | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| २१ | औरंगाबाद खुले कारागृह | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | एकूण | ६३४ | ११२१ | ९०९ | ५० | ६१२३ | ३३५० | १२१८७ |
| (क) जिल्हा कारागृह - वर्ग २ | | | | | | | | |
| २२ | अलिबाग | २७ | ४१ | ११ | ० | २६ | ३ | १०८ |
| २३ | सावंतवाडी | ८ | ५ | ३ | १ | १४ | ४ | ३५ |
| २४ | बुलढाणा | ५७ | ९० | ० | १० | २९ | ० | १८६ |
| २५ | परभणी | ८२ | ९९ | ९ | ५ | ४ | ३५ | २३४ |
| २६ | उस्मानाबाद | ८० | ३९ | ० | ० | ० | १२० | २३९ |
| २७ | बीड | ७९ | ८० | ० | २ | ५ | ५ | १७१ |
| २८ | नांदेड | १४३ | १५५ | २० | ० | ३१ | २४ | ३७३ |
| २९ | जळगाव | १६७ | ३३९ | ० | ० | १७ | ४३९ | ९६२ |
| ३० | विसापूर | ५७ | ६७ | ० | २ | ३ | ४२ | १७१ |
| ३१ | सोलापूर | ९७ | १३४ | ८३ | ० | १९३ | ४८ | ५५५ |
| ३२ | सांगली | १८० | २०० | २७ | ० | ४० | १५ | ४६२ |
| ३३ | सातारा | ८२ | १२२ | ८ | ६ | २३ | ४४ | ३०७ |
| ३४ | अहमदनगर | २८ | १० | १७ | ५ | १४ | ४७ | १२१ |
| ३५ | आटपाडी मुक्त वसाहत | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ३६ | मुंबई डी.डब्ल्यु. पी. | ० | ० | ० | ० | ७० | ३६० | ४३० |
| | एकुण | १०८७ | १३८१ | १७८ | ३१ | ४६९ | १२०८ | ४३५४ |
| (ड) जिल्हा कारागृह - वर्ग ३ | | | | | | | | |
| ३७ | जे.जे.रुग्णालय | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ३८ | कोल्हापूर | १८ | ४१ | ० | ० | ६२ | ४८ | १६९ |
| | एकूण | १८ | ४१ | ० | ० | ६२ | ४८ | १६९ |
| | एकूण (अ+ब+क+ड) | ३३०३ | ६८०५ | २१८६ | १०१ | १०४३२ | ८१३३ | ३०९६० |

**(स्त्रोत :- महाराष्ट्र कारागृह विभाग - हॅण्ड बुक ऑफ प्रिझन सांख्यिकी -२००६-०७)**

बंदी कारागृहात येण्यापूर्वी काय काम, व्यवसाय,नोकरी करीत होता याच्या माहितीचे विश्लेषण आढळते. प्रत्येक व्यक्ती आपला व कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी काही तरी काम करते, त्या कामातून मिळणाऱ्या पैशावर कुटुंबाचा उदरनिर्वाह चालत असतो. पण बऱ्याच कुटुंबांची कहाणी सांगते की, त्यांच्या

दररोजच्या उदरनिर्वाह एवढेही त्यांचे उत्पन्न नसते. समाजातील आसणारी आर्थिक विषमता हे गुन्ह्याचे कारण मानले जाते ज्यातून दरोडे, चोरी, लूटमार, भ्रष्टाचार असे अनेक आर्थिक गुन्हे घडतात.

आज अपराधांच्या प्रमाणामध्ये आर्थिक गुन्ह्यांचे प्रमाण सर्वात अधिक जाणवते.

आर्थिक अपराध होण्यापाठीमागची अनेक कारणे जाणवतात. कुटुंबाचा आकार मोठा, कामावरून मिळणारी कमी मजुरी, त्यातून येणारे दारिद्र्य,व्यसनाधीनता यामुळे आर्थिक गुन्हे मोठ्या प्रमाणावर घडतात. व्यक्तींच्या व्यवसाय जर चांगले असेल तर बऱ्याच वेळा असे गुन्हे घडत नाहीत. त्यामुळे जे बंदी आज कारागृहात शिक्षा भोगत आहेत ते कारागृहात येण्यापूर्वी काय व्यवसाय काम करत होते यासाठी वरील प्रश्नांच्या माध्यमांतून तथ्य संकलित केले.

**तक्ता क्र. ४.१.७ ब) बंद्यांचा व्यवसाय दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र | व्यवसाय | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | शेती | ७१ | ३५.५% |
| २. | नोकरी | २९ | १४.५% |
| ३. | स्वतःचा व्यवसाय | २८ | १४% |
| ४. | व्यापार | ३ | १.५% |
| ५. | मजुरी | २६ | १३% |
| ६. | हमाली | १ | ०.५% |
| ७. | ड्रायव्हर | १७ | ८.५% |
| ८. | सालदार | २ | १% |
| ९. | शिक्षक | २ | १% |
| १०. | शेती आणि मजुरी | ८ | ४% |
| ११. | आचारी | २ | १% |
| १२. | शेती आणि नोकरी | ३ | १.५% |
| १३. | मेकॅनिक | १ | ०.५% |
| १४. | एल.आय.सी.एजंट | १ | ०.५% |
| १५. | कॉन्ट्रॅक्टर | १ | ०.५% |
| १६. | फुलारी | १ | ०.५% |
| १७. | काहीच नाही | २ | १% |
| १८. | शिक्षण | २ | १% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

संशोधकाने अभ्यासलेल्या बंद्यांपैकी (७१) ३५.५% बंदी शेती करत होते. शेती हा भारतीयांचा मूळ व्यवसाय परंपरागत आहे. याचे प्रमाण ३५.५% असून नोकरी करणाऱ्यांचे प्रमाण (२०) १४.५% तर

स्वतःचा व्यवसाय (२८) १४% व्यापार (३) १.५%, मजुरी (२६) १३%, हमाली (१) ०.५%, ड्रायव्हर (१७) ८.५%, सालदार (२) १% शिक्षक (२) १%, शेती व मजुरी (८) ४%, आचारी (२) १%, शेती आणि नौकरी (३) १.५%, मेकॅनिक (१) ०.५%, एल.आय.सी.एजंट (१) ०.५%, कॉन्ट्रॅक्टर (१) ०.५%, फुलारी (१) ०.५%, काहीच काम न करणारे (२) १% तर ज्यांचे शिक्षण चालू होते असे तरूण (२) १% असे बंद्यांच्या कामाविषयी विश्लेषण आढळले.

वरील कामाच्या प्रकारांचे बारकाईने विचार केल्यास शेती, नोकरी, व्यवसाय, मजुरी असे जर आपण गट पाडले तर आपणास लक्षात येईल की, ३५.५% शेती करणाऱ्यांचे प्रमाण अधिक आहे. नोकरी करणाऱ्यांचे (२९) १४.५% तर शिक्षक (२) १% बाकी स्वतःचा व्यवसाय करणारे, मजुरी करणारे बंदी आहेत. म्हणजेच सर्वजण साधारण जीवन जगणाऱ्या व्यक्ती आहेत. पण त्यांच्या हातून कळत न कळत रागाच्या भरात असे कृत्य घडून गेले आणि ते आपल्या सर्वसामान्य जीवनापेक्षा जेलमध्ये जीवन व्यतीत करीत आहेत असे लक्षात आले.

आज कारागृहामध्ये ज्या बंद्यांना कामाची आवड आहे त्यांना काम देण्यासाठी सुतारकाम, लोहारकाम, पंजाकाम, मेस, हजाम, कुंडाकाम, गोदाम अशा अनेक ठिकाणी काम दिले जाते. त्याचा कुशल, अर्धकुशल व अकुशल अशा प्रकारे मोबदला दिला जातो. बंदी शिक्षा संपवून बाहेर पडल्यावर स्वतःचा उदानिर्वाह करण्यासाठी सक्षम व्हावा यासाठी वरील प्रशिक्षण दिले जाते.

## ४.२ कौटुंबिक माहिती

मध्यवर्ती कारागृहात शिक्षा भोगत असलेल्या बंद्यांचे कुटुंब आज कशा अवस्थेत असेल यासाठी हा प्रश्न विचारला.कारण समाजात जीवन जगत असताना कुटुंब ही अत्यंत महत्त्वाची संस्था आहे. कुटुंब हे सामाजीकरणाचे मूल्ये रूजवण्याचे, अनौपचारिक नियंत्रणाचे प्रभावी माध्यम आहे. कुटुंबातील कुटुंब प्रमुखाची जबाबदारी अत्यंत महत्त्वपुर्ण असते. बऱ्याच वेळा कुटुंब प्रमुखाच्या वर्तनामुळे कुटुंबे उद्‌वस्त झालेली आपणास पाहावयास मिळतात. किंवा त्याचे विपरीत परिणाम कुटुंबावर होतात.

कुटुंब प्रमुख कारागृहात असल्याने त्यांचे आई, वडील, पत्नी, मुले या सर्व सदस्यांवर विपरीत परिणाम होत असतो. आई वडील वृध्द असतील तर त्यांच्या सांभाळण्याचा आर्थिक प्रश्न निर्माण होतो. मुलांवर नियंत्रण राहत नाही. परिणामी त्यांचे शिक्षणही पूर्ण होत नाही. बऱ्याच वेळा असे अनियंत्रित बालके समाज विघातक कृत्यांकडे वळतात. पत्नीची मानसिक स्थिती बिघडु शकते अर्थात संपूर्ण कुटुंबावर परिणाम होतो. बंदी कारागृहात शिक्षा भोगत असल्याने त्याच्या कुटुंबाविषयी पुढील काही प्रश्नांच्या आधारे माहिती संकलित केली.

### ४.२.१ बंद्यांच्या कुटुंबांचे सध्या राहण्याचे ठिकाण :-

बंदी कारागृहात शिक्षा भोगत असल्याने सध्या त्याच्या कुटुंबांची काय अवस्था आहे म्हणजे त्याचे कुटुंब जेथे होते तेथेच आहे का? किंवा इतर ठिकाणी स्थलांतरित झाले किंवा विस्कळीत झाले. याचा आढावा घेतला गेला. कारण कुटुंबातील प्रमुख कारागृहात असल्याने समाजातील व्यक्तींचा कुटुंब सदस्यांकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलू शकतो. त्यामुळे बऱ्याच वेळा कुटुंबे नातेवाईक किंवा इतर ठिकाणी स्थलांतर करतात. काही वेळा पत्नी दुसरे लग्न करते, मुले असतील तर नातेवाईक किंवा आई, वडील सांभाळत असतात. त्यामुळे बंद्यांच्या कुटुंबाचे सध्या राहण्याचे ठिकाण कोठे आहे यासाठी पुढील माहिती मिळाली.

**तक्ता क्र.४.२.१ बंद्यांच्या कुटुंबाचे सध्या राहण्याचे ठिकाण दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | राहण्याचे ठिकाण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | पूर्वी होते तेथेच | १६४ | ८२% |
| २. | स्थलांतरित | १४ | ७% |
| ३. | विस्कळीत/भग्न | २२ | ११% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

मध्यवर्ती कारागृहात शिक्षा भोगणारे बंदी त्यांच्या कुटुंबीयांविषयी माहिती विचारताच ते भावनावश झाले. १६४ बंद्यांनी सांगितले की, आमचे कुटुंब पूर्वी होते तिथेच आहे. (१४) ७% बंद्यांनी सांगितले की, आमचे कुटुंब आता स्थलांतरित झाले आहे. म्हणजे हा अपराध घडल्यानंतर कुटुंब प्रमुख म्हणून जी जबाबदारी होते ती संपली. त्यामुळे आता आमचे कुटुंब पाहुण्यांकडे, नातेवाईकांकडे पत्नी, मुले, आई, वडील राहतात. २२ (११%) बंद्यांनी सांगितले आम्ही जेलमध्ये आलो आणि आमचे कुटुंब उद्‌वस्त, भग्न झाले. आम्ही कारागृहात आल्याने पत्नीने दुसरे लग्न केले. मुलांना नातेवाईक सांभाळतात.काही बंदी पत्नीच्या खून प्रकरणातच अडकल्याने पत्नीचा मृत्यू झाला, मी जेलमध्ये आलो आणि मुले आता नातेवाईकांकडे राहतात. म्हणजे आमचे स्वतंत्र कुटुंब होते ते विस्कळीत झाले. वरील तक्त्या वरुन ८२% बंद्यांचे कुटुंब पूर्वी होते तिथेच आहे. त्यांचे प्रमाण अधिक असून ७% कुटुंबांचे स्थलांतर झाले यांचे प्रमाण अत्यल्प आहे. असे जाणवले.

वरील विवेचनावरून आपणास जाणवते की, गुन्ह्यासारखे कृत्य घडून सुध्दा बंद्यांचे कुटूंब पूर्वी होते तेथेच असणाऱ्यांचे प्रमाण अधिक आहे. अर्थात कुटुंबातील एखाद्या व्यक्तीने गुन्ह्याचे कृत्य केल्याने त्याचे संपूर्ण कुटुंबावर परिणाम होत असला तरी त्यांचे कुटुंब इतर ठिकाणी स्थलांतरित होत नाहीत. ही

ग्रामीण समुदायातील बंद्यांचे प्रमाण अधिक आहे आणि ग्रामीण समुदायात संयुक्त कुटूंब पध्दतीचे प्रमाण अधिक आहे. संयुक्त कुटुंबात प्रत्येक सदस्याला सुरक्षितता देण्याचे कार्य कुटुंब करीत असते. नातेवाईक समाजातील व्यक्तीसोबतचे त्यांचे परस्परसंबंध ज्यामुळे कुटुंबातील एखाद्या व्यक्तीच्या हातून असे कृत्य घडले तरी इतर सदस्यांना मानसिक पाठबळ देण्याचा प्रयत्न नातेवाईक इतर व्यक्ती करीत असतात. त्यामुळे संपुर्ण कुटुंबाला स्थलांतर करण्याची वेळ येत नाही. कुटुंबाचे स्थलांतर झाले तर अनेक समस्या निर्माण होतात. कुटुंबाचे स्थलांतर न होणे हेच त्यांच्यासाठी फायद्याचे असते, कुटुंब व समाज यातील व्यक्तीबद्दलची आत्मीयता ही महत्त्वपूर्ण असते. ही अशीच अबाधित रहावी असे वाटते.

### ४.२.२ बंद्यांच्या कुटुंबातील एकू सदस्य संख्या :-

भारतीय समाज हा कृषिप्रधान असल्याने शेती हा प्रमुख व्यवसाय आहे. भारतातील बहुसंख्य लोक शेती करतात. पारंपारिक समाजात शेतीशी निगडित बारा बलुतेदार आणि अठरा आलुतेदार होते. औद्योगिक क्रांती, शिक्षण, व्यवसायाची मुभा इ. कारणांनी व्यक्ती ग्रामीण भागातील पारंपारिक व्यवसाय सोडून शहरांकडे येऊ लागला. आज शहरीकरण मोठ्या प्रमाणावर होत असूनसुध्दा ग्रामीण समुदायात संयुक्त कुटुंबाचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर आहे. संयुक्त कुटुंबात कमीत कमी दोन पिढ्यांच्या व्यक्ती एकत्र राहतात संयुक्त कुटुंबात सदस्यांची संख्या अधिक असल्याने कामाची विभागणी होती. वरील कारणांमुळे संयुक्त कुटुंबातून विभक्त कुटुंब पध्दती निर्माण होऊ लागली. यात नियंत्रणाचा अभाव व व्यक्ती स्वातंत्र्य जाणवते.

संयुक्त कुटुंबात अनौपचारिक नियंत्रण असल्याने व्यक्तीची नियमबाह्य वर्तन करण्याची सहसा मानसिकता होत नाही, पण विभक्त कुटुंबात सदस्य संख्या कमी असल्याने नियंत्रणाचा अभाव जाणवून व्यक्ती नियमबाह्य वर्तन करण्याचा संभव जाणवतो. त्यामुळे बंद्यांच्या कुटुंबातील संख्येवरून त्याच्या कुटुंबाचाही प्रकार आपणास कळू शकतो. त्यातून आपणास बंद्यांचे संयुक्त कुटुंबातील प्रमाण जास्त आहे काय किंवा विभक्त कुटुंबातील आहे याची माहिती आपणास येऊ शकते. यासाठी संशोधकाने प्रथम कुटुंब संख्या किती आहे ही माहिती करून घेतली.

**तक्ता क्र . ४.२.२ बंदयांच्या कुटुंबातील एकूण सदस्य संख्या दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र | एकूण सदस्य | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | २ | १७ | ८.५% |
| २. | २ ते ४ | ७८ | ३९% |
| ३. | ४ ते ६ | ६४ | ३२% |
| ४. | ६ ते ८ | २६ | १३% |
| ५. | ८ ते १० | १४ | ७% |
| ६. | ११ ते १४ | १ | ०.५% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

बंद्यांच्या कुटुंबातील एकूण सदस्य संख्यांचे वर्णन करणारी आहे. कुटुंबातील एकूण सदस्य किती आहेत हे जाणून घेण्यासाठी वरील प्रश्नाचा आधार घेऊन माहिती संकलित केली. कुटुंबाचा आकार हेही गुन्हा घडण्याचे एक कारण मानले जाते. कुटुंबातील एकूण सदस्य संख्येवरून संयुक्त कुटुंब, विभक्त कुटुंब याची कल्पना येते. १७ (८.५%) बंद्यांच्या कुटुंबात फक्त दोनच म्हणजे पत्नी आणि एक मुलगा एवढेच लोक होते. ७८(३९%) बंद्यांच्या घरी २ ते ४ सदस्य , ६४ (३२%) बंद्यांच्या घरी ४ ते ६ सदस्य, २६ (१३%) ६ ते ८ सदस्य तर ८ते १० सदस्य १४ (७%) तर ११ ते १४ सदस्य १ (०.५%) बंद्यांच्या घरी असल्याचे सांगण्यात आले. २ ते ४ सदस्य असणाऱ्यांचे प्रमाण सर्वात अधिक असून ११ ते १४ सदस्य असणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण सर्वात कमी असल्याचे निदर्शनास आले. वरील आकडेवारीवरुन कुटुंबाचा आकार लक्षात येतो त्यावरुन कुटुंबाचा प्रकार कोणता आहे याचे विश्लेषण करणे सोपे होते.

### ४.२.३ बंद्यांच्या कुटुंबांचा प्रकार :-

**तक्ता क्र.४.२.३ बंदयांच्या कुटुंबाचा प्रकार दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र | कुटुंब प्रकार | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | संयुक्त | ४५ | २२.५% |
| २. | विभक्त | १३५ | ६७.५% |
| ३. | भग्न | २० | १०% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

कुटुंबाचा प्रकार लक्षात येतो त्यात संयुक्त कुटुंबांचे प्रमाण फक्त (४५)२२.५% तर विभक्त कुटुंबांचे प्रमाण (१३५)६७.५% सर्वात अधिक असून भग्न कुटुंबांचे प्रमाण (२०) १०% आढळून आले. म्हणजे विभक्त कुटुंबीयांची संख्या अधिक आहे. पारंपारिक भारतीय समाजात दोन ते तीन पिढ्यांच्या व्यक्ती एकत्र राहत होत्या. त्यांना संयुक्त कुटुंब असे म्हटले जाते. संयुक्त कुटुंबात आजही वरील आकडेवारीवरुन अपराधाचे प्रमाण कमी आहे असे जाणवते. कारण संयुक्त कुटुंबामध्ये सर्व अडीआडचणी,समस्या या सामूहिकपणे सोडवल्या जातात. तसेच कुटुंब प्रमुखांचे नियंत्रण यामुळे आजसुध्दा संयुक्त कुटुंबातून अपराधांचे प्रमाण कमी असल्याचे जाणवते.

औद्योगिक क्रांतीनंतर संयुक्त कुटुंबातील व्यक्ती शिक्षण,व्यवसाय,नोकरी काम मिळवण्यासाठी शहराकडे येऊ लागला. त्यातूनच संयुक्त कुटुंबाचे विघटन होऊन विभक्त कुटुंबाची निर्मिती झाली. विभक्त कुटुंबात पती, पत्नी आणि त्यांची अविवाहित मुले राहत असल्याने अर्थात कुटुंब सदस्य संख्या कमी असल्याने अनौपचारिक नियंत्रण म्हणावे तसे राहत नाही. समत्ताक कुटुंब असून व्यक्तिगत स्वातंत्र्याच्या भावनेतून नियंत्रणाचे प्रमाण कमी झाल्याने असे अनेक अपराध घडतात. त्यामुळेच आज कारागृहातील कैद्यांचे प्रमाण विभक्त (१३५)६७.५% कुटुंबांतील सर्वात अधिक असल्याचे दिसून येते. बंद्याला शिक्षा झाल्याने (२०)१०% बंद्यांचे कुटुंब उद्‌धवस्त अर्थात भग्न झाल्याचे सांगण्यात आले. कारण घरातील पुरुष कारागृहात आल्याने त्यांची पत्नी घर सोडून माहेरी गेली, काहींनी दुसरे लग्न केले,काही पत्नी मृत्यूमुळे कुटुंब भग्न झाले, मुले नातेवाईकाकडे वाढू लागली. पुढे याचा परिणाम म्हणून पत्नी स्वैराचारी, व्यशा व्यवसाय करणे, मुले गुन्हेगारी वर्तन करणे अशा पध्दतीने कुटुंब विस्कळीत होते. यावरुन आजही २१ व्या शतकातही संयुक्त कुटुंबाची आवश्यकता आहे असे जाणवते.

### ४.२.४ बंद्यांच्या कुटुंबांतील शिक्षित व्यक्तींची संख्या : -

कुटुंब हे व्यक्तीच्या सामाजिकीरणाचे प्राथमिक साधन आहे. कुटुंबात व्यक्ती वर्तनाचे नियम, रुढी, प्रथा, परंपरा शिकत असते. कुटुंबातील व्यक्तीचा प्रभाव व्यक्तीवर असतो. कुटुंबात ज्या पध्दतीचे संस्कार मिळतील तशा पध्दतीचे वर्तन व्यक्ती करते. कुटुंबातील व्यक्ती धार्मिक, पारंपरिक असतील तो व्यक्ती तशाच पध्दतीने वर्तन करते. जर एखादे कुटुंब सुशिक्षित असेल अर्थात शिक्षित व्यक्तींची संख्या अधिक असेल तर घरातील व्यक्तीवरही शैक्षणिक प्रभाव जाणवून त्याच्या वर्तनात फरक जाणवतो. शिक्षित व्यक्ती आधुनिकतेचा पुरस्कार करणाऱ्या असतात. त्यामुळे कुटुंबात कसे संस्कार झाले त्या पध्दतीने व्यक्ती वर्तन करीत असते. बंद्याच्या कुटुंबातील शिक्षित व्यक्तींचे प्रमाण किती आहे यासाठी पुढील माहिती मिळाली.

**तक्ता क्र. ४.२.४ बंद्यांच्या कुटुंबातील शिक्षित व्यक्तींची संख्या दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र | शिक्षित व्यक्ती | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | १ ते ४ | १२३ | ६१.५% |
| २. | ५ ते १० | ३२ | १६% |
| ३. | ११ ते १२ | १ | ०.५% |
| ४. | अशिक्षित | ४४ | २२% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

मध्यवर्ती कारागृहात शिक्षा भोगत असलेल्या बंद्यांच्या कुटुंबातील शिक्षणाचे प्रमाण कसे आहे हे तपासण्यासाठी वरील प्रश्नाचा आधार घेतला असून वरील तपशीलवार माहिती मिळाली. संशोधकाने अभ्यासलेल्या एकूण  उत्तरदात्यापैकी कुटुंबातील शिक्षणाचे प्रमाण त्यात १ली ते ४ थी म्हणजे प्राथमिक शिक्षणाचे प्रमाण (१२३) ६१.५ टक्के आढळून आले तर ५ ते १० (३२) १६ टक्के ११ ते १२ वी (१) ०.५टक्के असे चित्र जाणवले तर ४४ (२२ टक्के)  उत्तरदात्यांच्या कुटुंबातील सदस्य अशिक्षित आहेत असे आढळले. म्हणजे प्राथमिक शिक्षणाचे प्रमाण सर्वात अधिक असून ११ ते १२ पर्यंतचे शिक्षणाचे प्रमाण सर्वात कमी जाणवले. २२ टक्के अशिक्षित कुटुंब सदस्यांचे प्रमाण जाणवले. शिक्षणाचे प्रमाण फक्त शहरी भागातच वाढले असून आजही ग्रामीण भागातील शिक्षणाचे प्रमाण वाढले नाही. निरक्षरतेचे प्रमाण ग्रामीण भागात जास्त असून त्यासाठी शासन,निमशासकीय संस्था अशा सर्व पातळ्यावर प्रयत्न चालू आहेत तरी परंतु साक्षरतेचे प्रमाण वाढत नाही. यासाठी मुलांना सक्तीचे शिक्षण या संदर्भात २००६ मध्ये केंद्र सरकारने कायदा करुन प्राथमिक शिक्षण सर्वांसाठी मोफत आणि सक्तीचे केले आहे. शिक्षणाचे प्रमाण वाढले तर अनेक समस्यांवर उपाय होऊ शकतात. तसेच अपराधांचे प्रमाणही कमी होण्यास मदत होऊ शकते.

### ४.२.५ बंद्याला शिक्षा झाल्याने कुटुंबावर झालेला परिणाम :-

बंदी त्याने केलेल्या अपराधी वर्तनाची शिक्षा कारागृहात भोगत असतांना त्याच्या कुटुंबावर काय काय परिणाम झाले या संदर्भात माहिती संकलित केली. कारण बंद्यांचे आई, वडील, पत्नी, मुले यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. त्या कोणकोणत्या समस्या आज निर्माण झाल्या आहेत किंवा कुटुंबावर कशा पध्दतीचा परिणाम झाला आहे. आई वडिलांच्या पालन पोषणाची मुलांचे शिक्षण सर्वांची मानसिक चिंता, समाजाचा पाहण्याचा दृष्टिकान आरोग्यावर होणारे परिणाम बऱ्याच वेळा कुटुंब भग्न होतात याचा परिणाम कुटुंबातील सर्व सदस्यांवर होत असतो.

**तक्ता क्र. ४.२.५ बंद्यांला शिक्षा झाल्याने कुटुंबावर झालेला परिणाम दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र | परिणाम | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | कुटुंब भग्न झाले | ६० | ३०% |
| २. | मुलांच्या शिक्षणावर | १० | ५% |
| ३. | आर्थिक | ३७ | १८.५% |
| ४. | मानसिक | १० | ५% |
| ५. | सामाजिक | ०१ | ०.५% |
| ६. | आरोग्यावर | ०१ | ०.५% |
| ७. | नोकरी गेली | ०१ | ०.५% |
| ८. | आई-वडिलांना दुःख | ०५ | २.५% |
| ९. | आर्थिक व मानसिक | ०२ | १% |
| १०. | वरील सर्व | ७१ | ३५.५% |
| ११. | संपूर्ण कुटुंब | ०१ | ०.५% |
| १२. | काहीच नाही | ०१ | ०.५% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

कारागृहातील बंद्यांना शिक्षा झाल्याने त्यांचा कुटुंबावर काय परिणाम झाला याची माहिती घेण्याचा प्रयत्न केला आहे. कुटुंब प्रमुख म्हणुन कुटुंबात कार्य करताना अपराधामुळे कारागृहात आल्याने संपूर्ण कुटुंबावर विपरीत परिणाम होतो. मुलांवर आर्थिक,आरोग्य,सामाजिक,मानसिक असे अनेक महत्त्वपूर्ण विपरीत परिणाम कुटुंबावर होतो.

संशोधकाने अभ्यासलेल्या एकूण बंद्यांपैकी (६०) ३० टक्के बंद्यांचे कुटुंब उद्‌वस्त झाले. म्हणजे बंद्यांला शिक्षा झाल्याने त्यांची पत्नी घर सोडून गेली. मुले नातेवाईकांकडे गेली. त्यामुळे कुटुंब भग्न झाले. मुलांच्या शिक्षणावर परिणाम झाले असे (१०) ५ टक्के बंद्यांनी सांगितले. आर्थिक परिणाम (३७) १८.५टक्के बंद्यांच्या कुटुंबीयांवर झाले. तसेच मानसिक परिणाम (१०) ५ टक्के बंद्यांवर परिणाम झाला असे सांगितले. सामाजिक परिणाम (१) ०.५ टक्के आरोग्यावर परिणाम (०१) ०.५ टक्के, नोकरी गेली (०१)०.५ टक्के,आई वडीलांना दुःख झाले (०५)२.५ टक्के,आर्थिक व मानसिक परिणाम (०२) १ टक्के वरील सर्व घटकांचा एकत्रित परिणाम (७१)३५.५ टक्के बंद्यांच्या कुटुंबीयांवर झाला. बंद्यांचा शिक्षेबरोबर संपूर्ण कुटुंबालाही शिक्षा झाल्याने संपूर्ण कुटुंब म्हणजे आई, वडील, भाऊ कारागृहातच आहे असे (०१)०.५ टक्के तर काहीच परिणाम झाला नाही असे (०१)०.५ टक्के बंद्यांनी सांगितले.

वरील विषलेषणावरुन बंद्यांला शिक्षा झाल्याने प्रथम कुटुंबातील मुलांवर, शिक्षणावर, आर्थिक परिणाम,मानसिक परिणाम झाला. म्हणजेच मुलांवर जे नियंत्रण होते ते नियंत्रण राहिले नाही अर्थात मुलांनी

शाळेत जाणे सोडले. कुटुंबातील कर्ता पुरुष कारागृहात आल्याने आर्थिक उत्पन्न थांबले. त्याचा विपरीत परिणाम उदरनिर्वाहावर झाला. सर्वात महत्त्वपूर्ण म्हणजे कुटुंबातील इतर सर्वांवर मानसिक परिणाम मोठ्या प्रमाणावर झाला. समाजामध्ये कुटुंबाकडे पाहण्याचा दर्जा खालावला. सर्व लोक कुटुंबाची अवहेलना करतात, कुटुंबाच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ लागला. अपराध घडल्याने शिक्षा झाल्याने जी नोकरी होती ती नोकरीही गेली. शिक्षा झाल्याने काही बंद्यांच्या आई ,वडीलांना दु:ख झाले म्हणजे बंद्याला शिक्षा झाल्याने कुटुंबावर अतिशय विपरीत परिणाम वरीलप्रकारे झाले.

**४२.६ बंद्यांच्या कुटुंबातील व्यक्तींची बंद्यांबद्दलची आपलेपणाची भावना :-**

कुटुंब हे प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात अत्यंत महत्त्वपूर्ण असते. सामाजिकीरणाचे प्राथमिक साधन म्हणुन कुटुंबाकडे पाहिले जाते. कुटुंबातील प्रत्येक सदस्यामध्ये आत्मीयतेची, आपलेपणाची भावना असते तरी परंतु कुटुंबातील सदस्याकडून अपराध घडून शिक्षा झाल्याने आज जे कारागृहात शिक्षा भोगत आहेत त्यामुळे कुटुंबातील व्यक्तींची आज बंद्याबद्दल आपलेपणाची भावना आहे काय यासाठीच या प्रश्नाद्वारे हे माहिती करून घेण्याचा प्रयत्न केला गेला.

**तक्ता क्र. ४.२.६ बंद्यांच्या कुटुंबातील व्यक्तीची बंद्यांबद्दलची आपलेपणाची भावना दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | आपलेपणाची भावना | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | आहे | १९७ | ९८.५% |
| २. | नाही | ०३ | १.५% |
| | **एकुण** | **२००** | **१००%** |

संशोधकाने अभ्यास केलेल्या एकुण बंद्यांपैकी १९७ (९८.५%) बंद्यांनी सांगितलेली कुटुंबातील व्यक्तींची त्यांच्याबद्दल आजही आपलेपणाची भावना आहे तर फक्त ३ (१.५%) बंद्यांनी आपलेपणाची भावना नाही असे सांगितले. कुटुंबीय अतिशय प्रिय असते. त्यामुळे कुटुंबातील सदस्य कारागृहात जरी असला तरी त्यांच्या प्रती प्रेमाची, आपलेपणाची भावना नाही असे सांगितले. कुटुंबीय अतिशय प्रिय असतात त्यामुळे कुटुंबातील सदस्य कारागृहात जरी असला तरी त्यांच्या प्रति प्रेमाची, आपलेपणाची भावना असते.

### ४.२.७ बंद्याला कारागृहात कुटुंबीयांची आठवण येते काय?

कुटुंबातील व्यक्ती या रक्तसंबंधीत व अतिप्रिय असतात त्यामुळे कुटूंबातील व्यक्तीबद्दल आत्मेयतेची भावना असते. जन्मापासून मृत्यूपर्यंत व्यक्ती कुटुंबातच राहत असल्याने प्रत्येक सदस्याबद्दल जिव्हाळा असतो. बहुसंख्य बंद्यांनी सांगितले की घरच्यांच्या आठवणीशिवाय आमचा एकही क्षण जात नाही. या प्रश्नाचे उत्तर सांगताना त्यांच्या चेहऱ्यावर दु:ख आणि आनंदाची भावना जाणवत होती.

**तक्ता क्रं.४.२.७**

**बंदयांला कारागृहात कुटुंबीयांची आठवण येते काय दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र | आठवण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | आठवण येते | १९४ | ९७% |
| २. | आठवण येते | ०६ | ३% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

कुटुंबीयांबद्दल आपलेपणाची भावना असतेच. पण कारागृहात असताना कुटुंबीयांची आठवण येते का? यासाठी बंद्यांना प्रश्न विचारला असता (१९४) ९७% बंद्यांना कुटुंबीयांची आठवण येते असे सांगितले तर (०६) ३% बंद्यांनी कुटुंबीयांची आठवण येत नाही असे सांगितले. याचे कारण विचारले असता त्यांनी सांगितले की, मी कारागृहात असल्याने पत्नी व्यभिचार करते, काहींनी सांगितले पत्नीने दुसरे लग्न केले,काहींनी सांगितले अजून लग्न झाले नाही, आई-वडील होते पण आता ते मरण पावले आहेत म्हणुन कुटुंबीयांची आठवण येत नाही असे सांगितले.

### ४.२.८ बंद्याने केलेल्या अपराधाव्यतीरिक्त कुटुंबातील सदस्याने कधी गुन्हा केला होता काय ?

समाजात व्यक्ती वावरत असताना अनेक चांगले आणि वाईट प्रसंग/घटना घडत असतात. बऱ्याच वेळा कुटुंबात किंवा कुटुंबातील व्यक्तीवर एखादे समाज विघातक कृत्य करण्याची वेळ येत असते. अशा प्रसंगी संपूर्ण कुटुंबावर परिणाम होत असतो. घरात अशा अनुचित घटना हमेशा घडत राहिल्या तर कुटुंबातील व्यक्तींवर संस्कार तसेच होतात आणि इतर सदस्यही असे कृत्य करण्यास घाबरत नाहीत. गुन्हेगारीची पार्श्वभूमी घरातच तयार होते. ज्या कुटुंबात संवाद असत नाही तेथे अनौपचारिक नियंत्रणाचे प्रमाण कमी असते. यातून अशा गुन्ह्यासारख्या घटना घडत असतात. सर्वसामान्य कुटुंबात सुध्दा म्हणजे ज्यांना गुन्हेगारीची पार्श्वभूमी नाही अशा कुटुंबातसुध्दा असा एखादा प्रसंग निर्माण होतो आणि

अपराधासारखे कृत्य सदस्यांच्या हातून घडते. त्यामुळे संशोधकाने बंद्यांच्या घरातील गुन्हेगारीची पार्श्वभूमी अप्रत्यक्ष माहिती करून घेण्याचा प्रयत्न केला आहे.

जर बंद्याने केलेला गुन्हा व्यतिरिक्त इतर सदस्याने गुन्ह्याचे वर्तन केले असेल तर कोणता गुन्हा केला याचीही माहिती संकलित केली.

**तक्ता क्र.४.२.८ बंद्याने सध्या केलेल्या गुन्ह्याव्यतिरिक्त कुटुंबातील सदस्याने कधी गुन्हा केला होता काय ? हे दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र | गुन्हा | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | होय | ११ | ५.५% |
| २. | नाही | १८९ | ९४.५% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

बंद्यांच्या कुटुंबात सर्व सदस्य राहत असताना कुटुंबातील इतर सदस्यांनी (बंदी सोडून) कधी अपराध केला होता काय या संदर्भात सविस्तर माहिती वरीलप्रमाणे मिळाली. कारण अपराधाची पार्श्वभूमी बऱ्याच वेळेला कुटुंबापासून सुरुवात होते. त्याचा परिणाम किंवा अनुकरण किंवा प्रभाव म्हणून इतर सदस्य अपराध अतिशय सफाईदार पध्दतीने करतात. बंद्यांच्या घरात अशी काही पार्श्वभूमी आहे काय याची माहिती घेण्यासाठी वरील स्वरूपाचा प्रश्न विचारण्यात आला. त्याचे सविस्तर विवरण पुढीलप्रमाणे करता येईल. संशोधकाने निवडलेल्या एकण उत्तरदात्यांपैकी (१८९) ९४.५ टक्के बंद्यांनी आमच्या व्यतिरिक्त कुटुंबात इतर सदस्यांनी कधीच गुन्हा केला नाही तर (११) ५.५ टक्के बंद्यांनी कुटुंबातील इतर सदस्यांनी गुन्हा केला होता असे सांगितले.

वरील विवेचनावरुन आपणास जाणवते की, बहुसंख्य बंद्यांच्या कुटुंबात अशी गुन्हेगारीची पार्शर्वभूमी नसून बंद्यांने प्रथमच अपराधाचे वर्तन केले म्हणजे काही विशेष प्रसंगामुळेच असे वर्तन आम्हाला करणे भाग पडले असे बंद्यांनी सांगितले. एकूण बंद्यांपैकी ५.५% बंद्यांनी बंद्याने केलेल्या गुन्ह्याव्यतिरिक्त गुन्हा केला होता असे सांगितले. म्हणजे फक्त ५.५टक्के (११) बंद्यांच्या कुटुंबात गुन्हेगारीची पार्श्वभूमी आढळली . गुन्हेगारीची पार्श्वभूमी असणाऱ्या कुटुंबातील व्यक्तींनी कोणता गुन्हा केला होता याची माहिती जाणून घेण्यासाठी संशोधकाने बंद्याला पुढील प्रश्न केला.

### ४.२.९ कोणता गुन्हा केला ?

**तक्ता क्र. ४.२.९ होय तर कोणता गुन्हा दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र | गुन्हा | वारंवारिता |
|---|---|---|
| १. | **जबरी चोरी - (३९२)** | ०३ |
| २. | घातक हत्याराने किंवा साधनांनी दुखापत करणे + (३२४)+(३२६) +खून करण्याचा प्रयत्न करणे (३०७) | ०४ |
| ३. | **मारामारी** | ०२ |
| ४. | (११०) ज्यास साहाय्य मिळाले, त्याने त्या सहाय्य करणाच्या इराद्यातून निराळ्या इराद्याने कृत्य केले असता त्याहुन निराळे कृत्य घडले त्याबद्दल साहाय्य करणाऱ्यावर जबाबदारी | ०१ |
| ५. | ३७९+४५७ चोरी बद्दल शिक्षा + रात्री घर फोडण्याचा अपराध | ०१ |
| | **एकूण** | **११** |

बंद्या व्यतिरिक्त इतर कुटुंबीयांनी अपराध केला होता असे ११ बंद्यांनी सांगितले. त्यांनी कोणता गुन्हा केला असा प्रश्न केला असता या मध्ये चोरी, रात्री घर फोडण्याचा प्रयत्न, घातक हत्याराने दुखापत आणि खून करण्याचा प्रयत्न, मारामारी अशा प्रकारची गुन्हे कुटुंबातील सदस्यांनी केले होते.

### ४.२.१० कुटुंब सदस्यास त्यात शिक्षा झाली काय?

कुटुंब सदस्याने जो गुन्हा केला त्या गुन्ह्यामध्ये त्या सदस्याला शिक्षा झाली असेल तरी पण बंद्याला अशा अपराधी कृत्याच्या परिणामांची माहिती असून सुध्दा अशा प्रकारचे कृत्य करण्यापाठीमागची पार्श्वभूमी आपणास लक्षात येते.

**तक्ता क्र. ४.२.१० कुटुंबातील सदस्यांना शिक्षा झाली काय ते दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र | शिक्षा | वारंवारिता |
|---|---|---|
| १. | होय | ०२ |
| २. | नाही | ०९ |
| | **एकूण** | **११** |

बंद्याव्यतिरिक्त इतर कुटुंबांतील सदस्याने कधी गुन्हा केला काय असे विचारले असता ११ बंद्यांनी होय असे सांगितले. मग त्यांना शिक्षा झाली काय असे विचारता ९ बंद्यांनी नाही असे सांगितले तर फक्त २ बंद्यांनी शिक्षा झाली होती असे सांगितले.

**४.२.११ कुटुंब सदस्याने केलेल्या गुन्ह्यात बंद्यांचा सहभाग :-**

कुटुंबातील एखाद्या सदस्याने गुन्हा केला. त्या गुन्ह्यात बंद्याचा सहभाग होता काय? हे महत्त्वाचे आहे. कुटुंबातील व्यक्तीनी ठरवून मुद्दाम नियोजनबध्द एखादी कृती केली असेल तर त्यात अनेक लोकांचा सहभाग असतो. पण प्रमुख ज्याने हे कृत्य केले त्याला शिक्षा होते. अशा कुटुंब सदस्याने केलेल्या गुन्ह्यात बंद्याचा सहभाग होता काय हे अतिशय महत्त्वाचे असते. कारण पूर्वी अशी घटना घडली त्यात बंद्याचा सहभाग होता मग पुन्हा असे कृत्य बंद्याने का केले म्हणजे अशा वर्तनाचा परिणाम त्यांना माहीत असून सुध्दा असे पुन्हा वर्तन घडले काय, त्यापाठीमागे मुख्य कारण काय आहे ते माहिती करुन घेण्यासाठी संशोधकाने असा प्रश्न करुन माहिती संकलित केली.

**तक्ता क्र ४.२.११**

**बंद्यीव्यतिरिक्त कुटुंबातील सदस्यांनी केलेल्या गुन्ह्यात बंदी सहभागी होता काय हे दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र | सहभाग | वारंवारिता |
|---|---|---|
| १. | होता | १० |
| २. | नाही | ०१ |
| | **एकूण** | **११** |

बंद्याव्यतिरिक्त कुटुंबातील व्यक्तीने केलेल्या अपराधात बंद्यांचा समावेश होता काय असे विचारले असता ०१ बंद्यांनी नाही तर १० बंद्यांनी आमचा सहभाग होता असे सांगितले.

वरील विश्लेषणावरुन असे जाणवते की, गुन्हेगारी पार्श्वभूमी ज्या कुटुंबाला आहे त्या कुटुंबातील व्यक्तीने गुन्हा केला त्यात बंद्यांचा सहभाग होता अशी बंद्याचे प्रमाण सर्वाधिक आहे. अर्थात १० बंद्यांना गुन्हेगारी पार्श्वभूमी आहे, त्यांचा सहभाग यात होता. कौटुंबिक भांडणामध्ये, कुटुंबातील व्यक्तीचे इतरांसोबत भांडण होत असताना आम्हीही त्यात सहभागी झालो होतो असे बंद्यांनी सांगितले. पण अशा गुन्ह्यात आमचा प्रत्यक्ष सहभाग नव्हता. बऱ्याच बंद्यांनी सांगितले आमचे नाव मुद्दाम गोवले गेले आहे. आम्ही कुटुंबीयांची मदत करताना आम्ही गंभीर अपराध केला नाही. अप्रत्यक्ष त्यात आमचा सहभाग होता

असे सांगितले. बंद्याचा अप्रत्यक्ष सहभाग होता. मग त्या गुन्ह्यात त्याला शिक्षा झाली काय यासंबधीची माहिती मिळवण्यासाठी त्यांना पुढील प्रश्न विचारला.

### ४.२.१२ बंद्यी सहभागी असेल तर त्याला झालेली शिक्षा :-

बंद्याने आता शिक्षा भोगत असलेल्या गून्ह्याव्यतिरीक्त गुन्ह्याचे कृत्य केले किंवा घडले असेल तर त्यात त्या व्यक्तीला शिक्षा झाली होती काय हेही महत्त्वाचे आहे. सतत गुन्हे करून शिक्षा भोगून पुन्हा असेच गुन्ह्याचे वर्तन करत असेल तर सराईत गुन्हेगार आहे काय तशी त्याची पार्श्वभूमी अभ्यासता येते.

**तक्ता क्र. ४.२.१२ त्या गुन्ह्यात बंद्यांला शिक्षा झाली होती काय ? हे दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र | शिक्षा | वारंवारिता |
|---|---|---|
| १. | होय | ०२ |
| २. | नाही | ०९ |
| | **एकूण** | **११** |

बंद्याला या अपराधाअगोदर कुटुंबातील इतर व्यक्तींनी गुन्हा केला. त्यात बंद्यांचा सहभाग होता असे बहुसंख्य बंद्यांनी सांगितले होते. त्यावेळी आपणास शिक्षा झाली होती काय असे विचारले असता नाही असे ०९ बंद्यांनी तर ०२ बंद्यांनी शिक्षा झाली होती असे सांगितले. शिक्षा न झाल्याचे प्रमाण अधिक आहे. कारण जे अपराध घडलेल्या बंद्यांचा सहभाग होता. पण गंभीर स्वरूपाचा गुन्हा नसल्याने त्यांना शिक्षा झ ाली नाही. ज्या दोन बंद्यांना शिक्षा झाली ती ३ वर्षांची शिक्षा झाली होती.

### ४.२.१३ कारागृहाबाहेर असतांना बंद्यांचे मित्रासंबंधी माहिती :-

व्यक्ती जीवन जगत असताना व्यक्तीवर कुटुंब या बरोबरच मित्रांचा प्रभाव खूप मोठ्या प्रमाणावर असतो. विचार एकमेकांचे जुळले तर ते मित्र होतात. एकमेकांच्या वर्तनाचा परिणाम एकमेकांवर होतो. बऱ्याच वेळा अपराधी वर्तनासाठी कुसंगती म्हणजे वाईट मित्रांचा सहवास हे कारण सांगितले जाते. तसेच मित्र एकमेकांना अडचणीच्या काळात मदत करतात एकमेकांना सर्व प्रकारचा आधार देत असतात. कारागृहात शिक्षा भोगणारा बंदी हा कारागृहात येण्यापूर्वी त्याचे मित्र होते काय? सध्या ते काय करतात? बंद्यांच्या कुटुंबीयांना आता मदत करतात काय? या संदर्भात बंद्याकडून सविस्तर माहिती पुढील प्रकारे मिळाली.

**तक्ता क्र.४.२.१३**

**कारागृहाच्या बाहेर असताना बंद्यांचे मित्र होते काय ? हे दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र | मित्र | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | होय | १६८ | ८४% |
| २. | नाही | ३२ | १६% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

प्रत्येक व्यक्तीच्या सामाजिकीरणाची जी विविध साधने असतात. त्यात कुटुंबाबरोबरच त्या व्यक्तीचे मित्रही तेवढेच महत्त्वपूर्ण असतात. कारण व्यक्तीच्या मित्रांवरुन व्यक्तीचा स्वभाव,आवडी,वर्तन यांची कल्पना येते. मित्र जर चांगले असतील तर व्यक्तींच्या वर्तनावर चांगलाच परिणाम होतो. वरील सारणीत कारागृहात राहणारे बंदी जेव्हा बाहेर सर्वसामान्य जीवन जगत होते तेव्हा त्यांचे मित्र होते काय असा प्रश्न केला असता (१६८) ८४ टक्के बंद्यांनी मित्र होते असे सांगितले तर (३२) १६ टक्के बंद्यांनी मित्र नव्हते असे सांगितले म्हणजे मित्र असणाऱ्यांचे प्रमाण अधिक आहे.

वरील विश्लेषणावरुण आपणास जाणवते की, मित्र असणाऱ्या बंद्यांचे प्रमाण अधिक आहे. प्रत्येक व्यक्तींना मित्र असतात. मित्रांना अनन्य साधारण महत्त्व असते. कारण मित्र हा व्यक्तीच्या सामाजिकीरणाचे प्राथमिक साधन मानले जाते. व्यक्ती ज्या गोष्टी आपल्या कुटुंबासोबत बोलू शकत नाही त्या गोष्टी मित्रांसोबत चर्चा करत असतो. गुन्ह्यासारखे कृत्य करताना मित्राला सांगितले होत काय किंवा त्यांना याची माहिती होती काय तर बहुसंख्य बंद्यांनी नाही असे सांगितले. आहेत जिवलग मित्र आमचे असे बहुसंख्य बंद्यांनी सांगितले.

### ४.२.१४ बंद्यांचे मित्र सध्या काय करतात?

**तक्ता क्र. ४.२.१४ बंद्यांचे मित्र सध्या काय करतात हे दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र | व्यवसाय | वारंवारिता |
|---|---|---|
| १. | शेती | ६५ |
| २. | व्यवसाय | ३० |
| ३. | काम | ५० |
| ४. | चोऱ्या व लूटमारी | ०२ |
| ५. | नोकरी | १६ |
| ६. | शिक्षा भोगत आहे | ०५ |
| | **एकूण** | **१६८** |

१६८ बंद्यांनी येथे येण्यापूर्वी मित्र होते असे सांगितले. ते आता काय करतात याची माहिती विचारली असता शेती करणाऱ्यांचे प्रमाण ६५,व्यवसाय करणारे ३०,काम (मजुरी) ५०,चोऱ्या,लूटमाऱ्या ०२, नोकरी १६, भिक्षा मागतात ०५ असे बंद्यांनी विवरण सांगितले. शेती करणाऱ्यांचे प्रमाण अधिक असून चोऱ्या लूटमार करणाऱ्यांचे प्रमाण सर्वात कमी आहे.

**४.२.१५ बंद्यांचे मित्र आता बंद्यांच्या कुटुंबाला मदत करतात.**

**तक्ता क्र. ४.२.१५ बंद्यांचे मित्र आता कुटुंबाला मदत करतात काय ? हे दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र | मदत | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | मदत करतात | २० | १०% |
| २. | मदत करत नाहीत | १८० | ९०% |
| | **एकूण** | २०० | १००% |

बंद्यांचे जे पूर्वीचे मित्र होते ते बंद्यांच्या कुटुंबीयांना मदत करतात का असे विचारले असता १८० बंद्यांनी नाही असे सांगितले तर २० बंद्यांनी मदत करतात असे सांगितले. म्हणजेच मित्र जोपर्यंत आपण त्यांच्या सोबत आहोत तोपर्यंतच सोबत राहतात. पण आपण आडचणीत असल्यावर आपल्या कुटुंबीयांना मदत करत नाहीत असे बहुसंख्य बंद्यांनी सांगितले.

वरील विवेचनावरुण आपणास निदर्शनास येते की, जिवलग मित्र असूनसुध्दा आता ते बंद्यांच्या कुटुंबाला मदत करत नाहीत. याचे सोबत होतो तो पर्यंत ते आमच्या सोबत चांगले होते. पण आमच्या हातून गुन्ह्याचे कृत्य घडल्याने ते आता आमच्या कुटुंबास सुध्दा मदत करत नाहीत. त्यामुळे आमचा मित्रांवरील विश्वास उडाला आहे असे बहुसंख्य बंद्यांनी सांगितले.

मित्र हा आनंदापेक्षा दुःखात मदत करणारा असतो. पण वरील विवेचनावरुन जाणवते की, मित्र फक्त सुखात सोबत असतात. दुःखात मात्र आपल्या सोबत नसतात .यावरुन मित्रांची व्याख्याही बदलत जात आहे असे जाणवते. ज्या बंद्यांनी सांगितले की आमचे मित्र कुटुंबीयांना आजही मदत करतात. मग हे मित्र बंद्यांच्या कुटुंबीयांना कोणती मदत करतात या माहितीसाठी पुढील प्रश्न केला.

**४.२.१६ बंद्याचे मित्र कुटुंबाला कशा प्रकारची मदत करतात?**

**तक्ता क्र.४.२.१६ बंद्यांचे मित्र कुटुंबीयांना कशा स्वरूपाची मदत करतात ते दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र | स्वरुप | वारंवारिता |
|---|---|---|
| १. | आर्थिक | १० |
| २. | मानसिक | ०५ |
| ३. | आरोग्य | ०५ |
| | **एकूण** | **२०** |

बंद्यांचे मित्र बंद्यांच्या कुटुंबीयांना जी अल्पशी मदत करतात त्या मदतीचे स्वरूप विचारले असता आपल्या कुटुंबाला आजही आमचे मित्र गरज पडेल तेव्हा पैसे देऊन आर्थिक मदत करतात १०, घरातील व्यक्तींना मानसिक आधार देतात ०५, तर घरातील व्यक्ती आजारी पडल्यावर कुटुंबीयांना दवाखान्यात घेऊन जातात असे ०५ बंद्यांनी सांगितले. त्यांचा आम्हाला आधार वाटतो व आमच्या मित्रांचा अभिमान वाटतो.

## ४.३ बंद्यांच्या आर्थिक परिस्थिती संबंधी माहिती

अर्थसंस्था ही समाजव्यवस्थेचा महत्त्वाचा घटक आहे. व्यक्तीच्या गरजा भागवण्यासाठी पैसा हे साधन असते. आपल्याकडे किती पैसा आहे त्यावरून आपला दर्जा (श्रीमंत, गरीब) असा ठरतो. कार्ल मार्क्सच्या भाषेत सांगायचे झाल्यास अर्थ संस्था ही समाज व्यवस्थेचा पायाभूत संरचना (Basic Structure) असून यावरच बाकी सर्व व्यवस्था अवलंबून आहेत. ज्याला (Super Structure) अशी संरचना असे विश्लेषण कार्ल मार्क्स करतात. तसेच भांडवलदार आणि कामगार असे दोन वर्ग भांडवलशाही अर्थ व्यवस्थेमध्ये निर्माण होत असतात. दोन वर्गात समाजाची विभागणी प्राचीन काळापासून चालत आली असून त्यात हमेशा संघर्ष होत असतो. यातून अर्थव्यवस्थेचे महत्त्व लक्षात येते. भारतात गरीब, श्रीमंत अशी दरीही आचरणास पाहावयास मिळते. श्रीमंत गरिबांचे हमेशा शोषण करतात. त्यातून गरीब व्यक्ती जीवन जगताना आपल्या मूलभूत गरजाही पूर्ण करु शकत नाही. अशा परिस्थितीत गरीब व्यक्ती नियमबाह्य वर्तन करुन आपल्या गरजा पूर्ण करतात. भारतात गुन्ह्यांच्या प्रमाणात कारणांचा विचार केला तेव्हा आर्थिक गुन्ह्यांचे प्रमाण अधिक आहे. अर्थात बऱ्याच वेळा व्यक्तीची आर्थिक परिस्थितीच गुन्ह्यासारखे कृत्य करण्यास कारणीभूत ठरते. कारागृहात शिक्षा भोगणाऱ्या बंद्यांची आर्थिक

परिस्थिती कशी आहे. त्यांनी केलेल्या अपराधास आर्थिक परिस्थिती हेच कारण होते हे या संदर्भात संशोधकाने बंद्याला त्या संदर्भातील काही प्रश्न केले आणि त्या संबंधीची माहिती पुढीलप्रमाणे मिळाली.

### **४.३.१ बंद्याला स्वतःची जमीन आहे काय?**

भारत हा कृषिप्रधान देश असून शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. ग्रामीण भागातील बहूसंख्य व्यक्ती शेती आणि त्या सोबत निगडित व्यवसाय करुन आपला उदरनिर्वाह करतात. प्राचिन काळापासून आजच्या आधुनिक युगापर्यंत शेतीचे महत्त्व कमी झाले नाही असे जाणवते. ग्रामीण समुदायात शेतीला आजही काळी आई असे संबोधले जाते. त्यांच्याकडे किती जमीन आहे त्यावरुन त्यांच्या समाजात दर्जा ठरत असतो. त्यामुळे कारागृहात शिक्षा भोगणाऱ्या कैद्यांकडे स्वतःची जमीन आहे काय? जर असेल तर किती एकर असे प्रश्न करुन संशोधकाने माहिती संकलित केली ती पुढीलप्रमाणे.

**तक्ता क्रं .४.३.१ बंद्याला स्वतःची जमीन आहे काय ? दर्शविणारा तक्ता**

| **अ.क्र** | **जमीन** | **वारंवारिता** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १. | आहे | ११५ | ५७.५% |
| २. | नाही | ८५ | ४२.५% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

ही बंद्यांच्या स्वतःची जमीन आहे काय या संबंधी माहिती होण्यासाठी वरील प्रश्न विचारला. भारतात आज शेती हा व्यवसाय मुख्य व्यवसाय मानला जातो. आज शेतीवरच बहुसंख्य कुटुंबीयांचा उदरनिर्वाह चालतो. कारागृहात शिक्षा भोगणाऱ्या बंद्यांकडे म्हणजे ११५ (५७.५%) जमीन स्वतःची आहे तर ८५ (४२.५%) बंद्यांकडे स्वतःची जमीन नाही. स्वतःची जमीन असणाऱ्यांचे प्रमाण अधिक तर स्वतःची जमीन नसणाऱ्यांचे प्रमाण कमी जाणवले.


वरील शेतीच्या प्रमाणावरुन आपणास जाणवते की, ज्यांच्याकडे जमीन आहे अशा व्यक्तींचे प्रमाण अधिक आढळले. त्यांच्याकडे जमीन असल्याने उत्पन्नाचे निश्चित साधन असते अशा व्यक्तींमध्ये गुन्ह्यांचे प्रमाण अधिक जाणवते.

### ४.३.२ बंद्याला किती एकर शेती आहे ?

**तक्ता क्रं. ४.३.२ जमीन आहे तर किती एकर ? दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **एक्कर** | १ ते २ | ३ ते ४ | ५ ते ६ | ७ ते १० | ११ ते१५ | १६ते २० | २० ते ३० | ५० ते १०० | - |
| **वारंवारिता** | १६ | ३१ | २८ | २० | ९ | ६ | ३ | २ | ११५ |

**बंद्याला असलेली जमीन दर्शविणारा आलेख ४.४**




एकूण ११५ बंद्यांकडे स्वतःची जमीन आहे असे तथ्य संकलनातून कळाले. मग ही जमीन किती आहे असा प्रश्न विचारला असता १ ते २ एकर असणाऱ्या बंद्यांचे प्रमाण १६, ३ ते ४ एकर जमीन असणाऱ्या ३१, ५ ते ६ एकर २८, ७ ते १० एकर २०, ११ ते १५ एकर ०९, १६ ते २० एकर ०६, २० ते ३० एकर ०३, १०० एकर ०२ असे विश्लेषण आढळले. म्हणजे १०० एकर असणारे मोठे शेतकऱ्यांचे प्रमाण सर्वात कमी म्हणजे फक्त २ असून ३ ते ४ एकर म्हणजे अल्पभूधारक यांची संख्या सर्वाधिक म्हणजे ३१ एवढी आहे. जर आपण एक एकर ते दहा एकर असा गट केला तर २०० पैकी ९५ बंद्यांकडे १ ते १० एकर एवढीच जमीन आहे म्हणजेच अल्पभूधारकांचे प्रमाण सर्वाधिक आहे असे जाणवते. ११ ते ३० एकर जमीन असणाऱ्यांचे प्रमाण फक्त १८ आहे. म्हणजे हे अत्यंत कमी संख्येने आहेत. जे अल्पभुधारक आहेत त्यापैकी बऱ्याच जणांची पडीत जमीन आहे. काहींची नापीक आहे आणि काहींच्या शेतीतून अतिशय अल्प उत्पन्न होते. म्हणजे जमीन असून सुध्दा उत्पन्न चांगल्या प्रकारे होत नसल्यामुळे अनेकांना मजुरी करावी लागते. जोडधंदा करावा लागतो. व्यापार व्यवसाय असे जोडधंदे करुन आपला उदरनिर्वाह भागवतात.

अत्यल्प शेतीतून उत्पन्न जीवनावश्यक गरजा भागवण्याएवढेही मिळत नाही. अशा वेळी या व्यक्ती इतर कामधंदा करून उदर निर्वाह करतात. अर्थात शेती असूनसुध्दा अल्पभूधारकांमध्ये गुन्ह्यांचे प्रमाण अधिक आहे असे जाणवते. दारिद्र्य हे सर्व समस्यांची जननी मानले जाते. त्यात गुन्ह्यासाठी सुध्दा प्रमुख कारण म्हणून दारिद्र्य आहे. शेती असून नसल्यासारखी आहे जीवन जगण्यासाठी इतर उत्पन्नांची साधने स्वीकारून चरितार्थ चालवावा लागतो. आणि मग अशा प्रसंगी गुन्ह्यासरखी कृत्येही सहज पध्दतीने घडतात, त्यामुळे गुन्ह्यांचे प्रमाण दारिद्र्यामुळे वाढत आहे असे जाणवते.

### ४.३.३ बंद्यांच्या कुटुंबांचे सध्याचे उत्पन्नाचे साधन :-

बंद्यांनी शेती संदर्भात ११५ बंद्यांनी शेती आहे असे सांगितले आणि त्यांना किती शेती आहे असे विचारले असता ०१ ते १० एकर शेती असणाऱ्या अल्पभूधारकांचे प्रमाण अधिक असून ती शेतीसुध्दा कोरडवाहू असल्याने फक्त शेतीवरच संपूर्ण कुटुंबाचा उदरनिर्वाह चालत नसल्याने इतर काय उत्पन्नाची साधने आहेत ज्यावर त्यांच्या कुटुंबीयांचा उदारनिर्वाह चालतो या संदर्भात पुढील प्रकारची माहिती मिळाली.

**तक्ता क्र. ४.३.३ बंद्यांच्या कुटुंबाचे सध्या उत्पन्नाचे साधन दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र | उत्पन्नाचे साधन | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | शेती | ५२ | २६% |
| २. | व्यवसाय | १८ | ९% |
| ३. | मजुरी | ६० | ३०% |
| ४. | शेती आणि मजुरी | ४७ | २३.५% |
| ५. | शेती आणि नोकरी | १० | ५% |
| ६. | ड्रायव्हर | ०२ | १% |
| ७. | नोकरी | ०९ | ४.५% |
| ८. | शेती आणि व्यापार | ०१ | ०.५% |
| ९. | निराधार | ०१ | ०.५% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

बंद्यांच्या कुटुंबाच्या उत्पन्नाची साधने कोणती आहेत यांची माहिती विचारली असता वरीलप्रमाणे माहिती मिळाली. संशोधकाने अभ्यासलेल्या एकुण बंद्यांपैकी उत्पन्नाचे साधन शेती (५२)२६% ,व्यवसाय (१८)९%,मजुरी (६०)३०% ,शेती आणि मजुरी (४७)२३.५%,शेती आणि नोकरी (१०)५%, ड्रायव्हर (०२) १%, नोकरी (०९)४.५ %, शेती आणि व्यापार (०१)०.५%, निराधार (०१)०.५ % असे विस्तृत विवेचन आढळते. मजुरी हे उत्पन्नाचे साधन असणाऱ्यांचे प्रमाण सर्वात अधिक असून शेती हे ५२

उत्तरदात्यांचे उदरनिर्वाहाचे साधन आहे. बाकी आपणास जमेल त्या पध्दतीने व्यवसाय,व्यापार,नोकरी करून आपला उदरनिर्वाह करतात.

वरील विश्लेषणावरुन बंद्यांचे कुटुंबातील व्यक्ती मजुरी करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. यांचे प्रमाण अधिक आहे तर शेती करून उदरनिर्वाह करणाऱ्यांचे प्रमाण त्याखालोखाल आहे. थोडक्यात आपणास असे म्हणता येते की बहुसंख्य बंदी हे सर्वसाधारण आर्थिक स्थिती असणारे आहेत. म्हणजेच दररोज काम केल्याशिवाय पर्याय नाही अशा सर्वसाधारण परिस्थितीमधील आहेत असे वरील विवेचनावरुन वाटते.

### ४.३.४ बंद्यांच्या कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न :-

कुटुंबाचा उदरनिर्वाह वेगवेगळ्या माध्यमातून होतो. अर्थात शेतीतून येणारे उत्पन्न, याचबरोबर मजुरी, व्यवसाय, नौकरी करुन आपले उदरनिर्वाह चालतो. वर्षभरात सर्व माध्यमांतून एकूण उत्पन्न किती होते हे महत्त्वपूर्ण आहे. कारण यावरून त्यांच्या मूलभूत गरजा पूर्ण होतात काय हा महत्त्वपूर्ण भाग आहे. भारतात दारिद्र्य रेषेचे प्रमाण १५ टक्के (२०११) इतके आहे. कुटुंबाच्या एकूण उत्पन्नावर त्या कुटुंबाचा समाजातील दर्जा ठरत असतो. त्यासाठी बंदी त्याच्या कुटुंबाचे एकूण वार्षिक उत्पन्न किती आहे हे माहिती करुन घेण्यासाठी संशोधकाने माहिती घेतली असता पुढीलप्रमाणे माहिती मिळाली.

**तक्ता क्र. ४.३.४ बंद्यांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न दर्शविणारा तक्ता**


| अ.क्र | उत्पन्न (हजार रु.मध्ये) | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | २० ते ३० | ३३ | १६.५% |
| २. | ३० ते ४० | २७ | १३.५% |
| ३. | ४० ते ५० | ४५ | २२.५% |
| ४. | ५० ते ६० | ०५ | २.५% |
| ५. | ६० ते ७० | ०१ | ०.५% |
| ६. | ७० ते ८० | ०४ | २% |
| ७. | ८० ते ९० | १२ | ६% |
| ८. | ९० ते १ लाख | ४७ | २३.५% |
| ९. | १ ते २ लक्ष | १४ | ७% |
| १०. | ३ ते ४ लक्ष | १० | ५% |
| ११ | ४ ते ६ लक्ष | ०२ | १% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

बंद्यांच्या कुटुंबीयांचे वार्षिक उत्पन्न दर्शवणारी आहेत. मागील सारणीत त्यांचे उत्पन्नाचे साधने पाहिल्यावर सर्वसाधारण उत्पन्नाची साधने त्यात मजुरी करणाऱ्यांचे प्रमाण अधिक जाणवले. मजुरी बरोबरच अनेक जोड व्यवसाय शेती,व्यापार असे करुन उदरनिर्वाह करणाचा बंद्यांचे वार्षिक उत्पन्न किती आहे याची माहिती मिळाली.वार्षिक २० ते ३० हजार उत्पन्न असणाऱ्यांचे प्रमाण (३३) १६.५ टक्के, ३० ते ४० हजार (२७) १३.५ टक्के, ४० ते ५० हजार (४५) २२.५ टक्के, ५० ते ६० हजार (०.५) २.५ टक्के, ६० ते ७० हजार (०१) ०.५ टक्के, ७० ते ८० हजार (०४) २ टक्के, ८० ते ९० हजार(१२) ६ टक्के, ९० ते एक लाख (४७)२३.५ टक्के, एक ते दोन लाख (१४) ७ टक्के ,३ ते ४ लाख (१०) ५ टक्के, तर ४ ते ५ लाख (२) १ टक्के, असे विवरण आढळले.

वरील विश्लेषणात ९० ते १ लाख उत्पन्न आसणाऱ्यांचे प्रमाण सर्वाधिक आहे. जर आपण २० ते५० हजार उत्पन्न असणाऱ्यांचे प्रमाण (१०५) ५२.५ टक्के असे सर्वाधिक प्रमाण आहे म्हणजे ज्या उत्पन्नातून स्वतः आणि कुटुंबीयांचे चांगल्या पध्दतीने उदरनिर्वाह करु शकत नाहीत. ५० ते १ लाख उत्पन्न असणाऱ्यां बंद्यांचे प्रमाण (६९) ३४.५ टक्के असे प्रमाण आढळले. आणि १ लाख ते चार लाख उत्पन्न असणाऱ्यांचे प्रमाण (२४) १२ टक्के असे आहे असे लक्षात येते. आज ग्रामीण भागात एका व्यक्तीला दररोज ४७ रु जगण्यासाठी लागतात आणि शहरात ६६ रु जर ४७ आणि ६६ रु या प्रमाणे उत्पन्नाचे विश्लेषन केले तर कुटुंबाचा चरितार्थ चालवणे ही तारेवरची कसरत मानावी लागेल असे वाटते.

वरील विश्लेषणावरून जाणवते की, २० ते ५० हजार उत्पन्न असणाऱ्या अर्थात दारिद्र्य रेषेखालील बंद्यांचे प्रमाण अधिक आहे. वरील तक्त्यातील विवेचनात पाहिल्याप्रमाणे दारीद्र्य हे गुन्ह्यासाठी कारणीभूत असते. कुटुंबाच्या गरजाही पूर्ण होत नसतील तर व्यक्ती गुन्ह्याचा मार्ग अवलंबतो आणि त्यांचे प्रमाण सर्वाधिक आहे .आज गुन्ह्याच्या वाढत्या प्रमाणाचे सर्वात महत्त्वपूर्ण कारण म्हणून दारीद्र्य असे आपणास सांगता येईल. दारीद्र्यातील व्यक्तीचे गुन्ह्याचे प्रमाण सर्वाधिक आहे असे म्हणत असताना ९० हजार ते ४ लाख उत्पन्न असणाऱ्यांचे प्रमाण दारिद्र्यातील व्यक्ती पेक्षा थोडे कमी आहे. पण त्यांचे प्रमाण पाहता ३५ टक्के आपणास आढळले, म्हणजे ज्या श्रीमंत व्यक्ती असतात त्यांच्यात गुन्ह्यांचे प्रमाण वाढत आहे असे जाणवते. म्हणजे सर्वात कमी उत्पन्न अर्थात दारिद्र्यता आणि जास्त उत्पन्न अर्थात श्रीमंती यांचे गुन्ह्यांचे प्रमाण सर्वाधिक आहे असे जाणवते.

**बंद्यांचे वार्षिक उत्पन्न दर्शविणारा आलेख ४.५**




### ४.३.५ बंद्यांच्या घराचे स्वरूप :-

व्यक्तीची आर्थिक परिस्थिती कशी आहे हे ओळखण्याच्या साधनांपैकी एक साधन म्हणजे त्याचे घर होय. श्रीमंत व्यक्तीकडे लोकांची संख्या कमी पण राहण्यासाठी आलिशान घरे असतात. घरात सर्व सुविधा असतात. ग्रामीण भागातसूध्दा श्रीमंतांची घरे चांगली म्हणजे सर्व सोईंनी युक्त असतात अर्थात गरिबांच्या घरातील व्यक्तींची संख्या जास्त पण घराचे स्वरूप मात्र लहान असते. एकाच खोलीत अनेक लोक झोपतात, पती पत्नीला बऱ्याच वेळेस एकांत मिळत नाही. ग्रामीण किंवा शहरी समुदायातही गरिबांची घरे लहानच असतात. लहान घरात चांगले वाईट वर्तनाचे संस्कार मुलांवर आपोआप होत असतात. घराचे स्वरूप हे व्यक्तीच्या आर्थिक स्थितीचे दर्शन घडवते. बंद्यांना त्यांच्या घराचे स्वरूप विचारले असता पुढील प्रमाणे माहिती मिळाली.

**तक्ता क्र.४.३.५**

**बंद्यांच्या घराचे स्वरूप दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र | घराचे स्वरूप | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | कच्चे | २२ | ११% |
| २. | मातीचे | ९५ | ४७.५% |
| ३. | छप्पर | २३ | ११.५% |
| ४. | पक्के | ५४ | २७% |
| ५. | स्थलांतरित | ०१ | ०.५% |
| ६. | उद्‌धवस्त | ०३ | १.५% |
| ७. | किरायाचे | ११ | ५.५% |
| ८. | नातेवाईकाकडे | ०१ | ०.५% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

कारागृहातील बंद्यांच्या घराचे स्वरूप दर्शवणारी आहे. घर कसे आहे असे विचारले असता पुढीलप्रमाणे विवेचन संशोधकाने अभ्यासलेल्या एकूण बंद्यांच्या (२२) ११ टक्के बंद्यांच्या घर कच्चे, मातीचे (९५) ४७०५ टक्के, छप्पर (२३) ११.५ टक्के, पक्के विटांचे (५४) २७ टक्के तर आपण कारागृहात आल्याने कुटुंब इतर नातेवाईकाच्या गावी स्थलांतरीत झाले आहे. असे (०१) ०.५टक्के बंद्यांनी सांगितले. (३) १.५टक्के बंद्यांनी आमचे घर उद्ध्वस्त झाले आहे असे सांगितले. तर (११) ५.५ टक्के बंद्यांनी भाडयाचे आहे तर (०१) ०.५ टक्के बंद्यांनी नातेवाईकाकडे राहण्यासाठी गेले आहेत असे सांगितले. मातीच्या घराचे प्रमाण सर्वात अधिक जाणवते. तर पक्क्या घराचे प्रमाण दुसऱ्या क्रमांकावर आढळते. बाकी घराचे स्वरूप छप्पर, स्थलांतरित किरायाचे असे जाणवते. अर्थात सर्वसाधारण घरातीलच बंद्यांचे प्रमाण अधिक असल्याचे जाणवते. वरील विवेचनावरून जाणवते की, बहुसंख्य बंदी दारिद्र्य रेषेखालील असून त्यांचे घर हे कच्चे मातीचे छप्पर अशा स्वरूपाचे आहे अर्थात हे सर्व गरीब आहेत. म्हणजे गुन्ह्यांमध्ये गरीब वर्गातील व्यक्तींचे प्रमाण अधिक आहे.

## ४.४ सामाजिक व राजकीय माहिती

मानव हा समाजशील प्राणी आहे असे ॲरिस्टॉटल यांनी म्हटले आहेत. तो समाजाशिवाय राहू शकत नाही म्हणजे प्रत्येक व्यक्तीला इतर व्यक्तींच्या सहकार्याची गरज असते. जर एखाद्या व्यक्तीने ठरवलेली आपण इतरांच्या मदतीशिवाय जगायचे तर ते जास्त काळ शक्य नाही हे अनेक प्रयोगांतून सिध्द झाले आहे. व्यक्ती समाजात जीवन जगत असताना समाजातील रीती, रुढी, परंपरा, मूल्ये यांचे पालन करत असते. व्यक्तीला समाजात सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक अशा अनेक बाजू असतात. सामाजिक कार्यात त्यांना जावेच लागते. कारण त्यावरुन आपले आणि आपल्या कुटुंबाचे स्थान ठरते. त्यामुळेच संशोधकाने कारागृहात शिक्षा भोगत असलेल्या बंद्यांच्या समाजात असताना सामाजिक, राजकीय, धार्मिक जीवनाचा आढावा घेण्यासाठी काही प्रश्न विचारले. त्या संबंधीची माहिती विचारली असता पुढीलप्रमाणे उत्तरे मिळाली. त्या उत्तरांचे सारणी स्वरूपात वर्णन आणि त्यांचे विश्लेषण पुढीलप्रमाणे केले आहे.

### ४.४.१ बंद्यांचा सामाजिक कार्यांतील सहभाग :-

मानव हा समाजशील आहे. त्याच्या गरजा समाजात भागवल्या जातात. तो एक मेकांना सहकार्य करीत असतो. प्रत्येक व्यक्तीला सामाजिक बाजू असते. व्यक्ती आपले सामाजीक संबंध दृढ करुन सर्व सामाजिक कार्यात सहभागी होते. सामाजिक कार्यातून त्याला खूप मदत मिळत असते. समाजातील इतर

व्यक्तींबरोबरचे परस्पर संबंध व्यक्ती नेहमी जपण्याचा प्रयत्न करीत असते. कारण तो इतरांच्या व सामाजिक कार्यात सहभागी झाल्याशिवाय त्याच्या कार्यात कोणीच सहभागी होत नाही. व्यक्तीचा दर्जा बऱ्याच वेळा त्याच्या सामाजिक कार्यावरून ठरत असतो. त्यामुळे बंदी कारागृहाबाहेर असताना त्याचे सामाजिक संबंध कसे होते हे त्याचा सामाजिक कार्यातील सहभाग किती होता यावर अवलंबून असतात.

**तक्ता क्र ४.४.१**

**बंदी कारागृहात येण्यापूर्वी सामाजिक कार्यात सहभाग घेत होता काय हे दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र | सहभाग | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | होय | १९६ | ९८% |
| २. | नाही | ०४ | २% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

वरील सारणी  बंदी  शिक्षा होण्या अगोदर समाजात वावरत असताना सामाजिक कार्यात जसे लग्न समारंभ, कोणतेही सामाजिक कार्यक्रमांतील व्यक्तींचा सहभाग हा अत्यंत महत्त्वपूर्ण असतो. प्रत्येक व्यक्ती अशा सामाजिक कार्यात आवर्जून सहभागी होते कारण सामाजिक कार्यात सहभागी झाले तर एकमेकांच्या कौटुंबिक कार्यात व्यक्ती सहभागी होतात. व्यक्तीच्या सामाजिक कार्यातील सहभागावरून त्याचा सामाजिक दर्जा कसा आहे याची कल्पना येते. यासाठीच संशोधकाने वरील प्रश्न बंद्यांना केले असता  यांत सहभागी होत होता काय असा प्रश्न विचारला १९६ (९८टक्के) बंद्यांनी होय असे सांगितले तर फक्त (४) २ टक्के बंद्यांनी सामाजिक कार्यात सहभागी होत नव्हतो असे सांगितले. सामाजिक कार्यातील सहभागावरच त्या कुटुंबाचे समाजातील स्थान समजते.

वरील विवेचनावरून आपणास जाणवते की, समाजात व्यक्ती वावरत असताना एकमेकांना साहाय्य करतात. सामाजिक आर्थिक  सहकार्य करतात. यामुळे व्यक्तीचा दर्जा समाजात चांगला निर्माण होतो. आणि यांचे प्रमाण अधिक आहे. कारण यावरुन समाजातील कुटुंबाचे स्थान ठरत असते.  बंद्याला त्याच्या सामाजिक कार्यातील सहभाग या बाबत माहिती विचारताना त्यांच्या कुटुंबाचे समाजातील स्थान कसे आहे यासाठी संशोधकाने पुढील प्रश्न केला.

### ४.४.२ बंद्यांच्या कुटुंबाचे समाजातील स्थान

**तक्ता क्र ४.४.२**

**बंद्यांच्या कुटुंबाचे समाजातील स्थान दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र | स्थान | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | चांगले | १९४ | ९७% |
| २. | वाईट | ०१ | ०.५% |
| ३. | साधारण | ०५ | २.५% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

बंद्यांना त्यांच्या कुटुंबाचे समाजात स्थान कसे आहे याची माहिती मिळवण्यासाठी वरील प्रश्न बंद्यांना विचारला. बंद्यांनी समाजातील कुटुंबाचे स्थान सांगताना १९४ (९७ टक्के) बंद्यांनी चांगले स्थान आहे तर फक्त (०१) ०.५ टक्के बंद्याने कुटुंबाचे समाजात वाईट स्थान तर (०५) २.५ टक्के साधारण स्थान असल्याचे सांगितले.

वरील विश्लेषणावरून जाणवते की, व्यक्ती समाजात वावरत असताना सर्व सामाजिक कार्यात सहभागी होते. त्याला त्याच्या कुटुंबाला लोकांनी चांगले म्हणावे यासाठी जे जे समाजिक कार्यक्रम होतांना त्यात सहभागी व्यक्ती होत असत आणि त्याच्या कौटुंबीक कार्यात सुध्दा त्या व्यक्तीचा सामाजिक कार्यातील सहभाग कसा आहे यावरून इतर व्यक्ती येतात. त्यामुळे आपल्या कौटुंबिक कार्यात लोकांनी यावे यासाठी व्यक्ती सामाजिक कार्यात सहभागी होतात. पण सामाजिक कार्यातील सहभागी असणाऱ्या बंद्यांचे प्रमाण अधिक आहे. यावरून आपणास जाणवते की, सामाजिक कार्यात व्यक्ती सहभागी होतांना त्यापाठीमागे त्यांचा स्वार्थ असतो असे त्यांच्या वाढत्या प्रमाणावरून वाटते.

### ४.४.३ बंदी सामाजिक नियमांचे पालन :-

व्यक्तीचा जन्म कुटुंबात झाला तरी त्याच्या गरजा  समाजाशिवाय पूर्ण होत नाहीत. जन्मतः प्रत्येक व्यक्तीला कोणता तरी धर्म आणि जात असते. त्याच्या धर्म आणि जातीचे संस्कार मुलांवर कुटुंबीय करत असतात. तसेच शेजारी मित्र हे ही वेगवेगळी नियमने व्यक्तीवर वर्तनातून बिंबवत असतात. प्रत्येक व्यक्ती जीवन जगत असताना वर्तनविषयक समाजात काही नियम असतात. त्या नियमांचे पालन प्रत्येकाने करावे असे अपेक्षित असते. प्रत्येक व्यक्ती त्या नियमांचे पालन करण्याचा प्रयत्न करते. बऱ्याच वेळा व्यक्ती स्वार्थापोटी अशा नियमांचे उल्लंघन करतो. नियमने हा मानवी संस्कृतीचा अविभाज्य घटक आहे. त्यामुळे बंदी अपराध करण्यापूर्वी समाजात वावरत असताना सामाजिक नियमांचे पालन करत होते काय? या

उत्स्कुतेपोटी संशोधकाने वरील प्रश्न केला. कारण कायद्याचे उल्लंघन करणारी व्यक्ती सामाजिक नियंमांचेही उल्लंघन करीत होते काय. कारण सामाजिक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तींना कायद्याचे उल्लंघन करणे गैर वाटत नाही. पण जो सामाजिक नियमांचे नियमित पालन करतो तो कोणत्या तरी अपरिहार्यतेशिवाय असे अपराधाचे कृत्य करणारा नाही.

**तक्ता क्र. ४.४.३ बंदी सामाजिक नियमांचे पालन करत होता काय ? हे दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र | सहभाग | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | होय | १८८ | ९४% |
| २. | नाही | १२ | ६% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

बंदी समाजात वावरत असताना सामाजिक नियमांचे पालन करण्यासंदर्भात माहिती संकलित केली असता १८८(९४ टक्के) बंद्यांनी सामाजिक नियमांचे पालन करत होते अर्थात गुन्हा करण्याची परिस्थिती अपरिहार्य बनली. त्यामुळे अपराधाचे कृत्य आमच्या हातून घडले असे बंद्यांनी सांगितले. तर फक्त (२२) ११ टक्के बंद्यांनी नाही असे सांगितले.

वरील विवेचनावरून आपणास जाणवते की, सामाजिक कार्यातील सहभाग आणि सामाजिक नियंमांचे पालन करणाऱ्या बंद्यांमध्ये गुन्ह्यांचे प्रमाण अधिक जाणवते. कायदाबाह्य वर्तन हे समाज अमान्य असते. मग सामाजिक  नियमांचे पालन करणाऱ्या व्यक्ती कायद्याचे उल्लंघन कसे करतात हा महत्त्वाचा प्रश्न पडतो. सामाजिक नियम हे प्रत्येक धर्मनिहाय वेगवेगळे असतात. कायदे मात्र सर्वांना सारखेच आहेत. सामाजिक नियमामधून व्यक्तीला कायदेशीर वर्तनाचीही जाणीव करुन देणे गरजेचे आहे असे वाटते. व्यक्ती जर सामाजिक नियमांचे पालन करते तर कायदेविषयक नियमांचे पालन करणे अपेक्षित असते पण तसे होतांना वरील विवेचनावरून दिसत नाही.

### ४.४.४ बंद्यांची  ईश्वरावरील श्रध्दा :-

भारतातील बहुसंख्य लोकांचा देवावर विश्वास आहे. प्राचीन भारतात ३३ कोटी देव होते असे सांगितले जाते. आजही ग्रामीण भागात इश्वरावर श्रध्दा आसणाऱ्यांची संख्या बहुसंख्य आहे. पण शहरात राहणाऱ्या बहुसंख्य लोकांचीही श्रध्दा ईश्वरवर असलेली आपणास आढळून येईल. शहरात आज प्रत्येक व्यक्तीकडे वेळ खूप कमी आहे आणि दररोजच्या धावपळीच्या जीवनात कमी श्रमांत जास्त पैसा

मिळवण्यासाठी प्रत्येक व्यक्तीची धावपळ चालू असते. असे जीवन जगत असताना अशा अनेक घटना आपल्या हातून घडतात ज्या समाजमान्य नाहीत. मग आपल्या मनाला मानसिक समाधान लाभण्यासाठी व्यक्ती ईश्वराची पूजाआर्चा करते. आस्तिक व्यक्ती नियमबाह्य वर्तन करण्यास सहसा धजत नाही.

**तक्ता क्र. ४.४.४ बंद्यांची ईश्वरावर श्रध्दा आहे काय हे दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र | श्रध्दा | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | श्रध्दा आहे | १९८ | ९९% |
| २. | श्रध्दा नाही | ०२ | १% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

कारागृहातील बंद्यांची देवावर श्रध्दा आहे काय असा प्रश्न केला असता (१९८) ९९ टक्के बंद्यांनी आहे तर फक्त (०२) १ टक्के बंद्यांनी नाही असे सांगितले.

वरील विश्लेषणावरुन जाणवते की, ईश्वरावर श्रध्दा असणाऱ्यांमध्ये गुन्ह्यांचे प्रमाण अधिक जाणवते. ईश्वर हा आपला कर्ता करविता असतो या भावनेतून व्यक्ती ईश्वरावर श्रध्दा ठेवत असते. ईश्वरावर श्रध्दा ठेवणारी व्यक्ती वेळ प्रसंगी कायद्याचे उलंघन करण्यास मागेपुढे पाहत नाही. म्हणजे आपणास असे म्हणता येईल की ईश्वरावरील श्रध्दा आणि गुन्ह्यांचे वर्तन या दोन्ही गोष्टी वेगवेगळ्या आहेत. ईश्वराला मानणाऱ्या, श्रध्दा असणाऱ्यांचे प्रमाण वाढत आहे असे जाणवते. ईश्वराची उपासना ही दुसऱ्याला हानी पोहचू नये असे शिकवत असते. पण व्यक्ती सर्रास यांचे पालन करीत नाहीत असे जाणवते.

### ४.४.५ बंद्यांचा धार्मिक कार्यांतील सहभाग

व्यक्ती जीवन जगत असताना समाजातील विविध सामाजिक कार्यात ती जशी सहभागी होते. बहुसंख्य लोकांचा आजही देवावर विश्वास आहे असे म्हणत असताना त्या संदर्भात होणाऱ्या सर्व धार्मिक कार्यांत लोकांचा सहभाग असतो. आजही धर्माने सांगितले आहे म्हणून चार धाम करणे, बालाजी, साईबाबा, वैष्णोदेवी, पंढरपूर, तुळजापूर अशा ठिकाणी आजही धार्मिक कार्य म्हणुन लोक जातात. कारागृहातील बंद्यांना तुम्ही धार्मिक कार्यात सहभागी होत होता काय असे विचारता सर्व म्हणजे १०० टक्के बंद्यांनी धार्मिक कार्यात आम्ही सहभागी होत असे सांगितले.

**४.४.६ बंद्यांचा मतदानातील सहभाग :**

भारतातील प्रत्येक व्यक्तीला मतदानाचा हक्क भारतीय राज्यघटनेने दिला आहे. एक व्यक्ती, एक मत, एक मूल्य हे घटनेने ठरवून दिलेले आहे. प्रत्येक व्यक्तीच्या मताला अनन्य साधारण असे महत्त्व आहे. ज्यांनी वयाची १८ वर्षे पूर्ण केली आहेत, अशा प्रत्येक व्यक्तीला मतदानाचा हक्क दिला गेला आहे.

आज ज्या ज्या वेळेस निवडणुका होतात त्यात लोकसभा, विधानसभा किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेच्या असो अशा वेळी आजपर्यंत १०० टक्के मतदान झालेले नाही, हा इतिहास आहे. मतदानाचे प्रमाण जास्तीत जास्त ७०-७५ टक्के पर्यंत गेले आहे. म्हणजे मतदानाचा बाकी लोकांमधील उदासीनता किंवा राजकारणाबाबत उदासीनता हा संशोधनाचा विषय आहे. पण प्रत्येक व्यक्तीने मतदान करणे हा आपला हक्क आहे ही भावना प्रत्येक व्यक्तींने लक्षात घेतली पाहिजे.

**तक्ता क्र ४.४.५ बंदी कारागृहात येण्यापुर्वी मतदान करत होता काय ? हे दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र | मतदान | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | होय | १९० | ९५% |
| २. | नाही | १० | ५% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

कारागृहात बंद्यांना शिक्षा लागण्यापूर्वी तुम्ही मतदान करत होता काय असा प्रश्न केला असता (१९०) ९५ टक्के बंद्यांनी मतदान करत होते तर फक्त (१०) ५ टक्के बंद्यांनी नाही असे सांगितले. वरील सारणीवरुन बंद्यांमध्ये मतदानाच्या संदर्भात जाणीव असल्याचे लक्षात येते. कारागृहात शिक्षा भोगणाऱ्या कैद्यांना मात्र मतदानाच्या हक्कापासून वंचित ठेवले आहे. बंद्यांना मतदानाचा हक्क नाही. त्यांना मतदान करू दिले जात नाही. बंद्यांमध्ये मतदानाचे महत्त्व माहित असल्याचे बहुसंख्य बंद्यांनी आम्हाला मतदानाचा हक्क हवा आहे. हा आमच्यावर होणारा अन्याय आहे असे सांगितले. आमच्या हातून चुकून, कळत न कळत गुन्ह्यांचे वर्तन केले. त्यासाठी ती विशिष्ट परिस्थिती जबाबदार होती. पण त्यामुळे मतदानाच्या हक्कापासून आम्हास वंचित ठेवले असे बंद्यांनी सांगितले. बंद्यांच्या मतदानाच्या हक्कासाठी श्री. संजय पारोदे हा बंदी लढत आहे. तो सर्व बंद्यांना मतदानाचा हक्क मिळावा यासाठी वरिष्ठांकडे लेखी निवेदन देत असल्याचे समजले.

**समारोप :-**

प्रस्तुत प्रकरणात संशोधकाने प्रत्यक्ष कारागृहात जाऊन बंद्यांच्या मुलाखती घेतल्या. त्यातून जी तथ्ये समजली त्यांचे सविस्तर विवेचन प्रस्तुत प्रकरणात केले आहे. बंद्यांकडून जी वेगवेगळी माहिती मिळाली तिचे वर्गीकरण करून प्रस्तुत प्रकरणात बंद्यांची वैयक्तिक माहिती यात त्यांचे वय, धर्म, जात, शिक्षण, वैवाहिक स्थिती, मूळपत्ता त्यांचा व्यवसाय यांचा सविस्तर आढावा घेतला असून बंद्यांची कौटुंबिक माहिती सविस्तर घेतली आहे. तसेच बंद्यांची आर्थिक परिस्थिती संदर्भात त्यांचे उत्पन्नाची साधने, कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न, जमीन या संदर्भात सविस्तर माहिती घेतली आहे. तसेच त्यांची सामाजिक माहिती या संदर्भात त्यांचे कुटुंबाचे समाजातील स्थान, सामाजिक कार्यातील सहभाग आदींचे सविस्तर विवेचन केले आहे.

****************

# प्रकरण ५ वे

## बंद्यांची आरोग्य, मानसिक, केलेल्या अपराधासंबंधी माहिती

५.१ बंद्यांची मानसिक आणि आरोग्यविषयक परिस्थिती

५.२ बंद्यांनी केलेल्या अपराधां संबंधी माहिती

## ५.१ बंद्यांची मानसिक आणि आरोग्यविषयक परिस्थिती

व्यक्ती समाजात वावरत असताना त्याच्या वर्तनावर आजूबाजूच्या परिसराच्या प्रभावाबरोबरच त्याची मानसिक आणि आरोग्यविषयक बाजूंचा प्रभाव मोठया प्रमाणावर पडत असतो. प्रामुख्याने मानसिक घटक हा अत्यंत महत्त्वपूर्ण असतो. जर व्यक्तीला मानसिक समाधान नसेल तर त्याचे बरेच विपरीत परिणाम वर्तनावर घडतात. मानसिक परिणाम झालेल्या व्यक्तींना वेडे असेही संबोधले जाते. त्यासाठी व्यक्तीचे आरोग्य चांगले राहणे आवश्यक आहे.

**आरोग्याची व्याख्या :**

१. **"जागतिक आरोग्य संघटना (WHO) :-** व्यक्तीची शारीरिक,मानसिक आणि सामाजिक सुस्थिती म्हणजे आरोग्य होय. आरोग्य म्हणजे व्यक्तीचे शरीर, मन, आणि तो ज्या सामाजिक परिस्थितीत राहतो. ती परिस्थिती चांगली राहणे आवश्यक आहे." [१] (के. पार्क, अनुवाद डॉ. जगन्नाथ दीक्षित. २००९)

२. "चांगल्या शरीरात चांगले मन वास करीत असते.चांगले आरोग्य राहण्यासाठी व्यक्तींनी चांगल्या सवई अवलंबाव्या लागतात. कारण आरोग्य ही संपत्ती आहे ती कोणत्याही ठिकाणाहून खरेदी करता येत नाही." [२] (डॉ सुधा काळदाते आणि डॉ. शंकर गायकवाड. १९९३)

व्यक्तीचे आरोग्य बिघडले म्हणजे त्याचा शारीरिक बिघाड होणे. त्याचा परिणाम म्हणून त्यांच्या मनावर विपरीत परिणाम होतो. त्यासाठी व्यक्तीला समाजात चांगले जीवन जगण्यासाठी त्याची शारीरिक,मानसिक आणि सामाजिक पातळीवर सुस्थिती राहणे गरजेचे आहे. अपराधासाठी मानसिक स्थिती आणि आरोग्य हे दोन्ही घटक परिणाम करणारे आहेत. व्यक्तीचे आरोग्य बिघडले तर तो दुरुस्त होण्यासाठी लागणारा खर्च अनियंत्रित असतो. म्हणजे चांगले आरोग्य लाभले तर व्यक्ती समाज अमान्य कृत्य करणार नाहीत. अपराधासाठी मानसिक घटकही तेवढेच महत्त्वपूर्ण आहे. अपराधशास्त्रात अपराधाच्या कारण मीमांसा संदर्भात जे वेगवेगळे सिध्दांत प्रसिध्द आहेत. त्यात मानसिक परीक्षणाचा संप्रदाय (School of Mental Testers) ही संकल्पना एच.एच.गोडार्ड (H.H.Goddard) यांनी मांडली आहे.

१) " मानसिक आजाराने ग्रस्त असलेल्या व्यक्ती आपल्या वर्तनाच्या परिणामांचे मूल्यमापन करु शकत

---

१) सामाजिक आरोग्य परिचर्या, लेखक :- के. पार्क, अनुवाद डॉ. जगन्नाथ दीक्षित

२) वैद्यकीय समाजशास्त्र : डॉ सुधा काळदाते आणि डॉ. शंकर गायकवाड

नाहीत. हा संप्रदाय सांगतो सर्व अपराध मानसिक दुर्बलतेतून होतात आणि ही मनोरुग्णाची लागण एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे होते.

२) तसेच मनोविष्लेषणात्मक संप्रदाय (Psychiatric School) ही रूपवादी सिध्दांताची शाखा मानली जाते. या संप्रदायाचे प्रमुख सिग्मन फ्रॉईड, एडलर,ओटोरेक हे मानले जातात." [३] (जितकृष्णा सिंह. २००१)

**"सिग्मन फ्रॉईड सांगतात :** मानवामध्ये तीन गुणांमध्ये समायोजन पाहिजे १. अवबोधात्मता (ID), २. बोधात्म (Ego), ३. आदर्शात्म (Superego) वरील तिन्ही गोष्टीत समायोजन असले तर व्यक्ती व्यवस्थित वर्तन करते. पण मानसिक तणाव, मानसिक विकृतीमुळे व्यक्ती वरील तीन तत्त्वांमध्ये सामंजस्य ठेवू शकत नाही. त्यामुळे व्यक्ती सामाजिक नियमांचे उल्लंघन करतात. अर्थात गुन्हे / अपराध करतात. सिग्मन फ्रॉइडबरोबरच एडलर,ओटोरेक यांनीही मानसिक संप्रदायात योगदान दिले आहे." [४] (प्रा. माणिक माने. १९९९) म्हणजे अपराधासाठी मानसिक कारण अत्यंत महत्त्वपूर्ण मानले जाते. त्यासाठीचे संशोधकाने मानसिक आणि आरोग्यविषयक प्रश्नांद्वारे त्या परिस्थितीचा आढावा घेतला.

### ५.१.१ बंद्यांची संगीत गाण्यांची आवड :-

मानव हा समाजशील प्राणी असला तरी मानवाला बुध्दी, भावना, मन यामुळे त्यांचे वेगळेपण जाणवते. प्रत्येक व्यक्ती आनंदी राहण्याचा प्रयत्न करते, आनंदी जीवनासाठी व्यक्ती संगीत गाणे यांना सोबत करतो. व्यक्तीला दुःखापासून परावृत्त करण्याचे साधन म्हणून संगीत गाणे याकडे पाहिले जाते. संगीत गाणे आवडत नाही असे सांगणारी व्यक्ती अतिशय तुरळक प्रमाणात आढळतात. संगीत, गाणे यामध्ये खूप मोठी शक्ती असते. ज्यामुळे व्यक्ती प्रसंन्न, आनंदी राहाते. संगीत मानवासच आवडते असे नसून मानवेत्तर जीवांनाही ते आवडते. व्यक्तीच्या दुःखाच्या काळात एकांतवासापेक्षा संगीत गाण्याला व्यक्ती जवळ करते. ज्या व्यक्तींना संगीत गाणे आवडत नाही. त्यांचा स्वभाव, मानसिकता यामध्ये सामान्य मानवापेक्षा फरक जाणवतो. अर्थात संगीत गाणे आवडणारी व्यक्ती आनंदी राहिल्याने त्याचा परिणाम त्यांच्या वर्तनावर होतो.

---

३) अपराधशास्त्र और दंडशास्त्र :- जितकृष्णा सिंह

४) गुन्हेगारीशास्त्र :- प्रा. माणिक माने

**तक्ता क्र.५.१.१**

**बंद्यांला संगीत गाणे आवडते काय ? हे दर्शविणारा तक्ता**

| **अ.क्र** | **संगीत गाणे** | **वारंवारिता** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १. | आवडते | १८० | ९०% |
| २. | आवडत नाही | २० | १०% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

कारागृहातील बंद्यांना संगीत गाणे आवडते काय असा प्रश्न केला असता १८० (९०%) बंद्यांनी होय आवडते तर (२०)१०% बंद्यांनी आवडत नाही असे सांगितले. म्हणजे संगीत गाणे आवडणाऱ्यांचे प्रमाण अधिक असल्याचे जाणवते. बंद्यांना सगीताची आवड आहे काय? त्यांना गाणे वगैरे आवडते का? जर आवडत असतील तर कशा प्रकारची याची माहिती करून घेण्याचा प्रयत्न संशोधकाने केला आहे. कारण मानसशास्त्र सांगते कर्कश असे संगीत गाणे आवडणाऱ्या लोकांचा स्वभाव विचित्र असतो. अशा लोकांच्या हातून अपराधासारखी कृत्ये होण्याची दाट शक्यता असते.

वरील विवेचनावरून जाणवते की, संगीत, गाणे यांची आवड सर्व व्यक्तींनाच असते. संगीत गाणे न आवडणारी माणसे अपुवादाने सापडतात. कारण माणसांच्या मनोरंजनाचे एक प्रभावी साधन आहे. संगीत गाणे आवडणाऱ्या व्यक्तींना कशा स्वरूपाचे संगीत गाणे आवडते. यावरून त्यांचा स्वभाव लक्षात येतो. कारागृहात शिक्षा भोगणारे बहुसंख्य बंदी युवा अवस्थेत आसल्याने त्यांना शांत अर्थपूर्ण गाणे आवडतात यावरूण त्यांचा स्वभाव हा चांगला आहे असे जाणवते. म्हणजे कर्कश संगीत गाणे आवडणाऱ्या व्यक्ती विचित्र स्वभावाच्या असतात. त्यामुळे त्यांच्या हातून गुन्ह्याचे कृत्य सहजपध्दतीने घडू शकते. पण येथे आपणास असे जाणवते की शांत, अर्थपूर्ण संगीत गाणे आवडणाऱ्यांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात आहे.

**तक्ता क्र. ५.१.२ बंद्यांला संगीत, गाणे कशा स्वरूपाचे आवडते ते दर्शविणारा तक्ता**

| **अ.क्र** | **स्वरुप** | **वारंवारिता** |
|---|---|---|
| १. | शांत | १०० |
| २. | अर्थपूर्ण | ६२ |
| ३. | कर्कश | ०४ |
| ४. | कीर्तन | १४ |
| | **एकूण** | **१८०** |

ही बद्यांना कशा स्वरूपाचे संगीत गाणे आवडतात या संदर्भातील माहिती वरीलप्रमाणे मिळाली. यात १०० बंद्यांनी शांत गाणे आवडते, ६२ बंद्यांनी अर्थपूर्ण ज्यामुळे मनाला आनंद मिळतो वेळ कसा गेला कळत नाही, ०४ कर्कश स्वरूपाचे गाणे आवडते यात प्रामुख्याने युवकांचा सहभाग होता, नवीन गाणे आवडतात असे त्यांनी सांगितले. तर १४ बद्यांनी कीर्तन आवडते असे सांगितले. शांत स्वरूपाची गाणे आवडणाऱ्यांचे प्रमाण अधिक असून कर्कश संगीत गाणे आवडणाऱ्यांचे प्रमाण सर्वात कमी आहे.

**५.१.३ बंद्यांला चित्रपटाची आवडतात**

चित्रपट हे मनोरंजनाचे एक साधन आहे. समाजाचे प्रतिबिंब चित्रपटांमधून प्रगट केले जाते. प्रत्येक व्यक्तीला चित्रपट आवडतातच पण त्यास काही अपवाद असतात. मानवी संस्कार, स्वभाव, मानसिकता यावरुन व्यक्तीची आवड निवड ठरत असते. आपल्या स्वभावाला अनुसरून व्यक्ती चित्रपटांची निवड करते आणि तो पाहाते. त्याला काय पाहिजे हे त्या-त्या व्यक्तीच्या दृष्टिकोणावर अवलंबून असते. कारण व्यक्ती तितक्या प्रकृती असतात. त्यामुळे बंद्यांना कोणत्या प्रकारचे चित्रपट आवडतात या पाठीमागे त्यांचा स्वभाव लक्षात येण्यासाठी वरील प्रश्न संशोधकाने केला.

**तक्ता क्र.५.१.३ बद्याला चित्रपट कोणते आवडतात हे दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र | चित्रपट प्रकार | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | मनोरंजनात्मक | ९६ | ४८% |
| २. | कौटुंबिक | ५२ | २६% |
| ३. | ज्ञानवर्धक | १० | ५% |
| ४. | धार्मिक | ०३ | १.५% |
| ५. | गुन्हयावर आधारित | ०२ | १% |
| ६. | मनोरंजनात्मक + | ०५ | २.५% |
| ७. | आवडत नाही | ३२ | १६% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

बंद्यांना चित्रपटाची आवड आहे काय तसेच असेल तर कोणत्या चित्रपटाची आवड आहे असे संशोधकाने विचारले असता वरील माहिती मिळाली. संशोधकाने अभ्यासलेल्या उत्तरदात्यांपैकी (९६) ४८% बद्यांनी कॉमेडी मनोरंजनात्मक चित्रपट आवडतात तर (५२) २६% घरेलू, कौटुंबिक कथानकाचे चित्रपट तर (१०) ५% ज्ञानवर्धक तर (३) १.५%धार्मिक, तर गुन्हेगारीवर आधारित (२)१% तर मनोरंजनात्मक आणि कौटुंबिक कथानकाचे (५) २.५% तर (३२) १६% बंद्यांनी चित्रपटाची आवड नाही

असे सांगितले. मनोरंजनात्मक आणि कौटुंबिक चित्रपटांची आवड असणाऱ्यांचे प्रमाण अधिक असून गुन्हेगारीवर आणि धार्मिक चित्रपटांची आवड असणाऱ्यांचे प्रमाण कमी आहे.

वरील विष्लेषणावरुण आपणास जाणवते की, कारागृहात युवकांचे व प्रौढांचे प्रमाण अधिक असल्याने त्यांना मनोरंजनात्मक, चित्रपट जास्त प्रमाणात आवडतात. साहजिकच तरुण वयात मनोरंजनात्मक चित्रपट अधिक पाहणाऱ्यांचा ओढा असतो जे प्रौढ अतिवृध्द आहेत त्यांना कौटुंबिक आणि ज्ञानवर्धक चित्रपट आवडतात प्रौढ आणि वृध्द अवस्थेतील व्यक्ती कुटूंबाकडे अधिक आकर्षिलेला असतो. त्यामुळे ज्या चित्रपटात कौटुंबिक कथानक आहे व ज्ञानवर्धक जे चित्रपट आहेत ते पाहणाऱ्यांचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर आहे असे जाणवते.

## आरोग्यविषयक माहिती

### कारागृहामध्ये बंद्यांसाठी असलेली वैद्यकीय सुविधा

राज्यात मध्यवर्ती कारागृहे, जिल्हा कारागृहे तसेच खुली कारागृहे असा एकूण विस्तार आहे मध्यवर्ती कारागृहात बंद्यांची संख्या जास्त असल्यामुळे कारागृहातच आंतररुग्ण ठेवण्याची व्यवस्थाही आहे. तसेच वैद्यकीय अधिकारी, मिश्रक, परिचारक यांचीही नेमणूक केलेली आहे. दैनंदिन किरकोळ आजारांवर देण्यासाठी औषधांचा साठा पुरेसा असतो. जास्त आजारी बंदी रुग्णांना विशेष उपचारांसाठी स्थानिक शासकीय सर्वोपचार रुग्णालयात पाठविण्यात येते. मुंबईला जे. जे. समूह रुगणालयात कारागृह बंद्यांसाठी वेगळी व्यवस्था आहे.या व्यतिरिक्त स्थानिक सर्वोपचार रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांशी संपर्क साधून बंद्यासाठी डोळे तपासणी शिबिर, दंत चिकित्सा शिबिर व तत्सम बाबी कारागृहात राबविण्यात येतात. तसेच लायन्स क्लब, रोटरी क्लब अशा सेवाभावी संस्थांकडून बंद्यांना डोळे तपासून मोफत चष्मे वाटपाचे शिबिरही आयोजित करण्याचा उपक्रम राबविण्यात येतो.

कारागृहात महारोग, इतर त्वचारोग, क्षयरोग आणि एडस व कावीळ अशा संसर्गजन्य रोगाने पीडित रुग्णांना विभक्त ठेवण्याची प्रशासनाकडून खबरदारी घेण्यात येते. कारण कारागृहातील इतर बंद्यांचे सर्वसामान्य स्वास्थ्य अबाधित ठेवणे महत्त्वाचे असते. तसेच मनोरुग्ण बंदी त्यांच्यासाठी वेगळया कक्षाची सोय असते. शिक्षा झालेला बंदी मनोरुग्ण झाल्यावर त्याला नजीकच्या मनोरुग्णालयात पाठविण्याची नियमात तरतूद आहे. तसेच न्यायाधीन बंदी मनोरुग्ण आढळल्यास न्यायालयाच्या आदेशाने त्याला नजीकच्या मनोरुग्णालयात पाठविण्याची तरतूद आहे. त्यानुसार कार्यवाही केली जाते.

स्त्री बंदी रुग्णांना तपासणीसाठी स्त्री वैद्यकीय अधिकाऱ्यांची सोय असते. इतर कारागृहांत नजीकच्या शासकीय रुग्णालयातून स्त्री वैद्यकीय अधिकारी वेळोवेळी भेट देऊन स्त्री बंद्यांची वैद्यकीय तपासणी व औषधोपचार उपाययोजना करतात. आवश्यक वाटल्यास नजीकच्या शासकीय रुग्णालयात पाठविण्यात येते. ज्या बद्यांना विशेष आहाराची गरज आहे अशा रुग्ण बद्याना वैद्यकीय अधिकारी यांनी शिफारस केलेला पौष्टिक आहार देण्याची सुविधा आहे. तसेच वयस्कर बद्यांना पोळी अगर भाकरी खाता येत नसेल अशांना भात देण्याची तरतूद आहे. ज्या बद्यांना तिखट किंवा तेल, तूप वर्ज्य असेल अशा बंद्यांना या वस्तूचा वापर न करता अन्न तयार करुन दिले जाते. सामान्य स्वास्थ्य ठेवण्यासाठी बंद्यांचे केस कापणे , दाढी करणे, तसेच आठवड्यातुन अंथरुण - पांघरुण व कपडे धुण्यासाठीचा खर्च शासन करते.

आरोग्य ही संपत्ती आहे. ती कोणत्याही दुकानात विकत मिळत नाही, आरोग्य हे व्यक्तीला कमवावे लागते. त्यासाठी काही चांगल्या गोष्टी जशा नियमित व्यायाम,संतुलित आहार, व्यसन न करणे (दारू,सिगारेट,तंबाखू,गुटखा,बिडी) नियमित आवश्यक तेवढी झोप इ. चांगल्या सवयी अंगीकारल्या पाहिजे. तसेच मानसिक ताण कमी करण्यास सकारात्मक विचार नेहमी ठेवणे गरजेचे आहे. सामाजिक संबंध हे मैत्रीपूर्ण असावेत कारण संघर्षमय संबंध असतील तर त्याचा विपरित परिणाम मन आणि शरीरावर होतो. पर्यायाने आरोग्य बिघडते. त्यासाठी व्यक्तीने आरोग्य चांगले राहण्यासाठी नेहमी प्रयत्नशील असावे.

समाजात वावरताना व्यक्तीचे शारीरिक व मानसिक आरोग्यात बिघाड झाल्यावर व्यक्ती डॉक्टरकडे जाते आणि उपचार घेते. आज व्यक्तींचे आजारांचे प्रमाण वाढल्याने डॉक्टरांची गरज वरचेवर वाढत आहे. वैद्यकशास्त्रातील संशोधनातून वैद्यकशास्त्राची व्याप्ती वरचेवर वाढत आहे. डॉक्टर शारीरिक आणि मानसिक आजारांवर उपचार करतात. आणि व्यक्तीचे आरोग्य चांगले ठेवण्यासाठी प्रयत्न करतात.

नियमांचे उल्लंघन करूण कारागृहात शिक्षा भोगणाऱ्या बंद्यांची आरोग्यविषयक काळजी घेणे हे कारागृह प्रशासनाचे कर्तव्य आहे. त्यामुळे बंद्यांच्या आरोग्यविषयक सुविधा संदर्भात संशोधकाने माहिती संकलित करण्याचा प्रयत्न केला. संशोधकाने अभ्यासलेल्या मध्यवर्ती कारागृहात एक स्वतंत्र बॅरेक्स रुग्णालय म्हणून वापरण्यात येते. येथे संपूर्ण कारागृहातील बंद्यांची आरोग्यविषयक काळजी घेण्यासाठी दोन डॉक्टर्स आहेत. डॉक्टर्स बंद्यांना जेव्हाही गरज वाटली तेव्हा बंद्यांची आरोग्य तपासणी करुण औषध उपचार केले जातात. बंदयांना जर ॲडमिट उपचार करावे लागले तर दवाखान्यातच रूग्णांना ॲडमिट केले जाते व उपचार केले जातात. जर एखाद्या वेळी एखादा बंदी गंभीर आजाराने आजारी असेल आणि कारागृहातील रुग्णालयात ठेवून सुध्दा त्याच्यात काही फरक पडत नसेल तर अशा रुग्णांना ताबडतोब शासकीय

रुग्णालयात पाठवले जाते व रुग्णावर उपचार केले जातात. म्हणजे बंद्यांना आरोग्य सुविधा ताबडतोब दिल्या जातात. कारागृहात बंद्यांना शारीरिक व्याधी डॉक्टर्स दूर करतात. पण मानसिक रुग्णांसाठी कारागृहात मानसोपचार तज्ञ डॉक्टर्स नाहीत. त्यामुळे मनोरुगणांवर उपचार केले जात नाहीत. जर एखाद्या बंद्याला मानसिक आजारांची तीव्रता अधिक असेल तर अशा मनोरूग्णाला शासकीय रुग्णालयातील मनोसोपचार तज्ञांना दाखवले जाते. कारागृहातील बंद्यांना शासकीय रूग्णालयापर्यंत घेऊन जाण्यासाठी स्वतंत्र रुग्णवाहिका आहे. डॉक्टर्स दररोज पूर्ण वेळ कारागृहातील रुग्णालयात हजर असतात. त्यामुळे जर एखाद्या बंद्याला काम करताना काही इजा झाल्यास त्यावर ताबडतोब उपचार केले जातात.

बद्यांच्या आरोग्य संदर्भात संशोधकाने तेथील डॉक्टर्सला विचारले असता बंद्यांनी मुळात आजारी पडू नये यासाठी प्रथम काळजी घेतली जाते. यासाठी त्यांना संतुलितआहार, व्यायाम, विश्रांती, काम, मनोरंजन, सांस्कृतिक कार्यक्रम, वैयक्तिक, सामूहिक स्वच्छता, परिसर स्वच्छता अशा चांगल्या सवयी कारागृह प्रशासन लावते. त्यामुळे व्यक्तीला शारीरिक आजार लवकर होत नाहीत आणि त्यातूनही जर बंदी आजारी पडला तर त्यावर ताबडतोब उपचार केले जातात. औषधी इंजेक्शन्स , योग्य तो आहार दिला जातो. काही आजाराने काही बंदी आजारी आहेत त्यांची विशेष काळजी आम्ही घेतो असे डॉक्टर्सनी सांगितले.

कारागृहात समाजापासून दूर राहून काही बंद्यांना मानसिक आजाराची शक्यता असते. अशा वेळी त्या बद्यांना इतर बंद्यांच्या सान्निध्यात राहण्यासाठी  सांगितल जाते. प्राथमिक उपचारही केले जातात पण जास्तच प्रमाणात आजार वाढला तर शासकीय रुग्णालयात उपचार केले जातात. मानसिक आजारापासून बंद्यांना वाचवण्यासाठी वर्षातून त्यांना घरी ज्याच्यासाठी कुटुंबातील व्यक्तीसोबत राहण्यासाठी सुटटी दिली जाते. तसेच दर महिन्याला त्याच्या कुटुंबीयांना भेटण्यासाठी परवानगी असते . त्यातून मानसिक विकृती कमी होते असे डॉक्टरांनी सांगितले. थोडक्यात कारागृहात बंद्यांची आरोग्यविषयक काळजी अत्यंत चांगल्या पध्दतीने घेतली जाते असे संशोधकास आढळून आले.

### ५.१.४ बंद्यांची आरोग्य तपासणी

कारागृहात बंद्यांची आरोग्य तपासणी होते काय ? जर होत असेल तर कधी होते याची सत्य माहिती घेतली. कारागृहात बंद्यांच्या आरोग्य तपासणीसाठी स्वतंत्र दवाखाना असून दोन डॉक्टर दररोज हजर असतात. बंदी आजारी पडला किंवा तसे चिन्हे दिसू लागताच त्याची वैद्यकीय तपासणी करुन औषधे उपचार केले जातात असे प्रत्यक्ष कारागृहात गेल्यावर तुरुंग अधिकाऱ्यांनी सांगितले. संशोधकाने स्वत: जेथे वैद्यकीय  उपचार करतात ते छोटेसे रुग्नालय ही पाहिले तेथे अॅडमिट होण्याची सोय नाही रुग्णांची

तपासणी करुन औषण उपचार केले जातात. गंभीर आजार असेल तर घाटी या शासकीय रुग्णालयात बंद्यांला पाठवले जाते असे सांगण्यात आले.

**तक्ता क्र.५.१.४ बद्यांची आरोग्य तपासणी महिन्यातून किती वेळा होते ? हे दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र | तपासणी | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | १ वेळा | ५२ | २६% |
| २. | २ वेळा | १८ | ९% |
| ३. | गरज पडेल तेव्हा | ११९ | ५९.५% |
| ४. | होत नाही | ११ | ५.५% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

संशोधकाने प्रत्यक्ष बद्यांना आरोग्य तपासणी महिन्यातुन किती वेळा होते असा प्रश्न केला असता (५२) २६% बंद्यांनी महिन्यातून एक वेळा तर (१८) ९% बद्यांनी महिन्यातून दोन वेळा तर (११९) ५९.५% बंद्यांची गरज पडेल तेव्हा आरोग्य तपासणी केली जाते तर (११) ५.५ % बंद्यांनी आरोग्य तपासणी होत नाही असे सांगितले . त्या बंद्यांनी संशोधकाने आरोग्य तपासणी तुमची आजपर्यंत झाली नाही काय असे विचारता त्यांनी आम्ही आजपर्यंत आजारीच पडलो नाही असे सांगितले.

वरील विवेचनावरुन बंद्यांना आरोग्य तपासणी गरज पडेल तेव्हा होते असे सांगणाऱ्यांचे प्रमाण ५९.५ % सर्वात अधिक असून होत नाही असे सांगणाऱ्यांचे प्रमाण सर्वात कमी ५.५ % आहे.कारण कारागृहात बंद्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी स्वतंत्र दवाखाना असून दोन डॉक्टर्स नेहमी उपस्थित असतात. एखादा बंदी आजारी पडला तर त्याची ताबडतोब वैद्यकीय तपासणी होते आणि उपचार केले जातात. गरज पडला तर शासकीय रुग्णालयात पाठवले जाते पण ज्या बंद्यांना आरोग्यविषयक समस्या उदभवणारच नाहीत. त्यासाठी विषेश काळजी घेऊन गरज पडेल त्या वेळेला बंद्यांची तपासणी केली जाते.

### ५.१.५ बंद्यांचा आजार

आजारपण ही प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यातील महत्त्वपुर्ण भाग असतो. प्रत्येक व्यक्ती कधीतरी आजारी पडते. आजारपण हे व्यक्तीला सांगून येत नाही. व्यक्तीच्या जीवनशैलीमध्ये फरक पडला की व्यक्ती आजारी पडते. यातून व्यक्तींना अनेक रोगाने ग्रासते. रोगाचे शारीरिक, मानसिक, अपघाती किंवा आगंतूक आणि नैसर्गिक रोग हे प्रमुख प्रकार सांगितले जातात. व्यक्तीला रोग होण्यासाठी अनेक कारणे कारणीभूत असतात. रोगाची चिन्हे दिसू लागताच त्यातून बरे होण्यासाठी डॉक्टरांची मदत घेतली जाते. कारागृह ही सुधार संस्था आहे. तेथे अनेक बंदी एकत्र राहतात. त्या बंद्यांना रोगांची लागण होऊ शकते

त्यामुळे कारागृहातील बंदी सध्या कोणत्या आजाराने ग्रस्त आहेत, त्यांच्या रोगावर उपचार चालू आहेत का ? म्हणजेच वैद्यकीय सुविधा मिळतात काय हे पाहण्यासाठी संशोधकाने पुढील प्रश्न बंद्यांना करून माहिती मिळवली.

**तक्ता क्र.५.१.५**

**बंदी सध्या कुठला आजाराने ग्रस्त आहे काय ? हे दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | आजार | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | होय | ३५ | १७.५% |
| २. | नाही | १६५ | ८२.५% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

बद्यांना कोणता आजार झाला आहे काय नाही याचे विवेचण करणारी आहे. कारागृहातील बंद्यांना संशोधकाने आपणास कोणता आजार आहे का असे विचारताच (१६५) ८२% बंद्यांनी कोणताच आजार नाही तर (३५) १७.५% बंद्यांनी आजार आहे असे सांगितले. म्हणजे आजार नसणाऱ्यांचे प्रमाण अधिक आहे. यावरुन आपणास असा निष्कर्ष काढता येतो की, कारागृहात बंद्यांची आरोग्यविषयक काळजी चांगल्या पध्दतीने घेतली जाते त्यामुळे बहुसंख्य बंद्यांचे आरोग्य चांगले आहे.

**५.१.६ बंदी कोणत्या आजाराने ग्रस्त आहे ?**

**तक्ता क्र. ५.१.६**

**बंद्यांना कोणता आजार आहे ते दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र | आजार | वारंवारिता |
|---|---|---|
| १. | एड्स | ०१ |
| २. | मूत्राशय | ०१ |
| ३. | उष्णता | ०२ |
| ४. | गुडघा दुखणे | ०३ |
| ५. | रक्तदाब | ०७ |
| ६. | दमा | ०२ |
| ७. | मानसिक संतुलन | ०४ |
| ८. | खाज येणे | ०२ |
| ९. | डाळ्यांचे विकार | ०३ |

| | | |
|---|---|---|
| १०. | मूळव्याध | ०१ |
| ११. | चिकण गुन्या | ०१ |
| १२. | हात जळालेला | ०२ |
| १३. | पोट दुखणे | ०३ |
| १४. | दात दुखणे | ०१ |
| १५. | घसा दुखणे | ०१ |
| १६. | कुष्टरोग आणि अंडकोष | ०१ |
| | **एकूण** | **३५** |

ज्या बंद्यांना आजार आहे ते , कोणता आजार आहे याचे विवरण करणारी आहे. त्यात एड्स झालेला ०१, मूत्राशयाचा विकार ०१, उष्णतेचा आजार ०२, गुडघादुखी ०३, रक्तदाब ०७, दमा ०२, मानसीक संतुलन ०४, खाज येणे ०२, डोळे विकार ०३, मूळव्याधी ०१, चिकन गुण्या ०१, हात जळालेला त्यामुळे त्रास ०२, पोट दुखणे ०३, दातांचा त्रास ०१, घशाचा त्रास ०१, कुष्ट रोग व अंडकोष ०१ असे एकुण ३५ रूग्ण आजारांनी ग्रस्त असलेले जाणवले.

वरील विवेचनावरून असे जाणवते की, कारागृहात बंद्यांची आरोग्याची काळजी घेण्यासाठी स्वतंत्र रुग्णालय असून गरज पडेल तेव्हा आरोग्य तपासणी होते. तरीसुध्दा काही बंदी विविध आजारांची ग्रस्त आहेत असे जाणवते. बंद्यांच्या विविध आजारांबाबत त्यांना विचारले असता बरेच आजार बंद्याना कारागृहात येण्यापुर्वीच होते. पण काही दुखणे असे आजार येथे आल्यावर उद्‌भवले. ज्या वृध्द व्यक्ती आहेत त्यांना रक्तदाब, दात,पोट,दमा, डोळे असे विविध विकार झालेले आढळले.

### ५.१.७ बंद्यांच्या आजारांवरील उपचार

**तक्ता क्र ५.१.७**

**बंद्यांच्या आजारांवर उपचार चालू आहेत काय ? ते दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र | उपचार | वारंवारिता |
|---|---|---|
| १. | होय | १८ |
| २. | नाही | १७ |
| | **एकूण** | **३५** |

कारागृहातील ज्या बंद्यांना आजार आहे अशा बंद्यांना त्यावर उपचार चालू आहेत काय याची माहिती संशोधकाने करुन घेतली असता १८ बंदी सांगतात उपचार चालू आहेत पण १७ बंदी सांगतात उपचार चालू नाहीत. याची सखोल माहिती विचारली असता बंद्यांनी सांगितले की विशेष असे उपचार केले

जात नाहीत फक्त वरवरचा उपचार केला जातो. कारण आम्हाला बऱ्याच दिवसांपासून आजार आहे पण अद्याप दुरुस्त झाला नाही.ज्या बंद्यांना एडस, अंडकोष, रक्तदाब, मूत्राशय, मानसिक आजार अशा विविध आजारांच्या बंद्यांना त्यांच्या आजाराविषयी संशोधकाने सविस्तर विचारले असता बहुसंख्य बंद्यांनी सांगितले की आमच्या आहाराची विशेष काळजी घेतली जाते. आम्हाला औषध गोळ्या वेळेवर दिल्या जातात. पण कारागृहात मानसिक रुग्णांसाठी मानसोपचार तज्ञ नाहीत. त्यामुळे ज्या मनोरुग्ण व्यक्ती आहेत त्यांच्यावर योग्य प्रकारे उपचार होत नाहीत. त्यामुळे कारागृहात मानसोपचार तज्ञांची नितांत आवश्यकता आहे असे बहुसंख्य बंद्यांनी सांगितले.

कारागृहात दोन फिजिशियन आहेत पण त्याच बरोबर मानसोपचारतज्ञ असणे गरजेचे वाटते. कारण कारागृहाच्या चार भिंतीत राहून बहुसंख्य बंद्यांचे मानसिक संतुलन बिघडण्याची दाट शक्यता असते. अशा मनोरुग्णावर वेळीच उपचार केले नाहीत तर त्याचे विपरीत अनेक परिणाम होऊ शकतात. त्यामुळे अशा रुग्णांची काळजी घेण्यासाठी कारागृहात मनासोपचार तज्ज्ञांची नितांत गरज आहे.

### ५.१.८ बंद्यांचे व्यसन

व्यसन आणि आरोग्य यांचा अतिशय जवळचा संबंध आहे. व्यक्तीला चांगली व्यसने किंवा सवयी असतील तर त्याचा चांगला परिणाम दिसतो. जर व्यक्तीला वाईट व्यसने असतील तर त्याचा वाईट परिणाम दिसतो. म्हणजेच व्यक्तीला अनेक आजार जडतात. बऱ्याच व्यक्ती विरंगुळा, दुःख विसरणे, श्रीमंतीचे प्रदर्शन, मित्रांची संगत या विविध कारणांनी वेगवेगळी व्यसने करतात. यातून बरेच रोग होण्याचा संभव असतो. सिगारेट, गुटखा, तंबाखू यांमुळे कर्करोगाचे प्रमाण वाढले असून अति मद्य सेवनाने हृदयविकार, मानसिक विकार असे रोग होऊ शकतात. बहुसंख्य व्यक्तींना कोणते तरी व्यसन असतेच. त्यासाठी संशोधकाने कारागृहातील बंद्यांना कोणते व्यसन आहे या संदर्भात माहिती मिळवण्यासाठी पुढील प्रश्न विचारला.

**तक्ता क्र. ५.१.८**


**बंदी कारागृहात सध्या कोणते व्यसन करतात ते दर्शविणार तक्ता**

| अ.क्र | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | तंबाखू | ७८ | ३९% |
| २. | बिडी | २२ | ११% |
| ३. | तंबाखू + बिडी | ०२ | १% |
| ४. | गोवा | ०२ | १% |
| ५. | व्यसन नाही | ९६ | ४८% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

बंदी कारागृहात शिक्षा भोगत असताना व्यसन कोणते करत याच्या माहितीचे विवेचन केले आहे. कारागृहात राहत असतानाही काही बंदी आपले व्यसन पूर्ण करतात तशी त्यांना सुट दिली जाते असे म्हणता येईल. संशोधकाने अभ्यास केलेल्या एकूण बंद्यांपैकी (७८) ३९% बंद्यांनी सांगितले, आम्ही तंबाखू खातो (२२) ११% बंदी विडी ओढतात. बिडी आणि तंबाखू (०२) १% तर गोवा (०२) १% असे व्यसन करतात तर (९६) ४८% बंदी व्यसन करत नाहीत.वरील विश्लेषणावरुन व्यसन न करणाऱ्यांचे प्रमाण अधिक असून त्या खालोखाल तंबाखू खाणाऱ्यांचे प्रमाण ३९ टक्के आहे तर गोवा खाणाऱ्यांचे प्रमाण सर्वात कमी आढळले.

वरील विवेचनावरून जाणवते की, कारागृहातील बहुसंख्य बंद्यांना व्यसन नाही पण ज्यांना व्यसन आहे त्यामध्ये तंबाखू, बिडी यांचे व्यसन आहे. कारागृहात येण्यापूर्वीपासूनच या व्यसनांची सवय आम्हाला होती. आजही ती आहे असे बंद्यांनी सांगितले अर्थात व्यसनाचे प्रमाण वाढत आहे असे जाणवते.

**बंद्यांचे व्यसन दर्शविणारा आलेख ५.१**




## ५.२ बंद्यांनी केलेल्या अपराधासंबंधी माहिती

व्यक्ती समाजात वावरत असताना सामाजिक नियमाप्रमाणे वर्तन करते. आपल्या गरजा भागवत असताना जीवनात असे अनेक प्रसंग येतात की ही व्यक्ती सामाजिक नियमांच्या विरुध्द वर्तन करते. पण या वर्तनामागची पार्श्वभूमी त्या व्यक्तीला तसे वर्तन करण्यासाठी भाग पाडते. गुन्हा ही प्रवृत्ती असून गुन्हेगार ही व्यक्ती असते. सामाजिक नियम किंवा कायद्याच्या विरुध्द वर्तन म्हणजे गुन्हा करणे होय. गुन्ह्याचे वर्तन घडण्यामागे अनेक कारणे असतात. एकदा एखाद्या व्यक्तीकडून तसे कृत्य घडले आणि

त्याला त्यावरचा गुन्हा सिध्द होऊन शिक्षा झाली म्हणजे त्यावर गुन्हेगाराचा शिक्का पडतो. तो तुरुंगात गेल्यानंतर त्याच्या कुटुंबावर होणारा विपरीत परिणाम हा अत्यंत भयानक असतो. कायद्याचे उल्लंघन करणाऱ्याला शिक्षा होतेच. ही शिक्षा प्राचीन काळापासून दिली जाते पण आज यामध्ये "सुधारणा आणि पुनर्वसन" या नियमाप्रमाणे शिक्षा दिली जाते.

समाजात असे गुन्हेगारीचे वर्तन का घडते ? म्हणजे त्याच्या मागे काय कारणे असतात, अपराध कोणता, कसा, किती लोकांनी केला, त्याला किती वर्षांची शिक्षा झाली, त्याने खरोखरच गुन्हा केला काय या संबंधीची सविस्तर माहिती संशोधकाने कारागृहात शिक्षा भोगत असलेल्या बंद्याना विचारले. बंद्यांनी त्यांच्या हातून जे अपराधी कृत्य घडले त्या संदर्भात अतिशय सविस्तर माहिती कथानक स्वरूपात संशोधकास सांगितली. प्रथम बंदी माहिती सांगण्यास दचकत होते. पण संशोधकाने त्यांना विश्वासात घेऊन ही माहिती कोठेही सांगितली जाणार नाही याची खात्री देताच बद्यांनी अतिशय सविस्तर माहिती सांगितली. बऱ्याच बंद्यांनी अतिशय मनमोकळेपणाने घडलेला प्रसंग सांगितला.

### ५.२.१ बंद्यांने केलेला गुन्हा

बंदी ज्या कृतीमुळे कारागृहात आला ती कृती अर्थात त्याने कोणता गुन्हा केला अथवा असे कोणते वर्तन त्याने केले जे वर्तन कायद्याने निषिध्द मानले आहे. भारतीय दंडसंहितेत त्याचे वर्गीकरण करुन प्रत्येक कृती, त्या पाठीमागची पार्श्वभूमी, त्या कृतीचा परिणाम, त्या कृतीची तीव्रता, त्या कृती करण्यापाठीमागचा उद्देश या सर्व गोष्टींचा विचार करुन प्रत्येक वर्तनासाठी विशिष्ट कलम असून त्याला कोणती शिक्षा असावी याचा उल्लेख आहे. एखाद्या व्यक्तीचे वर्तन कायदाबाह्य आहे किंवा नाही हे न्यायालय ठरवते. न्यायालय तो दोषी आहे किंवा नाही या संदर्भातील सर्व प्रक्रिया करुन त्या व्यक्तीस विशिष्ट दिवासाचा कारावास व पैशाच्या स्वरूपात शिक्षा देते. विशिष्ट मुदतीची शिक्षा झालेल्या त्या गुन्हेगाराला कारागृहात ठेवले जाते. खून करणे, बलात्कार करणे, चोरी, दरोडा, पत्नीची हत्या असे गंभीर अपराध केलेल्या व्यक्तीला भारतीय दंडसंहितेअंतर्गत शिक्षा दिली जाते. कारागृहात जन्मठेपेची शिक्षा भोगणाऱ्यांचे प्रमाण अधिक जाणवते. बंद्यांनी कोणता गुन्हा केला त्या संदर्भात भारतीय दंडसंहितेप्रमाणे गुन्हा आणि कलम पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**भारतीय दंडसंहिता - कलम**

१) १२० - ज्या अपराध्यास कैदेची शिक्षा सांगितली आहे तो अपराध करण्याचा बेत लपवणे तो अपराध घडला तर

१२० - अ- अन्यायाने संगनमत याची व्याख्या

१२०-ब- अन्यायाच्या संगनमताबद्दल शिक्षा

२) १३८- अधिकाऱ्याला शिरजोरीने कृत्य करण्यास अंत:प्रेरणा देणे परिणामी अपराध घडल्यास

३) ३०२- खून या सदरात न मोडणार सदोष मनुष्यवध ज्या कृत्यामुळे मृत्यू घडून आला ती कृती इ. घडवून आणण्याचा उद्देशाने केलेली असल्यास

४) ३०४ ब - हुंडाबळी १) स्त्रीचा लग्नानंतर सात वर्षांच्या आत मृत्यू

२) भाजणे, जखमा अगर इतर विशेष कारणांमुळे

३) मृत्यूपूर्वी हुंड्याच्या मागणीवरुन पती अगर नातलगाकडून त्रास.

५) ३०४ - क - बेदरकारपणे किंवा हयगयीने केलेल्या कृत्यामुळे मृत्यूस कारण होणे.

६) ३०६ - आत्महत्या करण्यास साहाय्य

७) ३०७ - खून करण्याचा प्रयत्न करणे.

८) ३२३ - इच्छापूर्वक दुखापत पोहचविणे.

९) ३२४ - घातक हत्याराने किंवा साधनांनी दुखापत करणे.

१०) ३३२ - लोकसेवकाला त्याच्या कर्तव्यापासुन धाकाने परावृत्त करण्यासाठी इच्छापूर्वक दुखापत पोहचविणे.

११) ३४२ - कोणत्याही व्यक्तीला गैरपणे परिरुध्द करणे.

१२) ३४९ - बळजोरी

१३) ३५४ - स्त्रीस लज्जा वाटून तिच्या मनास धक्का बसावा या इराद्याने तिच्या अंगावर जाणे अगर तिच्यावर अन्यायाची बळजबरी करणे.

१४) ३५६ - एखाद्या व्यक्तीने परिधान केलेल्या किंवा जवळ बाळगलेल्या मालमत्तेची चोरी करण्याचा प्रयत्न करताना हमला किंवा फौजदारी पात्र बलप्रयोग करणे.

१५) ३६३ - मनुष्य चोरुन नेण्याबद्दल शिक्षा

क) अल्पवयीन इसमाला भिक्षा मागण्याच्या हेतूने चोरुन नेणे अगर पंगू करणे.

१६) ३६४ - खून करण्याकरिता चोरुन अगर पळवून नेणे.

१७) ३६६ - एखाद्या स्त्रीला विवाहाची सक्ती करण्याच्या किंवा तिला शीलभ्रष्ट इ करण्याच्या उद्देशाने तिचे अपहरण करणे.

क) अज्ञान मुलीला अनैतिक कृत्यासाठी मिळवणे.

ख) परकीय देशांतून मुलींची आयात व दृष्यदंड

१८) ३७२ - वेशाव्यवसाय इ. प्रयोजनाकरिता अज्ञान व्यक्तीची विक्री करणे किंवा तिला भाड्याने देणे.

१९) ३७३ - वेशा व्यवसाय प्रयोजनाकरिता अज्ञान व्यक्तीची खरेदी करणे किंवा तीचा कब्जा मिळवणे.

२०) ३७६ - बलात्कार किंवा जबरीचा संभोग केल्याबद्दल शिक्षा

२१) ३८० - राहते घर वगैरे ठिकाणी चोरी

२२) ३९२ - जबरीच्या चोरीबद्दल शिक्षा

२३) ३९४ - जबरी चोरी करताना किंवा करण्याचा प्रयत्न करताना एखादया व्यक्तीने इच्छा पुर्वक दुखापत करणे अथवा अशा जबरी चोरीत तीच्या जोडीला अन्य कोणतीही व्यक्ती निबध्द असणे.

२४) ३९५ - दरोडा घातल्याबद्दल शिक्षा

२५) ३९७ - मृत्यु किंवा जबरी दुखापत घडवुन आणण्याचा प्रयत्नासहीत जबरी चोरी किंवा दरोडा

२६) ३९९ - दरोडा घालण्याची पूर्व तयारी करणे.

२७) ॲन्टी करप्शन -

२८) N.D.P.S. Act.१९८५ गुंगीकारक औषधी दृष्य व मनोव्यापार परिणाम करणारे पदार्थ अधिनियम

**तक्ता क्र. ५.२.१**

**बंद्यांने कोणता गुन्हा केला ? ते दर्शविणारा तक्ता**

| अ. क्र | गुन्हा (कलम) | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | (३०२) - खून या सदरात न मोडणार सदोष मनुष्यवध ज्या कृत्यामुळे मृत्यू घडून आला ती कृती इ. घडवून आणण्याच्या उद्देशाने केलेली असल्यास | १०६ | ५३% |
| २. | (३०२+३०७) - खून या सदरात न मोडणार सदोष मनुष्यवध ज्या कृत्यामुळे मृत्यू घडून आला ती कृती इ. घडवून आणण्याच्या उद्देशाने केलेली असल्यास +खून करण्याचा प्रयत्न करणे. | ०८ | ४% |
| ३. | (३०७) - खून करण्याचा प्रयत्न करणे. | ०७ | ३.५% |
| ४. | (३७६) - बलात्कार किंवा जबरी संभोग केल्याबद्दल शिक्षा | ११ | ५.५% |

५) भारतीय दंडसंहिता १८६०-ॲड.राम शेलकर - पृष्ठ क्र. (१८० ते २७५)

६) औरंगाबाद पोलिस मार्गदर्शिका - (पृष्ठ क्र. ७४-९३)

| | | | |
|---|---|---|---|
| ५. | (३७६+३२३+५०४) - बलात्कार किंवा जबरी संभोग केल्याबद्दल शिक्षा + इच्छापूर्वक दुखापत पोहचविणे + | ०१ | ०.५% |
| ६. | (३२४+३९२) - घातक हत्याराने किंवा साधनांनी दुखापत करणे + जबरीच्या चोरीबद्दल शिक्षा | ०२ | १% |
| ७. | (३०२+४९८) खून या सदरात न मोडणार सदोष मनुष्यवध ज्या कृत्यामुळे मृत्यू घडून आला ती कृती इ. घडवून आणण्याच्या उद्देशाने केलेली असल्यास + | १० | ५% |
| ८. | (३०२+३२४) - खून या सदरात न मोडणार सदोष मनुष्यवध ज्या कृत्यामुळे मृत्यू घडून आला ती कृती इ. घडवून आणण्याच्या उद्देशाने केलेली असल्यास + घातक हत्याराने किंवा साधनांनी दुखापत करणे | ०५ | २.५% |
| ९. | (३७६+३९२) - बलात्कार किंवा जबरी संभोग केल्याबद्दल शिक्षा + जबरीच्या चोरीबद्दल शिक्षा | ०१ | ०.५% |
| १०. | (एन.डी.पी.एस.) - गुंगीकारक औषधी द्रव्य व मनोव्यापार परिणाम करणारे पदार्थ अधिनियम | ०१ | ०.५% |
| ११. | (३९९) दरोडा घालण्याची पूर्वतयारी करणे. | ०१ | ०.५% |
| १२. | (३९४+३९७) - जबरी चोरी करताना किंवा करण्याचा प्रयत्न करताना एखाद्या व्यक्तीने इच्छापूर्वक दुखापत करणे अथवा अशा जबरी चोरीत तिच्या जोडीला अन्य कोणतीही व्यक्ती निबध्द असणे + मृत्यू किंवा जबरी दुखापत घडवुन आणण्याच्या प्रयत्नासहित जबरी चोरी किंवा दरोडा | ०१ | ०.५% |
| १३. | (३९५) दरोडा घातल्याबद्दल शिक्षा | ०४ | २% |
| १४. | (३०२+३२६+३२४+३४९) - खून या सदरात न मोडणार सदोष मनुष्यवध ज्या कृत्यामुळे मृत्यू घडून आला ती कृती इ. घडवून आणण्याच्या उद्देशाने केलेली असल्यास + + घातक हत्याराने किंवा साधनांनी दुखापत करणे + बळजोरी | ०३ | १.५% |
| १५. | (३८०+४५७+४०७) - राहते घर वगैरे ठिकाणी चोरी | ०३ | १.५% |
| १६. | (३०७+३२३) - खून करण्याचा प्रयत्न करणे + इच्छापूर्वक दुखापत पोहचविणे | ०१ | ०.५% |

| | | | |
|---|---|---|---|
| १७. | (३०२+३०४) - खून या सदरात न मोडणार सदोष मनुष्यवध ज्या कृत्यामुळे मृत्यू घडून आला ती कृती इ. घडवून आणण्याच्या उद्देशाने केलेली असल्यास + हुंडाबळी १) स्त्रीचा लग्नानंतर सात वर्षांच्या आत मृत्यू २) भाजणे, जखमा अगर इतर विशेष कारणांमुळे ३) मृत्यूपुर्वी हुंड्याच्या मागणीवरुन पती अगर नातलगांकडून त्रास. | ०३ | १.५% |
| १८. | (३९५+३७६+३४२+३५४+५५६) - दरोडा घातल्याबद्दल शिक्षा + बलात्कार किंवा जबरी संभोग केल्याबद्दल शिक्षा + कोणत्याही व्यक्तीला गैरपणे परिरुध्द करणे + स्त्रीस लज्जा वाटून तिच्या मनास धक्का बसावा या इराद्याने तिच्या अंगावर जाणे अगर तिच्यावर अन्यायाची बळजबरी करणे | ०२ | १% |
| १९. | (३२४) - घातक हत्याराने किंवा साधनांनी दुखापत करणे. | ०२ | १% |
| २०. | (४९८) - विवाहित स्त्रीचा छळ करणे | ०१ | ०५% |
| २१. | (३०+५०६+५०८) - मृत्यू किंवा जबर दुखापत घडवून आणणे इ. धमकी + एखादी व्यक्ती दैवी प्रकोपाचा विषय होईल असा तिचा समज करुन देऊन घडवलेली कृती | ०९ | ४.५% |
| २२. | (१३८) - अधिकाऱ्याला शिरजोरीने कृत्य करण्यास अपप्रेरणा देणे परिणामी अपराध घडल्यास | ०१ | ०.५% |
| २३. | (३०४) - खून या सदरात न मोडणारा सदोष मनुष्यवध ज्या कृतीमुळे मृत्यू घडून आला | ०१ | ०.५% |
| २४. | (४९८+३०६) - + आत्महत्या करण्यास सहाय्य | ०७ | ३.५% |
| २५. | (ॲन्टि करप्शन) - लाचलुचपत प्रतिबंधक | ०१ | ०.५% |
| २६. | (३०४+४९८) - खून या सदरात न मोडणारा सदोष मनुष्यवध ज्या कृतीमुळे मृत्यू घडुन आला ती कृती इ. | ०२ | १% |
| २७. | (३०२+४४८) - खून या सदरात न मोडणारा सदोष मनुष्यवध ज्या कृतीमुळे मृत्यू घडून आला ती कृती इ. घडवून आणण्याच्या उद्देशाने केलेली असल्यास + गृह अतिक्रमण | ०१ | ०.५% |
| २८. | (३०२+४४८) - खून या सदरात न मोडणारा सदोष मनुष्यवध ज्या कृतीमुळे मृत्यू घडून आला ती कृती इ.घडवून आणण्याच्या उद्देशाने केलेली असल्यास | ०१ | ०.५% |
| २९. | (१२०+४२०+४९८) - ज्या अपराध्यास कैदेची शिक्षा झाली आहे तो अपराध करण्याचा बेत लपवणे तो अपराध घडला तर नसला तर + फसवणूक करणे + अपराध करण्याच्या उद्देशाने विवाहित स्त्रीस भुरळ पाडून नेणे किंवा अडवणूक करणे | ०१ | ०.५% |

| | | | |
|---|---|---|---|
| ३०. | (३५४+३६६+३७२+३७३) - स्त्रीस लज्जा वाटून तिच्या मनास धक्का बसावा या इराद्याने तिच्या अंगावर जाणे अगर तिच्यावर अन्यायाची बळजबरी करणे + एखाद्या स्त्रीला विवाहाची सक्ती करण्याच्या किंवा तिला शीलभ्रष्ट इ करण्याच्या उद्दशाने तिचे अपरण करणे. क) अज्ञान मुलीला अनैतिक कृत्यासाठी मिळवणे. ख) परकीय देशातून मुलींची आयात व द्रव्यदंड + वेशाव्यवसाय इ. प्रयोजनाकरिता अज्ञान व्यक्तीची विक्री करणे किंवा तिला भाडयाने देणे + वेश्या व्यवसाय प्रयोजनाकरिता अज्ञान व्यक्तीची खरेदी करणे किंवा तिचा कब्जा मिळवणे. | ०२ | १% |
| ३१. | (३३२+३२४+३६३+३६४) - लोकसेवकाला त्याच्या कर्तव्यापासून धाकाने परावृत्त करण्यासाठी इच्छापूर्वक दुखापत पोहचविणे + घातक हत्याराने किंवा साधनांनी दुखापत करणे + मनुष्य चोरुन नेण्याबद्दल शिक्षा क) अल्पवयीन इसमाला भिक्षा मागण्याच्या हेतूने चोरुन नेणे अगर पंगू करणे + खून करण्याकरिता चोरुन अगर पळवून नेणे. | ०१ | ०.५% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

बंद्याने कोणता गुन्हा केला याचे विवरण करण्यासाठी आणि गुन्ह्याचे वर्तनाचे अनेक प्रकार आहेत. कोणते वर्तन कोणत्या कलमाअंतर्गत दंडनीय आहे हे " भारतीय दंडसंहितेने" निश्चित केले आहे. "व्यक्तीचे कोणते वर्तन नियमबाह्य असू शकते. तसे वर्तन केल्यावर किती वर्षांचा कारावास व किती रुपये दंड, तो गुन्हा दखलपात्र आहे की अखदलपात्र आहे ? अर्थात कोणत्या गुन्ह्याला जामीन मिळू शकतो, कोणत्या गुन्ह्याला जामीन मिळू शकत नाही, कोणत्या न्यायालयात कोणते खटले चालतात याचे सविस्तर वर्णन **भारतीय दंडसंहिता १८६०** मध्ये केले असुन १०९ ते ५११ या कलमाअंतर्गत व्यक्तींचे विविध गुन्ह्याचे वर्तन याचेही सविस्तर विवेचन केले आहे."

बंद्यांच्या हातून असे कोणते गुन्ह्याचे वर्तन झाले त्याचे सविस्तर विवेचन पुढीलप्रमाणे संशोधकाने अध्ययनासाठी निवडलेल्या एकूण बंद्यांपैकी ३०२ या कलमाखाली {खून करणे}(१०६) ५३% बंदी शिक्षा भोगत होते. म्हणजेच कारागृहात ५०% पेक्षा अधिक कैदी खून केल्याबद्दल शिक्षा भोगत आहेत. या खुनामध्ये पत्नीचा खून, भांडणामध्ये मरण पावणे, जाणून बुजून मारणे, अनवधानाने मारहाण केली असता मृत्यू होणे असे खुनाचे विवेचन आले. ३०२+३०७ या कलमाखाली (०८) ४% बंदी शिक्षा भोगत आहेत. ३०२ मध्ये खून करणे आणि ३०७ मध्ये खून करण्याचा प्रयत्न केल्याबद्दल शिक्षा झालेले असे एकत्रित दोन्ही गुन्ह्याखाली शिक्षा झालेले असे एकत्रित दोन्ही गुन्ह्याखाली शिक्षा भोगत असणारे ४% बंदी

कारागृहात आहेत. ३०७ या कलमाअंतर्गत (०७) ३.५% बंदी शिक्षा भोगत आहेत. ३०७ कलमांअंतर्गत ज्या व्यक्तीने खून करण्याचा प्रयत्न केला आहे पण प्रत्यक्षात खून झाला नाही असे ०७ बंदी या कलमांअंतर्गत शिक्षा भोगत आहेत.

३७६+३२३+५०४ या तीन कलमांअंतर्गत एकत्रिपणे शिक्षा झालेले (०१) ०.५% बंदी आहेत. ३७६ म्हणजे जबरी संभोग केल्याबद्दल शिक्षा, ३२३ पुढच्या व्यक्तीची इच्छा नसताना दुखापत करणे, ५०४ शांतता भंग घडवून आणण्याच्या उद्देशाने अपमान करणे. अशा तिन्ही कलमांअंतर्गत एकत्रित शिक्षा भोगणारा एक बंदी संशोधकाला माहिती सांगितली त्या बंद्यांस सविस्तर विचारले असता त्याने एका लहान मुलीवर बलात्कार केला होता असे सांगितले. ३२४+३९२ या दोन कलमांअंतर्गत (०२) १% बंदी शिक्षा भोगत आहेत. ३२४- घातक साहित्याने इच्छापूर्वक दुखापत करणे, ३९२ - जबरी चोरी करणे, चोरी करीत असताना घरातील व्यक्ती जाग्या झाल्याने त्या आमच्यावर धावून आल्यामुळे पण आम्ही त्यांना सळईने मारले. त्यात ते बेशुध्द पडले आणि आम्ही पळालो असे बंद्यांनी सांगितले. ३०२+४९८ या कलमाअंतर्गत (१०) ५% बंदी शिक्षा भोगत आहेत. ३०२ खून करणे, ४९८ विवाहित स्त्रीचा छळ करणे, पत्नीचा छळ करुन म्हणजे तिला शारीरिक त्रास देऊन तिचा खून केल्याबद्दल १० बंदी शिक्षा भोगत आहेत. ३०२+३२४ या कलमाअंतर्गत (०५) २.५% बंदी शिक्षा भोगत आहेत. ३०२ खून, ३२४ घातक हत्याराने दुखापत करणे, मारामारी करत असताना पुढच्या व्यक्तीचा मृत्यू झाल्याने या कलमाअंतर्गत शिक्षा भोगत आहोत असे बंद्यांनी सांगितले. ३७६+३९२ या कलमाअंतर्गत (०१) ०.५% बंदी शिक्षा भोगत आहेत. ३७६ जबरी संभोग, ३९२ जबरी चोरी, चोरी करत असताना स्त्रियांवर बलात्कार केला त्यामुळे या कलमाखाली एक बंदी शिक्षा भोगत आहेत. गुंगीकारक औषधी द्रव्य व मनोव्यापार परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ अंतर्गत (०१) ०.५% बंदी शिक्षा भोगत आहे. अंमली पदार्थ म्हणजे चरस याची वाहतूक करताना ड्रायव्हर पकडला गेला. त्यात त्यावर NDPS अंतर्गत शिक्षा देण्यात आली असे बंद्यांने संशोधकास सांगितले. ३९९ या कलमाअंतर्गत (०१) ०.५% बंदी शिक्षा भोगत आहेत, ३९९ कलम दरोडा टाकणे, दरोडा टाकल्याबद्दल पकडला जावून तो आज शिक्षा भोगत आहे. ३९४+३९७ या कलमाअंतर्गत (०१) ०.५% बंदी शिक्षा भोगत आहे. चोरी करत असताना घरात झोपलेल्या व्यक्तीस मारहाण केली आणि चोरी केली असे या बंद्याने सांगितले. ३९५ दरोडा घालणे या कलमाअंतर्गत (०४) २% बंदी शिक्षा भोगत आहेत. ३०२+३२६+३२४+३४९ या विविध कलमांअंतर्गत (०३) १.५% कैदी शिक्षा भोगत आहेत. बळजबरी करीत असताना दुखापत केली आणि त्यात खून झाला अशा घटनाक्रमात ३ बंदी शिक्षा भोगत आहेत. ३८०+४५७+४०७ या कलमांअंतर्गत सामानाची ने आण करतांना विश्वासघात करुन चोरी केली असे (०३) १.५% बंदी शिक्षा भोगत आहेत.

३०७+३२३ खून करण्याचा प्रयत्न करीत असताना मोठी दुखापत केली यामुळे (०१) ०.५% बंदी शिक्षा भोगत आहे. ३०२+३०४ खून आणि मनुष्य वधाचा गुन्हा या कलमाअंतर्गत (०३) १.५% बंदी शिक्षा भोगत आहेत. ३९५+३७६+३४२+५५६ या एकत्रित कलमांअंतर्गत (०२) १% बंदी शिक्षा भोगत आहेत. दरोडा, संभोग, स्त्रियांवर अत्याचार करण्याचा इराद्याने अंगावर जाणे म्हणजे दरोडा टाकला असता त्यावेळी स्त्रियांवर बलात्कार, स्त्रियांच्या शरीराशी चाळे करणे असे प्रकार कोठेवाडी दरोडा प्रकरणा अंतर्गत दोन बंद्यांना या कलमाखाली शिक्षा झाली आहे. ३२४ घातक साधनाद्वारे दुखापत करणे या कलमाअंतर्गत (०२) १% बंदी शिक्षा भोगत आहेत. ४९८ विवाहित स्त्रियांचा छळ करणे या कलमाअंतर्गत (०९) ४.५% बंदी शिक्षा भोगत आहेत. १३८ (लाच घेतल्या प्रकरणी) या कलमाअंतर्गत (०१) ०.५% बंदी शिक्षा भोगत आहे. ३०४ हुंडाबळी - हुंडयासाठी त्रास देतो म्हणून पत्नीने जाळून घेतले त्यात ती संपूर्ण जळाली मी तिला वाचवण्यासाठी गेलो असता माझे अर्धे शरीर भाजले असे (०१) ०.५% बंदी शिक्षा भोगत आहे. हा बंदी युवक होता. त्याचे नुकतेच लग्न झाले होते पण पत्नीने घरगुती कारणाने जाळून घेतले. पण पत्नीच्या घरच्यांनी तिचा छळ करुण मारले असे सांगितले. संशोधकाला या युवकाने स्वतःचे जळालेले अर्धे शरीर दाखवले. त्या जळालेल्या भागाचा आजही त्रास होतो असे त्यांनी सांगितले.

४९८+३०६ विवाहित स्त्रीस क्रूरतेची वागणुक व आत्महत्येस साहाय्य केल्या प्रकरणी (०७) ३.५% बंदी शिक्षा भोगत आहेत. ३०४+४९८ विवाहित स्त्रीस क्रूरतेची वागणूक व तिच्या मृत्यूस कारणीभुत होणे या कारणास्तव (०२) १% बंदी शिक्षा भोगत आहेत. ३०२+४९८ घराचे अतिक्रमण व खून या कलमाखाली (०१) ०.५% बंदी शिक्षा भोगत आहेत. ३०२+३७६ जबरी संभोग करुण खून केल्या प्रकरणात (०१) ०.५% बंदी शिक्षा भोगत आहे. १२०+१२०+४९८ फसवणूक करुन दुसऱ्याच्या पत्नीस पळवून नेणे अशा अपराधाअंतर्गत (०१) ०.५% बंदी शिक्षा भोगत आहे. ३५४+३६६+३७२+३७३ स्त्रीस बळजबरी करणे, पळवून नेणे, वेश्या व्यवसाय करण्यासाठी, वयाने लहान १८ वर्षांच्या आतील मुलीची विक्री करणे व तीस विकत घेणे या कलमाअंतर्गत (०२) १% बंदी शिक्षा भोगत आहेत. ३३२+३२४+३६३+३६४ सरकारी कर्मचाऱ्याला त्याच्या कामापासून परावृत्त करुन त्याला गंभीर इजा करण्याच्या उद्देशाने त्याला चोरुन घेऊण जाणे या कलमाअंतर्गत (०१) ०.५% बंदी शिक्षा भोगत आहे. वरील विश्लेषणावरुण असे लक्षात येते की, कलम ३०२ खून करणे या कलमाअंतर्गत सर्वात जास्त बंदी शिक्षा भोगत आहेत. म्हणजे खून करणाऱ्यांचे प्रमाण अधिक असून इतर गुन्ह्याचे प्रमाण थोड्याफार प्रमाणात कमी आपणास पाहावयास मिळते. याचे विस्तृत विश्लेषण वर आलेले आहे.

### ५.२.२ बंद्याने केलेल्या गुन्ह्यांत लोकांचा सहभाग

बंद्याने जो गुन्हा केला तो त्याने एकट्यानेच केला आहे काय किंवा त्याच्यासोबत किती लोक सहभागी होते हे पाहणे आवश्यक आहे. कारण गुन्ह्यासारखे कृत्य करण्यास व्यक्ती एकटा सहसा धजत नाही. त्यामुळे आज संघटित अपराधाचे प्रमाण वाढले आहे. अनेक लोक त्यात सहभागी झालेले असतात, कामाची विभागणी असते, एकमेकांना सहकार्य असते, सुरक्षात्मक उपाय व सतर्कतेचे नियोजन केलेले असते. संघटित अपराधात सापडण्याची संधी कमी असते. खुन, दरोडा, बलात्कार, मादक द्रव्यांची ने-आण असे गुन्हे संघटित स्वरूपातच मोठ्या प्रमाणात घडत असतात. त्यांचे प्रमाण वरचेवर वाढत आहे. संघटित गुन्ह्यांत गुन्हा करण्यासाठी धाडस होते, भीती वाटत नाही यांमुळे तो वरचेवर अनेक कृत्ये करत असतो. बंद्यांनी केलेल्या अपराधात खून, बलात्कार, दरोडा, चोरी, पत्नीचा छळ, पत्नीला आत्महात्येस प्रवत्त करणे असे गुन्ह्याचे प्रमाण अधिक आहे. या गुन्ह्यात त्यांनी इतरांचे सहकार्य घेतले काय किंवा एकट्यानेच गुन्हा केला यातून त्याची अपराधाची मानसिकता कळते.

**तक्ता क्र. ५.२.२**

**बद्यांने केलेल्या गुन्ह्यात किती लोक सहभागी होते दर्शविणारा तक्ता**


| अ.क्र | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | एकट्याने | ८७ | ४३.५% |
| २. | दोघांनी | १५ | ७.५% |
| ३. | तिघांनी | १७ | ८.५% |
| ४. | ४-६ | २५ | १२.५% |
| ५. | ६-८ | ०९ | ४.५% |
| ६. | ८-१० | ०३ | १.५% |
| ७. | १०-१२ | ०३ | १.५% |
| ८. | १२-१४ | ०८ | ४% |
| ९. | केला नाही | ३३ | १६.५% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

ज्या व्यक्तीने कायदाबाह्य वर्तन केले आहे. तो गुन्हेगार असतो, व्यक्ती जेव्हा असे गुन्ह्याचे कृत्य करते तेव्हा बऱ्याच वेळा एकटा करण्यापेक्षा इतरांना सोबत घेऊन मग तो प्रत्यक्ष किंवा अप्रत्य (गुन्ह्याच्या नियोजनात सहकार्य) सहभाग असल्याने त्याचे मानसिक पाठबळ वाढते. त्यामुळे वरील तक्त्यावरुन बंद्यांनी जो अपराध केला आहे तो किती लोकांनी मिळून केला या संबंधीचे विवेचन आढळले. संशोधकाने

अभ्यासलेल्या एकुण बंद्यांपैकी एकट्याने अपराध म्हणजे आपण स्वतःच अपराध केला यामध्ये इतर कोणीही सहभागी झाले नव्हते असे (८७) ४३.५ टक्के बंद्यांनी सांगितले. दोघांनी मिळून अपराध केला असे (१५) ७.५ टक्के  बंदी, तिघांनी मिळून अपराध केला असे (१७) ८.५ टक्के बंदी, चार ते सहा लोकांनी मिळून अपराध केला असे (२५) १२.५ टक्के बंदी, सहा ते आठ बंद्यांनी मिळून अपराध केला असे (०९) ४.५ टक्के, आठ ते दहा बंद्यांनी मिळून अपराध केला असे (०३) १.५ टक्के, दहा ते बारा लोकांनी मिळून अपराध केला असे (०३) १.५ टक्के बंदी, बारा ते चौदा लोकांनी मिळून अपराध केला असे (०८) ४ टक्के तर अपराध केलाच नाही पण आपणावर खोटा आरोप ठेवून गुन्हा दाखल केला त्यातून आज शिक्षा भोगत आहे असे (३३) १६.५ टक्के बंदयांनी सांगितले.

वरील विवेचनावरुन एकट्याने अपराध करणाऱ्यांचे प्रमाण सर्वात अधिक जाणवते तर ४ ते १२ जणांनी मिळून संघटितपणे गुन्हा केला यांचे प्रमाण प्रत्येकी ३ असे अल्प आहे. ३३ बंदी सांगतात आम्ही अपराध केलाच नाही पण चुकीची शिक्षा भोगत आहोत. वरील विवेचनावरुन असे जाणवते की, गुन्हा घडण्या प्रसंगी त्या व्यक्तीवर अशी परिस्थिती निर्माण होते की, असे कृत्य केल्याशिवाय पर्याय असत नाही. त्यामुळे एकट्यानेच गुन्हा करणाऱ्या व्यक्तींचे प्रमाण अधिक आहे. एकटी व्यक्ती असे कृत्य करण्यास घाबरत नाही. कारण परिस्थितीच तशी असते असे जाणवते. जास्त लोक एकत्र येऊन नियोजनबध्द गुन्हा करणाऱ्यांचे प्रमाण कमी जाणवते. गुन्ह्यांचे प्रमाण कमी जाणवते.

**गुन्ह्यांतील लोकांचा सहभाग आलेख ५.२**



### ५.२.३ बंद्याने केलेल्या अपराधात कुटुंबातील व्यक्तींचा सहभाग

बंद्याने जो अपराध केला आहे त्यामध्ये त्याच्या कुटुंबातील सदस्यांचा सहभाग होता काय ? कारण नियमबाह्य वर्तन करीत असताना कुटुंबातील व्यक्ती सोबत असतील तर व्यक्तीच्या वर्तनात त्या सदस्यांचाही प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सहभाग असतो. जर कुटुंबीयांचा सहभाग नसेल तर व्यक्तीला मानसिक पाठबळ मिळत नाही. त्यामुळे व्यक्ती अपराधासारखे कृत्य करण्यास घाबरतात. आज घरगुती हिंसाचाराचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढत आहे. यात बऱ्याच वेळा कुटुंबातीलच व्यक्तींचा सहभाग असतो. त्यामुळे बंद्याने जो अपराध केला आहे त्यात कुटुंबातील व्यक्तीचा सहभाग होता काय आणि असेल तर कुटुंबातील कोणत्या व्यक्ती बंद्यांसोबत होत्या या माहितीसाठी संशोधकाने पुढील प्रश्नातून माहिती संकलित केली.

**तक्ता क्र ५.२.३**

**बंद्यांने केलेल्या अपराधात कुटुंबातील इतर कोणी सहभागी होते काय दर्शविणार तक्ता**

| अ.क्र. | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | होय | ८२ | ४१% |
| २. | नाही | ११८ | ५९% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

बंद्यांने केलेल्या अपराधात कूटुंबातील कोणती व्यक्ती सहभागी होती काय याचे विवेचन करणारी आहे. संशोधकाने अभ्यासलेल्या एकुण बंद्यांपैकी त्यांनी केलेल्या अपराधात कुटुंबातील व्यक्ती कोणी सहभागी होते काय असा प्रश्न केला असता (११८) ५९% बंद्यांनी  कोणतीच व्यक्ती सहभागी नव्हती, तर (८२)४१% बंद्यांनी सांगितले होय आम्ही केलेल्या अपराधात आपले कुटुंबातील सदस्यही सहभागी होते.

वरील विश्लेषणावरुन बंदयाने केलेल्या अपराधात कुटुंबातील कोणी सहभागी नव्हते यांचे प्रमाण सर्वात अधिक ५९% असून बंद्याने केलेल्या अपराधात कुटुंबातील व्यक्तींचा सहभाग होता असे सांगणाऱ्यांचे प्रमाण कमी ४१% जाणवले. कुटुंबात जेव्हा भांडणे होतात तेव्हा बऱ्याच वेळा इतर सदस्यही यामध्ये सहभागी असतात. कारण कौटुंबिक बाद हा सहसा पती, पत्नी, किंवा पती व इतर सदस्य यांच्यात होतो**.** अशा वेळी पतीबरोबर बऱ्याच वेळा इतर सदस्यांचाही सहभाग असतो. पण बऱ्याच बंद्यांनी अगोदर सांगितले होते की, आम्ही एकट्यानेच असे कृत्य केले. त्यामुळे कुटुंबातील व्यक्ती किंवा इतर व्यक्तींचा सहभाग कमी प्रमाणात जाणवतो. ज्या बंद्यांनी कुटुंबातील व्यक्तींचा सहभाग होता असे सांगितले. त्यांचे प्रमाण कमी जाणवले. ज्या बंद्यांच्या कृत्यात कुटुंबातील सदस्यांचा सहभाग होता. त्यात कोणत्या सदस्यांचा सहभाग होता हे या संदर्भात माहिती घेण्यासाठी संशोधकाने बंद्याला पुढील प्रश्न केला.

## ५.२.४ बंद्याने केलेल्या अपराधात कुटुंबातील कोणत्या व्यक्ती सहभागी होत्या ?

**तक्ता क्र.५.२.४**

**बंद्यांनी केलेल्या अपराधांत कुटुंबातील कोणते सदस्य सहभागी होते ते दर्शविणार तक्ता**

| अ.क्रं. | सहभाग | वारंवारिता |
|---|---|---|
| १. | आई | ०६ |
| २. | वडील | ०९ |
| ३. | आई व वडील | ०७ |
| ४. | भाऊ | २५ |
| ५. | बहीण | ०१ |
| ६. | आई, वडील, भाऊ | १० |
| ७. | वडील, भाऊ | ०४ |
| ८. | भाऊ व मुले | ०२ |
| ९. | नातेवाईक | ०३ |
| १०. | मुलगा | ०३ |
| ११. | पत्नी | ०३ |
| १२. | वडील व काका | ०४ |
| १३. | भाऊ व नातेवाईक | ०१ |
| १४. | मित्र | ०१ |
| १५. | मुलगा आणि पत्नी | ०१ |
| १६. | आई आणि भाऊ | ०२ |
| | **एकूण** | **८२** |

बद्याने केलेल्या अपराधात बंद्याबरोबर कुटुंबातील कोणत्या व्यक्ती सहभागी होत्या याचे विवेचन करणारी आहे. संशोधकाने अभ्यासलेल्या एकूण बंद्यांपैकी ८२ बंद्यांनी कुटुंबातील व्यक्ती सहभागी होत्या हे सांगितले. त्यात कुटुंबातील कोणत्या व्यक्ती सहभागी होत्या हे विचारले असता बंद्यांसोबत आई - ६ , वडील - ९ , आई आणि वडील एकत्रित मिळून ७, भाऊ २५, बहीण ०१, आई ,वडिल,भाऊ १०, वडील भाऊ ०४, भाऊ आणि मुले ०२, नातेवाईक ०३, मुलगा ०३, पत्नी ०३, वडील व काका ०४, भाऊ व नातेवाईक ०१, मित्र ०१, मुलगा व पत्नी ०१, आई आणि भाऊ ०२ असे बंद्यांनी सविस्तर सांगितले.वरिल विवेचनात भाऊ सोबत घेऊन अपराध करणाऱ्यांचे प्रमाण सर्वात अधिक आहे. वरील सर्व अपराधांतील सहभागी व्यक्ती पाहिल्या असता कौटुंबिक अपराधात सहभागी असणाऱ्या व्यक्तींचे प्रमाण अधिक होते. असे त्यांनी एकत्र येऊन अपराधाची कृती घडली असे सांगितले.

वरील विवेचनावरुण जाणवते की, बंद्याने केलेल्या अपराधात कुटुंबातिल आई, वडील भाऊ यांच्या सहभागाचे प्रमाण अधिक आहे. या सर्व सहभागावरुन लक्षात येते की, कौटुंबिक कलहातूनच त्यात कुटुंब सदस्यांचा सहभाग होता. कुटुंबातील असे एखादे कृत्य करण्यामागे कौटुंबीक वादच असतो मग अशा वेळी कुटुंबातील व्यक्ती एकत्र येऊन असे कृत्य करतात. यात कौटुंबिक वादातून घडणाऱ्या घटनांचे प्रमाण अधिक आहे असे जाणवते.

### ५.२.५ बंद्याने केलेल्या गुन्ह्यांचे कारण

गुन्हा ही सार्वत्रिक स्वरूपाची समस्या आहे. दिवसेंदिवस गुन्ह्यांच्या स्वरूपात वाढ होत आहे. गुन्ह्यासाठी अनेक कारणे कारणीभूत असतात. गुन्ह्याचा कारणविषयक अभिजात सिंध्दांत, पिशाच्च्यावादी सिध्दांत, भौगोलिक सिध्दांत, मनोवैज्ञानिक सिध्दांत, समतावादी सिध्दांत, रूपवादी सिध्दांत, समाजशास्त्रीय सिध्दांत असे सिध्दांत प्रसिध्द आहेत. अनेक विचारवंत, अभ्यासकांनी गुन्ह्यांच्या कारणविषयक सिध्दांताची मांडणी केलेली आहे. याचा सविस्तर आढावा स्वतंत्रपणे घेण्यात आला आहे.

गुन्हेगारीचे प्रमाण सर्वत्र वाढत आहे. पण गुन्ह्याचे स्वरूप आणि गुन्ह्याची कारणे मात्र देश कालपरत्वे वेगवेगळी आहेत. जगभरातील गुन्हेगारीचे एकच कारण सर्वत्र लागू पडत नाही. भारतीय संदर्भात गुन्ह्याचा अभ्यास करताना भारतातील गुन्ह्यांची कारणे वेगळी असलेली आपणास पाहावयास मिळतात. यात आर्थिक कारणे, कौटुंबिक कारणे, धार्मिक कारणे, राजकीय कारणे, जातीय कारणे, रुढी परंपरा, वाढती लोकसंख्या, भ्रष्ट प्रशासन व्यवस्था, व्यक्तिगत द्वेष अशी अनेक कारणे आपणास जाणवतात. भारतीय संदर्भात कारागृहांतील बंद्यांचा अभ्यास करत असताना बंद्यांनी जो गुन्हा केला आहे त्याचे नेमके कारण काय आहे याचा आढावा पुढीलप्रमाणे घेण्यात आला आहे.

**तक्ता क्र. ५.२.५**

**बद्यांनी जो गुन्हा केला तो करण्याचे कारण दर्शविणारा तक्ता**

| अ.क्रं. | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | आर्थिक कारण | २२ | ११% |
| २. | शेतीचा वाद | ३२ | १६% |
| ३. | इतरांच्या सांगण्यावरुन | ०२ | १% |
| ४. | गावात गुंडगिरी करणाऱ्यास | ०६ | ३% |
| ५. | कौटुंबिक कारण | ३७ | १८.५% |
| ६. | वासना प्रेम | १३ | ६.५% |
| ७. | भांडण / वाद | २४ | १२% |

| | | | |
|---|---|---|---|
| ८. | इच्छेविरुध्द लग्न | ०२ | ०१% |
| ९. | पत्नीसोबत वाद | २६ | १३% |
| १०. | गांजा अवैध वाहतूक | ०१ | ०.५% |
| ११. | राजकीय कारण | ११ | ५.५% |
| १२. | होळी सणात दगडफेक | ०१ | ०.५% |
| १३. | अनैतिक संबंध असा संशय | ०७ | ३.५% |
| १४. | सुनेचा खून | ०१ | ०.५% |
| १५. | मानसिक त्रास देत असल्याने | ०१ | ०.५% |
| १६. | चोरी | ०५ | २.५% |
| १७. | दरोडा | ०४ | २% |
| १८. | जातीय वादातून | ०२ | १% |
| १९. | धार्मिक वाद | ०१ | ०.५% |
| २०. | बनावट नोटा | ०१ | ०.५% |
| २१. | विनयभंग | ०१ | ०.५% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

कारागृहातील जे बंदी शिक्षा भोगत आहेत त्यांनी कोणत्या कारणांनी अपराधाचे वर्तन केले. त्यांनी केलेल्या अपराधाची काय कारणे, अपराधाचे स्वरूप काय हे समजण्यासाठी संशोधकाने वरील प्रश्नांच्या आधारे माहिती जाणून घेतली. अपराधाची आज संपूर्ण जगभर अनेक कारणे सांगितली जातात. अपराध्याच्या कारणांसंदर्भात विविध अपराध शास्त्रज्ञांनी अनेक सिध्दांत प्रसिध्द केले आहेत आजपर्यंत जे सिध्दांत प्रसिध्द केले आहेत त्यापैकी कोण कोणती कारणे आज या बंदयामध्ये दिसतात त्याचाच आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे. संशोधकाने कारागृहातील बंद्यांना वरील प्रश्न विचारले असता आर्थिक कारण म्हणजे पैशाच्या व्यवहारातून (२२) ११ टक्के अपराध घडल्याचे बंद्यांनी सांगितले. म्हणजे पैशाचा व्यवहार त्यामुळे अफरातफर  झाल्याने गुन्हा घडला असे बंदयांनी सांगितले. शेतीच्या वादातून (३२) १६ टक्के अपराध घडल्याचे बंद्यांनी सांगितले. इतरांच्या सांगण्यावरून (२) १ टक्के  अपराधाचे कृत्य आमच्या हातून घडले असे बंद्यांनी सांगितले.

गावांत गुंडगीरी  करणाऱ्याला मारले असे (०६) ३ टक्के बंद्यांनी सांगितले. गावातीलच काही लोक गुंडगिरी करत होते. त्यात त्यांनी गरीब स्त्रियांची अब्रू लुटने,काम करुन घेऊन पैसे न देणे,गरीब लोकांची लुबाडणूक करणे,त्यांचा अपमान करणे,गुंडगिरी करणे असे कृत्य करणाऱ्याला मारले. कारण एकाला मारल्यामुळे संपूर्ण गाव शांत राहणार होते. त्यामुळे असे कृत्य केल्याचा आजही पश्चात्ताप होत नाही तर अशा गुंडांना मारल्याचा आजही आम्हास गर्व वाटतो असे बंद्यांनी सांगितले.

कौटुंबिक भांडणातुन (३७) १८.५ टक्के अपराध घडल्याचे बद्याने सांगितले. कौटुंबिक भांडणे सर्व ठिकाणी असतात. पण आमचे कौटुंबिक भांडणे इतके विकोपाला गेले की अपराधासारखे कृत्य आमच्या हातुन सहजपणे घडून गेले. वासना, प्रेम म्हणजे लैगिंक गंरज भागवताना बलात्कारासारख्या अपराधात (१३) ६.५ टक्के बंदी शिक्षा भोगत आहेत. भांडण / वाद त्यातून अपराध होऊन (२४) १२ टक्के बंदी शिक्षा भोगत आहेत. भांडणाचे परिवर्तन पुढे मारामारीत होऊन पुढच्या व्यक्तीचा खून झाला असे बद्यांनी सांगितले. आपल्या इच्छेविरुध्द लग्न झाल्याने सांगितले. आपले लग्न आई, वडिलांनी मुलगी पसंत नसताना सुध्दा जबरदस्तीने केले याचा परिणाम पुढे वादात होऊन अपराधासारखी घटना  घडली. घरात पत्नीसोबत भांडण झाल्याने अपराध घडला असे (२६) १३ टक्के बंद्यांनी सांगितले. घरात पत्नीसोबत अनेक कारणांवरुन दररोज भांडणे होत पण त्यातून अपराधासारखे कृत्य झाल्याने आज याची शिक्षा भोगत आहे असे बंद्याने सांगितले.

गांजाची अवैध वाहतूक करणारा ड्रायव्हर पकडला गेला आणि अमली पदार्थाची ने आण करणे या कायद्याअंतर्गत एक बंदी ०.५ टक्के शिक्षा भोगत आहे. हा बंदी मुळात टॅव्हल्स गाडीवर ड्रायव्हर होता. त्याला ड्रायव्हरच्या पगाराव्यतिरिक्त हजारो रुपये या गांजाची वाहतूक केल्यावर मिळत असुन अनेक वेळा त्याच्या गाडीत गांजा असायचा. पण एक वेळ पकडलो. त्याची शिक्षा भोगत आहे असे बंद्याने सांगितले. त्याने सांगितले की गांज्याच्या वाहतुकीतून त्याला लाखो रुपये मिळाले होते असे त्याने त्या घटने संदर्भात सविस्तर विचारल्यावर विवेचन केले . राजकीय कारणावरुन भांडणाचे पर्यवसन पूढे अपराधासारख्या घटनेतून खून झाले असे (११) ५.५ टक्के बंद्यांनी सांगितले. गावात राजकीय कारणावरुन एकमेकांच्या पक्षाला मदत किंवा पराभव करण्यातून अपराधासारखी कृत्य झाले असे ११ बंद्यांनी सांगितले.आमच्या हातून राजकीय कारणाने अपराध घडला असे त्यांनी सांगितले.

बंजारा जातीमध्ये होळीच्या सणाला अनन्य साधारण महत्त्व असते. यामध्ये सर्व व्यक्ती दारू पिऊन होळीचा सण साजरा करतात. या होळीच्या सणात दारू पिऊन दोन गटात दगडफेक झाली आणि दुसऱ्या गटातील एक व्यक्ती मरण पावली त्याचा माझ्यावर गुन्हा होऊन आज मी शिक्षा भोगत आहे असे (०१) ०.५ टक्के  बंद्याने सांगितले. अनैतिक संबंध अशा संशयावरुन अपराधाचे कृत्य झाले असे (०७) ३.५ टक्के बंद्याने सांगितले. यामध्ये प्रामुख्याने पत्नीचे अनैतिक संबंध होते त्यामुळे आम्ही पत्नीला मारले असे बंद्यांने सांगितले. एका बंद्याने सांगितले मी लाईट फिटिंगचे काम करतो. आमचा संसार आगदी चांगला चालला हाता. पत्नीची आई पत्नीस हमेशा कान भरत असत, मुळात ती (सासू) व्यभीतोचारी होती. पत्नीचेही तिच्या नातेवाईकासोबत संबंध होते. आम्हाला एक मुलगाही होता. पत्नीच्या अनैतिक संबंधांची

माहिती मला मिळाली. पत्नीला मी बऱ्याच वेळा समजावून सांगितले पण ती तिच्या आईच्या मदतीने संबंध ठेवत असत. त्यामुळे मला राग सहन झाला नाही. त्यामुळे मी पत्नीला मारले असे एका बंद्यांने आपली हदयस्पर्शी कहाणी सांगितली. आता मुलगा एका आश्रमात शिक्षण घेतो पण सासू आजही त्याच्याकडे जा ये करते त्याचा राग मला आजही येतो. असे त्या बंद्याने सांगितले. सुनेच्या खुनामुळे आपणास शिक्षा झाली असे (०१) ०.५ टक्के बंद्याने सांगितले. मुलाचे सुनेसोबत हमेशा वाद होत होते. त्यामुळे सुनेने आत्महत्या केली पण तिच्या नातेवाईकांनी आम्ही मारली असा आरोप आमच्यावर ठेवला त्यामुळे सुनेला मारले म्हणून आज मी शिक्षा भोगत आहे. मानसिक त्रास देत असल्याने पुढील व्यक्तीचा खून झाला असे (०१)०.५% बंद्याने सांगितले. मला पुढची व्यक्ती हमेशा मानसिक त्रास देत होती त्यामुळे मला राग सहन झाला नाही त्यातून खून झाला.

चोरी केल्याच्च्यामुळे पकडले जाऊन (०५) २.५टक्के बंदी शिक्षा भोगत आहेत. चोरी करताना आम्ही अनैतिक कृत्यही केले. तसेच जबर दुखापतही केल्यां कारण चोरी करताना घरातील व्यक्ती जागी झाल्यावर बऱ्याच वेळा त्यांना मारावे लागले असे बंद्यांनी सांगितले. दरोडा कलमाअंतर्गत (०४)२% बंदी शिक्षा भोगत आहेत. यात प्रामुख्याने बीड जिल्ह्यातील आष्टी गाव ता. आष्टी येथील पारध्यांनी कोठेवाडी येथे दरोडा १२ लोकांनी टाकला होता. या दरोडयात या दरोडेखोरांनी स्त्रियांसोबत अतिशय घृणास्पद असे कृत्य केले. त्यांचे लैगिंक शोषण केले आणि काही लोकांची अमानुष हत्याही केलीं. हे प्रकरण संपूर्ण महाराष्ट्रभर गाजले. कोठेवाडीवर दरोडा २००१ मध्ये घडला होता. एकूण १२ जणींपैकी ४ लोकांवर मोक्का लावला गेला असे सांगितले. जातीय वादातून खून झाला असे (२) १ टक्के बंद्यांनी सांगितले. धार्मिक वादातून अपराध घडल्याचे (०१) ०.५ टक्के बंद्याने सांगितले. स्त्रीचा विनयभंग केल्याबददल (०१) ०.५ टक्के बंदी शिक्षा भोगत आहे. बनावट नोटा प्रकरणी (०१) ०.५ टक्के बंदी शिक्षा भोगत आहे. या बंद्याने बनावट नोटांचा प्रत्यक्ष व्यवहारात वापर करण्यासाठी वापर केला होता. त्यामुळे त्याला शिक्षा झाली असे या बंद्याने सांगितले.

वरील सारणीचे विवेचन पाहता कोणत्याच एकाच कारणासाठी अपराध घडला असे निश्चितपणे सांगता येत नाही. कारण वरील विवेचन पाहता २१ कारणांसाठी वेगवेगळ्या अपराद्याखाली बंदी शिक्षा भोगत आहेत असे जाणवते. कौटूंबिक वादातून सर्वात अधिक बंदी शिक्षा भोगत आहेत. तर अनुक्रमे शेतीचा वाद १६ टक्के,आर्थिक कारण ११ टक्के , पत्नीसोबत वाद १३ टक्के असे प्रमाण आढळते. म्हणजेच अपराधासाठी वरील विवेचनावरुन बहुकारणवादी सिध्दांतच लागू पडतो. असे जाणवते. अपराधाच्या विविध सिध्दातांपैकी आर्थिक कारण हे प्रभावीपणे जाणवले तसेच कौटुंबिक कारण यात

पत्नीसोबत वाद यातून घडणाऱ्या घटनांचे प्रमाणे अधिक असून इतरही गुन्हे थोड्या फार प्रमाणात घडतात असे दिसते. वरील विवेचावरुन अपराधाच्या कारणांचा सविस्तर आढावा घेता येतो.

### ५.२.६ बंद्याला झालेली शिक्षा

गुन्हा, गुन्हेगार या बरोबरच शिक्षेचाही उगम झाला. गुन्हा हा प्राचीन काळापासून आजच्या आधूनिक समाजापर्यंत आला आहे. तसेच शिक्षाही प्राचीन काळापासून अस्तित्वात होती आणि आहे. गुन्ह्याचे स्वरूप जसे स्थल, कालपरत्वे बदलत असते तसेच शिक्षेचे स्वरूपही बदलत असते. शारीरिक शिक्षा, आर्थिक शिक्षा, हद्दपार, एकांतवास, कारावास, फाशी अशा विविध प्रकारच्या शिक्षा दिल्या जात होत्या. आज शिक्षा व्यवस्थेमध्ये सुधारणावादी दृष्टिकोन आल्याने फाशी, एकांतवास, हद्दपार अशा शिक्षा खूप कमी प्रमाणात दिल्या जातात. आज कारावासाची शिक्षा मोठ्या प्रमाणात दिली जाते. व्यक्तीला त्याच्या कुटुंबीयांपासून दूर ठेवणे, त्याच्या प्रिय व्यक्तीपासून काही काळ दूर ठेवणे हीच मोठी शिक्षा मानली जाते. कारागृहात आज मानवतावादी दृष्टिकोनातून बंद्यांसोबत वर्तन केली जाते. शिक्षा ही बंद्याने केलेल्या गुन्ह्याचे वर्तन, त्या वर्तनाची तीव्रता, त्यातून झालेले नुकसान, त्या वर्तनाचा उद्देश या सर्व गोष्टींचा आढावा घेऊन विशिष्ट कालावधीसाठी बंद्याला कारागृहात पाठवले जाते. कारागृहात शिक्षा भोगणाऱ्या बंद्यांना किती वर्षांची शिक्षा झाली त्याची माहिती पुढीलप्रमाणे मिळाली.

**तक्ता क्र.५.२.६**

**बंद्याने केलेल्या गुन्ह्यात बंद्यांला किती वर्षांची शिक्षा झाली ते दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | जन्मठेप (१४ वर्षे) | १४५ | ७२.५ % |
| २. | ६ महिने ते १ वर्षे | ०४ | २ % |
| ३. | १ ते २ वर्षे | ०४ | २.० % |
| ४. | ३ ते ४ वर्षे | ०१ | ०.५ % |
| ५. | ४ ते ५ वर्षे | ०५ | २.५ % |
| ६. | ५ ते ७ वर्षे | ०८ | ४ % |
| ७. | ७ ते १० वर्षे | १८ | ९ % |
| ८. | १० ते १४ वर्षे | ११ | ५.५ % |
| ९. | २० ते २३ वर्षे | ०३ | १.५ % |
| १०. | एकत्रित ५२ वर्षे | ०१ | ०.५ % |
| | **एकूण** | **२००** | **१०० %** |

कारागृहातील बंदी जे शिक्षा भोगत आहेत त्यांना किती वर्षांची शिक्षा झाली याचे विवेचन करणारी आहे. संशोधकाने अभ्यास केलेल्या एकूण बंद्यापैकी जन्मठेपेची शिक्षा १४ वर्षे झालेल्यांचे प्रमाण १४५ (७२.५%) असून ६ महिने ते एक वर्षाची शिक्षा झालेले (४) २% बंदी आहेत. तर एक ते दोन वर्षाची शिक्षा झालेले बंद्यांचे प्रमाण (०४) २% असून ३ ते ४ वर्षाची शिक्षा झालेल्या बंद्यांचे प्रमाण (०१) ०.५% असून ४ ते ५ वर्षाची शिक्षा झालेल्या बंद्यांचे प्रमाण (०५) २.५% आहे, ५ ते ७ वर्षांची शिक्षा झालेल्या बद्यांचे प्रमाण (८) ४% असुन, ७ ते १० वर्षांची शिक्षा झालेल्या बंद्यांचे प्रमाण (१८) ९% आहे, १० ते १४ वर्षांची शिक्षा झालेल्या बंद्यांचे प्रमाण (११) ५.५ % आहे तर २० ते २३ वर्षांची शिक्षा झालेल्या बंद्यांचे प्रमाण (०३) १.५% असून अनेक अपराधांमध्ये एकत्रितपणे ५२ वर्षे शिक्षा झालेला एक बंदी शिक्षा भोगत आहे.

वरील विवेचनावरुन असे निदर्शनास येते की जन्मठेपेची शिक्षा झालेल्यांचे प्रमाण सर्वात अधिक ७५.५ % असून , २० ते २३ वर्षाची शिक्षा झालेल्या बद्यांचे प्रमाण १.५ अनुक्रमे असून , ६ महिने ते २ वर्षांची शिक्षा झालेल्या बंद्यांचे प्रमाण २% असून सर्वात कमी एकत्रीत ५२ वर्षे शिक्षा झालेला बंद्यांचे प्रमाण ०.५% असे आहे. कारागृह हे गुन्हेगारांना सुधारण्याचे कार्य करत असतांना कारागृहात येणारे बंदी हे जन्मठेप या शिक्षेखाली अधिक प्रमाणात आहेत. जन्मठेप ही शिक्षा खून व तत्सम गुन्ह्यासाठी न्यायालय देते. अशा बंद्यांचे प्रमाण कारागृहात अधिक जाणवते. पण या सर्व बंद्यांची पूर्व पार्श्वभूमी ही गुन्हेगारी स्वरूपाची नाही असे जाणवते. बंदी जन्मठेपेची शिक्षा भोगत असताना त्याचा विपरित परिणाम तो स्वतः आणि त्याच्या कुटूंबियांवर मोठ्या प्रमाणात पडत असतो. चौदा वर्षे आपण तुरुंगात राहणार या संबधीची त्यांची मानसिकता झालेली असते. एकंदरीत कारागृहात जन्मठेपेची शिक्षा भोगणाऱ्या बंद्यांचे प्रमाण अधिक आहे.

### ५.२.७ बंद्याने खरोखरच गुन्हा केला काय ?

एखाद्या व्यक्तीने कायदाबाह्य वर्तन केले तर त्याला विशिष्ट कालावधीची शिक्षा कारागृहात भोगावी लागते. कारागृहात शिक्षा भोगत असलेला बंदी त्याने गुन्हा केला हे न्यायालयात सिध्द झाल्यानेच न्यायालयाने अशा व्यक्तींना विशिष्ट काळासाठी कारावासाची शिक्षा दिली. न्यायालयाने जरी या व्यक्तींना शिक्षा दिली तरी या व्यक्तीने खरोखरच अशा पध्दतीचे कृत्य केले काय ? किंवा त्याच्या हातून न कळत घडले किंवा त्यांने असे कृत्य न करताच अशा गुन्ह्यात त्याचे नाव गोवण्यात आले ज्यामुळे तो आज शिक्षा भोगत आहे. व्यक्तीने खरोखरच असे कृत्य मुद्दाम, जाणून बुजून केले तर त्याला शिक्षा झालीच पाहिजे. पण अशा बऱ्याच घटनेत त्या घटनेशी काहीही संबंध नसतांना इतर राग मनात धरून काही व्यक्तींना अशा गुन्ह्यात मुद्दाम हेतूपुरस्सरपणे गोवले जाते. न्यायालयीन प्रक्रियेत या व्यक्ती स्वतःला निर्दोष सिध्द करू

शकत नाहीत. त्यामुळे हे गुन्हेगार म्हणून न्यायालय विशिष्ट कालावधीची शिक्षा देते. पण अशा प्रकारचे प्रमाण अतिशय नगण्य असते. बंद्याने जे अपराधाचे कृत्य केले ते खरोखरच केले काय हा प्रश्न बंद्याला विश्वासात घेऊन संशोधकाने केला. या प्रश्नाचे उत्तर देत असताना बंद्याचा चेहरा ते खरे खोटे सांगतात. याचे निरीक्षण संशोधकाने केले . बंद्याने खरच आम्ही असे गुन्ह्याचे कृत्य मुद्दाम केले असे सांगतांना त्यांना संकोच वाटत नव्हता. पण काही बंदी अतिशय भाविक होऊन आम्ही असे कृत्य केले नाही तरी परंतु आमच्या विरोधकांनी आम्हाला मुद्दाम यामध्ये गुंतवले आहे. आम्ही चुकीची शिक्षा भोगत आहोत असे दु:खी होऊन ते सांगत होते.

**तक्ता क्र.५.२.७**

**बंद्यांनी खरोखरच गुन्हा केला काय ? हे दर्शविणारा तक्ता**

| अ.क्रं. | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | होय | १५४ | ७७ % |
| २. | नाही | ३३ | १६.५ % |
| ३. | नकळत हातून घडला | १३ | ६.५ % |
| | **एकूण** | **२००** | **१०० %** |

बंद्यांनी खरोखरच गुन्हा केला काय याचे विश्लेषण करणारी आहे. संशोधकाने ज्यांना शिक्षा झाली आहे अशा बंद्यांची माहिती घेतली त्यात बंद्यांनी खरोखरच गुन्हा केला काय हा अतिशय महत्त्वपुर्ण प्रश्नातून महत्त्वाची माहिती संकलित करण्याचा प्रयत्न केला. हा प्रश्न बंद्यांना अतिशय विश्वासात घेऊन विचारला असता वरील प्रकारची माहिती मिळाली. संशोधकाने अभ्यासलेल्या बंद्यांपैकी (१५४) ७७% बंद्यांनी होय आम्ही गुन्हा केला आहे असे सांगितले. म्हणजे गुन्हा केल्याचे कबूल केले तर (३३) १६.५% बंद्यांनी आम्ही गुन्हा केला नाही असे सांगितले. ते सांगतात आम्ही प्रत्यक्ष अपराध केला नसुन आमची नावे अपराधात द्वेष भावनेतून मद्दाम गोवली गेली. आता आम्ही चुकीची शिक्षा भोगत आहोत असे ३३ बंद्यांनी सांगितले तर (१३) ६.५% बंद्यांनी आमच्या हातून न कळत गुन्हा घडला असे सांगितले. आमचा उद्देश अपराध करण्याचा मुळीच नव्हता पण ती परिस्थितीच अशी बनली की नकळतपणे आमच्या हातून अपराधाचे कृत्य झाल्याचे १३ बंद्यांनी कबुल केले.

वरील विवेचनावरुन खरोखरच अपराध केला असल्याचे बहुसंख्य बंद्यांनी कबूल केले. यांचे प्रमाण सर्वात अधिक असून नकळत गुन्हा घडला असे सांगणाऱ्यांचे प्रमाण सर्वात कमी आहे. यावरून आपणास असे जाणवते की, व्यक्ती एखादे कायदाबाह्य वर्तन करुनसुध्दा मी केलो नाही असे म्हणण्या पेक्षा

मी असे कृत्य केल्याची कबुली बंदी देतात म्हणजे बंद्यांमध्ये प्रामाणिकता आहे असे जाणवते. बऱ्याच वेळी दैनंदिन जीवनात असे गैरवर्तन करणाऱ्या व्यक्ती आपण असे कृत्य केलेच नाही असे सांगतात किंवा ते लपवण्याचा तरी प्रयत्न करतात. पण प्रत्यक्षात शिक्षा भोगणारे बंदी मात्र त्यांची कबुली अगदी सहजपणे देतात. आमच्या हातून न कळत घडले म्हणजे आम्हाला असे कृत्य करायचे नव्हते अशी कबुलीही दिल्याने त्यांच्यातील प्रामाणिकपणा आजही कायम आहे असे जाणवते.

### ५.२.८ गुन्हा घडल्याने चूक झाली अशी भावना :-

व्यक्ती जीवन जगताना चांगले आणि वाईट असे अनेक प्रसंग येतात. बऱ्याच वेळा व्यक्ती एखादी वाईट कृती करते पण ती घटना घडल्यानंतर त्या व्यक्तीला पश्चात्ताप होतो. आपण असे वर्तन करायला नको होते. पण तोपर्यंत घटना घडुन गेलेली असते. व्यक्ती घटना, प्रसंग घडण्यापुर्वी विचार करुन वर्तन करण्याचा प्रयत्न करते. बऱ्याच वेळी त्याने रागाच्या भरात स्वतःवरील मानसिक आणि शारीरिक संतुलन सुटते आणि त्याच्या हातून गुन्ह्याची कृती घडते. ज्या व्यक्तीला अशा आपल्या वर्तनाचा पश्चात्ताप होतो. त्या व्यक्तीची गुन्हेगारी स्वरूपाची पार्श्वभूमी असत नाही. पण जे सराईत गुन्हेगार असतात त्यांना अशा गुन्हेगारी वर्तनाचे वाईट तर वाटतच नाही. उलट त्याच्यावर त्यांचा उदरनिर्वाह चालत असतो. कारागृहात शिक्षा भोगणाऱ्या बंद्यांना त्यांनी केलेल्या कृत्यांवर आता पश्चात्ताप होतो काय याची माहिती संशोधकाने घेण्याचा प्रयत्न केला. कारागृहात आल्याने आपले कुटुंबीय नातेवाईक, मित्र यांच्यापासून दूर रहिल्याने एकटेपणाची भावना निर्माण होते. गुन्ह्याचे कृत्य करताना आपणास याची जाणीव झाली नाही पण आज मात्र याचा पश्चात्ताप होत आहे काय या संदर्भात पुढील माहिती मिळाली.

**तक्ता क्र.५.२.८**

**बंद्यांच्या हातून गुन्हा झाल्याने चूक झाली असे वाटते काय हे दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | होय | १४६ | ७३ % |
| २. | नाही | ४६ | २३ % |
| ३. | गुन्हा केलाच नाही | ०८ | ४ % |
| | **एकूण** | **२००** | **१०० %** |

बंद्यांने जो अपराध केला आहे त्याबाबत त्याला चूक झाली किंवा त्या कृत्या संदर्भात पश्चात्ताप होतो. काय या उद्देशाने माहिती संकलित केली असता संशोधकाने अभ्यासलेल्या एकूण बंद्यापैकी (१४६) ७३ % बंद्यांनी होय आमच्या हातून चूक झाली असे कबुल केले तर (४६) २३% बंद्यांनी नाही जे घडले ते आम्हास चुकीचे वाटत नसून ते योग्यच होते असे सांगितले. कारण दुसऱ्यावर अन्याय करणाऱ्याला मारणे हे चुकीचे वाटत नाही तर त्यांच्यापासून होणारा बहुसंख्य लोकांना त्रास आज होत नाही. त्यामुळे आपण जे केले ते चुकीचे अजीबात वाटत नाही असे सांगितले तर (०८) ४% बद्यांनी अपराध केलाच नाही तर चूक झाली किंवा नाही म्हणण्याचा प्रश्नच येत नाही असे सांगितले.

वरिल विवेचनावरुन बहुसंख्य बंद्यांनी जे कृत्य झाले त्याचा आज पश्चात्ताप होतो. जी घटना घडली ती चुकीची घडली जर ती घडली नसती तर आज कारागृहात बंदिस्त जीवन जगत आहोत ती वेळ आली नसती. तसेच आज आपल्या कुटुंबाची,मुलांची,आईवडिलांची वाताहत झाली नसती असे पश्चात्तापाचा सूर बहुसंख्य बंद्यांनी सांगितला तर गुन्हा केलाच नाही असे सांगणाऱ्यांचे प्रमाण सर्वात कमी म्हणजे आहे.

### ५.२.९ गुन्ह्याचे वर्तन करावे वाटले काय :-

व्यक्ती समाजात जीवन जगत असताना आपल्या गरजा भागवण्यासाठी इतरांचे सहकार्य घेते. व्यक्ती आपल्या सुखासाठी इतरांना  दुःख पोहचले तरी चालेल या भुमीकेतून वर्तन करतात. अशा प्रसंगी आपण जे वर्तन करत आहोत ते नियमबाह्य आहे याची कल्पना असूनसुध्दा असे नियमबाह्य वर्तन व्यक्तीच्या हातून घडते. पण जर गुन्हा करण्याची परिस्थिती तशी निर्माण झाली तर होणाऱ्या परिणामांची तमा व्यक्ती बाळगत नाही. यावरुन बंद्यांने मुद्दाम जाणून बुजून वर्तन केले आहे काय किंवा न कळत घडले याची कल्पना आपणास येऊ शकते.

**तक्ता क्र ५.२.९**

**गुन्हा घडला तेव्हा बंद्याला गुन्हा करावा असे वाटले का ते दर्शविणारा तक्ता**

| अ.क्रं. | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | होय | १३५ | ६७.५ % |
| २. | नाही | २२ | ११ % |
| ३. | नकळत घडला | १० | ५ % |
| ४. | गुन्हा केलाच नाही | ३३ | १६.५ % |
| | **एकूण** | **२००** | **१०० %** |

बंद्यांना ज्यावेळी गुन्हा घडला त्या वेळी गुन्हा करावा असे वाटले का ? कारण बऱ्याच वेळा व्यक्तीला एखादे कृत्य करत असताना ती कृती करण्याचे धाडस त्यांच्यात होत नाही. गुन्ह्यासाठी परिस्थिती जरी निर्माण झाली तरीसुध्दा व्यक्तीला असे अपराधाचे कृत्य करावे असे वाटले का असे संशोधकाने बंद्यांना विचारले असता (१३५) ६७.५% बंद्यांनी होय गुन्हा घडला तेव्हा करावा वाटला. कारण परिस्थितीच तशा पध्दतीची निर्माण झाली होती तर (२२) ११% बंद्यांनी नाही गुन्हा करावा असे वाटत नव्हते, तर (१०) ५% बंद्यांनी नकळत गुन्हा घडला असे सांगितले, तर (३३) १६.५% बद्यांनी अपराध केलाच नाही असे सांगितले.

वरील विश्लेषणावरुन आपणास जाणवते की, गुन्ह्याचे वर्तन मुद्दाम, जाणून बुजून करणाऱ्यांचे प्रमाण अधिक आहे. व्यक्ती वर्तन करताना ते वर्तन नियमबाह्य आहे किंवा नाही याची शहानिशा करत नाही म्हणजे बहुसंख्य व्यक्ती आज कायद्याचे उल्लंघन करतात. त्यात त्यांना काहीच गैर वाटत नाही. आज समाजात ही प्रवृत्ती वाढत असलेली आपणास दिसून येते. स्वार्थी मानवी प्रवृत्ती अशा गुन्ह्याच्या कृत्यांना जन्म देते ही प्रवृत्ती वरचेवर वाढत आहे हे गुन्ह्याच्या वाढत्या प्रमाणावरुन आपणास जाणवते.

### ५.२.१० गुन्ह्याच्या प्रसंगा वेळी बंद्याने केलेले व्यसन

व्यक्तीला अनेक व्यसने असतात. व्यक्ती अनेक कारणांनी व्यसने करतात. दारू, सिगारेट, तंबाखू, बिडी, चरस, गांजा आदी सेवनाचे व्यक्तीवर होणारे शारीरिक व मानसिक परिणाम दिसून येतात. वरील व्यसनांचे प्रमाण वाढले तर व्यक्तीचे मानसिक संतुलन बिघडून आपण काय करत आहोत याचे भानही असत नाही. आज गुन्ह्याच्या जेवढ्या काही घटना घडतात त्यातील बहुसंख्य गुन्हेगार गुन्हा करताना व्यसन केलेले आढळतात. यांच्या कारणांचा शोध घेतला असता असे कृत्य करण्यासाठी मानसिकता सामान्य स्वरूपात नसली तर व्यक्ती असे कृत्य सहज पध्दतीने करते. बलात्कार, खून, चोरी, दरोडा, लूटमार इत्यादी गुन्हे करताना व्यक्ती कोणते तरी व्यसन करुनच करते. व्यसन करणे हा व्यक्तीच्या जीवनाचा भागच बनल्याचे दिसून येते. बालकांपासून वृध्दांपर्यंत वेगवेगळी व्यसने करणाऱ्यांचे प्रमाण वरचेवर वाढत आहे. त्यामुळे बंद्यांने गुन्ह्याचे कृत्य करताना व्यसन केले होते काय आणि केले असेल तर कोणते व्यसन केले होते याची माहिती पुढील प्रश्नातून मिळाली.

**तक्ता क्र.५.२. १०**

**बंद्यांच्या हातून गुन्हा घडला तेव्हा बंद्याने व्यसन केले होते काय हे दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | होय | ३६ | १८ % |
| २. | नाही | १६४ | ८२ % |
| | **एकूण** | **२००** | **१०० %** |

बंद्यांने ज्यावेळी गुन्हयाचे कृत्य केले त्यावेळी व्यसन केले होते काय याचे विवेचन करण्यात आले आहे. अपराधाच्या कारणांत व्यसन हे सुध्दा एक कारण असून व्यसनाच्या आहारी जाऊन किंवा एखादे विधायक कृत्य करत असताना नशा येणाऱ्या पदार्थाचे सेवन बऱ्याच वेळा केले जाते. त्यामुळे संशोधकाने बंद्यांनी अपराधाचे कृत्य करताना व्यसन केले होते काय असा प्रश्न केला असता (३६) १८% बंद्यांनी अपरारधाचे कृत्य करताना व्यसन केले होते असे सांगितले, तर (१६४) ८२% बंद्यांनी व्यसन केले नव्हते असे सांगितले. म्हणजेच कोणतेच व्यसन न करता सर्वात जास्त बंद्यांनी अपराधाचे कृत्य केले होते तर व्यसन करूण ज्यांनी अपराध केला आहे त्यांचे प्रमाण सर्वात कमी होते.

### ५.२.११ गुन्ह्याप्रसंगी कोणते व्यसन केले होते ?

**तक्ता क्र. ५.२. ११ गुन्हा घडताना बंद्याने कोणते व्यसन केले होते ते दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | विवरण | वारंवारिता |
|---|---|---|
| १. | तंबाखु | ०६ |
| २. | सिगारेट | ०२ |
| ३. | दारू | २१ |
| ४. | बिडी | ०२ |
| ५. | दारू + सिगारेट | ०२ |
| ६. | गांजा | ०२ |
| ७. | गुंगीच्या गोळ्या | ०१ |
| | **एकूण** | **३६** |

वरील सारणीवरुन बंद्यांनी अपराधाचे कृत्य करीत असतांना व्यसन केले होते. त्यांनी कोणत्या प्रकारचे व्यसन केले होते याची माहिती संकलित केली असता एकूण ३६ बंद्यांनी अपराधाचे कृत्य करत असतांना व्यसन केले होते असे सांगितले.त्यात तंबाखू ०६, दारू २१, विडी ०२, सिगारेट ०२, दारू आणि सिगारेट ०२, गांजा ०२, गोळ्या ०१, असे व्यसन केले होते असे बंद्यांनी संशोधकाला सांगितले. दारू पिऊन

अपराध करणाऱ्यांचे प्रमाण सर्वात अधिक तर नशा येणाऱ्या गोळ्या घेऊन अपराध करणाऱ्या बंद्यांचे प्रमाण सर्वात कमी असल्याचे जाणवते.

### ५.२.१२ शिक्षा संपल्यावर घरी जाऊन करणारे काम

बंदी गुन्ह्याची शिक्षा कारागृहात भोगत असतांना त्याचा परिणाम त्याच्या स्वतःवर, कुटुंबावर, मुलांवर वाईट पध्दतीचा होतो. त्याचे काम, धंदा, नौकरी, बंद पडते. त्यामुळे कुटुंबाच्या उदनिर्वाहाचा प्रश्न निर्माण होतो. कुटुंबाकडे समाजाचा पाहण्याचा दृष्टिकोण बदलतो. या सर्व गोष्टींचा विपरीत परिणाम बंद्यांच्या मानसिकतेवर पडत असतो. त्याला कारागृहात अनेक प्रश्न सतावत असतात. शिक्षा संपून घरी गेल्यावर कुटुंब, समाज आपला स्वीकार करील काय ? आपली गेलेली नौकरी मिळेल काय, आपणास काम मिळेल काय, कारण पूर्वी जे काम करत होतो तेच पुन्हा मिळेल असे नाही. त्यामुळे बंद्यांमध्ये मानसिक बदल करण्यासाठी त्याने हमेशा चिंता करू नये. यासाठी त्याला काम देऊन चिंतेपासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला जातो. अनेक विविध उपक्रमांच्या माध्यमातून त्याच्यामध्ये सुधारणा करण्यासाठी कारागृह प्रशासन प्रयत्न करत असते. बंदी शिक्षा संपवून घरी जाऊन काय काम, व्यवसाय करणार यासंदर्भात त्यांची मानसिकता काय आहे याचा शोध घेण्याचा प्रयत्न संशोधकाने केला.

**तक्ता क्र. ५.२.१२**

**बंदी शिक्षा संपून घरी गेल्यावर काय करणार हे दर्शविणारा तक्ता**

| अ.क्रं. | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | शेती | ७५ | ३७.५ % |
| २. | व्यवसाय | ४८ | २४ % |
| ३. | व्यापार | ०२ | १ % |
| ४. | गुन्हे (खून) | ०३ | १.५ % |
| ५. | मजुरी | ३२ | १६ % |
| ६. | काम | १८ | ९ % |
| ७. | आराम | ०८ | ४ % |
| ८. | ड्रायव्हर | १० | ५ % |
| ९. | नोकरी | ०४ | २ % |
| | **एकूण** | **२००** | **१०० %** |

बंदी शिक्षा संपून घरी गेल्यावर काय करणार या संबंधी माहिती घेतली तिचे वर्णन करणारी आहे. कारण कारागृहात शिक्षा भोगल्याने समाजाचा पाहण्याचा दृष्टिकोन नकारात्मक असतो, कारागृहात शिक्षा भोगत असताना बऱ्याच वेळा इतर सराईत गुन्हेगारांच्या संपर्कात येऊन बाहेर आल्यावर अतिशय सराईतपणे गुन्हे करुन कारागृहात बंद्यांचे योग्य पध्दतीचे पुनर्वसन केले जात नाही. त्यांना प्रशिक्षण दिले जात नाही असे सांगितले जाते. वरील सर्व प्रश्नांचे उत्तर शोधण्यासाठी संशोधेकाने वरील प्रश्नाच्या साहाय्याने माहिती संकलित करण्याचा प्रयत्न केला. संशोधकाने अभ्यासलेल्या एकूण बंद्यांपैकी (७५) ३७.५ टक्के बंदी शेती करणार, (४८) २४ टक्के बंदी व्यापार करणार (०२) १ टक्के, (३) १.५ टक्के गुन्हे किंवा खुन करणार, (३२) १६ टक्के बंदी मजुरी करणार, (१८) ९ टक्के, बंदी काम करणार, (८) ४ टक्के बंदी वय झाल्यामुळे आराम करणार, (१०) ५ टक्के बंदी ड्रायव्हरचे काम करणार, (४) २ टक्के बंदी नोकरी करणार असे सांगितले.

वरील विश्लेषणावरुन शिक्षा संपल्यावर बाहेर आल्यावर उदरनिर्वाहासाठी शेती करणाऱ्या बंद्यांचे प्रमाण अधिक असून व्यापार करतो असे सांगणाऱ्यांचे प्रमाण सर्वात कमी आढळले. म्हणजेच भारतात शेती करणाऱ्यांचे प्रमाण अधिक आहे. भारत हा कृषिप्रधान देश असल्याने बहुसंख्य भारतीयांचा शेती हा व्यवसाय आहे. शेती आणि शेतीशी निगडित जोड व्यवसाय यातून उदरनिर्वाह करणाऱ्यांचे प्रमाण सर्वाधिक आहे. पण भारतीय शेती ही बहुसंख्य प्रमाणात मौसमी पावसावर आवलंबून आहे. पाऊस वेळेवर पडत नसल्याने शेतीत उत्पन्न होत नाही. परिणामी उदरनिर्वाह करण्यासाठी शेतकऱ्यांना इतर कामधंदा लागतात. भारताने आज खासगीकरण, उदारीकरण, आणि जागतिकीकरण धोरणाचा स्वीकार करुन उद्योगधंद्यांचा विकास होत असला तरी बहुसंख्य भारतीयांची मानसिकता शेती करण्यावर अधिक आहे. निसर्गाने शेतकऱ्यास साथ दिली नाही तरी शेतीवरील प्रेम कमी होत नाही. त्यामुळे बहुसंख्य बंदी बाहेर आल्यावर शेती करतो असे म्हणतात.

### ५.२.१३ कुटुंब, समाज- बंद्यांचा स्वीकार

बंद्यांला शिक्षा झाल्याने त्याचे कुटुंब आणि समाज यांचा त्याच्याकडे पाहण्याचा नकारात्मक दृष्टिकोन निर्माण होतो. बंद्याने जो गुन्हा केला ते वर्तन कुटुंब आणि समाजातील व्यक्तीला माहिती असेल, त्याची पार्श्वीभूमी माहीत असेल यावरुन बंद्यांबद्दलची भावना चांगली आणि वाईट अशा स्वरूपाची असू शकते. सराईत पध्दतीने गुन्हे करणारी व्यक्ती असेल तर समाज त्या व्यक्तीला गुन्हेगार म्हणूनच द्वेषाच्या भावनेतून बघत असतो. कुटुंबातील मात्र रक्तसंबंधीत असल्याने व्यक्तीचा द्वेष करत नाहीत. शिक्षा संपून घरी आल्यावर कुटुंब व समाजातील व्यक्ती आपल्यासोबत कशा वागतात यावरुन आपल्या बद्दलची

मानसिकता कळत असते. जर बंद्याला शिक्षा संपून घरी आल्यावर कुटुंब व समाजातील व्यक्ती पूर्वीसारखेच संबंध ठेवत असतील तर त्यांनी स्वीकार केला आणि हे संबंध ठेवण्यास घाबरत असतील किंवा पूर्वीसारखे ठेवत नसतील तर अप्रत्यक्ष ते आपल्याला स्वीकारलेले नाहीत असा निष्कर्ष निघतो. बंद्यांची या संदर्भात काय प्रतिक्रिया आहे. या भूमिकेतूनच संशोधकाने माहिती मिळवली.

**तक्ता क्र. ५.२.१३**

**बंद्यांची शिक्षा संपल्यानंतर कुटुंब / समाज बंद्यांचा स्वीकार करेल काय हे दर्शविणारा तक्ता**

| अ.क्रं. | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | होय | १८४ | ९२ % |
| २. | नाही | ०६ | ३ % |
| ३. | माहीत नाही | १० | ५ % |
| | **एकूण** | **२००** | **१०० %** |

कारागृहातील बंदी आपली शिक्षा पूर्ण करुन आपल्या कुटुंबात / समाजात वापस आल्यावर कुटुंब /समाज त्यांचा स्वीकार करेल काय? या संदर्भातील माहिती संशोधकाने बंद्यांना विचारली असता वरील माहिती बंद्यांनी दिली. कारण बंदी कारागृहात शिक्षा भोगत असताना कुटुंब विस्कळीत झालेले असते. गुन्हेगारीचा शिक्का पडलेला असतो, नातेवाईक दूर जातात, समाजाचा पाहण्याचा दृष्टिकोन नकारात्मक असतो, त्यामुळे भविष्यकाळासंदर्भात म्हणजे शिक्षा संपून बाहेर गेल्यावर कुटुंब / समाज स्वीकार करेल काय असा प्रश्न केला असता एकूण उत्तरदात्यांपैकी (१८४) ९२% बद्यांनी त्यांचा कुटुंब / समाज स्वीकार करेल असे सांगितले तर (०६) ३% बंद्यांनी स्वीकार करणार नाही असे सांगितले तर (१०) ५% बंद्यांनी सांगितले माहीत नाही म्हणजे कुटुंब /समाज आमचा स्वीकार करील का नाही हे माहिती नाही असे सांगितले.

वरील विश्लेषणावरुन बहूसंख्य बंदी सांगतात समाज/ कुटुंब त्यांचा स्वीकार करील याचे प्रमाण सर्वात अधिक असून सर्वात कमी प्रमाण कुटुंब समाज आमचा स्वीकार करणार नाही यांचे आहे. म्हणजेच गुन्ह्याचे वर्तन करणे म्हणजे त्यात काही गैर नाही ही मानसिकता वाढत आहे. शिक्षा झाली तरी त्याचा परिणाम म्हणून कुटुंब किंवा समाज आम्हाला टाकून देणार नाही किंवा आमच्या स्वीकार करणार नाही असे नाही तर आमच्या स्वीकारच करेल ही मानसिकता बहुसंख्य बंद्यांची आहे. समाजात अशी प्रवृत्ती वाढत असल्याने एखाद्या व्यक्तीचे वर्तन कायद्याबाह्य असत. त्याला शिक्षा झाली तरी ताठ मानेने फिरणारे

बहुसंख्य लोक आपणास आढळतात. याचा परिणाम येणाऱ्या पिढीवर होत असतो आणि याचाच परिणाम म्हणून गुन्ह्याच्या प्रवृत्तीत वाढ होत चालली आहे.

समाजातील ही प्रवृत्ती कमी करण्यासाठी गुन्हेगारांना न्यायालय शिक्षा देतेच पण बाहेर आल्यावर त्याच्यामध्ये सुधारणा झाली नसेल आणि पूर्वीसारखे नियमबाह्य वर्तन करीत असेल तर समाजाने त्यावर नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे. कारण व्यक्ती कायद्यापेक्षा सामाजिक नियमांना अधिक भीती असतो. त्यामुळे अत्यंत महत्त्वपुर्ण भुमिका समाजाची आहे. याचा चांगला परिणाम येणाऱ्या पिढीवर होत असतो पण असे होतांना आज दिसत नाही असे वाटते. कारण बहुसंख्य बंदी म्हणतात समाज कुटुंब आमचा स्वीकार करील.

**५.१.१४ शिक्षेतील माफी -** बंद्यांना माणूस समजणे हा कारागृह प्रशासनाचा दृष्टिकोन आहे. त्यांना त्याची जाणीव होणेकामी माफी पध्दतीची सवलत आहे.

| | |
|---|---|
| साधारण माफी | ७ दिवस |
| रात्र पहारेकरी (नाईट वॉचमन) | ८ दिवस |
| सिध्ददोष अन्वेषक (वॉर्डर) | ९ दिवस |
| कुंडाकाम | १० दिवस |
| एक वर्ष झाल्यानंतर चांगल्या वर्तणुकीची माफी | ३० दिवस |
| खुल्या कारागृहातील माफी | एक महिन्याला ३० दिवस |
| खुली वसाहत माफी | एक महिन्याला ३० दिवस |

बद्यांनी चांगले काम व वर्तणुकीबद्दल विशेष कारणे/ प्रसंगानिमित्त राज्य माफी जाहीर केली जाते. ह्या सर्व उपक्रमांचा एकूण उद्देश बंदी कारागृहात सद्‌वर्तनी व कामात मग्न राहून प्रशासनाला व त्याला स्वतःला मदत व्हावी असा आहे. बंद्यास ठराविक कालावधीपर्यंत एकूण १/३ काळापेक्षा अधिक सूट मिळत नाही. तसेच सराईत गुन्हेगार व प्रशासकीय कारणास्तव रत्नागिरी विशेष कारागृह येथे पाठविण्यात आलेल्या बंदी इत्यादींना माफी देय नाही. गुंगीकारक औषधी द्रव्य व मनोव्यापार परिणाम करणारे पदार्थ कायदा (एन.डी.पी.एस. ॲक्ट) मध्ये दिनांक २९ मे १९८९ नंतर शिक्षा झालेल्या कैद्यांना माफी देण्यात येत नाही.

**तक्ता क्र. ५.३.१४**

**बंद्यांची काही शिक्षा माफ झाली आहे काय? ते दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | होय | १४ | ७ % |
| २. | नाही | १८६ | ९३ % |
| | **एकूण** | **२००** | **१०० %** |

बंद्यांना झालेल्या एकूण शिक्षेपैकी काही शिक्षा माफ झाली आहे काय याचे विवेचन करणारी आहे. कारागृहात बंद्यांना त्याच्या अपराधीपणाच्या कृत्यांवर मा.न्यायालय जेवढ्या कालावधीची शिक्षा देते तेवढी शिक्षा बंद्यांना कारागृहात काढावी लागते. पण कारागृहात राहत असताना बंद्यांने जर चांगले वर्तन केले म्हणजे कारागृहातील सर्व नियमांचे पालन करणे, भेटीसाठी जेवढी रजा मिळाली आहे तेवढीच रजा घरी भोगणे, रजेच्या काळात कोणतेच अपराधासारखे कृत्य करणार नाही, कारागृहात मारामारी ,गडबड, पळून जाण्याचा प्रयत्न करणार नाही. अशा बंद्यांचा अहवाल मा. कारागृह अधीक्षकामार्फत मा. कारागृह उपमहानिरीक्षक , मा महानिरीक्षक यांच्याकडे जातो तेव्हा अशा बद्यांची संपूर्ण चौकशी होऊन त्याला एकूण झालेल्या शिक्षेपैकी काही शिक्षा बक्षीस म्हणून माफ केली जाते. ज्यामुळे त्या बंद्यांमध्ये मानसिक परिवर्तन व्हावे ही अपेक्षा असते. संशोधकाने कारागृहात शिक्षा भोगत असलेल्या बंद्यांपैकी बंद्यांची शिक्षा माफ झाली काय असा प्रश्न केला असता (१८६) ३३% बद्यांनी नाही . शिक्षेत माफी मिळाली नाही तर फक्त (१४) ७% बंद्यांनी सांगितले माफी मिळाली. थोडक्यात माफी न मिळणाऱ्या बंद्यांचे प्रमाण अधिक असून माफी मिळणाऱ्या बंद्यांचे प्रमाण सर्वात कमी आहे.

वरील विवेचनावरुन आपणास जाणवते की, कारागृहात शिक्षा भोगणाऱ्या बंद्यांना जास्त प्रमाणात माफी मिळत नाही. याचे कारण विचारले असता बंदी आणि प्रशासन यांच्याकडून वेगवेगळी उत्तरे मिळाली. बंदी सांगतात की, कारागृह प्रशासन आमचा चांगला वर्तनाचा अहवाल मंजूरीसाठी वरिष्ठांकडे वेळोवेळी पाठवला जात नाही. परिणामी आम्हाला माफी मिळत नाही पण प्रशासन सांगते की, आम्ही माफी संदर्भात योग्यत्या बंद्याला अहवाल वरिष्ठांकडे पाठवतो. पण बऱ्याच वेळी ही माफी मंजूर होत नाही. त्यामुळे बहुसंख्य बंद्यांना माफी मिळत नाही.

**तक्ता क्र. ५.२.१५**

**बंद्यांची किती शिक्षा माफ झाली आहे ते दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | विवरण | वारंवारिता |
|---|---|---|
| १. | १५ दिवस | ०२ |
| २. | ६ महिने | ०३ |
| ३. | १ वर्षे | ०२ |
| ४. | १.५ वर्षे | ०१ |
| ५. | २ वर्षे | ०३ |
| ६. | ५ वर्षे | ०२ |
| ७. | १० वर्षे | ०१ |
| | **एकूण** | **१४** |

ज्या बंद्यांची काही शिक्षा माफ झाली आहे याचे विवेचन करणारी असुन किती शिक्षा माफ झाली आहे त्या संदर्भात संशोधकाने माहिती संकलित केली असता संशोधकाने अभ्यासलेल्या एकूण बंद्यांपैकी ६ महिने शिक्षा माफी झाली आहे. असे ३ बंद्यांनी सांगितले तर १ वर्षे शिक्षा माफ झाली असे २ बद्यांनी सांगितले. तर दीड वर्षाची शिक्षा माफ झाली असे ०१ बंद्याने सांगितले. तर २ वर्षांची शिक्षा माफ झाली असे ०२ बंद्यांनी सांगितले तर १० वर्षांची शिक्षा माफ झाली असे १ बंद्यांने सांगितले तर ५ वर्षांची शिक्षा माफ झाली असे ०२ बंद्यांनी सांगितले. वरील विवेचनावरुन सहा महिने शिक्षा माफ होणाऱ्या बंद्यांचे प्रमाण सर्वात अधिक म्हणजे ३ एवढे आहे तर दीड वर्षांची शिक्षा माफ होणाऱ्यांचे प्रमाण सर्वात कमी ०१ असे आहे.

**समारोप :-**

प्रस्तुत प्रकरणात बंद्यांच्या मानसिक आणि आरोग्यविषयक परिस्थितींचा सविस्तर आढावा घेतला असून यामध्ये बंद्याला संगीत गाण्याची आवड, चित्रपटांची आवड, बंद्यांची कारागृहात होणारी आरोग्य तपासणी, बंद्यांचा आजार, बंद्यांचे व्यसन, याचा सविस्तर आढावा घेतला आहे. बंदी ज्या अपराधामुळे कारागृहात आला त्या अपराधांचा सविस्तर आढावा प्रस्तुत प्रकरणात घेतला आहे. यामध्ये बंद्याने कोणता गुन्हा केला आहे. गुन्ह्यातील लोकांचा सहभाग केलेल्या गुन्ह्यात कुटुंबातील सदस्यांचा सहभाग, गुन्हा करण्याचे कारण, बंद्यांने खरोखरच गुन्हा केला काय, त्याला झालेली शिक्षा या संबंधीचा सविस्तर आढावा घेतला आहे. बंद्यांच्या मानसिक, आरोग्य आणि त्याने केलेल्या अपराधासंबंधी सविस्तर विवेचन केले आहे.

**************

# प्रकरण ६ वे

# बंद्यांना दिल्या जाणाऱ्या सुविधा आणि गृहीत कृत्यांची पडताळणी

- **बंद्यांना दिल्या जाणाऱ्या सुविधा :** **निवास**

  **कपडे**

  **आहार**

  **वैद्यकीय सुविधा**

  **ग्रंथालय**

  **शैक्षणिक साहित्य**

- **अधिकाऱ्यांची माहिती**
- **गृहीत कृत्यांची पडताळणी**

## ❖ कारागृहात मिळणाऱ्या सुविधांसंबंधी माहिती

मानव हा समाजशील प्राणी आहे . समाजात जीवन जगत असताना आपल्या गरजा भागवताना त्याला संघर्ष करावा लागतो हे प्राचीन काळापासुन आजपर्यंत चालत आले असून पुढेही असेच चालू राहील. व्यक्ती आपल्याला सुख,आनंद मिळवण्यासाठी काहीही करते, किंबहुना तो सामाजीक नियम किंवा कायदेविषयक नियमही तोडण्यास मागेपुढे पाहत नाही. ज्या व्यक्तीने कायद्याचे उल्लंघन केले आहे त्यांना गुन्हेगार असे समजले जाते. आणि अशा गुन्हेगारांना डांबून ठेवण्याचे ठिकाण म्हणजे कारागृह होय. गुन्हा हा जसा प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे तसाच तुरुंग ही व्यवस्थासुध्दा प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे.

शिक्षा व्यवस्था ही प्राचीन काळापासून आहे. फक्त तिच्या स्वरूपात बदल झाला आहे. प्राचीन काळी ईश्वराविरुध्द केलेली प्रत्येक कृत्‌ी म्हणजे गुन्हा होय. त्या नंतर राजेशाही व्यवस्थेत राजा विरुध्द केलेली प्रत्येक कृती ही गुन्ह्याची होती. नंतर समाजाविरुध्द केलेली प्रत्येक कृती म्हणजे गुन्हा तर आधुनिक काळात कायद्याचा भंग करणारी प्रत्येक कृती म्हणजे गुन्हा होय असे गुन्ह्याचे स्वरुप प्राचीन काळापासून बदलत आले आहे. शिक्षा व्यवस्थेतही काळानुरूप बदल झाला आहे. "स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारतातील कारागृहे ही कारागृहे न राहता सुधारणालये बनली आहेत. कारागृहात बंद्यांना प्रशिक्षण द्यावे जेणे करुन शिक्षा भोगणारा बंदी बाहेर आल्यावर त्याचा उदरनिर्वाह चांगल्या प्रकारे चालावा, त्याला देणाऱ्या अन्नाचा दर्जा चांगला, पूरक आणि पोषक असावा. त्यांच्या मनोरंजनाची साधने पुरेशी असावीत. प्रत्येक बद्याला काम द्यावे, त्यांची आरोग्यविषयक काळजी घेतली जावी अशा अनेक सूचना तुरुंग सुधार समितीने करण्यास सांगितले आहेत."[१] (जित कृष्णा सिंह. २००१) जर वरील सर्व सुविधा बंद्यांना मिळत असतील तर ती कारागृहे न राहता सुधारालये बनतील. कारण येथे त्यांचे मानसिक परिवर्तन करण्यासाठी योगा, वेगवेगळे सांस्कृतिक कार्यक्रम, मनोरंजनात्मक कार्यक्रम, खेळ , कारागृहातील आल्हाददायक वातावरण, वेळेवर रजा मंजुरी बद्यांना त्यांच्या नातेवाईकांना भेट त्यामुळे ती सुधारालये बनली आहेत. " शिक्षा व्यवस्थेत स्वातंत्र्यानंतर आमुलाग्र बदल झाले आहेत. कारण एखादा अपराधी हा जन्मजात अपराधी नसून तो परिस्थितीमुळे असे अपराधीपणाचे कृत्य करतो. त्यामुळे त्याच्यात सुधारणा होऊ शकते. त्यामुळे बंद्यांना कारागृहात कठोर शिक्षा न देता त्यामध्ये परिवर्तन होईल त्या संदर्भात तुरुंग व्यवस्था कार्य करते.

शिक्षा व्यवस्थेत आज अपराध्यांच्या सुविधांसाठी अपराधी परिविक्षा अधिनियम १९५८, पॅरोल,

---

१) अपराधशास्त्र और दंडशास्त्र - जित कृष्णा सिंह

खुले कारागृह, खुल्या वसाहती अशा विविध माध्यमांतून सुधारणात्मक शिक्षा दिल्या जातात."[२] (दा.धों. काचोळे. २००१) संशोधकाने मध्यवर्ती कारागृहातील बंद्यांचा अभ्यास या विषयावर संशोधन करत असताना बंद्यांच्या माहितीव्यतीरिक्त कारागृहात आज बंद्यांना दिल्या जाणाऱ्या सुविधा या सुधारणा आणि पुनर्वसन या नुसार आहेत काय? बद्यांच्या मानसिक परिवर्तनासाठी काय काय कार्यक्रम आयोजित केले जातात, आरोग्यविषयक सुविधा दिल्या जातात काय ? बंद्यांना प्रशिक्षण दिले जाते काय ? त्यांना सुट्टी कधी व कशी दिली जाते. त्यांच्यासाठी मनोरंजनाची साधने कोणती आहेत ? या सर्व सुविधांचा आढावा घेण्यासाठी संशोधकाने या विषयावर संशोधन करण्याचे ठरवले. कारागृहात मिळणाऱ्या सुविधेसंदर्भात संशोधकाने बंद्यासाठी संर्रा चत मुलाखत अनुसूची तयार करुन कारागृहात मिळणाऱ्या सुविधांसंदर्भात सत्य वास्तव माहिती , तथ्य संकलित केले.संशोधकाने बंद्याकडून माहिती मिळवली. तसेच तुरुंग व्यवस्थेत काम करणारा अत्यंत महत्त्वपुर्ण घटक म्हणजे तेथील कर्मचारी, अधिकारी अधिकाऱ्यांसाठी स्वतंत्रपणे प्रश्नावली तयार करुन कारागृहात बद्यांना दिल्या जाणाऱ्या सुविधांसंदर्भात तथ्य संकलित केले. बंद्याकडून आणि तुरुंग अधिकाऱ्याकडून मिळालेल्या माहितीचे विवेचन सारणी स्वरूपात केले असून त्यांचे विवेचन संशोधकाने पुढीलप्रमाणे केले आहे.

**बंद्यांना मिळणारा आहार**

मानवाला जीवन जगण्यातील अत्यंत महत्त्वपूर्ण घटक म्हणजे अन्न होय. मानवाचा आहार हा तो ज्या भौगोलिक, सामाजिक परिस्थितीत राहतो त्यावर तो अवलंबून असतो. व्यक्तीला वरील घटकांना धरुन पूरक आणि पोषक आहार जर मिळाला नाही तर व्यक्तीला अनेक रोगांना सामोरे जावे लागते. आज भारतात अनेक लोक एक वेळचे अन्न खातात. अनेक जण उपाशीपोटी झोपतात. अनेक जण अत्यंत निकृष्ट दर्जाचे अन्न खातात. याचाच परिणाम म्हणून व्यक्तींना अनेक रोगांना सामोरे जावे लागते. म्हणजेच व्यक्तीला पूरक आणि पोषक आहाराची नितांत गरज असते. कारागृह ही शासनाची संस्था असून कायदा बाह्य वर्तन करणाऱ्यांना ठेवण्याचे ठिकाण म्हणजे कारागृह होय. या कारागृहात आज त्यांच्या क्षमतेपेक्षा अधिक बंदी राहतात. पुरुष स्त्रिया त्यांची लहान बाळ असे कारागृहात राहतात त्यांना पूरक आणि पोषक आहार हा वैद्यकीय अधिकाऱ्यांनी प्रमाणित केलेल्या आहार चार्टनुसार आहार दिला जावा असे प्रमाणित केले. पण प्रत्यक्षात तशा पध्दतीचा आहार दिला जातो काय या संदर्भात संशोधकांनी त्या संदर्भात बंदयांना प्रश्न विचारून सविस्तर माहिती घेतली आहे. तसेच कारागृहातील अधिकारी यांनाही बंद्यांना दिल्या जाणाऱ्या आहारा संदर्भात माहिती घेतली.

२) गुन्हेगारीशास्त्र - दा.धों. काचोळे

**कारागृहातील बंद्यांना देण्यात येणारा आहार तक्ता, ६.१ (अ)**
**स्त्री व पुरुष भारतीय व परदेशी न्यायाधीन व सिध्ददोष बंद्यांना द्यावयाच्या**
**आहाराचे सुधारित प्रमाण**

| अ.क्र<br>१ | आहार वस्तू<br>२ | परिमाण<br>३ |
|---|---|---|
| १ | तांदूळ (अ) न्यायाधीन बंदी | १५० ग्रॅम |
| | (ब) शिक्षा झालेल्या बंद्यांस | २०० ग्रॅम |
| २ | गहू किंवा ज्वारी किंवा बाजरी किंवा मिलो पीठ. | |
| | अ)न्यायाधीन बंदी पुरुष (उपलब्धतेनुसार) | ३०० ग्रॅम पीठ किंवा ५०० ग्रॅम |
| | ब) न्यायाधीन बंदी स्त्री | वजनाचा पाव |
| | क) शिक्षा बंदी पुरुष | ३०० ग्रॅम पीठ किंवा ५०० ग्रॅम |
| | ड) शिक्षा बंदी स्त्री | वजनाचा पाव |
| ३. | कडधान्ये व डाळ | ३५० ग्रॅम पीठ किंवा ६०० ग्रॅम |
| ४. | भाजीपाला तीन दिवस (सोमवार, बुधवार, शुक्रवार) | वजनाचा पाव |
| | अ) पालेभाजी | २०० ग्रॅम पीठ किंवा ३५० ग्रॅम |
| | ब) इतर | वजनाचा पाव |
| | क) कंदमुळे | १२० ग्रॅम रविवार सोडून |
| | भाजीपाला चार दिवस (मंगळवार, गुरुवार, शनिवार, | |
| | रविवार) | १०० ग्रॅम |
| ५. | अ) इतर, ब) कंदमुळे | ५० ग्रॅम |
| ६. | दूध किंवा दही, टोमॅटो | ५० ग्रॅम |
| ७. | बेसन पीठ | |
| ८. | कांदे | १०० ग्रॅम |
| ९. | गोडे तेल | १०० ग्रॅम |
| १०. | मीठ | ३० ग्रॅम फक्त रविवारसाठी |
| ११. | केळी | ५० ग्रॅम |
| | ओला मसाला | २० ग्रॅम |
| १२. | | १० ग्रॅम |
| | सुका मसाला | १ नग (१०० ग्रॅम) |
| | | ५ ग्रॅम (हिरवी मिरची २ ग्रॅम, आले १.५ ग्रॅम, कोथिंबीर १ ग्रॅम, कढीपत्ता |
| १३. | | ०.५ ग्रॅम) |
| | जळण | १०ग्रॅम (जिरे ०.२५ग्रॅम, हिंग ०.२५ग्रॅम, हळद ०.५०ग्रॅम, लसूण ०.७५ग्रॅम, धने ०.७५ग्रॅम, मेथी ०.७५ग्रॅम, मोहरी ०.७५ग्रॅम, मिरची ६ ग्रॅम) |
| | | ६८० ग्रॅम लागकु किंवा १०० मिली डिझेल. |

**बंद्यांना देण्यात येणाऱ्या चहा व न्याहारीचे प्रमाण :-**

| अ.क्र. | आहार वस्तू | परिमाण |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| अ | **चहा** | |
| | १) साखर | २० ग्रॅम |
| | २) चहा पावडर | ५ ग्रॅम |
| | ३) दूध | ५० मि.लि. |
| ब | **शिरा (रविवारी व गुरुवारी)** | |
| | १) रवा | ६० ग्रॅम |
| | २) गूळ | ४० ग्रॅम |
| | ३) वनस्पती तूप | २० ग्रॅम |
| क | **उपीट किंवा पोहे** | |
| | १) पोहे | ६० ग्रॅम (मंगळवार, शुक्रवार) |
| | २) रवा | ६० ग्रॅम (सोमवार, बुधवार, शनिवार) |
| | ३) कांदे | १० ग्रॅम |
| | ४) गोडे तेल | ५ ग्रॅम |
| | ५) राई (मोहरी) | ०.५ ग्रॅम |
| | ६) कोथिंबीर | १ ग्रॅम |
| | ७) हिरवी मिरची | २ ग्रॅम |
| | ८) हळद | ०.५ ग्रॅम |
| | ९) मीठ | २ ग्रॅम |

(१.इंधन-अ,ब आणि क करिता १२० ग्रॅम लाकूड किंवा २५ मि.लि. डिझेल वापरले जाते. धार्मिक सणादिवशी बंद्यांना शिरा देण्यात येतो.)

न्यायाधीन बंद्यांचा आहार, सिध्ददोष बंदयांचा आहार, खुल्या कारागृहातील बंद्यांचा आहार, वैद्यकीय आहार, गरोदर स्त्रियांचा आहार, किशोरांचा आहार, बंद्यांना देण्यात येणारा चहा व न्याहारी हे शासन अधिसूचना क्रमांक एमआयएस "२०४/प्र.क्र.४७/ पीआरएस - २ दिनांक २७ मे २००५ प्रमाणे मंजूर करण्यात आला आहे.

**वैद्यकीय आहाराचे सुधारित प्रमाण :-**

| अ.क्र. १ | आहार वस्तू २ | परिमाण ३ |
|---|---|---|
| १ | पर्याय - अ | |
| | (अ) दूध | १३०० मि.लि. |
| | (ब) साखर | २५ ग्रॅम |
| | (क) जळण | ४५० लाकूड किंवा ७० मि.लि. डिझेल |
| २ | पर्याय - ब | |
| | (अ)दूध | ८८० मि.लि. |
| | (ब) साबुदाणा | ८५ ग्रॅम |
| | (क) साखर | ५५ ग्रॅम |
| | (ड) तांदूळ | ५५ ग्रॅम |
| | (इ) मीठ | ५ ग्रॅम |
| | (फ) जळण | ४५० ग्रॅम लाकूड किंवा ७० मि.लि. |
| ३ | पर्याय -क | डिझेल. |
| | अ) साधा आहार (आहार प्रमाण क्रमांक) | "[३] |

बंद्यांचे सकाळचे जेवण बनवण्याचे काम रात्री दोन वाजेल्यापासूनच चालू होते. कारागृहातील बंदीच संपूर्ण अन्न शिजवतात. कारागृहात दळण दळण्यासाठी एक स्वतंत्र गिरणी असून धान्य साठवण्यासाठी गोदाम आहे. सर्व अन्नधान्य या गोदामात साठवले जाते.

दररोज बंद्यांना आंघोळ झाल्यानंतर चहा/दूध दिले जाते त्यानंतर नाष्टा त्यात तीन दिवस उपमा दोन दिवस पोहे व दोन दिवस शिरा दिला जातो. जेवणामध्ये तीन पोळ्या,वरण, भात, भाजी कधीकधी पातळ भाजीच असते. असे जेवण सकाळ आणि संध्याकाळी दिले जाते. ज्यांना पोळी पचत नाही त्यांना भात जास्त दिला जातो. दुपारी बंद्याना प्रत्येकी एक केळी, एक टमाटे व सायंकाळच्या जेवणात एक कांदा दिला जातो. १५ ऑगस्ट, २६ जानेवारी, १ मे ,१७ सप्टेंबर अशा राष्ट्रीय सणांच्या वेळी गोड जेवण दिले जाते त्यामध्ये बुंदी, शिरा असा आहार दिला जातो. कारागृहात जेवणांमध्ये मांसाहार दिला जात नाही पण

---

३) नागरिकांची सनद - गृह (तुरुंग विभाग) महाराष्ट्र शासन

कारागृहात कॅन्टीन आहे. त्यामध्ये वर्षातून विशिष्ट दिवशी (बकरी ईद) मांसाहार विकत घेता येतो. वर्षातून तो पाच वेळाच ठेवला जातो. या वेळी बंदी ज्यांना मांसाहार करावयाचा आहे त्यांनी विकत घेऊन खावे लागते असे सांगण्यात आले.

कारागृहातील कॅन्टीनमध्ये काही ठराविक पदार्थ बद्यांसाठी विक्रीसाठी ठेवले जातात. बंदी या कॅन्टीनमधून कुपन्सद्वारे विकत घेतात. कुपन्स कारागृह प्रशासन बंद्यांना देते. कारागृहात बंदी जे काम करतात किंवा जे बंदी काम करीत नाहीत पण त्यांचे कुटुंबीय पैसे पाठवतात त्या पैशातून बंद्यांना कुपन्स दिले जातात. त्या कुपन्सवर बंद्याना पदार्थ मिळतात लोणचे, पापड, शेव, पाव, ब्रेड, खारी असे पदार्थ तेथे मिळतात. कारागृहातील सर्वच बंदी या कॅन्टीनमधील पदार्थ विकत घेऊ शकत नाहीत. कारण प्रत्येक बंद्याला काम नाही, बऱ्याच बद्यांच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती खालावलेली असल्याने ते पैसे पाठवू शकत नाहीत. त्यामुळे सर्वच बंदी कॅन्टीनमधील पदार्थ न घेता कारागृह प्रशासनामार्फत दिला जाणारा नियोजित आहार तोच घेतात. अन्नाचा दर्जा हा आहारतज्ञांच्या मार्गदर्शनाखाली ठरवून दिला जातो. आहाराचे प्रमाणही कारागृह नियमात ज्या पध्दतीने आहे त्या प्रमाणे दिला जातो. वरील आहारचार्ट मध्ये त्याचे विष्लेषण करण्यात आले आहे.

**तक्ता क्र. ६.१ (ब)**

**बंद्यांना कारागृहात पुरेसा आहार मिळतो काय ते दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | मिळतो | १४९ | ७४.५ % |
| २. | मिळत नाही | ५१ | २५.५ % |
| | **एकूण** | **२००** | **१०० %** |

कारागृहात शिक्षा भोगत असलेल्या बंद्यांच्या आहारासंबंधीचे विवेचन करणारे आहे. संशोधकाने अभ्यासलेल्या एकूण बंद्यांपैकी (१४९) ७४.५ टक्के बंद्यांनी सांगितले, पुरेसा आहार आम्हास मिळतो तर (५१) २५.५ टक्के बंद्यांनी पुरेसा आहार मिळत नाही असे सांगितले. आहारात काय मिळते या संदर्भात विचारणा केली असता तीन पोळ्या, भात, भाजी, वरण असे सकाळी आणि सायंकाळी जेवण मिळते. या व्यक्तिरिक्त सकाळी दूध,चहा,नाष्टा दिला जातो. दुपारी एक फळ आणि एक टमाटा दिला जातो असे सांगण्यात आले. वरील दिलेला आहार आम्हास पुरतो असे सर्वात जास्त बंदी ७४.५ टक्के सांगितले तर २५.५ टक्के बंद्यांनी आहार पुरत नाही. कारण आमचा आहार अधिक असल्याने तीन पोळ्या,भात पुरत

नाही तर त्यामध्ये वाढ करावी आणि त्याचबरोबर आहाराचा दर्जा चांगला असावा असे काही बंद्यांनी सांगितले.

आहाराच्या दर्जासंदर्भात तुरुंग अधिकारी आणि डॉक्टर्स यांना विचारले असता त्यांनी सांगितले शासनाने ठरवून दिलेल्या आहार चार्टप्रमाणे आहार दिला जातो. राष्ट्रीय सण धार्मिक सण या दिवशी गोड पदार्थ दिले जातात. जे बंदी आजारी असतात त्यांना स्वतंत्र आहार दिला जातो असे सांगितले. आहारासंबंधी सविस्तर माहिती पुढील प्रमाणे दिली आहे.

**तक्ता क्र. ६.२**

**बद्याला स्वच्छ व मुबलक पाणी मिळते काय ? ते दर्शविणारा तक्ता**

| अ.क्रं. | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | होय | १९० | ९५ % |
| २. | नाही | १० | ५ % |
| | **एकूण** | **२००** | **१०० %** |

कारागृहात बंद्यांना पिण्याचे स्वच्छ व मूबलक पाणी मिळते काय याचे विवेचन करणारी आहे, " पाणी ही मानवाची मूलभूत गरज असून ते पाणी स्वच्छ म्हणजे दुषित असू नये आणि हे मुबलक असावे. आज पाण्याचा प्रश्न मात्र खूप गंभीर बनला आहे. एकतर मुबलक पाणी  नाही आणि जे आहे ते स्वच्छ आहेच असे नाही. त्यामुळे व्यक्तींच्या आरोग्यात खूप मोठ्या प्रमाणात बिघाड होत आहे. अनेक  आजार अस्वच्छ पाण्यामुळे होतात, त्यामुळे व्यक्तीला शारीरिक,मानसिक आर्थिक त्रास सहन करावा लागतो."[४] (के.पार्क अनुवाद, डॉ. जगन्नाथ दीक्षित. २००९) आज स्वच्छ पाण्याची एक लिटरची बाटली पंधरा रु. देऊन घ्यावी लागते. पण हे सर्वसामान्य जीवन जगणाऱ्या माणसांना शक्य नाही. त्यामुळे कारागृहात बंद्यांना स्वच्छ पाणी व मुबलक पाणी आहे काय या संदर्भात माहिती संकलित केली असता संशोधकाने अभ्यासलेल्या एकुण बंद्यांपैकी (१९०) ९५% बंद्यांनी सांगितले की कारागृहात स्वच्छ व मुबलक पाणी उपलब्ध आहे. तर फक्त (१०) ५% बद्यांनी स्वच्छ व    मुबलक पाणी नाही असे सांगितले.  वरील माहितीवरुन कारागृहात स्वच्छ मुबलक पाणी आहे. संशोधकाने स्वतः याची पाहणी केली असता पाणी साठवण्याचा मोठा हौद व पिण्यासाठी स्वतंत्र टाकी असून त्या पाण्यात निर्जतुकीकरण औषध टाकले जाते असे सांगण्यात आले म्हणजे कारागृहात स्वच्छ व मुबलक पाणी उपलब्ध आहे.

---

४) सामाजिक आरोग्य परिचर्या - लेखक - के.पार्क अनुवाद, डॉ. जगन्नाथ दीक्षित.

- **कारागृहात बंद्यांसाठी निवास व्यवस्था**

कारागृहातील सर्वसाधारण बंद्यांना रात्री बंद करण्यासाठी बॅरॅकची सोय असते. तसेच ज्या बंद्यांना जास्त सुरक्षा व्यवस्था द्यावी लागते अशा बंद्यांना सुरक्षित कक्षात ठेवण्याची तरतूद आहे. त्या बंद्यांना त्यांच्या विश्रामासाठी चांगल्यापैकी मोकळी जागा नियमाप्रमाणे उपलब्ध केली जाते.

संपूर्ण बॅरॅक्सची तसेच कारागृहाच्या आतील, बाहेरील परिसराची स्वच्छता कटाक्षाने राखली जाते. पिण्याच्या पाण्याचे हौद नेहमी स्वच्छ ठेवण्यात येतात. प्रत्येक कारागृहात नवीन शौचालये बांधण्यात आली आहेत. कारागृहातील बॅरॅक्स, विभक्त कोठड्या यांना वारंवार रंग रंगोटी करण्यात येते. तसेच कारागृहातील सांडपाण्याच्या गटारी नेहमी स्वच्छ राहतील याची कारागृह प्रशासन कटाक्षाने काळजी घेते. बद्यांना दैनंदिन पुरविले जाणारे अन्नधान्य व्यवस्थित साफ केले जाते. स्वयंपाकगृहातील काम करणाऱ्या बंद्यांचे स्वास्थ्य नेहमी चांगले असल्याबद्दल तसेच त्यांना कोणतेही त्वचारोग अगर आजार नसल्याबाबत वैद्यकीय अधिकाऱ्याकडुन वारंवार तपासणी केली जाते. या सर्व बाबी राबविण्याबाबत प्रशासनाचा मुख्य उद्देश बंद्यांचे आरोग्य, स्वास्थ्य चांगले राहावे असा आहे.

**तक्ता क्र. ६.३**

**बंद्यांच्या राहण्याच्या ठिकाणाचे वातावरण कसे आहे ते दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | प्रसन्न / प्रकाशमय | १७५ | ८७.५ % |
| २. | अंधारमय | २५ | १२.५ % |
| | **एकूण** | **२००** | **१०० %** |

कारागृहातील जेथे बंदी राहतात. तेथील वातावरण (भौगोलिक) कसे आहे या संदर्भात विवेचन करणारे आहे. "व्यक्तीच्या चांगले आरोग्य लाभण्यासाठी त्यांच्या राहण्याचे ठिकाण प्रसन्न, आल्हाददायक असणे गरजेचे आहे कारण त्याचा परिणाम त्याच्या शारीरिक वाढ आणि विकासावर होत असतो." जर राहण्याचे ठिकाणचे वातावरण प्रसन्न आल्हाददायक असेल तर त्या वातावरणातील व्यक्तींची शारीरिक वाढ व मानसिक विकास चांगल्या पध्दतीने होतो."[५] (कित्ता) त्यामुळे संशोधकाने कारागृहात शिक्षा झालेल्या बंद्यांना जेथे ठेवले जाते तेथील वातावरण कसे आहे या संदर्भात तथ्य संकलित केले.

५) कित्ता

संशोधकाने ज्या बंद्यांचे अध्ययन केले त्यापैकी (१७५) ८७.५% बद्यांनी सांगितले. आमच्या राहण्याचे ठिकाण अतिशय प्रसन्न, प्रकाशमय आहे तर (२५) १२.५% बंद्यांनी अंधारमय आहे असे सांगितले. कारागृहात राहण्यासाठी बॅरेक्स  असून एकूण ८+८= १६ बॅरेक्स असून तेथील बॅरेक्समध्ये प्रकाश येण्यासाठी -जाळ्या सोडल्या असुन हवा अतिशय खेळती असते. सर्व बॅरेक्सचा आकार हा अंडाकृती असून आतील भाग हा अतिशय कमी म्हणजे अपुरा आहे. बॅरेक्सच्या बाहेर ज्या ठिकाणी बंद्यीना वेगवेगळे प्रशिक्षण दिले जाते, कामाचे ठिकाण अतिशय आल्हाददायक आहे. परिसर अगदी स्वच्छ आहे. आरोग्यासाठी पोषक असे वातावरण कारागृहात आहे. संशोधकाने स्वतः त्या वातावरणाची पाहणी केली त्यात वरील स्वरूपाचे अल्हाददायक, प्रकाशमय वातावरण आढळून आले.

**बद्यांच्या राहण्याची व्यवस्था :-**

कारागृहात सामूहिक राहण्याची व्यवस्था आहे. फक्त जे बंदी संसर्गजन्य आजाराने ग्रस्त आहेत त्यांना राहण्याची स्वतंत्र व्यवस्था केली जाते. संशोधकाने राहण्याच्या व्यवस्थेची पाहणी केली असता बंद्यांना राहण्यासाठी बॅरेक्स असून एका बॅरेक्समध्ये ४५ ते ५० बंद्यांना सामूहिकपणे राहण्याची व्यवस्था आहे. त्या बॅरेक्समध्ये संडास, बाथरुम, पंखे, लाईट, टी.व्ही. कॅरम, पेपर, पिण्याचे पाणी या सर्व सोई आढळल्या.

**तक्ता क्र.६.४**

**कारागृहात बद्यांचे मित्र झाले आहेत काय हे दर्शविणारा तक्ता**

| अ.क्रं. | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | होय | १७६ | ८८ % |
| २. | नाही | २४ | १२ % |
| | **एकूण** | **२००** | **१०० %** |

कारागृहात बंद्यांचे मित्र झाले आहेत काय यांचे विवेचन करणारी आहे. कारण कारागृहाच्या बाहेर जीवन जगताना बंद्यांचे मित्र होते. पण कारागृहात आल्यावर मित्र झाले आहेत काय या संदर्भात माहिती घेतली असता संशोधकाने अभ्यासलेल्या एकूण बंद्यांपैकी (१७६) ८८ टक्के बद्यांनी मित्र झाले आहेत असे सांगितले तसेच आम्ही एकत्र जेवण,काम करतो. एकाच बॅरेक्समध्ये राहतो. आमचे सुख दुःख एकमेकांसोबत चर्चा करतो असे बहुसंख्य बंद्यांनी सांगितले. मित्र झाल्याने आपले मन मोकळे होते असेही काही बद्यांनी सांगितले. तर फक्त (२४) १२ टक्के बंद्यांनी कारागृहात मित्र झाले नाहीत असे सांगितले. कारागृहात मित्र झाले आहेत असे सांगणाऱ्यांचे प्रमाण अधिक आहे.

## ❖ बद्यांना आवडीनुसार व्यावसायिक प्रशिक्षण

कारागृहे ही सुधारालये बनल्याने बंद्यांना विविध कामांचे प्रशिक्षण दिले जाते. यासाठी कारागृहात स्वतंत्र असा कारखाना विभाग कार्यरत आहे. कारागृहात बंद्यांना त्यांच्या आवडीनुसार प्रशिक्षण दिले जाते काय याचे विवेचन करणारी आहे. सुधारणा आणि पुनर्वसन ज्याप्रमाणे मार्गक्रमण करत असताना कारागृहात बंद्यांना त्यांच्या आवडीनुसार प्रशिक्षण दिले पाहिजे, हे प्रशिक्षण जेथे दिले जाते काय या संदर्भात संशोधकाने बंद्यांना प्रश्न विचारला असता आम्हाला आमच्या आवडीनुसार प्रशिक्षण दिले जाते असे सांगितले.

कारागृहात बंद्यांना दिल्या जाणाऱ्या प्रशिक्षणासंदर्भात संशोधकाने पाहणी केली असता सध्या कारागृहात सुतारकाम, लोहारकाम, शिवणकाम, गोदाम, वल्डिंग, नाव्हीकाम, कुंडाकाम, दरीकाम, पंजाकाम अशा विविध ठिकाणी बंद्यांना काम दिले जाते असे आढळून आले.

**औद्योगिक प्रशिक्षण शाळा**

कारागृहात बंदी पुनर्वसनाच्या दृष्टीने निरनिराळी कामे उदाहरणार्थ शिवणकाम, लोहारकाम, सुतारकाम, चर्मोद्योग, विणकाम, साबण निर्मिती, बेकरी, कागद कारखाना, ऑटोमोबाईल वर्कशॉप, पेंटिंग विभाग, शेती हे उद्योग चालविले जातात.बंद्यांना त्याचे प्रशिक्षण मिळावे यासाठी कारागृहात औद्योगिक प्रशिक्षण शाळा सतत कार्यरत आहेत. हे प्रशिक्षण देण्यासाठी तांत्रिक कर्मचाऱ्यांची नेमणूक केलेली आहे. ते कर्मचारी बंद्यांना त्या त्या उद्योगातील प्रशिक्षण देतात. या सर्व उपक्रमांचा मुख्य उद्देश म्हणजे बंद्यांचे सुटल्यानंतर योग्य पुनर्वसन व्हावे, तसेच त्यांचा कारावासातील काळ कामात व्यस्त राहून त्यांना पगार मिळून त्यांना त्यातून दैनंदिन खर्च भागविता यावा. तसेच बंद्यांच्या मनात शासनाचे काम केल्याबद्दल स्वाभिमान व आनंद वाटावा असा आहे.

**तक्ता क्र. ६.५**

**बंद्यांनी प्रशिक्षण घेतले / घेत आहेत काय ? हे दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | होय | १३० | ६५ % |
| २. | नाही | ७० | ३५ % |
| | **एकूण** | **२००** | **१०० %** |

कारागृहात बंदी राहत असतांना संशोधकाने बंद्यांना प्रशिक्षण दिले जाते काय या प्रश्नावर बहुसंख्य बंद्यांनी होय दिले जाते  असे सांगितले, त्या संबंधी संशोधकानेही पाहणी केली तेव्हा त्यात सत्यता आढळली.संशोधकाने अभ्यास केलेल्या बंद्यांना तुम्ही प्रशिक्षण घेतले आहे काय किंवा सध्या घेत आहात काय या संदर्भात माहिती संकलित केली असता (१३०) ६५ टक्के बंद्यांनी होय, आम्ही प्रशिक्षण घेतले असून सध्या आम्ही काम करतो तर (७०) ३५ टक्के बंद्यांनी आम्ही प्रशिक्षण घेतले नाही असे सांगितले. प्रशिक्षण घेणाऱ्या बद्यांचे प्रमाण अधिक असून प्रशिक्षण न घेणाऱ्यांचे प्रमाण अत्यंत कमी आहे. प्रशिक्षणा संदर्भात कारागृह प्रशासनाकडे विचारणा केली असता ज्या बंद्यांना काही आजार आहे किंवा ज्या बंद्याची काम करण्याची शारीरिक क्षमता नाही अशा बंद्याना काम दिले जात नाही असे सांगण्यात आले.

**तक्ता क्र. ६.६**

**बंद्यांनी कोणते प्रशिक्षण घेतले / घेत आहेत हे दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र | व्यवसाय | वारंवारिता |
|---|---|---|
| १. | सुतार काम | ४७ |
| २. | लोहार काम | १५ |
| ३. | पंजा काम | ०७ |
| ४. | मेस | ०१ |
| ५. | पॉवरलूम | १४ |
| ६. | शिवणकाम | १२ |
| ७. | सध्या इतर ठिकाणी काम | ०४ |
| ८. | दरी काम | ०१ |
| ९. | स्वयंपाक करणे | ०३ |
| १०. | गोदाम | ०१ |
| ११. | वेल्डिंग | ०३ |
| १२. | वॉचमन | ०१ |
| १३. | धोबी काम | ०२ |
| १४. | यंत्रमाग | ०४ |
| १५. | स्क्रीन प्रिंटिंग | ०१ |
| १६. | सॉ मिल | ०३ |
| १७. | कुंडा काम | ०१ |
| १८. | न्हावी | ०१ |
| १९. | साफसफाई | ०१ |
| २०. | काम दिले नाही | ०८ |
|  | **एकूण** | **१३०** |

कारागृहातील बंद्यांना कोण-कोणत्या स्वरूपाचे प्रशिक्षण दिले जाते याचे विवेचन करणारी आहे. कारागृहातील सर्व बंद्यांना कामाचे प्रशिक्षण दिले जाते पण जे आजारी आहेत विशिष्ट रोगाने ग्रस्त आहेत किंवा ज्यांची शारीरिक क्षमता नाही त्यांना काम दिले जात नाही. मग कारागृहात कोणकोणते प्रशिक्षण दिले जाते या संदर्भात संशोधकाने बंद्यांना माहिती विचारली असता ४७ बंदी सुतारकामाचे प्रशिक्षण, पॉवरलूम १४, शिवणकाम १२, सध्या इतर ठिकाणी काम वेल्डिंग ०३, वॉचमन०१, धोबीकाम ०२, यंत्रमाग ०४, स्क्रीन प्रिटिंग ०१, सॉ मील ०३, कुंडा काम ०१, न्हावी ०१, साफसफाई ०१ सध्या काम दिले जात नाही ०८ असे विवेचन वरीलप्रमाणे सांगता येईल. प्रामुख्याने सुतारकाम करणाऱ्यांचे प्रमाण सर्वात अधिक आहे.

**तक्ता क्र. ६.७**

**बंद्यासोबत किती लोक प्रशिक्षण घेतात हे दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र | विवरण | वारंवारिता |
|---|---|---|
| १. | २ ते ५ | १४ |
| २. | ५ ते १० | १५ |
| ३. | १० ते १५ | ०२ |
| ४. | २० ते ३० | १२ |
| ५. | ३० ते४० | २९ |
| ६. | सध्या इतर ठिकाणी काम | २४ |
| ७. | सध्या बंद आहे | ३४ |
| | **एकूण** | **१३०** |

कारागृहात बंदी काम करत असताना त्यांचा आढावा घेतला असता वरील माहिती मिळाली. संशोधकाने अभ्यासलेल्या एकूण बद्यांपैकी काम करताना आपल्यासोबत २ ते ५ बंदी काम करतात असे १४, ५ ते १० बंदी काम करतात असे १५, १० ते १५ बंदी काम करतात असे ०२, २० ते ३० बंदी काम करतात असे १२ तर ३० ते ४० बंदीकाम करतात असे २९, सध्या इतर जेथे गरज आहे तेथे काम दिले जाते असे २४ तर सध्या काम बंद आहे असे ३४ बद्यांनी सांगितले अशी माहिती संशोधकाला मिळाली.

**तक्ता क्र. ६.८**

**बद्यांना प्रशिक्षणाचा फायदा कारागृहाबाहेर आल्यावर भविष्यात होईल काय हे दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | होय | १०२ | ५१% |
| २. | नाही | ९८ | ४९% |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

कारागृहात बंद्यांना विविध प्रशिक्षण दिले जाते त्या प्रशिक्षणाचा त्यांना शिक्षा संपूण बाहेर गेल्यावर फायदा होईल का ? असा प्रश्न संशोधकाने बंद्यांना विचारला त्याचे विवेचन वरिलप्रमाणे मिळाले. कारागृहे आज सुधारालये बनली आहेत. सुधारणा आणि पुनर्वसन या ब्रिदवाक्याप्रमाणे काम करत असताना कारागृहात शिक्षा भोगणाऱ्या प्रत्येक बंद्यास व्यावसायिक प्रशिक्षण द्यावे. कारण त्यामुळे कारागृहात वेळ कसा गेला ते कळणार नाही व बाहेर पडल्यावर त्यांना या प्रशिक्षणातून रोजगार मिळावा याच उददेशाने बंद्याना प्रशिक्षण दिले जाते. कारागृह प्रशासन अतिशय उदात्त हेतूने बंद्यांना प्रशिक्षण दिले जाते. पण प्रत्यक्षात बंद्यांना त्याचा उपयोग शिक्षा संपून घरी गेल्यावर होईल काय याच जिज्ञासेपोटी संशोधकाने बंद्यांना विचारले असता (१०२) ५१ टक्के बंद्यांनी सांगितले होय. आम्हाला येथे दिलेल्या प्रशिक्षणाचा निश्चितच उपयोग होईल. आम्ही आमचा उदरनिर्वाह या प्रशिक्षणावर करू शकतो. असे सांगितले तर (९८) ४९ टक्के बद्यांनी नाही आम्हाला या प्रशिक्षणाचा बाहेर गेल्यावर फायदा होणार नाही असे सांगितले. कारण बाहेर गेल्यावर परिस्थिती वेगळी असेल. मिळेल ते काम करावे लागेल. कारण मिळालेल्या प्रशिक्षणाचा उपयोग करायचे ठरवले तर त्यासाठी लागणारा पैसा आमच्याकडे नाही. त्यामुळे हे प्रशिक्षण /काम येथेच चांगले आहे. याचा उपयोग बाहेर गेल्यावर होणार नाही. वरील विवेचनावरुन लक्षात येते की बद्यांना जे प्रशिक्षण दिले जाते त्याचा फायदा होईल असे बहुसंख्य बंद्यांनी सांगितले.

बंद्यांना कारागृहात दिल्या जाणाऱ्या प्रशिक्षणाचा कसा फायदा होईल या संदर्भाचे विवेचन आहे. बंद्यांना विविध प्रकारचे प्रशिक्षण दिले जाते. त्या प्रशिक्षणाचा फायदा शिक्षा संपून घरी गेल्यावर निश्चित होईल असे बहुसंख्य बंद्यांनी सांगितले. ज्या बंद्यांनी या प्रशिक्षणाचा फायदा बाहेर पडल्यावर होईल असे सांगितले. त्यांना या प्रशिक्षणाचा कसा फायदा होईल असे संशोधकाने बंद्यांना विचारला असता संशोधकाने अभ्यासलेल्या बंद्यांनी सांगितले. कारागृहात मिळालेल्या प्रशिक्षणाचा फायदा आम्ही बाहेर गेल्यावर त्याच पध्दतीचा व्यवसाय करुन आमचा उदरनिर्वाह करू असे सांगितले. बंद्यांनी मिळालेल्या प्रशिक्षणाचा बाहेर गेल्यावर काहीच उपयोग होणार नाही असे सांगितले.

**सारणी क्र. ६.९**

**बंद्यासोबत सोबती कसे वागतात हे दर्शविणारी सारणी**

| अ.क्र | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | मैत्रीपूर्ण | १८६ | ९३ % |
| २. | खोडकर | १० | ५ % |
| ३. | भांडण करतात | ०२ | १ % |
| ४. | इतर | ०२ | १ % |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

वरील सारणीवरुन कारागृहातील बंद्यांसोबत त्यांचे सहकारी कशा पध्दतीचे वर्तन करतात याचे विवेचन आहे. कारागृहात राहताना काम करताना अनेक बंदी एकत्र राहतात पण एकत्र राहतात. त्यांचे वर्तन कशा स्वरूपाचे असते त्यासंदर्भात संशोधकाने माहिती संकलित केली. संशोधकाने अभ्यासलेल्या एकूण बंद्यांपैकी (१८६) ९३ टक्के बंद्यांनी सांगितले. आमचे सोबती अतिशय प्रेमाने, मैत्रीपूर्ण वागतात तर (१०) ५ टक्के बंद्यांनी सांगितले आमचे सोबती खोडकर स्वरूपाचे वर्तन करतात तर (०२) १ टक्के बंद्यांनी सांगितले आमचे सोबती भांडण करतात तर (०२) १ टक्के बंद्यांनी सांगितले तात्पुरत्या स्वरूपाचे संबंध ठेवतात, कधी चांगले तर, कधी खोडकरपणे आमच्या सोबत सहकारी वर्तन करतात असे सांगितले.

मैत्रीपूर्ण चांगले वर्तन करतात यांचे प्रमाण अधिक आहे म्हणजे कारागृहातही बंदी आपले मित्र करुन त्यांच्या सोबत चांगल्या पध्दतीचे वर्तन करतात. आम्हीच आमच्या सुख-दु:खांच्या गोष्टी एकमेकांना सांगतो. त्यामुळे भांडण, मारामारी करण्याचा प्रश्नच येत नाही असे बद्यांनी सांगितले.

कारागृहात बंदी राहताना त्यांचे सहकारी कशा पध्दतीने वागतात याचे विवेचन लक्षात येते. कारागृहातील बंदी एकत्र राहत असताना काम करताना किंवा इतर वेळी एकमेकांसोबत कसे राहतात या संदर्भात संशोधकाने माहिती संकलित केली. बंद्यांनी सांगितले आमचे सहकारी आमच्यासोबत चांगले वागतात. भांडण करीत नाहीत. येथे भांडण करण्याचा प्रश्नच येत नाही. कारण सर्वजण समदु:खी आहे. त्यामुळे आम्ही एकमंकासोबत प्रेमाने राहतो असे बहुसंख्य बंद्यांनी सांगितले. आमचे सहकारी आमच्यासोबत भांडणे करतात असे सांगितले.वरील विष्लेषणावरुन असे निदर्शनास येते की बंदी एकमेकांसोबत प्रेमाने चांगले वर्तन करतात.

कारागृहात विविध विभागात काम करणाऱ्या बंदयांना त्यांच्या कामाचा मोबदला मिळतो काय याचे विवेचन करणारे आहे. बंदयाकडून त्यांच्यामध्ये कारागृहातुन बाहेर पडल्यावर त्याने या प्रशिक्षणाचा फायदा व्हावा मिळालेल्या प्रशिक्षणाआधारे त्याने बाहेर आल्यावर उदरनिर्वाह होऊ शकतो. तसेच कारागृहात बंदयांना फक्त बसवुन ठेवण्यापेक्षा त्यांना काम दिले तर त्यांचा वेळ कसा गेला ते कळणार नाही त्यामुळे ते जास्त विचार करणार नाहीत परिणामी त्यांच्या मनावर विपरीत परिणाम होणार नाही. या विविध उद्देशाने बंदयांना काम दिले जाते पण काम करवून घेऊन त्याचा त्यांना मोबदला दिला जातो का असे संशोधकाने बंदयांना विचारल्यावर १२९ बंदयांनी होय कामाचा मोबदला मिळतो तर ०१ बंदयाने नाही असे सांगितले. कामाचा मोबदला प्रत्येकाला दिला जातो असे सांगितले गेले.

**तक्ता क्र. ६.१०**

**बंदी किती  तास काम करतात हे दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | विवरण | वारंवारिता |
|---|---|---|
| १. | ४ ते ६ | ०८ |
| २. | ६ ते १० | ११७ |
| ३. | १० ते १४ | ०३ |
| ४. | १४ ते १८ | ०२ |
| | **एकूण** | **१३०** |

कारागृहात बंद्यांना काम दिले जाते. ते बंदी किती तास एका दिवसात काम करतात या संदर्भातील विवेचन आहे. कारागृहात बंद्यांना विविध ठिकाणी काम दिले जाते हे काम करताना एका दिवसाला किती तास काम करतात या संदर्भात संशोधकाने माहिती संकलित केली.

संशोधकाने अभ्यास केलेल्या एकुण बंदयांपैकी ४ ते ६ तास काम करणाऱ्यांचे प्रमाण ०८, ६ ते १० तास काम करणारे बंदी ११७, १० ते १४ तास काम करणारे बंदी ०३, तर १४ ते १८ तास काम करणारे ०२ बंदी आढळले.कारागृहात ६ ते १० तास काम करणाऱ्या बंदयाची संख्या अधिक असुन विविध विभागात करणाऱ्या बंदयांचे प्रमाण सर्वात कमी आहे. त्यात प्रामुख्याने वॉचमन म्हणुन बंदी काम करतात.

### ❖ वेतन पध्दत व आर्थिक व्यवहार

कारागृहातील बंद्यांना देण्यात येणाऱ्या वेतन पध्दतीचा प्रमुख उद्देश म्हणजे बंद्याच्या मनात स्वावलंबनाची भावना जागृत करुन शासनास काही प्रमाणात का होईना महसूल मिळवून देणे हा आहे. २५ नोव्हेंबर १९९९ पासून शासनाने वेतनाच्या दरात सुधारणा केली असून त्यात पुढील दराने वेतन दिले जाते. १) कुशल कामगार -४० रु., २) अर्धकुशल -  ३५ रु. ३) अकुशल - २५ रु.

दैनंदिन गरजा भागविण्यासाठी त्यातील १/१० रक्कम नावावर शिल्लक ठेवून उर्वरित रक्कम दिलेल्या कुपन्सच्या माध्यमातून खर्च करता येते. या खर्चांत उपाहारगृहातील वस्तू खरेदी करणे तसेच जवळच्या नातेवाईकांना तसेच त्यांच्या न्यायालयीन कामासाठी वकिलांना मनिऑर्डरने पैसे पाठविण्याची सुविधा आहे. न्यायाधीन बंद्यांना स्वेच्छेने काम केल्यास प्रोत्साहनपर  वेतन दिले जाते. बंद्यांची १/१० राखून ठेवलेली रक्कम (बचत) त्यास कारागृहातून मुक्त होते वेळी दिली जाते. बंद्यास कारागृहातून सुटताना त्याच्या नावावर जमा असलेली संपूर्ण रक्कम परत केली जाते. जेणेकरुन कारागृहातून मुक्त झाल्यावर त्याला लगेच इतरांकडून मदत घेण्याची गजर पडू नये असा त्यामागे उद्देश आहे.

**तक्ता क्र. ६.११**

**बंद्यांना कामाचा मोबदला महिण्याला किती मिळतो हे दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र | विवरण | वारंवारिता |
|---|---|---|
| १. | ११० ते १५० रु. | १५ |
| २. | १५० ते २००रु. | १६ |
| ३. | २०० ते ३०० रु. | १५ |
| ४. | ३०० ते ७०० रु. | २९ |
| ५. | ७०० ते १०००रु. | ५५ |
| | **एकूण** | **१३०** |

बंद्यांना कामाचा मोबदला किती मिळतो याचे विवेचन करणारे आहे. कारागृहात विविध विभागात काम करत असताना त्यांना मोबदला मिळतो हा मोबदला किती मिळतो याची माहिती संशोधकाने संकलित केली. कारागृहात कामाचा मोबदला शासनाने ठरवून दिलेल्या नियमांप्रमाणे दिला जातो. कामगारांचे कुशल, अर्धकुशल, अकुशल असे वर्गीकरण केले जाते. कुशल कामांसाठी रु. ४० /-, अर्धकुशल कामासाठी रु. ३५/- तर अकुशल कामासाठी रु. २५/- एवढी मजुरी बंद्यांना दररोज दिला जातो असे सांगण्यात आले. कारण रविवारी कामासाठी सुट्टी, शासकीय सणाला कामासाठी सुट्टी असते त्यामुळे बंद्याने एका महिन्यात किती काम केले आणि तो वरीलपैकी कोणत्या प्रकारात मोडतो त्यावरुन त्याचा महिन्याला पगार होतो.

संशोधकाने बंद्यांना महिन्याला किती पगार मिळतो याची माहिती विचारली असता १०० ते १५० रु कामाचा मोबदला मिळतो असे १५ बंद्यांनी सांगितले तर १५० ते २०० रु. मोबदला मिळतो असे १६ बद्यांनी सांगितले तर २०० ते ३०० रु. मोबदला मिळतो असे १५ बंद्यांनी सांगितले तर ३०० ते ७०० रु मोबदला मिळतो असे २९ बंद्यांनी सांगितले तर ७०० ते १००० रु. मोबदला मिळतो असे ५५ बंद्यांनी सांगितले.बंद्यांना त्यांनी केलेल्या कामाची मजुरी काम केलेल्या दिवसाप्रमाणे असते. त्यामुळे ती कमी जास्त होते असे बंद्यांनी सांगितले. वरील विवेचनावरुन ७०० ते १००० रु. ही सर्वात जास्त मजुरी ५५ बंद्यांना मिळते तर ११० ते १५० ही सर्वात कमी मजूरी १५ बंद्यांना मिळते असे लक्षात येते. वरील विवेचनावरुण जाणवते की, कारागृहात काम करुन महिन्याला जास्तीत जास्त सातशे ते एक हजार रुपयापर्यंत पैसे मिळतात. सातशे ते एक हजार रु. हा मोबदला अत्यल्प आहे. बंद्यांने जे काम केले त्याची कारागृहाबाहेरील मजुरी आणि कारागृहात मिळणारा मोबदला यामध्ये मोठ्या प्रमाणावर तफावत जाणवते. यातून त्यांची आर्थिक पिळवणूक होते असे जाणवते. मिळणारा मोबदला हा अत्यंत कमी आहे असे जाणवते.

**तक्ता क्र. ६.१२**

**बंदयांना मिळणाऱ्या मोबदल्याची नोंद होते काय ? हे दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | विवरण | वारंवारिता |
|---|---|---|
| १. | होय | १३० |
| | **एकूण** | **१३०** |

बंद्यांना त्यांच्या कामाची जी मजुरी दिली जाते तिची नोंद ठेवली जाते काय याचे विवेचन आढळते. संशोधकाने बंद्यांना महिन्याकाठी त्यांना मिळणाऱ्या पगारासंदर्भात प्रश्न विचारला असता बंद्यांनी सविस्तर वर्णन सांगितले. त्याचे विवेचन वरच्या सारणीत आले आहे. जो मोबदला दिला जातो. त्याची नोंद होते का असे संशोधकाने बंद्यांना विचारले असता सर्व बंद्यानी होय पैशाची नोंद होते असे सांगितले. बंद्यांना जो महिन्याला पगार मिळतो. ही रक्कम प्रत्यक्ष बंद्याला दिली जात नाही ती कारागृह प्रशासनाकडेच प्रत्येक बंद्यांच्या नावे जमा असते.

बद्याला जर त्या रकमेतील काही रक्कम आपल्या घरी पाठवायची असेल तर M.O. करुन पाठवू शकतो. काही रक्कम कुपनच्या स्वरूपात कॅन्टीनमधून सामान खरेदी करू शकतो. पण काही ठराविक रक्कम ही बंद्याला कोणत्याच स्वरूपात दिली जात नसून ती रक्कम एकत्रितपणे बंदी आपली शिक्षा भोगून घरी परत जातानाच त्याला दिली जाते. या संदर्भात तुरुंग अधिकाऱ्यांना विचारले असता त्यांनी सांगितले बंदी शिक्षा संपून घरी जाताना जर त्याच्याजवळ पैसे नसतील तर गावी गेल्याबरोबर त्याच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण होतो. ताबडतोब काम मिळेलच असे नाही. अशा वेळी बंद्याने काम करुन मिळवलेला पैसा त्याची मदत करतो. त्यामुळे आम्ही बंद्याला सर्व रक्कम खर्च करण्यासाठी देत नाही असे तुरुंग प्रशासनाने सांगितले.

**तक्ता क्र.६.१३**

**बंद्यांना प्रथमोपचार तात्काळ मिळतो काय हे दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | होय | १९४ | ९७ % |
| २. | नाही | ६ | ३ % |
| | **एकूण** | **२००** | **१०० %** |

कारागृहात बंद्यांना काही इजा झाल्यास किंवा काही आजाराची चिन्हे दिसताच ताबडतोब प्रथमोपचार मिळतो काय याचे विवेचन लक्षात येते. कारागृहात बंदी अनेक विभांगात काम करतात. काम करताना जर त्यांना काही इजा झाली तर त्यांना प्रथमोपचार ताबडतोब मिळतो काय असे संशोधकाने बंद्याना विचारले असता (१९४) ९७ टक्के बद्यांनी होय ताबडतोब प्रथमोपचार मिळतो असे सांगितले तर फक्त (०६) ३ टक्के बद्यांनी नाही ताबडतोब प्रथमोपचार मिळत नाही असे सांगितले.

प्रथमोपचारा संदर्भात बंद्याना सविस्तर विचारले असता बंद्यांनी सांगितले कारागृहातील बंद्यांची काळजी घेण्यासाठी कारागृहात स्वतंत्र दवाखाना असुन दोन डॉक्टर दररोज हजर असतात. कारागृहातील कोणत्याही बद्यास काही इजा झाल्यास किंवा काही आजाराची चिन्हे दिसताच ताबडतोब प्रथमोपचार केला जातो असे सांगितले. जर एखादी गंभीर इजा असेल किंवा आजार असेल अशा वेळी बंद्यांना ताबडतोब शासकीय रुग्णालयात पाठवले जाते व त्याच्यावर उपचार केले जातात असे बंद्यांनी सांगितले.

वरील विवेचनावरुन बंद्यांना ताबडतोब प्रथमोपचार मिळतो असे जाणवले व बहुसंख्य बद्यांनी तसेच सांगितले.

### ❖ शैक्षणिक सुविधा

कारागृहात बंद्यांसाठी ग्रंथालय असते तसेच बंद्यांना त्यांच्या खाजगी रकमेतून वर्तमानपत्रे दिली जातात. शासन खर्चाने कारागृहातत शिक्षकांची सोय केलेली असते. निरक्षर बंद्यांना साक्षर करण्याबाबत सतत प्रयत्न चालू असतात. त्यासाठी कारागृहामध्ये कायम स्वरुपी शिक्षकांची नेमणूक केलेली असते. तसेच साक्षर बंद्यांना उच्च शिक्षणासाठी कारागृह प्रशासनाची प्रोत्साहनपर सर्वांगीण मदत होते. अशी अनेक उदाहरणे आहेत की, कारागृहात बंद्यांने कला विषयात स्नातक, स्नातकोतर तसेच कायदा विषयात स्नातकाची पदवी प्राप्त केली आहे. काही कारागृहांत शासनातर्फे तर काही सेवाभावी संस्थांमार्फत संगणकाचे प्रशिक्षण देण्याचे कार्य सुरू झालेले आहे. परीक्षेला बसण्यासाठी विशेष सवलत, अभिवचन रजा शासनातर्फे दिलेली आहे. या सर्व उपक्रमांमागे बद्यांचे पुढील आयुष्य सुखाचे जावे असा कारागृह प्रशासनाचा उद्देश असतो.

या संदर्भात उदाहरण द्यावयाचे झाल्यास, येरवडा मध्यवर्ती कारागृहातील आफ्रिकन बंदी हॅरिसन कुडजो यांच्या कवितेला अमेरिकन शासनाने पुरस्कृत केले आहे. तसेच नागपूर मध्यवर्ती कारागृहातील बंदी गणेश श्रावण चौधरी यास त्याच्या 'तुर्तास' या कविता संग्रहास महाराष्ट्र शासनाने पुरस्कृत केले आहे. बंदी हा कारागृहात सुखाने व समाधानाने राहत असून आपल्याजवळील कलागुणांचा विकास करू शकतो हे या वरील उदाहरणांवरुन दिसून येईल. तसेच नागरी जीवनाची ओळख, ग्रामपंचायती सामूहिक विकास

योजना, पंचवार्षिक योजना, कुटीरउद्योग इत्यादी विविध विषयांवर त्या त्या विषयातील तज्ज्ञांकडून भाषणे आयोजित केली जातात. तसेच नीती-शिक्षणाचे पाठही आयोजित केले जातात.

**तक्ता क्र. ६.१४**

**बंदी कारागृहात सध्या शिक्षण घेतात काय हे दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | शिक्षण घेत आहेत | ०५ | २.५ % |
| २. | शिक्षण घेत नाहीत | १९५ | ९७.५ % |
| | **एकूण** | **२००** | **१०० %** |

कारागृहात शिक्षा भोगणारे बंदी सध्या शिक्षण घेत आहेत काय याचे विवेचन करणारी आहे. शिक्षण ही मानवी जीवनातील अत्यंत महत्त्वपुर्ण प्रक्रिया आहे. व्यक्ती जन्मापासून मृत्यूपर्यंत अनौपचारिक आणि औपचारिक अशा दोन्ही पध्दतीने शिक्षण घेत असतो. त्यातून त्याला प्रत्येक वेळी नवीन शिकायला मिळत असते. त्यामुळे त्याच्या वर्तनात बदल होतो. पर्यायाने जीवनमानातही बदल होतो. येथे संशोधकाने औपचारिक शिक्षण हाच संदर्भ घेऊण बंद्यांच्या सध्याच्या शिक्षणासंदर्भात माहिती संकलित केली.

बंदी कारागृहाच्या बाहेर असतान जर त्याला औपचारिक शिक्षणाची पार्श्वभूमी असेल आणि शिक्षणाचे महत्त्व त्याला समजलेले असेल तर त्याला शिक्षणाबद्दल अधिक माहिती सांगण्याची गरज पडत नाही. संधी मिळेल तेव्हा तो त्याचा लाभ घेतो. कारागृह प्रशासन कारागृहातील बंद्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन देते. ज्यांना शिक्षणाची आवड आहे त्यांना शिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहन देऊन त्यासाठी लागणारे साहित्यही पुरवले जाते. संशोधकाने बंद्यांना आता शिक्षण घेतात काय संदर्भात प्रश्न विचारला असता संशोधकाने अभ्यासलेल्या एकूण बंद्यापैकी (१९५) ९७.५ टक्के बंद्यांनी आम्ही सध्या  शिक्षण घेत नाही असे सांगितले तर फक्त (०५) २.५ टक्के बंद्यांनी होय सध्या आम्ही शिक्षण घेत आहोत असे सांगितले. पाच बंदी मुक्त विद्यापीठाअंतर्गत सध्या शिक्षण घेत आहेत असे सांगितले. बहुसंख्य बंदी शिक्षण घेत नाहीत असे वरील विवेचनावरुण लक्षात येते. या संदर्भात संशोधकाने बंद्यांना सविस्तर विचारले असता बंद्यांने सांगितले की आता आमचे शिक्षणाचे वय नाही असे काहीनी सांगितले आम्ही अगोदरही शिक्षण घेतलेले नाही म्हणजे आम्ही अशिक्षीत आहोत असे काहींनी सांगितले. आता शिक्षण घेऊन काय फायदा होणार आहे? काहीच नाही जर आम्ही आता शिक्षण घेतले तरी बाहेर गेल्यावर त्या शिक्षणाचा त्याला उपयोग

होईलच असे नाही. काहींनी तर सांगितले आज शिक्षण घेऊन काहीच उपयोग नाही फक्त वर्षे वाया घालणे आहे. फक्त लिहिता, वाचता येण्यापुरते शिक्षण पाहिजे. पुढे शिक्षण घेण्याची गरज नाही. कारण आज उच्च शिक्षण घेऊनही प्रत्येकाला नोकरी लागतेच असे नाही. नौकरीसोठी आज लाखो रुपये सांगितले जातात एवढे पैसे आणायचे कोठून ? आज आमची मुले शिक्षण घेत आहेत पण त्या शिक्षणातून त्यांना नोकरी लागेल असे वाटत नाही. कारण नोकरीसाठी पैसे भरण्याची ऐपत आमची नाही मुलांना उच्च शिक्षण देऊन नोकरी नाही लागली तर त्याची दुसरे काम करण्याची मानसिकताही राहत नाही. त्यामुळे शिक्षण पध्दतीविषयी आणि शिक्षणाच्या बाजारामुळे ,भ्रष्टाचारामुळे शिक्षण नकोसे वाटते असे बंद्यांनी संशोधकास सविस्तर सांगितले.

**तक्ता क्र.६.१५**

**बंदी कारागृहात सध्या कोणते शिक्षण घेतात ते दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र | विवरण | वारंवारिता |
|---|---|---|
| १. | पत्रकारिता | ०२ |
| २. | सातवी | ०१ |
| ३. | चौथी | ०१ |
| ४. | बी.ए | ०१ |
| | **एकूण** | **०५** |

बंदी कारागृहात मुक्त विद्यांपीठाअंतर्गत जे शिक्षण घेतात ते कोणते शिक्षण आहे याचे विवेचन लक्षात येते. संशोधकाने अभ्यासलेल्या बंद्यांपैकी केवळ पाच बंद्यांनी आम्ही सध्या शिक्षण घेत आहोत असे सांगितले या पाच बंद्यांना संशोधकाने या संदर्भात सविस्तर माहिती विचारली असता पत्रकारितेचा अभ्यासक्रम (०२), सातवी ०१, चौथी ०१, बी.ए. ०१ अशा प्रकारचे हे पाच बंदी शिक्षण घेत आहेत.

पत्रकारितेचे शिक्षण घेणाऱ्या बंद्यांची संख्या इतर अभ्यासक्रमांच्या शिक्षणापेक्षा जास्त आहे असे जाणवते. कारागृहात जे बंदी शिक्षण घेतात त्यांना शैक्षणिक साहित्य पुरवले जाते काय ? याचे विवेचन लक्षात येते. त्यांना शिक्षणासाठी लागणारे साहित्य त्यात पुस्तके, वही, पेन इ. साहित्य कारागृह प्रशासनाकडुन पुरवले जाते काय या संबंधी संशोधकाने जे बंदी सध्या शिक्षण घेत आहेत त्यांना विचारले असता शैक्षणिक साहित्य पुरवले जाते असे ०४ बंद्यांनी सांगितले तर ०१ बंद्याने नाही शैक्षणिक साहित्य पुरवले जात नाही असे सांगितले.

### ❖ बंद्यांसाठी होणारे विविध कार्यक्रम

व्यक्तींचे मानसिक आरोग्य चांगले राहण्यासाठी समाजात होणाऱ्या अनेक सांस्कृतिक कार्यक्रमांत तो सहभागी होत असतो. त्यात विविध सामाजिक, सांस्कृतिक, मनोरंनात्मक कार्यक्रमातून व्यक्ती मानसिक समाधान शोधण्याचा प्रयत्न करतो. समाजातील अनेक संस्था अशा कार्यक्रमांचे आयोजन आणि नियोजन करीत असतात. कायद्याच्या नियमांचे उल्लंघन करुन व्यक्ती जेव्हा शिक्षा भोगण्यासाठी कारागृहात येतो तेव्हा त्याचे सर्वात महत्त्वपूर्ण म्हणजे व्यक्तिगत स्वातंत्र्य हिरावून घेतले जाते हीच मोठी शिक्षा मानली जाते. पण कारागृहात शिक्षा भोगत असताना कुटुंब, समाज यापासून दूर राहिल्याचा विपरीत परिणाम बंद्यावर होऊ शकतो. त्यातून त्यांचे आरोग्य बिघडू शकते. बंदी ज्या परिस्थितीमुळे येथे आला त्याला येथे शिक्षा भोगण्याबरोबर त्याची जी गुन्हेगारी प्रवृत्ती, जी मानसिकता असते ती बदलण्यासाठी त्यांना काम दिले जाते. तसेच विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.

संशोधकाने मध्यवर्ती कारागृहातील बंद्यांचा अभ्यास केल्याने बंद्यासाठी कारागृहात कोणकोणते कार्यक्रम आयोजित केले जातात त्या सबंधीची माहिती संकलित केली. २ ऑक्टोबर हा महात्मा गांधी जयंतीदिन बंदी कल्याण दिन म्हणून कारागृहात साजरा केला जातो. या दिवशी विविध सामूहिक कार्यक्रमांचे आयोजन करुन खाण्यासाठी गोड पदार्थ दिले जातात. तसेच १५ ऑगस्ट, २६ जानेवारी अशा राष्ट्रीय सणाच्या दिवशी राष्ट्रीय एकात्मतेचे कार्यक्रम आयोजित केले जातात. तसेच रमजान, नाताळ इ. धार्मिक सनही सामुहिकपणे साजरे केले जातात. रमजाननिमित्त कारागृहात मौलवीना बोलावून नमाज आणि सामूहिक व्याख्यानाचा कार्यक्रम आयोजित केला जातो. तसेच प्रजापती ब्रम्हकुमारी यांचेही व्याख्यान आयोजित केले जाते. त्यातून बंद्यांना विविध विषयांवर व्याख्यानांद्वारे बौध्दिक मेजवानी मिळते. दर रविवारी सभागृहात आसाराम बापूंच्या प्रवचनाचा कार्यक्रम आयोजित केला जातो. तसेच कारागृहामार्फत अनेक सांस्कृतिक कार्यक्रम जसे गीत गायन, मनोरंजन, नाटके अशा कार्यक्रमांचे आयोजन केले जाते पण मागील दोन वर्षांपासून अशा मनोरंजनात्मक कार्यक्रमांचे प्रमाण कमी झाले असून ते पूर्वीप्रमाणे व्हावे असे अनेक बंद्यांनी सांगितले.

शहरातील काही निमशासकीय संस्था(N.G.O.) बंद्यांसाठी रक्षाबंधनानिमित्त राखी बांधण्याचा कार्यक्रम आयोजित करतात. तसेच योगा, विपश्यना यांचे कार्यक्रमही आयोजित केले जातात. (N.G.O.)मार्फत आज बंद्याना संगणक प्रशिक्षण देण्याचा उपक्रम चालू आहे असे सांगण्यात आले. निमशासकीय संस्थांमार्फत अत्यंत मर्यादित कार्यक्रम होतात. कारागृहात बंद्यामध्ये मानसिक परिवर्तन होण्यासाठी जे विविध कार्यक्रम होतात त्यांचे प्रमाण अत्यंत कमी असून जे कार्यक्रम होतात ते धार्मिक

कार्यक्रम असतात. त्या कार्यक्रमांत त्या त्या धर्माच्याच व्यक्ती सहभागी होतात. सर्व बंद्यांना समावेशक असा कार्यक्रम सहसा होत नाही अशी खंत बंद्यांनी व्यक्त केली. आणि ते व्हावेत याचा सकारात्मक परिणाम बंद्यांवर होतो असे बंद्यांनी सांगितले. अशा विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून बद्यांचे मनोरंजन आणि मानसिक परिवर्तन करण्याचा प्रयत्न केला जातो.

बंद्यांच्या वैयक्तिक आवडींना कारागृहात प्राधान्य दिले जाते. कारागृहात ज्ञानेश्वर वाघमारे हा ३० वर्षांचा युवक जन्मठेपेची शिक्षा भोगत आहे. पत्नीने आत्महत्या केली पण ३०२ खून केल्याचा आरोप ठेवून शिक्षा लागली असे ज्ञानेश्वरने सांगितले. ज्ञानेश्वर बी.ए., आय.टी.आय. शिक्षण घेतलेला असुन स्वतःचे इलेक्ट्रिकलचे दुकान होते. हे करत असतांना त्यांना पेंटिगचा छंद होता. तो त्यांनी पुढेही तसाच जोपासला. कारागृहात आल्यावरही त्यांनी  हा छंद जोपासला आहे.

बंगलोर येथे जानेवारी २०१० मध्ये भारताच्या कारागृह मंत्रालयाने विविध राष्ट्रीय स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत ज्ञानेश्वर पेंटिंग काढण्यसाठी पाठवण्यात आले. तेथे ज्ञानेश्वरने ड्रॉईंगचे १०,०००/- रुपयांचे बक्षीस पटकावले. कारागृहातील बऱ्याच पाट्या ज्ञानेश्वरने रंगवल्या असून बोर्डही तयार केल्याचे संशोधकला आढळून आले. थोडक्यात कारागृहात बंद्यांच्या वैयक्तिक कलागुणांना वाव दिला जातो असे जाणवते. काही बंद्यानी संशोधकाला सांगितले आम्ही इतर कारागृहात (ठाणे, पुणे, नाशिक, कोल्हापुर, नागपुर ) येथून बदलीवर आलो आहोत. तेथे बंद्यांसाठी विशेष सामुहीक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. पण येथे तसे आढळून आले नाही असे सांगितले म्हणजे सांस्कृतिक कार्यक्रम कारागृह प्रशासनामार्फत आयोजित केले जात नाहीत असे जाणवते. फक्त निमशासकीय संस्थांचेच काही कार्यक्रम होतात असे जाणवते.

**तक्ता क्र.६.१६**

**बंद्यांसाठी कारागृहात होणारे सामुहीक कार्यक्रम कोणते घेतले जातात हे दर्शविणारा तक्ता**

| **अ.क्र** | **विवरण** | **वारंवारिता** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १. | आसाराम बापु | ३० | १५ % |
| २. | राष्ट्रीय कार्यक्रम | ०२ | १ % |
| ३. | ईद | ०१ | ०.५ % |
| ४. | भजन | ०१ | ०.५ % |
| ५. | जयंत्या | ०१ | ०.५ % |
| ६. | सांस्कृतिक कार्यक्रम | ०१ | ०.५ % |
| ७. | वरील सर्व | १०८ | ५४ % |
| ८. | कार्यक्रम होत नाहीत | ५६ | २८ % |
| | **एकूण** | **२००** | **१०० %** |

कारागृहात होणाऱ्या विविध कार्यक्रमांचे वर्णन करणारी आहे. कारागृहे ही आज कारागृहे न राहता सुधारलये बनली आहेत. कारागृहात आज बंद्यांना शिक्षा देण्याऐवजी त्यांच्यामध्ये सुधारणा करण्यासाठी प्रयत्न केले जातो. विविध कार्यक्रमांचे नियोजन आणि आयोजन करुन त्यांचा फायदा बंद्यांमध्ये मानसिक परिवर्तनात होतो. संशोधकाने कारागृहात बंद्यांच्या परिवर्तनासाठी काय काय कार्यक्रम आयोजीत केले जातात या संदर्भात तथ्ये संकलित केली. प्रत्यक्ष बंद्यांना त्या संदर्भात माहिती विचारली. तुरुंग अधिकाऱ्याकडून माहिती संकलित केली. प्रत्यक्ष बंद्यांनी सांगितले. की कारागृहात आसाराम बापूचे प्रवचन (३०) १५ टक्के सर्व राष्ट्रीय कार्यक्रम (०२) १ टक्के, ईद (०१) ०.५ टक्के, भजन ०१ (०.५ टक्के) सर्व महापुरुषांच्या जयंत्या (०१) ०.५ टक्के,विविध सांस्कृतिक कार्यक्रम त्यात गाणे, रक्षाबंधन असे ०१ (०.५ टक्के) तर वरील सर्व कार्यक्रम होतात असे (१०८) ५४ टक्के बंद्यांनी सांगितले तर (५६) २८ टक्के बंद्यांनी कार्यक्रम होत नाहीत असे सांगितले.

वरील विश्लेषणावरुण विविध कार्यक्रम कारागृहात होतात असे बहुसंख्य बंद्यांनी सांगितले. त्या विविध कार्यक्रमात सर्व धार्मिक सण राष्ट्रीय सण ,जयंत्या,आसाराम बापूचे प्रवचन असे विविध कार्यक्रम कारागृहात साजरे केले जातात. असे संशोधकाने अभ्यासलेल्या बंद्यापैकी बहुसंख्य बंद्यांनी सांगितले. २८ टक्के बंद्यांनी कार्यक्रम होत नाहीत असे सांगितले. त्या संदर्भात सविस्तर विचारले असता बंद्यांनी सांगितले की नेहमीचे सण साजरे केले जातात. पण आमच्यासाठी काही विशेष कार्यक्रमांचे आयोजन केले जात नाही. फक्त रविवारी आसाराम बापूंचे प्रवचन कार्यक्रम होतो. त्यात मोजकेच लोक सहभागी होतात. सर्व बंद्यांना कोणलाच कार्यक्रमात सहभागी करुन घेतले जात नाही. राष्ट्रीय सणाच्या दिवशी फक्त गोड खाण्यासाठी देतात, पण विशेष असे कोणतेच कार्यक्रम होत नाहीत असे सांगितले.

**तक्ता क्र.६.१७**

**कारागृहात होणाऱ्या कार्यक्रमांत बंदी सहभागी होतात का ते दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | होय | १०० | ५० % |
| २. | नाही | १०० | ५० % |
| | **एकूण** | **२००** | **१०० %** |

कारागृहात बंद्यासाठी होणाऱ्या विविध कार्यक्रमांत बंदी सहभागी होतात काय याचे विवेचन करणारे आहे. कारागृहात जे विविध कार्यक्रम साजरे होतात त्यात प्रवचन, भजन, कीर्तन,राष्ट्रीय सण , धार्मिक सण त्यात बंदी स्वत: सहभागी होतात काय या संदर्भातील तथ्य संशोधकाने अभ्यासलेल्या एकूण

बंद्यांपैकी (१००) ५० टक्के बद्यांनी सांगितले. आम्ही त्यात सहभागी होत नाही. या संदर्भात संशोधकाने बंद्यांना सविस्तर विचारले असता बंद्यांनी सांगितले की सामूहिक सर्वासाठी एकत्रित असे कार्यक्रम सहसा कारागृहात होत नाहीत. राष्ट्रीय सणाला फक्त मिष्टांन्न दिले जाते. धार्मिक सणादिवशी विशिष्ट गोड पदार्थ दिले जातात. पण मानसिक परिवर्तनासाठी मनोरंजनासाठी अध्यात्मिक , योगा असे कोणतेच कार्यक्रम कारागृहात होत नाहीत. त्यामुळे त्यात सहभागी होण्याचा प्रश्नच येत नाही. जर कधी एखादा कार्यक्रम आयोजित केला तरी सर्व बंद्यांना त्याचा लाभ होत नाही. असे बंद्यांनी सांगितले. या संदर्भात तुरुंग अधिकाऱ्यांना विचारले असता काही रक्षाबंधन, प्रवचनासारखे कार्यक्रम आयोजित करतात. सर्व बंद्यांना एकदाच एकत्रितपणे अशा कार्यक्रमात सुरक्षेबाबत बाहेर काढले जात नाही. कारण कारागृहात क्षमतेपेक्षा अधिक कैदी राहतात. त्यामुळे सुरक्षेच्या दृष्टीने सर्वांना बाहेर कार्यक्रमांसाठी काढणे शक्य नाही असे सांगण्यात आले.

**तक्ता क्र.६.१८**

**बंद्यांसाठी होणाऱ्या कार्यक्रमांतून बंद्यांना मानसिक समाधान मिळते काय ते दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | मिळते | १२५ | ६२.५ % |
| २. | मिळत नाही | ७५ | ३७.५ % |
| | **एकूण** | **२००** | **१०० %** |

कारागृहात जे काही विविध कार्यक्रम साजरे केले जातात त्यातून मानसिक समाधान मिळते काय याचे विश्लेषण लक्षात येते. कारागृहात जे विविध कार्यक्रम साजरे केले जातात त्यातून बंद्यांना मानसिक समाधान मिळते का नाही या संदर्भात संशोधकाने बंद्यांना विचारले असता (१२५) ६२.५ टक्के बंद्यांनी होय आम्हाला या विविध कार्यक्रमांतून मानसिक समाधान मिळते तर (७५) ३७.५ टक्के बंद्यांनी नाही असे सांगितले.

वरील विश्लेषणातून असे निदर्शनास येते की कारागृहात होणाऱ्या विविध कार्यक्रमांतून बहुसंख्य बंद्यांना मानसिक समाधान मिळते. अर्थात कारागृहात जे काही कार्यक्रम होतात त्यामध्ये समाधान मानणाऱ्यांचे प्रमाण अधिक जाणवते. कारण कारागृहात फक्त चार भिंतीत राहताना जो मानसिक त्रास होतो त्यातून काही काळ मनाला आनंद म्हणून असे जे विविध कार्यक्रम होतात त्यांचा लाभ मिळातो असे जाणवते. पण जे काही कार्यक्रम होतात त्यापेक्षा अधिक कार्यक्रम झाले तर त्याचा सकारात्मक परिणाम मोठ्या स्वरूपात होऊ शकतो. त्यासाठी कारागृह प्रशासनाने त्या पध्दतीने प्रयत्न करणे गरजेचे आहे.

**बंद्यासाठी खेळ व करमणूक**

बंद्यांना साधारणतः त्यांच्या कामावरून परत आल्यावर करमणूक म्हणुन व्हॉलिबॉल, कबड्डी असे खेळ खेळण्यासाठी नियमात तरतूद आहे. मैदानी खेळांमुळे बंद्याचे आरोग्य, त्यांच्या मनाची प्रसन्नता तसेच सांघिक व सहकार्याची भावना उत्पन्न होऊन त्यांच्या एकूण वागण्यात फरक पडावा हा उद्देश असतो. बंद्यांना इनडोअर गेम्स जसे की बुध्दिबळ, कॅरम इत्यादी सुविधा पुरविली जाते. बंद्यास कारागृहाच्या आत किंवा व चांगल्या वर्तवणुकीच्या बंद्यांना बाहेर स्पर्धेसाठी कारागृह महानिरीक्षक यांच्या परवानगीने पाठविण्याची सोय आहे. बंद्यांना करमणुकीसाठी कारागृहात दूरदर्शन संच, रेडिओची व्यवस्था शासनातर्फे करण्यात येते. तसेच बंद्यांना कारागृहात स्त्रीपात्रविरहित नाटक व इतर विविध गुणदर्शन कार्यक्रम करण्याची परवानगी असते.

**तक्ता क्र.६.१९**

**कारागृहात बंदी फावल्या वेळात काय करतात ते दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | पेपर | २६ | १३ % |
| २. | आराम | ११० | ५५ % |
| ३. | काम | ०६ | ३ % |
| ४. | कॅरम | ०७ | ३.५ % |
| ५. | टी.व्ही. | ०४ | २ % |
| ६. | फिरणे | ०६ | ३ % |
| ७. | नामस्मरण | १५ | ७.५ % |
| ८. | हरिपाठ | ०१ | ०.५ % |
| ९. | मनोरंजन | ०१ | ०.५ % |
| १०. | विचार करणे | ०२ | १ % |
| ११. | नमाज | ०१ | ०.५ % |
| १२. | वरील सर्व | २१ | १०.५ % |
| | **एकूण** | **२००** | **१०० %** |

बंदी कारागृहात राहत असताना त्यांना काही काम दिले जाते म्हणजे विविध विभागांत हे बंदी काम करतात. कामाचे ठराविक तास असतात. त्या ठराविक वेळेनंतर बाकी वेळेत काय करतात या संबंधीचे विवेचन आढळते. संशोधकाने बंद्यांना दिवसभरात काम केल्यानंतर जो वेळ शिल्लक राहतो त्या फावल्या वेळात काय करतात. या उत्सुकतेपोटी ही माहिती संकलित केली. कारण बंद्याला बॅरेक्स मध्ये राहावे लागते. फक्त कामासाठीचाच वेळ बॅरेक्समधून बाहेर म्हणजे कारागृहातच जेथे कामाचे ठिकाण आहे तेथे

जावे लागते. पण काम संपल्यानंतरच्या वेळेत बंदी काय करतात असा प्रश्न विचारला असता संशोधकाने अभ्यासलेल्या बंद्यांपैकी पेपर वाचतो असे (२६) १३ टक्के, आराम करतो असे (११०) ५५ टक्के, काम करतो असे (०६) ३ टक्के,कॅरम खेळतो असे (०७) ३.५ टक्के , टी.व्ही. पाहतो असे (०४) २ टक्के,फिरतो असे (०६) ३ टक्के,देवाचे नामस्मरण करतो असे (१५) ७.५ टक्के, हरिपाठ करतो असे (०१) ०.५ टक्के, मनोरंजन (०१) ०.५ टक्के, विचार करतो असे (०२) १ टक्के, नमाज पडतो असे (०१)०.५ टक्के, तर वरील सर्व असे एकत्रितपणे मिळुण (२१) १०.५ टक्के बंद्यांनी सांगितले.

वरील विवेचनावरुन असे निदर्शनास येते की कामानंतरचा वेळ बहुसंख्य बंदी आराम करण्यात घालवतात. कारण काम करुन थकवा येतो. त्यामुळे रिकाम्या वेळेत आराम करतो असे सांगितले तर बाकी बंदी पेपर,कॅरम,टी.व्ही, नामस्मरण ,विचार करतात अशा प्रकारे आपला वेळ घालवतात.

**तक्ता क्र. ६.२०**

**बंद्यांची आवड दर्शवणारा तक्ता**

| अ.क्र | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | वाचन | ४२ | २१ % |
| २. | लिखाण | ०२ | १ % |
| ३. | पेंटिंग | ०२ | १ % |
| ४. | काम | १७ | ८.५ % |
| ५. | नामस्मरण | ४१ | २०.५ % |
| ६. | व्यायाम/अभ्यास | ०१ | ०.५ % |
| ७. | खेळ | ०३ | १.५ % |
| ८. | धार्मिक कार्यक्रम | ३१ | १५.५ % |
| ९. | गाणे ऐकणे | ०२ | १ % |
| १०. | टी.व्ही.पाहणे | ०८ | ४ % |
| ११. | आवड नाही | ५१ | २५.५ % |
| | **एकूण** | **२००** | **१०० %** |

बंद्यांची काय काय आवडी आहेत याचे विवेचन करतो. प्रत्येक व्यक्तीला काही गोष्टीची आवड असते. ती आवड जोपासण्याचा प्रयत्न प्रत्येक व्यक्ती करत असते. पण कारागृहात आल्यावर त्याच

आवडी पुढे कायम राहतात काय किंवा दुसऱ्या काही आवडी निर्माण होऊन परिस्थितीनुरूप समायोजन करावे लागते या संदर्भातील माहिती संशोधकाने घेतली.

संशोधकाने अभ्यासलेल्या बंद्यांपैकी आपली आवड सांगत असताना वाचनाची आवड (४२) २१ टक्के,लिखाणाची आवड (०२) १ टक्के, नामस्मरण करण्याची आवड (४१) २०.५ टक्के, व्यायाम आणि अभ्यासाची आवड (०१) ०.५ टक्के, खेळाची आवड (०३) १.५ टक्के,धार्मिक कार्यक्रमांची आवड (३१) १५.५ टक्के,गाणे ऐकणे (०२) १ टक्के,टी.व्ही.पाहणे (०८) ४ टक्के, व कोणतीच आवड नाही (५१) २५.५ टक्के असे विश्लेषण बंद्यांनी सांगितले. वरील विवेचनात कोणतीच आवड नसणाऱ्यांचे प्रमाण सर्वात अधिक २५.५ टक्के असे आहे. त्या संदर्भात सविस्तर विचारले असता बरेच बंदी सांगतात कारागृहात आल्यावर सर्व आवडी विसरुन गेल्या. कारण एखादी घटना हातून घडली आणि आपल्या कुटुंब,नातेवाईक,मित्र यापासून दूर राहिल्याने मनात हमेशा विचार येतात. त्यामुळे आता कोणतीच आवड राहिली नाही. फक्त जेवढी शिक्षा राहिली आहे ती कारागृहात काढणे एवढाच उद्देश आमचा आहे असे बंद्यांनी सांगितले. जे बंदी आपली आवड पूर्ण करण्याचा प्रयत्न करतात त्यांनी सांगितले की येथे वेळ जात नाही. मनामध्ये बरेच विचार येतात. त्यातून दु:ख होते. त्यामुळे मन गुंतवण्यासाठी आम्ही वेगवेगळ्या आवडी निर्माण करुन घेतल्या आहेत व वेळ काढत आहोत. कारण जेवढी शिक्षा राहिली आहे तेवढे दिवस येथे काहीच न करता राहणे म्हणजे ही दुसरी शिक्षाच आम्हाला वाटते. त्यासाठी मन रमण्यासाठी काही तरी करुन वेळ घालवण्याचा प्रयत्न आम्ही करतो असे बंद्यांनी सांगितले.

**तक्ता क्र ६.२१**

**बद्यांना कारागृह कर्मचाऱ्यांकडून मिळणारी वागणूक कशी आहे हे दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | चांगली | १७५ | ८७.५ % |
| २. | वाईट | ०१ | ०.५ % |
| ३. | मध्यम | २२ | ११ % |
| ४. | आडमूठी | ०२ | १ % |
| | **एकूण** | **२००** | **१०० %** |

कारागृहातील कर्मचारी बंद्यांना कशा प्रकारची वागणूक देतात याचे विवेचन आढळते. कारागृह व्यवस्थेत काम करणारा अत्यंत महत्त्वपुर्ण घटक म्हणजे कारागृहातील कर्मचारी होय यामध्ये शिपायापासुन

तुरुंग अधिकारी यापर्यंत सर्व कर्मचाऱ्यांचा समावेश होतो. कर्मचारी बंद्यांच्या पुनर्वसनात अत्यंत महत्त्वपुर्ण भूमिका पार पडतात. जर कर्मचाऱ्यांनी चांगल्या पध्दतीने बंद्यांसोबत वर्तन केले तर बंद्यांमध्ये सहकार्याची भावना जागृत होते. जर बंद्यांसोबत चांगले वर्तन होत नसेल तर विरोधाची भावना त्यांच्यात निर्माण होते.

संशोधकाने बंद्यांना कर्मचारी कशा पध्दतीची वागणूक देतात या संबंधीची माहिती संकलित केली असता संशोधकाने अभ्यासलेल्या एकूण बंद्यांच्या (१७५) ८७.५ टक्के बंद्यांनी सांगितले. कारागृहातील सर्व कर्मचारी आम्हाला अतिशय चांगली वागणूक देतात म्हणजे आमच्याशी सौजन्याने वागतात. वेळप्रसंगी रागावतात पण पुन्हा आमच्याशी चांगले बोलतात असे सांगितले (०१) ०.५ टक्के बंद्यांनी सांगितले. वाईट वागतात म्हणजे हमेशा आरडाओरड करुन बोलतात अपमान करुन बोलतात असे सांगितले तर (२२) ११ टक्के बद्यांनी सांगितले. मध्यम स्वरूपाची वागणुक देतात म्हणजे कधी प्रेमाने बोलतात कधी अपमान करतात,कधी रागावतात असे संतुलित वर्तन करतात. तर (०२) बद्यांनी सांगितले कर्मचारी आमच्याशी आडमुठ्यासारखे वागतात असे बंद्यांनी सांगितले.

वरील विवेचनावरुण कारागृहातील सर्व कर्मचारी बद्यांशी प्रेमाने वागतात. चांगली वागणूक देतात असे बहुसंख्य बंद्यांनी सांगितले म्हणजे कारागृहातील कर्मचारी आणि बंदी यांच्यातील संबंध अतिशय चांगले आणि सहकार्याचे आढळले. वेळप्रसंगी कर्मचारी बंदयांना रागावतात,समाजावुन सांगतात आणि जास्त अतिरिक्त वर्तन बंदी करीत असेल तर त्याला थोडी फार शिक्षा देतात असे जाणवले.

**तक्ता क्र. ६.२२**

**बंद्यांना घर आणि कारागृह यातील कोणता फरक जाणवतो ते दर्शविणारा तक्ता**

| **अ.क्र.** | **विवरण** | **वारंवारिता** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १. | घर ते घर | १६८ | ८४ % |
| २. | मन व इच्छा बांधल्यासारख्या | ३२ | १६ % |
| | **एकूण** | **२००** | **१०० %** |

बद्यांना घर आणि कारागृह यांच्यातील फरकाचे विवरण लक्षात येते. समाजात वावरत असताना कुटुंब कुटुंबातील व्यक्ती, मित्र, नातेवाईक यांचा सहवास अत्यंत महत्त्वपुर्ण असतो. कारण प्रत्येक जण एकमेकांच्या सुख दु:खात सहभागी होत असतात. त्यामुळे घर त्यातील व्यक्ती याबद्दलची आत्मीयता खूप असते. एखाद्या विघातक कृत्यामुळे कारागृहात शिक्षा भोगावी लागल्याने कारागृहात राहत असताना कारागृहातील वातावरण कुटुंबातील वातावरणासारखे असते असे म्हणजे असताना त्या संदर्भात बंद्यांच्या

काय प्रतिक्रिया आहेत. त्या संशोधकाने जाणण्याचा प्रयत्न केला. संशोधकाने अभ्यासलेल्या बंद्यांपैकी (१६८) ८४ टक्के बद्यांनी सांगितले की घर ते घर असते. कारण कारागृह हे जरी कुटुंबासारखे असले तरी घर असत नाही. कारण घरात राहणारी माणसे त्यांच्यामधील प्रेम, आपुलकी,जिव्हाळा,गरजा पूर्ण करणे, एकमेकांबद्दल समर्पणाची भावना,जिव्हाळा कुटुंबात राहतो तो कारागृहात राहत नाही. कारागृहात फक्त माणसे राहतात पण जेवढी प्रेम,आपुलकी जशी घरात असते तशी येथे असत नाही. म्हणून घर ते घर असते असे सांगून घर आणि कारागृह यांच्यातील महत्त्वपूर्ण फरक ८४ टक्के बंद्यांनी सांगितले. तर (३२) १६ टक्के बंद्यांनी सांगितले. कारागृहात मन,इच्छा बांधल्यासारख्या होतात. घरामध्ये तसे असत नाही असा फरक १६% बंद्यांनी सांगितला.

वरील विवेचनावरुन घर ते घर असे सांगणाऱ्या बंद्यांचे प्रमाण सर्वात अधिक असून मन,इच्छा बांधल्या जातात यांचे प्रमाण सर्वात कमी आढळते. अर्थात कारागृह हे कारागृहच असते ते कुटुंबाची जागा घेऊ शकत नाही यावरुण कुटुंब संस्थेचे किती महत्त्व आहे ते लक्षात येते.

**तक्ता क्र.६.२३**

**बंद्यांची आता गुन्हेगारी प्रवृत्ती कमी झाली काय हे दर्शविणारा तक्ता**

| **अ.क्रं.** | **विवरण** | **वारंवारिता** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १. | होय | १८१ | ९०.५ % |
| २. | नाही | १९ | ९.५ % |
| | **एकूण** | **२००** | **१०० %** |

कारागृहात शिक्षा भोगणाऱ्या बद्यांची गुन्हेगारी प्रवृत्ती कमी झाली आहे काय याचे विवेचन लक्षात येते. बंदी कारागृहात राहत असताना त्यांच्यात सुधारणा होण्यासाठी त्यांना प्रशिक्षण/काम विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून मनोरंनातून त्यांची गुन्हेगारी मानसिकता कमी करण्याचा प्रयत्न कारागृह प्रशासन करते. पण ते करीत असताना ज्यांच्यासाठी असे विविध उपक्रम राबवले जातात त्यांच्यावर परिणाम होणे गरजेचे आहे. जर त्यांच्यावर परिणाम झाला तर त्यांच्यामधील जी गुन्हेगारी प्रवृत्ती आहे ती कमी होईल. याचा परिणाम बंदी शिक्षा संपून घरी आल्यावर असेच अपराधीपणाची कृत्ये तो करणार नाही.

संशोधकाने बंद्यांची काही प्रमाणात का होत नाही गुन्हेगारी प्रवृत्ती कमी झाली काय असे बंद्यांकडून माहिती घेत असताना (१८१) ९०.५ टक्के बंद्यांनी सांगितले होय आमच्यामधील गुन्हेगारी प्रवृत्ती आता कमी झाली आहे. कारण त्या गुन्हेगारी कृत्यामुळेच आज या चार भिंतींमध्ये जीवन जगावे लागत आहे. याचा परिणाम आमच्या स्वतःवर तर होत आहेच पण आमच्या कुटुंबातील सदस्यांवर खुप मोठया प्रमाणात विपरीत परिणाम होत आहे. त्यामुळे आमच्यामध्ये मुळात तशी गुन्हेगारी प्रवृत्ती नव्हती पण जी मानसिकता होती त्यामध्ये निश्चितच बदल झाला आहे असे बहुसंख्य बद्यांनी सांगितले. तर फक्त (१९) ९.५ टक्के

बंद्यांनी आमची गुन्हेगारी प्रवृत्ती कमी झाली नाही असे सांगितले. याचे कारण विचारले असता त्यांनी सांगितले की मुळात आम्ही गुन्हा केला नाही. मुद्दामहून आमच्यावर गुन्हा केल्याचा आरोप ठेवला व न्यायालयाने आम्हास शिक्षा दिली. पण ही चुकीची शिक्षा आम्ही भोगत आहोत. आमच्यावर अन्याय झाला असून ज्यांनी आमच्याविरुध्द वर्तन केले त्या व्यक्तींना येथून बाहेर गेल्यावर संपवणार असे काही बंद्यांनी प्रतिक्रिया व्यक्त केल्या.

### ❖ बंद्यांसाठी भेटीची सवलत

कारागृहातील बंदी हा आपल्या नातेवाईकांपासून दूर असल्यामुळे त्याला त्यांना भेटण्याबाबत नियमात तरतूद आहे. जेणेकरून त्यांचे नातेवाईक व इतरांशी संबंध अबाधित राहतात. तसेच दैनंदिन घरातील अडचणी व इतर बाबींची चर्चा होण्यास मदत होते. नियमाप्रमाणे काही विशेषप्रसंगी जादा भेटी देण्याबाबत प्रचलित नियमात तरतुद आहे.

| | | |
|---|---|---|
| न्यायाधीन बंदी .. | आठवड्यातुन एक वेळा .. | वकिलांना न्यायालयीन व कायदे |
| स्थानबध्द .. | आठवड्यातुन दोन वेळा .. | विषयक सल्ला देण्यासाठी प्रशासनिक |
| सिध्ददोष बंदी .. | महिन्यातून एक वेळा .. | सोयीनुसार केव्हाही भेटता येते. |
| | | कारागृहीन सुट्टीचा दिवस वगळता. |

नियमाप्रमाणे काही विशेष प्रसंगी जादा भेटी देण्याबाबत प्रचलित नियमांत तरतूद आहे. एका वेळी ५ कुटुंबीय व्यक्ती किंवा दोन मित्र यांना भेट घेता येते.निरनिराळ्या गँगच्या व महत्त्वाच्या केसमधील बंद्यांना प्रशासकीय सुरक्षा व्यवस्था म्हणून या संवर्गातील बंद्यांना भेटीसाठी येणाऱ्या व्यक्ती फक्त नातेवाईकच असल्यास आणि ते नातेवाईक असल्याबाबत नजीकच्या पोलीस स्टेशनकडून दाखला आणण्याबाबत प्रशासनाची मागणी असते. तसेच भेटीच्या वेळी कौटुंबिक बाबी, खासगी चर्चा व कोर्ट केसबाबत चर्चा करण्यास परवानगी आहे. तो नियम या संवर्गातील बंद्यांनी कटाक्षाने पाळावा अशी प्रशासनाची अपेक्षा आहे. नातेवाईकांच्या भेटी व वकील भेटी यांच्या वेळा अधीक्षक ठरवितात. बंद्यांना कारागृहात दाखल झाल्यावर भेटीसाठी नातेवाईकांची नावे कारागृह अधिकाऱ्यांकडे देणे अनिवार्य आहे. साधारणतः भेट ही २० मिनिटांत आटोपणे अनिवार्य आहे. भेटीच्या वेळी कोणत्याही वस्तूची देवाण - घेवाण निषिध्द आहे. सदरच्या सर्व भेटी या निःशुल्क असतात.

**तक्ता क्र.६.२४**

**बंद्यांना भेटायला कोण येतात ते दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | आई,वडील | ११८ | ५९ % |
| २. | भाऊ | १६ | ८ % |
| ३. | मित्र | ०१ | ०.५ % |
| ४. | नातेवाईक | २० | १० % |
| ५. | पत्नी,मुले | २१ | १०.५ % |
| ६. | मुलगी | ०३ | १.५ % |
| ७. | भाऊ,बहीण | ०१ | ०.५ % |
| ८. | कोणीच येत नाही | २० | १० % |
| | **एकूण** | **२००** | **१०० %** |

कारागृहात भेटण्यासाठी कोण येतात याचे विवेचन आकलन होते. कारागृहात शिक्षा भोगत असताना बंद्यांना त्यांच्या कुटुंबीयांना महिन्यातुन एक वेळ भेट दिली जाते. ही भेट घेण्यासाठी बंद्यांचे कुटुंबीय येतात का नातेवाईक , मित्र येतात का ? याचा आढावा संशोधकाने घेतला असता संशोधकाने अभ्यासलेल्या एकूण बंद्यांपैकी (११८) ५९ टक्के बंद्यांनी सांगितले.आई,वडील पत्नी,मुले म्हणजे कुटुंबीय भेटण्यासाठी येतात तर (१६) ८ टक्के बद्यांनी  भाऊ येतात, (०१) ०.५ टक्के बंद्यांनी मित्र येतात, (२०) १० टक्के बंदयांनी सांगितले नातेवाईक भेटण्यासाठी येतात (२१) १०.५ टक्के बंदयांनी सांगितले. कोणीच येत नाही या संदर्भात बंद्याला सविस्तर विचारले असता काहींनी सांगितले आई,वडील आहेत. काहींनी सांगितले, नातेवाईक मी केलेल्या अपराधाचा परिणाम म्हणुन मुद्दाम येत नाहीत. काहींनी सांगितले पत्नीने दुसरे लग्न केले, काहींनी सांगितले आणखी लग्नच झाले नाही . आई वडील वारले त्यामुळे भेटण्यासाठी कोणीच येत नाहीत असे बंद्यांनी सांगितले.

वरील विवेचनावरुण असा निष्कर्ष निघतो की बद्यांना कारागृहात भेटण्यासाठी त्यांचे कुटुंबीयच मोठ्या प्रमाणात येतात असे जाणवते. कुटुंबातील नाते संबंध हे रक्ताचे असतात, एकमेकांची काळजी घेणे, अडचणीच्या काळात मदत करणे, मानसिक, आर्थिक, आधार देणारे केंद्र म्हणून कुटुंबाकडे पाहिले जाते. त्यामुळे आपल्या कुटुंबातील सदस्य कारागृहात असेल तर त्याला जाऊन वेळोवेळी भेटणे, त्याला आधार देण्याचे काम कुटुंबातील सदस्य करत असतात. कुटुंबातील व्यक्तीबद्दल आपलेपणाची भावना असल्याने बंद्यांना भेटण्यासाठी कुटुंबीय येतात. ज्या बंद्यांचे कुटूंब विस्कळीत झाले आहे अशा बंद्यांना भेटण्यासाठी कोणीच येत नाही, नातेवाईक असतात पण त्यांना तेवढी आत्मीयता असत नाही. त्यामुळे कुटुंबीय आणि

नातेवाईक यांच्यामध्ये फरक जाणवतो. त्यामुळे बंद्यांना त्यांच्या कुटुंबातील सदस्य मोठ्या प्रमाणावर भेटायला येतात.

**तक्ता क्र. ६.२५**

**बद्यांना भेटायला कधी येतात ते दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | दरमहा | १०८ | ५४ % |
| २. | दर तीन महिन्यांत | ३० | १५ % |
| ३. | दर सहा महिन्यांत | ३६ | १८ % |
| ४. | वर्षांतून एकदा | ०६ | ३ % |
| ५. | येत नाही | २० | १० % |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

बंद्यांना भेटण्यासाठी त्यांचे नातेवाईक कुटुंबीय कधी येतात याचे विवेचन करता येते. बंद्यांना भेटण्यासाठी महिन्यातून एकदा भेट दिली जाते. त्या भेटीत कुटुंबीय बंद्याला भेटू शकतात. ज्यामुळे बंद्यांचा आणि कुटुंबीयांचा संपर्क राहता. घराकडील खुशाली बंद्याला कळले. बऱ्याच बंद्यांना कुटुंबीय नाहीत त्यांचे नातेवाईक कधी तरी येतात. पण ज्यांना नातेवाईक हीनाहीत, मित्र जोपर्यंत आपण बाहेर आहोत तोपर्यंत सोबती राहतात. पण कारागृहात भेटण्यासाठी म्हणुन बऱ्याच वेळेस येत नाहीत. बहुधा कुटुंबातील व्यक्ती आई, वडील ,पत्नी ,बहीण,भाऊ ,मुले,नातेवाईक भेटीसाठी  येतात. संशोधकाने बद्यांच्या भेटीसाठी जे नातेवाईक येतात ते कधी कधी भेटायला येतात असे बंद्यांना विचारले असता संशोधकाने अभ्यास केलेल्या एकूण बंद्यांपैकी (१०८) ५४ टक्के बंद्यांनी सांगितले. दर महिन्याला भेटण्यासाठी कुटुंबीय येतात (३०) १५ टक्के बंद्यांनी सांगितले, दर तीन महिन्याला भेटायला येतात (३६) १८ टक्के बंद्यांनी सांगितले, दर सहा महिन्याला भेटायला येतात तर (०६) ३ टक्के बंद्यांनी सांगितले. वर्षांतून एकदा भेटायला येतात तर २० बंद्यांनी सांगितले की आम्हाला भेटायला कोणीच येत नाही. त्या संदर्भात बंद्यांना सविस्तर विचारले असता आम्ही कारागृहात आल्याने आमचे कुटुंब उदवस्त झाले. पत्नीने दुसरे लग्न केले.आई,वडील वारले त्यामुळे जिव्हाळ्याचे आता कोणीच राहिले नाही. त्यामुळे कोणीच भेटायला येत नाही असे बद्यांनी सांगितले. दर महा बंद्यांच्या भेटीसाठी (१०८) बंद्यांचे कुटुंबीय येतात पण दर तीन महिना,दर सहा महिना वर्षांतून एकदा असे कुटुंबीय भेटणाऱ्यांचे प्रमाणही ३६% आहे. त्या संदर्भात बंद्यांना सविस्तर विचारले असता त्यांनी सांगितले की आम्ही घरातील कमावते व्यक्ती कारागृहात असल्याने अगोदरच कुटुंबाची

उपासमार होते आणि घरची तशी आर्थिक परिस्थितीही चांगली नाही. त्यामुळे आणि आमचे गाव औरंगाबादपासुन खूप दूर आहे. जाणे येण्यासाठी बस भाडेही जास्त असल्याने आमचे कुटुंबीय वेळ मिळेल तेव्हा पैसे जमा होतील तेव्हा येतात. काही बंद्यांनी सांगितले आमचे आई,वडील,वृध्द झाले आहेत. ते दरमहा भेटीला येऊ शकत नाहीत म्हणून जेव्हा वेळ मिळेल तेव्हा येतात.

सारांश रूपात पाहिले असता भेट घेण्यासाठी पैसा नसल्याने इच्छा असून सुध्दा बरेच कुटुंबीय दरमहा भेटीसाठी येऊ शकत नाहीत. म्हणजे बरेच बंदी सर्वसाधारण आर्थिक परिस्थितीमधील आहेत असे जाणवते. वरील विवेचनावरुन असा निष्कर्ष निघतो की बंद्यांना दरमहा भेटण्यासाठी येणाऱ्यांची संख्या सर्वात अधिक असून वर्षांतून एकदा भेटण्यासाठी येणाऱ्यांचे प्रमाण सर्वात कमी असल्याचे निदर्शनास येते.

**तक्ता क्र.६.२६**

**कारागृहात कुटुंबीयांना भेटण्यासाठी नियम असावेत काय ते दर्शविणारा तक्ता**

| अ.क्रं. | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | होय | १३८ | ६९ % |
| २. | नाही | ६२ | ३१ % |
| | **एकूण** | **२००** | **१०० %** |

बंद्यांना भेटण्यासाठी विशिष्ट नियम असावेत का जे नियम आहेत ते योग्य आहेत त्या संदर्भात बंद्यांनी दिलेल्या उत्तरांचे विश्लेषण करता येते. बंद्यांना कारागृहात भेटण्यासाठी महिन्यातून एकदाच नियमाप्रमाणे भेटता येते. सिने अभिनेता संजय दत्त जेव्हा जेलमध्ये होता तो बाहेर आल्यानंतर संजय दत्तने सांगितले की बंद्योंना कुटुंबीयाना भेटण्यासाठी विशिष्ट नियम (महिन्यातून एकदा) नसावेत. कारण बंदी आपल्या कुटुंबापासून दूर राहिल्याने त्याची मानसिक स्थिती बिघडू शकते. जर त्याची मानसिक स्थिती योग्य ठेवायची असेल तर बंद्याला त्यांच्या कुटुंबीयाला वाटेल तेव्हा भेटू द्यावे असे सांगितले.

वरिल विवेचनावरुन नियम असावेत म्हणजे महिन्यातून एकदाच भेट असावी असे सांगणाऱ्यांचे प्रमाण अधिक असुन विशिष्ट नियम नसावेत असे सांगणाऱ्यांचे प्रमाण सर्वात कमी आहे. भेटण्याच्या नियमासंदर्भात कारागृह तुरुंग अधिकाऱ्यांना विचारले असता त्यांनी सांगितले की नियमानुसार महिन्यातून एक वेळ भेट दिली जाते. जर महिन्यातून एक वेळेपेक्षा अधिक वेळ भेट दिली तर त्याचा परिणाम असा होईल की बंद्यांची पूर्ण मानसिकता कुटुंबामध्ये गुंतुन राहण्याची दाट शक्यता असते. यातून तो पळूनजाण्याचा प्रयत्न करू शकतो. किंवा त्याची मानसिकता नक्कीच बिघडते. त्यामुळे नियमाप्रमाणे महिन्यातून एक वेळची भेट ही योग्य आहे असे वाटते असे सांगितले.

**तक्ता क्र.६.२७**

**कारागृहात बंद्यांसाठी योगा,व्याख्यान,शिबिरे होतात काय ते दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | होय | ३० | १५ % |
| २. | नाही | १७० | ८५ % |
| | **एकूण** | **२००** | **१०० %** |

कारागृहात बंद्यांच्या मानसिक परिवर्तनासाठी त्यात सुधारणा होण्यासाठी योगा, व्याख्यान कार्यक्रम होतात का ? विविध शिबिरे होतात का याचे विश्लेषण करता येते. कारागृहे ही कारागृहे न राहता आज सुधारालये बनली असुन विविध कार्यक्रमांचे आयोजन आणि नियोजन कारागृह प्रशासनाने करावे असे अपेक्षित असते. त्या संदर्भात संशोधकाने कारागृहात होणाऱ्या कार्यक्रमासंदर्भात बंद्यांना विचारले असता संशोधकाने अभ्यासलेल्या एकूण बंद्यांपैकी (१७०) ८५ टक्के बंद्यांनी सांगितले की कारागृहात बंद्यांसाठी योगा,व्याख्यान ,विशेष शिबिरे यांचे आयोजन केले जात नाहीत तर फक्त (३०) १५ टक्के बंद्यांनी सांगितले व्याख्यान ,शिबिरे अशा कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते.

वरील विवेचनावरुन असे लक्षात येते की बंद्यांसाठी योगा,विशेष व्याख्यान असे काही कार्यक्रम होत नाहीत असे बहुसंख्य बंद्यांनी सांगितले. कारागृहात बंद्यांसाठी जे काही कार्यक्रम साजरे केले जातात. त्यामध्ये बंदी सहभागी होतात का याचे विवेचन करता येते. कारागृहात बंद्यांसाठी जे वेगवेगळे कार्यक्रम आयोजित केले जातात. त्यामध्ये बंदी सहभागी होतात का या संदर्भात बंद्यांना माहिती विचारली असता. बंद्यांनी सांगितले आम्ही त्यात सहभागी होत नाही असे बंद्यांनी सांगितले आम्ही सहभागी होतो.

वरील विश्लेषणावरुन असा निष्कर्ष काढला जातो की, कारागृहात बद्यांसाठी विशेष अशा कार्यक्रमांचे आयोजन केले जात नाही आणि जे कार्यक्रम साजरे केले जातात त्यात सर्व बंद्यांचा समावेश नसतो.

**बंद्यांना घरी भेटण्यासाठी सुटी मिळते**

बंद्यांना घरी जाण्यासाठी सुटटी मिळते काय याचे विवेचन करता येते. कारागृहात शिक्षा भोगत असताना कुटुंबीयांना भेटण्यासाठी संचित आणि पॅरोल अशा दोन पध्दतीच्या रजा मिळतात, बंद्याला शिक्षा लागल्यानंतर दोन वर्षे त्याने शिक्षा भोगल्यानंतर त्याला सुटी मिळते. पण सुटी घेण्यासाठी जी कार्यालयीन परवानगी आणि  प्रक्रिया पूर्ण करावी लागते त्यानंतर कारागृह नियमानुसार प्रत्येक बंद्याला सुट्टी मिळते.

सुट्टी संदर्भात बंद्याला विचारले असता बंद्यांनी सांगितले होय आम्हाला घरी जाण्यासाठी सट्टी मिळते. काही बंद्यांनी सांगितले आम्हाला सुटी मिळत नाही. त्या संदर्भात सविस्तर चौकशी केली असता समजले की काही बंद्यांच्या रजा मंजूर होत नाही. कारण योग्य त्या वेळी सुटटी मिळण्याची कार्यवाही करावी लागते. ती वेळेत पूर्ण झाली नाही तर सुटटी मंजूर होत नाही. बऱ्याच बद्यांचा जामीन घ्यायला कोणी तयार होत नाही. त्यामुळे सुटटी मंजूर होत नाही. बऱ्याच बंद्यांना जवळचे कुटुंबीय किंवा नातेवाईक नाहीत. त्यामुळे सुटी घेऊनही कोठे जायचे म्हणून काही बंदी सुटीवर जात नाहीत असे सांगितले.

वरील विवेचनावरुन असा निष्कर्ष निघतो की कारागृह नियमाअंतर्गत बंद्यांना जी सुटी आहे ती दिली जाते. कारण रजा/सुटी हा त्यांचा हक्क समजला जातो. जास्तीत जास्त बंदी सुटीचा लाभ घेतात असे निदर्शनास येते.

### ❖ बंद्यांना अभिवचन व संचित रजेची सवलत

बंद्यांना प्रचलित नियमाप्रमाणे अभिवचन व संचित रजेची सवलत असते. बंद्यांना अभिवचन/संचित रजेवर सोडण्यासंदर्भात त्वरीत निर्णय घेण्यासाठी निरनिराळया संबंधित अधिकाऱ्यांना करावयाच्या कार्यवाहीसाठी कालावधी निश्चित करण्यात आला आहे.

| अ.क्र.<br>१ | निर्णय घेण्याच्या कार्यवाहीतील मुख्य टप्पे<br>२ | कार्यवाही करावयाचा कालावधी<br>३ |
|---|---|---|
| १ | बंद्याने अभिवचन / संचित रजेवर जाण्यासाठी करावयाच्या विनंती अर्जासाठी पूर्व मुदत. | २० दिवस |
| २ | वर उल्लेखिलेल्या अर्जावर कारागृह अधीक्षक तसे अर्ज प्राप्त झाल्यावर पोलिस अधीक्षक आणि विभागीय आयुक्त यांच्याकडे पाठविण्याचा कालावधी | २ दिवस |
| ३ | पोलिस अधीक्षकांना अशा प्राप्त झालेल्या अर्जावर आपला सविस्तर अहवाल विभागीय आयुक्तांकडे आणि कारागृह अधीक्षकांकडे पाठविण्याचा कालावधी | १० दिवस |
| ४ | अभिवचन / संचित रजेसाठी अर्ज आणि त्यावरील पोलिस अहवाल प्राप्त झाल्यावर विभागीय आयुक्त/ सक्षम अधिकारी यांनी त्यावरील निर्णय कळविण्याचा कालावधी | ४ दिवस |
| ५ | सक्षम अधिकाऱ्यांचा अभिवचन/संचित रजेच्या मंजुरीचा संबंधित प्राप्त झाल्यावर कारागृह अधीक्षक यांनी करावयाच्या कार्यवाहीचा कालावधी | ४ दिवस |

विभागीय आयुक्त  अभिवचन रजा ३० दिवस मंजूर करतात. त्यामध्ये ६० दिवस रजा वाढ मंजूर करू शकतात. कारागृह अधीक्षक बंद्यांच्या कुटुंबातील व्यक्तीचा मृत्यू झाल्यानंतर ही रजा मंजूर करू शकतात. अभिवचन रजा मंजूर केल्यानंतर त्यामध्ये वाढ करून घ्यावयाची असल्यास बंद्याने रजा वाढ मंजूर करण्यासाठी प्रथम संबंधित आयुक्त यांचेशी पत्रव्यवहार करणे आवश्यक आहे. त्यापूढील रजावाढ आवश्यक असल्यास शासनाला विनंती करणे आवश्यक आहे. मात्र रजावाढ मंजूर झाल्याशिवाय गैरहजर राहणे, हा कारागृहातील गुन्हा असून त्याबद्दल माफी कपातीची शिक्षा देण्याची तरतूद आहे.

**संचित रजा..**   विभागीय कारागृह उपमहानिरीक्षक १४ दिवस मंजूर करुन १४ दिवस वाढ मंजूर करू शकतात. विशेषप्रसंगी रजेमध्ये मुदतवाढ करू शकतात परंतु मुदतवाढीचा कालावधी त्यांच्या शिक्षेमध्ये गणला जात नाही.

बंद्यांना झालेल्या शिक्षेच्या ठराविक  काळानंतर संचित रजा विभागीय कारागृह उपमहानिरीक्षक हे मंजूर करतात. या रजेचा कालावधी शिक्षेत माफी म्हणून समजला जातो. ही रजा चांगल्या वर्तणुकीच्या बंद्यांसाठी सवलत आहे. परंतु तो बंद्योंचा हक्क नाही. तसेच भारतीय दंडविधान कलम ३९२ ते ४०२ अंतर्गत बंदी सदरच्या रजेस पात्र ठरत नाहीत.

खालील बंदी त्याचे शिक्षेच्या कालावधीनुसार संचित रजेसाठी पात्र ठरतात -

१) ज्यांना एक वर्षापेक्षा अधिक पण पाच वर्षांपर्यंत शिक्षा आहे, ते दरवर्षी १४ दिवस संचित रजेवर सुटण्यास पात्र ठरतात.

२) ज्या बंद्याला ५ वर्षांपेक्षा अधिक शिक्षा झाली आहे, असे बंदी दर दोन वर्षांनी १४ दिवस संचित रजेवर जाण्यास पात्र ठरतील. मात्र ज्याला ५ वर्षांपेक्षा अधिक शिक्षा झाली आहे व ज्यांचा शिक्षेचा कालावधी ५ वर्षे बाकी आहे असे कैदी दरवर्षी संचित रजेवर जाणेस पात्र आहेत.

३) ज्या बद्यांना जन्मठेपेची शिक्षा झाली असेल असे बंदी ७ वर्षांनंतर २ वर्षांतून एकदा संचित रजेवर जाण्याऐवजी वर्षातून एकदा रजेवर जाणेस पात्र आहेत. जन्मठेपेची शिक्षा झालेल्या बंद्यांना पहिली ७ वर्षे, दोन वर्षांतून एकदा संचित रजा मिळणेस पात्र आहेत. संचित रजेसाठी न्यायाधीन कालावधी हा शिक्षेत धरावयाचा आहे. संचित रजा मंजुरीचा पूर्ण अधिकार विभागीय कारागृह उपमहानिरीक्षक यांना आहे. जर बंदी संचित रजा वाढ मंजूर झाल्याशिवाय गैरहजर राहिला तर हा कारागृहातील गुन्हा आहे. त्याबद्दल माफी कपातीची शिक्षा देण्यात येते.

**तक्ता क्र.६.२८**

**बंद्यांना घरी भेटण्यासाठी किती सुट्टी मिळते ते दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | ६ महिन्यांतून एक वेळ | १९ | ९.५ % |
| २. | १२ महिन्यांतून एक वेळा | १२९ | ६४.५ % |
| ३. | गेलो नाही | ४८ | २४ % |
| ४. | लालपट्टी | ०४ | २ % |
| | **एकूण** | **२००** | **१००%** |

वरील तक्त्यावरुन कारागृहात बंद्यांना सुटी वर्षांतून किती वेळा मिळते याचे विवेचन करता येते. संशोधकाने बंद्यांना जी सुटी मिळते ती प्रत्यक्षात वर्षांतून किती दिवसांची मिळते या संदर्भात माहिती संकलित केली. सुटी हा बंद्यांचा अधिकार आहे. काही बंदी सुटीची प्रक्रिया वेळेवर करत नाहीत. त्यामुळे त्या वर्षातील सुटटीचा हक्क संपतो. प्रत्यक्षात बंद्यांना सुटी वर्षांतून किती वेळा मिळते. या संदर्भात प्रत्यक्ष बंद्यांना विचारले असता सहा महिन्यांतून एकदा सुटी मिळते असे (१९) ९.५ टक्के बंद्यांनी सांगितले. वर्षांतून एक वेळ सुटी मिळते असे (१२९) ६४.५ टक्के बद्यांनी सांगितले तर (४८) २४ टक्के बद्यांनी सुटीवर गेलो नाही असे सांगितले. या संदर्भात सविस्तर विचारले असता सुटीसाठीची प्रक्रिया करण्यासाठी कोणी नसल्याने ती वेळेवर होत नाही. त्यामुळे सुटीवर गेलो नाही असे सांगितले. तर (०४) २ टक्के बद्यांनी लाल पट्टी असल्या कारणाने सुटी मंजूर होत नाही असे सांगितले. लाल पट्टी म्हणजे सुट्टीवर गेल्यावर सुटटी संपताच कारगृहात न येता पळुण गेलो पण नंतर पोलिसांनी पकडुन आणले. त्यामुळे आम्हाला लाल पट्टी असून सुटी मंजूर होत नाही असे सांगितले.

**तक्ता क्र.६.२९**

**बंद्यांना किती दिवसांची रजा मिळते ते दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | विवरण | वारंवारिता |
|---|---|---|
| १. | ३० दिवस | १८ |
| २. | ३० दिवसांपेक्षा अधिक | १३४ |
| | **एकूण** | **१५२** |

बंद्यांना जी सुटी मिळते ती किती दिवसांची मिळते याचे विवेचन करता येते. बद्यांच्या सुटी संदर्भात ती किती दिवसांची मिळते याची माहिती बंद्यांना विचारल्यावर १८ बंद्यांनी सांगितले वर्षांतून एकदा

३० दिवसाची रजा मिळते तर १३४ बंद्यांनी सांगितले ३० दिवसांची संचित रजा मिळते. पण पुन्हा ३० दिवसांची रजा वाढवता येते म्हणजे ३० पेक्षा जास्त दिवसांची सुटी मिळते असे सांगितले.

वरील विश्लेषणावरुन ३० पेक्षा अधिक दिवसांची रजा मिळते असे सर्वात जास्त बंद्यांनी सांगितले त्यांचे प्रमाण सर्वात अधिक आहे.

**तक्ता क्र.६.३०**

**अपराध घडला तेव्हा बंदी रिमांडवर /जामिनावर असताना खर्च कोणी केला ते दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | कुटुंबीय | १७८ | ८९ % |
| २. | मित्रमंडळी | ०२ | १ % |
| ३. | नातेवाईक | १८ | ९ % |
| ४. | शासन | ०२ | १ % |
| | **एकूण** | **२००** | **१०० %** |

बंद्यांच्या हातून जेव्हा अपराध घडला तेव्हा तो जामिनावर असताना किंवा तो रिमांडवर असताना पैसा कोणी खर्च केला याचे विवेचन करता येते. अपराध जेव्हा घडला तेव्हा बंद्यांला अटक झाली तेव्हा कोर्टात त्यांची बाजू मांडण्यासाठी जो खर्च लागतो तो खर्च कोणी केला हे अत्यंत महत्त्वपुर्ण आहे. कारण बंद्याने अपराध हा कोणाच्या सांगण्यावरुन केला तर त्याच्या कोर्टाचा खर्च निश्चितच अशी व्यक्ती करणार आणि स्वतःच केले असेल तर पैशाची जमवा जमव करावी लागली काय ? अशा अनेक प्रश्नांचा उलगडा करण्यासाठी संशोधकाने बंद्यांना विचारले तुम्ही जामिनावर किंवा रिमांडवर असताना कोर्टाचा खर्च कोणी केला असे बंद्यांना विचारले तर (१७८) ८९ टक्के बद्यांनी आमच्या कुटुंबीयांनी खर्च केला तर (०२) १ टक्के बंद्यांनी सांगितले मित्र मंडळीनी खर्च केला तर (१८) ९ टक्के बंद्यांनी सांगितले नातेवाईकांनी खर्च केला तर (०२) १ टक्के बद्यांनी सांगितले आमचा कोर्टचा खर्च शासनाने म्हणजेच सरकारी वकिलामार्फत झाल्याने शासनाने खर्च केला असे सांगितले.

वरील विश्लेषणावरुन असा निष्कर्ष निघतो की, बंदी रिमांडवर किंवा जामिनावर असताना कोर्टचा खर्च कुटुंबीयांनीच केला असे सांगणाऱ्या बंद्यांचे प्रमाण अधिक तर मित्र मंडळीनी आणि शासनाने केला असे अनुक्रमे सांगणाऱ्यांचे प्रमाण सर्वात कमी होते. अपराध घडल्यानंतर जेव्हा रिमांडमध्ये ठेवण्यात आले तेव्हा आमच्या घरच्या व्यक्तींनीच जामीन मिळवण्यासाठी प्रयत्न केला आणि कोर्टाचा खर्चही कुटुंबीयांनीच केला असे बद्यांनी सांगितले. आमच्या हातून जो अपराध झाला होता तो कोणाच्या सांगण्यावरुन झाला नव्हता असेही काही बंद्यांनी सांगितले.

**कारागृहात गंभीर गुन्हेगारासाठी राहण्याची स्वतंत्र व्यवस्था आहे**

कारागृहात जे बंदी राहतात त्यात काही गंभीर स्वरूपाचेही बंदी असतात. त्यांच्या राहण्याची व्यवस्था स्वतंत्र आहे की नाही याचे विवेचन करणारी आहे. गुन्हेगारांचे अनेक प्रकार पडतात. प्रामुख्याने सराईत गुन्हेगार आणि सर्वसाधारण गुन्हेगार असा प्रमुख फरक केला जातो. जे सराईत गुन्हेगार आहेत, ज्यांनी गंभीर स्वरूपाचे अपराध केले आहेत आणि असे अपराधी प्रामुख्याने संघटित अपराधातील असतात. अशा सर्व बंद्यांना जर एकाच ठिकाणी (बॅरेक्स) मध्ये ठेवले तर त्यांचा परिणाम इतर बंद्यावर होतो. सराईत गुन्हेगार सर्वसाधारण बंद्यांच्या सहवासात आले तर त्यांचा परिणाम म्हणून अपराध करण्याची तंत्रे,पध्दती या संदर्भात देवाण घेवाण होऊ शकते. त्यामुळे जे बंदी सर्वसाधारण आहेत ते पूढे सराईत गुन्हेगारांच्या टोळीत जाऊ शकतात आणि गंभीर गुन्हे करू शकतात. जर असे झाले तर कारागृहाचा जो मुळ उद्देश आहे सुधारणा आणि पुनर्वसन ते होणार नाही. त्यामुळे संशोधकाने कारागृहातील बंद्यांना त्या संदर्भातील माहिती विचारली असता बंद्यांनी सांगितले  गंभीर गुन्हेगारांसाठी राहण्याची स्वतंत्र व्यवस्था आहे. कारागृहे आज सुधारणा आणि पुनर्वसन या प्रमाणे मार्गक्रमण करत असून गंभीर गुन्हेगारांचा संपर्क सर्वसामान्य बंद्यासोबत येऊ नये यासाठी गंभीर गुन्हेगारांना राहण्यासाठी स्वतंत्र अशा यार्डाची व्यवस्था करण्यात आली असून जे अती गंभीर गुन्हेगार आहेत त्यांना राहण्यासाठी स्वतंत्र अंडाकृती यार्ड आहे त्यात एकटेच राहावे लागते, प्रकाश फक्त वरूण उघडे आहे त्यामुळे त्यातून जेवढा प्रकाश येईल तेवढा वेळच दिसते. ती एक प्रकारची शिक्षाच असते. थोडक्यात गंभीर गुन्हेगारांना राहण्याची स्वतंत्र व्यवस्था आहे. त्यामुळे गंभीर गुन्हेगारांचे संस्कार सर्वसामान्य बंद्यांवर पडणे शक्य नाही असे बंद्यांनी सांगितले.

**तक्ता क्र.६.३१**

**बंद्यांवर इतर गुन्हेगारांचा परिणाम होतो काय ते दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | परिणाम होतो | २८ | १४ % |
| २. | परिणाम होत नाही | १७२ | ८६ % |
| | **एकूण** | **२००** | **१०० %** |

कारागृहात राहत असताना इतर बंद्यांचा एकमेकांवर काय परिणाम होतो याचे विवेचन करता येते. मानव हा समाजशील प्राणी आहे. तसेच तो अनुकरणप्रिय आहे. तो इतरांच्या कृतीचे सहज अनुकरण करतो. इतरांच्या वर्तनाचा परिणाम एकमेकांवर सहज होतो. अपराधाचे एक महत्त्वपुर्ण कारण म्हणजे

अपराधी व्यक्तींची संगत,सोबत. जर आपले सोबती अपराधी स्वरूपाचे असतील तर त्यांच्या सहवासात येणारी व्यक्ती त्यांच्या सारखीच अपराध करू शकते.

कारागृहात एकत्र राहत असताना एकमेकांच्या विचारांचा प्रभाव एकमेकांवर पडतो. त्यातुन पुढील आयुष्याची दिशा ठरत असते. संशोधकाने याच जिज्ञासेपोटी बंद्यांना इतर गुन्हेगारांचा तुमच्यावर काय परिणाम होतो असे विचारले असता (१७२) ८६ टक्के बंद्यांनी आमच्यावर कोणताच परिणाम होत नाही तर (२८) १४ टक्के बद्यांनी आमच्यावर परिणाम होतो असे सांगितले तर त्यांना त्या संदर्भात सविस्तर विचारले असता आरोग्यविषयक व मानसिक परिणाम होतो असे सांगितले. आरोग्यविषयक म्हणजे अस्वच्छ राहणीमान, व्यसन यांचा आमच्या आरोग्यावर परिणाम होतो. तर मानसिक परिणाममध्ये इतर बंदी आमची मानसिकता बिघडवण्याचा प्रयत्न करतात असा आमच्यावर इतर बंद्यांचा परिणाम होतो असे सांगितले. वरिल विवेचनावरुन बंदी एकत्र राहत असताना इतर बंद्यांचा परिणाम बहुसंख्य बंद्यावर होत नाही. तर काही बंद्यांवर आरोग्यविषयक व मानसिक परिणाम होतो असे सांगितले.

**तक्ता क्र.६.३२**

**बद्याला झालेल्या शिक्षेबद्दल बंद्यांचे काय मत आहे ते दर्शविणारा तक्ता**

| **अ.क्र.** | **विवरण** | **वारंवारिता** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १. | योग्य शिक्षा | ६८ | ३४ % |
| २. | चुकीची/अन्याय झाला | १०० | ५० % |
| ३. | न्यायालयीन अत्याचार | ३२ | १६ % |
| | **एकूण** | **२००** | **१०० %** |

बंद्यांना जी शिक्षा झाली आहे त्या बददल त्यांचे काय मत आहे याचे विवेचन करता येते. कारागृहात राहणारे बंदी त्यांना जी शिक्षा झाली आहे त्या शिक्षेसंदर्भात त्यांचे व्यक्तिगत काय मत आहे हे जाणण्याचा संशोधकाने प्रयत्न केला. संशोधकाने अभ्यासलेल्या बंद्यांपैकी (६८) ३४ टक्के बद्यांनी सांगितले आम्हाला योग्य शिक्षा झाली आहे म्हणजे ३४ टक्के बद्यांनी आपल्या कृत्यावर ठाम असून आम्ही जे कृत्य केले त्याची योग्य शिक्षा आम्हाला मिळाली असे सांगितले तर (१००) ५० टक्के बंद्यांनी सांगितले आमच्यावर अन्याय  झाला आहे. आम्हाला चुकीची शिक्षा मिळाली आहे. आम्ही मुळात अपराध केलाच नाही. आम्हाला यात मुद्दाम गुंतवण्यात आले आणि त्याचा परिणाम म्हणुन आज आम्ही चुकीची शिक्षा

भोगत आहोत, आमच्यावर अन्याय झाला आहे असे सांगितले. तर (३२) १६ टक्के बंद्यांनी सांगितले. आमच्यावर न्यायालयीन अत्याचार झाला आहे म्हणजेच आमच्या कृत्याची न्यायालयाने शहानिशा केली नाही त्यामुळे आमच्यावर न्यायालयीन अत्याचार झाला असे वाटते.

वरील विवेचनावरुन बद्यांना झालेल्या शिक्षेसंदर्भातील स्वतःच्या मताचा विचार केला तर अन्याय झाला, चुकीची शिक्षा झाली असे सांगणाऱ्या बंद्यांचे प्रमाण अधिक आहे. तर न्यायालयीन अत्याचार झाला असे म्हणणाऱ्यांचे प्रमाण कमी आहे.

**साठ वर्षावरिल वृध्द बंद्यांना कारागृहात ठेवले जाते काय ?**

६० वर्षे वयाच्या पुढील बंद्यांनाही कारागृहात ठेवले जाते का नाही याचे विवेचन करणारी आहे. बंदयांच्या हक्का संदर्भात मानव अधिकार आयोगाने नेहमीच अग्रेसर भूमिका घेतली आहे. २००८ मध्ये मानव अधिकार आयोगाने महाराष्ट्रातील कारागृहांची पाहणी करुन ६० वर्षावरील बंदी कारागृहात आहेत काय याची पाहणी केली. ६० वर्षावरील बंद्यांना कारागृहात ठेवता येत नाही असे असुनसुध्दा आज वयाची ६० वर्षे पूर्ण केलेले बरेच बंदी कारागृहात आढळतात. त्यामुळे संशोधकाने बंद्यांनाच त्या प्रकारचा प्रश्न केला असता बंद्यांनी सांगितले. ६० वर्षावरील अनेक बंदी आमच्यासोबत शिक्षा भोगत आहेत. पण न्यायालयाने त्यांच्या वयाचा विचार करता त्यांना कारागृहातून लवकर मुक्त करावे असे काही बंद्यांनी सांगितले, ६० वर्षावरील बंदी कारागृहात राहत नाहीत असे सांगितले. कारण हा बंदी सेपरेट यार्डमध्ये राहतो. त्यांचा इतर सामान्य बंद्यांशी संपर्क येत नाही. त्यामुळे त्या बंद्याने सांगितले कि ६० वर्षावरील बंद्यांना कारागृहात ठेवले जात नाही.

वरील विवेचनावरुन आपल्या असे निदर्शनास येते की ६० वर्षावरील बंद्यांनाही कारागृहात ठेवले जाते. या संदर्भात कारागृह प्रशासनास विचारले असता सांगण्यात आले की, न्यायालयाने जी शिक्षा दिली आहे ती बद्यांना भोगावी लागते आणि शिक्षा ही न्यायालय त्याच्या वयाचा विचार न करता त्या व्यक्तीने केलेल्या अपराधाचा विचार करुन शिक्षा देते असे सविस्तर सांगण्यात आले.

**तक्ता क्र.६.३३**

**बंदी कारागृहातील उपक्रमांवर समाधानी आहेत काय ते दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | समाधानी आहेत | १४६ | ७३ % |
| २. | समाधानी नाहीत | ५४ | २७ % |
| | **एकूण** | **२००** | **१०० %** |

वरील तक्त्यावरुन बंदी कारागृहात राबवल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांवर समाधानी आहेत काय याचे विवेचन करता येते. कारागृहात बंद्यांच्या पुनवर्सनासाठी आज अनेक उपक्रम राबवले जातात. अनेक सुविधा बंद्यांना दिल्या जातात. त्यांच्या सोबत मानवतावादी दृष्टिकोनातून व्यवहार केला जातो हे सर्व करत असताना कारागृहात राहणार बंदी ज्याच्यासाठी हे विविध उपक्रम राबवले जातात यावर तो समाधानी आहे काय या संदर्भात संशोधकांनी बंद्यांना माहिती विचारली असता (१४६) ७३ टक्के बद्यांनी सांगितले होय आम्ही कारागृहात आमच्यासाठी राबवल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांवर समाधानी आहोत तर (५४) २७ टक्के बंद्यांनी सांगितले आम्ही कारागृहात राबवल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांवर समाधानी नाही. कारण आज जे उपक्रम राबवले जातात ते पुरेसे आणि सर्वसमावेशक नाहीत. आज कारागृहात संगीत,गाणे,मनोरंजन,भजन,ज्ञानवर्धक कार्यक्रम,प्रवचन,योगा यासारखे कार्यक्रम होऊन त्यांचा लाभ सर्व बंद्यांना व्हावा असे बंद्यांनी सांगितले. जर असे विविध उपक्रम राबवले तर आमची शिक्षा भोगताना जो मानसिक ताण येतो तो येणार नाही असेही बंद्यांनी सांगितले.

**तक्ता क्रं. ६.३४**

**बंद्यांना सुधारण्यासाठी कारागृहात आणखी कोणत्या सुविधा व्हाव्यात ? असे बंद्यांना वाटते ते दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र | विवरण |
|---|---|
| १. | चांगले जेवन मिळावे |
| २. | चांगले वातावरण असावे |
| ३. | मनोरंजनाची साधने पाहिजेत |
| ४. | प्रत्येकाला काम मिळावे |
| ५. | मतदानाचा हक्क पाहिजे |
| ६. | सामूहिक कार्यक्रम व्हावेत |
| ७. | घरच्यांना भेटण्यासाठी वेळ अधिक मिळावा व खुली चर्चा व्हावी |
| ८. | क्वॉईन बॉक्स पाहिजे |
| ९. | खेळाचे साहित्य पाहिजे |
| १०. | ग्रंथालयात पुस्तके अधिक असावीत |
| ११. | कामाचा मोबदला अधिक असावा |
| १२. | कॅन्टीनमध्ये जास्त पदार्थ असावेत |
| १३. | सुट्टी वेळेवर मिळावी |
| १४. | वृध्द व्यक्तींना लवकर सोडावे |
| १५. | मानसोपचार तज्ज्ञांची नियुक्ती |
| १६. | वैद्यकीय उपचार व्हावेत |

| | |
|---|---|
| १७. | वृध्दांना शिक्षणाची सोय असावी |
| १८. | वरील सर्व |
| १९. | सुटल्यावर कर्ज मिळावे |
| २०. | बाहेर लकवर सूटावे |
| २१. | जे आहे ते ठीक आहे |
| २२. | जे आहे त्यात थोडा बदल हवा |

बंद्यांना सुधारण्यासाठी कारागृहात कोणत्या सुविधा व्हाव्यात. वरील तक्त्यावरुन बंद्यांना ज्या वेगवेगळ्या सुविधा मिळतात त्या पेक्षा आणखी कोणत्या सुविधा व्हाव्यात याचे विवेचन करणारी सारणी आहे. संशोधकाने बंद्यांना कारागृहात ज्या सुविधा मिळतात त्यापेक्षा आणखी काही सुविधा मिळाव्यात बंद्यांची काय अपेक्षा किंवा मागणी आहे याची शोध घेण्याचा प्रयत्न संशोधकाने केला आहे. कारागृहात आज अनेक कलमांखाली शिक्षा भोगणारे कैदी असून अनेक बंदी इतर कारागृहांतून नागपूर, कोल्हापूर, नाशिक, पुणे, ठाणे इ. ठिकाणांहून बदलीवर आले आहेत. म्हणजे बदलून आलेल्या बंद्याकडून इतर कारागृहात मिळणाऱ्या सुविधा या संदर्भातही संशोधकाने माहिती विचारली तेव्हा बऱ्याच बंद्यांनी सांगितले की इतर ठिकाणी म्हणजे आम्ही ज्या कारागृहातून आलो तेथील बंद्यांना राहण्याच्या ठिकाणचे वातावरण प्रसन्न असून हॉस्पिटल चांगले आहे. कॅन्टीन चांगली आहे . सुटी वेळेवर मंजूर होते. मुलाखत चांगली होते, मानसोपचार तज्ज्ञ आहेत, बंद्यांसाठी चांगले कार्यक्रम होतात, चांगले जेवण मिळते असे सांगितले. म्हणजेच येथे मिळणाऱ्या सुविधा यामध्ये तुलना करता येते.

संशोधकाने अभ्यासलेल्या मध्यवर्ती कारागृहातील बंद्यांना कारागृहात काय काय सुविधा मिळाव्यात असे विचारता बंद्यांनी अतिशय मनमोकळेपणाने संशोधकाशी गप्पा मारल्या. प्रथम संशोधकाने कारागृहात काय काय सुविधा मिळतात त्या विचारुन घेऊन त्यावर तुम्ही समाधानी आहात काय त्या संबंधी माहिती विचारुन घेतली होती. पूढे आणखी काही सुविधा व्हाव्यात अशी बंद्यांची अपेक्षा आहेत त्या पुढीलप्रमाणे आहेत.

१) कारागृहात बद्यांना सकाळी चहा,नाष्टा, जेवण त्यात तीन पोळ्या,भात,दाळ,भाजी असे अन्न मिळते. पण बरेचसे बंदी त्यावर समाधानी नाहीत, तर त्यांनी सांगितले आम्हाला मिळणाऱ्या अन्नाचा दर्जा हा चांगला म्हणजे हे अन्न हे सकस असावे आणि हे जेवण पोटभर मिळावे जेवढे जेवण मिळते त्यात आमचे पोट भरत नाही. आमचा पोटमारा होतो असे सांगितले. बंद्यांना आहार हा कारागृह नियमावली प्रमाणेच मिळतो पण त्यापेक्षा चांगले मिळावे अशी त्यांची अपेक्षा आहे.

२) बंद्यांना राहण्यासाठी एकूण सोळा बॅरेक्स असून अंडाकृती ही इमारत असून मध्ये अत्यंत थोडी मोकळी जागा आहे. एका बॅरेक्समध्ये पंचेचाळीस बंदी राहतात. त्यामुळे राहण्याच्या ठिकाणी गर्दी होते परिणामी वातावरण दूषित होते. ते तसे असु नये चांगले वातावरण असावे असे सांगितले गेले.

३) कारागृहात बंद्यांच्या मनोरंजनासाठी प्रत्येक बॅरेक्स मध्ये टी.व्ही., कॅरम, वर्तमानपत्रे असतात. पण यांची संख्या अत्यंत कमी असल्याने त्यासंदर्भात बऱ्याच वेळा बंद्यांमध्ये तणावाचे वातावरण निर्माण होते. त्यामुळे कारागृहात मनोरंजनाची साधने वाढवणे गरजेचे असून त्यांचे प्रमाणही वाढवावे.

४) प्रत्येकाला काम असावे. कारागृहात बंदी शिक्षा भोगत असताना काही काळ शिक्षा भोगल्यानंतर त्यांना काम दिले जाते. पण येथे जे बंदी आहेत त्या प्रत्येकाला काम दिले जात नाही. प्रत्येकाना काम द्यावे असे बंद्यांचे म्हणणे आहे. कारण दिवसभर बॅरेक्समध्ये बसून विविध विचार डोक्यामध्ये येतात. त्यामुळे प्रत्येक बद्याला काम द्यावे. म्हणजे दिवसभरचा वेळ कसा जाईल ते कळणार नाही. त्यामुळे आमच्यावर मानसिक परिणाम होणार नाही. त्यामुळे प्रत्येक बंद्यांना आज काम दिले जात नाही. त्यामुळे प्रत्येकाला काम मिळावे अशी अपेक्षा बंद्यांनी व्यक्त केली.

५) मतदानाचा हक्क पाहिजे. कारागृहातील बंद्यांना मतदानाच्या हक्कापासून वंचित ठेवले जाते. त्यांना मतदान करता येत नाही कारण "भारतीय राज्यघटनेने अनुच्छेद ३२६ नुसार भारतातील प्रत्येक नागरिकास ज्यांनी वयाची १८ वर्षे पूर्ण केलेली आहेत त्यांना मतदानाचा हक्क आहे. तर दुसरीकडे रिप्रेझेन्टेशन ऑफ पीपल ॲक्ट १९५१ सेक्शन ६२ (५) च्या अंतर्गत बंद्यांना मतदानापासून रोकले आहे."[६] (संकलन - राजेश चौधरी. २००८)

जगात ग्रेट ब्रिटन, युरोप, जर्मनी, फ्रान्स, स्विडन, पोर्तुगाल, ग्रीस इ. राष्ट्रात काही विशिष्ट बंद्यांना मतदानाचा हक्क दिला गेला आहे. त्यामध्ये ज्यांच्यावर महाअपराधाचा आरोप आहे. अशांना मतदानाचा हक्क नाही. पण सर्वसामान्य गुन्ह्यांचा ज्याच्यावर आरोप आहे त्यांना काही प्रमाणात मतदानाचा वापर करण्यास परवानगी आहे.

कारागृहातील बहुसंख्य बंद्यांनी सांगितलेली बंद्यांना मतदानाचा हक्क द्यावा असे संशोधकास सांगितले. थोडक्यात ज्यांच्यावर आरोप आहे तो पण सर्वसाधारण अपराधाचा अशाच आरोपींना मतदान करता येते. पण गंभीर गुन्ह्यासाठी जे आरोपी आहेत त्यांनाही मतदान करता येत नाही. पण जे बंदी आहेत ज्यांच्यावर गुन्हा सिध्द होऊन शिक्षा झाली आहे अशा बंद्यांना कोठेच मतदानाचा हक्क दिला जात नाही असे दिसते. असे असुनसुध्दा बंदी मतदानाचा अधिकार पाहिजे असे सांगतात. पण आज संपूर्ण जगभर विचारवंत, पत्रकार, मानव अधिकार आयोग जे आरोपी आहेत पण ज्यांनी गंभीर गुन्हा केला नाही अशांना मतदान

६) भारताचे संविधान - संकलन - राजेश चौधरी पान-२०८

करण्यासाठी परवानगी द्यावी त्यासाठी आज आपल्या पावळीवर प्रयत्न करीत आहेत.

६) सामूहिक कार्यक्रम व्हावेत.कारागृहात बंद्यासाठी कारागृह प्रशासन आणि निमशासकीय संस्था यांच्या मार्फत अनेक कार्यक्रम राबवले जातात. त्यातून बंद्यामध्ये मानसिक परिवर्तनासाठी खूप मोठी मदत होते. तरी पण जे काही कार्यक्रम राबवले जातात ते अतिशय मोजके असून धार्मिक कार्यक्रमांत फक्त त्या त्या धर्मांचे लोक सहभागी होतात. सर्वसमावेशक असे, मनोरंजनपर संगीत, गाणे, नाटके, पोवाडे असे काही कार्यक्रम होत नाहीत. ते व्हावेत इतर कारागृहांत बदलीवर आलेल्या बद्यांनी सांगितले इतर कारागृहात बरेच कार्यक्रम होतात तसे कार्यक्रम येथे होणे गरजेचे आहे अशी अपेक्षा व्यक्त केली.

७) घरच्यांना भेटण्यासाठी वेळ अधिक असावा व खुली चर्चा व्हावी.

कारागृहातील बद्यांना त्यांच्या कुटुंबीय, मित्र, नातेवाईक यांना भेटण्यासाठी प्रत्येक महिन्यातून एक वेळा भेट दिली जाते. भेटीची वेळ कारागृहाचे प्रमुख ठरवतात. आज बंद्यांना त्यांच्या कुटुंबीयांना भेटण्यासाठी एका रुममध्ये काच असते त्या काचेमधून फक्त बंदी आणि कुटुंबीय पाहू शकतात त्यांच्यात खूपच अंतर असते आणि फोनवर बोलावे लागते. असे सांगितले. पण ही भेट योग्य नाही. या भेटीत वेळ अतिशय कमी असतो. त्यामुळे बोलणे पूर्ण होत नाही. त्यामुळे भेटीचा वेळ अधिक असावा आणि कुटुंबीयांशी एकमेकांसमोर बसून चर्चा करू द्यावी. ज्यामुळे मानसिक समाधान मिळेल अशी अपेक्षा बंद्यांनी व्यक्त केली.

८) क्वॉईन बॉक्स पाहिजे.:-__कारागृहातील बंद्यांचा कारागृहाबाहेरचा संपर्क नसतो. फक्त महिन्यातून एकदा भेट आणि पत्राद्वारे होते पण आज प्रत्येक ठिकाणी क्वॉईन बॉक्स आहेत. अशा पध्दतीचा क्वॉईन बॉक्स कारागृहात असावा. क्वॉईन बॉक्सवरुन आपल्या कुटुंबीयांशी बोलता येईल. क्वाईन बॉक्सवर बोलताना कारागृह कर्मचारी आमच्या बोलण्यावर लक्ष ठेवतील. जर आक्षेपार्ह बोलणे असेल तर त्याचीही आम्हाला शिक्षा द्यावी. क्वॉईन बॉक्सवरुन फक्त आमच्या कुटुंबीयांनाच त्यात पत्नी, मुले, आई, वडील यांनाच बोलण्याची परवानगी द्यावी त्यासाठी कारागृहात क्वॉईन बॉक्स पाहिजे.

९) खेळाचे साहित्य पाहिजे.:- कारागृहात बंद्यांना फक्त काम करणाऱ्या बंद्यांनाच परिसरातच कामाच्या ठिकाणी पाठवले जाते. पण त्यांना मैदानी खेळ खेळण्यासाठी सोडले जात नाही किंवा खेळाचे साहित्यही कारागृहात नाही. जर खेळाचे साहित्य असेल तर आम्ही मैदानी खेळ खेळु शकतो. त्यामुळे आमचे आरोग्य ही चांगले राहील असे बंद्यांनी सांगितले.

१०) ग्रंथालयात पुस्तके अधिक असावीत.:- कारागृहात जे बंदी वाचन करू शकतात. त्यासाठी कारागृहात ग्रंथालय आहे. मराठी, हिंदी, उर्दू, इंग्रजी अशी १३४६ पुस्तके आहेत. मासिके, साप्ताहिके आहेत. ही पुस्तके

खूपच जुनी असून ती पुरेशी नाहीत. नवीन काही पुस्तके ग्रंथालयात असावी. वर्तमानपत्रे २० बंद्यामध्ये एक या प्रमाणे येते. ते १० बंद्यामध्ये एक असे द्यावे म्हणजे वाचनात वेळ घालवता येईल असे बंद्यांनी सांगितले.

११) कामाचा मोबदला अधिक असावा. :- कारागृहातील बंद्यांनी काही काळ शिक्षा भोगल्यानंतर बंद्यांना काम दिले जाते. पण प्रत्येक बंद्याला काम दिले जात नाही. ज्या बंद्यांना काम दिले जाते जे काम करतात त्यांनी सांगितले की आम्हाला आज जो कामाचा मोबदला मिळतो तो अत्यंत कमी आहे. काम खूप असून कामाच्या तुलनेत योग्य तो मोबदला मिळत नाही. त्यामुळे घरी कुटुंबीयांनाही काही पैसे मोजकेच पाठवता येतात. पण त्यात कुटुंबीयांचा उदरनिर्वाह होत नाही. त्यामुळे आजच्या मोबदलापेक्षा अधिक मोबदला मिळावा. कामाचे योग्य मूल्यमापन करुन मोबदला द्यावा अशी अपेक्षा व्यक्त केली.

१२) कॅन्टीनमध्ये जास्त पदार्थ असावेत.:- कारागृहात बंद्यांसाठी कारागृह नियमाने जो आहार ठरवून दिला आहे तोच आहार दिला जातो. पण बंद्यांना त्या शिवाय काही पदार्थ खावेसे वाटल्यास कॅन्टीनमधून घेता येतात त्यासाठी पैसे द्यावे लागतात. ते कुपन्सच्या स्वरूपात आज कारागृहात कॅन्टीन आहे पण तेथे फक्त लोणचे, पापड, शेव, चिवडा असे काही ठराविक पदार्थ मिळतात. पण हे ठरविकचा पदार्थ न मिळता सर्व पदार्थ कॅन्टीनमध्ये ठेवावेत म्हणजे आम्हाला ती घेवुन खाता येतील असे काही बंद्यांनी अपेक्षा व्यक्त केली.

१३) सुटटी वेळेवर मिळावी.:- कारागृहात बंद्यांना कुटुंबापासून ,समाजापासुन दूर ठेवल्याने मानसिक ताण येतो. हा मानसिक ताण कमी करण्यासाठी बद्यांना दरवर्षी तीस दिवसांची रजा मिळते. ती वाढवुन घेवून ३०+३० अशी साठ दिवसांची रजा मिळते. पण त्यासाठीची जी प्रक्रिया आहे ती बहुतेक वेळा पूर्ण होत नाही. कारागृह प्रशासनाकडे अर्ज करुनही ती वेळेवर अर्ज मंजुर न झाल्याने किंवा आमच्या घराकडील मंडळींनी जामीन न घेतल्याने त्या त्या वर्षातील रजा रद्द होतात. त्यामुळे आम्हाला घरी जाण्यासाठी रजा मिळत नाही. त्यामुळे आमची रजेची प्रक्रिया दरवर्षी वेळेच्या आत पूर्ण करावी म्हणजे आम्हाला आमच्या कुटुंबाला नातेवाईकांना भेटता येईल. जर आम्ही घरी सुटटीवर गेलो नाही तर मानसिक ताण येतो असे बंद्यांनी सांगितले. घरी जाऊन आल्यानंतरचा काळ कारागृहात आनंदाचा जातो. असेही बंद्यांनी संशोधकास सांगितले.

१४) वृध्द व्यक्तीना लवकर सोडावे.:- कारागृहात ज्यांचे वय ६० वर्षांपेक्षा अधिक आहे अशा वृध्द व्यक्तींची संख्या बरीच आहे. संशोधकाने अभ्यासलेल्या एकूण २०० बंद्यांपैकी वय वर्षे ६० ते ७५ पर्यंतचे १८ बंदी आढळले. म्हणजे कारागृहातील एकुण बंद्यांच्या संख्येत वय वर्षे ६० ते ७५ वयाचे अनेक वृध्द कारागृहात शिक्षा भोगत आहेत. त्यांना लवकर घरी सोडावे कारण त्यांचे वय झाले. वृध्दापकाळात कारागृहात राहण्यापेक्षा आपल्या घरी कुटुंबीयांत राहणे गरजेचे असते. तेवढाच मानसिक आधार मिळतो . येथे तर त्यांना संपूर्ण शिक्षा संपेपर्यंत ठेवले तर बरेच जण येथेच मृत्यू पावतील. वृध्द असल्या कारणाने

त्यांना काही कामही होत नाही. दिवसभर चार भिंतीच्या आत बसून त्यांच्या मनावर परिणाम होऊ शकतो. बऱ्याच वृध्दांना दात नाहीत. त्यांना पोळी खाता येत नाही. फक्त भात खातात. बऱ्याच वृध्दांना दिसत नाही. त्यांना चष्मा लावावा लागतो. नेहमी आपल्या कुटुंबीयांच्या आठवणीत ते वावरत असतात. त्यांच्या हातून परिस्थितीनुसार एखादी घटना घडली त्याचा परिणाम म्हणून ते शिक्षा भोगत आहेत. पण अशा बंद्याना काही काळ शिक्षा भोगल्यानंतर त्यांना पश्चात्ताप होत असेल. त्यांच्यामध्ये सुधारणा झाली असेल तर त्यांची शिक्षा संपण्याच्या आत त्यांच्या वयाचा विचार करुन सोडावे. त्यामुळे त्यांना मृत्युसमयी मानसिक सुख मिळेल आणि पर्यायाने कारागृहात होणारी गर्दी कमी होईल असे सविस्तर बंद्यांनी सांगितले. वय वर्षे ६० पेक्षा अधिक वयाच्या वृध्द व्यक्तींना कारागृहात ठेऊ नये असे मानवी हक्क आयोगाने सांगितले असूनसुध्दा आज कारागृहात ९ बंदी वय वर्षे ६० ते ७५ च्या दरम्यान आढळतात. या संदर्भात कारागृह प्रशासनाला माहिती विचारली असता मा.न्यायालयाने एखाद्या व्यक्तीला शिक्षा भोगण्यासाठी कारागृहात राहण्याचे आदेश दिले आहेत, तेवढे दिवस बंद्यांना कारागृहात ठेवले जाते. एखादी व्यक्ती एखादी नियमबाह्य कृती करते तेव्हा न्यायालय त्यात नियमबाहय कृतीसाठी जी शिक्षा असेल तेवढी शिक्षा देते. त्या व्यक्तीचे असे कृत्य केलेल्या वेळचे वय गृहीत धरत नाही आणि जर असे ६० वर्षे वयाच्या वृध्द व्यक्तींना शिक्षा न देता सोडले तर आज जे विविध अपराध घडतात ते सर्व अपराध ६० वर्षे वयाच्या पुढील व्यक्तीकडून होण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे न्यायालय त्यांच्या वयापेक्षा त्यांनी केलेल्या कृत्यावर शिक्षा देते.

१५) कारागृहात मानपसोपचार तज्ज्ञांची नियुक्ती करावी :- कारागृहात बद्यांची आरोग्यविषयक काळजी घेण्यासाठी दोन डॉक्टर्स आहेत. ते फक्त शरिरीक आजारावर उपचार करतात. पण कारागृहात चार भिंतीच्या आत आपल्या कुटुंबीय नातेवाईक दूर असल्याने बंद्यांना मानसिक ताण येतो. त्याचा परिणाम त्यांच्या वर्तनात, इतरांसोबत वागण्यात दिसतो. त्यामुळे अशा मनोरुग्णांवर उपचार करण्यासाठी कारागृहात मानसोपचारतज्ज्ञ डॉक्टरांची नियुक्ती करणे गरजेचे आहे . इतर कारागृहातून बदलीवर आलेले बंदी यांनी सांगितले. इतर कारागृहांत मानसोपचार तज्ज्ञ आहेत पण तेथील कारागृहात मानसोपचार तज्ज्ञ डॉक्टर्स नाहीत. त्यामुळे मनसोपचार तज्ज्ञ डॉक्टरांची नियुक्ती करावी म्हणजे मनोरुग्णांवर ताबडतोब उपचार होऊ शकतील आणि त्यातून पुढे होणारा विपरीत परिणाम टाळता येईल असे बंद्यांनी सांगितले.

१६) आजारी पडल्यावर उपचार चांगले व्हावेत :- कारागृहातील बंदी आजारी पडला किंवा एखादा रोग उदभवला तर त्यावर वरवरचा उपचार केला जातो. त्यामुळे बंद्यांना त्या आजाराचा जास्त त्रास होतो. त्यामुळे बंद्यांना उपचार चांगले मिळावेत जेणेकरुन आमचा आजार ताबोडतोब बरा होऊन आम्ही कामाला जाऊ शकू व आनंदी जीवन जगु. एका युवक बंद्याने सांगितले माझ्या पत्नीने जाळून घेतले तेव्हा तिला विझवण्यामध्ये खाद्यापासून पायापर्यंत माझी एक बाजू जळाली. आज ती त्वचा जाड काळी पडली असून

त्याचा भयंकर त्रास होतो. त्यावर उपचार चालू आहेत पण त्याचा काही परिणाम होतो असे जाणवत नाही त्यामुळे बंद्यांना आजारी पडल्यावर चांगले उपचार करावेत. असे बंद्यांनी सांगितले.

१७) वृध्दांना शिक्षणाची सोय असावी. :- कारागृहात जे वृध्द आहेत पण ते साक्षर नाहीत अशा बंद्यांना शिक्षकामार्फत प्रौढ साक्षरतेचे वर्ग चालवावेत. त्यामुळे अक्षरओळख होऊन आम्ही पोथीपुराण, रामायण, महाभारत अशा पुस्तकांचे वाचन करुन आमचे जीवन जगू. आज आम्हाला वाचता येत नसल्याने आम्ही फक्त विचार करत बसतो. त्यामुळे आम्हाला शिक्षणाची सोय असावी असे वृध्द बंद्यांनी सांगितले.

१८) बाहेर लवकर सोडावे :- आमच्या हातून कळत नकळत किंवा ती परिस्थितीतच तशी बनली त्यामुळे आमच्या हातून गैरकृत्य घडले याची आम्ही आज शिक्षा भोगत आहोत. पण आज आम्हाला त्या घटनेबद्दल खूप पश्चात्ताप होत आहे. कारण रागाच्या भरात क्षणात असे कृत्य घडुन गेले आणि संपूर्ण आयुष्य चार भिंतीच्या आत जगावे लागते हे खूप मोठे दुर्दैव आहे. त्यामुळे बंद्याने काही काळ शिक्षा भोगल्यानंतर त्यांना जर झालेल्या घटनेचा पश्चात्ताप होत असेल. त्यांच्या वर्तनामध्ये सुधारणा झाली तर काही अटींवर अशा बंद्यांना कारागृहातून लवकर सोडावे. जेणेकरुन त्यांचे उर्वरित आयुष्य सुखा समाधानाने घालवता येईल. तसेच कारागृहातील गर्दीही कमी होईल. असे काही बंद्यांनी सांगितले.

१९) सुटल्यावर कर्ज मिळावे.:- कारागृहात त्याला झालेली विशिष्ट शिक्षा कारागृहात भोगत असताना त्याला काम/प्रशिक्षण दिले जाते. त्याचा उपयोग तो तेथून सुटून गेल्यावर त्याच्या उदरनिर्वाहासाठी होईल. पण बाहेर पडल्यावर या प्रशिक्षणाचा उपयोग करुन घ्यावयाचा असेल किंवा पुढील उदरनिर्वाहासाठी एखादा उद्योग टाकावयाचा असेल तर त्यासाठी भांडवलाची गरज असते. पण बंदी कारागृहात राहिल्याने तो गुन्हेगार आहे असा कलंक / शिक्का समाज त्याच्यावर मारतो. त्याचे कुटुंब बहुतेक वेळा उपासमारीचे शिकार ठरते किंवा विस्कळीत तरी होते. अशा प्रतिकूल परीस्थितीत शिक्षा संपून घरी जाताना अनेक प्रश्न मनामध्ये असतात. समाज आपला स्वीकार करील काय ? पूर्वीप्रमाणे वागणूक देईल काय ? आता उदरनिर्वाह कसा करायचा असे अनेक प्रश्न भेडसावतात. त्यामुळे आम्ही बाहेर पडल्यावर आम्हाला स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी एखादा उद्योग /काम चालू करण्यासाठी कर्ज मिळण्याची व्यवस्था प्रशासनाने करावी.असे बंद्यांनी सांगितले. बंद्यांना शिक्षा संपून घरी गेल्यावर मदतीसाठी काही निमशासकीय संस्था कार्यरत आहेत. पण त्यांची संख्या अत्यंत कमी असून माहितीच्या अभावी अनेक बंद्यांना त्याचा लाभ मिळत नाही. त्यामुळे निमशासकीय संस्थांबरोबरच कारागृह प्रशासनाने कर्ज मिळण्याची व्यवस्था करावी.

२०) जे आहे ते ठीक आहे :- कारागृहात आज विविध सुविधा दिल्या जातात. त्यात निवास,आहार,काम,कामाचे वेतन,साजरे होणारे धार्मिक कार्यक्रम,आरोग्य सेवा या सर्व गोष्टी अगदी

वेळेवर होतात. आपल्या घरीही एवढ्या सुविधा मिळत नाहीत. त्यामुळे आज जे काही कारागृहात मिळते त्यावर आम्ही समाधानी आहोत. त्यामध्ये काहीच बदल करण्याची गरज नाही. जे आहे ते ठीक आहे. असे काही बंद्यांनी सांगितले. म्हणजेच कारागृहात मिळणाऱ्या सुविधांवर काही बंदी समाधानी आहेत असे जाणवते.

२१) जे आहे त्यात थोडा फार बदल करावा :- कारागृहातील काही बद्यांनी ज्या सुविधा दिल्या जातात त्यावर समाधान व्यक्त करत जे आहे त्यात थोड्या प्रमाणात बदल करावा असे सांगितले. कारण त्यात अन्नाचा दर्जा , सर्वांना काम , कार्यक्रमात सर्वांचा सहभाग, कामाच्या वेतनात वाढ, रजा वेळेवर मिळावी अशा थोड्या फार प्रमाणात बदल करावा असे काही बंद्यांनी सांगितले. कारागृहातील बंद्यांनी त्यांना मिळणाऱ्या सुविधा संदर्भात कोणकोणत्या सुधारणा व्हाव्यात या संदर्भात वरील विवेचन सर्व बंद्यांनी सांगितले. त्याचप्रमाणे वरील बदलांव्यतिरिक्त आणखी काही बदल व्हावेत असे बंद्यांनी सांगितले. ते पुढीलप्रमाणे

- ❖ कारागृहातील तरुण बद्यांनी सांगितले जे तरुण विवाहित आहेत पण एखाद्या अपराधासारखे कृत्य घडल्याने आम्ही कारागृहात शिक्षा भोगत आहोत. आमच्या लैगिंक भावना मारल्या जातात. त्यामुळे महिन्यातून ठराविक वेळा कारागृहातच आमच्या पत्नीसोबत लैगिंक संबंध ठेवण्याची सोय असावी असे काही तरुण बंद्यांनी सांगितले.
- ❖ जन्मठेप झालेल्या बंद्यांना संपूर्ण शिक्षा न देता काही काळ म्हणजे ९ ते १० वर्षे शिक्षा भोगल्यानंतर सोडून द्यावे.
- ❖ कारागृहात मिनी बँक असावी.म्हणजे आम्ही जे काम करतो . त्याचा मोबदला बँकेत ठेवता येईल किती पैसे खर्च केले किती राहिले आम्हाला स्वतःला पाहता येईल.
- ❖ ३०२ म्हणजे मनुष्य वधाच्या अपराधाबद्दल जाणीव जागृती करावी. कारण कारागृहात ३०२ कलमाखाली येणाऱ्या बंद्यांचे प्रमाण अधिक आहे. कारण आज ३०२ गुन्ह्याबद्दल शिक्षा म्हणजे जन्मठेप होते. म्हणजे या पुढचे संपूर्ण आयुष्य कारागृहात काढावे लागते. याची जाणीव कारागृहात आल्यावर होते. जर आम्हाला जन्मठेपच्या शिक्षेसंदर्भात किंवा ३०२ कलमासंदर्भात माहिती असती तर आमच्या हातून असे कृत्य घडले नसते. पण आज गावपातळीवर ३०२ कलम काय आहे या संदर्भातील शिक्षा लोकांना समजावून सांगावी म्हणजे असे कृत्य (३०२ कलमात येणारे ) करण्यास लोक घबारतील. पर्यायाने अपराधाचे प्रमाण कमी होईल.

❖ कारागृहातील फक्त ३०% बंदीच मुळात गुन्हेगार आहेत पण ७०% बंदी निरापराध आहेत. कारण त्यांनी अपराध न करता त्यांच्यावर खोटा आरोप हा द्वेष भावनेतून ठेवला आणि त्यांना न्यायालयाने शिक्षा दिली. ते आज चुकीची शिक्षा भोगत आहेत. बऱ्याच बंद्यांनी सांगितले आमच्यावर न्यायालयीन अत्याचार झाला आहे. त्याचा परिणाम म्हणून आमचे आयुष्यातील अत्यंत महत्त्वपुर्ण काळ येथे कारागृहात घालावा लागतो. कारागृहातील सर्व बंद्यांचे ब्रेन मॅपिंग करावे त्यातून हे सिध्द होईल की ७०% बंदी निरापराध आहे. न्यायालयीन प्रक्रिया चालू असतानांच ब्रेन मॅपिंग होणे गरजेचे आहे. कारण यातून खऱ्या गुन्हेगारांनाच शिक्षा होईल. निरापराध व्यक्तींवर वैयक्तिक द्वेषापोटी, सुडबुध्दीने जाणुन बसून केसमध्ये नावे घेतली जातात. पण त्यांना ब्रेन मॅपिंगमध्ये त्यांनी अपराध केला आहे का नाही यांची माहिती कळू शकेल असे बंद्यांनी सांगितले.

❖ कारागृहात बंद्यांना आलेली पत्रे दिली जात नाहीत. बऱ्याच वेळा खूप दिवसानंतर दिली जातात. पत्राच्या माध्यमातून कुटुंबाची सविस्तर माहिती आम्हाला कळते. बऱ्याच कुटुंबांची आर्थिक परिस्थिती बेताची असल्यामुळे कुटुंबीय दर महिन्याला भेटण्यासाठी येऊ शकत नाहीत. त्यावेळी पत्रे पाठवून खुशाली कळवतात. पण आमची आलेली पत्रे वेळेवर दिली जात नाहीत. ती वेळेवर दिली जावी.

❖ कारागृहातील बंद्यांनी सांगितले बंद्यांच्या कामासाठी जे कारखाने आहेत. त्यापैकी काही कारखाने बंद आहेत त्यामुळे बऱ्याच बंद्यांना काम करण्याची इच्छा असून सुध्दा काम मिळत नाही. त्यामुळे बंद कारखाने लवकरात लवकर सुरू करावेत म्हणजे बहुसंख्य बंद्याना काम मिळेल. यात यंत्रमाग, शिवणकाम, पंजाकाम सध्या बंद आहेत.

❖ कारागृहात बंद्यासाठी कॅन्टीन सुविधा आहे. पण या कॅन्टीनमधील सामानाची किंमत दुप्पट लावली जाते. परंतु जे पाहिजे ते सामान येथे मिळत नाहीत. कॅन्टीनमध्ये सर्व सामान मिळावे.

❖ कारागृहात मा.कारागृह महानिरीक्षक , मा. उपमहानिरीक्षक यांनी वेळोवेळी भेटी द्यावेत कारण आमच्या अडचणी वरिष्ठांना सांगितल्या तर त्या लवकर दुर केल्या जात नाहीत जर महानिरीक्षक आणि उपमहानिरीक्षक साहेबांनी भेटी दिल्या तर आमच्या अडचणी प्रत्यक्ष त्यांच्या पुढे मांडता येतील असे बंद्यांनी सांगितले.

## ❖ अधिकाऱ्यांची माहिती

मध्यवर्ती कारागृहातील अधिकाऱ्यांसाठी खास प्रश्नावली तयार करण्यात आली होती. या प्रश्नावलीमध्ये अधीकाऱ्यांसाठीचे काही वैयक्तिक प्रश्न होते तर कैद्यांसोबत काम करत असतांना त्यांचे अनुभव, कार्य प्रणाली, त्यांना मिळणाऱ्या सुविधा, कामाबद्दलची आपुलकी, अपराध्यासोबत वागतांना

वर्तवणूक आणि अपराध्यांना दिल्या जाणाऱ्या सुविधा या संबंधीची एक संरचीत प्रश्नावली तयार करण्यात आली. कारागृहातील अधिकाऱ्यांसाठी प्रश्नावली तयार करण्याचे कारण म्हणजे तुरुंग व्यवस्थेतील अत्यंत म्हत्त्वपूर्ण घटक म्हणजे कर्मचारी त्यात महत्त्वपूर्ण कामगिरी पार पाडणारे अधिकारी वर्ग यांना अपराध्यासोबत म्हणजे त्यांचे पुनर्वसन व त्यांच्यामध्ये सुधारणा घडविण्यासाठी अधिकारी वर्गाची मानसिकता असली पाहिजे. कारण गुन्हेगार या येणारा प्रत्येक माणूस भिन्न अशा सामाजिक, आर्थिक, राजकीय,कौटुंबिक, धार्मिक परिस्थितीमधील असतो. तो गुन्हेगार का झाला या पाठीमागे अनेक कारणे असतील. पण त्या कारणांचा विचार करुन त्या गुन्हेगारांची पार्श्वभूमी जाणून घेऊन त्यांच्यामध्ये बदल घडवणे हे तितकेच अवघड काम आहे. जर अशा बंद्यांना योग्य पध्दतीची वागणूक दिली नाही त्यांच्यामध्ये सुधारण्यासाठी काही खास प्रयत्न केले गेले नाही, तर तो कैदी इतर बंद्यांसोबत राहून त्याची गुन्हेगारी प्रवृत्ती वाढू शकते आणि यातून समाजाला खूप मोठा धोका निर्माण होतो.जेलमध्ये गेलेला आरोपी इतर गुन्हेगारांच्या संगतीमुळे आणखी सराईत बनतो. आपले मित्र वाढवतो. आणि टोळी बनवून बाहेर पडल्यावर मोठे गुन्हे करायला सुरुवात करतो.

वरील संदर्भ लक्षात घेता अपराध्यांना जेलमध्ये आल्यावर त्यांच्यात योग्य ती सुधारणा नाही झाली तर काय होते. याचा अनुभव प्रत्यक्ष भारतीय पोलीस अधिकारी श्री खोपडे साहेब यांनी वरील पुस्तकास दिलेल्या प्रस्तावनेवरून आपणास लक्षात येते. म्हणजे जेल व्यवस्थेतील अत्यंत म्हत्त्वपूर्ण घटक कर्मचारी अधिकारी यांचीही माहिती घेण्याचे संशोधकाने ठरवले. कारण या अधिकारी वर्गाची योग्य पध्दतीचे सुधारणा केली तर निश्‍तिच बाहेर येणारा गुन्हेगार हा गुन्हेगार न राहता तो एक सुजाण नागरिक होईल. आपले जीवन शांतीच्या मार्गाने जगेल. नाही तर IPS अधिकारी यांनी सांगितल्याप्रमाणे ते सराईत गुन्हेगार बनतील. तरी अधिकाऱ्यांची सर्वांगीन माहिती घेतल्यानंतर पुढील सविस्तर माहिती मिळाली. बहुसंख्य अधिकाऱ्यांनी प्रश्नावली भरुन दिली. त्यामध्ये बऱ्याचशा अधिकाऱ्यांनी त्यांची व्यक्तिगत माहिती देण्याचे टाळले. कारागृहात शिक्षा लागलेले एकूण कैदी ४१९, रिमांड किंवा आरोपी ५९६, शिक्षा झालेल्या स्त्रिया ०५, रिमांडवरील स्त्रिया ३० एकूण १०१५.बहुसंख्य अपराध्यांना जन्मठेप शिक्षा झाली आहे अशी माहिती दिली गेली.

कारागृहात अपराध्यासाठी पक्की इमारत असून यात एकुण ८+८ =१६ बॅरेक्स आहेत. एका बॅरेक्समध्ये किमान ४५ बंदी राहतात. एका बॅरेक्समध्ये संडास बाथरुम, पंखे लाइट, टी.व्ही, कॅरम, बंद्यांना साबण, दंतमंजन,कपडे,अंथरुण,ग्लास,पाणी, पांघरुण नियमाप्रमाणे (Jail Manual) दिले जाते. तसेच अपराध्यांना त्यांच्या आवडीनुसार प्रशिक्षण दिले जाते. सध्या येथे लोहारकाम, सुतारकाम,

शिवणकाम इ कामांचे प्रशिक्षण दिले जाते. त्यासाठी स्वतंत्र प्रशिक्षकांची नियुक्त करण्यात आली आहे. बंद्याकडुन दररोज आठ तास काम करून घेतले जाते. त्यांना त्या कामाप्रमाणे नियमित पगारहां दिला जातो. त्याची नोंद रजिस्टरमध्ये होते. कुशल कामासाठी ४० रुपये, अर्धकुशल कामासाठी ३५ रुपये आणि अकुशल कामासाठी २५ रुपये दिले जातात. काम करताना इजा झाल्यावर ताबडतोब प्रथमोपचार केले जातात.

कारागृहात कैद्यांची आरोग्यविषयक काळजी घेण्यासाठी दोन डॉक्टरांची नियुक्ती करण्यात आली आहे. कारागृहातील बंद्यांना जेव्हा पाहिजे तेव्हा ताबडतोब वैद्यकीय मदत उपलब्ध हाते. गंभीर आजारासाठी शासकीय रुग्णालयात बंद्यांना घेऊन जावे लागते. त्यासाठी स्वतंत्र रुग्णवाहिका जेलमध्ये आहे. कारागृहात सर्व बंद्यांना सहानुभुतीपूर्वक वागणूक दिली जाते. मानवी दृष्टिकोनातून सामान्य माणसाप्रमाणे वागणूक दिली जाते. बंद्यांना महिन्यातून एक वेळा भेट दिली जाते. यात त्यांचे कुटुंबीय नातेवाईक भेटी घेतात. जर भेटण्यासाठीचा महिन्यातील १ पेक्षा अधिक भेटी केल्या तर बंद्यांची मानसिकता बिघडू शकते. त्याचा परिणाम त्यांच्या वर्तनावर होतो. बंद्यांना घराची आठवण येऊ नये म्हणून त्यांच्या विचारात परिवर्तन व्हावे म्हणून प्रतयेक बॅरेक्समध्ये एक टी.व्ही. ,कॅरम ,बुध्दिबळ, पेपर आहेत . तसेच वाचनालयीन पुस्तके आहेत. आसाराम बापू यांचे प्रवचन कार्यक्रम होतात. बऱ्याच निमशासकीय संस्थांनी (N.G.O.) अनेक मार्गदर्शनपर कार्यक्रम, रक्षाबंधन, व्यक्तीमत्त्व विकास कार्यक्रम घेतले आहेत. यातून बंद्यांचे मानसिक परिवर्तन करण्याचा प्रयत्न केला जातो.

शिक्षण हा माणसाचा तिसरा डोळा असतो. जेलमध्ये आलेल्या बंद्यांना शिक्षणाची इच्छा असेल तर मुक्त विद्यापीठाद्वारे शिक्षण घेण्यासाठी परवानगी दिली जाते. त्यांना योग्य ते साहित्य पुरवले जाते. आज कायद्याचा अभ्यास, पदवीधर, पत्रकारिता, असे शिक्षण काही कैदी घेत आहेत.

कारागृहात बंद्यांच्या वयाची अट नाही. न्यायालयाने जी शिक्षा दिली आहे म्हणजे एकूण किती वर्षांची तेवढी शिक्षा तो कैदी कारागृहात काढतो. ६० वर्षांच्या वरील बंद्यांना सोडावे असे मानवी हक्क आयोगाने सांगितले असतानाही आज या कारागृहात बरेच कैदी वय वर्षे ६० च्या पूढे आहेत. कारागृहात आज रोजी पूरेसे कर्मचारी आहेत. कर्मचाऱ्यांना वेळोवेळी प्रशिक्षण दिले जाते. बंद्यांना वेळेवर रजा हा त्यांचा अधिकार आहे. ५ वर्षांवरील शिक्षाआधीन बंद्यांना वर्षांतून एक वेळा संचित रजा १५ दिवसांची व पॅरोल रजा वर्षातून दोन वेळा १५+१५=३० दिवसांची रजा दिली जाते. त्या संबंधीची कार्यवाही कर्मचारी करतात. बऱ्याच बंद्यांची जामीन कोणी घेत नाही त्यामुळे त्यांची सुटी वाया जाते. कारागृह प्रशासन सुधारणा आणि पुनवर्सन यासाठी अतिशय योग्य पध्दतीने काम करत आहे. त्यामुळे यात काहीच सुधारणा

/बदल करण्याची गरज नाही. राष्ट्रीय मानव अधिकार आयोगाने आजपर्यंत एक वेळाही कारागृहास भेट दिली नाही. बंद्यांसोबत काम करताना मानवतावादी दृष्टिकोनातून त्यांना वागणूक दिली जाते .बऱ्याच बंद्यांच्या समस्या अधिकारी वर्ग सोडवतात. त्यातून बंद्यांचे समाधान यात खुप मोठा आनंद असतो. बऱ्याच वेळा काम करताना इच्छा असूनही शासन नियमामुळे अडचणी येतात. अनेक गुणवंत बंदी असतात त्याबद्दल त्यांची सहानुभूती वाटते अशी माहिती देण्यात आली.

## ❖ गृहीत कृत्यांची पडताळणी (Hypothesis Teasting)

संशोधन प्रक्रियेमध्ये गृहीत कृत्यांना अनन्य साधारण महत्त्व आहे. गृहीतकृत्ये ही संशोधकाला दिशा दर्शन करण्याचे कार्य करतात. संशोधन प्रक्रियेस सुरुवात झाल्यानंतर संशोधक काही गृहीत कृत्यांची मांडणी करतो आणि त्या दिशेने संशोधन करतो. प्रस्तुत संशोधनात संशाधकाने जी गृहीत कृत्ये मांडली होती त्यानुसार संशोधनाअंती त्या गृहीत कृत्यांची पडताळणी करणे आवश्यक असते. ती पुढीलप्रमाणे :-

१. गुन्हेंगार हे जन्मजात नसून परिस्थितीने बनतात. गुन्हेगांराबाबत लॉम्बोसो आणि गोडार्ड या अभ्यासकांनी रुपवादी सिध्दांत विकसित केला. लॉम्ब्रोसो यांनी १८७५ मध्ये रूपवादी सिध्दांतांत सांगितले की, अपराधी हे जन्मजात असतात. त्यांच्या शरीराची विशिष्ट अशी ठेवण असते. अशा जन्मजात व्यक्ती इतर सामान्य लोकांपेक्षा वेगळ्या असतात. त्यांचे मोठे डोळे, लांबट चेहरा, सपाट व मोठे कान, गालांची हाडे वर आलेली, मोठे कान, तीक्ष्ण व भेदक दृष्टी, केसांचे प्रमाण अधिक इ. लक्षणे आढळतात. गोडार्ड यांनी शारीरिक लक्षणांऐवजी मानसिक आधार यांचा अभ्यास करुन अपराधाचे मूळ कारण मानसिक विकृती सांगितले. मानसिक विकृती ही अनुवंशंकितेने येते. त्यामुळे असे मानसिक विकृत लोक गुन्ह्याचे वर्तन करतात. म्हणजेच ते जन्मताच असतात असे सांगितले. पण या सिध्दांतावर टीका झाली. चार्ल्स गोरिंग (Charles Goring) व त्यांच्या सहकाऱ्यांनी ३० हजार कैद्यांचे अध्ययन केलं पण त्यांना सामान्य माणसे आणि अध्ययन केलेले कैदी यांमध्ये भिन्नता जाणवली नाही. त्यांमध्ये समानताच अधिक जाणवली. त्यामुळे आधुनिक काळात अपराधी हे जन्मजात नसून ते परिस्थितीने बनतात हा अधुनिक विचार पुढे आला.

संशोधकाने गुन्हेगार हे जन्मजात नसून परिस्थितीने बनतात असे गृहीतकृत्य मांडले होते. संशोधकाने मध्यवर्ती कारागृहातील २०० बंद्यांच्या मुलाखती घेतल्या. त्या दोनशे बंद्यांमध्ये शरीराची विशिष्ट ठेवण किंवा मानसिक विकृती अशी लक्षणे आढळली नाहीत. म्हणजेच बंदी आणि सर्वसामान्य व्यक्ती यांच्यात विषेश असा फरक जाणवत नाही. बंदी हे ही सर्वसामान्य माणसाप्रमाणेच असतात. त्यांनी जे अपराधाचे कृत्य केले त्यापाठीमागे विविध कारणे आहेत. ति सर्व परीस्थितीजन्य कारणे आहेत बहूसंख्य

बंद्यांनी नियोजनबध्द अपराधाचे कृत्य केले नाहीत त्यामुळे अपराधी हे जन्मजात नसून परीस्थितीने बनतात. हे गृहितक सत्य ठरले आहे. बंद्यांच्या कुंटुंबीयांची गुन्हेगारी पार्श्वभुमी आहे काय ? त्या संदर्भात बंद्यांनी केलेल्या अपराधा व्यतिरीक्त कुटुंबातील इतर व्यक्तिंनी कधी गुन्हा केला काय ? असा प्रश्न केला असता (तक्ता क्रं. ४.२.८) १८९ बंद्यांनी नाही असे सांगितले म्हणजे बंद्यांच्या कुटुंबाची गुन्हेगारी पार्श्वभुमी नाही असे जाणवते. यावरुण गुन्हेगार हे जन्मजात नसतात असे जाणवते.

बंद्याने केलेल्या अपराधात कुटुंबातील कोणी सहभागी होते (तक्ता क्र. ५.२.३) या संदर्भात ११८ बंद्यांनी नाही म्हणजेच एकट्यानेच गुन्हा केल्याचे सांगितले. तसेच अपराधाचे कृत्य परिस्थितीतुन झाले त्यामुळे केलेल्या अपराधाबद्दल आता पश्चात्ताप होतो किंवा आमच्या कडून चुक झाली असे १४६ (७३%) बंदी सांगतात. (तक्ता क्र. ५.२.८) यावरूण आपणास असे निदर्शनास येते की, अपराधी हे परिस्थितीमुळे बनले आहेत. ते जन्मजात असत नाहीत हे सिध्द होते. त्यातून संशोधकाने मानलेले गुन्हेगार हे जन्मजात नसून परिस्थितीने बनतात हे गृहीतक सत्य ठरले आहे.

**२.** कारागृहात सुधारात्मक सुविधांचा अभाव जाणवतो, असे गृहीतक संशोाकाने मांडले होते. कारागृहे ही कारागृहे न राहता ती सुधारालये बनली आहेत. सुधारणा आणि पुनर्वसन या पध्दतीने मार्गक्रमण करताना सुधारणात्मक दृष्टिकोनातून बंद्यांना सुधारण्यासाठी अनेक सुविधा आहेत. त्यात त्यांच्या वर्तनामध्ये मूलभुत बदल होऊन वृत्तीत बदल व्हावा हाच महत्त्वपूर्ण उद्देश जाणवतो. त्यात त्यांना मिळणारे अन्न, त्याचा दर्जा, वाचनासाठी वर्तमानपत्रे, पुस्तके, खेळ, मनोरंजनाची साधने, प्रवचन, योगा, धार्मिक कार्यक्रम, पॅरोल रजा अशा अनेक सुविधांचा समावेश आपणास करता येईल. कारागृह प्रशासन या सर्व सोई सुविधा बंद्यांना दिल्या जाऊन त्यांच्यामध्ये सुधारणा करण्यासाठी प्रयत्नशील असते असे म्हणत असताना आज कारागृहातून बाहेर पडणारा कैदी हा बऱ्याच वेळा अट्टल गुन्हेगार बनतो. त्या संदर्भात वृत्तपत्र प्रसार माध्यमांकडून बऱ्याच वेळा वाचण्यात, ऐकण्यात येते. त्यामुळे कारागृहात सुधारणात्मक सुविधा दिल्या जात नसाव्यात असे गृहितक संशोधकाने मांडले होते.

कारागृहात कैद्यांना ज्या वेगवेगळ्या सुविधा दिल्या जातात त्या संदर्भात संशोधकाने बंद्यांना मुलाखती दरम्यान प्रश्न विचारले. पुरेशा आहार संदर्भात प्रश्न केला असता १४९ (७४.५%) बंद्यांनी सांगितले आम्हाला पुरेसा आहार मिळतो. (तक्ता क्र. ६.१.ब) तो आहार फक्त जास्त प्रमाणातअसावा. पण तुरुंग नियमावलीच्या आदेशानुसार तेवढेच आहारांचे प्रमाण दिले जाते. पिण्यासाठी मुबलक व स्वच्छ पाणी आहे असे (९५ टक्के) बंद्यांनी सांगितले. (तक्ता क्र.६.२) (तक्ता क्र. ६.३) नुसार त्यांच्या राहण्याच्या ठिकाणांचे वातावरण प्रसन्न / प्रकाशमय आहे असे दिसते तक्ता क्र. ०६ नुसार बंद्यांना त्यांच्या आवडीनुसार प्रशिक्षण मिळते. (तक्ता क्र. ६.११) नुसार बंद्यांनी काम केल्याचा मोबदला त्यांना मिळतो.

हा मोबदला त्यांना दरमहा मिळतो तो त्यांच्या वैयक्तिक नावावर जमा होतो. (तक्ता क्र. ६.१३) नुसार बंद्याला काम करताना काही इजा झल्यास ताबडतोब प्रथमोपचार मिळतो असे १९४ बंद्यांनी सांगितले. त्यांच्यासाठी कारागृहात स्वतंत्र दवाखाना आहे. त्यामुळे आजारी बंद्यांवरही ताबडतोब उपचार होऊन त्यांची वेळोवेळी तपासणीही होते. (तक्ता क्र. ६.१४) नुसार ज्या बंद्यांना शिक्षण घ्यावयाचे आहे त्यांना शिक्षणाची संधीही उपलब्ध करून दिली जाते. कारागृहातील ०५ बंदी सध्या शिक्षण घेत असून मुक्त विद्यापीठात त्यांचा प्रवेश आहे. तसेच त्यांना शैक्षणीक साहित्य पण पुरवले जाते हे (तक्ता क्र. ६.१५) वरुन लक्षात येते. कारागृहातील बंद्यांना मानसिकतेमध्ये परिवर्तन होण्यासाठी सामूहिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.असे तक्ता क्र. ६.१६ वरुण लक्षात येते कारागृहात योगा, व्याख्यान यांचे विशेष आयोजन केले जात नाही (तक्ता क्र. ६.२७) असे बंद्यांनी सांगितले. घरी भेटण्यासाठी सुट्टी नियमानुसार मिळते असे बंद्यांनी सांगितले (तक्ता क्र. ६.२८) कारागृहात ज्या वेगवेगळया उपक्रमांची अम्मल बजावणी केली जाते त्या उपक्रमावर समाधानी बंद्यांचे प्रमाण अधिक आहे. (तक्ता क्र. ६.३३) कारागृहात बंद्यांच्या सुधारण्यासाठी वरील सुविधा कारागृहात राबवल्या जातात. योग, प्राणायम, विशेष व्याख्याने आयोजित केली जात नाहीत असे जाणवले व बंद्यांनी ही सांगितले. त्यामुळे संशोधकाचे हे गृहीतक काहीअंशी सत्य ठरले असून बहुतांशी असत्य ठरले आहे.

**३.** करागृहात क्षमतेपेक्षा अधिक कैदी ठेवले जातात. समाजात व्यक्ती आपल्या स्वतःच्या सुखांसाठी इतरांना दुःख झाले तरी चालेल ही प्रवृत्ती समाजात वाढत आहे. अशा कायदाबाह्य वर्तन करणाऱ्यांचे प्रमाण वरचेवर वाढत आहे. आज भारतात १२०० कारागृहे आहेत. महाराष्ट्रात एकूण ३८ कारागृहे आहेत. त्यातील एकूण क्षमता आणि प्रत्यक्षातील कैद्यांची संख्या पाहिल्यास आपणास याची जाणीव होईल.

| **अ.क्र.** | **कारागृह प्रकार** | **एकुण संख्या** | **प्रत्यक्ष कैदी ठेवण्याची क्षमता** | **प्रत्यक्ष कैदी** |
|---|---|---|---|---|
| ०१ | मध्यवर्ती करागृहे | ०८ | ११,३८२ | १७,०८६ |
| ०२ | जिल्हा कारागृहे वर्ग-१ | ०८ | २,७०६ | ३,५४३ |
| ०३ | जिल्हा कारागृहे वर्ग-२ | १३ | २,१७१ | ३,०६७ |
| ०४ | जिल्हा कारागृहे वर्ग-३ | ०२ | १४५ | १९६ |
| ०५ | महिला कारागृहे | ०१ | २६२ | २४१ |
| ०६ | बोस्टल स्कुल | ०१ | १०५ | १८३ |
| ०७ | विशेष कारागृहे | ०१ | २४६ | ६५४ |
| ०८ | खुले कारागृहे | ०३ | ७२२ | ३३२ |
| ०९ | खुली वसाहत | ०१ | २८ | २९ |
| | **एकुण** | **३८** | **१७,७६७** | **२५,३३३"**[७] |

(Handbook of Prison Statisctics. 2007)

वरील आकडेवारी महाराष्ट्रातील कारागृहातील बंदी ठेवण्याची क्षमता आणि प्रत्यक्षातील एकूण बंदी यांची संख्या पाहिली असता आज कारागृहात क्षमतेपेक्षा अधिक बंदी ठेवले जातात असे निदर्शनास येते.

संशोधकाने संशोधना दरम्यान हर्सूल मध्यवर्ती कारागृहातील प्रत्यक्ष कैदी यांची माहिती संकलित केली. या कारागृहाची क्षमता ५७९ आहे पण प्रत्यक्षात ९०८ एवढे कैदी आहेत. कारागृहात प्रत्यक्ष शिक्षा लागलेलो बंदी आणि ज्यांच्यावर आरोप आहे असे आरोपी या दोघांनाही ठेवले जात असल्याने कारागृहात बंद्यांची संख्या वाढत आहे.

हर्सुल मध्यवर्ती करागृहातील वर्षनिहाय शिक्षा लागलेले आणि आरोपी यांची संख्या पुढील प्रमाणे.

| इ.स. | शिक्षा लागलेले | आरोपी | एकुण |
|---|---|---|---|
| २००५ | ४,४४० | ४,०८० | ८,५२० |
| २००६ | ५,५२० | ४,५६० | १०,०८० |
| २००७ | ५,५८० | ५,०४० | १०,६२० |
| २००८ | ५,४६० | ५,२८० | १०,७४० |
| २००९ | ५,१०० | ६,३०० | ११,४०० |
| २०१० | ५,३८८ | ७,२७२ | १२,६६० |

वरील आकडेवारी वरुन एकूण वार्षिक संख्या जर पाहिली तर ती दरवर्षी वाढत गेलेली दिसते. पण कारागृहांची क्षमता मात्र तेवढीच आहे. त्यावरुन कारागृहातील क्षमतेपेक्षा अधिक कैदी ठेवले जातात हे संशोधकाचे गृहितक पुर्ण सत्य ठरले आहे.

**४.** बंद्यांकडे मानवतावादी दृष्टिकोनातुन पाहिले जात नाही किंवा तशा आदेशांचे पालन केले जात नाही. असे गृहितक संशोधकाने मांडले होते. कारागृहात बंद्यांना अतिशय कठोर अशी वागणुक दिली जात असत. यातून कारागृहातून बाहेर पडणारा माणूस हा अट्टल गुन्हेगार बनत असतो. बऱ्याच वेळेस बंदी मनोरुग्ण होत असत. कारागृहातील कैदी हे ही मानव आहेत त्यांनी जे वर्तन केले आहे त्याला परिस्थिती जबाबदार असते. त्यामुळे त्यांच्याकडे मानवतावादी दृष्टिकोणातून पाहूण त्याच्या सोबत वर्तन करताना ही भावना असावी. त्यांच्याशी कारागृह कर्मचाऱ्यांचे वर्तन हे अमानवीय असू नये असे मानवतावादी दृष्टिकोन सांगतो. प्रत्यक्षात बंद्यांकडे मानवतावादी दृष्टिकोनातून पाहीले जाते. याच संदर्भात माहिती संकलित केली असता कारागृह कर्मचारी आमच्या सोबत चांगले वागतात (तक्ता क्र. ६.२१) असे सांगितले. ते बंद्यांशी सौजन्याने वागतात वेळप्रसंगी रागावतात पण पुन्हा आमच्याशी चांगले बोलतात. सुट्टी (पॅरील) हा कैद्यांचा अधिकार आहे कारण कारागृहात राहूण घराकडील मंडळांविषयी फक्त विचार करून चालत नाही तर

त्यांची प्रत्यक्ष भेटही आवश्यक आहे. कारण त्यामुळे त्यांचे मानसिक संतूलन राखले जाते. बंद्यांची सुट्टी वेळेवर मंजूर करणे हे मानवतावादी वर्तनाचे उदाहरण आहे. त्यामुळे कारागृहातील बहुसंख्य बंद्यांची रजा वेळेवर मंजूर होते (तक्ता क्र. ६.२९) असे बंद्यांना संगितले. बंद्यांच्या सुधारण्यासाठी जे वेगवेगळे उपक्रम कारागृहात राबवले जातात. (तक्ता क्र. ६.३३) त्यावर बहुसंख्य बंदी समाधानी आहेत.

कारागृहात **सुधारणा आणि पुनर्वसन** या प्रमाणे मार्गक्रमण करताना अनेक सुविधा दिल्या जातात. तसेच सर्व बंद्यांना काम दिले जाते. कारण कैदी हेही मानव आहेत. जर त्यांना एकाच ठिकाणी फक्त बसून ठेवले तर त्यांच्यावर मानसिक परिणाम होऊ शकतो. त्यामुळे त्यांच्या मनावर परिणाम होऊ नये म्हणून काम दिले जाते. कुशल कामगारांसाठी ४० रु. अर्धकुशल कामगारासाठी ३५ रु. तर अकुशल कामगारांसाठी २५ रु. दररोज दिला जातो. या कामगाराकडून अतिश्रम करुन घेतात असे संशोधकाने गृहीतक मानले होते, पण कारागृहात दिवसाला सरासरी १० तासांपर्यंत काम करून घेतले जाते. पण १४ ते १८ तासांपर्यंतही काही बंद्यांना काम करावे लागते. (तक्ता क्र. ६.१०) असे तक्त्यावरुन जाणवते पण ६ ते १० तास काम करणाऱ्यांचे प्रमाण अधिक आहे. रात्री वॉचमन म्हणून काम करणाऱ्यांना जास्त काळ काम करावे लागते. त्यामुळे संशोधकाचे हे गृहीतक काही अंशी असत्य ठरले आहे.

(तक्ता क्र. ६.३३) संशोधकाने कारागृहातील बंद्यांकडे मानवीय दृष्टिकोनातुन पाहिले जात नाही व त्यांच्याकडुन अतिश्रम करुन घेतले जाते. हे गृहीत ही काही प्रमाणात असत्य ठरले आहे.

**५** कुटुंब, समाज यांपासून दूर राहिल्याने बंद्यांच्या मनात विफलतेची भावना निर्माण होते असे गृहीतक संशोधकाने मांडले होते. मानव हा समाजशील प्राणी आहे. तो आपल्या गरजा भागवण्यासाठी इतर व्यक्तींच्या सान्निध्यात येतो, आणि आपल्या गरजा भागवतो. कुटुंब नातेवाईक, मित्र, समाज यामध्ये त्याच्या अनेक गरजा भागविल्या जातात. पण जेव्हा माणूस आपल्या प्रिय माणसापासुन दूर जाईल तेव्हा त्याच्या मनामध्ये असुरक्षितता, परकेपणाची भावना निर्माण होते. करागृहात शिक्षा भोगणारा कैदी जेव्हा आपल्या आप्तेष्टापासून दुर असतो. त्यामुळे त्याच्या मनामध्ये विफलतेची भावना, असुरक्षिततेची भावना निर्माण होते. त्याचा परिणाम त्यांच्या मनावर होतो.

कारागृह प्रशासन सर्व बंद्यांनमध्ये विफलतेची अर्थात मानिसक अस्थैर्याची भावना निर्माण होऊ नये यासाठी विविध कार्यक्रम आणि उपक्रमांच्या माध्यमातून प्रयत्न करते. संशाधकाने या बंद्यांची मानसिकता तपासून त्यांच्या मध्ये विफलतेची भावना निर्माण होते काय यासाठी अनेक प्रश्नांमधून तथ्य संकलन केले. घर आणि कारागृह यांच्यात फरक आहे काय असा प्रश्न विचारताच ९९ टक्के लोकांनी होय असे ताबडतोब सांगितले. अर्थात घराबद्दल प्रत्येकांचीच ओढ होती घर ते घर असते अशा एकाच वाक्यात वर्णन केले. (तक्ता क्र. ६.२२) घरच्या लोकांची आठवण येते का तर बहुसंख्य लांकांनी सांगितले की होय,

आमचा एक दिवसही असा जात नाही की आम्हाला घरच्यांची आठवण येत नाही. बंदी कारागृहात शिक्षा भोगत असल्याने त्याचा अत्यंत विपरीत परिणाम हा त्याच्या कुटुंबावर झाला. बहुसंख्य बंद्यांचे कुटुंब उध्वस्त झाले. (तक्ता क्र. ४.२.७) कुटुंबातील व्यक्ती जिकडे तिकडे गेल्या याचे शल्य बहुसंख्य बंद्यांच्या संभाषण आणि चेहऱ्यावर जाणवत होते. शिक्षा संपवून घरी गेल्यावर समाज तुमचा स्वीकार करेल काय? तर बहुसंख्य बंदी होय समाज आमचा स्वीकार करणार (तक्ता क्र.५.२.१३) असे सांगितले. बऱ्याच बंद्यांच्या मनावर मानसिक परिणाम झाल्याचे जाणवले. हमेशा घरच्या व्यक्तींची चिंता करुन करुन तसेच आपण किती दिवस येथे राहणार आपल्या आई, वडील, पत्नी, मुले यांचे काय होणार, अशी चिंता हमेशा करुन त्यांच्या मनामध्ये विफलतेची भावना निर्माण होते. संशोधकाचे कुटुंब समाज यापासून दूर राहिल्याने त्यांच्या मनात विफलतेची भावना निर्माण होते हे गृहीतक पूर्णतः सत्य ठरले आहे.

**समारोप :-**

कारागृहात ही एक सुधार संस्था आहे, कारागृहात बंद्यांना मानवतावादी दृष्टिकानाातून वागणूक मिळते. तसेच त्या संबंधी त्यांना ज्या विविध सुविधा दिल्या जातात त्यात निवासाची व्यवस्था, कपडे, आहार, वैद्यकीय ग्रंथालय, शैक्षणिक साहित्य यांचा सविस्तर आढावा घेण्यात आला आहे. बंद्यांना मिळणाऱ्या वरील सुविधांवरुण जाणवते की, बंद्याना कारागृह नियमाप्रमाणे सर्व सुविधा दिल्या जातात. बंद्यांना विविध विभागांत काम देऊन त्यांना प्रशिक्षित केले जाते ज्याचा फायदा त्यांना शिक्षा संपून घरी आल्यावर होतो. वरील सर्व सुविधांवरुन कारागृहात मानवतावादी दृष्टिकोनाची अम्मलबजावणी केली जाते असे जाणवते प्रस्तुत प्रकरणात याचा सविस्तर आढावा घेतला आहे. तसेच संशोधकाने संशोधनापुर्वी जी गृहीत कृत्ये मांडली होती त्यांची पडताळणी तथ्य संकलनावरुन प्रस्तुत प्रकरणात केली आहे.

*********

# प्रकरण ७ वे

# सारांश, निष्कर्ष आणि शिफारशी

## ६.१ सारांश

## ६.२ निष्कर्ष

## ६.३ शिफारशी

## ७.१ सारांश :-

२१ व्या शतकात भारत महासत्तेकडे वाटचाल करत आहे असे म्हणत असताना भारतापूढे अनेक आव्हाने उभी आहेत, अनेक समस्या उग्र रूपधारण करत आहेत. देशातील अनेक घटना पाहिल्यानंतर आजही मानवाला माणूस म्हणून वागणूक मिळत नाही, त्यांच्या मानवी अधिकारांचे नेहमीच उल्लंघन होते. यामध्ये स्त्रिया, बालके, अस्पृश्य जातीचे लोक, कारागृहातील कैदी इ. आदींच्या मानव अधिकारांच्या उल्लंघनाच्या अनेक घटना आपल्या अवती भोवती नेहमीच घडतात. अशा घटनांची आपल्याला सवयच झाली आहे असे वाटते. कारण अशा घटनांमधून कोणतेच विचार मंथन होत नाही किंवा कोणी त्या संदर्भात चिंता व्यक्त करत नाही, केली तर फक्त कागदावरचं प्रत्यक्षात मात्र ती फारशी आपणास जाणवत नाही. म्हणजेच आजही लांकांना मानवतावादाची संकल्पना समजावून सांगण्याची गरज वाटते आणि ती आहेच.

समाजात आर्थिक किंवा सामाजिक निकषावर उच्च, कनिष्ठ, श्रीमंत, गरीब असे वर्ग नेहमीच अस्तित्वात असतात. श्रीमंतांनी उच्च वर्गीयांनी किंवा सक्षम व्यक्तींनी आपल्यापेक्षा गरिब व्यक्ती, अक्षम व्यक्तींवर अन्याय होणार नाही तेही मानव आहेत, त्यांच्या मानवी अधिकारांने उल्लंघन होणार नाही यांची दक्षता घ्यायला हवीं पण आज तसे होताना दिसत नाही. त्यामुळे अशा विविध घटना घडतात. यातून व्यक्तींची मानसिकता लक्षात येते.

कारागृह ही एक सुधारसंस्था आहे. तेथे येणाऱ्या बंदी एखादा गुन्हा केलेला असतो पण त्याने गुन्हा का केला तर परिस्थितीच तशी निर्माण झाली. त्याने जे कृत्य केले त्याची शिक्षा म्हणून त्याला त्याच्या कुटुंबातून दूर कारागृहात ठेवले जाते. पण कारागृहात त्याला मिळणारी वागणूक ही अतिशय अमानवी आहे. त्यांना मिळणाऱ्या सुविधा याही अत्यंत तोकड्या असतात. तो गुन्हेगार आहे म्हणजेच त्याने अतिशय वाईट कृत्य केले आहे. त्यांच्याशी चांगले कसे वागायचे या आविर्भावातअगदी सहज पध्दतीने त्यांच्या मानवी हक्काचे उल्लंघन केले जाते. तसे वर्तन त्यांच्या सोबत केले जातो.

कारागृहात आज कैद्यांची सख्या वाढल्याने गर्दी मोठ्या प्रमाणात होते आहे. परिणामी मिळणाऱ्या सुविधांमध्ये कमतरता जाणवते असे कारागृह प्रशासन सांगते. कारागृह नियमावलीप्रमाणे सर्व सुविधा देण्याचा प्रयत्न करते व सुधारणा आणि पनर्वसन या प्रमाणे आजची कारागृहे मार्गक्रमण करीत आहेत. कारागृहात येणारा बंद्यी हा माणूस असून त्यामध्ये सुधारणा करण्यासाठी वेगवेगळ्या माध्यमांतून प्रयत्न केले जातात. मानवतावादी दृष्टिकोनाची अंमलबजावणी केली जाते. असा दावा प्रशासन करीत असले

तरी आजची परिस्थिती पूर्वीपेक्षा वेगळी आहे असे जाणवते. आजपर्यन्त अनेक लेखक, अभ्यासक, विचारवंत मानवी हक्क आयोग यांनी कारागृहात मिळणाऱ्या सोई संदर्भात अनेक वेळा सूचना केल्या आहेत. वेळोवेळी ज्या सूचना केल्या त्यांचे पालन होते काय? कैद्यांना प्रत्यक्षात मिळणाऱ्या सुविधा त्यांचा प्रत्यक्ष आढावा घेण्यासांठी संशोधनात्मक अभ्यास करुन कारागृहा संदर्भातील वास्तव माहिती प्रस्तुत संशोधन अहवालात केली आहे. प्रस्तुत संशोधन अहवालाची विभागणी सात प्रकरणांत केली आहे. प्रत्येक प्रकरणाचे सारांश रूपात विवेचन पुढीलप्रमाणे केले आहे.

**प्रकरण १ ले** - मध्यवर्ती कारागृहातील बद्याचा अभ्यास करत असताना प्रकरण पहिले यामध्ये प्रस्तावना याशीर्षकाखाली विवेचन केले असून संशोधन विषयाच्या अनुषंगाने ज्या महत्त्वपूर्ण संकल्पना आहेत त्यांच्या सविस्तर आढावा घेतला आहे. गुन्हा ही संकल्पना अतिशय व्यापक आहे. ती प्राचीन काळापासून आजच्या आधुनिक काळापर्यत टिकून आहे. पण याचे स्वरूप मात्र बदलत गेलेले आपणास पाहावयास मिळते. गुन्हा ही कृती आहे, जी नियमाचे उल्लंघन करणारी आहे. समाजात नियमने व्यक्ती वर्तमानासाठी असतात. पण बऱ्याच वेळा व्यक्ती या नियमांचे उल्लंघन करते. अर्थात गुन्हा करते. त्यासाठी अनेक कारणे कारणीभूत असतात.

प्राचीन काळात देवांचे, ईश्वराचे प्राबाल्य मोठ्या प्रमाणात होते, तेव्हा ईश्वराविरुध्द केलेली कृती म्हणजे गुन्हा होय असे मानले जात असे. नंतर १२ व १३ व्या शतकात धर्माचे प्राबाल्य मोठ्या प्रमाणात होते. तेव्हा धर्माच्या नियमाविरुध्द केलेली कृती म्हणजे गुन्हा होय, नंतर राजेशाही काळात राजाविरुध्द केलेली कृती म्हणजे गुन्हा समजली जाई. त्यानंतर कायद्याचे उल्लंघन करणारी कृती म्हणजेच गुन्हा होय. अशी विविध काळात गुन्ह्याचे स्वरुप बदललेले जाणवते. समाजातील प्रथा आणि कायदे हे त्या समाजातील नीतिमत्ताविषयक कल्पनांवर आधारलेले असतात. त्या विरुध्द होणारे वर्तन हे समाजाच्या दृष्टीने गुन्हा असते. गुन्ह्याच्या कायदेशीर, सामाजिक अशा विविध व्याख्या अनेक अभ्यासकांनी केल्या आहेत.

गुन्ह्याचे वेगवेगळे प्रकार अनेक अभ्यासकांनी केले आहेत. त्यात विल्यम ॲड्रियन बोंजर यांनी आर्थिक गुन्हे, लैंगिक गुन्हे, राजकीय गुन्हे, एडविन सदरलँड यांनी गंभीर स्वरूपाचे गुन्हे, साधारण गुन्हे तर हेज यांनी समाज व्यवस्थेविरुध्द गुन्हे मालमत्तेविरुध्द गुन्हे एडविन लेमेट यांनी परिस्थितीजन्य गुन्हे योजनाबध्द गुन्हे, विश्वासघाताचे गुन्हे असे गन्ह्याचे वेगवेगळे प्रकार सांगितले आहेत.

गुन्हयांबरोबर गुन्हेगार ही संकल्पनाही अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. गुन्हेगार ही व्यक्ती असते. ज्यांनी नियमांचे उल्लंघन केले आहे तो गुन्हेगार असतो. गुन्हेगार ही व्यक्ती असते. अशा गुन्हेगार व्यक्तीला

न्यायालय त्याचा गुन्हा सिध्द झाला तर विशिष्ट कालावधीसाठी कारागृहात ठेवण्याची शिक्षा देते. गुन्हेगाराचे विविध स्वरुपात वर्गीकरण केले जाते. त्यात जन्मजात गुन्हेगार, भावनाप्रधान गुन्हेगार, मनोविकृत गुन्हेगार, प्रासंगिक गुन्हेगार, तर सदरलँड यांनी कनिष्ठ वर्गीय गुन्हेगार व पांढरपेशीय गुन्हेगार असे वर्गीकरण केले आहे. तर हॅवलॉक एलीस यांनी राजकीय गुन्हेगार, भावनाप्रधान गुन्हेगार, मनोविकृत गुन्हेगार, आकस्मिक गुन्हेगार, नीतिभ्रष्ट गुन्हेगार, व्यावसायिक गुन्हेगार, सऱ्हाईत गुन्हेगार असे वर्गीकरण केले आहे.

शिक्षा व्यवस्था ही गुन्ह्यांप्रमाणे प्राचीन काळापासून आजच्या आधुनिक काळापर्यंत स्वरूप बदलत आहे. ज्यांनी नियमांचा भंग केला आहे त्यांना शिक्षा दिली जाते. न्याय व्यवस्था, पोलीस यंत्रणा शिक्षा व्यवस्थेत महत्त्वपुर्ण भुमिका पार पडतात. शिक्षेचे रूपही काळानुरूप बदलत आलेले आपणास आढळून येते. शिक्षा ही सुध्दा शाश्वत स्वरूपात आढळते. शिक्षे संदर्भात अनेक सिध्दांत प्रसिध्द आहेत. त्यात बदला किंवा सूड सिध्दांत दहशत सिध्दांत, सुधारणात्मक सिंध्दांत, प्रतिबंधात्मक सिध्दांत, सामाजिक ऐक्यभाव जोपासना सिध्दांत असे अनेक सिध्दांत आहेत. शिक्षेचे अनेक उद्देश आणि प्रकारही अनेक अभ्यासकांनी सांगितले आहेत. शिक्षेच्या प्रकारांमध्ये अवयव तोडणे, फटके देणे, आर्थीक दंड, नुकसान ग्रस्ताला भरपाई देणे, मालमत्ता जप्त करणे, हद्दपार, तडीपार, एकांतवास, कारावास, फाशी, सामाजिक अपमान अशा अनेक प्रकारच्या शिक्षा दिल्या जात होत्या.

आजच्या आधुनिक युगात कारावासाच्या शिक्षेचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर आहे. कारागृह हे एक असे ठिकाण आहे जेथे गुन्हेगार व्यक्तींना एकांतवासात ठेवले जाते. व्यक्ती हा समाजशील प्राणी आहे. व्यक्तीला कुटुंब आणि समाज यापासुन दूर राहणे हीच मोठी शिक्षा मानली जाते. त्यामुळे जी व्यक्ती गुन्हेगार आहे त्यांना न्यायालय विशिष्ट कालावधीची शिक्षा देते. तो पर्यंत व्यक्तीला कारागृहात राहावे लागते.

कारागृहाची शिक्षा भारतात प्राचीन काळापासून दिली जाते. वेदकाळ, स्मृतिकाळ, महाकाव्य काळ, बुध्द काळ, मध्ययुगीन काळ, ब्रिटिश काळ, आधुनिक काळ अशा सर्व काळांत कारागृह अस्तित्वात आहे. पण कैद्यांना दिल्या जाणाऱ्या वर्तणुकीत मात्र बदल झाला आहे.

आज कारागृहात बंद्यांसोबत मानवतावादी दृष्टिकोनातून वर्तन केले जाते. त्यांना वेगवेगळे प्रशिक्षण देऊन त्यांना प्रशिक्षित केले जाते. तसेच कामाचा मोबदलाही दिला जातो. ज्यामुळे थोडे फार घरी पैसे पाठवता येतील. सर्वात महत्त्वाचे म्हणजे काम दिल्याने रिकामा वेळ जास्त राहत नाही व रात्री चांगली

झोप लागेल. नाहीतर रिकामा वेळ जास्त राहिल्याने हमेशा विचार करुन त्यांना मानसिक आजार जडू शकतात. आज ज्यांना काम नाही असे अनेक बंदी आपला वेळ विचार करुन मनोरुग्ण होत आहेत असे जाणवते. कारागृहात आज मानवतावादी दृष्टिकोनातून वागणूक दिली जात असली तरी त्यात सुधारणा होणे गरजेचे वाटते. दिल्ली येथील तिहार कारागृहात किरण बेदी यांनी सखोल बदल केला. त्याचा सकारात्मक परिणाम बंद्यांवर व प्रशासनावर जाणवू लागला. त्यामुळे कारागृह सुधाराचे दिल्ली मॉडेल आज संपूर्ण भारतभर प्रसिध्द आहे. त्याचा अवलंब इतर कारागृहे करण्याच्या प्रयत्न करतात. प्रस्तुत प्रकरणात वरील सर्व संकल्पनांचा सविस्तर आढावा घेत आहे.

**प्रकरण २ रे-** प्रकरण दुसरे हे संशोधकाने संबंधित विषयावर संशोधन करताना जी संशोधन प्रक्रियेचा अवलंब केला त्याचा सविस्तर आढावा घेतला आहे. संशोधन विषयाची निवड केल्यानंतर संशोधन विषयासंबंधित साहित्याचा आढावा घेतला. अनेक अभ्यासक, विचारवंत, संशोधक यांनी कारागृहासंबंधी जे काही अभ्यास केले आहेत. त्याचा आढावा घेतला असून सर्व अभ्यासांतून जाणवते की, कारागृहात क्षमतेपेक्षा अधिक बंद्यांची संख्या असल्याने कारागृहांतील गर्दी वाढतच आहे. कारागृहाची इमारत व रचना ही जुनी असून आज गुन्ह्यांचे प्रमाण वरचेवर वाढत असल्याने कारागृहात गर्दीचे प्रमाण वाढत आहे. वाढत्या गर्दीमुळे सर्वांना नियमाप्रमाणे सुविधा पुरवणे अशक्य झाले आहे. बंद्यांसाठी मिळणारा अन्नाचा दर्जा हा निकृष्ट आहे. राहण्याच्या ठिकाणी खेळती हवा नाही, पुरेशी जागा नाही, बंद्यांच्या संख्येच्या प्रमाणात संडास, फॅन, पेपर, पुस्तके मनोरंजनाची साधने या सर्व गोष्टी नाहीत. त्यामुळे अनेक समस्या आज कारागृहासमोर आहेत. बंद्यांना विविध कामांचे प्रशिक्षण दिले जाते. पण बरेच ट्रेड बंद पडले आहेत. बंद्यांकडे रिकामा वेळ खूप असतो. त्याचे योग्य पध्दतीचे नियोजन होत नाही. बंद्यांसोबत कारागृह कर्मचारी मानवतावादी दृष्टिकोनातून वागत नाहीत. सुधारणा आणि पुनर्वसन या प्रमाणे सुविधा मिळत नाहीत असे सर्वांच्या नोंदीतून जाणवते. आजसुध्दा कारागृहाची तीच अवस्था आसल्याचे जाणवते. वेळोवेळी कारागृह सुधारणांबाबत अनेक सूचना केल्या तरी परंतू आज तशीच अवस्था असल्याचे जाणवते. संशोधन विषया संदर्भात संबंधित साहित्याचा आढावा घेऊन संबंधित विषयातील कोणत्या बाजुंचा अभ्यास करावा यासाठी संशोधकाने उद्देश निश्चित केले. त्यामध्ये बंद्यांची वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक, मानसिक इ. परिस्थितीचा सविस्तर आढावा घेण्याचे ठरले. तसेच बंद्याने जो अपराध केला आहे त्याचाही सविस्तर अभ्यास केला, तसेच कारागृह रचनेचा अभ्यास, बंद्यांना दिल्या जाणाऱ्या विविध सुविधा, यातुन बंद्यांमध्ये होणारे परिवर्तन त्यांचा सविस्तर अभ्यास करण्याचे निश्चित झाले. संशोधन करताना संशोधकाने त्या विषयासंबंधीच्या प्राथमिक माहिती आधारावर काही निश्चित गृहीत कृत्यांची मांडणी केली. गुन्हेगार हे

जन्मजात नसतात. कारागृहात सुधारणात्मक सुविधांचा अभाव जाणवतो. क्षमतेपेक्षा अधिक कैदी कारागृहात असतात. कैद्यांना मानवतावादी दृष्टिकोनातून वागणुक मिळत नाही. तसेच कुटुंब व समाज यांच्यापासून दूर राहिल्याने त्यामध्ये विफलतेची भावना निर्माण होते. अशी गृहीतके संशोधकाने मांडली.

संशोधन प्रक्रियेतील पुढील टप्पा म्हणजे संशोधन आराखडा होय संशोधकाने संशोधन आराखड्यात अध्ययनाचे क्षेत्र औरंगाबाद येथील मध्यवर्ती कारागृहात निश्चित करुन एकक म्हणून ज्या व्यक्ती गुन्हेगार या व्याख्येत मोडतात व न्यायालयाने त्यांना विशिष्ट कालावधीची शिक्षा दिली आहे त्यांना निश्चित केले. कारण कारागृहात आरोपी आणि बंदी अशा दोन्ही पध्दतीच्या व्यक्ती राहतात. आरोपी यांच्यावर गुन्हा केल्याचा आरोप असतो. त्यामुळे ते गुन्हेगार या व्याख्येत येत नाहीत. प्रस्तुत संशोधनामध्ये जे गुन्हेगार आहेत त्यांचीच एकक म्हणुन निवड केली. एककांची निवड केल्यानंतर सर्व एककांचा अभ्यास करणे शक्य नव्हते. कारण त्यांची संख्या अधिक असल्याने त्यामधून नमुना निवड पध्दतीचा वापर करुन एकक निवडणे शक्य होते. त्यामुळे संशोधकाने नमुना निवडीतील संभाव्यता नमुना यातील उपप्रकार साधा यादृच्छिक पध्दतीमधील कोटा नमुना निवड पध्दतीचा वापर करुन दोनशे बंद्यांची नमुना म्हणुन निवड केली.

नमुना निवडीनंतर तथ्य संकलनासाठी संशोधकाने मुलाखत अनुसूची या तंत्राचा वापर केला. कारण बरेच बंदी अशिक्षित असल्याने ते लिहून माहिती देणे शक्य नव्हते. त्यासाठी संशोधकाने मुलाखत अनुसूची तयार करुन प्रत्यक्ष बंद्यांची कारागृहात जाऊन मुलाखती घेतल्या व माहिती संकलित केली. त्यामुळे मुलाखती दरम्यान बंदी सर्व माहिती खरी सांगतो की खोटी सांगतो याचे निरीक्षणाद्वारे सत्यता पडताळता आली. निरीक्षण या तंत्राद्वारे माहिती संकलन करते वेळी त्यांचे हावभावही टिपता आले. त्यामुळे मुलाखत अनुसूची व निरीक्षण या प्राथमिक तंत्राचा वापर करुन माहिती संकलित केली. तसेच द्वितीयक स्त्रोतामधील सार्वजनिक प्रलेखातील प्रकाशित साधनांच्या अवलंब केला गेला. यातून माहिती संकलीत केली. यामध्ये पुस्तके, मासिके, मॅन्युअल्स, वर्तमानपत्रे आदींचा माहिती संकलनासाठी उपयोग केला गेला. तथ्य संकलनानंतर मुलाखत अनुसूचीमधील प्रश्नांच्या उत्तरांना कोड देऊन सांकेतिकीरण केले. त्यावरुन मास्टर चार्टच्या आधारे सारणीयन करण्यास मदत झाली आणि त्यानंतर सारणीचे विश्लेषण केले. प्रस्तुत संशोधन अहवाल सात प्रकरणांत वर्गीकरण करण्याचे निश्चित केले. संशोधन विषयाच्या संदर्भात संबंधित साहित्याचा आढावा घेतला. तसेच संशोधन विषयाच्या सैध्दांतिक बाजूंचेही विवेचन केले गेले आहे.

गुन्ह्या संदर्भात अनेक सिध्दांतांची मांडणी अनेक अभ्यासकांनी केली आहे. त्यामध्ये गुन्ह्याचा पूर्वशास्त्रीय सिध्दांत हा प्राचीन सिध्दांत असून पिशाच्च वृत्ती गुन्ह्यासाठी कारणीभूत असते असे मानतो. पुढे

कैसर बेकारिया यांनी शास्त्रीय आणि नवशास्त्रीय सिध्दांताची मांडणी केली. व्यक्ती जीवनात सुखाची प्राप्ती व्हावी त्यासाठी बऱ्याच वेळा गुह्याचे वर्तन करतात. थोडक्यात जास्त सुखाची लालसा हे गुह्याचे मुख्य कारण आहे असे हा सिद्धांत सांगतो. शास्त्रीय सिद्धांतानंतर भौगोलिक सिध्दांताची मांडणी १८३० ते १८८० च्या काळात क्वेटलेट आणि ग्वेरी यांनी केला. गुह्यांच्या मुळाशी भौगोलिक परिस्थिती कारणीभूत असते. भौगोलिक पर्यावरणातील जल, वायू, पर्वत, नद्या ऋतुमानानुसार होणारे बदल आदींचा प्रभाव गुन्ह्यासाठी प्रभावी ठरतो. असे विवेचन हा सिध्दांत करतो. डेक्टस्टर यांनी अपराधाचे भौगोलिक कॅलेंडरच प्रसिध्द केले. भौगोलिक सिध्दांतानंतर समाजवादी सिध्दांताचा उगम १८५० मध्ये झाला. त्याचा समर्थक म्हणून कार्ल मार्क्स आणि एगल्स यांना मानले जाते. श्रीमंत आणि गरीब भेद समाजात असतो. गरीब आपल्या गरजा भागवण्यासाठी गुन्ह्यासारखे कृत्य करतात. असे विवेचन समाजवादी सिध्दांत करतो.  पण सर्वच गरीब गुन्हा करत नाहीत.  अशी टीकाही सिध्दांतावर झाली आणि हा सिध्दांत मागे पडला. त्यानंतर रुपवारी सिध्दांताचा उगम झाला. लोब्रोसो यांनी १८७५ मध्ये विकसित केला. गुन्ह्येगार व्यक्तीची शरीराची विशिष्ट अशी ठेवण असते.  त्याच व्यक्ती गुन्हा करतात असे हा सिध्दांत सांगतो. गोडार्ड यांनी शारीरिक लक्षणां ऐवजी व्यक्तीची मानसिक स्थीती गुन्ह्यासाठी कारणीभूत असते असे मांडले. त्यातून मानसिक परीक्षण सिध्दांताचा उगम झाला. मानसिक तणावामुळे व्यक्ती गुन्हे करतात असे  विवेचन हा सिध्दांत करतो त्यानंतर समाजशास्त्रीय सिध्दांत प्रसिध्द झाला.  व्यक्ती कोणतेही वर्तन उपजत असते असे नाही तो इतरांच्या सहवासातून  शिकून घेतो. अपराधाचे वर्तनही तो इतरांकडून शिकतो असे विवेचन समाजशास्त्रीय सिध्दांत करतो. बहुकारणवादी सिध्दांत हा गुन्ह्यासाठी एकच कारण जबाबदार असत नाही असे विवेचन केले आहे.प्रस्तुत संशांधनात संशोधनकाने बंद्यांनी केलेल्या अपराधाच्या कारणाचा सविस्तर आढावा घेतला असता प्रस्तुत संशोधन बहुकारणवारी सिध्दांतामध्ये मोडते. प्रस्तुत प्रकरणात वरील  सर्व घटकांचा सर्वसमावेशक आढावा संशोधकाने घेतला आहे.

**प्रकरण ३ रे** : प्रस्तुत प्रकरण द्वितीय तथ्य संकलन तंत्राचा वापर करुन माहितीचे संकलन केले आहे.या प्रकरणामध्ये करागृह प्रशासन व त्यांची कार्यपध्दती कशा स्वरूपाची आहे. त्यांचा सविस्तर आढावा घेतला आहे. १८९४ च्या कायद्याने महाराष्ट्रात कारागृहाची स्थापना झाली. अस्तित्त्वात असलेल्या कायद्याच्या विरुध्द वर्तन करुन गुन्हा करणाऱ्यांना समाजात शांतता आणि सुव्यवस्था राखण्यासाठी काही काळ एकांतवासात ठेवणे. हा मुख्य उद्देश कारागृह स्थापनेपाठीमागचा आहे.  कारागृहात गुन्हेगारांना सुधारण्यासाठी योजनाबध्द कार्यक्रम राबवले जातात.  महाराष्ट्रात कारागृह प्रशासन व नियंत्रणाची जबाबदारी महानिरीक्षक यांच्याकडे असून याचे मुख्यालय पुणे येथे आहे. कारागृहाचे मध्यवर्ती कारागृहे,

जिल्हा कारागृहे, किशोर सुधारालये, खुली कारागृहे, खुली वसाहत अशी एकूण ३८ कारागृहे आहेत. कारागृहांत बंदी ठेवण्याची एकूण क्षमता १७,७६४ (पुरुष १६,८२४, महिला ९४३) इतकी आहे. मात्र प्रत्यक्षात यापेक्षा किती तरी अधिक पटीने कैदी कारागृहात शिक्षा भोगत आहेत असे जाणवते.

महाराष्ट्र राज्याचे कारागृह मुख्यालय पुणे येथे असून त्यांच्या मदतीसाठी पूर्व विभाग नागपूर, पश्चिम विभाग पुणे, दक्षिण विभाग मुंबई आणि मध्य विभाग औरंगाबाद येथे विभागीय कार्यालये असून कारागृह उपमहानिरीक्षक त्यांच्या नियंत्रणाखाली त्या त्या विभागातील कारागृहे काम करीत असतात. मध्यवर्ती व जिल्हा कारागृहात न्यायाधीन, सिध्ददोष व स्थानबध्द अशा बद्यांना ठेवले जाते. कारागृहांचे अधीक्षक संबंधीत कारागहाचे प्रमुख असतात. इतर सर्व कर्मचारी आपआपल्या पदानुसार जवाबदारी पार पाडतात.

कारागृहातील बंद्यांचा प्रवेश त्यावर होणारी प्रक्रिया दैनंदिनी कारागृह नियमावलीप्रमाणे चालू असते. बंद्यांसाठीचे कपडे, बिस्तरा, तेल, मंजन, साबण,ताट, वाटी या वस्तू दिल्या जातात. बंद्यांना पत्रव्यवहाराची मुभा आहे पण बंद्याला आलेले पत्र व बंद्याने लिहिलेले पत्र प्रथम कारागृह अधिकारी वाचतात. आक्षेपार्ह मजकूर असेल तर तशी पत्रे दिली किंवा पाठवली जात नाहीत. विविध वर्तमानपत्रे कारागृहात बंद्यांसाठी येतात. कारागृहात उपाहारगृह असून तेथे बंद्याला चहा, कॉफी, बीडी, तंबाखू, कागद पेन पोस्टकार्ड, खाण्याच्या वस्तू इत्यादी मिळतात. पण येथील वस्तूंच्या किंमती मुळ किंमतीपेक्षा अधिक असतात. कारागृहात महात्मा गांधी जयंती २ ऑक्टोंबर हा बंदी कल्याण दिन म्हणून साजरा केजा जातो.

कारागृहात बंद्याने नियमांचे पालन करावे यासाठी मार्गदर्शक सूचना केल्या जातात. त्यांचे पालन करणे हे अत्यावशक असते. कारागृह नियमांचे उल्लंघन झाले तर बंद्याला शिक्षा दिली जाते. त्यात त्याला ताकीद दिली जाते. कामात बदल करणे, विभक्त कोठडीत ठेवणे अशा शिक्षा दिल्या जातात. बंद्याला कायदेविषयक मदतही कारागृहात उपलबध करून दिली जाते.

मध्यवर्ती कारागृहात एकूण सोळा बॅरेक्स आहेत. त्यात बॅरेक्समध्ये शिक्षा झालेल्या बंद्याला ठेवले जाते. प्रत्येक बॅरक्समध्ये ४५ बंद्यांना ठेवले जाते. प्रत्येक बॅरेक्समध्ये फॅन, बल्ब, संडास, पाण्याचा हौद, ड्रम, पिण्यांच्या पाण्याच्या ड्रम, टीव्ही असे साहित्य असते. कारागृहाचे प्रमुख अधीक्षक असून त्याना साह्य करण्यासाठी उपअधीक्षक तीन वरिष्ठ तुरूंग अधिकारी व त्यांच्या संबंधित कर्मचारी कर्तव्य बजावत असतात.

कारागृहात बंद्यांसाठी स्वतंत्र कारखाना विभाग असून त्यात विविध कामांचे प्रशिक्षण दिले जाते. कामाचा मोबदला दिला जातो. कुशल कामगारांसाठी दररोज ४० रु अर्धकुशल कामगारासाठी ३५ रु व अकुशल कामगारासाठी २५ रु दिले जातात. यातून बंद्यांचे पुनवर्सन करण्याचा प्रयत्न केला जातो. कारागृह प्रशासन त्यांची रचना आणि कार्यपध्दती ही अतिशय महत्त्वपूर्ण आहे याचा सविस्तर आढावा प्रस्तुत प्रकरणात घेतला आहे.

**प्रकरण :- ४** प्रकरण चार हे संशोधकाने प्राथमिक तथ्य संकलन तंत्रातील मुलाखत अनुसूची व निरीक्षण यांचा वापर करुन जी माहिती मिळाली तिचे विवेचन प्रस्तुत प्रकरणात आढळते. बंद्यांची वैयक्तिक कौटुंबिक आर्थिक आणि सामाजिक माहितीचा अंतर्भाव प्रस्तुत प्रकरणात झाला आहे. संशोधकाने कारागृहात शिक्षा भोगणाऱ्या पुरुष बंद्यांचा अभ्यास केला आहे. बंद्योंचे वयनिहाय वर्गिकरण केले असून त्यात तरुणांचे प्रमाण (१८ ते ३० वर्षे ) अधिक आहे. ६० ते ७५ वयोगटातील बंद्यांचे प्रमाण सर्वात कमी जाणवते. यावरुन आपणास जाणवते की साठ वर्षे वयाच्या वरीलही व्यक्ती कारागृहात आहेत. धार्मिक वर्गीकरणात हिंदू धर्मीयांचे प्रमाण अधिक आढळले. बंद्यांमध्ये अशिक्षितांचे प्रमाण सर्वाधिक असून प्राथमिक, माध्यमिक, आणि उच्च माध्यमिक शिक्षण घेणाऱ्यांचे प्रमाण अनुक्रमे जाणवते. ग्रामीण भागातील बंद्यांची संख्या अधिक आहे. तसेच विवाहितांचे प्रमाण अधिक असुन शेती करणारे बंदी मोठ्या प्रमाणात आहेत. या वैयक्तिक माहितीबरोबरच त्यांच्या कौटुंबिक  माहितीत त्यांचे सध्या राहण्याचे ठिकाण पूर्वी होते तेथेच आढळते. कुटुंबातील सदस्य संख्येत दोन ते सहा सदस्यांची संख्या अधिक असून विभक्त कुटुंबाचा प्रकार प्रामुख्याने जाणवतो. बंदी कारागृहात आल्याने बहुसंख्य बंद्याचे कुटुंब विस्कळीत झाले असुन काही बंद्यांच्या कुटुंबातील सर्व सदस्यांवर सर्व बाजूंनी परिणाम झाल्याचे आढळून आले. बंदी कारागृहात असतानाही कुटुंबाबद्दल आपले पणाची भावना असून दररोज कुटुंबीयांची आठवण येते असे बहुसंख्य बंद्यांनी सांगितले. बंद्यांला बाहेर असताना मित्र होते पण आज ते त्यांच्या कूटूंबियाला मदत करत नाही असे जाणवते. बंद्यांची आर्थिक परिस्थिती सर्वसाधारण आढळली. शेतकऱ्यांचे प्रमाण अधिक आहे पण ३ ते ४ एकर जमीन असणाऱ्यांचे प्रमाण अधिक आसल्याने त्यांचे उत्पन्नही मर्यादित आहे. २० ते ५० हजार यामधील बंद्यांचे प्रमाण सर्वाधीक आहे. यावरुन त्यांची आर्थिक परिस्थिती सर्वसाधारण आहे असे लक्षात येते.

बंद्यांची सामाजिक माहिती घेतली असता समाजाच्या इतर नातेवाईकांच्या सर्व कार्यात सहभागी होतात, समाजात बहुसंख्य बंद्यांचा दर्जा चांगला आहे. ते सामाजीक नियमांचे पालनही करतात. ईश्वरांची

उपासना करतात अशी माहिती मिळाली. प्रस्तुत प्रकरणात वरील सर्व माहितीचा सविस्तर आढावा घेतला आहे.

**प्रकरण ५ वे** : प्रस्तुत प्रकरणात बंद्यांची मानसिक आणि आरोग्यविषयक परिस्थिती आणि बंद्यांनी केलेल्या अपराधा संबंधी माहितीचा सविस्तर आढावा घेतला आहे. जागतिक आरोग्य संघटनेने केलेली आरोग्याची व्याख्या त्यातील शारीरिक, मानसिक या घटकांना पुढे ठेवुन माहिती संकलित केली आहे. व्यक्तीचे आरोग्य अबाधित राहणे गरजेचे असते. नाही तर त्यातून त्यांच्या आर्थिक नुकसाना बरोबर मानसिक मनोबल खालावते. कारागृहात आरोग्यांची काळजी घेण्यासाठी दोन स्वतंत्र डॉक्टरांची नियुक्ती केली आहे. गरज पडेल तेव्हा त्यांची तपासणी होऊन औषध उपचार केले जातात. बंदी अधिकच आजारी असेल आणि त्यासाठी त्याला दवाखान्यात दाखल करावे लागेल अशा परिस्थितीत घाटी या शासकीय रुग्णालयात पाठविले जाते. करागृहातील काही बंद्यांना विविध आजार झाले आहेत. त्यात एड्स, मूत्राशय, उष्णता, रक्तदाब,  दमा, मानसिक विकार, खाज येणे, मूळव्याध इ. आजारांनी बंदी ग्रस्त आहेत. त्यांच्या आजारांवर नियमित उपचार चालू असून खाणे, पिणे, आणि राहणे या बाबत त्यांची विशेष काळजी घेतली जाते. बंद्यांना तंबाखूचे व्यसन मोठ्या प्रमाणात आहे. बंद्यांची मानसिकता ही संतुलित आढळली. कारण त्यांना चित्रपट, संगीत गाण्यांची आवड आहे. घरेलू चित्रपट, शांत संगीत, गाण्याच्या आवडीचे प्रमाण अधिक आहे. तसेच बंद्याने जो अपराध केला त्यासंदर्भात सविस्तर माहिती घेतली.

कारागृहात खून, सदोष मनुष्यवध या गुन्ह्यांखाली बंद्यांची संख्या जास्त असून ते जन्मठेपेची शिक्षा भोगत आहेत जो अपराध झाला तो एकट्यानेच केले असून परिस्थितीच तशी निर्माण झाली असे सांगितले. जो अपराध झाला त्यामध्ये कौटुंबिक कारणांचे प्रमाण अधिक असून आर्थिक वादातून व शेत जमीन वादातून अपराधाचे प्रमाण वाढत आहे असे आढळले. तसेच इतरही कारणे आढळली. म्हणूनच कारागृहात येणारे बंदी हे एकाच कारणाने गुन्हा करत नसून त्यासाठी अनेक कारणे कारणीभूत असतात. जो अपराध घडला तो आम्ही खरोखरच केला पण रागाच्या भरात केला. त्याचा आज पश्चात्ताप होतोय, चूक झाली असे वाटते. कारण आज शिक्षा भोगताना त्यांचा त्रास जाणवतो. असे बंद्यांनी सांगितले. म्हणजे व्यक्ती रागाच्या भरात एखादे गुन्ह्याचे कृत्य करतो. त्याचा परिणाम त्या व्यक्ती आणि त्याच्या कुटुंबावर होत असतो. प्रस्तुत प्रकरणात वरिल परिस्थितीचा सविस्तर आढावा घेतला आहे.

**प्रकरण ६ वे** :प्रस्तुत प्रकरणात कारागृहात बंद्यांना दिल्या जाणाऱ्या सुविधांची सविस्तर आढावा घेतला असून संशोधकाने संशोधनापूर्वी जी गृहीतके मांडली होती त्यांची पडताळणी केली आहे. करागृह

अधिकाऱ्यांसाठी स्वतंत्र प्रश्नावलीतून जी माहिती मिळाली तिचा स्वतंत्र आढावा घेतला आहे. कारागृह हे सुधारणा आणि पुनर्वसन या प्रमाणे मार्गक्रमण करत असताना बंद्यांसाठी अनेक सुविधा पुरवते, त्यात त्यांना दिला जाणारा आहार, निवास, कपडे, वैद्यकीय सुविधा, ग्रंथालय, शैक्षणिक साहित्य यांचा समावेश होतो. बंद्यांसाठी निवासाची व्यवस्था सामूहिक असून एका बॅरेक्समध्ये ४५ बंदी एकत्र राहतात. जे सराईत गुन्हेगार आहेत व जे गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यांखाली आले आहेत. त्यांना स्वतंत्र ठिकाणी राहण्याची व्यवस्था केली आहे. बंद्यांला कारागृहात प्रवेश मिळाल्यावर अंथरुण, पांघरुण, अत्यावश्यक साहित्य दिले जाते.

बंद्यांना ज्या ठिकाणी ठेवले जाते तेथे हवा शुध्द नाही. कारण अनेक बंदी एकत्र राहिल्याने कोंदट वातावरण जाणवते. तसेच बंद्यांची संख्या अधिक असल्याने वातावरणही दूषित होते. बंद्यांना मिळणारा आहार हा काही बंद्यांना पुरेसा वाटत नाही. दाळ, तीन पोळ्या, भाजी, भात असा आहार असतो. पण त्याचा दर्जा मात्र निकृष्ट जाणवला. पोळ्या अगदी जाड, करपल्यासारख्या, भाजी, वरण असते पण त्याला चवच नसते. त्यामुळे अन्नाविषयी अनेक बंद्यांनी चांगले मिळावे असे मत व्यक्त केले. दोन वेळचे जेवण, सकाळी नाष्टा दिला जातो. राष्ट्रीय सणांच्या दिवशी गोड जेवण दिले जाते. पण त्याचे प्रमाणही अतिशय कमी असते.

बंद्यांना कारागृहात विविध विभागांत प्रशिक्षण दिले जाते. सध्या आठ विभागात काम दिले जाते. या कामाचा मोबदलाही कुशल, अर्धकुशल आणि अकुशल या प्रमाणे दिला जातो. काम दिल्याने वेळ कसा जातो ते कळत नाही. सर्वांना काम असावे. असे बहुसंख्य बंदी सांगतात. कारागृहातील काही उद्योग बंद पडल्याने मोजक्याच बंद्यांना काम दिले जाते. कारागृहात मुक्त विद्यापीठ अंतर्गत काही बंदी शिक्षण घेत आहेत. पण यांचे प्रमाण अतीशय अत्यल्प आहे. ते वाढवणे गरजेचे आहे. वाचनासाठी ग्रंथालय असून वर्तमान पत्रे दररोज येतात. पण बंद्यांच्या वाढत्या गर्दीच्या तूलनेत यांचे प्रमाण कमी आहे जे आहे ते सर्वांना पुरेसे पडत नाही.

बंद्यांसाठी कारागृहात होणारे कार्यक्रम अतिशय कमी आहेत. त्यामुळे फावल्या वेळेत चिंता करुन बऱ्याच बंद्यांची मानसिक स्थिती बिघडत आहे. फक्त रविवारी आसाराम बापूचे प्रवचन होते. त्यातून आपणास मानसिक समाधान मिळते असे बंद्यांनी सांगितले. निमशासकीय संस्था कारागृहात कार्यक्रमांचे आयोजन करत नाहीत. योगा, प्राणायम होत नाही. बंद्यांना भेटण्यासाठी त्यांचे कुटुंबीय येतात पण भेटही खूप कमी कालावधीची व अतिशय दुरुन दिली जाते. कारागृहातून घरी जाण्यासाठी वर्षातून एकदा सँचित रजा मंजूर होते पण ती सर्व बंद्यांना होत नाही. बऱ्याच वेळा रजा मंजुरीची प्रक्रियाच एवढी दीर्घ चालते की वर्ष संपूण जाते पण रजा मंजूर होत नाही अशी आवस्था जाणवते. कारागृहात बंद्यांसोबत त्यांचे सोबती

चांगले राहतात पण कर्मचारी मात्र मानवतावादी दृष्टिकोणातून वागत नाहीत असे जाणवते. वरील सर्व सुविधांचा सविस्तर आढावा प्रस्तुत प्रकरणात घेतला आहे.

**प्रकरण ७ वे** - प्रकरण सातमध्ये संशोधकाने संपूर्ण संशोधनाअंती सारांश, निष्कर्ष आणि सूचनांची मांडणी केली आहे. कारागृहात सर्वसामान्य समाजात भीतीचे वातावरण असते. कारण कारागृह आणि सर्व सामान्य समाज यांचा संबंध सहसा येत नाही. वर्तमानपत्रे, पुस्तके, टी.व्ही. यांच्या माध्यमातुन जी माहिती मिळते ती त्रोटक असते. कारागृह हे ज्यांनी कायद्याने उल्लंघन केले आहे त्यांना कुटुंब, समाज यापासून दूर ठेवण्याचे ठिकाण म्हणजे कारागृह होय. कारागृह हे प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे पण त्यातील बंद्यांसोबतच्या वर्तनात आज मोठ्या प्रमाणात बदल झाले आहेत.

कारागृहात बंद्यांना दिल्या जाणाऱ्या सुविधा या कारागृह नियमावलीप्रमाणे देण्याचा प्रयत्न प्रशासन करते पण आज तसे होत नाही असे जाणवते. कारण बंद्यांसाठी ज्या सुविधा आहेत. त्या पुरेशा नाहीत त्या संदर्भात कारागृह प्रशासनास अभ्यासक, विचारवंत यांनी सूचना केल्या आहेत. कारागृहात मानवी हक्कांचे नेहमीच उल्लंघन होते असे जाणवते. कारागृहात येणाऱ्या बंद्यांचा वयोगट हा तरुण वर्गाचा मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे त्यांचे मानसिक संतुलन राखण्यासाठी विविध उद्योगांचे प्रशिक्षण द्यावे अर्थात जे जे उद्योग बंद पडले आहेत ते चालू करावते. बंद्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन द्यावे सुट्टीसाठी वेळेवर कार्यालयात प्रक्रिया करावी, अशा अनेक महत्त्वपुर्ण शिफारशी संशोधकाने केल्या आहेत. त्यांची अम्मलबजावणी होणे गरजेचे आहे. कारागृह ही सुधार संस्था आहे. त्यातील कर्मचाऱ्यांना वेळोवेळी प्रशिक्षण दिले तर त्यांच्या कार्यपध्दतीमध्येही सुधारणा होईल. प्रस्तुत संशोधनातून कारागृहातील बंद्यांचा वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक परिस्थितीचा सखोल आढावा घेतला असून कारागृहात बंद्यांना दिल्या जाणाऱ्या सुविधांचा आढावा घेतला आहे.

## ७.२ निष्कर्ष (Conclusion)

प्रस्तुत संशोधनामधून मध्यवर्ती कारागृहातील बंद्यांचा चिकित्सक अभ्यास केला असून बंद्यांच्या वैयक्तिक कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक, मार्नसिक, परिस्थितीचा तसेच केलेल्या अपराधाविषयी, कारागृह रचने विषयी, बंद्यांना दिला जाणाऱ्या सुविधा यातुन बंदयामध्ये परिवर्तन होते काय याचा आढावा संशोधकाने अभ्यासातुन घेतला असुन अभ्यासातुन जे निष्कर्ष प्रामुख्याने अधोरेखित करावे लागतात. ती पुढीलप्रमाणे.

१. अपराधासाठी वय हा घटक अत्यंत महत्त्वपुर्ण मानला जातो. तारुण्यामध्ये व्यक्तीच्या हातून अपराध होण्याची संभावना जास्त असते. त्यामुळे २० ते ३० वर्षे वयोगटातील युवकांचे अपराधामध्ये २९.५ टक्के म्हणजे सर्वाधिक प्रमाण जाणवते. त्या खालोखाल अनुक्रमे ३० ते ४० आणि ४० ते ५० वर्षे वयोगटातील २६ टक्के प्रमाण आढळून आले. अर्थात २० ते ५० वर्षे वयातील युवकांचे अपराधाचे प्रमाण अधिक आहे. ६० ते ७५ वर्षे वयाच्या वृध्दानांही येथे ठेवले जाते. याचे ९ टक्के प्रमाण आढळते.

२. भारतीय समाजात धर्म आणि जाती व्यवस्था व्यक्तीच्या जीवनामध्ये अत्यंत महत्त्वपुर्ण मानल्या जातात. व्यक्तीच्या जीवनामध्ये व्यक्तीची ओळख बऱ्याच प्रमाणात जातीवरुन होते. अपराधामध्ये हिंदू धर्मियांचे प्रमाण ६८ टक्के सर्वाधिक जाणवते. मुस्लिम धर्मीयामध्ये हे प्रमाण १८ टक्के जाणवते. प्रामुख्याने हिंदु धर्मातील मराठा, वंजारी, मातंग यांचे प्रमाण अनुक्रमे सर्वाधिक आहे तर शिख व जैन धर्माच्या अपराध्यांचे प्रमाण सर्वात कमी जाणवते. बौध्दाचे यांचे प्रमाण १३ टक्के आढळले.

३. शिक्षणाने मानवाला अनेक गोष्टी समजतात. अपराध आणि शिक्षण यांचा संबंध अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. संशोधन अभ्यासादरम्यान २९ टक्के अपराधी हे अशिक्षित होते तर ७१ टक्के प्रमाण शिक्षितांचे आहे. ७१ टक्के शिक्षण घेणाऱ्यामध्ये १ ते पदवीपर्यंतचे शिक्षित होते. अर्थात अपराध्यांमध्ये शिक्षित व्यक्तींची संख्या अधिक जाणवते.

४. भारतामध्ये ग्रामीण, आदिवासी आणि शहरी समुदयाचे लोक राहतात. ग्रामीण समुदाय मोठ्या प्रमाणात आहे. त्यांचे प्रमाणात अपराध्यांमध्ये सुध्दा ग्रामीण लोकांचे प्रमाण ७३.५ टक्के सर्वाधिक असुन शहरांचे प्रमाण त्या खालोखाल १६.५ टक्के आहे.

५. मानवी जीवनाता विवाहाला अनन्य साधारण महत्त्व आहे. विवाहानंतर व्यक्तीवर अनेक नवीन जबाबदाऱ्या येतात. स्वच्छंदी, वृत्तीला थोडा ब्रेक लागतो. पण अपराधासारखी कृती करण्यामध्ये विवाहित पुरुषांचे प्रमाण (८६.५ टक्के) सर्वाधिक आढळुन आले आहे. अविवाहित पुरुषांचे प्रमाण त्या तुलनेत अल्प आहे. विवाहित पुरुष जबाबदारी वाढुनही अपराधासारखे कृत्य करतात. पण जे त्यांनी अपराधाचे वर्तन नाईलाजास्तव केले आहे असे जाणवले.

६. प्रत्येक व्यक्ती आपल्या उदरनिर्वाहासाठी काही तरी काम करतो. त्याशिवाय त्याच्या कुटुंबाचा उदरहनर्वाह चालत नाही. अपराधामध्ये शेतकरी त्यांचे प्रमाण ३५ टक्के सर्वाधिक आहे. नोकरी करणाऱ्यांचे २९ टक्के प्रमाण आहे. शेतकऱ्यांचे प्रमाण अधिक असले तरी त्यांना शेती ही १ ते ६

एकरांच्या  दरम्यान मोठ्या प्रमाणात जाणवते अर्थात अल्प भूधारकांचे प्रमाण सर्वाधिक आहे आणि ही शेतीसुध्दा कोरडवाहु प्रमाणात अधिक असल्याचे जाणवते.

७. बंद्यांनी केलेल्या अपराधानंतर त्यांचे कुटुंब पूर्वी होते तेथेच आहे अशा बंद्यांचे प्रमाण ८२ टक्के असून विस्कळीत / भग्न कुटुंबाचे प्रमाण ११ टक्के आहे म्हणजे काहींचे सर्व कुटुंबच कारागृहात आहेत, काहींच्या पत्नीने दुसरे लग्न केले, मुले नातेवाईकाकडे गेली अशी कुटुंबांची अवस्था झाली तर ७ टक्के बंद्यांचे कुटुंब अपराधाच्या कृत्यानंतर इतरत्र स्थलांतरित झाले आहे.

८. कुटुंब  व्यवस्था ही समाज स्थिर ठेवुन व्यक्तीवर संस्कार घडवते. भारतात कुटुंब संस्थेला अनन्य साधारण महत्त्व आहे. व्यक्तीच्या वर्तनावर कुटुंबाचा प्रभाव मोठ्या प्रमाणावर जाणवतो. भारतात संयुक्त कुटुंब पध्दती मोठ्या प्रमाणावर जाणवते. पण आज अनेक कारणांनी तिचे विघटन होत आहे. त्यातून अनेक समस्या निर्माण होत आहेत. संशोधन अध्ययनात अपराधी हे विभक्त कुटुंबातूनच (६७.५ टक्के) मोठ्या प्रमाणात आलेले दिसतात. घरात पती, पत्नी आणि त्यांची अविवाहित मुले म्हणजे २ ते ४ कुटुंब सदस्यांचे प्रमाण अधिक जाणवते. अर्थात विभक्त कुटुंबात अनौपचारिक नियंत्रण एवढे पक्के असत नाही. त्यामुळे यातील बंद्यांचे प्रमाण अधिक आढळते. कुटुंबामध्ये व १ ली ते ४ थीपर्यंत शिक्षण असलेल्यांचे प्रमाण सर्वाधिक आहे. त्या पाठोपाठ अशिक्षितांचे प्रमाण आहे.

९. कुटुंब प्रमुख कारागृहात असल्याने त्यांच्या कुटुंबावर  अतिशय विपरीत परिणाम झाला आहे असे बहुसंख्य  ३०% बंदी सांगतात. आम्ही कारागृहात आल्याने आमचे कुटुंब उद्वस्त झाले. म्हणजे पत्नी माहेरी किंवा दुसरे लग्न करुन गेली. त्याचबरोबर जी कुटुंबे स्थिर आहेत त्यांच्यावर सर्व बाजूनी विपरीत परिणाम होत आहे असे जाणवले.

कुटुंबातील मुलांवर नियंत्रण कमी झाले. मुलांच्या शिक्षणावर परिणाम झाला. मुले कमावण्यासाठी काही तरी काम करु लागले. पत्नीही उदरनिर्वाहासाठी मोल मजुरी करुन लागली. कुटुंबाना आर्थिक समस्याबरोबरच मानसिक समस्या मोठ्या प्रमाणावर भेडसावू लागल्या. कुटुंबाकडे समाजाचा पाहण्याचा दृष्टिकोन  बदलला. त्यामुळे अनेक कुटुंबे उद्वस्त झाली. असे विपरीत परिणाम कुटुंबावर झाले. आपण कारागृहात जरी आलो तरी आपल्या कुटुंबाविषयी आजही आपली प्रेमाची भावना (९८.५ टक्के) आहे. कुटुंबातील व्यक्तींची दररोज आठवण येते. त्यामुळे बंदी अधिक काळ विचारात असतात माझे कुटुंबावर ही काय परिस्थिती आली ? माझ्या पत्नीचे मुलांचे, आई वडिलांचे काय हाल होत असतील याची चिंता त्यांना हमेशा सतावते असे जाणवले.

१०. बंद्याने जो गुन्हा केला आहे या व्यतिरिक्त कुटुंबातील इतर सदस्यांनी कधी गुन्हा केला काय असे विचारले असता बहुसंख्य बंद्यांनी (९४.५ टक्के) नाही असे सांगितले. म्हणजे कुटुंबात गुन्हेगारी पार्श्वभूमी नाही असे जाणवले.

११. व्यक्तीच्या जीवनात मित्रांना अनन्य साधारण महत्त्व आहे. आपले मित्र कोण व कसे आहेत यावरून आपली ओळख होत असते. बरेच लोक मित्राशिवाय असतात. अध्ययना दरम्यान बद्यांना मित्र होते काय ? असे विचारले असता ८४ टक्के बंद्यांना मित्र होते. ते सध्या शेती (६५ टक्के), स्वतःचा व्यवसाय (३० टक्के) तर काम करुन आपला उदरनिर्वाह करतात असे आढळले. जोपर्यंत आपण बाहेर होतो तोपर्यंत मित्र सोबत होते. आता हे मित्र कुटुंबाला मदतसुध्दा (९० टक्के) करत नाहीत. पण आजही हे बंदी अपेक्षा करतात की आपण शिक्षा भोगत आसल्याने आपल्या कुटुंबाला आपल्या मित्रांनी मदत करावी असे वाटते. पण तसे होत नाही असे सांगितले गेले.

१२. कारागृहात शिक्षा भोगणाऱ्या बहुसंख्य बंद्यांना शेती आहे. ५७.५ टक्के बंद्यांकडे शेतीचे प्रमाण अत्पल्प १ ते १० एकर असणाऱ्यांचे प्रमाण सर्वाधिक आहे त्यांची शेतीही कोरडवाहू आहे त्यामूळे त्यांना कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी पुरेसे उत्पन्न सुध्दा मिळत नाही यासाठी त्यांना इतरत्र मजूरी करावी लागते. मजूरी बरोबर इतर जोड व्यवसाय या आधारे ते उदरनिर्वाह करत होते. अर्थात बहुसंख्य बंद्यांची आर्थीक परिस्थिती बेताची आहे असे जाणवते. बंद्यांचे वार्षिक २० ते ५० हजार उत्पन्न असणाऱ्यांचे प्रमाण अधिक आहे त्याखालोखाल ५० हजार ते १ लाख उत्पन्न असणाऱ्यांचे प्रमाण आहे. बहुसंख्य बंद्यांची आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने त्यांची घरेही माती व छपराची असल्याचे समजले.

१३. बंदी कारागृहात येण्यापूर्वी त्यांची सामाजिक परिस्थिती कशी होती त्या संदर्भात बहुसंख्य बंदी (९८ टक्के) सामाजिक कार्यात सहभागी होत असे. त्यांच्या कुटुंबाचे स्थानही (९७ टक्के) चांगले होते. त्यामुळे समाजात त्यांना मानाचे स्थान होते. ते सामाजिक नियमांचे पालनही करत असत. त्यामुळे त्यांचा सामाजिक दर्जा चांगला होता. अर्थात त्यांची सामाजिक पार्श्वभुमी गुन्ह्याची नव्हती असे जाणवते. समाजात जी विविध धार्मिक कार्ये होत असत त्या सर्व सामूहिक धार्मिक कामात सर्वच बंदी (१० टक्के) सहभागी होत असत. समाजात वावरत असताना सामाजिक व धार्मिक नियम आपणास पाळावेच लागतात. सर्व कामात एकमेकांकडे जावे लागते असे बहुसंख्य बंद्यांनी सांगितले.

१४. भारतातील बहुसंख्य लोकांची ईश्वरावर श्रध्दा आहे. आजही ग्रामीण भागात ईश्वरावर श्रध्दा असणाऱ्यांचे प्रमाण अधिक आहे. असे म्हणत असताना शहरातही हे प्रमाण मोठ्या संख्येने आहे असे जाणवते. बंदी हेही ईश्वरावर श्रध्दा ठेवतात. मात्र या संदर्भात माहिती विचारली असता ९९ टक्के बंदी यांची ईश्वरावर श्रध्दा आहे. ईश्वराची पूजा करतात, भजन, कीर्तन, नामस्मरण, आपआपल्या धर्मानुसार ईश्वराची आराधना करतात. असे केल्याने त्यांना मनःशांती मिळते असे बहुसंख्या बंद्यांना सांगितले. प्रत्येकाच्या पेटीत आपआपल्या धार्मिक देवतांचे फोटो पाहावयास मिळाले. यावरुन त्यांची ईश्वरावर खूप श्रध्दा आहे असे जाणवते.

१५. कारागृहात येण्यापूर्वी ९५ टक्के बंद्यी प्रत्येक मतदानामध्ये सहभाग नोंदवल्याचे सांगितले. अर्थात मतदानाबद्दल बंद्यांमध्ये जाणिव जागृती असल्याचे जाणवते.

१६. मनोरंजन हा व्यक्तीच्या जीवनाचा एक भाग आहे. व्यक्ती मनोरंजनासाठी कोणकोणत्या गोष्टी करते. संगीत गाणे, चित्रपट ही मनोरंजनाची प्रभावी साधने आहेत, बहुसंख्य व्यक्तींना संगीत आवडते (९० टक्के) असे जाणवले. हे संगीत सुध्दा शांत आणि अर्थपूर्ण स्वरूपाचे कर्कश असे संगीत  बऱ्याच लोकांना आवडत नाही. संगीताबरोबर चित्रपटही मनोरंजनाचे साधन असल्याने त्या संदर्भात माहिती विचारली असता कौटुंबिक आणि मनोरंजनात्मक चित्रपट बहुसंख्य लोकांना आवडतात असे जाणवले. यावरुन त्यांचा स्वभाव हा शांत, कौटुंबिक वातावरणात वावरणारे आहेत असे जाणवले.

१७. व्यक्तीचे शारीरिक आरोग्य उत्तम राहिले तरच त्याचे मानसिक आरोग्य चांगले राहते. प्रत्येक व्यक्ती आपल्या आरोग्याची काळजी घेत असते. कारागृहात व्यक्तीच्या आरोग्या संदर्भात काळजी घेण्यासाठी एक स्वतंत्र रुग्णालय असून दोन डॉक्टरही नेहमीसाठी असतात. कारागृहातील बंद्यांची नियमित तपासणी केली जाते. पण गरज पडेल तेव्हा त्यांची तपासणी करुन त्यांच्यावर औषध उपचार केले जातात असे ९५ टक्के बंद्यांनी सांगितले. गंभीर आजार असेल तर ताबडतोब त्यांना शसकीय रुग्णालयात दाखल केले जाते असे जाणवले.

संशोधना दरम्यान (१७.५ टक्के) बंदी वेगवेगळ्या आजारांनी जसे की (मूत्राशय, उष्णता, रक्तदाब, दमा, मूळव्याध, डोळे, एड्स) इत्यादीने ग्रस्त आहेत. त्यांची नियमित तपासणी होऊन त्यांना वेळोवेळी औषधोपचार दिले जातात. त्यांना आहारसुध्दा पौष्टिक, दिला जातो असे बंद्यांनी सांगितले.

१८. मानव व्यसनांच्या आहारी गेला तर व्यसन हे त्याच्या जीवनाचे अविभाज्य अंग बनते. मग तो समाजात असो किंवा कारागृहात. कारागृहात शिक्षा भोगत असताना बंद्यांचे मानसिक संतुलन

बिघडू नये म्हणून त्यांच्या सवईप्रमाणे व्यसन करण्याची त्यांना परवानगी दिली जाते. पण कारागृहातील बहुसंख्य बंदी (४८ टक्के) व्यसनच करत नाहीत. त्याचे कारण म्हणजे कारागृहात कॅन्टीनमध्ये वडी, तंबाखू अत्यंत महाग मिळतात. त्यामुळे ते घेऊन ओढणे, खाणे परवडत नाही म्हणून आम्ही करत नाही असे जाणवले. पण कारागृहात बिडी, तंबाखू यांचे व्यसन करणाऱ्यांची संख्या सर्वाधिक जाणवते. ते काम करतात. काम करुन मिळालेल्या पैशातून कॅन्टीनमधुन बीडी, तंबाखू विकत घेतात. व व्यसन करतात असे आढळले.

१९. कारागृहात शिक्षा भोगणारा बंदी हा कोणता तरी गुन्हा करुन अलेला असतो. शिक्षा झाली म्हणजे त्याने केलेल्या कृत्याची सत्य, असत्यता न्यायालयाने तपासून ती सत्य ठरल्याने त्याला विशिष्ट कालावधीची शिक्षा न्यायालय देते. न्यायालयाने जेवढी शिक्षा दिली आहे तेवढा काळ त्या व्यक्तीला कारागृहात ठेवले जाते. व्यक्तीने गुन्हा कोणता केला आहे त्यावरुन त्याच्या शिक्षेचे स्वरुप ठरते. संशोधकाने अभ्यासलेल्या एकूण बंद्यांपैकी ५३ टक्के बंदी त्यांना ३०२ या कलमाखाली (खून करणे) जन्मठेपेची शिक्षा भोगत आहेत. या खूनामध्ये पत्नीचा खून, भांडणामध्ये मारणे, जाणून बुजून खून करणे, अनावधानाने मारणे अशा प्रकारे खून झाला आणि बंद्यांवर ३०२ कलमाअंतर्गत जन्मठेपेची शिक्ष लागली. यांचे प्रमाण अधिक जाणवले, बलात्कार आणि जबरी संभोग (३७६) या अंतर्गत (५ टक्के) बंदी शिक्षा भोगत आहेत. खून करणे, खुनाचा प्रयत्न, जबरी संभोग, स्त्रीला आत्महत्येसाठी प्रवृत्त करणे यांचे प्रमाण अधिक जाणवते. तसेच चोरीच्या उद्देशाने दरोडा टाकून चोरी करतांना स्त्रियांची अब्रू लूटणे, बलात्कार करणे, साने लूटणे याबरोबरच कोणी विरोध केला तर त्याला मारणे त्यात पूढील व्यक्तिचा मृत्यू होणे अशा घटनांचे प्रमाण कौटुंबिक अपराधांच्या खालोखाल आहे. तसेच स्त्रियांस बळजबरीने पळवून नेऊन त्यांच्यावर बलात्कार करणे, वेश्या व्यवसाय करण्यासाठी १८ वर्षेच्या आतील मुलींची विक्री करणे या कारणाने ही काही बंदी शिक्षा भोगत आहेत.

२०. व्यक्तीच्या हातून जो अपराध झाला असे अपराधाचे कृत्य करताना इतर कोणाचे साहाय्य घेतले का किंवा एकट्यानेच असे कृत्य केले या संदर्भातून माहिती संकलित केली असता (४३.५ टक्के) बंद्यांनी एकट्यानेच असे कृत्य केल्याचे सांगितले. म्हणजे संघटित अपराधाचे प्रमाण अतिशय अत्यल्प म्हणजे (१२.५ टक्के) आहे. यामध्ये लैंगिक अत्याचार, दरोडा, चोरी यांचा समावेश होतो. पण (१६.५ टक्के) बंद्यांनी सांगितले की, आम्ही असे अपराधाचे कोणतेच कृत्य केलेले नाही. आमचे नांव मुद्दाम जाणून बुजून गुंतवण्यात आले आहे. आमच्यावर अन्याय झाला असुन चुकीची शिक्षा भोगत आहोत असे सांगितले. जो अपराध झाला त्यामध्ये (५९ टक्के) बंद्यांनी सांगितले.

आमच्या कुटुंबातील कोणीही सहभागी झाले नव्हते. आम्ही एकट्यानेच केले, तर (४१ टक्के) बंद्यांनी सांगितले कुटूंबातील आई-वडील, भाऊ या सोबत असे कृत्य केले असे सांगितले. यावरुन गुन्हेगारी पार्श्वभूमी नसलेले बंदी आहेत असे जाणवले.

२१. बंद्याने जो अपराध केला त्यामध्ये कुटुंबातील इतर व्यक्तिंचा सहभाग होता असे ४१ टक्के बंद्यांनी सांगितले तर ५९ बंद्यांनी आम्ही जो अपराध केला त्यात आमच्या कुटुंबातील कोणीच सहभागी नव्हते असे सांगितले.

२२. बंद्यांनी केलेल्या अपराधात त्याच्यां कुटुंबातील सदस्यांचा सहभाग होता त्यासंदर्भात सविस्तर माहिती घेतली असता बंद्या सांबत त्यांची आई, वडिल, भाऊ यांचा सहभाग असणाऱ्यांचे प्रमाण अधिक जाणवले. यापाठीमागील कारणांचा शोध घेतला असता गुन्ह्यासाठी कौटुंबिक कारणे महत्त्वपूर्ण आहे असे जाणवले. यामध्ये प्रामूख्याने बंद्यांच्या पत्नीचा खून, छळ, तिला आत्महत्त्येस प्रवृत्त करणे अशा घटनांमध्ये कुटुंबातील सदस्यांचा सहभाग जाणवते.

२३. कारागृहात शिक्षा भोगणारे बंदी यांनी गुन्हा का केला त्याच्या कारणांचा आढावा घेतला असता एकूण २१ कारणांसाठी वेगवेगळ्या अपराधांखाली बंदी शिक्षा भोगत आहेत. यात कौटुंबिक वादातून सर्वाधिक बंदी (३१ टक्के) शिक्षा भोगत आहेत. यात कुटुंबातील सदस्यांचा खून, पत्नीचा खून इ. कारणांचा समावेश असुन आर्थिक कारणातून २६ टक्के यात पैशाची देवाण-घेवाण, शेतीचे वाद यांचा समावेश आहे. कुटुंबातील वाद व शेती व आर्थिक कारणांसाठी गुन्हयाचे प्रमाण इतर विविध गुन्ह्याच्या प्रमाणांपेक्षा अधिक असल्याचे जाणवते. त्याचबरोबर गावांत गुंडगिरी करणाऱ्या व्यक्तिस मारले. कारण गुंड प्रवृत्तीच्या लोकांच्या वर्तनाला संपूर्ण गाव त्रासले होते. गावातील अशा गुंड प्रवृत्ती असणाऱ्या लोकांना मारले असे ३ टक्के बंद्यांनी सांगितले. आम्ही जे कृत्य केले त्याचा आम्हाला अजिबात पश्चात्ताप होत नाही कारण त्यांना मारल्याने आज आमचे गाव सुखासमाधानाने राहत आहे अशी भावना व्यक्त केली.

गावातील राजकीय वादातून खून, मारामाऱ्या यांत ५ टक्के बंदी शिक्षा भोगत आहेत. धार्मिक वाद, बनावट नोटा बाळगणे, गांज्याची अवैध वाहतूक करणे, होळीच्या सणांत दगडफेकीत व्यक्तीचा मृतयू अशा अनेक कारणांनी गुन्ह्याची कृत्ये घडली असे बंद्यांनी सांगितले.

२४. कारागृहातील शिक्षा भोगणाऱ्या बंद्योंनी शिक्षा किती वर्षांची झाली या संबंधी माहितीवरुन असे निदर्शनास येते की, सर्वाधिक प्रमाण (७५.५ टक्के) जन्मठेप म्हणजे ज्यांना १४ वर्षे शिक्षा झाली आहे. त्यांनतर १० ते १४ वर्षे शिक्षा झालेल्या बंद्यांचे प्रमाण त्या खालोखाल जाणवते. तसेच सहा महिने ते एक वर्षे, एक वर्षे ते दोन वर्षे शिक्षा झालेल्यांचे प्रमाण अनूक्रमे ४ टक्के असून चार ते

पाच वर्षे शिक्षा झालेल्यांचे प्रमाण २.५ टक्के, पाच ते सात वर्षे शिक्षा झालेल्यांचे प्रमाण ४ टक्के, सात ते दहा वर्षे शिक्षा झालेल्यांचे प्रमाण ९ टक्के असून दहा ते चौदा वर्षे शिक्षेचे प्रमाण ५.५ टक्के आहे. एकत्रित सर्व गुन्ह्यांमध्ये बावन्न वर्षे शिक्षा भोगणारा एक बंदी आहे. न्यायालयाने वरील दिलेला शिक्षा त्यांना कारागृहातच भोगावी लागणार आहे.

२५. न्यायालयात अपराध सिध्द झाल्यावरच त्यांना शिक्षा दिली जाते. म्हणजे ते गुन्हेगार म्हणून ओळखले जातात. बंद्यांना त्यांनी खरोखरच असे अपराधाचे कृत्य केले. हे कृत्य केले आहे असे कबूल केले. पण हे करीत असताना आम्ही उगीचच केले नाही त्या पाठीमागे विशिष्ट पार्श्वभूमी होती त्यामुळे असे करणे आम्हाला भाग पडले. पण (१६.५ टक्के) बंदी आम्ही गुन्हा केला नाही पण आम्हाला फसवण्यात आले आहे. चुकीची शिक्षा आम्ही भोगत आहोत असे सांगितले.

२६. माणूस हा समाजशील तसेच परिवर्तशील आहे. गुन्हा सिध्द झाला. त्यांने कबूलही केला पण असे कृत्य केल्याचा परिणाम म्हणून कारागृहात शिक्षा भोगत असतांना कुटुंबीय, नातेवाईक, प्रियाव्यक्ती इ. पासून दूर राहिल्याने मनामध्ये कुठे तरी आज वाटते आपण जे कृत्य केले ती चूक झाली (७३ टक्के) आपण असे करायला नको होते. कारण यांचा खूप मोठा परिणाम आमच्या मनावर होत आहे. असे कृत्य घडले नसते तर आज आम्ही घरी असतो. त्यामुळे जे घडले ते चुक झाली असे बहुसंख्य बंद्यांच्या चेहऱ्यावर जाणवत होते. पण २३% बंद्यांनी आम्ही चूक केली नाही म्हणजेच आम्ही जाणून बुजून असे कृत्य केले पण ते करणे भाग होते. तशी परिस्थितीच निर्माण झाली त्यामुळे आम्ही जे केले ते चूक वाटत नाही असे त्यांच्या बोलण्यातून जाणवत होते.

२७. गुन्ह्याचे कृत्य ज्यावेळी त्यांच्या हातुन घडले तेव्हा त्यांनी कोणतेही व्यसन करुन केलेले नव्हते असे (८२%) बहुसंख्य बंद्यांनी सांगितले. व्यसन करुन अपराधाचे कृत्य केले नाही म्हणजे त्यांनी जाणून बुजून सर्वसाधारण परिस्थितीत अपराधाचे कृत्य केल्याचे निदर्शनास येते.

२८. कारागृहात विशिष्ट मुदतीची शिक्षा संपल्यानंतर समाजात पुन्हा त्यांचे पुर्वीचे स्थान आम्हास मिळेल अशी आशा प्रत्येकाला वाटते. (९२ टक्के) कारण आम्ही असे कृत्य परिस्थितीमुळे केले हे समाजाला माहीत होते. आमची गुन्ह्याची पार्श्वभूमी नव्हती. त्यामुळे परत गेल्यावर थोड्या फार प्रमाणात आमच्याकडे पाहण्याच्या दृष्टिकोनात बदल होईल. पण समाज आम्हाला नाकारणार नाही. आमचा स्वीकारच करेल असे बहुसंख्य बंद्यांच्या बोलण्यातुन जाणवले. समाजात घरी परत गेल्यावर आम्ही जो अगोदर शेती, व्यवसाय करत होतो तोच व्यवसाय आम्ही करुन आमचा उदरनिर्वाह करणार हा आत्मविश्वास त्यांच्यात होता.

२९. बंद्यांच्या शिक्षेतील माफी : कारागृहात बंदी वावरत असतांना त्यांना कारागृह नियमावलीचे पालन करावे लागते. बरेच बंदी अशा नियमावलीचे पालन करत नाही त्यासाठी जे बंदी या नियमावलीचे पालन करतील त्यांना त्यांच्या शिक्षेमध्ये काही शिक्षा माफ केली जाते. कारागृहातील शिक्षा भोगणाऱ्या बंद्यापैकी फक्त ७ टक्केच बंद्यांना शिक्षेत माफी मिळाली आहे.

बंद्यांच्या माफीचा प्रस्ताव कारागृह अधिक्षक मा. कारागृह उपमहा निरीक्षक यांच्याकडे पाठवतात पण बऱ्याच बंद्यांना माफीची सवलत मिळत नाही.

३०. आजची कारागृहे ही सुधारालये बनली आहेत. बंद्यांना सुधारण्यासाठी अनेक सुविधा कारागृहात दिल्या जातात. बंद्यांशी मानवतावादी दृष्टिकोनातून वर्तन केले जाते. त्यांना ज्या वेगवेगळ्या सुविधा मिळतात त्यात त्यांना जो आहार दिला जातो तो तज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली दिला जातो. पण तो आहार बहुसंख्य (७४.५ टक्के) बंद्यांना पुरेसा वाटतो. पण (२५.५ टक्के) बंद्यांना तो पुरेसा वाटत नाही. कारण सर्वांना समान पध्दतीने आहार दिला जातो. (तीन चपाती, वरण, भात, भाजी) काही बंदी शारीरिक कष्टाची कामे करतात. त्यांना आहार अधिक लागतो. त्यामुळे जो आहार त्यांना मिळतो तो पुरेसा वाटत नाही. पण त्याचबरोबर अन्नाचा दर्जा चांगला असावा असे सर्वच बंद्यांना वाटते असे जाणवले. बंद्यांना मिळणारा आहार हा चविस्ट असत नाही. पोळ्या करपलेल्या, वरण भाजी असते पण तिला चवच नसते त्यामुळे बहुसंख्य बंदी मिळणाऱ्या अन्नावर नाराज आहेत याचा परिणाम त्यांच्या वर्तनावर जाणवते. बरेच बंदी हमेशा चिडचिड करतात. शारीरिक श्रम करणाऱ्या बंद्यांना आहार अधिक असावा पण तो मिळत नाही. जे बंदी वृध्द असून दात नाही त्यांना भात अधिक दिला जातो. जे बंदी आजारी आहेत त्यांना स्वतंत्र आहार दिला जातो पण तोही निकृष्ठ दर्जाचा असतो.

३१. कारागृहात बंद्यांना बॅरेक्समध्ये समूहाने ठेवले जाते. जेथे त्यांना ठेवले जाते तेथील वातावरण प्रकाशमय आल्हाददायक आहे (८७.५ टक्के) असे जाणवते. कारण बॅरेक्समध्ये हवा खेळती आहे. एका बॅरेक्समध्ये कमीत कमी ४५ बंदी एकत्र राहतात त्यामुळे बॅरेक्समध्ये वातावरण कोंदट जाणवते. थोडा प्रकाशही येतो. तसेच पाणीही मुबलक आहे. पाणी मुबलक असल्याने दररोज आंघोळ, कपडे धुऊन स्वच्छ केल्याने आजार लवकर होत नाहीत.

३२. कारागृहात विविध अपराधांखाली शिक्षा भोगणारेबंदी एकत्र राहतात. तेथेही त्यांच्यामध्ये मैत्रीचे वातावरण आहे. ८८ टक्के बंद्यांनी कारागृहात आपले मित्र बनवले आहेत. ते मित्र जेवण, विचारांची देवाण - घेवाण, कामाच्या ठिकाणी एकत्र काम करतात. ते एकमेकांसोबत चर्चा करतात. त्यामुळे बंदी मानसिक समाधानी आहेत असे जानवले. ते मित्र एकमेकांसोबत मैत्रीपूर्ण

वागतात. त्यांच्या मध्ये आत्मियतेची भावना निर्माण होऊन सुख दुःखाचे प्रसंग एकमेकांना सांगत असतात कामाचे ठिकाणी एकत्र वावरत असताना सहकार्याच्या भावणेतून एकमेकांसोबत वागतात असे जाणवले.

३३. कारागृहात बंद्यांमध्ये सुधारणा करणे व त्यांना काम उपलब्ध करुन देणे यासाठी त्यांना विविध प्रकारचे प्रशिक्षण खास प्रशिक्षकांकडून दिले जाते. यामध्ये सुतारकाम, लोहारकाम, पंजाकाम, गोदाम, शिवणकाम, वेल्डिंग, नाव्हीकाम, कुंडाकाम, दरीकाम आदींचे प्रशिक्षण दिले जाते. यातुन त्या बंद्याला ज्या कामाची आवड आहे त्याला त्या पध्दतीचे प्रशिक्षण दिले जाते. या कामाचा त्यांन मोबदला मिळतो आणि बाहेर गेल्यावर त्या प्रशिक्षणांचा फायदा म्हणजे तेच काम करुन आपला उदरनिर्वाह करतील या उद्देशाने प्रशिक्षण दिले जाते. (९० टक्के) बंद्यांनी आम्हाला प्रशिक्षण दिले जाते असे सांगितले.

बंदी कारागृहातील सुतार काम, लोहार काम, पंजा काम, मेस, पॉवरलूम, शिवण काम, दरी काम, स्वयंपाक बनवणे, गोदाम वेल्डिंग, वॉचमन, धोबीकाम, यंत्रमाग, स्क्रीन पेंटिंग, सॉ मिल, कूंडाकाम, नाव्ही साफसफाई इ. पध्दतीची कामे करतात. कामामुळे त्यांना वेळ कसा गेला कळत नाही. त्यामुळे काम हे अत्यावश्यक वाटते. कारण रिकामा वेळ जास्त असेल तर विचार करुन मानसिक स्थिती बिघडू शकते. त्यामुळे काम हे अत्यंत आवश्यक आहे असे जाणवते.

कारागृहात वेळ घालवण्यासाठी बंदी काम करतात पण ते एखाद्या विभागात काम करत असतांना त्यातील बारकावे शिकतात. त्यातून त्या कामात त्यांची आवड निर्माण होते आणि शिक्षा संपूर्ण बाहेर आल्यावर या प्रशिक्षणाचा नक्कीच फायदा होईल असे ५१ टक्के बंदी सांगतात. या वरुन कारागृहात प्रशिक्षण हे अत्यंत आवश्यक आहे असे जाणवते.

३४. कारागृहात बंदी काम करत असताना त्या कामासाठी विशिष्ट ठरवून दिलेला वेळ या नियमांचे पालन केले जाते. ६ ते १० तास साधारणपणे काम करुन घेतले जाते. (११७) बंद्यांना काम आवश्यक आहे त्यांची जास्त काळ काम करू तेवढा वेळ कसा गेला, ते कळत नाही आणि जास्त काम कल्याने थकवा येतो आणि रात्री शांत झोप लागते. त्यामुळे बंद्यांना काम आवश्यक आहे असे वाटते पण कारागृहातील प्रत्येक बंद्याला काम दिले जात नाही. कारागृहात ठराविकच विभाग कार्यरत आसल्याने मोजक्याच बंद्यांना काम दिले जाते याचा परिणाम त्यांच्या वर्तनावर होतो. जे बंद दिवसभर काम करातात त्यांना रिकामा वेळ मिळत नाही परिणामी त्यांना रात्री शांत झोप लागते पण त्यांना काम नाही त्यांच्या वर्तनामध्ये कारागृह प्रशासनांत सहकार्याची भावना असत नाहीत ते विचार करत बसल्याने हमेशा चिडचिड करतात यामुळे त्यांच्या मानसिकतेवर परिणाम

झाल्याचे जाणवते त्यासाठी सर्व बंद्यांना कामाची व्यवस्था करणे अनिवार्य वाटते पण तसे होताना जाणवत नाही.

३५. कारागृहात बंद्यांकडून फक्त कामच करून घेतले जात नाही तर त्याचा मोबदलाही दिला जातो कामाचे स्वरूप कुशल, अर्धकुशल, अकुशल अशी विभागणी करून कुशल कामासाठी दररोज ४० रु. अर्धकुशल कामासाठी ३५ रु. तर अकुशल कामासाठी २५ रु. एवढी मजुरी दिली जाते. दर रविवारी व शासकीय सणांच्यादिवशी कामाला सुट्टी असते. त्यामुळे एका महिन्यात बंद्यांने काम किती दिवस केले आहे त्यावरुन तेवढ्या दिवसांची मजुरी दिली जाते असे आढळले.

३६. कारागृहात बंद्यांना काम करताना काही इजा दुखापत झाल्यास ताबडतोब प्रथमोपचार केला जातो. कारागृहातच स्वतंत्र दवाखाना असून दोन डॉक्टरांची नियुक्ती केली आहे. बंद्याला गरजेच्यावेळी आरोग्यसेवा पुरविल्याने त्यांच्या मनामध्ये कारागृह प्रशासनाविषयी आदारची भावना निर्माण होते. ज्या बंद्यांना आजार झाला आहे त्यावर ताबडतोब उपचार केले जातात. बंदी जास्त आजारी आसल्यास शासकिय रुग्णालयात दाखल केले जाते. कारागृहात शारीरिक रुग्णांऐवजी मानसिक रुग्णांचे प्रमाण अधिक जाणवते.

बंदी हमेशा विचार करुन त्यांच्या मनावर विपरीत परिणाम होतो त्यामुळे अशा बंद्यांवर वेळेच उपचार झाले तर पूढील होणारे दूषपरिणाम टाळता येतील त्यामुळे त्याचा परिणाम बंद्यांच्या वर्तनावर जाणवेल. बरेच बंदी हमेशा बडबड करत असतात. त्यांना बोलले तरी इकडे तिकडे पाहत असतात. अशा मानसिक अवस्था बिघडलेल्या बंद्यांसाठी मनोरुग्ण चिकित्सकाची अत्यंत गरज आहे पण कारागृहात मानसोपचार तज्ज्ञ डॉक्टर नाहीत.

३७. शिक्षण घेणे हा मानवाचा अधिकार आहे. कारागृहात ज्या बंद्यांना शिक्षण घेण्याची इच्छा आहे त्यांना मुक्त विद्यापीठाअंतर्गत प्रवेश दिला जातो. त्या बंद्याला शैक्षणिक साहित्य पुरवले जाते व परीक्षा देण्यासाठी परीक्षा केंद्रावर पाठवण्याची व्यवस्था कारागृहा मार्फत केली जाते. कारागृहात शिक्षणाची आवड आणि इच्छा आसणाऱ्यांचे प्रमाण अत्यल्प आहे असे जाणवते. कारण फक्त ५ बंदी पत्रकारिता, सातवी, चौथी, B.A. या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतला आहे असे निदर्शनास आले.

३८. कारागृहात बंद्यांसाठी विविध कार्यक्रम घेतले जातात. यात आसाराम बापूचे प्रवचन, राष्ट्रीय कार्यक्रम, ईद, महापुरुषांच्या जयंत्या सांस्कृतिक कार्यक्रम इ. कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. या सर्व कार्यक्रमांत सर्व बंदी सहभागी होतात. ज्यामुळे त्यांना मानसिक समाधान लाभते. राष्ट्रीय सणाच्यादिवशी गोड जेवण असते.

बंद्यांसाठी कारागृहात ठराविकच कार्यक्रम घेतले जातात. त्यामध्ये ज्यांना आवड आहे असेच लोक जातात पण सर्वसमावेशक अशा विशष कार्यक्रमांचे आयोजन केले जात नाही. ज्यामुळे बंदी नाराज असतात असे जाणवले. त्यांची इच्छा त्यांच्या मनोरंजनासाठी विविध संगीत रजनी, विविध विषयांवर व्याख्यान कार्यक्रम, विविध खेळ, योगा, प्राणायम यांचे आयोजन केले जावे अशी बहुसंख्य बंद्यांची इच्छा आहे. म्हणजेच येथे होणारे कार्यक्रम, खेळ, स्पर्धा यांचे आयोजन करावे अशी अपेक्षा आहे असे आढळले. ज्यामुळे त्यांना मानसिक समाधान मिळेल.

शहरातील काही नामांकित निमशासकिय संस्था मार्फत बंद्यांना संगणक प्रशिक्षण दिले जाते असे सांगितले. रक्षाबंधना निमित्त राखी बांधणे, विविध धार्मिक कार्यक्रम कारागृहात होतात पण त्यांचे प्रमाण अतिशय अल्प आहे. कारागृह प्रशासनाने निमशासकीय संस्थांचा सहभाग वाढविण्यासाठी प्रयत्न करावे. सुरक्षेच्या कारणास्तव व अपूरे कर्मचारी, बंद्यांची वाढती संख्या यामूळे हे सर्व करणे शक्य नाही असे कारागृह प्रशासन सांगते.

३९. कारागृहात बंद्यांना मिळालेला फावल्या वेळेत बहुसंख्य बंदी (५५%) आराम करतात. बाकीचे पेपरवाचन, देवाचे नामस्मरण, हरिपाठ, दूरदर्शन पाहणे, कॅरम खेळणे अशाप्रकारे वेळ घालवतात.

४०. कारागृहातील बंद्यांची आवडी संदर्भात माहिती घेतली असता नामस्मरण करणाऱ्यांचे व आवडीचे प्रमाण (२० टक्के) सर्वाधिक तर, वाचन करणे (२१ टक्के) , धार्मिक कार्यक्रमाची आवड (१५.५ टक्के) असून (२५.५ टक्के) बंद्यांना कोणतीच आवड नाही असे जाणवले. गाणे ऐकणे, दुरदर्शन पाहणे याचे प्रमाण ५ टक्के असून कामाची आवड असणाऱ्यांचे प्रमाण ८.५ टक्के आहे. पेन्टिंगची आवड असणाऱ्या एका बंद्याने आपला पेन्टिंगचा छंद आजही जोपासला आहे. त्याने कारागृहातील सर्व बोर्ड, पाट्या रंगवले असून काही चित्रेही काढले आहेत. बहुसंख्य बंदी हमेशा विचार करत राहतात. त्यामुळे त्यांना कोणतीच आवड नाही. आवड असून काय फायदा ? आमचे कुटुंब उद्वस्त झाले ही भावना मनामध्ये सतत विचार करत राहते असे जाणवले.

४१. कारागृहात सुधारणा आणि पुनर्वसन या अंतर्गत मानवतावादी दृष्टिकोनाची अम्मलबजावणी कारागृह प्रशासनाकडून केली जाते. बंद्यांना कारागृहातील कर्मचारी चांगल्या अर्थात आपुलकीच्या, मानवतेच्या भावनेतून वागवतात. (८७.५ टक्के) असे जाणवले. वेळप्रसंगी बंद्यावर रागावतात पण पुन्हा त्यांच्यासोबत चांगले वागतात. त्यांच्यासोबत चांगले वागल्याने एकमेकांमध्ये आपुलकीची भावना निर्माण होऊन कारागृहातील वातावरण खेळीमेळीचे असते.

४२. बंद्यांना कारागृहात वेगवेगळ्या सुविधा दिल्या जातात त्यामुळे त्यांना घर आणि कारागृह यांच्यात फरक जाणवतो काय या संबंधी माहिती संकलित केली असता ९९ टक्के बंद्यांनी सांगितले घर

आणि कारागृह यांत निश्चितच फरक आहे आणि हा फरक जमीन आकाशाएवढा आहे अशी भावना व्यक्त केली.

घर आणि कारागृहात नेमका फरक म्हणजे घर ते घर आहे आणि कारागृह ते कारागृह अशी भावना १०० टक्के बंद्यांनी व्यक्त केली. घर म्हणजे आई, वडील, पत्नी, मुले यांच्यासोबत राहिल्याने घर ते घर, कारागृहात एकटेच राहिल्याने येथे मन व इच्छा मारल्या जातात. सर्वात महत्त्वपुर्ण इच्छा म्हणजे लैगिक गरज पूर्ण होत नाही. घरातील व्यक्तीचा सहवास लाभत नाही. त्यामुळे घर आणि कारागृह यात महत्त्वपुर्ण फरक बंदी करतात असे जाणवते.

४३. कारागृहात बंद्यांच्या सुधारण्यासाठी अनेक उपक्रम राबवले जातात. त्यातून त्यांची गुन्हेगारी प्रवृत्ती कमी झाली काय या संबंधी माहिती घेतली असता गुन्हा करुन येथे आल्यापासून आजपर्यंत गुन्ह्याचा जो विचार होता तो कमी झाला आहे असे बहुसंख्य बंद्यांनी (९०.५ टक्के) सांगितले. जेव्हा कुटुंबापासून दूर आलो तेव्हाच केलेल्या कृत्याचा पश्चात्ताप होऊ लागला. आणि त्यामुळेच गुन्ह्याची जी भावना होती ती आपोआपच कमी होऊ लागली असे आढळले. अर्थात बंद्यांच्या मानसिकतेमध्ये फरक पडल्याने त्याचा परिणाम त्यांच्या वर्तनावर जाणवतो. कारागृह प्रशासनास नियमाप्रमाणे वर्तणूक करुण सहकार्य करतात असे जाणवले. कारागृहात आजपर्यंत हिंसक घटना झाली नाही असे सांगितले.

कारागृह प्रशासन बंद्यांना प्रवेशावेळी नियमांची माहिती करुन देते नियमाप्रमाणे वर्तन केले तर काही शिक्षा माफ होऊ शकते आणि जर नियमाविरुध्द वर्तन केले तर झालेल्या एकूण शिक्षेमध्ये वाढ होण्याची शक्यता असते. असे सांगितल्याने बंद्यांच्या वर्तनात फरक जाणवतो अर्थात केलेल्या कृत्येवर बंदी पश्चात्ताप करतात.

४४. बंद्यांना कारागृहात शिक्षा भोगत असतांना त्यांच्या कुटुंबीय, नातेवाईक, मित्र यांना महिन्यातून एक वेळ भेट दिली जाते. कारण या बंद्यांचे त्यांचे कुटुंबीय मित्र, नातेवाईक यांच्याशी भेट दिल्याने त्याचा परिणाम त्यांचे मानसिक संतुलन राखण्यासाठी होतो. त्यामुळे भेट आवश्यक मानली जाते. दर महिन्याला भेटण्याची परवानगी असून सुध्दा फक्त (५४ टक्के) बंद्यांनाच त्यांचे भेटायला येतात त्यात आई, वडील, पत्नी , मुले, भाऊ यांचे प्रमाण (८७ टक्के) आहे. (१० टक्के) बंद्यांना कोणीच भेटण्यासाठी येत नाहीत. त्यांना सविस्तर विचारल्यावर त्यांनी सांगितले आम्हाला कोणीच नाही मी जेलमध्ये आल्याने माझे कुटुंब उद्वस्त झाले.

बायकोने दुसरे लग्न केले, आई-वडील वारले आहेत, भाऊ-बहीण आपआपल्या संसारात आहेत. त्यामुळे भेटायला कोणीच येत नाही याचे वाईट वाटते अशी भावना त्यांच्या मनात

आहे. त्यामुळे भेटण्याची परवानगी असुनही आमच्यासाठी याचा काहीच उपयोग होत नाही अशी खंत त्यांच्या मनात असल्याचे जाणवले. कुटुंबीयांना आपणास महिन्यातून एकदाच भेट दिली जाते त्या संदर्भात त्यांना हा नियम असावा किंवा नसावा म्हणजे अधिक भेटी पाहिजे या उद्देशाने माहिती काढली असता भेटण्यासाठी नियम असावेत म्हणजे महिन्यातून एकच भेट असावे असे बहुसंख्य (६९%) बंद्यांचे विचार आहेत असे जाणवले. जास्त घरच्यांना भेटी दिल्यावर आपली मनःस्थिती बिघडु शकते. त्यामुळे विशिष्ट वेळीच म्हणजे महिन्यातून एकदाच भेट असावी असे त्यांना वाटते.

४५. कारागृहात बंद्यांसाठी योगा, प्राणायम, शिबिरे यामुळे त्यांच्या मानसिकतेमध्ये मोठ्या प्रमाणावर प्रभाव पडत असतो. त्यामुळे त्यांच्या वर्तनात स्थिरता जाणवते. पण कारागृहात अशा प्रकारचे योगा, प्राणायम, शिबिरे, होत नाहीत असे (८५ टक्के) जाणवले. त्यामुळे बंद्यांच्या मनात विफलतेची भावना निर्माण होऊ शकते. त्यामुळे अशा विशेष कार्यक्रमांचे आयोजन होणे काळाजी गरज आहे असे जाणवते.

४६. कारागृहात शिक्षा भोगत असताना कुटुंबीयांना भेटण्यासाठी ३० दिवसांची रजा वर्षातून एकदा मिळते. ती रजा ३० दिवसांनी वाढवता येते. संचित आणि पॅरोल असे दोन रजेचे प्रकार आहेत बंद्याला शिक्षा लागल्यानंतर दोन वर्षे त्याने शिक्षा भोगल्यानंतर त्याला सुट्टी मिळते. सुट्टी मंजुर करण्यासाठी कार्यालयीन प्रक्रिया पूर्ण करावी लागते. कारागृह नियमानुसार पॅरोल रजा ३० दिवस मंजूर करतात. त्यामध्ये विभागीय आयुक्त ६० दिवसांची रजा वाढवून मंजूर करू शकतात. बंद्याच्या कुटुंबातील व्यक्तीचा मृत्यू झाल्यानंतर ही रजा मंजूर करू शकतात. संचित रजा विभागीय कारागृह उपमहानिरीक्षक १४ दिवस मंजूर करुन १४ दिवसांची वाढ मंजूर करू शकतात. विशेष प्रसंगी रजेमध्ये मुदत वाढ करू शकतात. ही रजा चांगल्या वर्तणूकीचे बक्षीस म्हणून समजले जाते. संचित रजेवर दर दोन वर्षांनी १४ दिवसांची रजेवर जाण्यास पात्र असतात.

वरील नियमाप्रमाणे सुट्टीची प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर त्याला सुटीवर पाठवले जाते. (६४.५ टक्के) बंदी रजेवर जातात तर (२४ टक्के) बंदी रजेवर जात नाहीत. कारण त्यांचे भेटण्यासाठी कोणीच नसल्याने व बहुतेक जणांचा जामीन घेण्यास कोणीच तयार होत नाहीत. त्यामुळे बरेच बंदी सुट्टी ही हक्काची असूनही जात नाहीत असे जाणवते.

४७. बंद्याने ज्या वेळा अपराध केला आणि त्याला अटक केल्यानंतर त्याला जामीन मिळण्यासाठी रिमांडवर असताना जो खर्च लागतो तो (८९ टक्के) बहुतांश कुटुंबीयांनीच केला असे जाणवते. यातून आपणास कौटुंबिक नाते संबंधांची घट्ट पकड असल्याचे जाणवते.

४८. कारागृहात सर्व प्रकारच्या बंद्यांचा समावेश असतो. बॅरेक्समध्ये समूहाने बंदी राहिल्याने त्यांच्यात एकमेकांचा एकमेकांवर प्रभाव पडू शकतो. कारागृहात जे गंभीर स्वरूपाचे बंदी आहेत त्यांचा परिणाम इतर सामान्य बंद्यांवर येऊ नये यासाठी गंभीर बंद्यांना आमच्यापासून अंडा सेल किंवा सेपरेट यार्डमध्ये ठेवले जाते. गंभीर बंद्यांना सामान्य बंद्यांसोबत संबंध येऊ न दिल्याने त्यांच्या अपराधी प्रवृत्तीचा प्रभाव पडण्याचा प्रश्नच येत नाही. ही आवश्यक आणि महत्त्वपुर्ण व्यवस्था कारागृहात प्रशासनाने केली आहे असे आढळून आले.

सेपरेट यार्ड व अंडा सेलमध्ये अत्यंत गंभीर व धोकादायक गुन्ह्यात ज्या बंद्यांना शिक्षा लागली आहे त्यांना ठेवले जाते. सेपरेट यार्डमधील बंद्यांचे राहणीमान, खानपान यामध्ये भिन्नता असते. अशा गंभीर गुन्हेगारांना स्वतंत्र ठेवल्याने त्यांचा परिणाम इतर बंद्यांवर होत नाही.

४९. बंद्यांना न्यायालयाने जी शिक्षा दिली आहे त्या संबंधी त्यांच्याकडून माहिती संकलित केली असता (५० टक्के) बंद्यांनी सांगितले. आमच्यावर अन्याय झाला आहे. आम्ही प्रत्यक्षात गुन्हाच केला नाही पण आम्हाला यात गुंतवण्यात आले आहे. त्यामुळे आमच्यावर अन्याय झाला आहे अशी भावना आढळून आली (३४ टक्के) बंद्यांनी आम्हास योग्य शिक्षा झाली म्हणजे आम्ही जे कृत्य केले त्याची योग्य शिक्षा आम्हास मिळाली अशी भावना व्यक्त केली.

५०. कारागृहात प्रशासनामार्फत जे विविध उपक्रम राबविले जातात त्या विविध उपक्रमांवर बहुतांश (७३ टक्के) बंदी समाधान व्यक्त करतात. पण या उपक्रमात सुधारणा व वाढ व्हावी ही भावना त्यांच्या मनामध्ये जाणवते. बहुतांश बंदी कारागृहातील दिनचर्या, प्रशिक्षण, मनोरंजनाची साधने विविध उपक्रम यावर खूप समाधानी आहेत असे जाणवले. बऱ्याच बंद्यांनी कारागृहात होणाऱ्या कार्यक्रमासंदर्भात नकारात्मक भावना व्यक्त केली. अन्नांचा दर्जा, अन्नाचे प्रमाण, सर्व बंद्यांसाठी काम नाही, मानसोपचार तज्ज्ञ डॉक्टरर्स नाही, सामुहिक कोणतेच कार्यक्रम होत नाही, मनोरंजनाची साधणे, वर्तमानपत्रे, पुस्तके, दूरदर्शन संच ही सर्वसाधने पुरेशी नाहीत अशी भावना बहुसंख्य बंद्यांनी व्यक्त केली.

५१. कारागृहात बंद्यांच्या मनोरंजनासाठी प्रत्येक बॅरेक्समध्ये एक दूरदर्शन संच, दोन वर्तमानपत्रे, कॅरम आहेत. तसेच वाचनाची आवड आसणाऱ्यांना ग्रंथालय उपलब्ध आहे. बंद्यांना सामूहिक खेळासाठी विशिष्ट वेळ दिला जातो.आपला छंद जोपासण्यासाठी बंद्यांना कारागृह प्रशासन प्रोत्साहन देते असे आढळून आले.

५२. बंद्यांनी कारागृह प्रशासनाकडून काही अपेक्षा व्यक्त केल्या त्यात अन्नाचा दर्जा चांगला असावा, पुरेसा आहार मिळावा, सर्वांना काम असावे, कामाच्या मजूरीत वाढ व्हावी, सर्व समावेशक

कार्यक्रम व्हावेत, योगा, प्राणायम व्हावे, वर्तमानपत्रे, ग्रंथालयातील पुस्तके यांची संख्या वाढवावी, भेटीचा वेळ वाढवावा. भेट जवळून द्यावी. सूटी वेळेवर मिळावी, वृध्द बंद्यांना मुदतीपूर्व सोडावे, कारागृहात मानसोपचार तज्ज्ञ डॉक्टरांची नियूक्ती करावी, बंद्याला बाहेर सूटल्यावर कर्ज मिळण्याची व्यवस्था असावी अशा अनेक अपेक्षा बहूसंख्य बंद्यांनी व्यक्त केल्या काही बंद्यांनी सांगितले जे आहे ते ठिक आहे त्यात थोडाफार बदल करावा असे सांगितले.

## ७.३ शिफारशी

मध्यवर्ती कारागृहातील बंद्यांचा चिकित्सक अभ्यास केल्यानंतर कारागृहातील बंद्यासंदर्भात कारागृह प्रशासन यांच्या संदर्भात महत्त्वपुर्ण शिफारशी पुढीलप्रमाणे मांडण्याचा प्रयत्न संशोधकाने केला आहे.

१) कारागृहात येणाऱ्या बंद्यांचे वयनिहाय प्रमाण २० ते ३० आणि ३० ते ५० वर्षे वयोगटातील प्रमाण अधिक आहे. कारागृहात प्रत्येक बंद्याला काम दिले जात नाही. त्यामुळे ते बंदी बसून असतात. त्यांच्या मनामध्ये विफलतेची भावना निर्माण होत असते. २० ते ३० आणि ३० ते ५० वयोगटातील संख्या ज्यास्त असल्याने त्यांना जर काम नाही दिले तर त्यांचा परिणाम त्यांच्या मनावर होऊ शकतो. तसेच त्यांच्या वर्तनावरही परिणाम होऊ शकतो त्यासाठी कारागृहात येणाऱ्या प्रत्येक बंद्याला योग्य काम द्यावे. ज्यामुळे तो फक्त विचार करत बसत नाही. त्यामुळे त्यांच्यावर मानसिक परिणाम होणार नाही.

२) कारागृहात शिक्षा भोगणाऱ्या बंद्यांमध्ये शिक्षित व्यक्तींचे प्रमाण अधिक आहे. पण बंद्यांच्या कारागृहातील प्रमाणानुसार वाचनासाठी पुस्तके, वर्तमानपत्रे, खेळाचे साहित्य नाही. ग्रंथालयातील पुस्तके पुरेशी नाहीत. जर ग्रंथालयातील पुस्तक वाढली आणि ती बंद्यांना वाचनासाठी दिली गेली तर त्याचा चांगला परिणाम होऊ शकेल. आपला वेळ वाचनात घालवल्याने बंदी विचार करत बसणार नाहीत त्यातून मनोरुग्णांचे प्रमाणही कमी होईल.

३) कारागृहात येणाऱ्या बंद्यांच्या कौटुंबिक पार्श्वभूमीबाबत असे जाणवले की विभक्त कुटुंबातून आलेल्या बंद्यांचे प्रमाण अधिक आहे. विभक्त कुटुंबांत सदस्यावर नियंत्रण कमी जाणवते त्यामुळे अपराधासारखे वर्तन त्यांच्या हातून घडते. त्यासाठी संयुक्त कुटुंबे कसे आबाधित राहतील, संयुक्त

कुटुंबातून विभक्त कुटुंब होणार नाहीत याची खबरदारी घेतली पाहिजे जेणे करून अपराधांचे प्रमाण निश्चित कमी होईल.

४) घरातील कर्ता पुरुष कारागृहात आल्याने त्याचा परिणाम संपूर्ण कुटुंबावर होत असतो. त्यात त्याची पत्नी, मुले, आई वडील यांचे खाणे, राहणे, शिक्षण यांचे हाल होतात. परिणामी बऱ्याच वेळी कुटुंबे विस्कळीत होतात. म्हणजे एक प्रमुख व्यक्ती कारागृहात असल्याने त्याचा विपरीत परिणाम म्हणून संपुर्ण कुटुंब उद्वस्त होते. यातून अनेक कुटुंबे उद्वस्त होऊन अनेक समस्या निर्माण होतात. त्यासाठी अशा कुटुंबीयांच्या पालन पोषणाची जबाबदारी शासनाने किंवा निमशासकीय संस्थांनी घ्यावी ज्यामुळे उद्वस्त होणारे कुटुंबे आपणास थांबवता येतील. अशा कुटुंबाकडे समाजाचा पाहण्याचा दृष्टिकोन संकोचीत होता कामा नये. उलट कुटुंबियांना समाजाने मानसिक पाठबळ देणे गरजेचे आहे.

५) कारागृहात बंद्यांची आरोग्यविषयक काळजी घेण्यासाठी स्वतंत्र रुग्णालय व दोन डॉक्टर्स आहेत. पण कारागृहात सामान्य रुग्णांपेक्षा मनोरुग्णांचे प्रमाण वाढत आहे. अशा मनोरुग्णांवर वेळीच उपचार केले तर त्यात फरक पडू शकतो. त्यासाठी स्वतंत्र अशा मानसोपचारतज्ज्ञ डॉक्टरांची नियुक्ती करणे गरजेचे आहे.

६) कारागृहात बंदी शिक्षा भोगत असताना त्याचा परिणाम तो बंदी आणि कारागृह प्रशासन या दोघांवरही होत असतो. बरेच बंदी आपल्या हातून न कळत अपराधाचे कृत्य घडले असे कबूल करूण पुन्हा असे कृत्य आमच्या हातून घडणार नाही. कारण कुटुंबापासून दूर राहिल्याचा विपरीत परिणाम होत आहे असे जाणवले. त्यासाठी त्यांना न्यायालयाने जी शिक्षा दिली आहे त्या मध्ये काही शिक्षा माफ करावी. जेणे करुन त्याना लवकर आपला कुटुंबात गेल्याने त्यामुळे उद्‌भवणाऱ्या समस्या निर्माण होणार नाहीत आणि कारागृहात दररोज वाढणारी गर्दी आपोआपच कमी करता येऊन कारागृहावर होणाऱ्या खर्चांत कपात करता येईल.

७) कारागृहाबंद्यांना दिला जाणारा आहार बहुसंख्य बंद्यांना पुरेसा नाही त्यामुळे जे अन्न त्यांना दिले जाते त्याच्या दर्जामध्ये सुधारणा करुन प्रमाणही वाढवले पाहिजे. ज्यामुळे त्यांचे पोटभर जेवण मिळाल्याने मानसिकदृष्ट्या त्यांचा चांगला परिणाम जाणवेल.

८) कारागृहात बंद्यांना वेगवेगळे प्रशिक्षण दिले जाते. पण कारागृहातील प्रत्येक बंद्याला काम दिले जात नाही. त्यासाठी प्रत्येक बंद्याला काम द्यावे. प्रशिक्षणाचे अनेक विभाग जसे सुतारकाम, लोहारकाम, पंजाकाम आदींकामे बंद आहेत ते त्वरित चालू करणे गरजेचे आहे.

९) कारागृहात कुशल कामगाराला ४० रु. अर्धकुशल कामगाराला ३५ रु. तर अकुशल कामगाराला २५ रु. दररोज मजुरी मिळते. रविवार आणि राष्ट्रीय सण या दिवशी काम बंद त्यामुळे महिन्यात कामाचे दिवस कमी भरतात. परिणामी माहिन्याचा पगार अत्यंत कमी पडतो. त्यासाठी सर्व कामगारांची मजूरी वाढवली पाहिजे. जेणे करुन बंद्यांच्या नावे अधिक रक्कम जमा होईल व बाहेर आल्यावर त्या रकमेचा उपयोग होऊ शकतो. बरेच बंदी आपण कमावलेल्या पैशातून काही रक्कम घराकडे मनि ऑर्डरने पाठवतात. काही पैशातून कॅन्टीनमधून वस्तू खरेदी करतात. यामुळे शेवटी त्यांच्याकडे अतिशय कमी रक्कम शिल्लक राहते. कॅन्टीनमध्ये मिळणाऱ्या वस्तूंच्या किम्मती या जवळपास मुळ किम्मतीच्या दुप्पट असतात. त्यामुळे बऱ्याच वेळी त्या घेण्याचे टाळले जाते. त्यासाठी बंद्यांच्या मजुरीचे दर वाढवावेत, कॅन्टींनमध्ये मिळणाऱ्या वस्तूंची किम्मत त्या वस्तूच्या बाहेरच्या किम्मती एवढीच असावी.

१०) कारागृहात शिक्षा भोगणाऱ्या एकूण बंद्यांपैकी ७१ टक्के बंदी शिक्षित आहेत. पण फक्त पाच बंदी सध्या मुक्त विद्यापीठाअंतर्गत शिक्षण घेत आहेत. त्यासाठी कारागृहात शिक्षण घेण्यासाठी विशेष प्रोत्साहन समुपदेशन करणे गरजेचे आहे. त्यांनी विविध अभ्यासक्रमाला प्रवेश घेतला म्हणजे ते अभ्यासात व्यस्त राहतील. परिणामी त्यांचे मानसिक आरोग्य सुदृढ राहण्यासाठी मदत होईल.

११) कारागृहात बंद्यांच्या मनोरंजनासाठी किंवा मानसिक परिवर्तनासाठी सर्वसमावेशक असे कोणतेच कार्यक्रम होत नाहीत. जे होतात ते धार्मिक कार्यक्रम असल्याने ज्यांना आवड आहे अशाच व्यक्ती जातात. त्याचा परिणाम बंद्यांच्या मानसिकतेवर होतो. त्यासाठी सर्व बंद्यांसाठी असे गायन, संगित नाटके, व्याख्याने, योगा, प्राणायम, सांघिक खेळ इ. उपक्रम कारागृहात व्हावेत ज्यामुळे त्यांच्या सुधारण्यात मदत होईल.

१२) कारागृहातील बहुसंख्य बंद्यांकडे फावला वेळ जास्त असतो. त्याचा परिणाम मानसिक आरोग्य बिघडण्यात होते, त्यासाठी कारागृह प्रशासनाने बंद्यांच्या रिकाम्या, फावल्या वेळेचे योग्य नियोजन करणे गरजेचे आहे. ज्यामुळे त्यांना चिंता करुन मनोरुग्ण होण्यापासून आपण वाचवू शकतो. बंद्यांना विविध ठिकाणी काम देणे शक्य नसेल तर ते ज्या ठिकाणी राहतात त्याच ठिकाणी बसून

काही वस्तू बनविण्याचे प्रशिक्षण द्यावे ज्यामुळे प्रत्येकांना काम मिळेल त्यातून पैसाही मिळेल आणि बंद्यांना रिकामा वेळ जास्त मिळणार नाही. त्याचा चांगला परिणाम म्हणजे त्यांच्या वर्तनावर चांगला परिणाम होतो. कारागृह प्रशासनाला असे लघूउद्योग प्रशिक्षण देणे शक्य नसेल तर शहरातील काही नामांकित निमशासकिय संस्थांना कारागृहात निमंत्रित करुण असे उपक्रम चालु करणे गरजेचे आहे.

१३) बंद्यांना त्यांचे नातेवाईक कुटुंबीय, मित्र यांना नियमाप्रमाणे महिन्यातून एक वेळ भेट दिली जाते, पण भेट खूपच दूरुन आणि कमी कालावधीत असते, त्यासाठी बंद्यांना भेटीसाठी प्रत्यक्ष समोरा समोर बसून व जास्त कालावधी असावा. जेणे करुन त्यांचे सर्व विषयांवर सविस्तर बोलणे होईल. आपल्या मुलांना जवळ घेतल्याचे मानसिक समाधान त्यांना मिळेल.

१४) कारागृह आणि घर यांच्यातील महत्त्वपुर्ण फरक म्हणजे घरामध्ये बंद्यांना आपल्या पत्नीसोबत लैंगिक संबंध प्रस्थापित करता येतात. कारागृहात मात्र तशी व्यवस्था नाही. पण त्याचा परिणाम बंद्यांच्या मानसिकतेवर आणि वर्तनावर होतो. त्यासाठी कारागृहातच त्यांच्या पत्नीशी शरीर संबंध ठेवण्याची व्यवस्था करावी. ज्यामुळे पती पत्नीचे नाते अतूट राहील.

१५) कारागृहात बंदी शिक्षा भोगत असतांना त्यांच्या कुटुंबांना अनेक समस्यांचा सामना करावा लागतो पत्नी, आई, वडील, मुले यांचे हाल जे बंदी कारागृहात शिक्षा भोगत आहेत त्यांच्या कुटुंबाची मुलांचे शिक्षण, आई वडील यांचा सांभाळ शासनाने करावा किंवा एन.जी.ओ. यांनी करावा जेणे करुण उद्वस्त होणारी कुटुंबे थांबवता येतील. त्यांचे आई, वडील यांना वृध्दाआश्रमात राहण्याची व्यवस्था करावी. मूलांच्या शिक्षणासाठी शासकीय वसतीगृहात प्रवेश द्यावा. ज्यामुळे बंद्यांच्या कुटुंबांना समस्यांना सामोरे जावे लागणार नाही.

१६) कारागृहात सर्व बंद्यांसाठी दररोज योगा, प्राणायम नियमित होण्यासाठी प्रयत्न करावे. कारागृहात योगा, प्राणायम यामुळे त्यांचे मानसिक परिवर्तन होऊन जिवणाकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन निर्माण होईल यातून त्यांचे मानसिक आरोग्य बिघडणार नाही तसेच त्यांचे शारीरिक आरोग्यही सदृढ राहण्यासाठी मदत होईल. यासर्वांचा एकत्रित परिणाम म्हणून बंद्यांच्या वर्तनात निश्चितच बदल दिसेल यासाठी कारागृह प्रशासनात तातडीने कार्यवाही करणे गरजेचे आहे.

१७) बंद्यांना कारागृह नियमानूसार संचित १४ दिवस आणि पॅरोल ३० दिवसांची रजा मिळत असली तरी ती मंजूर होण्यासाठी बराच कालावधी लागतो. बरेच बंदी त्या विलंब प्रक्रियेमुळे त्या वर्षीची

सुटीवर जाऊ शकत नाहीत. त्यासाठी त्यांची सुट्टी मंजुरी प्रक्रिया जलद होऊन प्रत्येक वर्षाची नियमाप्रमाणे रजा मंजूर करुन बंद्यास उपभोगण्यासाठी द्यावी.

१८) कारागृहातील बहुसंख्य बंद्यांनी प्रत्यक्ष गुन्हा केला नाही. त्यांना मुद्दाम यामध्ये गुंतवण्यात आले आहे. आम्ही चुकीची शिक्षा भोगत असून आमच्यावर न्यायालयीन अत्याचार झाला आहे ही भावना त्यांच्या मनामध्ये निर्माण झाली आहे. त्यासाठी अशा बंद्यांच्या केसेसचा न्यायालयाने पुर्नविचार करावा. जेणे करुन ज्यांनी अपराधाचे कृत्यच केले नाही पण ते शिक्षा भोगत आहेत. यामुळे त्यांना न्याय मिळू शकेल.

१९) कारागृहात बरेच बंदी ६० वर्षांच्या वरील आहेत. ते विविध गुन्ह्याखाली शिक्षा भोगत आहेत. अशा वृध्द बंद्यांना काही काळ शिक्षा भोगल्यानंतर त्यांची पुढील शिक्षा शासनाने त्यांचे वाढते वय लक्षात घेऊन रद्द करावी. पण जे सऱ्हाईत गुन्हेगार आहेत किंवा ज्यांनी अत्यंत घातक असे कृत्य केले आहे अशा बंद्यांनी ६० वर्षे पूर्ण केली तरी त्यांना सोडू नये. जर त्यांना सोडले तर पुन्हा तसे अपराधाचे कृत्य घडू शकते. जर ६० वर्षे वयाच्या बंद्यांना सोडले तर समाजात चुकीचा संदेश जाईल की ६० वर्षे वय झालेल्यांना कारागृहात ठेवत नाही. असे झाले तर ६० वर्षांवरिल व्यक्तींचे अपराधाचे प्रमाण वाढू शकते. त्यासाठी ज्यांच्या वर्तनात बदल झाला आहे. पुन्हा असे कृत्य करण्याची शक्यता नाही असे खात्री करुनच ६० वर्षे वयाच्या बंद्यांना सोडावे.

२०) बऱ्याच बंद्यांना कारागृहातून सुटल्यानंतरची चिंता सतावते. कारण बाहेर आल्यावर पूर्वीचे संबंध, काम, व्यवसाय असेलच असे नाही. त्यामुळे बाहेर आल्यावर त्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. त्यांना उदर निर्वाहासाठी व्यवसायासाठी पैश्याची आवशकता असते. त्यासाठी शिक्षा संपुन घरी आलेला बंद्यांना बँकेमार्फत कर्ज मंजूर करण्याची व्यवस्था शासनाने करावी.

२१) बंद्यांना कारागृहात आधुनिक उद्योगांचे प्रशिक्षण द्यावे, तसेच त्यांना कायद्याचे ज्ञान आरोग्य शिक्षण, लैगिक शिक्षण द्यावे. बंद्यांना विविध उद्योगांचे प्रशिक्षण दिले तर बंदी बाहेर आल्यावर त्यांच्या उदरनिर्वाहाचे साधन ते स्वतः निर्माण करतील. तसेच त्यांना आरोग्य, लैगिंक शिक्षण दिल्याने आरोग्य सदृढ राहण्यासाठी ते स्वतः प्रयत्न करतील. बंद्यांना कायद्याचे न्याय द्यावे ज्यामुळे त्यांचे अधिकारी व इतर कायद्यातील बारकावे माहिती होती. याचा सकारात्मक परिणाम बंद्यावर होऊ शकतो.

२२) कारागृहातून शिक्षा संपून घरी गेल्यावर त्यांच्या पुनर्वसनाची जबाबदारी निमशासकीय संस्थांनी (एन.जी.ओ.) घ्यावी. बंद्यांना कारागृहाच्या बाहेर आल्यावर बऱ्याच वेळा समायोजनाची समस्या उदभवू शकते, कामाचा प्रश्न निर्माण होतो. अशावेळी विविध क्षेत्रात काम करणाऱ्या निमशासकिय संस्था यांनी ही जबाबदारी घेतली तर बंद्यांच्या हातून पून्हा गुन्ह्यासारखी कृत्ये करण्याची वेळ येणार नाही.

२३) कारागृहातील बंद्यांची वाढती संख्या लक्षात घेता कारागृहातील कर्मचारी संख्या शासनाने वाढवावी. जेणे करुन कर्मचाऱ्यांवर ताण येणार नाही आणि बंद्यांच्या वाढत्या गर्दीमुळे नियोजन योग्य पध्दतीने अम्मलबजावणी होत नाही त्यासाठी कारागृहातील कर्मचाऱ्यांची संख्या शासनाने वाढवावी.

२४) कारागृहातील वाढती गर्दी कमी करण्यासाठी बंद्यांची जामिनावर सुटका करावी. पॅरोलचा अधिक वापर करावा, भरपूर आर्थिक दंडाची शिक्षा द्यावी, काही बंद्यांच्या शिक्षेत सूट द्यावी, मुदतीअगोदर सुटका करावी. ज्यामुळे बंदी आणि कारागृह प्रशासन या दोघांवरही सकारात्मक परिणाम होऊ शकतो.

२५) कारागृहातील बंद्यांना जलदगतीने न्याय द्यावा. जेणे करुन जे आरोपी आहेत. त्यात जे निर्दोष आहेत ते घरी जातील. जेणे करुन कारागृहावर पडणारा ताण कमी होईल.

२६) कारागृहात बंद्यांच्या सुधारणेसाठी विषेश प्रयत्नांसाठी निमशासकीय संस्थांना आमंत्रित करुन विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यासाठी परवानगी द्यावी.

२७) उन्हाळ्यात उकाड्यामुळे गर्मी मोठ्या प्रमाणात होते त्यासाठी बंद्यांच्या संख्येच्या प्रमाणात पंख्यांची व्यवस्था करावी.

२८) बंदी जेथे राहतात त्या बॅरेक्समध्ये ४५ बंदी एकत्र राहिल्याने बॅरेक्समध्ये शुध्द हवा मिळत नाही. त्यासाठी शक्त असेल तर कारागृह प्रशासनाने बॅरेक्समधील बंद्यांची संख्या कमी करावी.

२९) कारागृहातील बंद्यांचे वय, शिक्षण, केलेला अपराध या आधारावर वर्गीकरण करावे. त्यानुसार त्यांचे समुपदेशन करावे. त्यांना शिक्षणासाठी प्रेरीत करावे. विविध अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यासाठी प्रवृत्त करावे. ज्यामुळे त्यांच्या वर्तनावर सकारात्मक परिणाम होईल.

३०) कारागृहातील बंद्यांच्या अडचणी किंवा समस्या जाणून घेवून त्या सोडविण्यासाठी प्रयत्न करावे.

३१) बंदी करागृहात आल्याने त्यांच्या कुटुंबियांना अनेक समस्या उदभवू शकतात. त्यासाठी अशा बंद्यांच्या कौटुंबियांना मदत करण्यासाठी कारागृह प्रशासनाने काही निमशासकीय संस्थांशी संपर्क करुण अशा कुटुंबियांना मदतीसाठी अवाहन करावे. ज्यामुळे बंद्यांच्या कुटुंबियांना विविध समस्यांना सामोरे जावे लागणार नाही.

३२) कारागृह कर्मचाऱ्यांची संख्या अपूरी आहे त्यामुळे त्यांना कामाचा ताण येतो. ताण कमी करण्यासाठी त्यांना विशिष्ट प्रशिक्षण, सहली, मनोरंजन, आरोग्यविषयक सुविधा आदिं बाबत विविध उपक्रम राबवावे.

**समारोप :-**

प्रस्तुत प्रकरणामध्ये संशोधकाने संपूर्ण संशोधनाअंती सर्व प्रकरणांचा सारांश थोडक्यात मांडला असून संशोधनातून जे निष्कर्ष निघाले त्यांना विस्तृत मांडले आहे संशोधनाने कारागृह प्रशासनाला काही शिफारशीही केल्या आहेत. जर या शिफारशींचे पालन कारागृह प्रशासनाने केले तर आजची कारागृहे ही सुधारालये बनतील. कारागृहातील सुविधा, बंद्यांना दिली जाणारी वागणूक, सुविधा, प्रशिक्षण, कामाचा मोबदला या संदर्भात ज्या शिफारशी केल्या आहेत त्यांचे पालन झाले तर कारागृहातुन बाहेर पडणारा बंदी हा चांगला नागरिक म्हणून बाहेर पडेल आणि कारागृहा संदर्भातील सर्वसामान्यांचा जो दृष्टिकोन आहे तो बदलेल असे जाणवते.

# परिशिष्ट

- संदर्भ ग्रंथ सुची

- मुलाखत अनुसूची

# Bibliography / संदर्भ ग्रंथ सुची


1) Ansari M.A., 'Social Justice and crime in India, ' 1996, Subline Pub. Jaipur.1st

2) Ahuja Ram, 'Criminology, ' 2000, Rawat Publication, Jaipur

3) Chowdhury Nitan Roy, 'Indian Prison Laws and correcation of prisoners, '2002, Deep & Deep pub. Pvt. New Delhi.

4) Coffey Alan, 'Correcational Administration, ' 1975, Prentice-Hall, Inc, Englewood cliffs new jersey.

5) Crow IAIN, 'The Treatment & Rehabilitation of offenders, ' 2001, Sage Pub. New Delhi.

6) Eston susan & piper Christine, 'Sentening and punistiment, ' 2005, Oxford university press, new York, Ist

7) Gov.of Maharashtra, 'Maharashtra Prison manual, ' 1979, Yeravada preson press pune

8) 'Hand book of Prison Statistics, ' 2007, Jail Dept. Pune

9) Madan G.R., 'Indian social problems, ' 2005, Allied Publishers pvt.ltd. new Delhi, 5th volume-2

10) Mide Maguri, Jon Vagg, Rod Morgan, 'Accountability and Prisons, ' 1985, Tavistock Publications, Londan & New York, 1st

11) M. Ponnaian, 'Criminology & Penology, '1992, Pioneer books. Delhi, 3rd

12) Pranjape N.V., 'Criminology and Penology, ' 2003, Central law publications Allahabad.

13) Sethne M.J., 'Society and Criminal'

14) Short Renee, 'The care of long term prisoners, ' 1979, The Macmillan Press ltd. London.

15) Sing K., 'Criminology, ' 1996, Prakashn Kendara, Lakhnow, 1st

16) Shubhangi Gote -'Female Criminology in India : A Sociological Analytics' (१९८५-१९९२)

17) Smrti Bhosale-'Undertrial Female Criminals in Mumbai : A Sociological Study. '

18) Stohr Mary, Walsh Anthony, Henmens Craig, 'Corrections -A Text/Reader, ' 2009, SAGE Publication India Pvt. Ltd. New Delhi

19) Swati Mehata, 'Maharashtra Abandoned Prisons - A Study Of Jails. ' 2010.

20) Vadockumchery James, 'Crime,Police & Correction, '

21) अग्नीहोत्री ए.एन., 'अपराधी कल्याण के विविध आयाम ', 1995, आराधना ब्रदर्स कानपुर, प्रथम

22) उपाध्याय उमेश, 'वर्तमान सामाजिक समस्याएँ ', 2004, विकास प्रकाशन कानपुर, प्रथम

23) कुमार आलोक, 'अपराध और समाज ', 2011, इशिका पब्लिशिंग हाऊस, जयपुर, प्रथम

24) जैन सुरेश, जैन निमीत, 'कानुनी सलाह ', तुलसी साहित्य पब्लिकेशन, मेरठ

25) प्रसाद गोविंद, 'आधुनिक सामाजिक समस्याएँ ', 2007, डिस्कव्हरी पब्लिकेशन, नवी दिल्ली, प्रथम

26) भट्टाचार्य सुनिल कान्त, 'भारत की सामाजिक समस्याएँ- मुद्दे और परिप्रेक्ष ', 2004, राधा पब्लिकेशन, नवी दिल्ली. प्रथम

27) मदन जी.आर., 'भारत की सामाजिक समस्याएँ ', 2000, विवेक प्रकाशन नवी दिल्ली, 5th

28) महाजन संजीव, 'भारत में सामाजिक विघटन ', 2004, अर्जुंन पब्लिकेशन, नवी दिली, प्रथम

29) मिश्रा महेन्द्र कुमार, 'भारतीय सामाजिक समस्याएँ ', 2012, के.एस.के. पब्लिकेशन, नवी दिल्ली, प्रथम

30) यादव रामजी, ‘सामाजिक समस्याएँ ’, 2005, अर्जुंन पब्लिकेशन नवी दिल्ली, प्रथम

31) राय एस. चन्द्रकुमार, ‘विवेचनात्मक अपराधशास्त्र ’, 2004, अर्जुंन पब्लिशिंग हाऊस, नवी दिल्ली, प्रथम

32) राय एस.चन्द्रकुमार, ‘भारतीय सामाजिक समस्याएँ ’, 2004 , अर्जुंन पब्लिशिंग हाऊस नवी दिल्ली, प्रथम

33) रस्तोगी आर.के., ‘सामाजिक अनुसंधान, सर्वेक्षण एवं सांख्यिकी ’, 2006, संजीव प्रकाशन मेरट,

34) वर्मा ओ.पी., ‘भारतीय सामाजिक समस्याऍ ’, 2004, विकास प्रकाशन कानपुर, प्रथम

35) शर्मा एम.एन., ‘ सामाजिक मनोविज्ञान ’, राजीव प्रकाशन मेरठ, प्रथम

36) शर्मा आर.डी., ‘भारतीय संविधान में मानव अधिकार और संरक्षण ’,

37) शर्मा रामनाथ, शर्मा राजेन्द्र कुमार, ‘सामाजिक विघटन ’, 1996, एटलंटा पब्लिशर्स ॲण्ड डिस्ट्रीब्युटर्स, नवी दिल्ली, प्रथम

38) शर्मा विरेन्द्र प्रकाश, ‘भारतीय समाज मुद्दे और समस्याएँ ’, 2004, पंचशिल प्रकाशन जयपुर,

39) शर्मा विरेन्द्र प्रकाश, ‘समाजशास्त्रीय अनुसंधान की विधीयाँ एवं पध्दतीयॉ ’, 2005, पंचशिल प्रकाशन जयपुर,

40) सिन्हा बद्री नारायण, ‘अपराधीकी ’, 1974, बिहार हिन्द ग्रंथ अकादमी, पटणा, प्रथम

41) सिंह जीत कृष्णा, ‘अपराधशास्त्र और दंडशास्त्र ’, 2001, प्रकाशन केंद्र लखनौ

42) हरिकिशन, ‘सामाजिक सर्वेक्षण एवं अनुसंधान ’, 2009, एटलंटा पब्लिशर्स ॲण्ड डिस्ट्रीब्युटर्स, नवी दिल्ली.

43) आगलावे प्रदिप, ‘संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे ’, २०००, विद्या प्रकाशन नागपुर, प्रथम

44) काचोळे दा.धो., ‘गुन्हा-समाजशास्त्र ’, २००१, कैलाश पब्लिकेशन औरंगाबाद, प्रथम

45) काचोळे दा.धो., ‘भारतीय समाज रचना ’, २०००, कैलाश पब्लिकेश, औरंगाबाद,

46) काचोळे दा.धो., ‘भारताच्या विघटनात्मक समस्या ’, १९९८, कैलाश पब्लिकेशन औरंगाबाद

47) कांबळे उध्दव, ‘मानवी हक्क, तत्व आणि दिशाभुल ’, २००७, साकेत प्रकाशन औरंगाबाद, प्रथम

48) के. पार्क, अनुवाद- दिक्षीत जगन्नाथ, ‘सामाजिक आरोग्य परिचर्या ’, २००९, बनारसीदास मनोत पब्लिशर्स जबलपुर, आवृत्ती ४

49) कुलकर्णी काशिनाथ, ‘गुन्हे, गुन्हेगार व त्यांना सुधारण्याचे तंत्रज्ञान ’, १९९८, सुयोग प्रकाशन पुणे, व्दितीय

50) किरण बेदी - अनुवाद- परमेश डंगवाल, ‘आय डेअर ’, १९९६, मेहता पब्लिकेशन हाऊस पुणे, प्रथम

51) काळदाते सुधा, ‘आधुनिक भारताच्या समस्या ’, २००५, मंगेश प्रकाशन, नागपूर.

52) काळदाते सुधा आणि गायकवाड शंकर, ‘वैद्यकीय समाजशास्त्र ’, १९९३, श्री लक्ष्मी प्रकाशन औरंगाबाद, प्रथम

53) खडसे भा.की., ‘भारतातील सामाजिक समस्या ’, १९९९, मंगेश प्रकाशन नागपुर, आवृत्ती ७

54) गृह विभाग , (कारागृह) पुणे, ‘नागरीकांची सनद ’, येरवाडा कारागृह मुद्रनालय, पुणे

55) घाटगे जयंत, ‘समकालीन भारतीय सामाजिक समस्या ’, 1999, घाटगे प्रकाशन कोल्हापूर

56) घाटोळे रा.ना., ‘संशोधन पध्दती ’, 2003, कैलाश पब्लिकेशन औरंगाबाद, प्रथम

57) चौधरी राजेश, ‘भारताचे संविधान ’, 2008, चौधरी लॉ पब्लिशर्स पुणे

58) पाटे सुमन, ‘भारतातील सामाजिक समस्या ’, 2000, विश्व पब्लिकेशन नागपुर, सुधारीत आवृत्ती

59) पोलीस मार्गदर्शीका, औरंगाबाद पोलीस, 2012, ओंकार प्रकाशन औरंगाबाद

60) माने माणिक, ‘गुन्हेगारीशास्त्र ’, 1999, फडके प्रकाशन कोल्हापुर

61) मराठी समाजशास्त्र परिषद, समाजशास्त्र संशोधन पत्रिका, डिसेंबर 2009, अंक 10

62) मेश्राम सुरेश, ‘प्रात्यक्षिक सामाजिक संशोधन ’,2000, कृष्णचंद्र एजन्सी नागपुर, प्रथम

63) रा.ज. लोटे, ‘भारतातील सामाजिक समस्या ’, 1999, पिंपळापुरे प्रकाशन नागपुर, आवृत्ती 4

64) शेलकर राम, काळे भालचंद्र, ‘भारतीय दंड संहिता ’1860, 2007, अशोक ग्रोवर आणि सन्स प्रकाशन औरंगाबाद, आवृत्ती 3

65) साळुंखे सर्जेराव, ‘समाजशास्त्रातील मुलभुत संकल्पना ’, 2000, नरेंद्र प्रकाशन पुणे. प्रथम

# <u>मुलाखत अनुसुची</u>

मध्यवर्ती कारागृहातील बंद्याचा अभ्यास(मध्यवर्ती कारागृह हर्सुल,औरंगाबाद) या विषयावर संशोधन करित असून या संशोधनासाठी आवश्यक आसणारी माहिती मला देण्यात यावी, ही माहिती गोपनीय स्वरुपात ठेवून या माहितीचा उपयोग केवळ संशोधनासाठीच केला जाणार आहे. तरी आपण माहिती देवून सहाकार्य करावे ही नम्र विनंती.

**संशोधक** — **मार्गदर्शक**

**सुधीर बसवंत गायकवाड** — **प्रा.डॉ.श्रीकांत गायकवाड**

१) संपूर्ण नाव : ______________________

२) लिंग : स्त्री / पुरुष ३) वय : ______________________

४) धर्म : ______________________ ५) जात : ______________________

६) शिक्षण : ______________________ ७) मुळपत्ता : ______________________

८) मातृभाषा : ______________________

९) सध्या कुटूंबाचे राहण्याचे ठिकाण : ______________________

१०) वैवाहिक दर्जा : विवाहित/अविवाहीत

११) व्यवसाय : ______________________

**१) कुटूंबाविषयी माहिती**

| अ.क्र | कुटुंब सदस्यांची नावे | लिंग | वय | शिक्षण | बंद्याशी नाते | व्यवसाय |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

२) कुटूंबाचा प्रकार : संयुक्त/विभक्त/भग्न

३) कुटूंबाचा वडीलोपार्जीत व्यवसाय : शेती/मजुरी/नोकरी/व्यवसाय/इतर

४) तुम्हाला स्वत:ची जमीन आहे काय ? अ) होय ब) नाही

४.१) होय असल्यास किती एकर ? ________________

५) कुटूबांचे सध्या उत्पन्नाचे साधन काय आहे ? ________________

६) सध्या कुटूंबीयाचे वास्तव्य कुठे आहे?

अ) पुर्वी होते तिथेच ब) स्थलांतरीत क) विस्कळीत

७) कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न किती आहे ? ________________

८) तुम्हाला शिक्षा झाल्याने तुमच्या कुटूंबावर काय परिणाम झाला आहे?

________________

९) कुटूंबातील व्यक्तींची आपल्याबददल आपलेपणाची भावना आहे का ?

अ)होय ब) नाही

१०) घरच्या लोकांची आठवण येते की ? अ)होय ब) नाही

११) तुम्ही केलेल्या आपराधात कुटूंबातील इतर कोण सहभागी होते का ? अ)होय ब)नाही

११.१) होय तर कोण कोण ? ________________

१२ ) इथे येण्यापूर्वी तुमचे मित्र होते काय ? सध्या ते काय करतात?

१३) तुमचे मित्र तुमच्या कुटूंबीयांना मदत करतात का? अ)होय ब) नाही

१३.१) होय तर कशा स्वरुपाची ? ________________

१४) तुमचे कुटूंबीय जेथे राहतात तेथील घराचे स्वरुप कसे आहे? ________________

१५) तुमच्या व्यतिरिक्त कुटूंबातील इतर कोणी सदस्यांनी कधी गुन्हा केला होता काय ?

अ) होय ब) नाही

१५.१) होय तर त्यांनी कोणता गुन्हा केला ? ________________

१५.२) त्यांना शिक्षा झाली का ? अ) होय ब) नाही

१५.३) त्यात तुम्हा सहभागी होता का ? अ) होय ब) नाही

१५.४) तुम्हालाही शिक्षा झाली होती का ? अ) होय ब) नाही

१५.५) होय तर किती वर्षाची ________________

## सामाजिक व राजकीय

१) सामाजिक कार्यात तुम्ही सहभागी होत होता काय ? अ) होय ब)नाही

२) समाजात तुमच्या कुटूंबाचे स्थान कसे आहे ? ________________

३) सामाजिक नियमांचे पालन करता होता काय ? अ) होय ब)नाही

४) देवावर तुमचा विश्वास आहे काय ? अ) होय ब)नाही

५) धार्मिक कार्यक्रमात सहभागी होत होता का? अ) होय ब)नाही

६) मतदान करत होतात का ? अ) होय ब)नाही

**मानसीक व आरोग्य विषयक**

१) तुम्हाला संगित, गाणे आवडते काय ? अ) होय ब)नाही

१.१) होय तर कशा प्रकारचे ? शांत /अर्थपूर्ण/कर्कश

२) तुम्हाला चित्रपट कोणते आवडतात ? कॉमेडी / घरेलु / ज्ञानवर्धक

३) तुमच्या हातुन गुन्हा झाल्याने चुक झाली आहे असे वाटते काय ? अ)होय ब)नाही

४) तुमची आरोग्य तपासणी महिन्यातून किती वेळेला होते ? ____________

५) आपण सध्या कुठल्या आजाराने आजरी आहेत काय ? अ)होय ब)नाही

५.१) होय तर कोणता ? ____________

५.२) त्यावर उपचार चालु आहेत का ? अ)होय ब)नाही

**केलेल्या अपराधाविषयी माहिती**

१) तुम्ही कोणता गुन्हा केला आहे? त्याविषयी सांगा

कधी केला- ____________

किती लोकांनी केला- ____________

का केला - ____________

२) आपणास किती वर्षाची शिक्षा झाली आहे ? ____________

३) तुम्ही खरोखरच गुन्हा केला आहे काय ? ____________

४) गुन्हा करण्यापाठीमागची काही पार्श्वभूमी ____________

५) आपल्या हातून गून्हा घडला तेव्हा गुन्हा करावे असे वाटले का ? ____________

६) गुन्हा केल्याचा आता पश्चाताप होतो का ? अ)होय ब)नाही

७) तुम्ही गुन्हा घडला तेव्हा व्यसन केले होते काय ? अ)होय ब)नाही

७.१) होय तर कोणते ? ______________________________

८) आता तंबाकू, सिगारेट, बीडी यांचे व्यसन करता का ? कोणते ? __________

९) शिक्षा संपून घरी गेल्यावर काय करणार ? व्यवसाय / शेती / व्यापार / गुन्हे

१०) शिक्षा संपल्यावर कुटुंब, समाज तुमचा स्विकार करेल काय ? अ)होय ब)नाही

११) झालेल्या एकूण शिक्षेपैकी काही शिक्षा माफ झाली आहे काय ? अ)होय ब)नाही

११.१) होय तर किती ______________________________

**कारागृहातील मिळणाऱ्या सुविधा विषयक माहिती**

१) कारागृहातील दिनचर्या सांगा ? ______________________________

२) आहार काय व किती मिळतो ?

सकाळ ________________ संध्याकाळ ________________

३) आहार पुरेसा मिळतो का ? अ) होय ब)नाही

४) पिण्यासाठी स्वच्छ व मुबलक पाणी आहे काय ? अ) होयब)नाही

५) राहण्याच्या ठिकाणाचे वातावरण कसे वाटते ? प्रसन्न (प्रकाशमय) / अंधारमय

६) राहण्याची व्यवस्था कशी आहे ? स्वतंत्र / सामूहिक / अन्य ----------

७) कारागृहात मित्र झाले आहेत काय? किती ? अ) होय ब)नाही -------------

८) आपल्या आवडीनुसार व्यावसायिक प्रशिक्षण दिले जाते काय ?

अ) होय ब)नाही

९) तुम्ही प्रशिक्षण घेता/घेतले आहे काय? अ) होय ब)नाही

९.१) कोणते ? ______________________________

९.२) हे प्रशिक्षण तुमच्या आवडीचे आहे काय ? अ) होय ब)नाही

१०) तुमच्या सोबत किती लोक प्रशिक्षण घेतात (काम करतात) ________________

११) तुमचे सोबती तुमच्या सोबत कसे वागतात? मैत्रीपुर्ण / खोडकर / भांडणे करतात / इतर---

१२) दिवसातून किती तास काम करता ? ______________________________

१३) कामाचा मोबदला मिळतो का? किती ? अ) होय ब)नाही ---------------

१४) मोबदल्याची नोंद होते काय ? ____________________

१५) काम करताना इजा झाल्यास प्रथमोपचार ताबडतोब काय केले जातात ? __________

१६) शिक्षा संपल्यावर मिळालेल्या प्रशिक्षणाचा फायदा होईल असे वाटते काय ? अ) होय ब)नाही

१६.१) होय तर कसे ? ____________________

१७) सध्या तुम्ही शिक्षण घेत आहात का ? अ) होय ब)नाही

१७.१) होय तर कोणते ? ____________________

१७.२) शैक्षणिक साहित्य पुरवले जाते काय ? अ) होय ब)नाही

१८) मनोरंजनाची साधने कोणती आहेत? ____________________

१९) कारागृहात कोण कोणते सामुहिक कार्यक्रम साजरे होतात ? ____________________

१९.१) त्यात तुम्ही सहभागी होतात का ? अ) होय ब)नाही

२०) तुम्हाला मानसिक समाधान मिळते काय ? अ) होय ब)नाही

२१) रिकाम्या वेळेत काय करता ?

२२) तुम्हाला कोण कोणती आवड आहे ? ____________________

२३) कारागृह कर्मचाऱ्यांकडुन वागणूक कशी मिळते ? ____________________

२४) तुमच्या सहकार्याकडून कशी वागणूक मिळते ? ____________________

२५) तुम्हाला घर आणि कारागृह यात फरक जाणवतो का ? कोणता ? __________ __________

२६) तुमची गुन्हेगारी प्रवृत्ती कमी झाली आहे काय ? अ) होय ब)नाही

२७) तुम्हाला भेटायला कोणकोण ? कधी येतात ? ____________________

२८) कुटूंबीयांना भेटण्याचे नियम असावेत का ? किंवा महिन्यातुन किती वेळा कुटूबियांनी भेटण्यासाठी यावे असे वाटते ? __________ __________

२९) व्याख्यान, योगा, विशेष शिबीरे घेतली जातात का ? अ) होय ब)नाही

३०) तुम्ही त्यात सहभागी होता काय ? अ) होय ब)नाही

३१) तुम्हाला घरी भेटून येण्यासाठी सुटी मिळते काय ? अ) होय ब)नाही

३१.१) महिन्यातुना किती वेळा व किती दिवसाची ________________ ________________

३२) तुम्ही बाहेर जामीनावर असतांना खर्च कोणी केला ?

अ) कुटुंबीय ब) मित्रमंडळी क) नातेवाईक ड) इतर ________________

३३) गंभीर गुन्हेगारासाठी राहण्याची स्वतंत्र व्यवस्था आहे काय ? अ) होय ब)नाही

३४) इतर गुन्हेगारांचा तुमच्यावर कोणता परिणाम होतो काय ? ________________

३५) आपणास जी शिक्षा झाली आहे त्याबददल आपले मत काय ?

३६) ६० वर्षापेक्षा जास्त वयोवृध्द गुनहेगारांना कारागृहात ठेवले जाते काय ? अ) होय ब)नाही

३७) कारागृहात राबविल्या जाणाऱ्या वेगवेगळया उपक्रमावर तुम्ही समाधानी आहात काय ?

अ) होय ब) नाही

३८) कैद्यांना सुधारण्यासाठी कारागृहात आणखी कोणत्या सुविध व्हायला हव्यात ते सांगा ?

*************